# THE BOOK WAS DRENCHED

# स्मरण-यात्रा

लेखक
काका कालेलकर

५९२०.९
K 14S

UNIVERSAL
LIBRARY

OU_192351

UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No M920.9 K14S Accession No M1250

Author काळेलकर, ना.सी.

Title स्मरणचित्रे.

This book should be returned on or before the date last marked below

# स्मरण-यात्रा

लेखक
काकासाहेब कालेलकर

किंमत तीन रुपये

प्रकाशक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार, पुणे २.

मुद्रक
केशव गणेश शारंगपाणी
आर्यभूषण मुद्रणालय
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

ऑगस्ट १९४९

માઝ્યા મ્હાતારપણીં;
દેવાનેં, મુલગી મ્હણૂન
મજકડે પાઠવિલેલ્યા
ચિ. સરોજતકા.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रयोजन आणि परिचय | ९ |
| | संस्मरणांची पार्श्वभूमि | २५ |
| | ( १८९२ ते १९०३ ) | |
| १ | माझे नांव | ५२ |
| २ | अुजवा का डावा ? | ५५ |
| ३ | साताऱ्याच्या आठवणी | ५८ |
| ४ | बाबाची खोली | ६६ |
| ५ | सीताफळाची बी | ७२ |
| ६ | विद्यारंभ | ७४ |
| ७ | अक्का | ८० |
| ८ | पैसे सांडले | ८७ |
| ९ | मोडका मास्तर | ९० |

| | | |
|---|---|---|
| १० | तूं कोणाचा ? | ९३ |
| ११ | पेरू आणि जिलब्या | ९५ |
| १२ | देशावरून कोंकणांत | ९९ |
| १३ | मला रुक्का द्या | १०३ |
| १४ | सभा | १०७ |
| १५ | दोन टाअिपांचा चोर | ११० |
| १६ | भित्री हिंमत | ११५ |
| १७ | गणपतीचा प्रसाद | ११८ |
| १८ | गोकर्णाची यात्रा | १२२ |
| १९ | आपण हत्ती विकत घेऊं | १३३ |
| २० | वाचनाचा आरंभ | १३७ |
| २१ | यल्लाम्माची जत्रा | १४२ |
| २२ | विठोबाची मूर्ति | १४८ |
| २३ | अुपास्य स्वयंवर | १५१ |
| २४ | पंढरी | १५७ |
| २५ | बाबाचा प्रभाव | १६४ |
| २६ | घटप्रभेच्या कांठीं | १६७ |
| २७ | निर्धार ( महाशिवरात्री ) | १७० |
| २८ | रामाची चान्नी | १७५ |
| २९ | वाजंत्र्यांचा अिलाज | १७९ |
| ३० | श्रावणी सोमवार | १८३ |
| ३१ | बोटें मोडण्याची कला | १८७ |
| ३२ | कुसंस्कार | १९२ |
| ३३ | मी मोठा केव्हां झालों | १९५ |
| ३४ | पंचरंगी पोपट | १९८ |
| ३५ | धाकटा झालों म्हणून | २०२ |
| ३६ | शहाणें होण्याची ना | २०७ |
| ३७ | देशभक्तीची गुणगुण | २११ |

| | | |
|---|---|---|
| ३८ | ज्युबिली–प्रसंगीं खून | २१३ |
| ३९ | शत्रु–मित्र | २१६ |
| ४० | अिंग्रजीचें वाचन | २१९ |
| ४१ | चिंचेवरील दीक्षा | २२१ |
| ४२ | नागरवेलाची वाडी | २२३ |
| ४३ | हकीम साहेब | २२७ |
| ४४ | व्रतनिष्ठ कुत्री | २३३ |
| ४५ | भाषांतर पाठमाला | २३५ |
| ४६ | ढोळधाड | २३९ |
| ४७ | वाघाची मावशी | २४५ |
| ४८ | सुरू पार्क | २४९ |
| ४९ | गणितबुद्धि | २५३ |
| ५० | भाअूचा अुपदेश | २५८ |
| ५१ | जगन्नाथबुआ | २६१ |
| ५२ | कपाल–युद्ध | २६५ |
| ५३ | मायाळू बाळिगा | २६८ |
| ५४ | साखर झोंप | २७२ |
| ५५ | माझी योग्यता | २७६ |
| ५६ | शनिवारची तोफ | २८० |
| ५७ | न्यायाचा अत्याचार | २८७ |
| ५८ | हिन्दुस्कूल | २९१ |
| ५९ | वामन मास्तर | २९७ |
| ६० | सिंहनाद | ३०१ |
| ६१ | शिक्षकाची अीर्षा | ३०७ |
| ६२ | मादक वाचन | ३१३ |
| ६३ | धारवाडचा भाजीबाजार | ३१८ |
| ६४ | गुप्त मंडळ | ३२३ |
| ६५ | कुसंस्काराचा पाश | ३२६ |

| | | |
|---|---|---|
| ६६ | फोटोची चोरी | ३३१ |
| ६७ | अंमलदाराचा मुलगा | ३३६ |
| ६८ | खेचरगाडी | ३३९ |
| ६९ | काव्यमय वरात | ३४२ |
| ७० | चोरांचा पाठलाग | ३४५ |
| ७१ | गृहस्थाश्रम | ३४८ |
| ७२ | भातकुली | ३५० |
| ७३ | गेस्ट हाऊसमधील अनुभव | ३५३ |
| ७४ | विठू आणि भानू | ३५६ |
| ७५ | भाजलेला भक्त | ३७० |
| ७६ | तेरदाळचें मृगजळ | ३७३ |
| ७७ | जीवन पाथेय | ३७६ |


●●●

## प्रयोजन आणि परिचय

लहानपणापासून आपण जें जीवन जगलों तें आठवणीच्या रूपानें पुन्हां जगण्यांत अेक प्रकारचा आनंद असतो. जीवनयात्रा बरीचशी संपविल्यानंतर तिची अशा रीतीनें अुजळणी करणें यालाच मी स्मरणयात्रा म्हणतों जवळ जवळ सहाव्या वर्षापासून अठराव्या वर्षापर्यंतचाच भाग माझ्या या स्मरणयात्रेंत येऊन जातो.

पण माझी ही ' स्मरणयात्रा ' आत्मचरित्र नाही. मधूनमधून आठवलेले कित्येक जीवन-प्रसंगच येथें नमूद केले आहेत. जीवनात घडलेले महत्त्वाचे फेरफार किंवा वेळोवेळी आलेले खोल अनुभव नमूद करण्याचाही येथें अिरादा नाही.

शिक्षक या नात्यानें बालकाच्या आणि युवानाच्या पवित्र सहवासात ज्याचे पुष्कळ दिवस गेले आहेत त्याला ठाअूक असतें की बालकाच्या आणि तरुणाच्या मनातील संकोच दूर करून त्याना जर स्वतःविषयी बोलावयास लावावयाचें असलें, त्याच्याशी आपली सहानुभूति दाखवावयाची असली, अथवा आत्मपरीक्षण करण्याची कला जर त्याना शिकवावयाची असली, तर जी स्वाभाविक साधनें आपल्याला वापरतां येतात, त्यापैकी अेक महत्त्वाचें साधन म्हणजे आपण आपल्या स्वतःच्या बालपणाचें प्राजल आणि निःसंकोच निवेदन करणें-हें होय. लहानपणी आपण अनुभविलेल्या आशा-निराशा, त्यावेळी मनाचा होत असलेला मुग्ध कोंडमारा, आपल्याला प्रथमच आकर्षूं शकलेले काव्यमय

प्रसंग, इत्यादि वस्तूंचें वर्णन जर आपण केलें तर मुलांचें हृदय-कमल आपोआप उमलूं लागतें. स्वतःचे गुण-दोष, जय-पराजय, कधींकधी वाटलेला क्षुद्र अहंकार आणि हातून घडलेला सहज स्वार्थ-त्याग यांचें जर हुबेहुब चित्र त्यांचेपुढें रंगवलें तर त्याना असाधारण आनंद होतो. कारण लहानाना वाटूं लागते की या वडील मंडळींचें जीवन ज्या अर्थी आपलेसारखेंच होतें त्या अर्थी यांना आपलें मानस सहज आणि बरोबर समजूं शकेल. अेवढेंच नव्हें तर त्याचा हे सहानुभूतिपूर्वक विचारही करूं शकतील.

अेखादें नवीन राज्य स्थापन झालें म्हणजे तें जगांतील सर्व जुन्या राष्ट्रांना जाहीर करतें कीं "आम्ही नवीन अस्तित्वांत आलों आहोंत. आमचें अस्तित्व मान्य करा." प्रमुख राष्ट्राकडून त्यांना मान्यता मिळाली म्हणजे नव्या राष्ट्राला धन्यता वाटते आणि आत्मविश्वासही वाटतो की जगांत आपणही कोणीतरी आहों.

बालकांचें आणि तरुणांचेंही असेंच असतें. आपला अनुभव, आपल्या चुका, आपल्या महत्त्वा-

कांक्षा आणि आपला बावळटपणा—यांपैकी कांहींच अनन्यसाधारण नाही. आपलेसारखेच अितरही पुष्कळ आहेत. किबहुना मनुष्यजात पिढ्यान् पिढ्या आपल्यासारखाच अनुभव घेअून, आणि आपल्याप्रमाणेंच टक्केटोणपे खाअून जीवनसमृद्ध होत आली आहे—असें पाहून तरुणाना हायसे वाटतें. स्वतःची महत्त्वाकांक्षा यथायोग्य आहे. जें अितरांना साधलें तें आपल्यालाही साधेल असें वाटूं लागून त्यांचा आत्मविश्वास दुणावतो.

स्वतःचे जीवनप्रसंग अगदी प्रामाणिक शब्दात तरुणापुढें अुजू करून मी कितीतरी मुग्ध हृदयें अुघडली आहेत. अितर कोणचीही मदत करता आली नाही अशा वेळी देखील त्यांना सहानुभूतीची मूल्यवान मदत मी देअूं शकलों आहे.

प्रत्येक संस्मरणांत वजनदार बोध, विचाराचें गांभीर्य किंवा काव्यमय चमत्कृति असलीच पाहिजे असेंही नाही. प्रत्येक संस्मरणाच्या श्रवणांनं मुग्ध हृदयाची तार छेडली गेली आणि 'होय मलादेखील असाच अनुभव आला होता'

असें हंसत हंसत किंवा ओलसर डोळ्यांनी कबुली जबाब मिळाला तरी बस आहे.

आपल्या देशांत चरित्रलेखन फारसें पहावयास मिळतच नाही. आपले लोक महात्म्यें लिहितात, स्तोत्रें लिहितात. चरित्रें लिहूं शकत नाहींत. दुसऱ्याचीं चरित्रें लिहिण्याच्या बाबतींत जेथें असा दुष्काळ आहे तेथें आत्मचरित्राविषयी काय सागावें ? तुकाराम महाराजांनी आत्मचरित्रपर दहा-पांच अभंग लिहिताना देखील केवढा कंटाळा आणि संकोच व्यक्त केला आहे !

प्रथम मला वाटलें की आपल्या लोकाना चरित्रलेखन साधत नाही अेवढेंच पण 'स्मरण-यात्रें'तील प्रकरणें वाचून कित्येक मित्रांनी केलेली टीका जेव्हां मी अैकली तेव्हा माझ्या ध्यानांत आलें की आत्मचरित्र लिहिणें हेंच आपल्या संस्कृतीला आणि शिष्टाचाराला मान्य नाही. लोभी माणसाच्या हातून सहजासहजीं जी पापें घडतात, त्यांची परंपरा सांगत असतांना जगदी कळस म्हणून, भर्तृहरीनें 'निजगुणकथापातक' सागितलें आहे. मनुष्यानें आत्मचरित्र लिहावें किंवा न

लिहावें या विषयींची चर्चा करून गांधीजीनी निर्णय दिला आहेच.

मला स्वतःला वाटतें कीं श्रेष्ठ किंवा असाधारण विभूतीनीच नव्हें, परंतु अत्यंत सामान्य, निर्विशेष, प्राकृत व्यक्तीनी देखील जर प्राजलपणे, विशिष्ट शिष्टाचार संभाळून आत्मचरित्रें लिहिली तर तें भिष्टच आहे. प्रत्येक माणसाजवळ अत्यंत महत्त्वाची गोष्ट जर असेल तर ती त्याचा स्वतःचा अनुभव होय. असा अनुभव कोणी सहृदयपणें आपल्यापुढें माडला तर आपण त्यांचें स्वागत का करूं नये ? मतलबी प्रचारकानी तयार केलेले अितिहास किंवा रंगवलेली चरित्रें वाचण्यापेक्षां अेक खरेंखरें आत्मचरित्र वाचल्यानें आपल्याला अधिक बोध मिळतो. आणि आपल्या अभिरुचीत कृत्रिमपणा आला नसेल तर अेखाद्या कादंबरीहून अशा आत्मचरित्रांत आपल्याला कमी गोडी वाटावयास नको दुःखाची गोष्ट अेवढीच आहे की पुष्कळाना स्वतःचे अनुभव, दुसरे समजूं शकतील अशा शब्दांत धड मांडताच येत नाहींत.

पण मला माझ्या स्मरणयात्रेचा अेवढादेखील

बचाव करावयाचा नाहीं. कारण मी प्रथमच सांगितलें आहे की हें आत्मचरित्र नव्हेंच मुळी !

कित्येक वाचकांना या स्मरणयात्रेंत कोठें कोठें आत्मप्रौढीचा वास येअील. त्यामुळें ते नाराज होण्याच्या पूर्वीच येथें अेवढें नमूद करणें बस आहे की आत्मप्रौढीनें मनुष्याची प्रतिष्ठा वाढत नसून कमी होत असते, हें मला ठाअूक आहे. मनुष्य स्वतःविषयी चागलें चांगलें लिहूं लागला तर त्याची छाप चागली पडत नाहीच; अुलट लोक साशंक होअून म्हणूं लागतात की शेवटी स्वतःच स्वतःला दिलेलें हें प्रमाणपत्र आहे ना ?

अेवढी जागृति बाळगून मी जें काही लिहिलें असेल तें आधळेपणानें नव्हें पण स्पष्ट जोखीम पत्करून लिहिलें आहे. वाचक जर सूक्ष्मपणें पहातील तर त्यांना दिसून येअील की, त्या त्या प्रसंगात आत्मप्रौढी मिरविण्यासारखें काही नाहीच मुळी. आणि बाळपणाच्या गोष्टीत असें काय असणार की ज्या संबंधानें आज मला स्वतःची तटस्थता सोडण्याचा मोह व्हावा ? श्रोत्यांच्या

अंतःकरणापर्यंत पोहोंचण्यासाठी जेवढी स्वाभाविकता आवश्यक वाटली तेवढी मी निःसंकोचपणें वापरली आहे. ही संस्मरणें अुपदेश करण्याच्या अिराद्यानें लिहिलीं नसून सहानुभूति जागृत व्हावी या अेकमात्र अुद्देशानें लिहिली आहेत पुष्कळदां नीतिबोधापेक्षा हृदयपरिचयच अधिक मदतगार आणि संस्कारक ठरतो.

जीं संस्मरणें लिहिली आहेत ती तरुणांसाठी आहेत. अितराना हा आपबोलीचा प्रकार न रुचला तर त्यानी हे सर्व प्रसंग काल्पनिक आहेत अशी धारणा करून वाचावे म्हणजे वाचताना त्याचा विरस होणार नाही.

राष्ट्रसेवक म्हणून काम करीत असताना 'स्मरण-यात्रा' लिहिण्याला वेळ मिळणें किंवा तसा संकल्प अुठणें शक्य नव्हतें. पण आजारी पडून जीवन यात्रेचा वेग मंद पडला तेव्हां मनो-विनोद म्हणून ही स्मरणयात्रा लिहिली गेली. अेकंदर प्रकरणें १०८ किंवा ११२ झाली होती. पण अेकदोन दुर्दैवी घटनांमुळें बरीच प्रकरणें साडलीं. पढें त्यांतील कांही परत मिळाली. नष्ट झालेलीं

प्रकरणें पुन्हां लिहून काढणें अशक्य नाही तसेंच सोपेंही नाहीं. अेखादी गोष्ट अेकदा लिहिल्यानंतर ती पुन्हा लिहितांना पहिल्यासारखा अुत्साह वाटत नाही. कित्येक संस्मरणें लिपिबद्ध होताच शरद् अृतूंतील ढगाप्रमाणें हलकी होअून अुडून जातात आणि मग त्यांना प्रयत्नपूर्वक ताजीं करूं गेलें तर ती पहिल्यासारखी सोपी राहत नाहीत. अेकदां लिहिलेली अक्षरें पुन्हा पुन्हां घोटल्यामुळें तीं जशी बोजड होतात त्याचप्रमाणें सहजगत्या लिहिली गेलेली फुलासारखी अुडतीं संस्मरणें, घोटली गेल्यानें, त्यांत अंतर्मुखता येअून ती जड होतात

जेव्हा कधीं हीं प्रकरणे नजरेखालून पुन्हा जातात अथवा स्नेही मंडळी याचा अुल्लेख करतात, तेव्हां अशाच प्रकारचे अनेक मौजेचे प्रसंग आठवतात ते सर्व जर लिहूं गेलों तर या स्मरणयात्रेशी समातर अशी याच काळाची दुसरी स्मरणयात्रा सहज तयार होअील. पण अशा दोन स्मरणयात्रांचा लेखन काळ भिन्न झाल्यामुळें आणि मनोवृत्तीतही पुष्कळ पालट झाल्यामुळें नव्या

स्मरणयात्रेचा सूरच निराळा व्हावयाचा. अेकच काळाविषयीचे दोन प्रामाणिक वृत्तांत भिन्न भिन्न काळी, भिन्न भिन्न वृत्तीनी लिहिले गेल्यामुळें त्यामध्यें मूलभूत अेकता असून देखील त्यांत केवढी भिन्नता येअूं शकते हें पहावयास मिळाल्यानें तो अेक आश्चर्याचा विषय होअून जाअील. आणि निदान साहित्यांत तरी सोन्यापेक्षां सोनाराचा प्रभाव किती असतो याची कांहीशी कल्पना येअील.

ज्या काळचे प्रसंग या संस्मरणात आले आहेत त्या काळचें माझें जीवन कौटुंबिक होतें. त्यात सामाजिक भाग क्वचितच दिसून येअी. व्यापक सामाजिक जीवनाची स्पष्ट कल्पना कॉलेजमध्यें गेल्यानंतरच होअूं शकली. त्या चार वर्षांत सामाजिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाचें बरेंचसे आकलन झाले. अेवढेंच नव्हें तर जीवनाच्या अनेक अंगअुपागाच्या बाबतीत माझे आदर्श कमी अधिक प्रमाणात स्पष्ट होअूं शकले त्या काळचें मनोमंथन आणि जीवनदर्शनातील नाविन्य आणि कुतूहल जर शब्दबद्ध केलें तर तशाच अवस्थेतून

पसार होणाऱ्यांना तें थोडेंबहुत अुपयोगी पडण्याचा संभव आहे. तें सर्व मनोमंथन लिहून काढावें असें पुष्कळदा वाटलें आहे. पण तशा प्रकारचा प्रारंभ मात्र होअूं शकला नाही.

ही प्रकरणें जेव्हां प्रथम लिहिलीं तेव्हा ती कालक्रमानें लिहिली नव्हती. प्रसंग जसजसे आठवत गेले, जसतसे ते लिहिले गेले पुढें ही प्रकरणें कालक्रमाप्रमाणें मांडली गेल्यामुळें अेक अडचण अुत्पन्न झाली आहे. त्या प्रकरणात येणाऱ्या कित्येक व्यक्तींचें प्राथमिक परिचय अुशीराने येतात आणि त्याचेविषयीचे अितर प्रसंग अगोदर येतात. गुजरातीच्या अनेक आवृत्ती झाल्या पण वरील व्युत्क्रम मी सुधारूं शकलों नाही. मराठी भाषांतरात थोडीबहुत सुधारणा केली आहे. पण कित्येक ठिकाणी हा दोष राहून गेला आहे. अेकदा वाटतें कीं पुढील आवृत्तीच्या वेळी हें सुधारत असतांना संबंध पुस्तकाची बरीच काटछाट करून त्याला आटोपशीर करावें. पण तसें करतांना पुस्तक सोवळें होअून जाअील की काय अशी भीति वाटते. पण भविष्यकाळची चिंता आज कशाला ?

मूळ पुस्तकाच्या गुजरातीत आजवर सहा आवृत्त्या झाल्या आणि पंधरा हजार प्रती त्या समाजांत वावरूं लागल्या तरीही ज्या समाजात माझें बाळपण गेलें त्या समाजात या माझ्या मराठी आवृत्तीचें कितपत स्वागत होअील याविषयी मनामध्यें धाकधुक आहे. श्री. देशमुखानी माझेशी सहकार करून हें पुस्तक अगदी स्वस्तात देण्याचे ठरविले ही अेक समाधानाची गोष्ट आहे

मराठी भाषातर होता होता कितीतरी वर्षें निघून गेली. त्यात माझा दोष नव्हता आणि मला त्याचा विषादही नाही.

स्वतः वार्धक्यात प्रवेश करीत असताना माझ्या बाळपणाच्या जीवनयात्रेचें वर्णन करणाऱ्या या स्मरणयात्रेला भीतभीतच समाजयात्रा करावयास पाठवून देत आहे.

ही स्मरणयात्रा मूळ गुजरातीत लिहिली होती. तिचें मराठी करण्याचें अेका स्नेह्यानें स्वेच्छेनें स्वीकारलें होतें. त्यांच्यानें तें झालें नाही म्हणून मीं स्वतःच तें काम आपल्या हाती घेतलें. लेखणी चालविण्याचा

सराव फारच कमी असल्यानें मला नेहमी अुदार हातांची मदत घ्यावी लागते आणि देवाने या बाबतीत मला कधीच वाण पडूं दिली नाही. मूळ गुजराती पुस्तक श्री. चंद्रशंकर शुक्ल यांनी आपल्या मोत्याच्या दाण्यासारख्या अक्षरानें मी सांगितलें तसें लिहून काढलें भाषांतराच्या बाबतीत देखील चि. श्रीपाद जोशी, शिवबालक बिसेन आणि सरोजिनी नाणावटी यानी थोडाफार हातभार लावला आहेच. पण बहुतेक सर्व लिखाण वेल्होर जेल-मध्यें पुरें केलें आहे. तेथें ही घरची मंडळी कशी मिळावी ? पण नागपूरचे माझे माननीय मित्र श्री भीकु-लालजी चाडक यानी मोठ्या प्रेमानें हें काम मागून घेतलें. याचें अक्षर देखील वळणदार आहे. या सर्वांचा येथें कृतज्ञतापूर्वक अुल्लेख करणेंही त्याना आवडायाचें नाही. तेव्हा कोणाचेही आभार मानण्याची हिमतच होत नाही. या अेका बाबतीत नेहमीच अगदीं जवळच्या स्नेह्याची देखील अभिरुचि हटकून आपल्या अभिरुचीच्या विरुद्ध असते. जें काम आपल्याला फारच गोड वाटतें तें करूं देतांना त्यांना भयंकर सायास पडतात.

१०: ६ ४९ वटपूर्णिमा
टीकमगड, विन्ध्य प्रदेश.

काका कालेलकर

●

पुढील प्रकाशनें

१ अनघा
*ग. त्र्य माडखोलकर*

२ मंगलसंसार
*गोपाल नीलकंठ दांडेकर*

३ अश्रु
*वि. स. खांडेकर*

●

# स्मरण-यात्रा

काका कालेलकर

## संस्मरणांची पार्श्वभूमि–

( १८९२ ते १९०३ )

माझा जन्म केव्हा झाला, हे निश्चितपणे सागणे कठिण आहे ज्योतिष्याकडून वडिलानीं जन्मपत्रिका करुन घेतली होती. माझ्या हातीं येतांच ती मी कोठे तरी हरवून टाकली. जन्माचे नक्की वर्ष काही ध्यानांत राहिले नाही. आओकडून ऐकले होतें की, माझा जन्म कार्तिक वद्य दशमीला झाला होता. माझेपेक्षा वडील बधूचा जन्म अि. सन १८८४ च्या प्रारंभी झाला होता. त्याचेहून मी दीड एक वर्षानें लहान, असें सर्वजण म्हणत असत. साताऱ्याला यादो गोपाळ पेठेमध्ये मी जन्मलों, हेहि मला ठाऊक होतें. अेवढया माहितीच्या जोरावर साताऱ्याच्या माझ्या अेका स्नेह्यानीं प्रयत्नपूर्वक जुने दाखले शोधून काढून माझा जन्मकाळ ठरवून दिला आहे. त्याप्रमाणे अि सन १८८५ च्या डिसेबरच्या पहिल्या तारखेस महाराष्ट्राची जुनी राजधानी सातारा येथें मी या भरतभूमीची हवा प्रथम पोटांत घेतली देशी तिथीप्रमाणें शके १८०७ कार्तिक वद्य १० मंगळवार हा माझा जन्मदिवस आहे. फल-ज्योतिषा-विषयीं मला विशेष आस्था नसल्यामुळे तिथी आणि वेळ याचें महत्त्व मला फारसें वाटत नाहीं. पण जेव्हां मी माझ्या आजीकडून अैकले कीं, मी जन्मलो त्या वेळी सकाळचा दहाचा समय होता व माझे वडील देवपूजेला बसले होते, तेव्हा मात्र मला फार आनंद झाला, का की माझ्या जन्मकाळी माझे जन्मदाते ओश्वराच्या ध्यानांत मग्न होते.

कालेलकर कुटुंब मूळचे सावंतांच्या वाडीकडील सावंतवाडीजवळ माणगांव म्हणून अेक कसबा आहे. तेथून जवळच कालेली म्हणून अेक खेडेगांव आहे. आमचें आडनांव या गावावरूनच पडले. असें म्हणतात कीं, आमचे मूळचें आडनांव राजाध्यक्ष असें होतें. आमच्या कुळांतील कांही जण रांगणेकर झाले, आणि कांहीं कालेलकर. सावंतवाडीच्या आसपास त्या काळी पुंडाअी चालत अमल्यामुळे आमचें पूर्वज कोकण सोडून बेळगांवकडे आले. माझे आजोबा बेळगांवजवळील हलकरणी नांवाच्या खेडेगांवांत रहात असत.

असें सांगतात कीं, पुंड लोक पैसा अुकळण्यासाठी श्रीमंताना धरून त्यांच्या छातीवर किंवा नाकावर मोठमोठे धोंडे आणून ठेवीत सरकारी अमलदारांचा त्रास देखील कधी कधीं या पुंडांच्या छळावर मात करीत असे त्या काळाचें वर्णन करीत असतां अेकाने सांगितले कीं, अशा प्रकारचा त्रास लोकाच्या अितका अंगवळणी पडला होता कीं पुष्कळ कुटुंबें मिळून अेकत्र स्वयंपाक करीत. दोन्ही बाजूला दोन कडी असलेल्या हंड्यांत भात शिजवीत. अशीच कडी असलेल्या पचांड्यांत सांभारे चुलीवर चढवीत. पुंडांची धाड येत आहे असा समाचार मिळताच गांवचे लोक कडचात बांबू घालून चुलीवरील भात-साभाऱ्यासह जंगलात पोबारा करीत. आणि तेथे नवी चूल करून कच्चा भात पक्का शिजवून निवांतपणें भोजन अुरकीत. शिजत अगलेले अन्न वारंवार मागे सोडून जंगलात पळ काढणें किती दिवस परवडणार ?

माझे आजोबा हलकरणी येथील अेका सावकाराच्या घरी नोकरीला राहिले. सामान्यपणें सावकारांना त्यांच्या कारकुनांनी लुबाडल्याचेच दाखले सांपडतील. माझ्या आजोबांच्या बाबतीत मात्र याच्या अगदी अुलट प्रकार झाला. त्यांनी धन्याशीं अितकी अभेद-बुद्धि वाढविली की जें कांहीं मिळवलें तें हिशेब वगैरे न ठेवतां त्याच्याच घरीं ठेअून दिले. धनी मेल्यानंतर त्यापैकी कांहींच हातीं आले नाहीं. ( माझे वडील जन्मभर मुलकी खात्यांत हिशेबाच्या कामावर राहून देखील त्यांनीं घरीं कधींच हिशेब ठेवला नाही. यामुळें त्यांचेंहि थोडें थोडके नुकसान झालें असें नाहीं. या दोन पिढ्यांच्या अनुभवानें शहाणे होण्याचे मलाहि सुचले नाहीं. मी सुधारणा अितकीच केली कीं पैसे मिळवूंहि नयेत आणि त्यांचा हिशेबहि ठेवूं नये. शिक्षण संपतांच सार्वजनिक कामांत पडलो. पोटापुरतेंच घेतलें. कधींहि कर्ज काढले नाहीं. हातांत असेल तेवढ्यांतच भागवलें आणि सुखी झालों. )

परिणाम असा झाला कीं, माझ्या वडिलाना अत्यंत गरिबींत दिवस काढून इंग्रजीचें थोडेंसें ज्ञान संपादावे लागले त्या वेळी मॅट्रिक परीक्षा नव्हती. लिटलगो वगैरे परीक्षा होत्या. प्रख्यात वैदिक विद्वान् शंकर पांडुरंग पण्डित कांही दिवस त्यांचे शिक्षक होते, असें वडील अभिमानाने सांगत असत. वडिलांनीं इंग्रजी अक्षर [illegible] सुंदर तयार केले होतें गरिबीमुळें अगदी लहानपणीं त्यांना नोकरी धरावी लागली. त्यांना कलादगी ( हल्लींच्या विजापूर ) जिल्ह्यात लष्करी खात्यांत नोकरी लागली. वडील जर त्याच खात्यांत राहिले असते तर आम्हां मुलांचा जीवनक्रम कदाचित् निराळाच झाला असता. फौजेचा "कमाण्डण्ट" जेव्हां स्वदेशीं परत गेला, तेव्हा त्यानें मुलकी खात्यांत वडिलांची शिफारस केली. विजापुरच्या बाजूला अेकदां मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळी सरकारकडून दुष्काळपीडितांना मदत दिली जात असे. त्या कामात वडिलाना फार श्रम पडले होते. वडिलांचे तोंडूनत्या दुष्काळाचें वर्णन अेकतांना अगावर काटा येत असे.

शहापूर हें शहर सांगली संस्थानात असून बेळगावाला अगदीं लागून आहे. तेथील भिसे कुटुंबाशी आमचा जुना संबंध होता माझी आते त्या कुटुम्बात दिली होती माझ्या आअीचें माहेरहि तेंच होतें. पुढें माझ्या दोन भावाचो लग्नेंहि भिसे कुटुम्बांतील मुलीशींच झालीं. दोन कुटुम्बांमध्यें अशा रीतीनें पुनः पुनः शरीरसम्बन्ध होणें हें आरोग्याच्या दृष्टीनें, मानसिक विकासाच्या दृष्टीनें आणि सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीनें हितकर नाही, असें माझे मत बनलें आहे.

त्या काळांतील सामाजिक जीवन सामान्य कोटीचेंच होतें. राजकीय अस्मिता, सामाजिक सुधारणा, औद्योगिक जागृति अथवा मौलिक धर्म-विचारणा या बाबतीत समाजांत जवळ जवळ अंधारच होता. सांपेल तें करून स्वतःचें अुत्पन्न वाढवावे आणि मुलांबाळांना सुखी करावे, याहून व्यवहाराचा विशेष आदर्श सामान्य कुटुंबांत नव्हताच. आज देखील या स्थितींत फारसा मोठा फरक झाला आहे, असें म्हणतां यावयाचें नाही. पण जिकडे तिकडे विचारजागृति दिसून येते खरी. समाजांतील प्रतिष्ठित लोकांनीं आपणांस ठपका देअूं नये, अशा रीतीनें वागावें हें होतें सामान्य माणसाचें नीतिशास्त्र. चोरी, चुगली आणि छिनाली न केली म्हणजे बस बाकी स्वार्थासाठीं मनुष्यानें वाटेल तें करावे असेंच व्यवहारांत लोक म्हणत.

धर्माच्या बाबतींत जरठ रूढीचेंच साम्राज्य होतें. प्रार्थनासमाजाचें कोणी नांवहि ऐकलें नव्हतें. सुधारकांचें नांव मधून मधून ऐकूं येऐी हें खरें; पण तेहि समाजद्रोही, धर्मभ्रष्ट याच नात्यानें. सुधारक म्हणजे मांस खाणारे, दारू पिणारे, ऐश्वराला न मानणारे, विधवेशीं लग्न लावणारे, जवळजवळ ख्रिस्ती झालेले, असाच सामान्य लोकांचा समज होता. पूर्वापार चालत आलेल्या रूढी, जाती-जातीमधील उच्चनीच-पणा, मत्सर आणि विद्वेष, खाण्यापिण्याच्या अनेक नियमांचा चक्रव्यूह, निरनिराळ्या स्वभावाच्या आणि आवडीनिवडीच्या देवदेवींच्या अुपासना, ग्रहांच्या आणि भूतप्रेतांच्या कोपाची भीति, त्यांचे मानपानाचे हक्क, बळी आणि शिरणी, व्रतवैकल्यें, सण आणि अुत्सव, याच गोष्टीना मुख्यत्वेंकरून धर्म म्हणून मानीत. या बाबतीत बावा-बैरागी, पुरोहित-भटजी आणि हरदास–पुराणिक समाजाला जी दिशा दाखवीत त्याच दिशेनें समाज यथाशक्ति जात असे.

माझ्या लहानपणीं मीं संन्यासी फारसे पाहिले नव्हते. त्यांचे वास्तव्य बहुतकरून तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीच असावयाचें. तीर्थ-यात्रा ही धार्मिक जीवनाचा जणुं काय कळस समजला जात असे. जन्मभर मेहनत करून जी शिल्लक टाकली असेल, त्यांतून म्हातारपणीं काशी-रामेश्वराची यात्रा व्हावयाची. जन्मभर हातून घडलेलीं पापें अशा रीतीनें धुअून निघतात, अशी लोकांची प्रामाणिक समजूत दिसे. समाज-नियमांचे विशेष अुल्लंघन घडलें तर समाजाला संतुष्ट करण्यासाठीं प्रायश्चित्त घ्यावें लागे. पण असें प्रायश्चित्त बरेच महाग किंवा अपमानकारक असल्या-मुळें लोक तें टाळण्याचा प्रयत्न करीत. आजदेखील अशी स्थिति कांहीं अंशीं असली तरी प्रत्येक बाबतींत समाजाची श्रद्धा डळमळलेली आहे. समाजाचें मन ठायी ठायीं साशंक झालें आहे. सामाजिक संघटन जवळजवळ मोडून गेल्यामुळें सामाजिक छळणूकहि कमी झाली आहे. निरनिराळ्या थोर पुरुषाच्या चारित्र्य-तेजामुळें आणि अनेक सुशिक्षित लोकांनीं चालविलेल्या अखण्ड आणि विविध चर्चेमुळें व्यक्तिगत आणि सामाजिक धर्मजीवनाचा अुच आदर्श समाजासमोर अधिकाधिक स्पष्ट होअूं लागला आहे. सुधारकपणा आणि नास्तिकता याहि बाबतीत अुथळपणा दूर होअून त्यांत बरेंच गांभीर्य येअूं लागलें आहे. प्रत्यक्ष आचरणांत शिथिलता वाढली असली तरी मानसिक भूमिकेमध्यें फारच महत्त्वाचें परिवर्तन होअूं लागलें आहे.

दरिद्री व लोभी माणसें ज्याप्रमाणें घरांत नको असलेली अडगळ देखील

बाहेर फेंकून देण्याची हिंमत करीत नाहींत, आणि त्यामुळें अनेक अडचणी सोसतात, त्याचप्रमाणें धर्ममध्यें रूढींचें आणि भ्रामक कल्पनांचें झालें आहे. भित्री, लोभी आणि लाचार माणसें ज्याप्रमाणें शिरजोर पुंडांपुढें नमून असतात आणि त्यांची खुशामत करतात, त्याचप्रमाणें देवदेवींविषयीं आणि धार्मिक रिवाजाविषयीं प्राकृत लोकांची वागणूक दिसून येते. कोणताहि फेरबदल करण्याची, नको असलेल्या किंवा घातक वस्तू काढून टाकण्याची हिंमतच होत नाहीं बरे वाओट जें कांहीं आळसानें, अनास्थेनें किंवा गफलतीनें बंद पडेल तें पडेल. पण जीवनांत विचारपूर्वक फेरफार करावा, वाओट दिसेल तें समजून उमजून टाकून द्यावे, चांगलें दिसेल त्याचें आग्रहपूर्वक ग्रहण करावें, हें जमत नाहीं. कारण याला चैतन्य लागतें. 'कांहीं करावयास गेलों आणि भलतेंच झालें तर ?' अशी आधळी भीति जवळ जवळ प्रत्येकाच्या मनांत वास करीत असते, यामुळे बरेंवाओट सर्व प्रकारचें जुनें असेल तें रहावयाचेंच. याखेरीज भीति घालून किंवा लालूच दाखवून कोणी कांहीं नवी टूम लादली तर तिचाहि विरोध करण्याची हिंमत नाहीं प्रत्येक वस्तूंत कांहीं तरी अुपयुक्तता असणारच, असे म्हणून संग्रह वाढतच जावयाचा. जें येअील त्याला येअू द्यावयाचें, अशीच मनोवृत्ति दिसून येते.

माझें लहानपण घरांतील कुलाचार, व्रतें, अुत्सव, भोळ्या समजुती, वगैरे सर्वांचें श्रद्धापूर्वक पालन करण्यांत गेलें होतें. अशा रूढिनिष्ठेमधून भोळ्या भक्तीचा अुदय झाला. माझ्यामध्ये ही भक्ति अितरांपेक्षा विशेष वाढीस लागली. भक्तीमधून निश्चयाचें बळ वाढतें, सकल्पशक्ति दृढावते, असा अनुभव आला. पुढें या भक्तीवर जेव्हां तार्किकतेचे हल्ले होअू लागले, तेव्हां त्यांतून शंकाशीलता अुत्पन्न झाली. या शंकाशीलतेनें आणि केवळ तार्किकतेनें कांहीं दिवस नास्तिकतेचे रूप धारण केलें. या नास्तिकतेंतून शुद्ध जिज्ञासा प्रगट झाली. आणि मी बुद्धिनिष्ठ अज्ञेयवादी बनलों. बुद्धिवादाची मस्ती मात्र मला चढली नाहीं. जिज्ञासा निर्मळ आणि नम्र होती. यामुळें विचार करतां करतां बुद्धिवादाच्या मर्यादा दिसू लागल्या. सरड्याची धांव कुंपणापर्यंत आणि बुद्धिवादाची मजल अज्ञेयवादापर्यंत, असें कळल्यानंतर वृत्ति माघारी परतली. आणि त्यांतून श्रद्धेच्या खऱ्या क्षेत्रांचें ओझरतें दर्शन झालें. नास्तिकता, बुद्धिवाद, अज्ञेयवाद, यांनीं नांगरलेल्या भूमिकेवर श्रद्धेचें पीक चांगलेंच आलें. आणि शेवटीं धर्माच्या शुद्ध, अुज्ज्वल आणि सनातन म्हणजेच नित्य नूतन स्वरूपाचा कांहींसा साक्षात्कार झाला. अशा रीतीनें त्या त्या काळीं आणि त्या त्या क्रमानें सर्व

वृत्तींचें अनुशीलन झाल्यामुळे धर्मजीवनाच्या सर्व बाजू समभावपूर्वक श्रद्धेनें पण तर्कशुद्ध दृष्टीने तपासण्याची संवी मला मिळाली.

जुन्या काळच्या जीवनामध्यें असलेली संस्कार-समृद्धि, कला-रसिकता आणि सार्वत्रिक समाधान या तिन्ही वस्तूंचा मी अनुभव घेतलेला आहे. यामुळें जुन्या-विषयी माझ्या मनांत अनादर नसून कृतज्ञता आणि भक्तीच आहे. तरी मला वाटतें कीं, ज्याप्रमाणें विस्तवावरील राख झडवायची असते किंवा घरामध्यें जमलेली अडगळ ( ज्याला अिंग्रजीत "लंबर" असें म्हणतात ) काढून टाकावयाची असते, त्याचप्रमाणें धर्मवृक्षाला देखील वेळोवेळी हलवून झाडून त्याचेवरील सुकलेलो अथवा कुजलेली पानें काढून टाकणे जरूर असते. सापाचा देखील जर संग्रह करून ठेवला तर तो वेळीं कामास येतो अशी अेक गुजराती म्हण आहे. तिच्या मुळाशी लोककथा अशी आहे की, अेका वाण्याच्या घरीं साप निघाला. अर्थात् त्यानें ताबडतोब तो मारला. गारल्यानंतर त्याचें काय करावयाचे ? नोकर त्याला गांवाबाहेर फेकून देणार होता. वाणी म्हणाला, 'संघऱ्यो साप कामनो' संग्रह करून ठेवला तर सापहि कामा येतो. या सापाला घराच्या छपरावर ठेअून दे. पडेल तिकडेच तो वाळत. अेके दिवशीं अेक घार राजवाड्याच्या आसपास घिरट्या घालत होती. तेथे राजकन्येने जलविहार करण्यापूर्वी आपला मोत्यांचा हार कांठावर ठेवला होता. घारीनें झडप घालून तो अुचलला. तेथून ती जी निघाली ती वाण्याच्या छपरावर येअून बसली तेथें तिने पाहिले की, हार कांहीं खाण्याची वस्तु नव्हे अितक्यांत तिच्या नजरेस तो साप पडला. तेव्हां तिने तो हार टाकून साप अुचलला आणि ती चालती झाली. वाण्याला अनायासे नवरत्नांचा लाभ झाला. त्या दिवसापासून वाण्याच्या जातीनें ठरवून टाकलें कीं, मेलेला साप देखील टाकून देअूं नये, सांभाळून ठेवावा. कधीं तरी अुपयोगी पडेल.

आतां या गोष्टीतला साप मेलेला होता आणि छपरावर अुन्हांत पडून वाळत होता. तोच जर जिवंत असला किंवा विहिरीत पडून कुजून पाणी विषारी करीत असला तरी त्याचा संग्रह करावयाचा की काय ? आपण परंपरागत सनातन धर्माच्या नांवानें रत्नेंहि बाळगून ठेवतों आणि खडेहि बाळगून ठेवतों, हलाहल विषहि आपण राखून ठेवलें आहे आणि अमृतहि संग्रहास ठेविलें आहे. संग्रहास ठेवलेल्या सापांपैकीं कित्येक जिवंत आणि विषारी आहेत, कित्येक मुळांत निरुपद्रवी होते पण आज सडून रोग पसरवीत आहेत. आणि त्यामुळें आपला शुद्ध, अुदात्त, सनातन

आर्य धर्म गुदमरून गेला आहे. बेणणी-निंदणी केल्यावांचून धर्मक्षेत्रांतून चांगले पीक मिळावयाचें नाहीं.

माझा जन्म झाला त्या वेळीं माझे वडील साताऱ्याच्या कलेक्टरचे हेड अकाअुन्टन्ट होते. त्या काळी रेल्वे नव्हती. प्रवास मुख्यत्वेकरून बैलगाडीनेंच होत असे. टपालाची नेआण खास घोड्याच्या टाग्यातून होत असे. जेव्हां आगगाडी प्रथम सुरू झाली, तेव्हां लोक दूरदूरहून ती पाहावयास हातात नारळ घेऊन येत आणि आगगाडीचें दर्शन होताच नारळ फोडून प्रसाद वांटीत, असें मी वडिलांच्या तोंडून अैकिले आहे. आगगाडीच्या डब्यांत बसण्यापूर्वी त्याच्या अुम्बरठ्याला हात लावून तो कपाळाला लावणारे लोक मी स्वत: पाहिले आहेत.

आम्ही सहा भाअू आणि अेक बहिण. मी सर्वांत लहान; बाबा सर्वांत मोठा. माझ्या संस्मरणाची सुरुवात होते, त्या वेळी बाबा आणि त्याचेहून धाकटा आण्णा दोघांचीं लग्नें झाली होतीं. आक्कांचेंहि लग्न झालें होतें. या सर्वांचीं लग्नें त्यांच्या लहानपणीच झालीं होतीं. विष्णूचे लग्न झाले त्या वेळी लग्नासाठीं म्हणून आम्ही साताऱ्याहून बैलगाडीनें बेळगांव-शहापुरला गेल्याचे मला स्मरतें. वडील आमच्या मागून टपालाच्या टांग्यानें आले. विष्णूच्या लग्नांत वरातीचा घोडा खूप मस्ती करीत होता, त्यामुळें विष्णूला आपली मांड सावरून धरणें कांहीसे कठीण झालें होतें. हें चित्र आज देखील माझ्या नजरेसमोर ताजे आहे. केशूचें आणि गोंदूचे लग्न झाले, त्या वेळी मी चांगलाच मोठा झालो होतो.

साताऱ्यामध्ये आम्ही समाजात फारसे मिसळत नसूं. तेथें आमच्या जातीचे लोक थोडे असावेत. दोनचार सरकारी अम्मलदार आणि त्यांच्या घरची मंडळी अेवढीच काय तीं आमच्या घरीं येत असल्याचें मला आठवतें. मनीची आअी म्हणून आमच्या आअीची अेक मैत्रीण होती. मनीशीं आम्ही खेळत असूं, तिच्या घरींहि जात असूं. पण तिच्या आअीचें नांव मात्र कधी अैकिलें नाहीं. ती फक्त मनीची आअी होती ! आमच्या शेजारी अेक शिंपी रहात असे. त्याचीं दोन मुलें नाना आणि हरी आमचेशीं खेळावयाला येत. डांग्या म्हणून अेक मुसलमान होता. तो केशूशीं खेळत

असे. यादो गोपाळ पेठेंतील मारुती आणि दुसरीकडील डोल्या गणपति हे मला आठवतात.

आम्ही शहापुरला गेलों म्हणजे आमचे सर्व वातावरण बदलून जाअी. शहापूर आमचेंच गांव होतें. तेथील चार मोठ्या मोठ्या गल्ल्या ( अेकेक गल्ली म्हणजे पेठ किंवा आळीच अमे. ) मुख्यत्वे आमच्या जातीच्या लोकांनींच वसवल्या होत्या. बहुतेक सर्व सराफ किंवा व्यापारी असत. बाकीचे सामान्य नोकरी करून असत. या सर्व कुटुंबांचा परस्पर संबध अितका कांहीं घनिष्ठ अमे कीं, प्रत्येक घरांत जेवायला काय तयार केले होतें अथवा सासू-सुनेचा काय झगडा झाला, याचा समाचार संध्याकाळ होण्यापूर्वी चारी गल्ल्यात पसरावयाचा. मधून मधून गांवजेवण झाले, कोणी वसतोत्सव केला, अेकाद्या कलावंतिणीचा नाच किंवा गाणे करविले किंवा अुन्हाळ्यांत सर्वांना पन्ह्याचे आमत्रण दिलें, म्हणजे सगळी जात अेकत्र व्हावयाची. मीमोल्लंघनासारख्या अुत्सवाचे वेळीं तर अठरापगड सगळ्याच जाती गोळा व्हावयाच्या. आमच्या जातीच्या लोकांनी बाधलेलीं मोठी मोठीं देवळें हीच सर्वांनीं अेकत्र जमण्याची स्थानें.

आम्ही शहापुरचे खरे. पण बहुतकरून वडिलाच्या नोकरीनिमित्त सातारा, कारवार, धारवाड, वगैरे ठिकाणींच रहात अलूं. यामुळे आणि आम्ही सर्वच भाअू शिक्षणाविषयीं अुत्साही असल्यामुळें आमच्या जातींत आम्हांला आदरानें बोलावीत. आपल्या जातीचा कोणी मनुष्य सरकारी नोकरी करून पुढे आला, तर जातीच्या लोकांना तें मोठे भूषण वाटे. या कारणामुळें देखील समाजांत आमची प्रतिष्ठा होती. तेव्हां शहापुरला जातांच आम्हाला समाजांत मिसळावें लागे.

लोकात मिसळण्याची कला मला साधली नाही ती नाहींच. कोणाचे घरीं गेलों तर आपण कोठे येअून पडलों, असेंच वाटे. लोकांत मिसळायला मनुष्याला शिष्टाचार अुत्तम अवगत असला पाहिजे. किंवा कोणी कांहीं म्हटलें, कोणी हसलें, तर त्याची पर्वा न बाळगण्याअितका कोडगेपणा तरी पाहिजे. मला त्या शिष्टाचाराची माहिती नव्हती आणि गोडी तर त्याहून कमी होती. अुलट बाजूनें सामान्य गोष्ट देखील माझ्या मनाला फार लागत असे. यामुळें मी लोकांत मिसळण्याचे प्रसंग टाळूं लागलों. कोठेंहि जेवणाचें आमंत्रण आलें, तर घरचे अितर सर्व जात असत, पण मी जात नसें. माझा असा स्वभाव पाहून अिष्टमित्र मला दोष देत. याच्यावर मी अेक तोड काढली.

वृद्ध लोक किंवा अतिप्रतिष्ठित लोक परान्न न घेण्याचा नियम करतात, हें पाहून मीहि तोच नियम केला आणि ही ढाल पुढें करून लोकांत मिसळण्याचें मी टाळूं लागलो. परिणाम असा झाला कीं, सामाजिक जीवनाची माझी अेक बाजू कायमची लंगडी पडली. आज देखील प्रसंग सार्वजनिक असो किंवा खाजगी असो, चार-चौघांत मिसळणें मला साधत नाहीं अनोळखी माणसाला भेटण्याचा प्रसंग आला तर मन अस्वस्थ होतें. सार्वजनिक काम करू अिच्छिणाऱ्यामध्यें हा फारच मोठा दोष म्हटला पाहिजे.

कितीतरी वर्षें आमचें येणेजाणे जे घडावयाचे, तें सातारा आणि शहापुरच्या दरम्यान असे. बेळगांव होतें शहापुरच्या अितक्या जवळ, पण तेथें आमचा संबंध केवळ शिरगांवकर डॉक्टराशी होता. कुटुंबामध्ये कोणी ना कोणी मधून मधून आजारी पडलेंच पाहिजे, असा आमच्या घरी जणू काय नियमच होता. अपवाद काय ते माझे वडील. त्यांनां वीस वीस वर्षात कधीं तापहि येत नसे आणि कधीं पडसेंहि होत नसे. शहात्तर–सत्याहत्तर वर्षें जगले पण त्यांचा अेकहि दांत पडला नव्हता किंवा कमजोरहि झाला नव्हता. आमची आक्का बाळंतपणांत नवज्वर होअून वारली, तेव्हां मी अगदीच लहान होतों. माझ्या मनाची अशी भावना झाली आहे कीं, त्या काळीं स्त्रीवर्गात क्वचितच कोणी आजारी पडल्याचे नजरेस येअी. आजारी पडावयाचे तें पुरुषानींच. आम्ही मुले केव्हांहि आजारी पडलों म्हणजे आमचे खूप लाड होत. आजारी पडण्यांत आपलीच कांहींतरी चूक असते अशी त्या वेळीं फारशी कल्पना नव्हती यामुळें आजारी पडण्याची आम्हांला लाज वाटत नव्हती. अुलट आजारी पडलो म्हणजे हक्कानें शाळा चुकवतां येते, सगळा दिवस अंथरुणांत पडून राहिलो तरी कोणी रागे भरत नाहीं, अभ्यास केला काय म्हणून कोणी विचारीत नाहीं, पर्वचा म्हणावी लागत नाहीं, अित्यादि कारणांमुळें आजारी पडणें म्हणजे मोठी मौज वाटे.

शहापुरला गेलो म्हणजे तेथून आठ नऊ मैलांवर असलेल्या बेळगुंदी नावाच्या खेडेगावीं अेकदां तरी जाणें व्हावयाचेंच. बेळगुंदी येथें आमच्या मामांचीं घरे होतीं. मावशी पण तेथेंच रहात असे. बेळगुंदीचीं लहानपणचीं संस्मरणें म्हणजे पेरू, करवंदे, जांभळें, रताळी, आंबे, फणस, मुरडे ( काजू ), अित्यादि फळें खाणें आणि अुसाचे भारेच्या भारे पुढें ठेवून सर्वांनीं आसपास बसून ते संपविण्याची शर्यत लावणें, वगैरे गोष्टींचींच आहेत. बेळगुंदीच्या शेतांतून आणि जंगलांतून मी खूप हिंडलों

आहें. ग्रामजीवनाचा अुत्तमोत्तम आनंद तेथेच मिळविला आहे. पण त्या गोष्टी बालपणच्या नव्हत; नंतरच्या आहेत.

आमच्या दोन्ही कुटुंबांमध्ये सामाजिक, धार्मिक, राजकीय अथवा औद्योगिक सुधारणेचे वातावरण यत्किंचितहि नव्हतें. मी जन्मलों त्यापूर्वी वडिलांना सतार वाजविण्याचा शोक होता. पुढें पुढें त्यांनीं तोहि सोडून दिला. ज्याला व्यसन म्हणतां येअील, असे आमच्या घरी काहीच नव्हतें. वडिलांना पान खाण्याचा देखील संवय नव्हती. सणावाराला गरीब ब्राम्हण बोलाविले तर मात्र जेवल्यानंतर त्यांना देण्यासाठीं बाजारांतून आम्ही पानसुपारी घेअून येत अूं. त्या दिवशी पानाचा विडा करून वडिलांना दिला तर कधीं ते खात, कधी खिशांत ठेऊन विसरून जात. व्यसनमुक्त, निर्दोष आणि विद्यापरायण म्हणून शहापुरांत त्या वेळी आमच्या कुटुंबाची चांगलीच ख्याति होती.

साताऱ्याहून वडिलांची कारवारला बदली झाली. पगार वाढला पण त्याबरोबर प्रवासाचा खर्चहि वाढला. कारवारला गेल्यामुळें मला सह्याद्रीची शोभा पहावयास मिळाली. समुद्राचा आणि समुद्रयात्रेचा अनुभव मिळाला. आणि अुघड अुघड मासे खाणाऱ्या समाजाचाहि थोडाबहुत परिचय झाला.

मुळांतच मला लोकांत मिसळणें जड जाअी आणि येथें तर भाषा, रिवाज, सर्व कांहीं निराळें. सर्वच लोक अपरिचित. यामुळें मनांतल्या मनांतच निरनिराळे विचार आणावेत, कल्पनेचे घोडे नाचवावेत आणि त्यांतच संतुष्ट असावे, ही कला मला साध्य झाली. या संवयीचा माझ्या जीवनावर बरा, वाअीट, दोन्ही प्रकारचा पुष्कळ परिणाम झाला आहे आम्ही कारवारला पाच सहा वर्षें राहिलो. पुढे तेथून वडिलांची बदली धारवाडला झाली. कारवारला मुख्य भाषा कोंकणी, पण सरकारी कामकाज आणि शाळेंतील अध्ययन कानडींतून चाले. धारवाडमध्यें फक्त कानडीच भाषा चालते. देशस्थ, लिंगायत, वगैरे लहानमोठ्या जातीशी नवीन परिचय झाला. ह्लेगचा अनुभव मिळाला. शहराबाहेर मोकळ्या मैदानांत झोंपड्या बांधून रहावयास शिकलों. माझी अेकुलती अेक बहीण मी अगदीं लहान असतांनाच वारली होती. माझ्या पांच भावांपैकीं मधला भाऊ विष्णु धारवाडला ह्लेगने वारला.

धारवाडहून आम्ही बेळगांवला आलों. येथेंच कांहीं वर्षें काम करून वडिलांनी पेन्शन घेतली. नंतर त्यांना बेळगांव जवळील सांगली संस्थानांत ट्रेझरी ऑफिसरची नोकरी मिळाली. समाजसेवेंत ज्यांनीं पुढें नांव मिळविलें ते डॉ. देव आणि

अेन्जिनियर अमृतलाल ठक्कर हे त्या वेळीं त्याच संस्थानच्या नोकरींत होते. पुढें हे दोघेहि ना. गोखल्यांच्या भारत-सेवक-समाजाला जाऊन मिळाले. डॉ. देव आमच्या घरीं वारंवार येत. ठक्कर बाप्पांचा परिचय गुजरातमध्यें गेल्यानंतरच मला झाला.

आम्ही जेव्हां कारवारला होतों तेव्हां अिंग्रज सरकारच्या वतीनें दक्षिण महाराष्ट्रांतील कित्येक संस्थानांचे हिशेब तपासण्यासाठीं माझ्या वडिलांना जावें लागत असे. ज्या संस्थानातील राजा अज्ञान असेल तेथील राज्यकारभार अॅडमिनिस्ट्रेटरच्या मार्फत होत असे. अशा वेळीं सरकारच्या अेका खास ऑडिटरने हिशेब तपासून रिपोर्ट करावा अशी व्यवस्था असे. अशा रीतीनें सावंतवाडी, मिरज मळा, जत, रामदुर्ग, मुधोळ, जमखिंडी आणि कर्नाटकांतील सावनूर, अितक्या संस्थानातून भिन्न भिन्न वेळी आमचे फिरणे झाले सावंतवाडीला तर अनेक वेळा गेलो आहोत.

संस्थानी शहरामध्यें राजधानीची शोभा तर असतेच. त्याखेरीज लोकांमध्यें अेक प्रकारची कलारसिकता आणि जुन्या प्रकारचा घरंदाजपणा हीं दिसून येतात. संस्थानी राज्यकारभारांत आणि तेथील सार्वजनिक जीवनांत घाण असल्याची आपण जी तक्रार करतो, ती मुळांत घाण नव्हती. त्या काळाच्या गरजा आणि जुने आदर्श याना आवश्यक अशा त्या गोष्टी पूर्वीच्या लोकांनीं स्थिर केल्या होत्या. त्या त्याच्या जमान्याला अिष्ट आणि पोषक होत्या. काळ बदलल्यानतर अर्थातच त्या त्या वस्तूंची अुपयुक्तता नष्ट झाली. अशा रीतीने गतप्राण झालेल्या वस्तु गाडून किंवा जाळून न टाकतां सांभाळून ठेवण्याचा प्रयत्न केला तर दुर्गंधहि पसरणारच. अेकाद्या स्वजनाच्या शवातून दुर्गंधी सुटत असेल, तर तो मनुष्यच वाअीट होता असें म्हणून त्याची निंदा करण्याचा अन्याय करण्यापेक्षा त्या शवाची जर आपण आदरपूर्वक अुत्तरक्रिया केली, तर अनारोग्य आणि अन्याय या दोन्ही संकटांतून आपण धावूं. संस्थानी वातावरण अंतर्यामांतून आणि प्रेमादरपूर्वक पाहिले असल्यामुळें त्यांत कडकपणें आणि आमूलाग्र सुधारणा करण्याच्या पक्षाचा जरी मी असलों, तरी आपली संस्थानें, त्यांचे पिढीजात नोकर याचेविषयीं माझ्या मनांत चीड किंवा तिरस्कार अुत्पन्न होत नाहीं.

सावंतवाडी संस्थानाची प्राकृतिक शोभा कांहीं औरच आहे तेथील लोक कांहींसे रजोगुणी आणि हुन्नर कलांत प्रवीण असे आहेत. मिरज, जमखिंडी, रामदुर्ग, वगैरे संस्थानात पेशव्यांच्या काळचें ब्राम्हणशाही वातावरण स्थिरावलेलें दिसले. पेशव्यांच्या काळची ब्राह्मणशाही कशीहि असो, आज मात्र तिच्यांत चांगला अंश

फारसा दिसून येत नाही. जतच्या राजाचे पांढरे निशाण हिन्दु-मुस्लिम ऐक्याचें द्योतक आहे. कारण ऐका मुसलमान फकिरानें तिकडील हिंदु राजाला तें दिले होतें. मुधोळच्या जुन्या राजाच्या बहादुरीविषयी आणि त्या बहादुरीचा नाश करणाऱ्या त्याच्या ऐषाविषयीं मी पुष्कळ ऐकलें होतें. सावनूर तर बोलून चालून नबाबी राज्य. कर्नाटकचे किंबहुना साऱ्या दक्षिणचे मुसलमान, धर्मांतें अुत्तरेकडील मुसलमानाशीं ऐक्य असतील पण त्याची राहणी, करणी आणि प्रत्येक गोष्टीकडे पहावयाची त्यांची दृष्टि खास द्राविडी पद्धतीचीच दिसून येते. संस्थानामध्ये बाधकाम नेहमींच चालूं असते. राजवाडे, देवळें नवीं नवीं अुभी व्हावयाचीं कुठे पूल बांधतात, कुठें रस्ते वाढतात, अशीं कामें चालत असल्यानें लोकाना ऐक प्रकारचें अुत्तम शिक्षण मिळतें, हें सर्व मी लहानपणाच्या अनुभवाच्या संस्कारावरून लिहीत आहे. हल्लींच्या स्थितीशीं याचा मेळ बसतो किंवा नाहीं हें पाहण्याचे येथे प्रयोजन नाहीं.

वडिलांना याप्रमाणें नोकरीनिमित्त वारंवार स्थलांतर करावें लागत असल्यामुळें माझे तीन वडील बंधू शिक्षणासाठी पुण्यास जाअून राहिले त्यांपैकी दोघे सहकुटुंब राहिले होते. आअी देखील काही दिवस पुण्याला जाअून राहिली होती. त्यामुळे माझी मराठी दुसरी अियत्ता पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांतच झाली. पुण्याहून मी कारवारला वडिलांच्याकडे गेलो. १८९८-९९ च्या सुमाराम आम्ही कारवार सोडले. त्यानंतर अगदी अलीअलाकडेपर्यंत मी कारवारला पुन्हां गेलों नव्हतो.

अगदीं लहानपणीं मनुष्याने कितीहि प्रवास केला तरी संस्कार ग्रहण करण्याची शक्ति परिमित असल्यामुळे अशा प्रवासापासून मिळणारा फायदाहि परिमितच असतो; पण जीवनामध्यें जी ऐक टवटवी येते, ती मात्र त्या वयाला अत्यंत पोषक असते. खास शिक्षणासाठीं म्हणून मीहि पुण्याला राहिलो. वडिलाच्या नोकरीमुळें सातारा, शहापूर, कारवार, धारवाड, बेळगांव आणि सांगली, अितक्या स्थानांचा परिचय आणि वर सांगितल्याप्रमाणें संस्थानी राजधान्यांचे जवळून दर्शन, अेवढा अनुभव अठरा वर्षांच्या वयाला कमी म्हणता यावयाचा नाही. माझे आजोबा श्री. आबा भिसे यांची जमीन बेळगुंदीला होती. त्याच्या आणि मामांच्या देखरेखीचा लाभ मिळावा म्हणूनं स्वाभाविक रीतीनें वडिलांनीं तेथेंच जमिनी विकत घेतल्या. शहापुरांत तीनेक घरे विकत घेतली आणि बेळगुंदीला अेक घर बांधले.

यांखेरीज सहजासहजीं घडणाऱ्या यात्रेच्या निमित्तानेंहि लहानपणी मी पुष्कळ फिरलों. कारवारच्या दक्षिणेस गोकर्ण-महाबळे[illegible] लहानपणीं जाणें

घडलें. सांगली–मिरजेच्या बाजूला गेलों असतांना कुरुंदवाडावरून आम्ही नरसोबाच्या वाडीला जाऊन आलों. जतला गेल्यानंतर पंढरपूरला न जाणें अशक्यच होतें. साताऱ्याहून जरंडयाच्या मारुतीचें आणि परळीच्या मज्जनगडावरील समर्थांचें दर्शन गोकर्णाला जाण्यापूर्वीच घडलें होतें. गोव्यामध्यें जाऊन मंगेशी, महालक्ष्मी, शांतादुर्गा, वगैरे पवित्र स्थानें पाहून येतांना जुन्या गोव्यांतील कॅथलिक लोकांची भव्य देवळें आणि पणजीसारखी रमणीय राजधानी, ही सहजच पहावयास मिळालीं.

समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या तीर्थ-स्थानांचे वैशिष्ट्य कांहीं निराळेंच असतें. गोकर्ण–महाबळेश्वरला दक्षिणेकडची काशी म्हणतात. हें स्थान पाहून मनावर जे संस्कार घडले, तसलेच संस्कार मोठेपणीं पश्चिमेकडील द्वारका आणि सोमनाथ पाहून, पूर्वेकडील जगन्नाथपुरीच्या समुद्रांत आघोळ करून, हिंदुस्थानच्या अगदीं पायाजवळील रामेश्वराला आणि कन्याकुमारीला प्रणाम करून आणि लंकेच्या दक्षिणेला देवेन्द्राच्या शेजारीं बसून भारत–पुरुषाचें ध्यान करून व्यापक रूपाने मिळविले. या स्थानांचे शास्त्रात लिहिलेलें माहात्म्य ज्यानें वाचलें नाहीं, अशा मनुष्यावर देखील हीं स्थानें आपला प्रभाव पाडल्यावाचून रहात नाहींत.

नरसोबाची वाडी म्हणजे कृष्णाकांठीं असलेलें गुरु दत्तात्रेयाचें स्थान. अेके काळी येथे ब्राह्मणी कर्मकाण्ड व सोवळेंओवळें यांचे फारच प्रस्थ होतें अेकाद्याला भूत लागलें असलें, तर तो नरसोबाच्या वाडीला जाऊन गुरु दत्तात्रेयाच्या सेवेला राहून मुक्त व्हावयाचा आणि भुताला गति मिळावयाची. ज्याला सोवळ्याओवळ्याचें आणि कर्मकाण्डाचें भूत लागलें असेल, त्याला अितर भुतें पळाडण्याची हिंमत करीत नसतील ! पंढरपूर ही भक्तिमार्गी महाराष्ट्राची धार्मिक राजधानी. साधूसंतांचे माहेरघर. तेथें भक्तीचा महोत्सव अखंड चालावयाचा. जात्यभिमानामुळें पतित झालेल्या प्रदेशांत अेकट्या पंढरपुरालाच मनुष्यांची समानता आणि देवाघरीं सर्वांमध्यें अभेद कांहीं अंशीं संभाळतां आले आहेत. जरंडा जसे मारुतीचें स्थान, त्याचप्रमाणें परळी हें मारुतीचे अवतार समजल्या जाणाऱ्या रामदासांचें स्थान. रामदासी लोकांनीं मनावर घेतलें, तर आजदेखील ते परळीला धर्मजागृतीचें अुगमस्थान बनवूं शकतील. पण सगळींच तीर्थस्थानें, कोण जाणे कशीं, जुन्या भांडवलावर चरितार्थ चालवणाऱ्या कुटुंबांप्रमाणें क्षीणतेज, मागसलेली आणि शिळीं होऊन जातात.

कोंकण गोव्याकडील मंगेशी, शान्तादुर्गा, आणि अशींच अितर देवस्थानें आमच्या जातीच्या कुळदेवांचीं असल्यामुळें तेथें कौटुंबिक श्रद्धा आणि जातीचें वैभव हीच विशेषतः पहावयास मिळतात. अिंग्रजांत देखील प्रतिपाळक दैवतें (गार्डियन डीटी) असतातच. कुळदेवाच्या दर्शनाला गेले असतां आपली मनोवृत्तीहि कांहीं निराळीच होते व तेवढ्यापुरतें त्या स्थानाला जागृत म्हटलें पाहिजे.

श्रद्धेनें जाणाऱ्या मनुष्याला तीर्थ-यात्रेपासून असाधारण समाधान मिळतें. शिक्षणाच्या दृष्टीनें जाणाऱ्याला कितीतरी लाभ होतो. आणि ज्याला समाजाची धार्मिक नाडी तपासावयाची असेल, त्यानें तर तीर्थस्थळें पाहिलींच पाहिजेत.

अशा रीतीने माझें लहानपण स्थिरपणे अेक ठिकाणीं राहून शिक्षण घेण्यांत न जातां रोजरोज नव्या ठिकाणीं जाअून नवेनवे अनुभव घेण्यात गेले. माझें शिक्षण व्यवस्थित व्हावें; याची कुणीच काळजी घेतली नाहीं, आणि मलाहि अेकादें काम स्थिरपणें दीर्घ काळपर्यंत करीत राहण्याची कधीं संवयच लागली नाहीं.

माझे वडील स्वभावानें अतिशय प्रेमळ पण तें प्रेम तोंडाने व्यक्त करण्याची त्यांना संवय नव्हती. माझ्या प्रकृतीची नेहमीं काळजी घेत. आजारी पडलों तर खूप शुश्रूषा करून माझें दुखणें ते दूर करीत. जे कांही हवें असेल तें आणून देत. हट्ट असा मी कधी केलाच नाहीं. पण केला तर तो कधीं वाया जावयाचा नाहीं, याची खात्री होती. कारण ते माझें कोडकौतुक पुरवीत असत (म्हणूनच तर आपण पांचशें रुपयांचा हत्ती विकत घ्यावा अशी बुद्धि झाली होती, आणि तेव्हांहि त्यांनीं मला वेडयांत न काढतां हत्ती बाळगण्याच्या खर्चाचा हिशेब समजावून देअून माझें वेडेपण मात्र काढून टाकलें.) परंतु कोणता आहार मला अनुकूल आहे, मी कसरत किंवा व्यायाम करतों किंवा नाहीं, शाळेंत नीट शिकतों किंवा नाहीं, शाळेमध्यें कशा प्रकारचे संवगडी मी पसंत केले आहेत, अित्यादि गोष्टींकडे त्यांनीं यत्किंचितहि ध्यान दिले नाही.

आपल्या कुटुंबाची परपरा अमुक आहे, अमुक आपण केलेंच पाहिजे, अमुक करतां कामा नये, अशा प्रकारच्या भावना निर्माण करून त्यांच्याद्वारा नीतीचें शिक्षण देण्याचें काम माझ्या आअीनें केलें. वडील आपण होअून कांही सांगावयाचे नाहींत. त्यांना छेडलें तरच ते स्वतःचा अभिप्राय देत. कोणाचें वांकडें करूं नये, देव करील तें चांगलें, असें समजून चालावें. अशा प्रकारची वडिलांची वृत्ति होती. महत्त्वाकांक्षा त्यांना जणूं कधीं शिवलीच नाहीं. प्रतिष्ठेची हौस आअीला पुष्कळ होती.

'कालेलकरांचें कुटुंब सदाचारी आहे, अेकीनें वागतें, परोपकारी आहे, घरीं आणलेल्या सुना सुखानें नांदतात' अशा प्रकारची कीर्ति मिळविण्यासाठीं आअी जणूं हपापलेली होती. देवानें मला पुष्कळ द्यावें आणि मी पुष्कळांच्या अुपयोगी पडावे, अशी महत्त्वाकांक्षा ती पुष्कळदां बोलूनहि दाखवीत असे. तेव्हां मी विनोदानें म्हणे, 'देवानें दिलेल्या संपत्तीतून कितवा हिस्सा तूं लोकांना देशील ? सगळेच्या सगळेच देअून टाकलेस तर देव यथेच्छ देअील. पण आपण देवाच्या व्यापारात कमिशनच फार मागतों. मग देवानें सरळच लोकांना कां देअून टाकूं नये ?' वडिलांना मौज-मजा, शौक आणि समाजात दिसून येणारी 'रसिकता' यांची साधारणपणें भीतीच वाटत असे या गोष्टी घरांत शिरल्या तर कुटुंबाची धूळधाण होअील, असें त्यांना वाटत असे. फोटोग्राफीचा नाद, हाच काय तो त्यांच्या मनाचा विरंगुळा.

आमच्या लहानपणीं फोटोग्राफी आजच्या अितकी सोपी नव्हती. आज ज्याप्रमाणे प्लेटस् बाजारांत तयार मिळतात, तशा त्या वेळीं मिळत नसत. आजच्या सारख्या प्लेटी जेव्हां प्रथम बाजारांत आल्या, तेव्हां त्यांना प्रथम प्रथम ड्राय प्लेटस् म्हणजे कोऱ्या प्लेटी म्हणत असत. साताऱ्याला जेव्हां वडील फोटो काढीत, तेव्हां साध्या, स्वच्छ केलेल्या काचेवर कलोडिनचा द्रव ओतून हातांतल्या हातांत सर्व काचेवर तो सारखा पसरून तो वाळण्यापूर्वीच ती डेव्हलपहि करीत. सर्व गोष्टी फार घाअीनें कराव्या लागत. कलोडिनची प्लेट डेव्हलप करण्यापूर्वीच जर वाळली, तर तिला सुरकुत्या पडत. त्या काळी फोटोग्राफीचे काम बरेच किचकट असे. वडिलांनीं फोटोग्राफीच्या नादाच्या पायीं बरेच पैसे खर्च केले होते.

आम्ही सांगलीला गेल्यानंतर आमच्या नानाला सतारीचा नाद लागला. त्याची सतार अैकून मला गायनवादन अैकण्याची गोडी लागली; आणि अीश्वरकृपेनें पुष्कळच चांगलें चागले संगीत मला अैकावयास मिळालें. वडील बन्धू बाबा यास संस्कृत साहित्याची आणि ज्ञानेश्वरीची गोडी होती. दुसरा भाऊ आण्णा यास लहानपणीं तन्हे-तऱ्हेचे प्रयोग करण्याची हौस असे पुढें त्यानें आमच्या घरांत वेदान्त आणला. विष्णूला चांगलें गातां येत असे. त्याला गणपती-अुत्सव, शिवाजी-अुत्सव, यांसारख्या सार्वजनिक कामांत भाग घेण्याची आणि लोकांत पुढें येण्याची हौस फार. घरांत भावांपैकीं माझा पुढारी म्हणजे केशू. तो शीघ्रकोपी आणि भोळा होता. मन लावून अभ्यास करीत असे. चक्कू ताडया घोक्या हा त्याचा मंत्र होता. त्याचेवर नेपोलियनच्या चरित्राची छाप विशेष पडली होती. गुप्तमंडळ स्थापन करावें, अिंग्रजांना

हांकून लावण्यासाठीं मोठें लष्कर तयार करावें, अशा प्रकारच्या कल्पनातरंगामध्ये तो मस्त असे पण अमंयन असल्यामुळें त्याचे हातून कांहीं होऊं शकलें नाहीं. कॉलेजमध्यें गेल्यानंतर त्याला अर्धांगवायु झाला आणि त्याची सर्व महत्त्वाकांक्षा कोमेजून गेली. गोंदू अथवा नाना हा माझा अगदीं जवळचा भाऊ. आम्हां दोघांत दीडच वर्षांचें अंतर. लहानपणीं आम्हीं दोघेच अेकत्र खेळत असूं. शाळा चुकवण्याच्या आणि अभ्यास न करण्याच्या सगळ्या युक्त्या मी गोंदूकडून शिकलों. गोंदूला केमिस्ट्री, ड्राइंग आणि फोटोग्राफी, या तिहीचा छंद असे. पुढें त्याने धंदा म्हणून फोटोग्राफीच पसंत केली.

मी वडिलांचा भक्त आणि आअीचा सेवक. आअीची वेणीफणीदेखील मीच करीत असें. बाबा म्हणजे सत्पुरुष, असे मला वाटत असल्यानें त्याचेविषयीं मला विशेष आदर असे. आण्यानें माझ्या बाळपणीं माझ्या शिक्षणाकडे थोडेंबहुत लक्ष दिले होतें. तो माझा बालपणातील वाली. पण मी अनुयायी होतों केशूचाच. केशूचे आणि विष्णूचें पटत नसे, यामुळें केशूच्या पक्षाचा म्हणूनच मला पुष्कळदा विष्णूशीं भांडावें लागे. आणि मी तें निष्कामभावें करीत असे गोंदू तर माझा संवगडी. त्याच्या मनोराज्याच्या गोष्टी मला दिवसरात्र अैकाव्या लागत. घरातील वडील मंडळी गोंदूला म्हणत, शाळेत काहीच शिकत नाही आणि अुठल्या बसल्या चित्रें काढ, फोटोग्राफीची पुस्तके वाच, अशांत वेळ घालवितो. आण्णा कधीं रागवला म्हणजे त्याची चित्रें फाडून टाकीत असे. त्यानें कोरलेले लांकडी शिक्के अेकदा आण्यानें जाळून टाकले. या छळणुकीमुळें गोंदू रात्री ९ वाजतां निजून १२ ला अुठत असे. आणि बारा ते तीन फोटोग्राफीची पुस्तके वाचत असे. त्यांत कांही मजेदार आकर्षक प्रयोग त्याला सांपडला तर अशा अपरात्री मला अुठवून तो मला सर्व समजावून सांगत असे. मी जर चटकन् अुठलो नाहीं किंवा ध्यान देअून त्याचें अैकलें नाहीं तर चिमटे काढून तो मला जागे करीत असे. माझी ज्ञाननिष्ठा अितकी होती की, या जबरदस्तीबद्दल मी कधीं तक्रार केली नाही.

आम्ही सर्वच भाअू मित्रप्रेमाविषयीं नांवजलेले होतों. बाबा साहित्यरसिक असल्यामुळें आणि त्याला शिकवायला घरीं भिसे मास्तर आणि शास्त्रीबुवा येत असल्यामुळें बाबाची खोली म्हणजे कितीतरी विद्यार्थ्यांना शिक्षणाचो पाणपोअी झाली होती. आण्णामध्ये विशेष अहं-प्रेम; यामुळें त्याचे मित्र बहुधा त्याचे अनुयायीच असत. खरा प्रेमळ स्वभाव विष्णूचा; पण शिक्षणांत तो

कच्चा होता. सामाजिक शिष्टाचाराची माहिती आणि कदर त्यालाच अधिक. दुसऱ्या लोकांसाठीं वस्तु विकत घ्याव्या, लोकांना घरीं फराळाला बोलवावें, वगैरे सर्व त्याला साधत असे. केशूला लहानपणी फेफरे येत असल्यामुळें सर्वांनाच त्याचा मिजाज संभाळावा लागे. या अेका गोष्टीनें त्याचा सर्व स्वभाव रगलेला होता. तो तरंगी, हट्टी आणि दिलदार होता. त्याचे रागद्वेष अतिशय तीव्र; पण क्षणजीवी. गोदूमध्यें शास्त्रीय शोध करण्याच्या हौसेखेरीज अितर खास विशेष त्या वेळीं नव्हता. पुढे पुढें त्याला वेदान्ताचा वगैरे नाद लागला आणि त्यानें त्याचे वाटोळें झालें. मी त्याला म्हणत असे कीं, वेदान्त हा पाऱ्याच्या रसायनासारखा आहे. पचला तर मनुष्य वज्रकाय होअील नाहीतर तो अंगावर अुठेल. धूर्त लोकांनीं वेदान्ताशीं खेळ करायला हरकत नाहीं. त्यांना तो खूप अुपयोगी पडतो आणि त्याना तो बाधण्याची मुळीच धास्ती नाहीं. गोदूमध्यें अहं-प्रमाचा लवलेशहि नव्हता. आम्ही सगळेच भाअू कमी अधिक प्रमाणानें आळशी खरे व्यवस्थितपणा कोणाच्याहि आयुष्यात दिसून आला नाहीं.

मी सर्वात धाकटा; त्यामुळें घरीं आलेल्या भावजयाशी मी समभावानें पुष्कळ खेळे. त्याचेविषयीं मला सहानुभूतिहि अरो. नवऱ्याच्या धाकामुळे त्यांना जीव मुठीत धरून कसें रहावें लागे, सासू-सासऱ्याशीं त्या खोटे कसें बोलीत, त्याना माहेरचा ओढा किती आणि कसा होता, हें सर्व निरनिराळ्या बाजूनें पहाण्याची संधी मला मिळाली होती. याचमुळें कौटुबिक जीवनाचे अनेक प्रश्न लहानपणापासून मला स्पष्ट समजलेले होते. कौटुंबिक जीवन अेकपरी स्वर्ग आहे आणि दुसऱ्या बाजूनें अखण्ड चालणारी अन्त-विहीन शोकान्तिका किंवा करुणिका (ट्रॅजेडी) आहे, हें मला लहानपणींच कळून चुकलें होतें. वडील आणि मातोश्री दोघें स्वर्गवासी झाल्यानंतर मी लागलाच बेळगांव-शहापुरचें वातावरण सोडून देऊन महाराष्ट्राच्या दुसऱ्या टोकाला जाऊन राहिलों, याचे हें अेक कारण खरेच अर्थात् ते गौण होतें. महाराष्ट्रांत राहण्यापेक्षां अितरत्र जाऊन सेवा करावी, असें ठरविण्याला आणि गुजरातच पसंत करायला जीं कारणें झालीं तीं निराळीं होतीं.

सार्वजनिक जीवनाचा माझा बाळपरिचय अगदींच तुटक आहे. मी पुण्याला मराठी दुसरींत होतों. तेव्हां तेथें हिंदु-मुसलमानांचा अेक भयंकर दंगा झाला होता. तो दंगा मुंबअीहून पुण्याला पसरला की पुण्याहून मुंबअीला गेला, हें त्या वेळीं कांहीच कळलें नव्हतें. क्षुल्लक कारणामुळें दोन जातीमध्यें झगडा सुरू झाला आणि चांगलीच

मारामारी झाली. मोठ्या वयाचे लोक देखील बेफाम होऊन अेकमेकाला शिव्या देतात आणि मारामारी करतात, हें जेव्हां मी अैकलें तेव्हां मला फार आश्चर्य वाटलें. या दंग्याच्या शेवटीं जी सभा झाली, तींत बाळ गंगाधर टिळकांनीं भाषण करून जाहीर केलें कीं, दोष दोन्ही पक्षांचा आहे, पण विशेष आगळीक मुसलमानांचीच होती असें म्हटलें पाहिजे. त्या काळीं टिळक लोकमान्य पदवीला पोहोंचले नव्हते.

यानंतरची घटना म्हणजे चीन-जपान युद्धाची. जपाननें पहिल्याच सपाटयाला चीनचे अेक मोठे जहाज बुडविल्याचें त्या वेळीं अकले होतें. चॅम्पियन नांवाच्या अेका अिंग्रजी पत्रांत त्या युद्धाच्या बातम्या येत असत. यानंतरची अद्‌भुत घटना म्हणजे गोव्यांत सुरू झालेल्या राण्यांच्या बंडाविषयींची. त्या वेळीं अैकलेल्या गोष्टी अेकत्र केल्या असत्या तर वीररसाचे अेक महाकाव्य बनलें असतें. राणे लोकांनीं पोर्चुगीज सरकारला विरोध करून वनवास पतकरला होता. जगलांत सुतार-लोहारांना बसवून ते बंदुका आणि दारूगोळा तयार करीत. अप्रतिम निशाणबाज असल्यामुळें पाखल्यांना ( पोर्चुगीज सोल्जरांना ) नेमके टिपून मारीत. शेवटीं गोव्याच्या गव्हर्नरानें कांहीं तरी तडजोड करण्यासाठीं म्हणून त्यांच्या पुढाऱ्याला भेटीस बोलाविले आणि दगा करून त्याला ठार केले, वगैरे वगैरे गोष्टी लोकांच्या तोंडून अैकल्या होत्या. त्या काळीं दादा राणा, दीपू राणा, वगैरे शूरांच्या नांवांनीं किती तरी लोककाव्यें गोव्यांत गात असतील. आज तीं सांपडतील का ?

पण सर्व समाजाला कुतूहल, भीति आणि अपेक्षा यांनी खळबळून सोडणारी घटना म्हणजे महाराणी व्हिक्टोरियाच्या हीरक महोत्सवाच्या रात्रीं पुणें येथें गव्हर्नरच्या घरची मेजवानी खाअून परत येणारा प्लेग ऑफिसर रॅन्ड याचा खून होय. प्लेग ही खरोखरच त्या वेळीं मोठी राष्ट्रीय आपत्ति होती. आणि प्लेगपेक्षां देखील प्लेग हटविण्यासाठीं सरकारनें जे कडक अुपाय योजिले, त्यांची छळणूक लोकांना अधिक वाटत होती. मरणाच्या कलेंत आपले लोक फार पूर्वीपासून तरबेज झालेले आहेत पण क्वॉरन्टाअीनचा जुलूम, घराची नासधूस, बायकांचा अपमान, वगैरे गोष्टी लोकांना असह्य झाल्या होत्या. रॅन्ड आणि आयर्स्ट यांचा खून झाल्यानंतर टिळकांवर राजद्रोहाचा खटला होअून त्यांना शिक्षा झाली. घोड्यावर बसावयास शिकवण्याचा वर्ग काढला होता, अेवढ्यावरूनच शंका घेअून सरदार नातू-बंधूंना राजकैदी म्हणून बेळगांवला अटकेंत ठेवलें. पोलिस खात्यानें चाफेकर-बंधूंचा कट अुघडकीस आणला. चाफेकर-बंधूंना फांशीची शिक्षा झाली. त्यांना पकडून देणारे त्यांचे साथी द्रविड-बंधू यांचाहि खून झाला. अशा

या सर्व घटनेमुळें समाजामध्यें अेकामेकांविषयीं शंका आणि अविश्वास आणि सरकारविषयी भीति बरीच दिसून आली. घरांत बसून बोलणारे लोक देखील आवाज बारीक करून अेकमेकांशीं बोलत. देशभक्त कोण आणि दगेबाज कोण, हें ठरविणें कठीण होऊन गेले. लोकांमध्यें देशाविषयी आणि देशभक्तीविषयीं बरीच जागृति झाली, हेंहि त्याबरोबरच दिसून आलें. निदान मुर्दाड शांति तर नष्ट झालीच.

यानंतरची सार्वजनिक चर्चा कानीं आली ती शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठीं सरकारनें केलेल्या कायद्याविषयीची. या कायद्यानें सावकाराचें वाटोळें होअील आणि शेतकऱ्यांना तर तादृश कांहीच फायदा व्हावयाचा नाहीं, अशा प्रकारची टीका त्या वेळीं सर्वत्र अैकूं येत होती. अिंग्रजाचें राज्य केवळ प्रजेला सोलून खाण्यासाठीं आहे, ही कल्पना लोकांत सर्वत्र रूढ होती. या अेका भावनेच्या बाबतींत अितर प्रांतांपेक्षां महाराष्ट्र नेहमीं पुढारलेला असतो. अिंग्रज सरकारच्या हेतूविषयी महाराष्ट्रीय जनतेला कधींहि विश्वास वाटलेला नाही.

यामुळेंच जेव्हां दक्षिण आफ्रिकेत ट्रान्सवालच्या बोअर लोकांचें आणि अिंग्रजांचें युद्ध सुरू झाले, तेव्हां आमच्या अिकडील जनतेची सहानुभूति बोअर लोकांच्याच बाजूला होती. दक्षिण आफ्रिकेत जाअून राहिलेले कांहीं हिंदी लोक अिंग्रज सरकारला मदत करतात, मुडदे-फरासांचें काम करतात, हें अैकून हे सर्व वेडेपीर आहेत असेंच आम्हां सर्वांना त्या वेळीं वाटत असे. क्रूगर, जोबर्ट, क्रॉन्जे, डिलारे, डिवेट्, वगैरे नांवें भारतीय राष्ट्रीय वीरांचींच असावीत, अशा प्रकारचें प्रेम आम्हांस त्यांचेविषयीं वाटे. लेडी स्मिथ, प्रिटोरिया, किम्बरले, ब्लोअेन फाअून्टेन, वगैरे शहरांचा भूगोल आम्हांला कसा मुखोद्गत झालेला होता. यानंतरची विराट घटना म्हणजे रुसो-जपानी युद्धाची. पण त्या वेळीं मी कॉलेजमध्यें जाअून पोहोंचलों होतों.

अगदीं लहानपणीं काँग्रेसचें नांव मी अेकदांच अैकले होतें. आमच्या मामांच्या रामानें कित्येक सोबत्यांच्या मदतीने संभाजी नाटक बसविलें होतें. त्याचा अेक खेळ करून आलेलें अुत्पन्न त्यानें काँग्रेसला पोचतें केलें होतें. काँग्रेस काय आहे, हें कांहींच ठाअूक नसल्यामुळें नाटकाचें अुत्पन्न रामा फुकटच घालवून बसला, असें त्या वेळीं मला वाटलें होतें. सुरेंद्रनाथ बानर्जी म्हणून कोणी जबरदस्त वक्ता काँग्रेससाठीं पुण्याला आला होता, अेवढीच काय ती माहिती माझ्या पोर-कानावर आदळली होती.

लोकामध्ये मिसळण्याची लाज आणि पांच वडील बंधूंचा दाब या दोन कारणांमुळं माझा स्वाभाविक विकास बराच कुण्ठित झाला. अर्थात् अेका बाजूनें कोंडली गेलेली शक्ति दुसऱ्या बाजूनें प्रगट झाली. मी मनोराज्यांत रममाण होऊं लागलों. मोठेपणीं मी काय करीन, राजा झालों तर राज्य कसें चालवीन, वगैरे कल्पना अखण्ड चालू असावयाच्या. अिमारती बांधाव्या, जगलांतून रस्ते काढावे, नदीवर पूल बांधावेत, डोगर पोखरून बोगदे तयार करावेत, घोडयावर बसून सगळा देश हिंडून यावें, ह्या कल्पना करणे मला फार आवडे पण कोणतीहि कल्पना मनांत आल्यानंतर व्यवहाराच्या कसोटीला तिला लावून पाहिली पाहिजे, हें मात्र मला त्या वेळीं सुचले नाहीं. त्यामुळें माझ्या योजना सगळ्या गगनविहारी असत. आजच्या दृष्टीने विचार करतां वाटतें कीं, रचनात्मक बुद्धीचा विकास होण्याला माझ्या कल्पनांनीं आणि योजनांनी मला चांगलीच मदत केली असली पाहिजे.

या अन्तर्मुख वृत्तीबरोबरच सृष्टि-सौंदर्याकडेहि माझें लक्ष फार लवकर वेधले. माणसांत फारसे मिसळावयाचे नाहीं तेव्हां साहजिकच, नदी, नाले, तलाव, बगीचे, कुरणें, शेतें, वगैरे पाहण्यांत मन रममाण होऊं लागलें. यांत कांहीं सौंदर्योपासना आहे, हें समजण्याअितकी प्रौढता माझ्यामध्ये फारच अुशीरा आली नदीच्या घाटावर बसून नदीच्या प्रवाहाकडे अेकसारखी टक लावून पहात बसण्यांत मला किती तरी आनंद वाटे. अुंच अुंच पहाड, जुने झालेले किल्ले, आकाशाकडे बोट दाखविणारीं मंदिराची शिखरे आणि प्रकाशाशी झगडत रहाणारी घनघोर जंगलें लहानपणापासूनच माझ्या भक्तीचा विषय झालेलीं आहेत; निर्दोष आनंद लुटावयाची कला अनायासें अशी हस्तगत झाली होती. नदीचा घाट, या कांठावरून त्या कांठावर आसन जमविणारे नदीवरचे पूल, नदीच्या पृष्ठभागावर अुंदराप्रमाणें सुळसुळाट करणाऱ्या होड्या आणि म्हशी-रेड्याप्रमाणें संथपणें चालणारीं जहाजें, हें सर्व पाहून मनुष्याचें आणि निसर्गाचें असलेलें सख्य मनावर चांगलेच बिंबलें होतें. आज देखील पूल आणि होडी पाहण्याचें कुतूहल माझ्या मनांतून ओसरलेले नाहीं. बागेंतील फुलें आणि आकाशांतील तारे अितकीं वर्षें पाहून देखील त्यांतील ताजेपणाची टवटवी माझ्या वांट्याला अजून कमी झाली नाहीं. नदीला पूर आला, आकाशांतून अुल्का पडूं लागल्या, भूकम्प झाला, जंगलांत वणवा पेटला अथवा मुसळधार पाअूस पडून चारी बाजूला पाणीच पाणी झालें, तर अशा वेळीं माझी चित्तवृत्ति दबली न जातां त्या त्या प्रसंगाशीं तदाकार होअून मला त्याची मस्ती चढते. निसर्गाविषयींचें अितकें कुतूहल असल्या-

नंतर म्युझियम पाहण्याची भूक अुत्पन्न होणें स्वाभाविकच आहे. जन्मांत मी पहिला म्युझियम पाहिला तो मोती तलावाच्या कांठीं असलेला सावंतवाडीचा म्युझियम. त्याच्यामार्फत मला पुष्कळ शिक्षण मिळाले. किडे, फुलपांखरें मारून, टांचणीनें टोंचून ठेवलेलीं पाहून मला वाअीट वाटले. कारण फुलांवर बागडणाऱ्या फुलपांखरांशीं मी पुष्कळच खेळत होतों. पक्षी मारून, त्यांच्या पोटांत पेंढा भरून त्यांना काचेच्या कपाटांत ठेवलेले पाहून मला रडावेसे वाटे. पक्षी पहावे आणि त्यांची चिव-चिव अैकूं येअूं नये, यासारखी विटम्बना दुसरी कोणती ? मिरज आणि जमखिंडी (रामतीर्थ) येथील म्युझियम त्या मानानें फारच लहान होते. पण ते देखील अजून ध्यानांत राहिले आहेत. लहानपणची ही गोडी वाढीस लागून प्रौढ वयांत मुंबअी, बडोदा, कलकत्ता, जयपूर, मद्रास, लखनौ, लाहोर, कराची, सारनाथ, नालंदा, श्रीनगर, कोलम्बो, गौहाटी, अित्यादि ठिकाणचे कमी अधिक प्रख्यात म्युझियम पहाण्याची दृष्टि मला मिळाली. पुढें पुढें तर काश्मिरांतील अनन्तपूर, बिहारमधील अशोकाचें पाटलीपुत्र आणि सिंधमधील मोहन-जो-दरो यासारखीं जमिनींतून अुत्खनन करून अुघडकीला आणलेलीं स्थाने मी मोठ्या हौसेने पाहून आलों आहें.

सुदैवाने लहानपणीं मला बैलगाडीतून आणि पायीं प्रवास करण्याची मुबलक संधी मिळाली, यामुळेंच सर्व गोष्टी मी संथपणें डोळाभर पाहूं शकलों. रेल्वेचा आणि मोटारीचा हजारो मैलांचा प्रवास मोठेपणीं मी केला आहे. त्यांतून देखील मी पुष्कळ मिळविलें आहे. पण बैलगाडीचा आणि पायीं प्रवास जसा आंगीं लागतो आणि मनांत मुरतो, तसें अितर प्रवासाविषयीं नाहीं. *He travels best who travels on foot* (पायी फिरणें अुत्तम यात्रा) हें वाक्य अक्षरशः खरे आहे.

माणसाच्या घडणीमध्यें आअीबापांचा आणि भावाबहिणींचा जितका भाग असतो, तितकाच शाळेंतील आणि खेळांतील संवगड्यांचा आणि शिक्षकांचा असतो. याहि बाबतींत मी बराच वंचित राहिलो. लहानपणाच्या या बारा वर्षांत अेकाहि ठिकाणीं मी सबंध अेक वर्ष स्थिरपणें काढलेले नाहीं. वारंवार स्थानान्तर घडल्यामुळें गाढ मैत्रीचा मला लहानपणीं अनुभवच मिळाला नाहीं. शिक्षकांचीं कित्येक नांवें मी माझ्या संस्मरणांत

दिलीं आहेत. सर्वांत वडील दोन बन्धू हे माझे पहिले शिक्षक. कारवारच्या हिंदू स्कूल-मधील दुभाषी आणि कामत या दोन शिक्षकांची माझेवर कायमची छाप पडली. पुढें विद्येची अभिरुचि अुत्पन्न करणाऱ्या शिक्षकांमध्यें पवार, चंदावरकर, नाडकर्णी, कित्तूर, गोखले आणि रावजी बाळाजी करंदीकर हे होते. पवार मास्तरांच्या हाताखालीं मी अिंग्रजी पांचवी केली. ते जातीनें मराठा; प्रार्थनासमाजाविषयीं त्यांच्या मनांत भक्ति असावी. अिंग्रजीची आणि त्यांतल्या त्यांत अिंग्रजी व्याकरणाची त्यांना विशेष गोडी होती. नियमितपणा, शिस्त, व्यवस्था, वगैरेविषयीं त्यांचा आग्रह विशेष. पण हुशार विद्यार्थ्याविषयीं सहज दिसून येअील असा त्यांचा पक्षपात असे. चंदावरकर मास्तर विचारसिक. त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें त्यांना तीन 'एम्' चीं व्यसनें होतीं. म्युझिक, मॅथेमेटिक्स, मेटाफिजिक्स ( संगीत, गणित आणि तत्वज्ञान ) माझ्या वाटघाला त्यांचें गणितच आले होतें. तें ते फार सुंदर रीतीनें शिकवीत. त्यांचा सज्जन नीट-नेटकेपणा पहाण्याजोगा असे. चंदावरकर मास्तरांपेक्षां देखील त्याच्यावरचे मास्तर नाडकर्णी हे त्यांच्या सरळपणामुळें मला अधिक आदरणीय वाटत. कित्तूर मास्तर जुन्या शिस्तीचे देशस्थ ब्राह्मण. यांची विद्यार्थी-वत्सलता, त्यांच्या कडकपणानें देखील झांकली जात नसे. मला जें कांहीं थोडे संस्कृत येतें, त्याचा पाया आमच्या बाबाने घातलेला, पण माझेकडून संस्कृत करून घेतलें कित्तूर मास्तरांनींच. गोखले मास्तर अगदीं नव्या पिढीचे मास्तर. स्मरण-यात्रेंत ज्यांचा उल्लेख येतो, ते हे गोखले नव्हेत. त्यांचें यांचें कदाचित् नातें असेल ! गोखले आम्हांला अिंग्रजी आणि सायन्स हे दोन विषय शिकवीत. त्यांच्यांत गुरुपणा असा नव्हताच ! विद्यार्थ्यांशीं मित्राच्या नात्याने वागत. हुशार विद्यार्थ्यांची अशी कांही सफाअीदार सूक्ष्मपणें स्तुति करीत कीं विद्यार्थ्यांना त्यांचेकडे आकर्षिले गेल्यावांचून गत्यंतर नव्हतें. त्यांनीं मला आपल्या सायन्सच्या कपाटांच्या किल्ल्याच देअून ठेवल्या होत्या. कधीं हौस आली म्हणजे चार विद्यार्थ्यांना बरोबर घेअून शाळेंत रात्रीचा मी निजावयास जाअी. आणि घरीं फोटोचा कॅमेरा वापरण्याची संवय असल्यामुळें शाळेंतील दुर्बिणींतून आकाशांतील पृथ्वीचा चंद्र, गुरूचे चंद्र, वगैरे पाहण्याचा आनंद मी मिळवित असें.

रावजी बाळाजी करंदीकर ही अेक समर्थ व्यक्ति होती. जेथें जात तेथें स्वतःची छाप पाडीत. पुढें ते अेज्युकेशनल अिन्स्पेक्टर झाले होते. पाठय पुस्तक समितींतहि ते नेमले गेले होते. लहानपणीं माधुकरी मागून ते शिकले होते. मरतांना आपल्या शिलकीचे अेक लाख रुपये त्यांनीं गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ अर्पण केले, असें

मी ऐकलें होतें. यांच्या पूर्वीचे हेडमास्तर श्री. साने हे काव्येतिहासांत निष्णात होते. पण त्यांचे हाताखालीं फारच थोडे दिवस मी शिकलों. हायस्कुलांत किंवा कॉलेजांत मला कोणी अिंग्रज अध्यापक मिळाला नाहीं. मिळाला असता तर बरे झालें असतें, असें केव्हां केव्हां वाटतें. गोऱ्या लोकांकडून कांहीं खास श्रेष्ठ संस्कार मिळाले असते या आशेनें नव्हे, तर संस्कारांची विविधता असावी अेवढ्या खातरच.

सौंदर्याचे किंवा कलेचें प्रेम मी निसर्गातून आणि धार्मिक संस्कारांतून संपादन केलें. पण ज्याला कला म्हणतात, सौंदर्यानुभव म्हणतात, त्याची स्पष्ट कल्पना सुदैवानें माझ्या चित्तांत फार अुशीरा जागृत झाली. घरी नौकरचाकर असून देखील घरीं लागणारे पीठ रोजच्या रोज दळून घेण्याचें काम बहुधा माझी आअी, बहीण आणि भावजय याच करीत. त्या वेळी अंथरुणांतून अुठून आअीच्या मांडीवर डोके ठेअून साखरझोप घेण्याची मला संवय होती. आअी, आक्का किंवा वहिनी दळतां दळतां गाणीं म्हणत असत. संगीत आणि काव्य यांचा हा माझा पहिला परिचय.

चैत्र महिन्यात गौरी बसल्या म्हणजे गौरीच्या आसपास आरास करण्यांत येअी. अेकाद्या खोलीत किंवा दिवाणखान्यांत सुंदर सुंदर वस्तूंची सुभग आणि मोहक रचना करणें यांत कांहीं थोडेंथोडकें शिक्षण मिळतें असें नाहीं. बाहुल्यांच्या प्रदर्शनापासून कृत्रिम बगीचा आणि त्या बगीच्यांत तात्पुरता तयार केलेला कारंजा, या सर्व गोष्टी आरासेंत येत असत. मग आम्हीं निरनिराळ्या लोकांच्या घरीं जाअून त्यांची आरास पाहून येत असूं. गणेशचतुर्थीच्या वेळीं देखील असेंच होत असे. लहानपणापासून घरच्या देवांची मी पूजा करीत असें. यांतूनच पुष्परचनेची गोडी अुत्पन्न झाली. मन्दिरांत गेलों म्हणजे गायन, नर्तन, काव्यश्रवण, कथाकीर्तन, पौराणिक चित्रें आणि रामलीला किंवा लळीत यांसारखीं नाटकें, अुत्सवांतील आकर्षक विधि आणि स्वादिष्ट प्रसाद, हें सर्व मिळून सात्त्विक कलारसिकतेचें अुंची शिक्षण मिळत असे. घरीं अुत्सव, व्रतें, सण, सर्व कांहीं भक्तिपूर्वक पाळले जात. गणेशचतुर्थीचे दिवस आले म्हणजे पावसाळ्यांतील गणेशपाखरांप्रमाणें घरोघर गणपतींची गर्दी व्हावयाची. हे गणपती कोठें दीड दिवस, तर कोठें तीन दिवस, आणि विशेष सोहळा असेल तर दहा दिवस पाहुणे राहून निजधामाला जात. हें पाहून अेकदां मला वाटलें, हे गणपती खरोखरच बुद्धिवान आहेत. स्वतःचें काम संपलें, मुदत भरली कीं चालूं लागतात. मनुष्यानें आपलें शिक्षणहि वेळेवर आटोपलें पाहिजे. नोकरीमधून पेन्शन देखील वेळेवर घेतलें पाहिजे. धंद्यांतून देखील वेळींच

निवृत्ति घेतली पाहिजे. आणि या जगांतून देखील यथाकाळी सुखानें निरोप घेतला पाहिजे. चेगटपणानें कोठेहि रेगाळूं नये.

ऋषिपंचमीच्या दिवशीं बैलाच्या श्रमाचें कांहीं न खाण्याचें आणि वर्षांतून निदान अेक दिवस पशुद्रोहापासून मुक्त रहावयाचें व्रत मला फारच आकर्षक वाटे. हें व्रत फक्त बायकांसाठीच कां असावें ? असेहि वाटल्यावांचून रहात नसे. हरतालिका आणि वटसावित्री हे तर बायकांचे खास सण. यांच्या मुळाशी केवढें सुंदर आणि भव्य पौराणिक कथाकाव्य पसरलेले आहे ! नागपंचमीच्या दिवशीं आम्ही घरोघर स्वतःच नाग तयार करून त्यांची पूजा करीत असूं चिकण्या मातीचा नाग करावयाचा. त्याची रुंदट फडा तयार करावयाची. मागल्या बाजूला दहाचा आंकडा कोरावयाचा. डोळ्याच्या ठिकाणीं दोन गुंजा बसवावयाच्या आणि दोन पाती दुर्वाची नागाची जीभ तयार करावयाची. गोकुळअष्टमीच्या दिवशीं अेका मोठ्या पाटावर आम्ही सवंध गोकुळ तयार करीत असूं चारी बाजूला किल्ल्याच्या भिंती करून, भिंतीवर शिगरे खोचून, त्यांवर कावळे बसवून देत असूं. चारी बाजूला चार महाद्वारें, आंत नंद, यशोदा, बळराम, कृष्ण, त्याचा सवंगडी पेंद्या, पुरोहित, महाबळभट, गाई, वासरें, सर्व कांहीं हातानें बनवून आम्ही गोकुळांत ठेवून देत असूं त्या दिवशी सात टेकडयाच्या घेरावाचें रोम शहर बांधणाऱ्या रेम्युलस् आणि रीमस् प्रमाणें अथवा चिखल-मातीतून सैन्य तयार करणाऱ्या शालीवाहनाप्रमाणें आमची छाती फुगत असे. रामनवमी, जन्माष्टमी, तुलशीचे लग्न, होळी, दरेक सणाचें वातावरण निराळें गोपाळकाल्याच्या दिवशीं कृष्णलीला करून आम्ही दही चोरीत असूं. हिवाळ्यांत पूर्वेकडे तांबडें दिसण्यापूर्वीच नदीवर जाऊन आघोळ करून मंदिरांत काकड आरती पहावयास जात असूं. भाद्रपद महिन्यांत श्राद्धप्रसंगी वंशाच्या पितरांचें स्मरण होअी. महाशिवरात्रीचे दिवशी निर्जळी अुपवास करून वचननिष्ठ हरणाचें आम्ही स्मरण करीत असूं. आणि आपल्या दुधाचा अभिषेक करणाऱ्या गाअीची आठवण करून महादेवाला रुद्राभिषेक करीत असूं. अशा रीतीनें कर्मकांड, अुत्सव, व्रतवैकल्य, भक्ति, पुराणश्रवण, वेदान्त-चर्चा, अित्यादि तऱ्हतऱ्हेच्या संस्कारांमुळें हृदय समृद्ध होत असे.

धार्मिक वाचनामध्यें अगदीं लहानपणीं शनिमाहात्म्य वाचलें होतें. सत्य-नारायणाच्या कथेचे तर सांज्याबरोबरच सेवन करावयाचें. स्वप्नाध्याय वाचल्यानंतर पडलेल्या स्वप्नाची दिवसभर आम्ही चर्चा करीत असूं. अेकदां अेक शकुनवन्ती हातांत आली; तेव्हां त्यांतील आंकडयावर डोळे झांकून खडा टाकून भविष्य

समजून घेण्याचा आम्ही प्रयत्न करीत असूं. त्यानंतरचें आमचें धार्मिक अध्ययन म्हणजे पांडवप्रताप, रामविजय, हरिविजय, गुरुचरित्र, भक्तिविजय, शिवलीलामृत, सन्तलीलामृत, गजेंद्रमोक्ष, अित्यादि ग्रन्थांचें. कर्मकाण्डाबरोबर भक्तियोगाचें मिश्रण झाल्यामुळें धार्मिक जीवनांत अेकांगीपणा राहिला नाहीं. आम्ही जरा मोठे झालों आणि घरांत स्वामी विवेकानंदाचे ग्रंथ मराठीतून आले. त्यांतूनच भगवद्गीतेचें अध्ययन सुरू झालें प्रबुद्धभारत आणि ब्रह्मवादिन् या दोन मासिकांतून वेदान्ताचा संदेश अिंग्रजींतून दर महिन्याला येअी. आण्णाकडून त्यांतील कांहीं लेखांचें सार आम्हांला मिळे. बाबानें तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्या संतवाणीचा परिचय करविला. मनाचे श्लोक तर आम्ही लहानपणींच पाठ केले होते. पदें, भजनें, आणि गाणीं यांचीं गोडी आमच्या आक्कामुळें आणि आअीमुळें आम्हांला लागली होती आणि सावंतवाडीला गेल्यानंतर श्री. रघुनाथ बापू रांगणेकरानीं राजयोगाची दीक्षा वडिलांना आणि आण्णाला दिली.

सामाजिक सुधारणेच्या बाबतींत जो प्रारंभ झाला तो सबंध हजामत न करवतां फक्त दाढीच करण्याचा. माझे दोघे वडील भाअू, जेव्हां पुण्याहून परत आले तेव्हां डोक्यावरील केस तसेच राहूं देअून त्यांनीं फक्त दाढीच करविली होती. घरांत मोठा हाहाकार झाला. मुलें ख्रिस्ती झालीं आहेत, अशी जिकडे तिकडे टीका होऊं लागली. प्रकरण अितकें माजले की, त्यांना हजाम बोलावून वस्तऱ्यानें डोकें साफ करवावें लागले गाअीच्या खुराअितक्या घेराची लांबलचक शेंडी ठेवून तिच्या आसपास अेक किंवा दोन बोटी घेरा ठेवणें हे धर्मांचें लक्षण होतें आंघोळ झाल्यानंतर दोन्हीं हातांनीं डोक्यावरचो शेंडी चाबकाप्रमाणें फटाक फटाक वाजविण्यांत लोकांना केवढा अभिमान वाटत असे! पुढें पुढे शेंडी पातळ आणि आखूड होत जाअून जवळजवळ नामशेष होत आली आहे.

याच सुमाराला अेकदां पुण्याहून वडिलांना तार आली की, तुमचा मुलगा विष्णु मिशनऱ्यांच्या नादीं लागून ख्रिस्ती होण्याच्या तयारींत आहे. ताबडतोब येअून त्याला वांचवून घ्या. वडील घाबरले. तावडतोब पुण्याला गेले. तेथे समजलें कीं, अप्रिलच्या पहिल्या तारखेची ती मस्करी होती. त्या वेळीं घरच्या सर्व लोकांची

जी गाळण झुडाली होती ती पहातां स्पष्ट म्हणतां येअील कीं, त्या वेळची धर्मान्तराची भीति मरणाच्या भीतीहून हजारपट अधिक होती. धर्मान्तर म्हणजे सामाजिक आणि सांस्कृतिक मृत्यु आणि चारित्र्यनाश, अशीच सार्वत्रिक समजूत दिसून येते.

यानंतरची घरांत शिरलेली सुधारणा म्हणजे सोवळें न नेसण्याची. प्रथम आमच्या घरीं कांदा कोणीच खात नव्हतें. कांद्याचा घरांत शिरकाव झाला बाबामुळें. त्याला कांद्याचीं भजीं फार आवडत. पण तीं रात्रीच करीत असत. केरोसिनचा दिवा देखील माझ्या देखतच घरांत सुरू झाला. घरांत सर्वत्र समया आणि पणत्याच असत. त्या कमी होऊन जेव्हां चिमणीचे दिवे आले, तेव्हां आपण तितक्या अशीं भ्रष्ट झालों, आपण धर्माच्या बाबतीत ढिले झालों, असें आम्हांला वाटूं लागलें. ज्या घरांत तिळाच्या तेलाचे दिवे असतील, त्या घरांतच लक्ष्मी प्रसन्न असते, अशी आमची समजूत होती. आम्ही साताऱ्याहून कारवारला गेलों आणि समुद्रकांठच्या गरम हवेमुळें आणि तेथील लोकाच्या सोबतीमुळे घरात चहा आणि कॉफी पिण्याअितके आम्ही अधार्मिक झालों. कारवारला गेल्यानंतर आम्ही घरांत ब्राह्मणेतराचें पाणी मधून मधून वापरूं लागलों. पिण्यासाठी किंवा स्वयंपाकासाठी नव्हे आणि पूजेसाठीं तर मुळींच नव्हे पण आंघोळीसाठीं. शूद्र बाअीनें धुऊन आणलेल्या लुगडयावर पाणी ओतून पिळून घेण्याचें देखील हळू हळू बंद झालें. आमच्या घरीं सोवळ्या-ओवळ्याची आणि देवपूजेची आस्था वडिलांच्या खालोखाल माझीच होती. तरीहि ग्रहणाच्या वेळीं खाणें आणि अस्पृश्यांना शिवून आंघोळ न करणें, या दोन गोष्टी मी माझ्या पुरत्या हट्टानें चालू ठेवल्या. माझे वडील बंधू जे कांही फेरफार सुरू करीत, ते नवीन पिढीची ढिलाअी किंवा अुच्छृंखळपणा म्हणूनच. अमुक वस्तु अिष्ट आहे म्हणून समाजांत अितका फेरफार केला पाहिजे, अशी सुधारक वृत्ति त्यात नसे. मी लहानपणीं 'धर्मनिष्ठ' असल्यामुळें मी जे कांहीं फेरफार केले त्यांची कारणे सागून त्या वस्तूंचा प्रचार करण्याची मला संवय होती. हाय स्कुलांत जेव्हां अेकदां स्नेहसंमेलन झाले तेव्हां ब्राह्मण-ब्राह्मणेतर, हिंदु-अहिंदु, असा पंक्तिप्रपंच आणि अुचनीच भाव पाहून मी आमच्या कितूर मास्तरांशी चांगलाच भांडलो होतों. माझें म्हणणें असें होतें कीं, ज्यांना वेगळें बसावयाचें असेल त्यांनीं खुशाल वेगळें बसावें, त्यांच्या आड मी येत नाहीं. पण ब्राह्मणांनीं वर बसावें, त्यांना अगोदर वाढावें, मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी, यांच्या पानांभोंवतीं रांगोळी नसावी, असला हलका प्रकार मी चालूं देणार नाहीं. स्नेहसंमेलन येथेंच मोडून टाकण्यास मी तयार आहें.

मी ॲक सेक्रेटरी असल्यामुळें माझाच हट्ट मी खरा केला. पण त्यापुढें कित्येक वर्षें स्नेहसंमेलन होऊंच शकलें नाहीं. आम्ही सारस्वत लोक ब्राह्मण म्हणून ब्राह्मणेतर लोकांशीं मिसळत नाहीं आणि पंच द्राविड ब्राह्मण आमच्या हातचें खात नाहींत. त्यामुळें महाराष्ट्राच्या समाजांत आम्हां सारस्वतांची स्थिति कांहींशी विचित्र आहे. म्हणूनच मला वाटतें, माझ्यामध्यें धार्मिक आणि सामाजिक उदारता फार लवकर जागृत झाली. ब्राह्मणी संस्कृतीमध्यें वाढण्याचा लाभहि मिळाला. आणि आपल्याला कुणी कमी लेखिलें म्हणजे आपल्याला किती वाओट वाटतें, याचा प्रत्यक्ष अनुभव झाल्यानें अितरांविषयीं सहानुभूति बाळगण्याला मीं शिकलो. यामुळेंच मोठेपणीं महाराष्ट्राच्या बाहेर गेल्यानंतर सिंधी, गुजराती, मुसलमान, पार्शी, बंगाली, आसामी, मारवाडी, मद्रासी, वगैरे सर्व समाजांशी मिसळून वागण्याचें मला आवडूं लागले आणि मनुष्य जितका दूरचा तितकेंच त्याच्याविषयीं आकर्षण अधिक, असा स्वभाव बनून गेला. आपले कोठें तरी चुकतें आहें, म्हणूनच अितक्या अुज्ज्वल धर्माचा वारसा मिळून देखील आपण अितके पतित आहोंत, ही भावना मनामध्यें बाणली.

वर वर्णिलेल्या सर्व विविध तयारीनें मी कॉलेजांत प्रवेश केला.

## माझें नांव १

लहान मुलांना त्यांचे नाव विचारले म्हणजे पुष्कळदां लाजेनें किंवा संकोचानें तीं आपलें नांव सांगत नाहीत. असें झालें म्हणजे मी थट्टेनें त्याना म्हणतों, "तुझें नांव तुला खरोखर आठवतच नाहीं. लहान मुलें निजलीं म्हणजे झोपेंत आपलें नांव विसरतात. अुठल्यानन्तर कुणीं नांव घेअून हांक मारली म्हणजे मग त्यांना आपलें नांव आठवतें. आज सकाळपासून तुझें नाव कुणी काढले नसेल. त्यामुळें तुझें नांव तुला आठवत नाही, खरे ना ?" असें म्हटले म्हणजे कांहीं मुले अुत्तेजित होअून म्हणतात, "मुळींच नाहीं. माझें नांव मला आठवतें."

"खरेच आठवतें काय ? तर सांग पाहूं तुझें नांव."

माझी ही युक्ति नेमकी लागू पडते व मूल आपलें नांव सांगतें. अेकदां अेका घुम्या मुलाशीं गांठ पडली. "विसरलास ना तुझें नाव ?" असा माझा शास्त्रोक्त प्रश्न अेकतांच थोडेसे गाल फुगवून, डोळे गंभीर करून, त्यानें मान हालवली आणि तो म्हणाला, "खरे आहे. माझें नाव मी विसरलों आहें !" माझी चांगलीच खोड जिरली ! पण वेळ मारून नेण्यासाठीं मी म्हटलें, "अरेरे ! किती दुःखाची गोष्ट ! या रे कोणी तरी आणि सांगा या विचाऱ्याला त्याचें नांव." मुलगाहि खमंग ! -खरोखरच कोणी येतें का म्हणून चोहींकडे पाहूं लागला.

आज मोठेपणी कोणीहि न विचारता मी स्वतःचें नांव सांगणार आहें. माझें नाव मी प्र म केव्हां ऐकले, हें मला ठाऊक नाहीं. हेंच माझें नांव असें मला कसें कळलें तें मी कसे सांगणार? पण पशुपक्षी देखील त्यांना ठेवलेलें नांव ओळखतात. तेव्हां स्वत:चें नांव ओळखण्यास मोठीशी मति लागत नसावी. ऐकाव्या शास्त्र्याला विचारलें, तर तो प्रतिष्ठित आवाज काढून म्हणावयाचा—*भूयः श्रवणेन नामग्रहणम्* ।

जेथें अक्कल चालत नाहीं, तेथे संस्कृत चालवावें.

आपलीं नांवें बहुतकरून जन्मनक्षत्राच्या अक्षरांवरून ठेवलीं जातात. पंचांगांत अवकहडाचक्र म्हणून ऐक चक्रव्यूह असतो. त्या चक्राच्या किनारीवर ग्रीक वर्णमालेतील अक्षरे मांडलेलीं असतात व आंतल्या घरांत नक्षत्र, राशी, गण, नाडी, इत्यादि अनेक गोष्टी दिल्या जातात. ऐकेक नक्षत्राच्या वाट्याला चार चार अक्षरें येतात त्यांपैकी ऐक अक्षर घेऊन तें आद्याक्षर कल्पून रुचेल तें नांव ठेवण्याचा रिवाज आहे. हें काम बहुशः जन्मपत्रिका करून देणारे जोशीच करतात

पण माझे नांव या जुन्या चाकोरीत सांपडले नाही. माझ्या जन्मापूर्वी कांहीं दिवस आमच्या घरीं ऐक साधू आला होता. त्यानें माझ्या वडिलांस सांगितलें, "याहि खेपेस तुमच्या घरीं मुलगाच जन्मेल. त्याचे नांव दत्तात्रेय ठेवा; कारण तो गुरुदत्तात्रेयाचा प्रसाद आहे." माझ्या वडिलांनीं त्या साधूला कांहीं देण्याची गोष्ट काढली. पण तो कांही घेईना. त्यानें ऐवढे मात्र सांगितले की, "मुलगा जन्मल्यावर दर गुरुद्वादशीला बारा ब्राम्हण जेवूं घाला म्हणजे झाले" माझ्या वडिलांचा जीवमान असेतोंपर्यंत आमच्या घरीं दरवर्षी बारा ब्राह्मणांची ही समाराधना होत असे.

मला असें वाटतें कीं, प्रत्येक माणसाला आपलें स्वत:चें नांव पसंत करण्याचा हक्क असावा. कितीतरी जणांस सर्वंध जन्मभर स्वतःला नावडणारे नांव कसेंबसे गोड करून घ्यावें लागले आहे. या बाबतीत मुली कांहीं अंशीं भाग्यवान् खऱ्या. कारण लग्नाच्या वेळीं त्यांचें नांव बदलतें. पण तेव्हां देखील त्यांना आपले नवें नांव स्वतः पसंत करण्याची मुभा कुठें असते?

मला स्वतःचें नांव पसंत करण्याची मोकळीक असती तर मी कोणतें नांव पसंत केले असतें, हे आज मला सांगतां यावयाचें नाहीं. पण आज मला ऐतकें तरी खास समाधान आहे की, माझें नांव आकाशांतील दूरच्या तटस्थ नक्षत्रांच्या स्वाधीन न राहतां माझ्या प्रेमळ आईबापांच्या हातींच राहिले आणि त्यांनीं फलज्योतिषाकडे धांव न घेतां ऐका विरक्त भक्ताची सूचना स्वीकारली.

मोठेपणीं अेकदां अेका आदरणीय व्यक्तीनें माझ्या नांवाचें महत्त्व मला समजावून देतानां खालील ओळी म्हटल्याः

आपणासि करि आपण दत्त ।
श्रीपति म्हणति यास्तव दत्त ॥

त्या दिवशीं मला समजलें कीं, स्वतःचें जीवन अर्पण केल्यानेंच दत्त हें नांव सार्थ होअील. आपलें सर्वस्व देअून टाकावें, कशाचाच लोभ बाळगूं नये, स्वात्मार्पण करावें, अेवढी वृत्ति जर मला साध्य करून घेतां आली, हा आदर्श जर मनांत आणि जीवनांत बिंबवितां आला, तरच माझ्या नांवाचें मी सार्थक केलें असे होअील. हे मला कळतें; पण त्याप्रमाणें मी वागूं शकलो आहे किंवा त्या दिशेकडे मी जात आहें, असे मला आजहि म्हणतां यावयाचे नाहीं. आणि त्यामुळें माझ्या नांवाबरोबर विषाद सतत चिकटून राहिला आहे.

दत्त आणि आत्रेय हे दोन शब्द मिळून दत्तात्रेय शब्द बनला आहे. अत्रिऋषीचा मुलगा म्हणून तो आत्रेय दत्त. त्रि म्हणजे त्रिगुण : सत्त्व, रज, तम. या तिन्ही गुणांच्या पलीकडे जो गेला, त्रिगुणातीत झाला, तो अ-त्रि ऋषि. असूयारहित अशा अनसूयेच्या पोटीं त्रिगुणातीत अत्रिऋषीला जो मुलगा झाला तो स्वात्मार्पण करूनच जीवनाचे सार्थक करणार.

पण केवळ नांव धारण केल्यानें त्याला शोभतीलसे गुण अंगीं येतातच, असे या जगांत थोडेंच घडतें ?

*

## अुजवा का डावा ?

२

आअीबापांचा जो सगळ्यांत धाकटा मुलगा असतो, तो कांही केल्या लवकर मोठा होतच नाहीं. माझे तसेच झाले. आपल्या हातानें जेवायला शिकावयाचे असतें, हे माझ्या स्वप्नीहि आले नाहीं. आअीनें भरवावे, आक्कानें भरवावें किंवा वहिनीनें. असें आमचे चालत असे. कितीदां तरी बाबा चिडून म्हणत असे, 'अेवढा मोठा घोडा झाला आहे पण अजून आपल्या हातानें जेवत नाहीं !' असें कोणी बोललें म्हणजे मला फार वाअीट वाटत असे; पण टीका होत आहे, तेव्हां स्वतःच्या वागण्यांत किंवा संवयींत कांहीं बदल केला पाहिजे, अेवढें मात्र मला सुचले नाहीं.

अेकदां घरांतील सर्व मंडळींनी अेक कट केला सगळा दिवस धिंग धिंग नाचून मी संध्याकाळीं थकून झोपीं गेलों होतों. तेथून मला अुठवून स्वयंपाकघरांत घेअून गेले. वाढलेले अेक ताट माझ्या पुढ्यांत ठेवण्यांत आलें. मग विष्णूनें चिमीला बोलावून म्हटले, "चिमे, या ताटांत थोडा भात कालव." चिमी माझी पुतणी. बाबाची मुलगी. माझेपेक्षां फक्त दीड वर्षानें लहान. चिमीने भात कालवून तयार केला. मग विष्णु चिमीला म्हणाला, "आतां या दत्तूला भरव." चिमीनें अेक घांस हातांत घेअून माझ्या तोंडाजवळ आणतांच मी निर्विकारपणें तोंड अुघडलें व घांस घेतला. अेकदम टाळ्यांचा कडकडाट झाला. सगळे हसूं लागले:- "पुतणी काकाला

भरवते तरीहि याला लाज नाहीं !" तेव्हां कुठे माझ्या ध्यानांत आलें कीं ही माझी फजिती झाली. मग मी लाजलों आणि दुसरा घास घेण्याचें साफ नाकारलें आणि खडबडून जागा होऊन मी तत्काळ निश्चय केला कीं, यापुढें आपल्या हातानेंच जेवावयाचें.

पण जेवावयाचे कोणत्या हाताने हे कुणाला ठाऊक होतें ? मी गोंधळलो. समोरच्या पंक्तींत बसलेल्या मंडळीकडे पाहिलें त्यांचे अनुकरण करूं जातां मी डावा हात ताटांत घातला. समोरच्या आरशात पहात असतां जसा अुजव्या-डाव्याचा घोटाळा होतो, तसें माझें झालें विष्णूनें पुनः नागी मारली— "पहा, या घोड्याला अजून अुजवा हात कोणता आणि डावा हात कोणता, हे देखील कळत नाही. "

पुढें मी वडिलांच्या जवळ बसून जेवूं लागलो. दोनतीन वेळां हाताचा घोटाळा झाला. तेव्हां मी मनाशीं खूणगांठ बाधली कीं या शास्त्रात आपबुद्धि कामाची नाहीं. मग मी रोज जेवायला बसतांनाच वडिलांना सरळ अुघडपणें विचारीत असें की, "अुजवा हात कोणता ?" खरा हात अेकदा अुघा झाला कीं मिळवली. मग कसलीच चिंता नाहीं.

अेके दिवशीं अचानक मला अेक शोध लागला. माझ्या अुजव्या कानांत दोन मोत्यांची अेक बाळी होती. मी सिद्धांत शोधून काढला की, ज्या बाजूच्या कानात बाळी आहे ती अुजवी बाजू या बाजूच्या हाताने जेवावयाचें. हा शोध लागल्यानंतर मग मी वडिलांना विचारण्याचे सोडून दिले. जेवण्याच्या पूर्वी हातानें मी दोन्ही कान चाचपून पहात असें. आणि ज्या कानांत मोती हातास लागे त्या बाजूच्या हातानें जेवण सुरू करीत असें. मी ह्या जो शोध लावला तिकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. आपली फटफजीती होअील या भीतीनें मी जेवायला बसतां बसतां मोठ्या चलाखीनें हें काम अुरकून घेत असें.

लहानपणीं आम्हांला बूट घालावे लागत. तसें म्हटलें तर आमचें बाळबोध घराणें. अिंग्रजी फॅशनचा आमच्या घरांत प्रवेश झाला नव्हता. अिंग्रजी फॅशनबरोबर जो अेक तोरा असतो आणि गरिबांविषयीं तुच्छभाव असतो, तो आमच्या

घरीं आणणारे कोणीच नव्हते. तरी देखील दखादेखीनें आमच्या घरात कित्येक परदेशी वस्तु येऊन थडकल्या होत्या. माझ्या नशिबीं अेक रेशमी झबलें आणि विलायती बूट वापरण्याचें आलें होतें झबल्यानें फारसा त्रास दिला नाहीं. थोडीशी जबरदस्ती केली म्हणजे बटणें बसत असत. पण बुटामध्यें अुजवा आणि डावा असा जातिभेद होता आणि तो कांहीं केल्या माझ्या डोक्यांत शिरेना. रोज सकाळीं अुठून वडिलांकडे जाअून विचारावे लागे की अुजवा बूट कोणता आणि डावा बूट कोणता ? वडिलांनीं कितीतरी वेळां पायाच्या आणि बुटाच्या आकारांतील सारखेपणा मला समजाविण्याचा प्रयत्न केला, पण माझ्या डोक्यांत तो शिरेल तर शपथ. मला नाहीं वाटत कीं वडिलाच्या समजावून सांगण्याच्या शक्तींत कांहीं कमतरता असेल. आणि मला असेंहि वाटत नाहीं की माझी समजशक्ति अगदींच मठ्ठ असेल. तरीपण अुजव्या-डाव्याचे शास्त्र मला अवगत झालें नाहीं तें नाहींच. वडिलाची समजावण्याची दिशा आणि माझी समजून घेण्याची दिशा या वेगळ्या वेगळ्या पडत असाव्यात; त्यांचा मेळ जमत नसे हें खचित. मानसशास्त्राच्या अभ्यासूनीं अशीं अनेक अुदाहरणें पाहिलीं असतील. व्यवहारांत तोंडचे हिशोब करतांना अेकाची अेक रीत असते, दुसऱ्याची दुसरी असते. दोघे मोठ्यानें हिशेब करूं लागले म्हणजे अेक काय म्हणतो तें दुसऱ्याला क्वचितच समजतें. असेंच कांहीसें आमचे होत असलें पाहिजे.

त्यानंतर मी दोन्ही बूट अगदीं अभेद बुद्धीनें हवेनसे वापरूं लागलों. आणि थोडयाच दिवसांत मी बूट असे कांहीं निराकार करून टाकले की मग वडिलांनाहि ओळखतां येअीना कीं कोणता बूट अुजवा नि कोणता डावा !

*

# साताऱ्याच्या आठवणी

स्वतःची ओळख द्यावयाची म्हणजे नांव, गांव, ठिकाण सांगितलें पाहिजे. म तर फक्त नांव सांगितले. बाकीचें सांगावयाचें राहूनच गेले.

सातारा येथें यादो गोपाळ पेठेंत आम्ही लक्कडवाल्यांच्या वाडयांत रहात अ माझ्या आयुष्याच्या अगदीं पहिल्या पहिल्या आठवणी साताऱ्याच्याच आहेत तेव्हां तेथूनच प्रारंभ केलेला बरा.

## उलटें जग

आमच्या घराच्या ओटयाच्या पायऱ्यांवर अुभें राहिलें असतां अुजव्या बाजूस द 'अजिमतारा' अथवा 'अजिंक्यतारा' किल्ला दिसत असे. अेके दिवशीं मी शोध लावत कीं पायऱ्यावर अुभें राहून जर अुठबस अुठबस केलें तर किल्ला देखील वरखाल होतो. हा शोध लागल्याबरोबर मला ही मजा बघण्याचा छंदच लागला. अुठाबश काढीत जावें आणि तोडानें अ...ब, अ...ब असें म्हणत जावें "अ...ब" अ म्हणत होतों हें आतां कांहीं आठवत नाहीं. मी लागलीच माझा हा शोध केशू आणि गोंदूला जाहीर केला. तेव्हां ते देखील अ...ब, अ...ब करूं लागले. आमच्य शेजारी नामदेव शिंपी रहात असे. त्याचे मुलगे नाना आणि हरि हे देखील आमच्य

स्वतःला अुलटे टांगून घेणाऱ्या वटवाघुळांना अुलटया दुनियेंत काहीं विशेष काव्य गवसत असेल अमे वाटत नाहीं. माझ्या या दुसऱ्या शोधाचेंहि प्रकाशन मी मोठया थाटानें केले.

अशा प्रकारचा हा आनंद लुटत असतां मला अेक विचार सुचला अेखाद्या तत्त्वज्ञान्याला सुचावा असाच तो गहन विचार होता. आजदेखील मला आश्चर्य वाटतें की त्या वयांत मला असा विचार कसा सुचला असेल. मी अुलट्या डोक्यानें ढेंगांतून जग पहात होतो मला शंका आली कीं अुलटे जग कोणतें आणि सुलटे कोणतें ? सगळेच लोक जर खालीं डोकें वर पाय करून झाडासारखे होअून चालूं लागले तर सगळ्यांनाच जग असें अुलटे दिसूं लागेल, त्यालाच सगळे सुलटे म्हणतील. आणि मग माझ्या सारखा अेखादा खोडकर माणूस पायावर अुभा राहिला तर त्याला आज आपल्याला दिसतें तसें जग दिसूं लागेल. आणि मग तो आश्चर्यचकित होअून म्हणेल, 'पहा, जग कसें अुलटे झाले आहे. डोक्यावर आकाश आणि पायाखाली जमीन !!'

असा विचार मला सुचला खरा. पण तो कुणाला सांगावयाचें मात्र सुचलें नाहीं. सांगावयाची अिच्छा कां झाली नाहीं हें सागणें कठीण. मुलांत रहस्यगोपनाची वृत्ति असते त्याचा कदाचित् हा परिणाम असावा. किंवा सुचलेले खोल विचार व्यक्त करण्यापुरती भाषासमृद्धि मजजवळ त्या वेळीं नसावी, म्हणून तसें झालें असेल. जवळ पुरेशी भाषा नसल्यामुळें मनुष्यजातीनें कांहीं थोडेथोडकें दुःख सोसलें नाहीं.

माझ्या वडिलांना फोटोग्राफीचा नाद होता. पेटीच्या आकाराचे लहानमोठे दोन "कॅमेरे" आमच्या घरीं होते.

आम्हांला समोर खुर्चीवर बसवून डोक्यावर अेक मोठा काळा कपडा घेऊन वडील कॅमेऱ्यामध्यें पहात. अेके दिवशी मी त्यांना म्हटलें, "तसबिरीच्या यंत्रांत काय दिसतें तें मला जरा पाहूं द्या ना?" त्यांनीं मला अेका लाकडाच्या घोडीवर कॅमेऱ्यामागें उभें करून माझ्या डोक्यावर काळें कापड घातले आणि ते म्हणाले, "आतां या पांढऱ्या कांचेवर काय दिसतें तें पहा." प्रथम मला वाटलें की, या कांचेंतून आरपार नळींतून भिंतीकडच्या पडद्यावर पहावयाचें असेल पण लगेच मला दिसून आलें कीं पांढऱ्या कांचेवरच चित्र पडतें. पण अरे हे काय? समोरच्या खुर्चीचे पाय अुलटे आहेत. अरे हें पहा, केशू खुर्चीवर येअून बसला. तो देखील पाय वर अुलटे करूनच चालत होता. ही पहा, मनी येअून शेपूट वर करून केशूच्या पायाशीं आपलें नांक घासत आहे. केशू जीभ काढीत आहे आणि कुत्र्यासारखे हात हालवीत आहे. आतां समजलें कीं खरें जग अुलटेंच आहे. आपण वेड्यासारखे पायानें चालतों म्हणून आपल्याला हें सर्व विपरीत दिसतें. खरे म्हटलें तर आकाश खालीं आहे आणि जमीन वर आहे!

## पोटातील आग

अेके दिवशी अेक सुकडा म्हातारा आमच्या दारीं आला आणि म्हणूं लागला, "थोडें ताक द्या मला. पोटांत आग पडली आहे." मला वाटलें, या माणसानें चुकून निखारे गिळले असतील. नाहीतर पोटांत आग कशानें पडणार? मी म्हणालों, "तुला अेक तांब्याभर पाणी पाजतों म्हणजे आग विझून जाअील. मला राहून राहून आश्चर्य वाटत होतें कीं यानें आग कशी खाली असेल! (श्रीकृष्णानें दावानल भक्षण केला होता ही गोष्ट त्या वेळीं मला ठाअूक नव्हती.) अितक्यांत आंतून विष्णु आला. त्यानें म्हाताऱ्याचें बोलणें अैकलें आणि अेक लोटाभर ताक आणून त्याला पाजले. म्हातारा आशीर्वाद देत देत निघून गेला. दुसरे दिवशी दुपारीं तो पुनः आला व म्हणूं लागला, "पोटांत आग पडली आहे; ताक द्या." मी माझ्या मनाशीं ठरविलें कीं हा म्हातारा लबाड आहे. कालच याची आग विझविली होती ना? मी रागानें त्याला म्हटलें, "लुच्चा! चल नीघ येथून. खोटे बोलतोस. जा, नाहीं तर लाथ मारतों

पहा." पण विष्णूनें येऊन अुलट मलाच धमकावलें आणि पुनः त्यानें त्या म्हाताऱ्याला ताक पाजलें.

बिचारा म्हातारा ! त्याला काय होत होतें याची जर मला कल्पना असती तर मी त्याचा असा अपमान केला नसता. आणि त्याला जर माझें अज्ञान कळून चुकलें असतें तर माझ्या बोलण्याचें त्याला वाअीट वाटलें नसतें. मी अेक नेणतें लेंकरू आहे असे समजून त्याने माझेकडे दुर्लक्ष्य केले असेल का श्रीमंताचे चढेल पोर आहे म्हणून तो मनांतल्या मनांत माझ्यावर रागावला असेल ? हें कोणी सांगावें ? विचाऱ्याची आतां पुनः गांठ कशी पडणार ?

### मांझ गध

काशी वहिनी ( मी तिला धाकटी वहिनी म्हणत असें ) माझी विशेष पक्षपाती होती. ती मला न्हाअूं घाली. स्वच्छ कपडे घाली. माझ्या लहानशा शेंडीची वेणी घाली आणि माझ्या कपाळाला कुंकवाची टिकली लावून डोळेभर पाही. केशू आणि गोंदू हें बघून माझी चेष्टा करीत आणि म्हणत, "पहा, हा वेडा कसा मुलीप्रमाणें वेणी घालून घेतो आणि कुंकू लावून घेतो." मी रडकुंडीला आलों म्हणजे धाकटी वहिनी मला धीर देत म्हणत असे, "त्यांना वाटेल तें बकूं दे त्याचें बडबडणें तूं अैकतोस कशाला ?" पण शेवटी मी केशूचो बाजू स्वीकारली, आणि धाकट्या वहिनीला साफ सांगितलें कीं "आम्हांला नाही कुंकू लावून घ्यावयाचे."

त्या दिवसापासून केशू मला रव्याचें गंध लावूं लागला. आम्ही घरचे स्मार्त. तेव्हां आमचे गंध आडवेंच असावयाचें. चन्द्रासारखें गंध लावून घेअून मी आअीजवळ गेलों, आजीजवळ गेलों आणि विचारलें, "आअी, आअी, माझें गंध कसे दिसतें ? आजी, तूं सांग, माझें गध कसें दिसतें ?" दोघांनीहि माझे कौतुक करून म्हटले, "फार सुन्दर दिसतें." बस्सू, मी खूष झालों ! 'माझें गंध छान S, छान S' असें म्हणत नाचत नाचत मी निघालो. येशू ख्रिस्ताने म्हटले आहे कीं, पडण्यापूर्वी मनुष्याला गर्व चढतो. त्या दिवशीं माझें असेंच झालें. मागील दारीं आंगणाकडे मी धांवत जात होतों, अितक्यांत चांगलीच ठेच लागून मी तोंडघशीं पडलों. कपाळाला खोक पडली. भळभळा रक्त वाहूं लागलें. माझें रडणें अैकून सगळे धांवत आले. कुणीसे जाअून वडिलांना बोलावून आणलें. त्यांनीं जखम धुतली आणि कसल्याशा पिवळ्या चिकट

कपड्याची पट्टी जम्मेवर बसवून दिली. केशू म्हणाला, "पहा दत्तूची खोक कशी गुणाकारासारखी आहे !" ती देखील जणूं काय माझी बहादुरीच ! कौतुकाचाच विषय ! सर्व जण कळवळून माझ्याकडे पहात होते. पण तेवढ्यांत देखील धाकट्या वहिनीच्यानें म्हटल्यावांचून राहवलें नाही, "पाहिलेंस ? कुंकू लावायचें सोडून गंध लावायला गेलास, त्याचें हें फळ !" पण मी धाकट्या वहिनीचा पक्ष सोडला तो सोडलाच. मी तोऱ्यात उत्तर दिलें, "खोकच काय पण डोके फुटून गेले तरी सुद्धां पुनः कुंकू लावून घेणार नाही."

मिरच्या—बहादुर

पण माझ्या हट्टाचें अथवा बहादुरीचें उत्तम उदाहरण दुसरेंच आहे.

अेके दिवशीं घरांत सांबार-पूड तयार करीत होते. खोबरे, तांदूळ, निरनिराळ्या डाळी, वगैरे तव्यावर भाजण्याचें काम चालू होतें. घरभर खमंग वास सुटला होता. विष्णूनें स्वयंपाकघरांत जाऊन तव्यावर परतलेले लालबुंद तांदूळ खाण्यासाठीं आणले. घरांतील मुलांना मधून मधून असा करभार न दिला तर घरांतील कोणतेंहि काम निर्विघ्नपणें पार पडत नसतें हा अनुभव जगांतील सगळ्या आयांना आहे.

मी बहुधा रात्रीं विरजण घालण्याच्या वेळी मांजरासारखा नेमका जाऊन पोहोंचत असे आणि कधी एका हातावर, तर कधीं दोन हातांवर, साय घेतल्यावांचून तेथून अुठत नसें. कधी कधीं सायीच्या ऐवजीं चरवीच्या बुडाचें खरपणहि मिळे.

मी विष्णूला विचारले, "विष्णू, तूं काय खातो आहेस ? मला दे ना थोडे." त्याला त्या दिवशी काय दुष्ट बुद्धि सुचली कोण जाणे. विष्णूचा स्वभाव टवाळखो खरा, पण दुष्ट नव्हता; पण त्या दिवशीं त्याला खरोखरच दुष्ट बुद्धि सुचली होती. जवळच एका पोत्यांत वाळलेल्या लाल मिरच्यांचें पांढरे बी पडलें होतें, तिकडे बोट करून विष्णु मला म्हणाला, "त्या पोत्यांत आहे तें मी खात आहें." मी झडप घालून पोत्यांतून मूठभर बिया तोंडांत कोंबल्या विष्णु थक्क होऊन आ वासून बघूं लागला. आणि मग विचारूं लागला, "कसें लागतें ?" जिभेची आगडोंब होत होती पण चेहऱ्यावर कांहीं न दाखवतां मी म्हणालों, "फार छान !" रडण्याची तयारी होती पण मर्द कांही असा थोडाच हार जाईल ? मी दृढ निश्चयानें त्या बिया कशाबशा चावून गिळून टाकल्या आणि लढाअी जिंकली ! माझा चेहरा मिरच्यासारखा लाल झाला

असला पाहिजे. पण मी हूं का चूं केलें नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं जी कांहीं स्थिति झाली ती माझ्यासारखा मिरच्या-बहादरच जाणे.

शिवाशिवीचें शास्त्र

अस्पृश्यतेची कल्पना मला प्रथम केव्हां आली याची आठवण करीत असतां खालील प्रसंग ध्यानांत येतातः—

अेके दिवशीं दुपारीं दोन वाजतां केशू नेहमींप्रमाणें शाळेला जावयास निघाला. त्या काळीं सर्वच मुलगे कांहीं टोपी घालीत नसत; कित्येक डोक्याला रुमाल घालीत. केशू पांढऱ्या टिपक्यांचा काळा रुमाल बांधीत असे. घरून निघाल्याला चार पांच मिनिटें झाली असतील, अितक्यांत तो दप्तर घेअून परत आला. आजीनें विचारले, "परत कां आलास रे?" तो म्हणाला, "शाळेला जातांना वाटेत चुकून गाढवाला शिवलों. म्हणून आंघोळ करण्यासाठी परत आलो आहें." आजीनें लागलीच थोडें पाणी गरम केले. त्याचे कपडे भिजविले. त्याला न्हाअूं घातले. दप्तरावर तुळशीपत्राचें पाणी शिपडलें आणि त्याला पुनः शाळेंत रवाना केलें.

गाढवाला शिवतां कामा नये, शिवलें असतां स्नान करा लागतें, या आचार-धर्माचा पहिला वस्तुपाठ मला बघावयास मिळाला.

त्याच दिवशीं संध्याकाळीं मला पेरू खावेसे वाटले. तेव्हां आअीनें मला महादूच्या खांद्यावर बसवून बाजारांत पाठविले. महादू आमच्या घरचा विश्वासू कोंकणी गडी. माझ्या हातांत पैसे कोण देणार? ते महादूजवळच दिले होते. पेरू देखील रस्त्यांत खातां कामा नयेत. घरीं आणल्यानंतर धुअूनच खाले पाहिजेत. मी महादूच्या खांद्यावर आरूढ होअून बाजारांत गेलों. पेरू पसंत केले मी. विकत घेतले महादूने. आम्ही परत येत असतां रस्त्यांत कुटूनसा विष्णु भेटला. मी त्याला म्हटलें, "विष्णू, मला तहान लागली आहे." तेथून जवळच अेक वाटोळा हौद होता. तेथें तो आम्हांला घेअून गेला. हौदाच्या चारी बाजूंनीं निरनिराळ्या प्राण्याच्या तोंडांतून पाणी पडत होतें. अेका बाजूला मनुष्य, दुसऱ्या बाजूला गाय, त्याच्यापुढे सिंह, असा थाट होता. मला वाटलें कीं, मनुष्याच्या तोंडांतून पाणी येतें. तें तर अुष्टें झालें. तेव्हां मी पुढें गेलों आणि गायीच्या तोंडांतून निघणारे पाणी प्यालों. विष्णूचें लक्ष तिकडे जातांच तो ओरडून म्हणाला, "अरे, अरे, दत्तू, हें काय केलेंस? त्या बाजूस तर महार लोक

पाणी पितात. त्या तोटीला शिवूं देखील नये !" माझ्या आयुष्यांतील हा पहिलाच सामाजिक गुन्हा. अिवलेंसें तोड करून मी घरीं आलों. मग मला आणि मला अुचलून आणणाऱ्या महादूला, दोघांना न्हावें लागलें. आणि मी शिकलों कीं, जशीं गाढवें तसे महार; दोघांनाहि शिवतां कामा नये.

मला त्या वेळीं काय ठाअूक कीं, मी धर्म शिकत नसून, अधर्म शिकत आहें आणि याचे प्रायश्चित्त मला कधींतरी करावयाचें आहे. साऱ्याला अशा रीतीनें जो स्पर्शास्पर्शभाव मी शिकलों, तो पंढरपुरला गेल्यानंतर बराचसा मावळला. पण त्याचें वर्णन येथें करीत नाहीं.

आमच्या शाळेच्या वाटेवर पोस्ट ऑफिस होतें तार हपीस पण त्याच्या बरोबरच होतें. तार हपिसांतील अेक तार जवळच्या पाण्यांच्या हौदांत सोडली होती. डांग्या म्हणून अेक मुसलमान मुलगा आमच्या शेजारी रहात असे त्यानें मला प्रथम सांगितले की, आकाशांत जेव्हां ढग गडगडतात आणि वीज पडते तेव्हा ती या तारेतून अुतरून पाण्यांत गडप होते. अशी तार नसेल तर सगळें घर जळून भस्म होअील.

अेके दिवशीं आमच्या शाळेंत बक्षिस-सभारंभ होता. बिगरींतल्या आम्हां लहान मुलांना हेडमास्तरानीं येण्याची सक्त मनाअी केली होती. मीं मनांत म्हटलें, आपल्याला बक्षिस न देअीनात का, पण गंमत पहायला काय हरकत आहे ? मी माझा ताबडा लाल अंगरखा घातला, डोक्याला पोपट असलेली जरीची टोपी घातली आणि शाळेंत गेलों. पण मला कुणी आंत जाअूं देअीना. हेडमास्तर स्वतःच दरवाजावर होते मी काकुळतीला येअून म्हटले, "मला बक्षिस मिळाले नाहीं म्हणून मी कांहीं आंत रडणार नाहीं. मला आंत जाअूं द्या. मी मुकाट्यानें बसून सर्व पाहीन." तरीहि हेडमास्तरांचें मन द्रवले नाहीं. त्यानीं मला तेथून परत पाठविले. कांहीं केल्या पाय अुचलेनात. माझा अूर भरून आला होता; पण रस्त्यांत रडावें तरी कसें ? मला हेडमास्तरांचा आणि शाळेचा चांगलाच राग आला. परत येतांना मी

पोस्ट ऑफिसाच्या दरवाजाच्या पायऱ्यांवर बसलों. कितीतरी वेळ तसा बसलों असेन. आतां राग काढावा कुणावर ? अेक विचार मनांत आला तो अमलांत आणण्याचें मनानें घेतले; तरी पण भीति वाटत होतीच. पुष्कळ वेळ भवति न भवति करून जिवाचा हिय्या केला. निश्चय केला. अिकडे तिकडे नीट पाहून घेतलें. मनांतील सर्व राग अेकवटून निश्चयाला बळकटी आणली. मग हळूच रस्त्यावरील अेक खडा अुचलला आणि झटदिशीं टपालाच्या पेटींत टाकून दिला ! म्हणतात ना 'भित्यापाठीं ब्रह्मराक्षस !' मी खडा टाकला मात्र, तोंच रस्त्यावरील अेक मनुष्य माझ्याजवळ आला. त्यानें मला विचारले, "कायरे ? पेटींत काय टाकलेंस ?" अुत्तर काय द्यावें हें मला सुचेना. जरासे ओठ हालवले अितक्यांत शहाणपण सुचलें कीं, अशा प्रसंगी ओठ हालवण्यापेक्षां पाय हालवलेले बरे. विचार डोक्यांत येतांच तेथून मी अशी धूम ठोकली कीं खडे-बहादुर हां हां म्हणतां घरीं येअून अुभे !

## बाबाची खोली ४

माझा सर्वांत थोरला भाऊ बाबा. याचा आम्हांला मोठा धाक असे. तो आमच्या नीतीचा संरक्षक होता व आमच्या वागणुकीवर त्याचा कडक पहारा असे. जरा कुठें रस्त्यावर गेलों कीं बाबानें आम्हांला धरून आणून घरांत बसवावयाचें. फाजील मुलांच्या तोंडचे शब्द आम्ही ऐकले तर आमची भाषा बिघडून जाईल म्हणून आम्हांला रस्यावर जाऊं देत नसत.

बाबाची अभ्यासाची खोली म्हणजे अेक मोठी सार्वजनिक संस्थाच होती. बाबा शाळेला गेला म्हणजे तेथें सारे सामसूम असे. पण बाकीचा सर्व वेळ बाबाच्या खोलींत काव्यशास्त्राचे आणि विनोदाचे जणूं काय फवारे अुडत असत.

आमच्या बाबाला पुस्तकांची भारी आवड आणि म्हणून हायस्कुलच्या विद्यार्थ्यांना जरूर असलेल्या व नसलेल्या तऱ्हतऱ्हेच्या पुस्तकांचा ढीग बाबाच्या खोलींत पडलेला असावयाचा. गुळाचा खडा पाहून मुंग्या आणि माशा जशा गोळा व्हाव्यात त्याप्रमाणें शाळेंतील पुष्कळ विद्यार्थी स्वाभाविकच बाबाच्या खोलीला चिकटून असत. बाबा शाळेंत जेवढें शिके तेवढें घरीं येअून मुलांस शिकवत असे. संस्कृत आणि झोंप हे त्याचे खास आवडीचे विषय. जागेपणीं संस्कृत श्लोक सारखे गुणगुणावयाचे आणि श्लोकांचा कंटाळा आला म्हणजे पाय लांब करून ताणून द्यावयाचें, असा

त्याचा नित्यक्रम असे. बाबाच्या झोपेंत देखील बाबा मौन पाळीत नसे आडवा होतां क्षणींच त्यांचें घोरणें सुरू होअी.

आण्णा बाबाहून धाकटा. त्याला बाबाचे घोरणे मुळींच आवडत नसे. सुनाची अेक लहानशी वात करून तो बाबाला हवा लावी. हवा लावणे हा आमच्या घरचा पारिभाषिक शब्द होता. सुनाची लहानशी वात नाकांत घातली म्हणजे जोरानें शिंक येऊन झोंप अुडते. जन-जागृतीच्या या सेवाकार्याला हवा लावणें, हे साधे नाव दिलें होतें.

अेके दिवशी मला वाटले, आपणहि थोडेंसें पुण्य कां मिळवूं नये ? सुनाची वात कुठे सांपडेना; तेव्हां मी आगपेटींतील अेक काडी घेतली आणि खूप सभाळून बाबाच्या नासिकाविवरात तिचा हळू प्रवेश करविला. म्हणतात ना की कलियुगांत कर्माचें फळ ताबडतोब मिळतें ! मला माझ्या कर्माचे गरम गरम फळ पुष्कळसें गालावर चाखावयास मिळालेच. त्याखेरीज 'द्वाड' 'मस्तीखोर' आणि 'खोडकर' अशा तीन पदव्या मला वहाल केल्या गेल्या.

बाबाला आणि आण्णाला शिकविण्यासाठी भिसे मास्तर आमच्या घरीं रात्रीं येत असत. भाषा, गणित आणि क्रोध हे त्यांचे खास विषय. ते घरी आले कीं मार्जार-मूषक न्यायानें आम्हांला कुठें तरी अेका कोनांत लपून रहावें लागे. या धाक्रामुळें भिसे मास्तरांविषयीं आम्हां लहान मुलाना तिटकारा असणें स्वाभाविक होतें. अेके दिवशी भिसे मास्तर शिकवण्याच्या अेन रंगांत आले होते. माझ्यानें तें बघवेना. या रंगाचा भंग कसा करावा या विचारांत मी चढलों-पडलों असें मी काय म्हणून म्हणावें ? दुसरें कांहींच सुचेना. तेव्हां दरवाजाजवळ अुभा राहून मोठ्यानें 'कू ऽ ऽ ऽ ऽ' म्हणून आगगाडीचा महामंत्र मी ललकारला.

बस्सू भिसे मास्तर कालिया-नागाप्रमाणें फूत्कार करीत अुठले. त्यांची नजर माझेवर पडेतोपर्यंत मो तेथे थांबतों कसचा ? मी जीव घेऊन पळालों. अितक्यांत गोदूच्या दुर्दैवानें त्याला धांवत धांवत तेथे आणले. भिसे मास्तरानीं त्यालाच पकडून त्याच्या तोंडांत अेक ठेऊन दिली आणि म्हटलें, "काय रे लुच्चा, ओरडतोस कशाला ?" गोंदूला बिचाऱ्याला यांतलें काय ठाऊक ? त्यानें भोकांड पसरलें. भिसे मास्तरानां झाले ही दुसरीच पीडा ! याचें रडणें थांबत नाही तोंवर वर्ग कसा पुढें चालणार ?

पण भिसे मास्तरांचें डोकें सुपीक. त्यांनीं अेक काडी पेटवली आणि गोंदूला म्हटलें, "तोंड मिट; नाहींतर घालतों पहा ही काडी तोंडांत !" मीं हळूच येऊन दारामागून हा सर्व करुण प्रसंग पहात होतों. मी कसा बचावलो, हाच विचार प्रथम मनांत आला. नंतर गोंदू आयता सांपडला आणि त्याची चांगली फजिती होत आहे असें वाटून मला हंसूहि आलें. पण मनाला कांहीं बरे वाटेना. कांहीं तरी बिघडलें, न शोभणारें कांहीं तरी माझ्या हातून झालें असें मनाला वाटूं लागले. कधो न वाटलेली लाज मला वाटूं लागली. पण अशी लाज मला कां वाटते याचा अुलगडा त्या वेळीं मनांत होअूं शकला नाहीं. शिक्षा पुरी होतांच गोंदू बाहेर आला. आपण त्याचा कांहीं अपराध केला आहे असें स्पष्ट वाटत नव्हतें. पण काहीं तरी चुकलें आहे खास, असें मनांत–मनांत नाहीं पण हृदयांत–ठसून गेले. त्या दिवशी रात्रीं झोंपी जाअीतोंपर्यंत गोंदूशीं फार गोडपणें आणि कोमलपणें वागलों. कारण नसतांनाच, त्याची खुशामत केली. आणि अितकें करूनहि त्या दिवशींचा तो प्रसंग विसरून जाण्याअितकी शांति मला मिळालीच नाहीं.

घरीं आम्हीं कांहीं दंगामस्ती केली किंवा हातून कांही आगळीक घडली कीं आम्हांला बाबाच्या खोलींत बसवून ठेवीत. आम्हांला ही शिक्षा थोबाडींत देण्यापेक्षां किंवा छडी मिळण्यापेक्षा देखील अधिक जड जाअी. आम्ही खोलीत पोहोंचलों कीं अेक कोपरा दाखवून आम्हांला हुकूम होअी, "बस तिकडे देवासारखा हात जोडून." माझें शरीर बसत असे. पण मन कसें बसून राहाणार ? मनांत विचार येअी, कसले हे विचित्र देव ? खेळत नाहींत, मस्ती करीत नाहींत, मुकाट्यानें हात जोडून बसतात. देव असे बसत असतील का ? अशी शंका मनांत येण्याचे कारण नव्हतें. कारण देवघरांतील देव असे बसलेले मी पाहिले होते. कोणी स्नान घातलें तरच न्हातात ! आणि नैवेद्य दाखविला तरच खातात !

मीं बसल्या बसल्या बाबाच्या खोलीचे चारी बाजूनें निरीक्षण देखील करीत असें. छडी कुठें आहे, पुस्तकें कोठें आहेत, शाअीची मोठी बाटली कुठें आहे, अंथरुणाची वळकटी कुठे आहे, सर्व कांही मी पाहून ठेवीत असें. समयीच्या आसपास डोगळे प्रदक्षिणा करीत असत, तें पाहून मला मोठी गंमत वाटे आणि दिवा हा प्रत्यक्ष देव

आहे, याचीहि खात्री होअी. सगळे डोंगळे अेकाच दिशेनें फिरत असत; पण त्यांतला अेकादा मोठा डोंगळा धूमकेतूप्रमाणें भुलटया दिशेनें जाअी.

अेके दिवशीं अशाच रीतीनें बाबाच्या खोलींत माझी स्थापना झाली होती. अशोकवनांतून सीतेला सोडविण्यासाठीं प्रभु रामचंद्रानें हनुमानासारख्या वीराची रवानगी केली होती. बाबाच्या खोलींतून मला सोडविण्यासाठीं कोणी येण्याजोगें नव्हतें. तेव्हां त्या वेळीं शिवाजीची गोष्ट ठाअूक नसूनहि मी शिवाजीमहाराजांचें अनुकरण केलें. अंथरुणाचो वळकटी पडली होती तिच्यामागे थकून झोंपी गेल्याचा मी बहाणा केला. बाबानें मला अेकदोन वेळां अशा स्थितींत पाहिले आहे, याचीहि खात्री करून घेतली आणि मग खोलींतील कुणाचेंहि लक्ष माझेकडे नाहीं, अशी संधी साधून सरपटत सरपटत मी खोली बाहेर पडलों आणि तेथून धूम ठोकली. मला अशा रीतीनें बाहेर आलेला पाहून केशूला मोठा आनन्द झाला. माझ्या पराक्रमाची कच्ची हकीकत त्यानें मजकडून अेकून घेतली आणि गोंदूजवळ त्यानें माझ्या पराक्रमाची पुष्कळ स्तुति केली. गोंदूमध्यें दूर दृष्टि कसलीहि नव्हती. त्यानें जाअून थोरल्या वहिनीला सर्व कांहीं सांगितले मग काय, माझ्या पलायन-कलेचें गुपित सर्वांनाच समजलें. पण कोणीहि माझ्यादेखत त्या गोष्टीची वाच्यता केली नाहीं.

मला वाटलें, ही चांगली युक्ति आपल्याला सांपडली आहे. पुन्हां अेकदां हातून कांहीं अपराध घडला आणि मला खोलीची शिक्षा झाली. तेव्हां मी पुनः पहिलाच अुपाय अजमावून पहिला. पण या वेळीं माझेपेक्षां बाबाच अधिक धूर्त ठरला ! त्यानें माझेकडे बळेंच दुर्लक्ष केले आणि मी सरकत सरकत दरवाजापर्यंत पोहोंचतो न पोहोंचतों अितक्यांत तो गरजला, "अरे चोरा ! पळतोस होय ? चल, ये परत." मी असा सांपडलों याचे दुःख होण्यापेक्षां आपली पत गेली, आतां मला नेहमीं पळपुटा चोर म्हणतील, अशा अस्पष्ट भीतीनें मी अस्वस्थ झालों. रात्रीं जेवण्याचे वेळी आण्णानें हंसत हंसत माझी हकीगत सर्वांना सांगितली. लाजेनें माझें पाणी पाणी झालें. त्या दिवशीं जेवणांत मुळ्याच्या खिळ्या केल्या होत्या. लाजेमुळें अेकूण अेक खिळी गळ्यांत कशी अडकत होती, त्याची आठवण आज देखील ताजी आहे.

मुलांना देखील अब्रू असते. फजिती झाली असतां तीं कोमेजून जातात. मोठ्या माणसांपेक्षां लहान मुलांमध्यें अब्रूची आणि मानापमानाची चाड अधिक असते, अेवढा विचार वडील मंडळी कां करीत नाहींत ?

दोन दिवसाच्या सार्वजनिक फजितीमुळें मी कांहींसा निगरगट्ट बनलों. त्यानन्तर जेव्हां जेव्हां मला बाबाच्या खोलीत कोडून ठेवीत, तेव्हां तेव्हां निसटून जाण्याचा प्रयत्न मी अचूक करावयाचा आणि त्यांत जर सापडलों तर त्याची लाज मला मुळीच वाटेनाशी झाली.

अेके दिवशीं केशूची दौत सांडली शाळेला जायची वेळ झाली होती. शाअीवांचून कसें जावयाचें ? केशू अगदीं रडकुंडीला आला. अितक्यात मी म्हणालों, "केशू, बाबाच्या खोलीत अेक सबंध बाटली भरलेली आहे तीतून हवी तेवढी शाअी मिळूं शकेल." मग काय विचारतां ? केशूनें दौत भरून शाअी घेतली आणि चोरी अुमगूं नये म्हणून तितकेच पाणी बाटलीत भरले ! ही खाशी सोय झाली. त्यामुळें केशू आणि गोंदू दोघेहि दौतींतील शाअी संभाळण्याविषयीं बेपर्वा झाले. दिवसांतून चार वेळां दौत सांडावयाची आणि चार चार वेळां बाटलीकडून जकात घेतली जावयाची ! थोडयाच दिवसांत बाटलीतील शाअी अगदीं पाण्यासारखी झाली. अगदीं यमुना-जळच म्हणावयास हरकत नाहीं. आणि आमचा सगळा व्यापार अुघडकीस आला. बाबा रागानें गरजला, "केशा, शाअी चोरतोस आणि वर पाणी घालून बाकीची शाअी बिघडवून टाकतोस ? मार दिला पाहिजे तुला."

मी हें अैकले आणि माझें विचारयंत्र चालू झालें. मी केशूला सुचविलें, "आपण शनिवारी कोळशानें पाटी घांसतों तेव्हां कसे काळें काळें पाणी निघतें ? तेंच आपण बाटलींत भरूं म्हणजे शाअी पातळ होणार नाही आणि आपण पकडले जाणार नाहीं." प्रयोग करून पहाण्याला अुशीर तो कितीसा ?

दुसरे दिवशीं बाटलीतील सगळीच शाअी फाटली. त्यामुळें केशूला मार मिळाला. या गुन्ह्यामध्यें माझा हात नव्हता; फक्त डोकेंच होतें. तेव्हां मला कांहीं वाटलें नाहीं कीं, आपण कांहीं वाअीट काम केलें आहे. केशूला मार मिळाला खरा. पण त्याबरोबर कोळशाचें किंवा सार्धे पाणी न घालण्याच्या अटीवर जरूर असेल तेव्हां बाबाच्या बाटलीतून आअीला सांगून शाअी घेण्याचा हक्कहि मिळाला.

गोंदूच्या भोळेपणामुळें माझ्या अशा अनेक युक्त्या घरच्या लोकांना समजून येत. पण मला दिसून आलें कीं घरची मंडळी मला रागे भरत; तरी माझे लाडच करीत. अेक तर मी सगळ्यांत धाकटा; दुसरें, मी जें कांहीं करीत असें तें केशू-गोंदूच्या अुपयोगी पडण्यासाठींच. यामुळें माझी कीर्ति बाबाच्या खोलीच्या सर्व

सभासदांमध्यें पसरली. सगळ्यांच्या दृष्टीनें मी अेक खेळणेंच होतों; पण यांतून अेक अकल्पित परिणाम घडून आला. अेके दिवशी अ.ण्णा म्हणाला, "या लवाडाला आमच्या खोलींतच निजूं द्या!" झाले. त्याच दिवशीं मार्ला अंथरूण बाबाच्या खोलींत घालण्याचा महादूला हुकूम सुटला आणि तेव्हापासून निजण्यापूर्वी आण्णा मला रोज कांहीं ना कांही शिकवूं लागला.

## सीताफळाची बी



साताऱ्याला आमच्या घराचे मागें अेक सीताफळाचें झाड होतें. झाडाला फळें लागूं लागलीं तेव्हां आम्ही रोज जाऊन झाडाला किती फळें लागलीं, काल पाहिलेलीं फळें आज किती मोठीं झालीं, वगैरे तपास करीत असूं. आम्हीं फळ तोडावयास निघालों म्हणजे आजी म्हणे, "हीं फळें अजून आंधळीं आहेत. अितक्यांत तोडूं नका. त्यांचे डोळे जरा मोठे होऊं द्या. डोळे उघडले म्हणजे फळ पिकलें असें समजावें "

गोंदूची बुद्धि लहानपणापासून यांत्रिक शोध करण्याकडे धांवत असे आणि म्हणूनच पुढें तो रसायनविद्या, पदार्थविज्ञानशास्त्र आणि फोटोग्राफीमध्ये प्रवीण झाला. अेक दिवस गोंदू म्हणाला, "आपले हे डोळे बरे नाहींत. हालतात. हे काढून टाकून त्यांचे जागीं सीताफळाचे डोळे बसविले पाहिजेत." वडिलांनीं तसबिरीचें यंत्र ( कॅमेरा ) तिपाअीवर अुभें केलें म्हणजे लगेच गोंदू म्हणावयाचा कीं, "आपले हे पाय चांगले नाहींत. वांकडेतिकडे असतात आणि वांकतात. हे कापून टाकून त्यांचे जागीं कॅमेऱ्याचे सरळ मजबूत पाय बसवले पाहिजेत. तसें झाले म्हणजे चालण्याची किती मौज वाटेल !"

अेके दिवशीं सीताफळ खातां खातां अेक बी माझ्या पोटांत गेली. घाबरून जाऊन

मी केशूला म्हटले, "केशू, शिताफळीची अेक बी माझ्या पोटांत गेली; आतां काय होअील ?" विष्णूने तें अैकले. चेष्टा करण्याची अितकी नामी संधी तो कसची सोडतो ? त्याने रडवें तोंड करून म्हटले, "अरेरे ! काय हा अनर्थ केलास ! आता तुझ्या बेंबींतून झाड अुगवणार !" "आणि मग आम्ही" केशूनें पूर्ति केली,—"त्या झाडावर चढून शिताफळें खाअू. आम्ही फळ तोडूं लागूं तसतशी तुझ्या पोटांत तिडीक अुठूं लागेल. आम्ही खात असूं आणि तूं रडत असशील"

मी चागलाच घाबरलो आणि पोटांतून झाड अुगवण्याच्या पूर्वीच रडूं लागलो. पण अितक्यांत मनांत शका आली, पण असें कधीकाळी झालें आहे काय ? पोटांतून झाडें अुगवत असतील काय ? आंतून जबाब मिळाला, होय, होय. यांत काय संशय ? एका चित्रांत सापाच्या वेटोळ्यावर विष्णु निजला आहे आणि त्याच्या नाभींतून कमलाचे झाड अुगवले आहे. हे आपण नाहीं का पाहिले ?

विशेष खात्री करण्यासाठी मी हळूच जाअून आजीला विचारले, "आजी, कमळाच्या देखील बिया असतात काय ग ?" आजी म्हणाली, "हो तर ! कमळाच्या बियांना कमळकाकडी म्हणतात. कमळकाकडीचं पीठ अुपवासाला चालतं. त्याची लापशी करून खातात." मला वाटले, विष्णु भगवानानें चुकून कमळकाकडी सबंधच्या सबंध गिळली असेल, म्हणूनच त्याच्या नाभीतून कमळ अुगवले.

माझी सोळा आणे खातरी झाली कीं, आपल्या पोटातून आता सीताफळाचे झाड अुगवणार आणि त्याला फळें लागली म्हणजे केशू ती तोडून खाणार !

त्यानंतर कितीतरी दिवस रोज मी आपले पोट चांचपून पहात असे कीं, अेकादा कोंब तर नाही अुगवला ?

## विद्यारंभ



साताऱ्याच्या महाराजांचे हत्ती रोज आमच्या घरावरून जात असत. महाराजांचे तीन हत्ती होतेः अेक म्हातारी हत्तीण होती; दुसरा मोठा हत्ती होता, त्याला दंत्या हत्ती म्हणत. कारण, त्याला अेकच लांब दांत होता. तिसऱ्या हत्तीला धाकटा हत्ती म्हणत. त्याला अेक देखील दांत नव्हता. अेके दिवशीं आम्ही शेजारच्या नामदेव शिंप्याच्या दुकानांत बसलों होतों. अितक्यांत रस्त्यावरून जाणारा दंत्या हत्ती दुकानासमोर आला आणि त्यानें आपली सोंड दुकानांत घातली. आमची घाबरगुंडी अुडाली पण दुकानांतून पळ काढायला दुसरा रस्ताच नव्हता नामदेवानें समयसूचकता वापरून दुकानांत असलेला अेक नारळ हत्तीच्या सोंडेत दिला. आणि हत्ती देखील नारळ घेअून मुकाट्यानें चालता झाला. नामदेवाच्या या हुशारीची गोष्ट आम्ही कितीतरी दिवस पुनः पुनः विस्तारपूर्वक वर्णन करीत अूं. आज मला वाटतें कीं, हत्ती दुकानासमोर आला, तो कांहीं चुकून आला नाहीं. नामदेवानेंच अेकाद्या सणानिमित्त हत्तीला नारळ देण्याविषयीं महाताला सांगितलें असेल आणि महात हत्तीला दुकानाकडे घेऊन आला असेल. तसें नसतें तर त्याच दिवशीं दुकानांत नारळ कुठून आला असता ? पण ही सर्व माझी आजची कल्पना आहे. त्या दिवशीं तर अमेंच वाटलें होतें कीं, आम्ही मोठ्या संकटांतून सुदैवानें कसेबसे बचावलों

आमच्या मागील दारीं अेक अुंबराचें आणि अेक सीताफळीचें अशीं दोन झाडें होतीं. मध्यें अेक अुंच तुळशी-वृंदावन होतें. आसपासची जमीन आम्ही नेहमीं शेणानें सारवून चक्क ठेवीत असूं. संध्याकाळीं पांच वाजतां आम्ही या अंगणांत दशमी खायला बसत असूं. दशमीबरोबर तूप, लोणचे, भाजी, मेतकूट, कांहींतरी असावयाचेंच. पण लोककथांचा रतीब मात्र अचूक मिळावयाचा. आमच्या धाकट्या वहिनीजवळ गोष्टीचा फार मोठा खजिना होता. धाकटी वहिनी रिकामी नसली म्हणजे मी आजीजवळ जाअून गोष्टींचा कर वसूल करीत असें तोंडी लावण्यास गोष्ट मिळवल्यावाचून कधी दशमी खाल्ल्याचें मला आठवत नाहीं. महादेव-पार्वतीचें सगळें जीवनचरित्र मी आजीकडून संध्याकाळच्या दशमीच्या वेळींच अैकलेलें आहे. आज देखील जेव्हां जेव्हां भगवान् महादेवाचे नांव अैकतों, तेव्हां तेव्हां आजीनें सांगितलेल्या लाब लांब जटा असलेल्या बाबाजीचेंच चित्र नजरेसमोर अुभें राहातें.

घरीं आम्हीं खेळ खेळत असूं, तेव्हां पुष्कळ वेळां केशूनें हत्ती बनावे, गोंदूनें महात होअून हत्तीच्या पुढें पुढें चालावे आणि मी दत्तू राजा होअून केशूच्या पाठीवर अंबारींत बसत असें. कारण मी सर्वात लहान. केशूच्या डोक्याला गळपट्टा बांधून त्याचें टोंक सोंडेच्या जागी पुढें सुटे सोडलेलें असे. आणि आम्ही घरांतल्या घरांत हत्ती हत्ती खेळत असूं. रस्त्यावर जाण्याची आमची प्राज्ञा नसे मी पांच वर्षांचा झालों तोंपर्यंत कधीं सडकेवर गेलोच नव्हतों. बाजारांत गेलों तर महादूच्या खांद्यावर बसूनच. महादूचा अधिकार आमच्यावर पूर्णपणें चालत असे. बाजारांत सुद्धां तो आम्हांला पांच पावलें देखील चालूं देत नसे. त्या वयांत जर कांहीं चाललों असेन तर तें आजीला राजी करून घराच्या मागील रस्त्यानें मारुतीच्या देवळापर्यंत; म्हणजे आळीच्या टोकापर्यंत !

अशा स्थितीमध्यें वाढलेला मुलगा व्यवहारांत बावळट ठरला तर आश्चर्य कसचें ? आमच्या गोंदूंत आणि माझ्यांत फक्त दीड वर्षाचें अंतर. त्याचा स्वभाव अगदींच भोळा. त्यामुळें त्याच्या मानानें मीं नेहमीं हुशार गणला जात असें.

मी पांच वर्षांचा झालों तेव्हां मी हट्ट सुरू केला कीं, मला शाळेंत जायचें आहे. पण घरीं मला कोणीच दाद देअीना. तेव्हां वडील कचेरीला गेले आहेत; बाबा वगैरे शाळेला गेले आहेत; अशी संधी साधून दुपारीं अडीच तीन वाजतांना मी आअीजवळ

नमन चालवावयाचे कीं 'मला शाळेला पाठव.' शेवटी कंटाळून, 'जाऊ या ही ब्याद' म्हणून आईनें मला शाळेंत जाऊ दिलें. पाढरे पाढरे ठिपके असलेला अेक लाल रुमाल आईनें माझ्या डोक्याला बांधला आणि मला शाळेंत धाडले. शाळेतल्या मुलांना अेक खेळणें सांपडलें. मुलें कधी खेळवीत, कधी रडवीत आज त्या वेळचे अेक पेठे मास्तरच आठवतात. त्यांच्या बंडीच्या आंतल्या खिशांत नेहमी बत्ताशे असत. मला पाहिले म्हणजे जवळ बोलावून अेखादा बत्तासा दिल्यावाचून रहात नसत. या बत्ताशामुळें शाळेविषयींचीं माझी पहिलीं संस्करणे अत्यंत गोड आहेत.

पण पहिल्याच दिवशीं अेक संकट अुभें राहिले खेळतां खेळतां डोक्याचा रुमाल सुटला. मला तो कांही पुनः बाधता येअेना आणि मुलाजवळ तें कबूल करण्याची लाज वाटूं लागली मला मोठी चिंता पडली. अितक्यात अेका मुलाने माझा रुमाल घेअून स्वतःच्या गुडघ्यावर बाधला आणि मग तो अुचलून माझ्या डोक्यावर ठेवला आणि मी पगडी सलामत घरी येअून पोहोचलें

त्यानंतर मी रोज शाळेस जाअूं लागलो. हळू हळू सडकेवरून जाण्याची मला हिंमत आली आणि पुढें पुढें घरातील सर्वांनी नको म्हटले तरी मी शाळेकडे धावत जाअी. पुष्कळ वेळा मला पकडून आणण्यासाठी महादू माझ्या मागून येअी. त्यामुळें धांवतां धांवतां तो किनपत जवळ आला आहे हे पाहण्यासाठी मी सिंहावलोकन करीत असे.

माझी ही शाळापरायणता पाहून मला अेका मुमुहूर्तावर शाळेत घालण्याचे ठरविण्यांत आले. बहुतकरून दसऱ्याचा दिवस असावा. सगळी शाळा जमली. सगळीं मुलें सणाचा पोषाख करून आली होती. जुन्या राजवाडयाच्या अेका चौसोप्यात शाळा भरत असे. त्यामुळें अिमारतीची भव्यता होतीच. सगळ्या मुलांना मिठाअी वाटण्यांत आली. शाळेच्या पट्टेवाल्यांना लाह्यांचे मोठे मोठे लाडू देण्यांत आले. शाळेंतील मास्तरांना चांदीच्या तबकांत खास चांगली मिठाअी देण्यांत आली आणि मी 'पाटीवर बसलों!' अेक वृद्ध मास्तर माझेजवळ येअून बसले. त्यानीं माझ्या पाटीवर मोठ्या मोठ्या वळणदार अक्षरांत **'श्रीगणेशायनमा ओनामासीधं'** लिहून दिलें. त्या पाटीवर हळद, कुंकू, वगैरे घालून माझ्या हातून तिची पूजा करविली. नंतर माझ्या हातीं अेक 'वळूची पेणशिल' दिली आणि माझा हात धरून माझेकडून त्यांनीं अेकेक अक्षर गिरवून घेतलें आणि घोटतां घोटतां तें अक्षर

म्हणवून घेतलें. सगळी अक्षरे गिरवून झालीं आणि त्या दिवशीची आमची शाळा संपली. अशा रीतीने मी शास्त्रोक्त विद्यार्थी झालों आणि मग मला घरीं नेण्यांत आले.

विद्यारंभाच्या उत्सवासाठी माझ्या हातांत सोन्याचीं कडीं, कानामध्यें मोत्याच्या कुड्क्या आणि गळ्यामध्ये सोन्याची कंठी, अितके दागिने घातले होते. अशा रीतीनें नंदीसारखे मला सजवून रोज महादूवरोबर शाळेला पाठवीत. त्यांत एक मोठीच अडचण अुत्पन्न झाली. दहा वाजण्याची घंटा झाली कीं सगळी मुले पाटी–पुस्तक, दप्तर घेअून वासराप्रमाणें घरीं धांवत जात. माझ्या शरीरावर दागिन्याची जोखीम असे म्हणून आमचे हेडमास्तर मला अेकटयाला घरीं जाअूं देत नसत. आणि महादू तर कधी कधी दहा दहा मिनिटे अुशीर करी. सुरवातीलाच अशा रीतीनें मला काही अपराध नसतांना शिक्षेवांचून ही शिक्षा भोगावी लागे मी काकुळतीला येअून हेडमास्तराना म्हणे, "कठी तर सदऱ्याच्या आंतच आहे. हातांतील कडी अंगरख्याच्या अस्तनीच्या आंत लपवून मी धांवत घरी जाअीन आणि महादू मला रस्त्यांतच भेटेल मग काय हरकत आहे ?" पण हेडमास्तर कांही केल्या बधत नसत.

नव्या विद्यार्थ्याचे नअू दिवस पुरे झाले आणि माझा हा आनन्द बघतां बघतां मावळला. चांदवडकर म्हणून अेक नवे मास्तर आमच्या शाळेंत आले आणि दुर्दैवानें आमचाच वर्ग त्यांच्याकडे गोंपनिण्यांत आला हे मास्तर भरीत बांध्याचे आणि धष्टपुष्ट होते. वयहि कांहीं फारसे नसावे. पण वसलेल्या जागेवरून अुठणें त्यांना जड वाटत असे प्रत्येक विद्यार्थ्याला अुठून आपली पाटी घेअून त्यांचेकडे जावें लागे. आम्ही मास्तरांच्या आंवतीभंवती दूर अेक मोठें अर्धवर्तुळ करून वसत असूं. आम्ही तर बोलून चालून मुले. तेव्हां मस्ती तर कांहीं व्हावयाचीच आणि मस्ती न केली तरी अेकाद्या कारणानें हातून चूक ही व्हावयाचीच. खरे सांगावयाचे म्हणजे माझ्या स्वभावांत मस्ती अशी नव्हतीच. चूक काय असते आणि अपराध कशाला म्हणावयाचे, हे देखील मला समजत नसे अियेत्तची थोडीशी कवायत मी समजूं लागलो होतों आणि तिचें पालनहि करीत असे. जेथें समजत नसे, तेथें शून्य दृष्टीनें पहात असे. त्या वेळचा माझा फोटो पहातां मी कांहीं शुद्ध बावळटासारखा दिसत नव्हतों खास. चेहेऱ्यावर नाजुकपणा होता अेवढेच. तरीहि कुठल्यातरी कारणानें रोज मला मार मिळे. चांदवडकर मास्तरांजवळ अेक तीन हात लांब छडी होती. स्वतःच्या आसनावर बसल्या बसल्या मुलांना शिक्षा करण्याचें हें दिव्य शस्त्र त्यांना फारच

अुपयोगी पडे. "हात पुढें कर" म्हणून ते आम्हाला दरडावून सांगत. मार खाण्यासाठीं हात पुढें करण्याची माझी कसची हिंमत होते ? पण हात पुढें केला नाहीं म्हणजे गुरुमहाराज आषाढमांडी घातलेल्या माझ्या जांघेवर छडी चमकावून देत. मांडीची काय भयंकर आगडोंब होत असे ! या तालमीच्या प्रतापानें हात पुढें करण्याची हिंमत माझ्यांत आली खरी. असे दुःख रोज चालत असे पण सगळींच मुलें मार खात असल्यानें शाळेला जाण्यांतील हा अेक आवश्यक विधि आहे, असेंच आम्हांला वाटे. यांत कांहीं चुकतें आहे किंवा घरी तक्रार करण्याजोगे आहे, असे मला वाटलेंच नाहीं. पण शाळेला जाण्याची माझी प्रफुल्लता कोमेजून गेली आतां शाळेला जाण्यासाठीं अुठेच आधीं अुशीराने आणि निरुत्साही पावलांनी शाळेचा पथ कंठीत असें.

असें कितीतरी दिवस चालले. अेके दिवशीं सकाळी शाळेंतून परत येअून मी पेज जेवायला बसलों. छमछम छडीच्या प्रतापानें हात लाललाल झाले होते गरम पेज हातांत घेतांच चटके बसूं लागले. मला जेवतां येअीना. डोळ्यांत अश्रु भरून आले पण ते पडूं देण्याची चोरी ! वहिनीनें तें पाहिले. आणि विचारले, "शाळेंतील मास्तरानें तुला मारलें कीं काय ?" मी साफ नाही म्हणून सांगितलें. पण त्याचेवर वहिनीचा थोडाच विश्वास बसणार ? तिनें घरभर ओरडा चालविला कीं दत्तूला मास्तर मारतो. मी अितका बावळट की वहिनी माझा कड घेअून अितका आक्रान्त करते आहे हें माझ्या डोक्यांत शिरले नाही. मला वाटले, वहिनी माझी फजिती करते आहे. ज्याला मार मिळतो तो मुलगा वाअीट, अेवढें शालेय नीतिशास्त्र मला अवगत झालें होतें. तेव्हां जरी मार मिळाला तरी तो कबूल करूं नये, अेवढें समजलें होतें. वहिनीचा मला मनस्वी राग आला. पण संध्याकाळपर्यंत मी तें सर्व विसरून गेलों.

शाळेंतील माझें शिक्षण ( ! ) नेहमींप्रमाणें चालूं लागलें. अितक्यांत अेके दिवशीं अेक पोलीस आमच्या वर्गांत आला आणि चांदवडकर मास्तरांना बोलावून घेअून गेला. थोडया वेळानें चांदवडकर परत आले आणि त्यांनीं मला विचारलें, "कायरे ! तूं घरीं जाअून कांहीं सांगितलें होतेंस कीं काय ?" मुग्धपणें मीं अुत्तर दिलें, "मुळींच नाहीं." पण आतां चांदवडकरांचा नूर अुतरला होता. त्यांचें तोंड चिमणीसारखें झाले होतें. ते कांहींच बोलले नाहीत आणि त्या दिवशीं मला किंवा कुणाला मार मिळाला नाहीं. दुसरे दिवशीं चांदवडकर आलेच नाहींत. वरच्या वर्गांतील मुलांकडून आम्हांला आनन्दाची बातमी कळली कीं, चांदवडकरांना अर्धचन्द्र मिळाला ! बिचारे नवीनच लागलेले अुमेदवार होते.

त्यानन्तर मी कितीतरी मास्तरांचा मार खाल्ला असेल पण बिचाऱ्या चांदवड-करांच्या कारकीर्दीच्या प्रारंभींच त्यांना मी बाधलों ! पुढें माझ्या कानीं आलें कीं, वहिनींनीं सांगितल्यामुळें बाबानें कोर्ठेसें जाऊन तक्रार केली आणि त्यामुळेंच शाळेच्या लहानशा दुनियेंत अवढी मोठीं राज्यक्रान्ति झाली ! या अेका प्रसंगामुळें सर्व शाळेचें लक्ष्य माझेकडे वेधलें आणि मारकुट्या मास्तराच्या हातून वर्गाची सोडवणूक मी केली म्हणून विद्यार्थी मला दुवा देऊं लागले.

साताऱ्याची गोष्ट. अेके दिवशीं अेक गाडी आमच्या दारीं येऊन अुभी राहिली आणि त्यांतून अेक ठिपक्या ठिपक्याचे गुंदर पातळ नेसलेली बाअी खालीं उतरली. तिचेजवळ सामानहि पुष्कळ होतें मी आअीला हांक मारून म्हटलें, "घरांत कोणस आलं आहे !" माझी अपेक्षा अशी होती कीं, आअी आंतून बाहेर येअीपर्यंत ही बाअी दरवाजांतच वाट पाहील. पण ती तर सरळ आंत गेली आणि घरचीच असल्याप्रमाणें घरांत इकडे तिकडे फिरूं लागली मला नंतर कळले कीं, ती माझी बहीणच आहे ! पुष्कळ दिवस सासरी राहून माहेरीं आली आहे.

जेवणे आटोपल्यावर तिनें आपले सर्व सामान सोडून आअीला दाखविले. त्यांतून पांचसहा सुंदर सुंदर रंगीत काचेच्या गोट्या निघाल्या. त्या मला देऊन ती मला म्हणाली, "दत्तू, घे तुला बैदुल !" मला आनंद तर झालाच. पण आनंदापेक्षां आश्चर्य अधिक झाले. घरीं बाबा आम्हांला बैदुलांना शिवूं देत नसे. गोटयांचा खेळ जुगारी लोकच खेळतात, चांगल्या घरची मुले गोट्यांनीं खेळत नसतात असे आमच्या मनावर ठसविले होतें. त्यामुळें वाटोळ्या गोटया पाहून जरी तोडाला पाणी सुटलें, तरी त्यांना शिवण्याची आम्हाला हिंमत होत नसे.

बैदुल मिळाल्याचा आनंद तर झालाच; पण त्यांनीं खेळायचें कसे, हे ठाअूक असेल

तर ना ? बैदुल घेऊन मी गोंदूकडे धांव ठोकली. त्याला पण बैदुलाचा खेळ ठाऊक नव्हता. तेव्हां आम्ही मितीशी समोरासमोर वपून गोट्या अकमेकाकडे जमिनीवरून फेकावयास सुरवात केली. अकमेकांच्या बैदुलांची टक्कर झाली म्हणजे आम्हांला खूप गंमत वाटे. पण सारा वेळ मनांत धाकधुक असावयाची की, जर बाबाची दृष्टि पडली तर खेळ बंद व्हावयाचा, इतकेंच नव्हे तर बैदुलहि जप्त व्हावयाचे.

अक्का घरांत सर्वांची आवडती आहे हे मला कळण्याम फारसा वेळ लागला नाही. अक्काच्या शहाणपणावर आणि प्रेमळ स्वभावावर आजी तर कुरवाडून जाजी. वडील सारा दिवस भागूला काय हवे, तिला काय आवडतें, हें समजून घेण्यास अुत्सुक असत बाबा आणि आण्णा दोघेहि अक्काची तऱ्हेतऱ्हेनें गोड मस्करी करून तिला खुश करण्यात गर्क असत. माझ्या मनाची खात्री झाली कीं अक्का करील तें चागलें. अक्काचे वर्तन तें चांगले वर्तन पण तिची अेक गोष्ट मात्र मला आवडत नसे. अक्का जेव्हां हातांत पुस्तक घेअी तेव्हां आम्हांला शाळेत शिकवले होतें तसे ती धरीत नसे. तर डाव्या बाजूची पाने वाटोळीं दुमडून दोन्ही पुढे अेक करून अेकाच हातांत पुस्तक धरून घडाघड वाचीत असे. अक्काच्या तोंडून गोष्टी अैकणें मला फार आवडे, पण पुस्तकाची तिने केलेली दशा काही केल्या सहन होत नसे.

अक्कानें घरी येतांच मला शिकवायला सुरवात केली मी बिगारीच्या वर्गात होतो. मी वाचताना अडखळलों तरी देखील अक्का माझेवर रागावत नसे तर अत्यंत प्रेमानें आणि मोठ्या चातुर्यानें मला शिकवीत असे तिला शिकविण्याची हातोटी चागली होती. रोज संध्याकाळी रामविजय घेऊन ती आअीला वाचून दाखवीत असे. मी नियमानें अक्कावयास बसत असें.

अेके दिवशी अक्का आअीला म्हणाली, "आअी, आपण हा पोपट घरात बाळगला आहे त्याला सोडून देऊं या." आश्चर्यचकित होऊन मी विचारले, "पण कां ? पोपट तर आम्हां सर्वांना आवडतो. त्याला का काढून लावावयाचे ?" अक्काने लागलीच सुस्वर कंठानें नळदमयंती आख्यान सुरू केले त्यांत जेव्हां राजाच्या हाती सांपडलेला हंस सुटून जाण्याची धडपड करतो, स्वतःला सोडून देण्यासाठीं राजाला परोपरीने विनवितो आणि तरीहि राजा सोडत नाही असें पाहून निराश होऊन स्वतःची म्हातारी आअी, स्वतःची मादी आणि पिलें यांची आठवण करून करून विलाप करतो, हा प्रसंग आला तेव्हां अक्काच्यानें राहवेना. तिला रडूं कोसळले. थोड्या वेळानें आसूं पुसून ओळीचा अर्थ तिनें स्फुंदत स्फुंदत आम्हांला सांगितला. सर्वांच्या

हृदयाला पाझर फुटला आणि तावडतोब निश्चय झाला की पोपटाला कोंडून ठेवता कामा नये. विष्णूनें पोपटाचा पिंजरा नेऊन शिताफळाच्या झाडावर टांगला आणि हळूच पिंजऱ्याचें दार अुघडलें. अेक क्षण तर पोपटाला अुडून जाण्याचे सुचलेहि नाहीं. हें झालें कसें म्हणून बिचारा दबकून गेला असेल-चकित झाला असेल. दुसऱ्याच क्षणीं पिंजऱ्यांतील दांडीवरून अुडून तो पिंजऱ्याच्या अुघडया दारांत बसला आणि तेथून भर्रर्रकन आकाशांत अुडून गेला. अक्काच्या डोळ्यांत आनंदाचे मोती चमकूं लागले, केसूने टाळ्या पिटल्या. सर्वच जण वर माना करून पोपट कुठें जातो हें पाहूं लागले. थोडयाच वेळांत पोपट परत आला आणि पिंजऱ्यावर बसला. विष्णु म्हणाला, "अरे, हा कांहीं आपल्याला सोडून जावयाचा नाहीं. आपण याला हळूच पकडून पुन्हां पिंजऱ्यांत कोंडून घालूं." पण अक्काने तसें करावयाचे नाहीं म्हणून निक्षून सांगितलें. पुढे रोज तो पोपट शिताफळाच्या झाडावर येऊन बसत असे आणि केळें किंवा मिरच्या आम्ही आणून दिल्या तर आमच्या हातून घेऊन खात असे आणि अुडून जात असे. असे अेखादा महिना चाललें असेल. पुढें पुढें तो पोपट अितर पोपटांत मिसळून गेला आणि मग आमच्याजवळ येण्याची भीति शिकला.

अक्काच्या तोंडून अेकलेलें नळाख्यान पुढें मीहि तोंडपाठ केलें. अजूनहि आठवतें. हंस राजाला प्रार्थून म्हणतो,

*जागजागी आहेत वीर कोटी*
*भले झुंझारांहि शक्ति जया मोठी*

*तया माराया धैर्य धरी पोटी,*
*पांखरूं हें मारणें बुद्धि खोटी*

*बचुनि माझी हे कनकरूप काया*
*कटकमुकुटादी भूषणें कराया*

*कशी आज्ञा उपजली तुला राया*
*काय नाही तूजला दया माया* २

पुढें कांही जुळेना तेव्हां हंसाला स्वतःचे घर आठवून तो म्हणतो,

*म्हातारी उडता नयेचि निजला माता मदीया अशी,*
*कान्ता काय वदो नवप्रसव ते साता दिसाची तशी,*
*पाता त्या उभयांस मी मज विधी घातास योजीतसे*
*हातामाजि नृपा तुझ्या गवसलों आतां करावें कसें ?*

थोड्या दिवसानन्तर अक्काचा नवरा बेळगांवाहून आमच्या घरीं आला. त्याचें वय आमच्या आण्णाअितकेंच असेल. तरीपण वडील त्याला नाअीक म्हणून मानानें बोलवीत. त्याला हात धुण्यासाठीं पाणी स्वतः देत. अशा तरुणाची वडील अितकी खुशामत कां करतात तें माझ्या ध्यानांत येअीना. मला तें सर्व कसेंसेंच वाटे. जांवअीबुवांचे नांवहि मी विसरून गेलों आहें. ते फारसे बोलत नसत. आमच्याशीं मिसळत नसत. त्यांच्या कानांतील भिकबाळी पुढें पुढें येत असे आणि जेवतांना ते अगदींच बेताचे खात, अेवढेंच स्मरतें.

चिमी ही आमच्या बाबाची मुलगी. भारी खेळकर. घरांतील सवाचेंच खेळणें होती. वयाच्या मानानें बरीच तरतरीत होती. अक्का चिमीला घेअून खेळवीत असतां मध्येंच खिन्न होअी आणि आअीला म्हणे, "आअी, शहाणं माणूस लाभत नाहीं आपली चिमी अितकी हुशार आहे. तिला आयुष्य कसं लाभेल याची काळजी मला वाटूं लागली आहे." पण अक्काचें हे वचन अक्काला च लागू पडणार आहे, हें त्या वेळीं अक्काच्याहि ध्यानीं आले नाहीं आणि आअीलाहि तशी शंका आली नाहीं.

आम्ही शाहपूरला आलों आहोंत. सराफ गल्लीतील भिशांचें घर तें आमचें आजोळ. तिथें आम्ही सध्यां राहिलो आहोंत. अक्का आजारी आहे. मोठी मामी रोज सकाळीं अुटून पेज तयार करी व आम्हां मुलांची पंगत बसवून आम्हांला जेअूं घाली. तोंडी लावण्यासाठीं पुष्कळदा भाजीच्या अेवजीं आम्हांला भोपळ्याचे सांडगेच तळून दिले जात. साताऱ्याला असताना नेहेमी तांदुळाचे सांडगे खाण्याची मला संवय. मला हे भोपळ्याचे सांडगे कसे आवडावेत ? मी माझी नावड व्यक्त करण्यासाठीं मामीला म्हणालों, "आमच्या घरचे (तांदळाचे) सांडगे काव काव करतात आणि तुमच्या घरचे हे सांडगे चिव चिव करतात म्हणून हे सांडगे मला आवडत नाहीत." माझ्या या काव्याचें त्या वेळीं बरेच कौतुक झालें.

थोड्याच दिवसांत घरांत सर्वत्र उदासीनतेची आणि चिंतेची छाया पसरली. अक्काचें दुखणें विकोपास पोहोंचले आहे. डॉ. शिरगांवकरांनीं सांगितलें की हा नवज्वर ( टॉयफॉईड ) आहे बाळंतपणानंतरचा नवज्वर ! मग काय विचारावे ? अेके दिवशी सकाळी अुठतांच समोरच्या घरच्या लोकांनी आम्हाला आपल्या घरीं जेवावयास बोलाविले. आम्ही सर्व मंडळी तेथे गेलो. कोण जाणे कशासाठी; पण आम्हांला तेथेच अडकवून ठेवण्याचे निरनिराळे प्रयोग होअू लागले. मी घरीं जाण्याची गोष्ट काढली कीं लागलींच अेखादा मोठा मुलगा मला म्हणावयाचा, "चल, तुला अेक गोष्ट सांगतों. गोष्ट कशीवशी पुरी झाली म्हणजे तो गाअून दाखवी. असें करतां करतां सध्याकाळ व्हावयास आली आतां मला वाटूं लागलें कीं सगळा दिवस आम्हांला येथे तांगडून बसविण्यांत कांहीतरी हेतु आहे मी कंटाळून भोकांड पसरले. मी रडतों आहें अेवढ्याचसाठीं गोदूला सहानुभूतीचें रडें कोसळले. ज्यांच्या घरी आम्ही गेलो होतों त्याच्या मुलाना समजेना की आतां काय करावे. बिचारे मेटाकुटीस आले. शेवटी त्यांनी अेक नाटक करण्याचा बूट काढला. अेकानें अेक लांब रुमाल डोक्याला बांधून त्याचे अेक टोंक नाकापुढें लटकतें सोडले. आणि अशा रीतीनें सोडेचा लम्बोदर गणपति तयार झाला. दोनचार केरसुण्या अेकत्र बांधून दुसऱ्या अेकानें मोराचा पिसारा बनवला आणि तो स्वतःच्या पाठीकडे बांधून त्याने स्वतःला मयूरवाहिनी सरस्वती बनविले. गणपती गाअूं लागला. सरस्वती थयथय नाचूं लागली. असे बराच वेळ चालले नाटक खूप चालले. पण रस कांहीं केल्या जमेना. अितक्यात शेजारच्या दुसऱ्या अेका मुलानें येअून मला म्हटले, "भिशांच्या घरीं तुझा बाप मोठ्यानें रडत आहे." त्याचें हे वाक्य अैकून मला त्याचा फारच राग आला. माझ्या वडिलांसंबंधानें अेकेरी शब्द वापरतो ! आणि माझे वडील कधी रडतील का ? जन्मांत मी कधी तसे पाहिले नव्हतें. मी चिडून त्याला म्हणालो, "तूं खोटं बोलतोस." मी तडक घरीं आलों. रात्रीचे नअू वाजण्याचा सुमार असेल. घरी सर्वत्र दुःखाची शान्ति पसरली होती. कोणी कोणाशीं बोलत नव्हतें. स्मशानांतून परत आलेले लोक घराच्या दरवाजाशी बसून स्नान करीत होते. अितकीच काय ती हालचाल घरांत दिसत होती. पुढल्या खोलीत अेका कोपऱ्यांत तांदुळाचे पोतें अर्धे भरलेले ठेवले होतें. त्यावर माझे वडील अेक पातळ अुपरणें पांघरून बसले होते. थंडीनें काकडत असावेत असें वाटत होतें. मला मांडीवर घेअून दुःखी आवाजानें ते म्हणाले, "दत्तू, आपली मागू आपल्याला सोडून दूर गेली." मला कांहीं केल्या

समजेना की झाले आहे काय ? दूर म्हणजे कुठवर गेली असेल ? कशासाठी गेली असेल ? वडील अितके दुःखी कां ? घरात कुणीच कुणाशी का बोलत नाहीं ? वडील तर राहून राहून अेकच वाक्य बोलत- "आपली भागू आपल्याला सोडून दूर गेली."

मी आंत गेलो तिथं पाहिले तर आअी ओक्यावर पावरूण घेअून निजली आहे. मला काय कल्पना की ती निजली नसून वज्राघातानें बेशुद्ध होऊन पडली आहे म्हणून ? माझी मावशी आअीच्या शेजारीं बसली होती. मला पाहून ती रडूं लागली. मामा तिचेवर चिडले म्हणाले, "तूच अशी रडू लागलीस तर मुले काय करतील ?"

रात्र कशीबशी निचून गेली. दुसरे दिवशी आअी काहीच खाअीना सगळ्यानीं परोपरीनें सांगून पाहिले पण तिनें कोणाचेच अैकले नाही शेवटचा अुपाय म्हणून राममामा मला आअीजवळ घेऊन गेले. त्यानी मला सांगितले, "तुझ्या आअीला म्हण, तूं जर जेवली नाहीस तर तुला माझ्या गळ्याची शपथ आहे." मी तसे म्हणणार अितक्यात आअीनें मला दटाअून म्हटले, "दत्त, तसे कांही बोलूं नकोस." झाले. मातृभक्त दत्तूची जीभ आता कसची हालते ? सर्व माझेवर चिडले. राममामांच्या चेहऱ्यावर माझ्याविषयीचा तिरस्कार स्पष्ट दिसत होता. पण मी बोललों नाही तें नाहीच.

'शहाण माणूस लाभत नाही' हे अक्काचें वचन शेवटी अक्काच्या बाबतीतच खरे ठरले ! आअी रोज त्या वचनाची आठवण काढून काढून रडत असे. अक्काने शेवटीं शेवटी अननस खावयास मागितला होता म्हणून आअीनें जन्मभर अननस खाण्याचें सोडून दिले

अक्काविषयीची माझीं प्रत्यक्ष संस्मरणे काय ती अेवढीच पण लहानपणापासून मी त्या स्मरणांचें ध्यान करीत करीत त्यांचें संगोपन करीत आलो आहे. साधारणपणे हिन्दु कुटुंबांत मुलींच्याविषयी फारशी कोणाला आस्था नसते. मुलगे तेवढे आवडते आणि मुली बहुतकरून नावडत्या, ही स्थिति अनेक प्रान्तांत आहे. कानडीमध्ये म्हणच आहे 'साकु सावित्री बेकु व्यंकप्पा' (पुरे या मुली असें वाटलें म्हणजे मुलीचें नांव सावित्री ठेवावे आणि देवा मला मुलगे दे अशी प्रार्थना करावयाची असली म्हणजे मुलाचें नांव व्यंकटेश ठेवावे). आमच्या घरी मात्र स्थिति

निराळी होती. आमच्या घरीं अक्काची स्थिति सर्व प्रकारें स्पृहणीय होती. बाबा आण्णा सारखेच तिचे लाड करीत असत आणि तिला शिक्षणसंस्कारहि बाबाआण्णांप्रमाणेंच मिळाले होते.

मनुष्याच्या जवळ जवळ सर्वच शुभ वृत्तींचा विकास कौटुंबिक वातावरणांत होत असतो. त्यांतहि आओच्यानन्तर जर कुणाची मुलावर विशेष छाप पडत असेल तर ती वडील बहिणीचीच. मनुष्याचा आओशीं संबंध असाधारण असतो. स्वतःच्या पत्नीशीं जो संबंध येतो तोहि अद्वितीय आणि अैकान्तिकच असतो. स्वतःच्या मुलांचा संबंधहि अशाच प्रकारचा वैशिष्ट्यपूर्ण असतो जो संबंध सहजव्यापी होऊं शकतो आणि ज्या संबंधांत अखिल स्त्रीजातीचा अन्तर्भाव होऊं शकतो तो संबंध म्हणजे भावा-बहिणीचाच.

मला समजूं लागलें त्यापूर्वीच माझी अंकुलती अैक बहीण वारली. त्यामुळें माझ्या जीवनांतील हें अैक दालन प्रथमपासूनच शून्यवत् झालें आहे. स्त्रियांची भक्ति मी दुरूनच करतों. त्यांचेशीं स्वाभाविकपणें परिचय करून घेणें मला साधनच नाहीं. भगिनीप्रेमाची भूक राहूनच गेली आहे. जीवनाच्या व्यापकतेचा आणि सर्वांगसुन्दरतेचा आदर्श जसजसा परिपक्व होऊं लागला, तसतसें मला अैकादी बहीण असती तर किती चांगलें झाले असतें, असा विचार मनांत येऊन मन विषण्ण होतें. स्वतःची बहीण नसल्यामुळें नव्या बहिणी करण्याचे साधत नाही ही कांहीं लहानसहान अडचण नव्हे !

माझ्या आदर्शाप्रमाणे ज्या पूजनीय आहेत अशा कितीतरी स्त्रिया मला ठाऊक आहेत. त्यांचा परिचय झाल्यास मी अवश्य पावन आणि अुन्नत होअीन अशी मनाला खात्री वाटते. तरीपण हृदयाची भूक अक्काच्या या थोड्याशा पण पवित्र अशा संस्मरणांनींच शमविणें प्राप्त आहे.

## पैसे सांडले

८

वाअीट मुलांच्या संगतीनें आमच्या तोंडीं वाअीट भाषा लागेल या भयानें ज्याप्रमाणें आम्हांला लहानपणीं घरांतून रस्त्यावर जाअूं देत नसत, त्याचप्रमाणें लहानपणीं कांहीं केल्या आमच्या हाताला पैशाचा स्पर्श होअूं देत नसत. चांगल्या घरच्या मुलांना ज्याप्रमाणे हाडाला किंवा विडीला शिवूं देत नाहीत, त्याचप्रमाणें तितक्याच आग्रहानें आम्हांला पैशाला शिवूं नये असे शिकविलें होतें. पैशाला किंवा रुपयाला लहान मुलांनी शिवूं नये ही गोष्ट आमच्या नसानसानें भिनली होती; पण त्याच कारणानें वाटोळी नाणीं हातांत खेळवावीत असें वारंवार मनांत येअी. अेकदां शाहपूरला नारायण मामांच्या बरोबर सारवट गाडींत ( धमणींत ) बसून मी दवाखान्यांत गेलों होतों. परत येतांना मी मामांना म्हणालों, " नारायणमामा, नारायणमामा, तुमचेकडचे पैसे मला जरा हातांत घेअूं द्या ना ! " मी हिय्या करून पैसे मागितले तर खरे; पण मनाची बालंबाल खातरी होती कीं ते 'लहान मुलांनीं पैशाला शिवूं नये' हें चिरपरिचित स्मृतिवाक्य माथीं मारणारच. पण तसें कांहीं झालें नाहीं. अुलट मामानें तीनेक आण्यांचे पैसे माझ्या हातांत दिले. माझ्या आनंदाला पार राहिला नाहीं. मूठ भरेल अितके पैसे हातांत आले, ही काय लहानसहान गोष्ट होती ? अेकेक पैसा हातीं घेअून मी तो वाटोळा फिरवला. सगळे पैसे मी पुनः पुनः मोजून पाहिले. ( तेव्हां मला

शभर पयेनचे आकडे मोजनां येन होते. ) हातांत पैसे असे किती नेळ खेळवणार ? नवलाअी कमी झाली आणि मी पैसे मुठीत दाबून ठेवले.

अितक्यांत वाटले कीं गाडीच्या मागच्या पायरीवर कोणी भिकारी मुलगा बसू नये म्हणून मागे पहात रहावे. म्हणून मागे तोंड करून गाडीच्या मागच्या दरवाजाबाहेर हात लटकवत ठेवून मी पाहूं लागलो. मारुतीच्या देवळापर्यंत आलो असू तेथे बाजूला कित्येक मुले विटीदांडू खेळत होतीं. त्यांच्या खेळाकडे माझे ध्यान गेले त्यामुळे हाताच्या मुठीकडचे ध्यान कमी झालें. मूठ सैल झाली आणि हातातील पैसे खाली पडले या भयंकर अपघातामुळे मी अितका कांहीं दिङ्मूढ झालो कीं, काय करावे हे मला सुचेना. आपल्या सांगण्यानें गाडी अुभी राहील हे तर ध्यानांत येण्याजोगे नव्हतेंच लहान मुलांच्या असल्या अिच्छेला कुणी मान दिल्याचे मी पाहिलें नव्हतें. मामाना सांगावें तर ते रागावतील ही मनाची पूर्ण खात्री. तेव्हां मूग गिळून गप्प बसावे या भित्र्या मुलांच्या सार्वभौम नीतीचे मी पालन केले. विटीदांडू खेळणाऱ्या मुलांपैकी अेकानें पैसे पडलेले पाहिले. तो हळू हळू चालत रस्त्यावर आला. त्यानें पैसे अुचलले, मजकडे पाहिले आणि पैसे आपल्या खिशात ठेवून दिले. मी शून्य नजरेनें त्याचेकडे पाहिले. त्यानेहि अेक पळभर माझेकडे दृष्टि फेकली आणि जणू काय काही झालेंच नाहीं, अशी साळसूद मुद्रा धारण करून अगदी हळू हळू चालत जाअून तो खेळात मिसळला. आसपासची मुले त्याचेकडे पाहून मिस्किलपणे हसली. त्याच्या त्या हसण्यांत स्वतःच्या मित्राला अलभ्य लाभ झाला याचे अभिनंदन आणि स्वत:ला ती संधी मिळाली नाहीं याचा हेवा ही दोन्ही स्पष्ट दिसत होतीं. चेहऱ्यावरून मनुष्याच्या मनांतील अितका सूक्ष्म भाव समजण्याइतकी अक्कल त्या वेळी माझ्यांत होती. पण अशा प्रसंगी काही करण्याजोगे असतें हे न सुचण्याअितका बावळटपणाहि माझेमध्ये होता !

लहान मुलांनी जर वर्गात ध्यान दिले नाही, प्रश्नाचे अुत्तर ताबडतोब दिले नाही किंवा अिशारा केल्याबरोबर सांगितलेले अेकले नाही, तर चिडून जाणाऱ्या शिक्षकांनीं आणि वडील माणसांनी माझा वरील प्रसग ध्यानात घेण्याजोगा आहे. बालमानसाचा विकास अेका ठराविक क्रमानेच होत नसतो. त्याच्यांत वडील मंडळींना आकलन न होणारी अशी, अनेक संस्कारामुळें आलेली, विविधता असते अितके देखील जर ते ध्यानांत ठेवतील आणि मुलांशीं वागण्यांत धीर धरतील तर बालद्रोहाच्या पापांतून वांचतील.

गाडी शेवटी अेकदांची दारीं येऊन पोहोंचली. मामा म्हणाले, "दत्तू, आण पाहूं ते पैसे!" दत्तू पैसे कोठून आणणार? तो वेड्यासारखा टकमक पाहूं लागला. पण शेवटीं कांहींतरी अुत्तर तर दिले पाहिजेच. मी म्हणालों, "पैसे हातांतून सुटून पडले."

"कुठे पडले? कसे पडले?"

"मारुतीच्या देवळासमोर, मुलें विटीदांडू खेळत होतीं, तिकडे."

"तर मग, वेड्या, मला तेव्हांच कां सांगितले नाहींस?"

"पण अेका मुलानें ते अुचलून घेतलेले मी पाहिले."

मामा तिरस्काराने हंसले, अुत्तरादाखल. मी लाजलेली आणि दीन अशी मुद्रा त्यांना दाखविली. मामा मला रागे भरले नाहींत किंवा माझ्या देखत घरांतील लोकांना घडलेला प्रसंग ते सांगावयास बसले नाहींत, या आनंदांत माझा ओशाळेपणा मी विसरून गेलों. आपल्या आवडत्या बहिणीचा कुसधुणा मुलगा घरीं आला आहे. तेव्हां रागे कसें भरावे? असा अुदार विचार करून मामानी ती गोष्ट मनांतल्या मनांत ठेवली असेल. आपला भाचा अगदींच बावळट आहे अशी मनाशीं खूणगांठ बांधून पुढें ते तो प्रसंग विसरलेहि असतील. पण माझ्या डोळ्यासमोर त्या दिवसाचा तो देखावा आज देखील त्या दिवसाअितकाच ताजा आहे. म्हणाल तर मारुतीच्या देवळासमोरील ती जागा मुद्दां नेमकी दाखवून देअीन.

## मोडका मास्तर

साताऱ्याहून अेकदां आम्ही आजोळी जाण्यासाठी निघालों. आम्ही विष्णूच्या लग्नासाठीं चाललों होतों. विष्णु हा बाबा, आण्णा आणि अक्का यांच्याहून लहान. बाळलग्नाचे ते दिवस. मुलगी आठ वर्षाची झाली आणि मुलगा बारा वर्षाचा झाला म्हणजे आअीबापाना त्याच्या लग्नाची काळजी लागत असे. अशाच रीतीने आमच्या विष्णूचें लग्न होणार होतें. त्या वेळी साताऱ्यापर्यंत रेल्वे आली नव्हती. तेव्हां साताऱ्याहून शाहूपूरला गाडी-रस्त्यानेंच जाणे शक्य होतें. आम्ही बैलगाडीत बसून शाहूपूरला आलो होतो, तें अजून आठवतें.

वडील आमच्या बरोबर नव्हते. बैलगाडीने साताऱ्याहून बेळगांवला जाण्यास जितके दिवस लागत तितकी रजा वडिलांना मिळणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांनी आम्हांला पुढे पाठवून स्वतः मागून टपालाच्या टांग्याने येण्याचे ठरविले होतें. जातांना वाटेवर अेक सुंदर दगडी पूल लागला. आम्ही नदीची सोय पाहून पुलाजवळच तळ दिला ! नदीकांठीं वडील बंधूनीं चांगलेसे तीन धोंडे रचून चूल तयार केली. आणि आअीला स्वयंपाकाची सोय करून दिली; अितक्यांत आअीने म्हटलें, "अरे बाबा, अिथें स्वयंपाक नाही करतां यावयाचा ! चला, आपण पुढल्या मुक्कामाला जाअूं." शोभिवंत पूल, त्याच्या खालची शीतल छाया आणि

भुकेची वेळ, अशा स्थितीत पुढे कूच करण्याचा हुकूम आईने कां दिला याची कल्पना होईना. आम्ही सर्वजण आईकडे टकमक पाहूं लागलों. ती म्हणाली, "पहा, या नदीच्या पाण्यावर जिकडे तिकडे बुडबुडेच आहेत." पाहातों तर खरोखरच पाण्याचा प्रवाह अगदीच संथपणे वाहात आहे आणि पृष्ठभाग बराचसा फेसाळ झाला आहे. मी आईला म्हणून पाहिले, "वरचे पाणी घाण असले म्हणून काय झालें? आंतले पाणी चागले असेलच ना?" आई म्हणाली, "पण ही नदी अपवित्र आहे. आपल्या धर्मात सांगितले आहे कीं नदीवर फेस आणि बुडबुडे आले म्हणजे नदी अपवित्र आहे असें समजावे. विटाळशी नदीच्या पाण्यास शिवूं देखील नये!" आम्ही मुक्काम हालवला.

शाहपूरला येऊन पाहातों तों अगदीच निराळें जग! सगळीकडे तांबडी माती. जमिनीवर जरा बसावें कीं लागलीच कपडे रंगून जात. पहिल्या दिवशीं मी कितीतरी तांबडे खडे हौशीने गोळा केले. पण पुढें त्याचे काहीच वाटेना. थोरल्या मामाची मुलगी माझ्याशीं बोले तें मला नीट समजत नसे. माझी भाषा मराठी. तिची बेळगांवी कोंकणी. सगळेच जगली जंगली वाटे. लाडू म्हणाली, "दत्तू, चल, आपण मोडक्या मास्तराच्या शाळेत शिकायला जाऊ या."

मोडका मास्तर म्हणजे खरोखर अेक वल्ली होती. शरिरानें ठेंगणा, स्वभावाने अुग्र आणि दोन्ही हात नसलेला. धोतर नेसायचे तें देखील बायकोच्या मदतीनेच. पण शिकविण्यांत अगदी पटाईत. मोडक्या मास्तरांच्या घरी चौसोप्यात मुले रांगेने बसत. मास्तर आळीपाळीनें प्रत्येक विद्यार्थ्याच्या पुढे जाऊन बसे आणि पायांत पेन्सिल धरून पाटीवर सुंदर वळणदार अक्षरे घालून देअी आणि म्हणे, "आतां घोट." कागद देखील जमिनीवर ठेवून, लेखणी पायाच्या आगठ्याजवळच्या बेचक्यात धरून, सुन्दर अक्षरानें अशा कांही वेगानें लिहीत असे कीं जणूं काय आजकालचा वर्तमानपत्राचा बातमीदारच.

चादवडकर मास्तरांचा अनुभव ताजाच होता. पण मोडक्या मास्तराला पाहातांच वाटले, की येथें कांही भीति नाही. आपण सुरक्षित आहोंत. जेथे हातच नाहींत तेथें छडीचे भय कसले? पण माझा हा आनन्द फार वेळ टिकला नाही. मी जरा कुठें टिवल्या बावल्या करूं लागलों, अितक्यात मोडक्या मास्तरानें जवळ येअन माझ्या अुघड्या माडीवर पायानें असा जोराचा चिमटा घेतला की मी किंकाळी फोडून शाळेंतून पळच काढला. दुसरे दिवशी आम्ही शाळेंत जाणार नाहीं म्हणून

साफ सांगून टाकले. मी मनात विचार केला कीं येथें कांहीं बाबाचें राज्य नाहीं कीं मला धमकावून शाळेंत घेऊन जाअील. पण माझ्या दुर्भाग्याने बाबाचें काम मोठ्या मामीनें केले. तिनें मला अुचलून घेऊन स्वताच्या हांडीवर (कडेवर) बसविले आणि शाळेंत नेलें. रस्त्यांतच मी मनाशीं खूणगांठ बाधली कीं आज जर हरलों तर शाळेची पीडा कायमची कपाळीं किंवा खरें म्हणजे मांडीला, चिकटावयाची ! तेव्हां शाळेच्या दरवाजांत मामीनें मला कडेवरून अुतरविलें मात्र, मी ताबडतोब दोन्ही पायांचा पुरता अुपयोग करून गल्लीचें दुसरे टोक गांठले. मामीचे शरीर कांहीं सडपातळ नव्हतें कीं ती माझा पाठलाग करून मला पकडूं शकेल. अंतीं माझा विजय झाला. आणि शाहपुरांत असेतोपर्यंत शाळेला न जाण्याची सूट मला मिळाली. माझेमुळें लाडू देखील घरींच राहूं लागली आणि आम्ही अेकमेकांस कहाण्या सांगण्याचें सत्र आरंभिले.

## तूं कोणाचा ?

१०

बेळगुंदी हें आमचें खेडेगांव. शाहपूरहून जवळजवळ आठ नऊ मैल दूर आहे. दोन टुमदार टेकड्यांच्या पायथ्याशीं अेका बाजूला वसलेले आहे. जमिनी सगळ्या भाताच्या. आसपास आमराया देखील पुष्कळ. हल्ली तेथे ऊंसहि होऊं लागला आहे. दरवर्षी लष्करचे लोक गोळीबारासाठीं येथे येऊन राहात असतात. आम्ही अेकदां बेळगुंदीला गेलों होतों आणि मामांच्या घरीं राहिलों होतों. पहिल्याच दिवशीं आअीबरोबर ग्रामजोशांच्या घरी बसावयास म्हणून गेलों होतों. तेथे गेलों मात्र आणि आम्ही घराच्या वळचणीच्या आडव्या बांबूला लटकून झोके घेऊं लागलों. गांवठी छपराचा तो बांबू. त्याला असला खोडकरपणा कसा सहन व्हावा ? त्यानें ताबडतोब कर्रर कर्रर असा आवाज करून माझे विरुद्ध कागाळी करण्यास सुरवात केली. सर्वांना माझा राग आला असला पाहिजे. स्वारीला युक्तीने पिटाळावा म्हणून धाकट्या मामीने मला म्हटलें, "बाळ, आमच्या या लहान्या येसूला घरीं घेऊन जा. तिला नीट संभाळ हो ! रस्त्यांत ठेंचबीच लागेल !"

दादा बहिणीला घेऊन निघाला खरा पण मामाचें घर कुठें आहे हें कांहीं त्याच्या ध्यानांत येअीना. बहिणीचा हात धरून चाल चाल चाललों. गांव संपून दुसऱ्या बाजूची वेस आली. पुढे महारवाडा आला. तरीपण आम्ही चाललोंच होतों.

शेवटीं अेका महारणीनें आम्हांला पाहून म्हटलें, "कुणाचीं लेकरे हीं ? कुठें चाललींत ?" माझ्या समोर येऊन तिनें विचारलें, "बाळ, तूं कोणाचा ?"

मी वाट चुकलों आहें आणि म्हणून माझा पत्ता मिळवावा यासाठीं ही म्हातारी मला विचारीत आहे अेवढेंहि माझ्या ध्यानांत आले नाहीं. मी ताबडतोब अुत्तर दिलें, "मी आअीचा." रस्त्यावरचे सर्व लोक हसूं लागले. तसें म्हटलें तर माझें अुत्तर कांहीं अगदींच बावळटपणाचें नव्हतें. आमच्या घरीं नातेवाअिकांपैकीं कितीतरी म्हाताऱ्या बाया येत आणि मला आअी आवडते को वडील तें जाणण्यासाठीं आम्हांला प्रश्न विचारीत, "बाळ, तूं कोणाचा ?" आणि मग त्या दिवसाच्या लहरीप्रमाणें आम्ही सांगत असूं, "आअीचा" किंवा "दादांचा." अगदीं लहानपणीं मी वडिलांना दादा म्हणत असें. मला वाटलें कीं ही म्हातारी तशाच हेतूने लाड करण्यासाठीं विचारीत असेल. आणि म्हणूनच मी माझेकडून योग्य अुत्तर दिलें होतें.

माझेकडून कांहीं सुगावा लागेना म्हणून त्या म्हातारीनें येसूकडे वळून विचारलें, "आणि, मुली, तूं ग कुणाची ?" आमची येसू कांहीं अवसानघातकी नव्हती. ती कशी दादाची लाज जाअूं देअील ? तिनें ताबडतोब म्हटलें, "मी नानाची." येसू आपल्या वडिलांना नाना म्हणत असे. आमचेकडून याहून अधिक माहिती काढणे शक्यच नव्हतें. तेव्हां म्हातारी म्हणाली, "मुला, चल माझ्या बरोबर ! मी तुम्हांला तुमच्या घरीं पोहोंचवितें. हा तुमचा रस्ता नव्हे." आम्ही म्हातारीच्या मागें मागें चाललों. रस्त्यावरील लोकांना विचारीत विचारीत म्हातारी मामांच्या घरापर्यंत आली. आम्हांला तेथें सोडून जर ती मुकाटयानें परत गेली असती तर तिचे अुपकार मी जन्मांत विसरलों नसतों. पण त्या थेरडीनें आमच्या प्रश्नोत्तराचा रिपोर्ट मामांना अक्षर न् अक्षर दिला. सगळे हसूं लागले त्यानंतर मी जेथें जाअी तेथें सर्वच माझी फजिती करीत. कोणीहि मला बघितलें कीं म्हणे, "मी आअीचा !" मी लाजून पाणी पाणी झालों. दत्तू अगदीं बावळट आहे अशी मामांच्या घरीं सर्वांची खात्री झाली. पण अीश्वररुपेनें दुसऱ्याच दिवशीं माझी लायकी सिद्ध करण्याची संधी मला मिळाली.

## पेरू आणि जिलब्या

११

आमच्या मावशीच्या बागेंत पेरू चांगले होत असत. मोठे मोठे पेरू आंतून लाल असून देखील त्यांत बिया फारशा नसत. मावशीने अेक मोठीशी टोपली भरून मोठे मोठे मुसंब्याअेवढे पेरू पाठविले होते. गडग्यानें टोपली जमिनीवर ठेवली न ठेवली तोंच आम्हीं मुलांनीं तिला गराडा घातला. आणि प्रत्येकाने अेकेक मोठा पेरू अुचलला. लहान मुलांनी जर सबंध पेरू खाल्ला तर ती आजारी पडतील अशी सर्वांची समजूत. म्हणून आण्णा आणि विष्णु हे दोघे आम्हां मुलांच्या मागे लागले. "आणा ते सर्व पेरू परत !" मुली बोलून चालून भित्र्या, शस्त्रबंदीचा कायदा झाल्याबरोबर ज्याप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांनीं आपलीं शस्त्रें सरकारच्या घरीं पोहोंचविलीं, त्याप्रमाणें मुलींनीं अेकामागून अेक येअून आपापले पेरू पटापट परत देअून टाकले. आम्ही मुलगे जात्या बंडखोर. शेवटच्या श्वासापर्यंत शरण जावयाचें नाहीं असा आमचा बाणा. आम्ही पलायनयुद्ध सुरू केले. आण्णा आणि विष्णु यांनीं आमचा पाठलाग सुरू केला. केशू, गोंदू, वगैरे सर्व पलायनविर्येत प्रवीण होते. ते कोणी हातीं आले नाहींत. मी सर्वांत लहान. माझें कितीसें चालणार ? थोडक्यांतच आण्णानें मला गांठलें. आणि मागून काखेंत हात घालून मला अलग वर उचललें. मी हवेंत तंगड्या झाडल्या. केशू-गोंदूंनीं हाहाःकार केला. आणि कां न करतील ?

आपल्या पक्षांतील अेक महारथी ( खरे म्हणजे महापदाति म्हटले पाहिजे. ) पडला तर तें कसें सहन व्हावें ? माझ्या हातचा पेरू जर हिसकावून घेतला गेला तर बाकीच्यांना आपापला पेरू खाण्यांत मग गंमत ती काय वाटणार ? त्यांना मला कसलेच सहाय्य करणें शक्य नव्हतें. केशू म्हणाला, "दत्तू, फेंक, फेंक तो तुझा पेरू मजकडे. " पण त्याला काय बातमी कीं विष्णु मागून येअून क्रिकेटच्या क्षेत्रपाळा-प्रमाणें त्याच्या मागेच अुभा आहे. मी पेरू फेंकला कीं विष्णु अुंच हातानें वरच्या वरच झेलावयाचा. आतां काय करावें ? माझ्या हृदयांत त्या वेळीं किती कालवाकालव होत होती ! आज जर हरलों तर सबंध बेळगुंदी गांवांत माझी अब्रू राहाणार नाहीं. कालच तर माझी फजिती जगजाहीर झाली आहे. पण भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें 'ददामि बुद्धियोगं तम्' या न्यायानें देवानेंच मला युक्ति सुचविली. आण्णाचे दोन्ही हात मला अुचलण्यांत गुंतले होते, त्यामुळें माझा पेरू माझ्याच हातांत होता. मी पेरूचा चावा घेतला आणि खातां खातां आण्णाला म्हटले, "घे आतां हा अुष्टा पेरू खायचा असेल तर." त्यानें मला खाली ठेवलें आणि खरोखरच माझ्या हातांतील अुष्टा पेरू घेण्यासाठीं हात पुढें केला. मी मनांत अभेद बुद्धि बाळगून पेरूच्या अितक्याच गोडीनें त्याच्या मनगटाचा चावा घेतला. आण्णा चिडणार, रागावणार, यापूर्वीच केशूनें आणि गोंदूनें विजयनाद केला. माझ्या बहादुरीमुळें सन्तुष्ट होअून विष्णु देखील माझे कौतुक करूं लागला. हें सर्व पाहून आण्णानें विचार केला कीं आतां रागावण्यापेक्षां हंसण्यावारी घालविण्यांतच शहाणपणा आहे.

पेरू स्वस्थ-मनें अुदरस्थ केल्यानन्तर जेवण्याची फारशी भूक अुरली नव्हती. पण केशू म्हणाला, 'आज जर आपण कमी खाल्लें तर त्यावर टीका होअील. आपण सिद्ध करून दिलें पाहिजे कीं पेरू खाणें म्हणजे आपल्यासारख्या मुलांना नुसता खेळ आहे. केशूचे म्हणणें अैकून त्या दिवशीं आम्ही आपलें नांव राखण्यासाठीं रोजच्याहून अधिकच खाल्लें. आमच्यापैकीं कोणाला असें नाहीं सुचलें कीं पत जास्ती खाण्यांत नसून आजारी न पडण्यांत आहे. नुसत्या पेरूनें जें झालें नसतें, तें अब्रूच्या या भलत्या कल्पनेमुळें घडून आले आणि गोंदू खरोखरच आजारी पडला.

दुसऱ्या दिवशीं केशूने आणि मी गोदूला बाजूला नेअून चांगलाच फाअिलावर घेतला. आम्ही म्हणालों, "तूं खरा वीरच नव्हेस. अब्रू सांभाळण्यासाठीं खाल्लें असतां

कोणी आजारी पडत असतें का ? दोन दिवस देखील तुला धीर धरतां आला नाहीं."

चार दिवसांनन्तर गोंदूनें दोन हिरव्या मिरच्या आणल्या आणि मला तो म्हणाला, "चल, दत्तू, यांनील अेक तूं खा !" "कांरे बुवा ?" मी विचारलें.

"तुला काय ठाअूक ? आज आबा ( आजोबा ) म्हणत होते की लहानपणीं कष्ट सहन कराल तर मोठेपणीं सुखी व्हाल. लहानपणीं कडू खाल तर मोठेपणीं गोड खावयास मिळेल." तेव्हां चल, आपण दोघेहि आजपासून मिरच्या खाअूं या म्हणजे मोठे झाल्यावर आपल्याला पेढे बरफी आणि जिलब्या खावयास मिळनील."

आबांचें म्हणणें आबांनीं कोणत्या अर्थानें म्हटलें होतें तें गोंदूला काय माहीत ? त्यानें आपला सरळ अर्थ घेतला होता. गोंदूचे म्हणणें मला पटलें नाहीं पण मिरच्या खात नाहीं म्हणावें तर भ्याडपणा दिसेल, म्हणून मी गोंदूच्या बावळटपणाच्या आहारी गेलों आणि आम्ही दोघांनीं अेकेक मिरची खाल्ली. गोदूला निदान अेवढें समाधान होतें कीं मोठेपणीं याच्या व्याजांत गोड गोड खावयास मिळणार आहे. मला बिचाऱ्याला तेवढेहि समाधान नव्हतें. माझें मिरच्या खाणें 'शुद्ध निष्कामकर्म' होतें.

थोडयाच दिवसांनीं आम्ही शाहपूरला परत आलों. कां कुणास ठाअूक, माझ्यांत आणि गोंदूंत जितकी नीतिनिष्ठा होती तितकी केशूमध्ये नव्हती. तो हवें तेव्हा हवी ती वस्तु ( अर्थात् घरची असेल तरच ) वाटेल त्या प्रकारे घेअून येत असे. त्याच्या नीतिशास्त्रांत दुसऱ्याच्या घरीं केली तरच ती चोरी होत असे. स्वतःच्या घरीं वाटेल तें करावें.

लग्नसराअीचे दिवस आले. वडिलांनीं काचेच्या कपाटांत अेक करंडी भरून जिलब्या ठेवल्या होत्या. मुंग्यांनाहि त्याचा सुगावा लागण्यापूर्वी केशूला त्याचा वास लागला. त्याने कपाट अुघडून करंडीतून दोनचार जिलब्या काढल्या. पण लाडक्या दत्तूवांचून खाव्या कशा ? मला बाजूला बोलावून म्हणाला, "घे या जिलब्या. खा !" यापूर्वी मी कधीं जिलब्या पाहिल्याहि नव्हत्या आणि खाल्ल्याहि नव्हत्या. जिलबीची गोडी चाखल्यावांचून तिचा आकार कधी कुणाला आवडण्याजोगा नसतोच. जिलबीचा अेक तुकडा मी तोंडांत टाकला. पण त्याचा तो आंबट गोड स्वाद मला आवडला नाहीं. मी खाण्याचें नाकारलें. अितक्या शिताफीनें हस्तगत

केलेल्या जिलब्या फुकट जातात असें पाहून केशूला माझा राग आला. मग काय, त्यानें माझा जोरांत गालगुच्चा घेतला आणि म्हटले, " म्हारडया ! खा, खा. नाहींतर मारतो बघ." माराच्या भयानें मी जिलबी खाल्ली आणि वांकडें तोंड करून तेथून निघून गेलों. चार पांच दिवस अशा प्रकारे जिलबी खाण्याची जबरदस्ती माझ्यावर झाली. आणि या अशा शिक्षणामुळें जिलबी ' आवडावयास ' मी शिकलों.

## देशावरून कोंकणांत १२

वडिलांची कारवारला बदली झाली, आणि आम्ही सातारा सोडलें. घरीं नरशा म्हणून अेक बैल होता, त्याला पाय-रस्त्यानें बेळगुंदीला मामांचे घरीं पाठविला. महादूला सोडून देणें भाग होतें. बिचाऱ्यानें रडून रडून डोळे सुजवून घेतले. मधुरेला निरोप देतांना आअीनें तिला स्वतःचे चांगले धड असलेलें पग जुनें लुगडें दिले. तिनें आम्हांला अनेक आशीर्वाद दिले. घरातील बऱ्याचशा सामानाची विल्हेवाट लावली आणि आम्ही प्रथम शाहपूरला गेलों तेथें कांहीं दिवस राहून आम्ही वेस्टर्न अिंडिया पेनिन्शुलर रेल्वेमध्यें बसून मुरगावला गेलों. वाटेत गुंजीच्या स्टेशनवर कारजीं अुडत होतीं ती पाहण्याची आम्हांला मोठी मौज वाटली. लोंढ्याला गाडी बदलून डब्ल्यू. आय. पी. रेल्वेच्या डब्यांत आम्ही बसलों.

कॅसल रॉक स्टेशनवर कस्टमच्या लोकांनीं आम्हां सर्वांची झडती घेतली. आमचे जवळ जकात घेण्याजोगे काय असणार ? पण प्रवासांत मुलांना अुपयोगी पडावेत म्हणून डबे भरभरून लहान मोठे लाडू घेतले होते. कस्टमच्या शिपायाच्या तोंडाला पाणी सुटलें. त्यानें निःसंकोचपणें मागणी केली, "हे तुरले लाडू आमका खावचाक दिया." मला वाटलें, आमचे लाडू आतां येथेंच संपणार ! आअीचें मन विरघळलें. "घे, बाबा ! त्यांत काय मोठें ?" असें आअी म्हणाली पण वडील मध्यें पडले. ते म्हणाले, "दुसऱ्या कोणालाहि द्या. या शिपायाला देणें म्हणजे लांच देणें आहे."

शिपाअी म्हणाला, "आम्ही काय कोणाला सांगायला जातों ? तुमचेकडे जर जकातीचा माल सांपडला असता आणि आम्ही तो जाअूं दिला असता तर आम्ही लांच घेतली असें झालें असतें."

वडिलांचे कांहींहि न अैकतां आअीनें त्या तिघांना अेकेक मोठा पोह्याचा लाडू दिला. तुपांत तळलेले आणि साखरेच्या पाकांत घोळलेले लाडू बिचाऱ्याने पूर्वी कधीं खाल्ले नसतील. तिघांनीहि लाडूचे तुकडे तोंडांत कोंबून आपल्या गालाचे लाडू बनविले. आअी म्हणाली, "घरच्या पट्टेवाल्यांना नव्हतें का खायला देत ? माझ्या मुलासारखे हे ! त्यांना खायला देण्यांत लाज कसली आली आहे ? माझ्याकडे कुणीं मागितलें आणि मी नाहीं म्हटलें, असे आजपर्यंत कधीं झालें नाहीं. आजच कुठली आहे तुमची लांच नी बीच !"

कॅसल रॉकपासून तीनअी घाटापर्यंत घाटाची शोभा डोळे भरभरून पाहिली. बघण्याचा आनन्द अधिक होता कीं अेकमेकाला बोलून दाखविण्याचा, हें सांगणें कठीण. पण आम्हीं अुजव्या खिडकीकडून डाव्या खिडकीकडे आणि डावीकडून अुजवीकडे, असे नाचून डब्यांतील लोकांना अगदीं नकोसे केलें.

पुढें आला दूधसागर. तो तर आमचेहून मोठमोठ्या अुड्या मारी. आम्ही यापूर्वी धबधबा पाहिला नव्हता. अितकें दूध वाहात चाललेलें पाहून खूपच मौज वाटली आणि आमची आगगाडीहि मोठी रसिक ! अगदीं धबधब्यासमोरच्या पुलावर ती अुभी राहिली आणि धबधब्याचे थंडगार तुषार खिडकीवाटे आमच्या डब्यांत येअून आम्हांला गुदगुल्या करूं लागले. त्या दिवशीं आम्हीं बाकीचा दिवस धबधब्याच्याच गोष्टी केल्या.

आम्ही मुरगांवला पोहोचलों. हल्ली मुरगांवाला लोक मार्मागोवा म्हणतात. आम्हीं स्टेशनवर अुतरलों. पुष्कळसे आगगाडीचे रूळ ओलांडून अेका खाणावळींत गेलो. तेथें जेवलों आणि मी जवळपास पडलेल्या शिंपा घेअून खेळूं लागलों. अितक्यांत केशू धांवत धांवत आला. त्याचे ते विस्फारलेले डोळे आणि जीव घेअून धांवत असावा अशी त्याची ती गति पाहून मला वाटलें अेकादा बैल त्याच्या मागें लागला असावा.

तो ओरडून म्हणाला, 'दत्तू, दत्तू, लवकर ये ! लवकर ये !! पहा तिथें किती किती पाणी आहे. अरे चल. टाक त्या शिंपा तिकडेच. समुद्र आहे समुद्र ! चल तुला दाखवितों.' लहानपणीं अेकाच्या अुत्साहाचे वारे दुसऱ्याला लागायला कारण

समजावें लागतें असें नाहीं. मलाहि केशू सारखेच अवसान चढलें आणि आम्ही दोघे धावूं लागलों. गोंदूनें दुरून आम्हांला धांवतांना पाहिले. त्यानेंहि धूम ठोकली ! आणि आम्ही तीन वेडेपीर अेकसारखे धांवूं लागलों.

आणि समोर काय दृष्टीस पडलें ? जन्मांत कधीं न पाहिले अितकें पाणी समोर दूरवर नाचत आहे. मी अेकदम अुद्‌गारलों, "अबबबबऽ ! कितीतरी हें पाणी !" मी दोन्ही हात शक्य तितके पसरले–छातीला ताण पडेल अितके पसरले. केशू आणि गोंदू यांनींहि हात पसरले. वडिलांनीं आम्हांला तशा स्थितीत पाहिलें असतें तर त्यांनी तसविरीचे यंत्र आणून आमची तसबीर काढली असती. "कितीतरी हें पाणी ! अितकें पाणी आलें कोठून ? आणि अुन्हामध्ये कसे चकाकत आहे !" डोळाभर पाहिलें तरी तृप्ती होअीना. आतां या पाण्याचे करावें तरी काय ? अगदीं आकाश टेकले आहे तिथपर्यंत पाणीच पाणी. आणि गप्पहि बसत नाहीं. आम्ही नाचूं लागलों आणि मोठमोठ्यानें ओरडूं लागलों. 'समुद्र ! समुद्र !! समुद्र !!!' आणि प्रत्येक वेळां आम्ही समुद्रांतील 'मुद्र' शक्य तितकें फुगवून म्हणत असूं. समुद्राची विशालता, लाटांचा खेळ आणि असले दृश्य प्रथमच पाहिल्याचा आमचा आनंदातिरेक व्यक्त करण्याला आमचेजवळ दुसरें साधनच नव्हतें. लाट अुठून, फुगून फुटावी त्याप्रमाणें आम्ही समुद्र समुद्र म्हणत तालांत नाचूं लागलो. पण आम्ही लाटा नसल्यामुळें शेवटी थकलों आणि आसपास पाहूं लागलो तेव्हां अेका बाजूला खोलीखोली अेवढ्या मोठ्या विटा रचलेल्या आम्ही पाहिल्या. कांहीं तिरप्या ठेवल्या होत्या आणि कांहीं सपाट. त्या वेळीं मला अुपमा सुचली. दुकानांतील साबणाच्या वड्यांची आणि आगकाडयाच्या पेट्यांची. या विटा पसरून मुरगांवचा धक्का तयार केला होता. महादेवाच्या पोळानें धिंगाणा घालावा त्याप्रमाणें या लाटा येअून येअून धक्क्याशीं टक्कर देत होत्या.

आम्ही परतलों आणि सर्वांना समुद्र कसा दिसतो त्याविषयीं सांगूं लागलों. समुद्रापुढें बिचारा दूधसागर मागेंच पडला.

सूर्य समुद्रांत मावळला. सर्वत्र अंधार पसरला. आम्ही जेवून खावून धक्क्याला लागलेल्या आगबोटींत जाअून बसलों. लोखंडी तारांचें जें कटवंजन ( कऽडा ) असतें त्याला लागून असलेल्या बाकावर गोंदू आणि मी दोघे जाअून बसलों आणि अुंटासारखी मान असलेल्या याऱ्या मोठाली पोतीं दोरखंडांत बांधून कशीं अुचलतात आणि ठेवून देतात हें पाहूं लागलों. आमच्या समोरील यारीनें अेका मोठ्या ढिगांतून पोतीं काढून काढून आमच्या आगबोटीचें पोट भरलें. यंत्रें घरघर करीत आणि

जहाजांतील खलाशी 'आबेस, आबेस, आऱ्या, आऱ्या' चा मंत्र बोलत. आबेस आबेस म्हणतांच सांखळी घट्ट होअी आणि आऱ्या आऱ्या म्हटले की ती सैल होअी.

आम्ही गंमत पहात होतों अितक्यांत आमच्या मागे जणूं काय अगदीं कानाला लागून 'भों ओंऽऽऽ' असा आवाज झाला. आम्ही दोघांनीं घाबरून बाकावरून टुणदिशीं अुडी मारली आणि वेडयासारखे चारी बाजूंस पाहूं लागलों कानठाळ्या, अगदीं बसून गेल्या होत्या. अेवढा मोठा आवाज अितक्याजवळचा सहन तरी कसा करावा ? कुठें आगगाडीचे दुरून अेकूं येणारे 'ऊऽऽऽ' आणि कुठे हे म्हशीप्रमाणे 'भों ओऽऽऽ' ? शेवटीं आवाज थाबला. लाकडी पूल मागे खेचला गेला. येण्या-जाण्याच्या रस्त्यावरील तारेचे कटवंजन पुनः बसविण्यांत आले आणि 'घस घस' करीत आमच्या आगबोटीने किनारा सोडला. बघतां बघतां अंतर वाढले. कुणी हातरुमाल हलवून तर कोणीं नुसते हात हालवून अेकमेकांना निरोप दिला. अशा वेळीं कांहीं लोकाचें कांहीतरी विसरलेले असतेंच. मग तें ओरडून ओरडून अेकमेकांला सांगतात आणि समोरचा मनुष्य न समजले तरी आश्वासनासाठी 'हो हो' म्हणत असतो.

ही सर्व मजा पाहिल्यानंतर आम्ही मागे वळलों. आगबोटीत सर्वत्र विजेचे दिवे होते. आगगाडींतील दिवे निराळे. तेथे खोबरेल आणि रॉकेल मिसळलेले दिवे लटकत्या हंडींत ठेवलेले असावयाचे. येथे भितींतून लहान लहान कांचेच्या गोळ्यांत विजेच्या तारा लाल तापून मंद प्रकाश देत असत.

आजचा दिवस म्हणजे निरनिराळ्या प्रकारच्या नवीन नवीन अुत्कट अनुभवाची मसालेदार खिचडी. डोळे, कान आणि मन अनुभव घेअून घेअून थकून गेले होते. त्यामुळें झोंप केव्हां आणि कशी आली हे मुळीच कळले नाहीं. फक्त आगबोटीचा पाळणा गोडपणे हालत होता अेवढीच गोष्ट झोपेंतून स्वप्नांत शिरली होती.

आम्ही कारवारला जाऊन जुने झालों होतो. समुद्राच्या नवलाईचे कौतुक बरेचसें ओसरलें होतें. लहानमोठ्या घाटदार सुरूच्या झाडांतून सुसकारणारा वारा आतां ओळखीचा झाला होता. मी मराठी शाळेंत शिकावयास जाऊं लागलो. दुसऱ्या अियर्त्तेत रामभाऊ गोडबोले म्हणून अेक मुलगा आमचेबरोबर शिकत असे. अेके दिवशी त्यानें मला विचारले, 'कायरे, कालेलकर, तुझेजवळ स्वतःचे कांही पैसे आहेत की नाहींत ?" मी मुग्धपणे म्हटले, "नाही. बाबा, मुलांजवळ पैसे कुठून येणार ? अेके दिवशीं लिमयांच्या घरी गेलो असतां तेथे मला मिठाअीसाठी म्हणून आठ आणे दिले होते. मी ते तावडतोब घरी आअीजवळ देऊन टाकले."

रामभाऊ म्हणाला, "म्हणून काय झाले ? ते पैसे तर तुझेच आहेत ना ? आअी-कडून ते मागून घे. आपण बाजारातून कांहीतरी चांगले चांगले खावयाचे घेऊं—" आश्चर्यचकित होऊन मी म्हणालो, "आपण काय कुरवाडी (शूद्र) आहोत बाजारची वस्तु घेऊन खायला ?" रामभाऊ चिडून म्हणाला, 'तुला कांहीच समजले नाही. पैसे घेऊन तर ये ! नन्तर त्या पैशांचे काय करावयाचे तें मी तुला शिकवीन. तुझे पैसे तुला मिळत नाहींत याचा अर्थ काय ?"

मला कांहीं विकत घेऊन खाण्याची अिच्छा तर मुळींच नव्हती. पण घरून मला

पैसे मिळावयचे नाहींत असें सोबत्याजवळ कबूल कसें करावे ! मी म्हणालो, "हो ! घेऊन येऊीन पैसे !" रामभाऊ अनुभवी ! त्यानें मला जातां जातां सूचना देऊन ठेवली. "आईनें जर पैसे देत नाही म्हटले तर रडून रडून आकांत कर."

अितक्या शिकवणीनें सुसज्ज होऊन मी घरीं पोहोंचलों. दुसरे दिवशीं सकाळीं मी आईजवळ पैसे मागावयास गेलों. माझे पैसे मला कां मिळूं नयेत या विचाराचें भूत डोक्यांत शिरले होतेंच; पण आठ आणे मागण्याची हिंमत कशी होणार ? मी फक्त अेक रुक्का मागितला. रुक्का म्हणजे अर्धा पैसा, दीड पै ! हें नाणें आजकाल पहावयास मिळत नाहीं आई म्हणाली "बाळ, मीच माझेजवळ पैसे ठेवीत नाहीं तर तुला कोठून देऊं ? त्यांचेकडे जाऊन मागून घे हवेतर."

मी तडक वडिलांचेकडे गेलो आणि म्हटले, "मला अेक रुक्का द्या !" कधींच पैशाचें नांव न घेणारा दत्तू आज रुक्का कां मागतो, याचें त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी मला विचारलें, "तुला रुक्का कशासाठीं पाहिजे आहे ?"

माझ्यावर मोठे संकट येऊन पडले. सोबत्याचें नांव तर देतां कामा नये. रामभाऊनें मला तसें शिकवूनच ठेवलें होतें कीं, माझें नांव सांगूं नकोस. बाजारांतील वस्तु घेऊन खावयाची आहे असें तरी कसे सांगावें ? बाजारी वस्तु खाल्ली तर अबूच जावयाची आणि तशी कांही वस्तु घेण्याचा माझा विचारहि नव्हता. तेव्हां मी हट्ट धरला कीं "मला अेक रुक्का द्या." कशाला तें कांहीं सांगितलें नाहीं.

वडीलहि हट्टास पेटले. त्यांनीं साफ सांगितलें कीं, "रुक्का कशाला हवा हें जर सांगितलें नाहींस तर रुक्काच नव्हे तर पैदेखील मजकडून मिळावयाची नाहीं."

मी तर अिरेसच पेटलों होतों. शिकविल्याप्रमाणें मी रडण्यास प्रारंभ केला "मला रुक्का...द्या...म...ला रु...क्का द्या !" सकाळपासून अकरा वाजेपर्यंत माझें हें नमन चाललें. थोडया दिवसांपूर्वी धाकट्या वहिनीनें आईला विचारलें होतें कीं, "वडिलांना पगार किती मिळतो ?" आई म्हणाली, 'दोनशें.' दहा वर्षांच्या वहिनीला दोनशें रुपये किती होतात हें पाहाण्याची अिच्छा अुत्पन्न झाली तेव्हां आईनें सुनबाअींचें कोड पुरविण्यासाठीं वडिलांना मुद्दाम सांगितलें कीं, "या महिन्याला नोटा आणूं नका; रोख रुपयेच आणावेत." रुपये आले तेव्हां अेक चांदीचे ताटांत ते पसरून आईनें तें ताट धाकट्या वहिनीच्या हातीं दिलें.

तो प्रसंग आठवून मी मनांत म्हणालों, परक्या घरून आलेल्या वहिनीसाठीं यांनीं अितकें केलें आणि मला मात्र अेक रुक्काहि देत नाहींत !

वडील कचेरीला गेले आणि मी रडतां रडतां झोपीं गेलों. पुढे संध्याकाळ झाली. पांच वाजतां वडील घरीं आले. त्यांना पाहातांच मी पुनः टुमणें सुरू केलें, "मला रुक्का द्याऽऽऽ!" "मला रु...क्का द्याऽऽऽ!" हें रुक्कागीत रात्रीं दहा वाजेपर्यंत चाललें. शेवटी माझी अिच्छा नसतांना आणि मला कळूंहि न देतां निद्रादेवीनें मला घेरलें आणि हें प्रकरण संपलें.

दुसरे दिवशीं शाळेला जाण्यास मन होअीना. रामभाअूने विचारल्यास त्याला अुत्तर काय द्यावे हा अेकच विचार मनांत अेकसारखा घोळत होता. माझे चालण्याजोगे असतें तर मी त्या दिवशीं शाळेलाच गेलों नसतों, पण माझी पक्की खात्री होती की, शाळेला जाण्याची जर यत्किंचितहि कां कूं केली तर पट्टेवाल्याच्या खांद्यावर बसून जावे लागणारच. असें झाले म्हणजे दुहेरी फजिती. कचेरीतील शिपायांमध्यें आणि शाळेच्या अलम दुनियेत ! तेव्हां मी मुकाट्यानें शाळेला गेलों आणि घडलेली सगळी हकीगत रामभाअूला सांगून त्याचा तिरस्कार संपादन केला. नअू वाजतां आम्हांला अेकीची रजा मिळत असे. त्या वेळीं विश्वनाथ वकील नांवाचा अेक मुलगा माझेजवळ आला. त्याचा चेहरा अश्रून डोळ्यापुढे आहे. शेंडीच्या लांब लांब केसामधून अेकादा केस तोंडात घालण्याची त्याला संवय होती. विश्वनाथ घरंदाज आणि देखणा होता. त्याच्या कपाळावर घामाचे स्वच्छ बिन्दु चमकत होते. त्यानें मला अेका बाजूस नेअन म्हटले, "कालपासून तुझी आणि रामभाअूची जी गोष्ट चालली आहे ती मी अैकत आहे. रामभाअू वाअीट मुलगा आहे. तो आज तुला घरून पैसे मागून आणावयास सांगेल, कधी तुला आपल्या घरचे आणून खावयास देअील. पुढें तो तुला चोरी करावयास सांगेल. तूं त्याच्या तावडीत गेलास म्हणजे तो तुला आणखी भलतीं सलती कामे करावयास सांगेल. तूं रामभाअूची संगत धरूं नकोस."

विश्वनाथाच्या बोलण्याचा माझ्या मनावर चांगला परिणाम झाला. मी रामभाअूची संगत सोडली. आज त्या प्रसंगाचा विचार करतां वाटतें कीं, मराठी तिसरी अियत्ता शिकणाऱ्या विश्वनाथाच्या अुपदेशाच्या मुळाशीं जगाचा अनुभव कुठून असणार? कुठे तरी वाचलेलें किंवा अकलेलें त्यानें माझेपुढे मांडलें असले पाहिजे! आपण केलेल्या अुपदेशाचा पुरा अर्थहि त्याच्या ध्यानांत आला नसेल. पण त्याची कळकळ खरीखुरी होती. त्यामुळेंच त्याची छाप मजवर पडली आणि विश्वनाथ आजवर नजरेसमोर ताजा राहिला आहे. आज तो बिचारा कोठें असेल कोण जाणे. मी दोन दिवस त्याच्याशीं दोस्ती केली पण तो माझ्यापेक्षां वयानें दोन वर्षांनी

मोठा होता. लहानपणी दोन वर्षांचे अंतर जाणवल्यावांचून रहात नाहीं. आमची दोस्ती वाढूं शकली नाहीं ती नाहींच.

बा विश्वनाथ, तूं हल्लीं कोठे आहेस, काय करतोस, हे मला माहीत नाहीं. पण तूं माझ्या जीवनावर अेकाच क्षणांत जो परिणाम केलास त्याबद्दल तुला मनापासून वंदनच केलें पाहिजे.

## सभा १४

कारवारचीच गोष्ट आहे. अेके दिवशी वडील तिसऱ्या प्रहरीं म्हणाले,"आज संध्याकाळीं मला सभेला जायचे आहे." सभा हा शब्दच मला नवा होता. मी विचारले, "सभा म्हणजे काय?" वडील म्हणाले, "मोठे मोठे लोक अेके ठिकाणीं जमतात आणि भाषणें करतात आणि सर्व लोक ती भाषणें अेकतात. त्याला सभा म्हणतात!"

"भाषणें म्हणजे काय?"

"भाषण म्हणजे सभेंत अेकादा मनुष्य अुभा राहून मनांत येअील तें बोलतो आणि बाकीचे सर्व लोक तें बसून अेकतात."

"मनांत येअील तें बोलतात?"

"अर्थात्! मनांत असेल तेंच मनुष्य बोलणार ना? जे सुचतें तेंच मनुष्य बोलतो."

"तर माझ्या मनात जे काहीं येअील तें मला सभेंत बोलतां येअील? मी वाटेल तें बोललो तरी तें भाषण होतें का?"

"अर्थात्! पण तूं लहान आहेस. तुला अितक्यांत तें जुळावयाचे नाहीं."

मी म्हणालो, "मला सभा पहावयाची आहे. मला बरोबर घेअून जाल?"

संध्याकाळ व्हायच्या आली आणि आम्ही सभेला गेलों. पाहातों तों सभा आमच्या शाळेंतच होती. मात्र बसण्यासाठीं आमच्या शाळेंतील बसकरांच्या जागी खुर्च्या आणि बाके ओळीनें लावलीं होती. वडिलांना पाहातांच सर्व मंडळींनीं 'याहो, याहो' म्हणून त्यांचे स्वागत केलें आणि ते पुढील खुर्चीवर जाऊन बसले. मला वडिलांनीं खूण करून दूरच्या बाकावर बसण्यास सुचविलें. लहानपणची आमची शाळेंतील समजूत असे कीं, अिंग्रजी शिकत असतील त्यांनींच बाकावर बसावयाचे. गांवठी शिक्षण बसकरांवरच व्हावयाचें. आज मला आमच्या शाळेंत बाकावर बसण्याची संधी मिळाली होती. बाकावर बसतांना हक्क नसतांना मोठा मान मिळाल्यासारखे मनाला वाटले. मी खूप खूष झालों. आमच्या शाळेंत मी बाकावर बसलों आहे हे कुणाकुणाच्या नजरेस पडत आहे हें पाहाण्यासाठीं मी चौफेर नजर फिरविली.

अितक्यांत सभा सुरू झाली. मला मोठी गम्मत वाटली. अेक जण खुर्चीवरून अुठून अुभा राही. थोडेसे बोले आणि पुनः खालीं बसे. त्याचे बोलणे चालू असतांना दुसरे कुणीच बोलत नसे. आपापल्या जागीं देवासारखे बसून राहात. बोलणारा बसला कीं ताबडतोब सर्व टाळ्या पिटीत. मला वाटले, "या मोठ्या लोकांना झालें आहे तरी काय ? असें काय करतात ? अेक जण बोल बोल बोलतो आणि बाकीचे लोक त्यांत मधून मधून कांहींच भर घालीत नाहीत तर अुलट टाळ्या पिटतात ! हे टाळ्या कशासाठी वाजवितात ? सर्वांचीच फजिती होते कीं काय ?"

जमलेल्या लोकांत आमच्या शाळेचे हेडमास्तर कसे अगदीं अुंदरासारखे अेका कोपऱ्यांत शिरले होते. आमची शाळा गाजविणारे सम्राट आज अगदीं चोरासारखे असे गुपचूप कां अुभे आहेत ? त्या पट्टेवाल्यापेक्षा देखील ते अधिक लाजाळू दिसतात.

वक्त्यांमध्ये माझ्या ओळखीचे म्हणजे फक्त लक्ष्मणराव शिरगांवकर हे होते. त्यांनीं तर आकाशाकडे बघूनच बोलण्यास सुरवात केली. ते काय बोलत होते तें त्या वेळींहि मी समजूं शकलों नव्हतो. तेव्हां आज त्याची आठवण कुठून असणार ?

थोडा वेळ गेला आणि मी कंटाळलों. अुठून अिकडे तिकडे येरझाऱ्या घालाव्या असें वाटलें. थोडें बागडतां आलें असतें तर कंटाळा गेला असता. पण दुसरे कोणींच अुठत नव्हतें. आपणच मध्यें कसें अुठावें, या संकोचानें मी अस्वस्थपणें

बसून राहिलों. अेकाच जागी अेकसारखें बसून राहाण्याचा मोठ्या माणसांचा धीर पाहून मला त्यांचें कौतुक वाटले.

शेवटीं अगदीं अंधार पडण्याची वेळ झाली. सभेसाठीं दिव्याची व्यवस्था नव्हती. माझ्याप्रमाणेंच कंटाळलेले पण व्यवहारकुशल असें कोणसे होतें त्यानें मध्येंच अुठून दिव्याची मागणी केली. झाले. सर्वांच्या ध्यानांत आलें कीं, आपण बराच वेळ भाषणें करीत आहोंत. चढलेला रंग अुतरला ! सर्वांना घरची आठवण झाली. लोक अुठले. थोडे थोडें बोलून सर्व बाहेर आले. मला हुश्श वाटले. "सुटलों अेकदांचा या सभेच्या कचाटींतून ! आतां पुन्हां सभेस म्हणून कधीं जावयाचें नाहीं."

माझ्या आयुष्यांतील ही पहिली सभा होती.

## दोन टाअिपांचा चोर १५

मनुष्य लहान असो किंवा थोर असो, ज्याप्रमाणे स्वादिष्ट पदार्थांची किंवा सुन्दर वस्तूंची त्याला गोडी असते त्याचप्रमाणे तो यान्त्रिक चमत्कृतीचा आणि रचना-कौशल्याचा पुजारी असतो. रवीच्या मदतीनें दह्यांतून लोणी कसें निघतें, गाडीच्या चाकावर लोखंडी धाव कशी बसविण्यांत येते, चरख्यांतून सुताची धार कशी काढतात, लोहाराचा भाता श्वासोच्छ्वास कसा घेतो, खरादीच्या किंवा कुंभाराच्या चाकावरून सुन्दर सुन्दर गोल वाटोळ्या वस्तु कशा अुठतात वगैरे पाहाण्यांत प्रत्येक मुलालाच काय पण प्रत्येक जिवंत व्यक्तीला अवीट आनन्द वाटत असतो.

माझ्या वडील बंधूजवळ *R. B. KALELKAR* नांवाचा अेक रबरी शिक्का होता. त्याची खुबी अशी होती कीं, रबरी अक्षरांवर अेक शाअीची गादी असलेलें झांकण कायमचें बसलेलें असावयाचें. वरून मूठ दाबली म्हणजे गादीचें झांकण बाजूला सरावयाचें आणि ताजीं ओलीं अक्षरे कागदावर आपली मुद्रा अंकित करावयाचीं. मूठ ढिली केली कीं अक्षरें लगेच मागे सरावयाचीं आणि गादीचें झांकण त्यांचेवर येअून बसावयाचें. तो शिक्का पाहून मला वाटूं लागलें कीं, आपल्या नांवाचा असा शिक्का असेल तर कशी बहार होअील ! तेव्हां मी मराठी दुसरींत होतों. त्याच वेळीं केशूनें पुण्याच्या शिवाजी छापखान्यांतून कालेलकर या अक्षरांचे

टाअीप त्या छापखान्यांत काम करणाऱ्या अेका खिळाऱ्याकडून मिळवून घेतले होते. अक्षरे अेका दोऱ्यानें करकचून बांधून तीं तो आपल्या प्रत्येक पुस्तकावर अुमटवीत असे. अुलटीं अक्षरें पुस्तकावर अुमटवितांच सुलटे नांव छापलें जात असे. हें पाहाण्याची मला मोठी गंमत वाटे. तपास करतां समजलें कीं असे छापखान्यांतील खिळे बाजारांत मिळत नसतात. तेव्हां वडिलांजवळ किंवा आअीजवळ हट्ट धरून खिळे मिळविण्याची सोयच नव्हती. त्यामुळें आपल्या नावाचे खिळे मिळविण्याची अिच्छा मनांतल्या मनांत जिरून गेली.

त्याच वर्षी मी कारवारला गेलो. ही माझी दुसरी खेप असावी. शाळेच्या वाटेवर अेक 'मोहमेडन प्रिन्टिंग प्रेस' लागत असे. आमच्या शाळेंतील अेक मुलगा त्या छापखान्यांत काम करीत होता. मला वाटलें की याचेकडून कधी तरी टाअिप मिळवितां येतील. अेके दिवशीं बाजारांतून कांहीसें विकत घेअून मी परत येत होतों. वाटेंत छापखान्यावर नजर पडली. मी आंत गेलो तो केवळ यंत्र कसें चालतें हें पाहाण्यासाठींच. पण तेथे आमचा तो शाळेंतील मुलगा काम करतांना दिसला. मी त्याला म्हणालों, "माझ्या नांवाचे टाअिप मला दे ना गड्या!" त्यानें मला विचारलें. "मला काय देशील?"

माझेजवळ देण्याजोगे होतेंच काय कीं जे मी देअूं करावे! मी म्हणालो, "दोस्त म्हणून तसेच दे ना!" त्याने ताबडतोब गंभीर चेहरा करून म्हटले, "आपण मित्र खरे; पण टाअिप मला देतां यावयाचे नाहींत छापखान्यांत नोकरी धरतांना आम्हांला शपथ घ्यावी लागते कीं छापखान्यांतून अेकहि टाअिप बाहेर जावयाचा नाहीं." मला त्याचेशीं हुज्जत घालण्याची अिच्छा झाली नाहीं पण मी मनांत म्हणालों कीं पैसे दिले असते तर स्वारी टाअिप द्यायला अेका पायावर तयार झाली असती. त्या वेळीं त्याची शपथ कुठे गेली असती?

मी त्याचा मूड अुगविण्याचें ठरविलें. तो जरासा कुठे अिकडे तिकडे गेला अितक्यांत त्याच्या समोरील दोन टाअिप मी हळूच अुचलले आणि तेथून पाय काढला. मी पाहिले होतें कीं टाअिप कानडी आहेत. माझ्या कामाचे नाहींत. पण चिडीस पेटलेला माणूस विशेष विचार कुठें करीत असतो? आणि मी तर चिडीस पेटलेलें मूल होतों. रस्त्यांत मी विचार करूं लागलों कीं टाअिप सांपडले नाहींत म्हणजे कशी फजिती होअील चोराची! मी फक्त दोनच टाअिप घेतले होते पण तेवढ्यानेंच मला संतोष वाटत होता, कीं लुच्चाची चांगली खोड मोडली.

असा विचार करीत मी थोडा पुढे गेलों अितक्यांत धांवत येऊन त्याने मला गांठलें. हातात टाअिप तर होतेच. मला दरडावून तो म्हणाला, "चल आतां आमच्या मालकाकडे." मला रडे कोसळले. मी म्हणालों, "घे तुझे टाअिप परत आणि मला सोड. मित्रासाठी अेवढे करणार नाहींस का?" त्यानें मला अुतर देखील दिलें नाहीं. पण माझे मनगट धरून तो मला आपल्या मालकाच्या दुकानापर्यंत ओढत घेऊन गेला. त्याच दुकानांतून थोड्या वेळापूर्वी मी घरीं हव्या असलेल्या वस्तू विकत घेऊन आलों होतों. त्या वेळी मी साव होतों. या वेळी त्याच दुकानांत चोर होऊन जाण्याचे माझ्या नशिबी होतें.

अंमलदाराच्या मुलाचे जीवन दुहेरी असतें. वडिलांच्या बरोबर जेव्हां तो फिरत असतो तेव्हां त्याचे सर्वत्र आदरपूर्वक स्वागत होतें, बसायला खुर्ची मिळते, 'काय कसें आहे' म्हणून मोठी मोठी मंडळी देखील त्याची विचारपूस करतात. पण तो मुलगा जेव्हां शाळेंत जातो किंवा सोबत्याबरोबर अेकटा फिरतो तेव्हां तो सामान्य माणूस बनतो. मला स्वतःला वडिलाच्या बरोबर फिरत असतां मिळणाऱ्या आदराची मुळींच गोडी नव्हती. त्या आदरातिथ्यांत कृत्रिमता असे. आणि त्यामुळे मोठ्या बंधनांत रहावें लागे. फिरावयास निघालों असता पट्टेवाला बरोबर असलेला मला मुळींच रुचत नसे. पण जर तो पट्टेवाला खरोखर किंवा कृत्रिमपणे बालक बनून माझ्या गोष्टी मन लावून अैकावयास तयार असला तर सोबती म्हणून त्याला पसंत करण्याची माझी तयारी असे. या दुकानदाराच्या अिथें मी प्रतिष्ठितपणे पुष्कळदा गेलों होतों. मनासारखीच छत्री मिळेनोंपर्यंत कितीतरी छत्र्या मी त्याला परत केल्या होत्या आणि आज त्याच दुकानीं दोन टाअिपाचा चोर म्हणून मला जावे लागत होतें. मी रडत रडतच दुकानांत गेलों. गेलों कसचा—त्या खिळाऱ्यानें मला खेंचतच नेलें! दुकानांत मालक नव्हता. मालकाचा चौदा पंधरा वर्षांचा मुलगा तेथें अुभा होता. त्याच्या हाती टाइप देऊन खिळाऱ्याने आपली कैफियत रुजू केली. "मी याचे खिळे घेतलेच नव्हते." असे म्हणण्याची बुद्धि मला सुचण्याजोगी नव्हतीच. कारण मला चोरी करण्याची सवय नव्हती. हा पहिलाच प्रसंग. मी रडत रडत म्हटले, 'पुनः असें करणार नाहीं.' दुकानदाराच्या मुलाला आमचें कांहीं अैकून घेण्याची दरकारच नव्हती; त्याला ठाअूक होतें कीं हा अंमलदाराचा मुलगा आहे आणि प्रश्न फक्त दोन टाअिपाचा आहे. तेव्हां बेपर्वाअीच्या स्वरानें तो म्हणाला, "तुम्हांला हे टाअिप घ्यावयास हरकत नाहीं. यांत काय मोठासा प्रश्न आहे?" "मला टाअिप

नको'' असें मी म्हटलें. तो पुन्हां म्हणाला, " मी खरोखर सांगत आहें. तुम्हांला हे टाअिप घेण्यास कांहीच हरकत नाहीं. " मी म्हणालों, " मला हे टाअिप मुळांतच नको होते. "

त्याला हे सर्व अैकायला वेळ नव्हता. त्यानें हातातील टाअिप रस्त्यावरील धुळीत पडूं दिले आणि तो आपल्या कामाला लागला. जातां जातां त्याने त्या खिळाऱ्याकडे नामर्जीच्या नजरेने पाहिले.

सुटल्याचा आनंद मातून मी घरीं आलों. घडलेली हकीगत मी कुणालाच कळवली नाही. पण त्या दिवसापासून मला जर कोणी त्या दुकानांतून कांहीं आणण्यास सांगितले तर मी कांहीना काही कारण पुढें करून तिकडे जाण्याचें टाळीत असे. तो खिळारी जेव्हां थोडयाच दिवसांनीं अेकदाचा आमच्या शाळेंतून गेला तेव्हां मला हायसे झाले.

## भित्री हिंमत

१६

कारवारला अेकदां आम्ही अुखाशेठच्या वखारींत रहात असूं. त्या अिमारतीला लोक म्हणत असत वखार, कारण अुखाशेठ तेथील अेक प्रख्यात कच्छी व्यापारी होता. पण ही कांहीं माल भरून ठेवण्याची वखार नव्हती. होशी गृहस्थानें स्वतःसाठीं बांधलेला बंगलाच होता. बंगल्याच्या खिडक्यांना जिकडे तिकडे तांबड्या, हिरव्या, निळ्या, पिवळ्या तऱ्हेतऱ्हेच्या काचा लावलेल्या होत्या. बंगला अुखाशेठच्या वैभवाप्रमाणेंच मोडकळीस आला होता. बंगल्याचा वरचा भाग आमच्या ताब्यांत नव्हता पण अगदीं रिकामा पडला असल्यामुळें आम्ही मुले दुपारच्या वेळीं तेथें जाअून अभ्यासाला, खेळायला किंवा मनसोक्त भांडायला बसत असूं !

अेकदां आम्ही अेक गोरे पान गुबगुबीत मांजर चोरून आणलें होतें. त्याचेसाठीं अेक रंगीत अैनेमहाल तयार करावयाचा होता. केशू आणि मी दोघे वरच्या मजल्यावर गेलों आणि मागच्या बाजूच्या खिडकीतील पांच अेक रंगीबेरंगी काचा काढून आणल्या. लांबीचें लुकण जुनें झालेलें. लाकडांत बसविलेल्या चुका निघून येण्यास अगदींच आतुर. तेव्हां काचा काढतांना आम्हांला कांहींच त्रास पडला नाहीं. भरपूर भाडें भरत आहोंत, तेव्हां काचा वापरायला हरकत कोणती ? आम्ही जर ही वखार भाड्यानें घेतली नसती तर येथें अुंदीर देखील राहायला आले नसते ! दोनचार काचा

वापरल्या म्हणून काय झालें ? असा स्वतःशीं युक्तिवाद करून आम्ही पस्तावणाऱ्या मनाला गप्प केलें आणि घरांतील अेक मोठा देवदारी खोका घेअून सुताराकडे गेलों.

मारियान लुअीस फर्नांडिस हा आमचा सुतार. वडिलांनीं त्याचेकडून पुष्कळ काम करून घेतलं होतें. त्यामुळें तो आम्हां मुलांचे लाड मोठ्या आनंदाने पुरवीत असे. आम्ही त्याला मेस्त म्हणत असूं. मेस्तानें तो खोका घेअून रांधून काढला; त्याला दरवाजे खिडक्या केल्या, त्यावर आम्ही काचा बसविल्या आणि याप्रमाणें आमचा मार्जारप्रासाद तयार झाला. जुन्या कपडयांची गादी शिवून आम्ही ती त्या प्रासादांत ठेवून दिली. प्रथम प्रथम जबरदस्तीला वश होअून पण नंतर स्वखुशीने आमचें मांजर त्या प्रासादांत राहूं लागलें. निरनिराळ्या खिडक्यांतून त्या मांजराकडे पाहिलें म्हणजे तें निरनिराळ्या रंगाचे दिसे. पुष्कळ दिवस आम्हांला त्या मांजराचाच नाद लागला होता.

मांजरापायीं पुष्कळ दिवस खेळण्यांत गेले आणि अभ्यास करीत नाहीं याचा मनाला पश्चात्ताप झाला. अभ्यासाचा निश्चय केला म्हणजे विद्यार्थ्याना अेकांताची नवी जागा हवी असते. कावळ्याला ज्याप्रमाणें आपल्या घरट्यासाठीं जवळपासच्या काड्या आवडत नाहींत, दूरदूर जाअून आणलेल्या आवडतात, त्याचप्रमाणें पस्तावलेल्या विद्यार्थ्याला अभ्यासासाठी अेकादी लोकविलक्षण जागाच हवी असते. वखारीभोंवतीं मोकळी जागा पुष्कळ होती. त्यांत पुष्कळशीं आब्याचीं झाडे होती. यांपैकीं बरींचशीं झाडें पायरी जातीचीं होतीं. बंगल्याच्या जागेभोवतीं विटाचुन्याची चांगली भिंत होती. आणि समोर टांगा किंवा गाडी येअूं शकेल अितका रुन्द रस्ता ठेवून भिंतीला लागून चुनेगच्चीचे अुंच अुंच दोन खांब होते. तोरण बांधावें त्याप्रमाणें या दोन खांबांवर सहा अिंचाची चौरस लाकडी तुळी आडवी बसविली होती. या दोन खांबांमधील फाटक कधींच मोडून गेलें होतें. फक्त सहा अिंची पूलच काय तो वर होता. मी अभ्यासासाठीं हा खांब पसंत केला. हातांत पुस्तक घेअन भिंतीवरून मी खांबावर चढलों आणि मन लावून वाचण्यास सुरवात केली.

मला असा बसलेला पाहून केशूच्याने राहवेना. तो दुसऱ्या भिंतीवरून समोरच्या खांबावर चढला. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला जयविजयासारखे आम्ही दोघे बसलेले आहोंत या कल्पनेचें मला हंसूं आलें आणि मीं प्रल्हाद–आख्यानापैकीं अेक आर्या सुरू केली:—

*पूर्वी जयविजयातें सनकादिकांच्या विषाद शापाने,*
*झाले जन्म त्रय परि मुक्तिस नेलें रतीश-बापाने*

अितक्यांत मलाच अेक शाप नडला. केशू मला म्हणाला, "या लाकडाच्या पुलावरून माझेकडे चालत ये!" केशूची आज्ञा ती! तिची अवहेलना होतांच कामा नये. मनांत आले की, हुकूम सोडावयाचा अशी त्याला संवय होती आणि केशूचा हुकूम झाला की मुकाट्यानें अथवा तत्परतेनें तो मानावयाचा अशी आम्हांला संवय होती.

पण अिथें मी पाहिले कीं अेक मोठी गाडी आत सहज येअूं शकेल अितक्या रुंद रस्त्याच्या दोन्ही बाजूला हे खांब होते. म्हणजे जमिनीपासून त्याची अुंची कांहीं कमी नव्हती आणि लाकडाचा हा पूल म्हणजे सहा अिंच सुद्धां नसेल असें अेक चौरस लाकूड! यावरून चालत जातांना पाय खात्रीनें सरकावयाचा आणि अध्यर्धावर जर भोवळ आली तर पाय निसरला नाहीं तरी देखील आपण पडणार.

असा सर्व विचार करून मी केशूला म्हटलें, "हें काम कठीण आहे. आपल्या हातून कांही होणार नाहीं." (खरोखर म्हणावयास पाहिजे होतें आपल्या पायानें.) भाअूनें प्रथम मला अुत्तेजन देऊन म्हटलें, "अरे, भिअूं नकोस. तुला कांहीं हें काम कठीण नाही." लहानपणापासून जर मला कसरतीची संवय असती तर हे काम मुळींच कठीण नव्हतें. पण माझी काही हिंमत होअीना. केशूनें कडकपणें हुकूम काढला, "तें कांही चालावयाचें नाहीं. तुला आलेच पाहिजे! आतां कांहीं तूं लहान नाहींस. चांगला दहा वर्षांचा झाला आहेस. अितकी देखील हिंमत नाही? मी सांगतों तुला, आलेच पाहिजे मी देखील तितक्याच दृढतेनें अुत्तर दिले, "हे कांही होण्याजोगें नाहीं." केशूला चिडायला वेळ लागत नसे. तो म्हणाला, "ध्यानांत ठेव. तूं आलास तर बरे; नाहींतर आज तुला असा मारणार आहे कीं, गालांतून रक्तच निघावें." मीं मनांत विचार केला, मार खाणें ही कांहीं नवीन गोष्ट नाहीं. या कलेंत आपण पंडित आहोंत पण अितक्या अुंचावरून पडून डोकें फुटावे हे कांही आपणांस परवडावयाचे नाही.

अशा प्रकारे पोक्त विचार करून मी पहिल्यांदाच आज्ञेचा सादर निरादर केला. मी त्याला नम्रतेनें म्हणालों, "भाअू, हें कांहीं माझ्यानें होणार नाही. तूं वाटेल तें कर पण माझा पाय येथून अुचलतच नाहीं."

भाऊ सुद्धां माझी ही भित्री दृढता पाहून चकितच झाला. शेवटीं त्रासून तो म्हणाला, "जा रडया येथून तूं असाच राहाणार. आता मीच तुला चालून दाखवितों."

बस ! माराच्या भयानें जे काम होऊं शकलें नाहीं तें या टोमण्यानें झालें. केशूनें चालून दाखविले आणि माझ्या अगोदर पूल ओलांडला तर माझी अब्रू ती काय राहिली ? मी ताडकन् उठून उभा राहिलों आणि सरळ पुलावरून या टोकापासून त्या टोकापर्यंत चालून गेलों. समोरच्या खांबावर केशू देखील उठून उभा होता. त्यानें मला मिठी मारली. त्याच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू चमकत होते. माझी पाठ थोपटून म्हणाला, "मी तुला नव्हतों सागत कीं, हें काम तुला अशक्य नाहीं म्हणून ? तुझ्यांत किती शक्ति आहे याची तुझ्यापेक्षां मलाच जास्त ओळख आहे." त्यानंतर मी कितीतरी वेळा त्या पुलावरून या बाजूनें त्या बाजूला जाऊन आलों.

त्या दिवशीं संध्याकाळीं केशूनें मला रामायणांतील मारुतीची गोष्ट सांगितली. सीतेचा शोध करण्यासाठीं लंकेपर्यंत कोण उडून जातें असा जेव्हां प्रश्न निघाला तेव्हां कुणाचीच हिमत होईना. वानरसेना चिन्तेंत पडली. समुद्र उल्लंघन करण्याची शक्ति अेकटया मारुतींतच होती. पण देवांनीं असे ठरविलें होतें कीं तुझ्यामध्यें अशी शक्ति आहे असे जोंपर्यंत कोणी हनुमानाला सांगितलें नाही तोपर्यंत त्याच्यांत ती प्रगट होणार नाही, त्याच्यांत आत्मविश्वास उत्पन्न होणार नाहीं.

अगदीं लहानपणची गोष्ट. या वेळेला आम्ही कारवारास रामजीशेठ तेली नावाच्या अेका कच्छी व्यापाऱ्याच्या घरी भाड्यानें राहात होतो. भाद्रपदाचा महिना आला. गणपति बाप्पा मोरयांचें घरी आगमन झाले अेका प्रशस्त मेजावर अेक अुंची बनात पसरून तिचेवर अेक रंगीत पाट ठेवला होता. त्या पाटावर अेक रेशमी वस्त्र, त्याचेवर कुंकुम-चर्चित अक्षतांचा ढीग आणि त्यावर गजाननमहाराज विराजमान झाले होते.

मेजापुढील जमिनीवर अेका ताम्हणांत चुन्याहळदीचे पाणी भरून ठेवले होतें. त्या लाल पाण्यांत पडलेलें गणपतीचें प्रतिबिंब दुरून पाहाण्यांत विशेष पुण्य आहे अशी त्या वेळची समजूत होती. आजच्या भाषेंत म्हणावयाचे म्हणजे त्या तांबड्या पाण्यांतील प्रतिबिंब मूळ बिंबापेक्षां अधिक काव्यमय असतें.

गणपतीची पूजा झाली. गणपतीच्या दोन्ही बाजूला स्थापल्या गेलेल्या दोन्ही गौरीचीहि पूजा झाली. या गौरी गणपतीच्या माता. अेक गौर मातीच्या लहानशा गाडग्यावर खोलगट पणतीच्या आकाराची झांकणी अुलटी ठेवून केलेली असते. या गौरीच्या पोटांत तांदूळ, हळकुंड, सुपारी, पंचरत्न आणि अेखादा रुपया हीं ठेवावयाचीं असतात. गळ्यांत मंगळसूत्र, झांकणीवर नाक, कान, डोळे आणि डोक्यावरील

केस काळ्या रंगानें काढावयाचे असतात. या गौरीची पूजा सबंध श्रावण महिनाभर होत असते. " आलीस गौरी बस पाटावर–रुसलिस गौरी चल घाटावर " हें कोंकणांतली म्हण या दिवसांत आबालवृद्धाच्या तोंडी ऐकूं येअी. आपल्या लोकांच्य भक्तीला विनोदाचें आणि खेळीमेळीचें वावडें नसतें.

दुसरी गौर म्हणजे वनश्रीची शोभा अेकवीस प्रकारच्या झाडांची पत्री गोळ करून तिची लहानशी पेंडी बनवावयाची आणि दोन बाजूला दोन पाळणे लॉबत आहेत आणि मध्यें गौर बसली आहे अशा प्रकारच्या अेका गौरीच्या चित्राच कागद त्या पेंडीभोंवती बांधून ही गौर तयार केलेली असते. कागद बांधण्यासाठ मंगळसूत्राचाच अुपयोग करण्यांत येतो.

अशा गणपतीची आणि त्याच्या दोन्ही मातांची विधियुक्त पूजा झाली. आम्ही टाळ्या वाजवीत वाजवीत आरती संपविली आणि गणपतीच्या प्रसादाचे मोदक भक्षण करून खेळावयास गेलों.

घरीं कुणी सामान्य पाहुणे आले तरी आम्हां मुलांना कितीतरी आनंद होत असे; मग सणाच्या दिवशीं गणपतीसारखा देवबाप्पा घरी आल्यानन्तर काय विचारावे ! आमच्या स्वागनसमितीने तीन दिवस लागोपाठ कसून मेहनत करून गणपतीच्या आसपास आरास केली होती. संध्याकाळीं चन्द्र-दर्शन घडतां कामा नये म्हणून आम्ही आमचा खेळ लौकर आटपून घरीं आलों.

त्या दिवशी दुपारीं शेजारच्या कुणीसें मला माझ्या करंगळी अेवढी जाड अुदबत्ती दिली होती. आमच्या घरी अगदीं बारीक बारीक अगरबत्त्याच आणीत. मला वाटले की जाड अगरबत्ती अुंची असली पाहिजे. हिचा धूरहि विशेष असला पाहिजे. त्या अगरबत्तीच्या आनन्दांत मी घरांत शिरलों. तेथे गजाननमहाराज दिसले. मनात भक्तीला अूत आला. ' अितकी चांगली अुच अगरबत्ती गणपतीलाच अर्पण केली पाहिजे ' अितक्यात मनांत दुसरा विचार आला की, संध्याकाळीं फटाकडे अुडवितांना जाड अुदबत्ती कितीतरी अुपयोगी पडेल. रात्रीच्या फटाकड्या आणि समोर विराजमान असलेला मोरया यांच्यामध्ये बराच वेळ स्वयंवर चालले शेवटीं व्यवहारबुद्धीनें तडजोड सुचविली. अुदबत्तीचे दोन तुकडे करावेत अेक वहावा गणपतीला आणि दुसरा ठेवावा फटाक्यांसाठीं, असें ठरविले. अेवढी लांब सबंध अगरबत्ती तोडण्याचें मन होअीना. पण शेवटीं अर्ध्यावर धरून ती वांकविली आणि घडी केल्याप्रमाणें तिचे दोन तुकडे केले. पण आंतली बांबूची काडी काय

अशी सहज तुटते ? तोडण्याचें जवळ दुसरे कांहीं साधन नसलें तरी ओश्वरानें नख आणि दात प्रत्येकाला दिलेच आहेत. त्या दोहोंचा अुपयोग केला आणि दोन भागांपैकीं अेक भाग पेटवून गणपती समोर ठेवून दिला. सोवळ्यांत बसलेल्या गणपतीच्या टेबलाला शिवू नये म्हणून हळूच टेबलाजवळ जाअून अुदबत्तीचे पेटतें टोंक टेबलाच्या बाहेर येअील अशा रीतीनें तो तुकडा हलकेच टेबलावरच्या बनातीवर वरून अलग ठेवून दिला. दात वापरून अुदबत्ती अुझी केली याची रुखरुख मनांत होती. पण झाले त्याला अिलाज नाही असें म्हणून आणि अुशी बाजूच प्रथम पेटवून मनाचें समाधान केलें आणि माडीवर फटाके अुडविण्यासाठी निघून गेलों. तेथें कठड्याच्या आड्या लाकडामध्यें सुतारानें भोकें पाडून दिलीं होतीं. त्यात फटाके बसवून अुदबत्तीनें ते पेटविण्याची मोठी मौज वाटे.

फटाकडे अुडवून मी शेटजीकडून रोजच्या गोष्टीची वसुली करण्यासाठी गेलो. त्यांनीं अेक राजा जंगलांत शिकारीला गेला असतां त्याला भूक आणि तहान कशी लागली, पुढें अेका धनगराने त्याला शेळीचे ताजें दूध कसे काढून दिले, खुश झालेल्या राजानें जवळच पडलेल्या अेका पानावर त्या धनगराला तीनशें साठ गांवांचे अिनाम कसें लिहून दिलें आणि राजाला जातांना आश्चर्यचकित होअून धनगर पहात असतां त्या शेळीनें तें अिनामपत्र कसे खाअून टाकले याची अेक सुन्दर गोष्ट सांगितली. विचारा धनगर विलाप करू लागला:

*कहूँ कुछ कहूँ कुछ कहा न जावे,*
*कोने सवारे पेटे मेरे मावे,*
*बकरी त्रणसो साठ गाम खाकर गयी और भूखी की भूखी.*

लहानपणचे ते शब्द जसे ऐकले तसे येथे नमूद केले आहेत ही भाषा गुजराती आहे कीं कच्छी की मारवाडी त्याचें संशोधन मात्र मी अजून केले नाही.

गोष्ट अैकून मी घरी परत आलों. आणि पाहातों तों टेबलाबरची बनात टेबलावर नव्हती स्थापन केलेल्या गणपतीखालची बनात कोणी काढली, कशी काढली, असें आश्चर्य करतों आहें तोंच ती बनात मी वडिलांच्या हातांत पाहिली आणि ती बनात जळून तिच्यावर कण्हेरीच्या पानासारखें लांब भोक पडलेलेहि मला दिसून आलें. सणावाराच्या दिवशीं चांगली बनात बिघडली आणि स्थापन केलेल्या

गणपतीला अुचलून त्याच्या खालून ती काढावी लागली हे अपशकुनासारखे झाले, यामुळें वडील रागानें जमदग्नि झाले होते. त्यांनी मला विचारले, "कायरे, हे कोणी केले ?" माझ्या अुदबत्तीचा प्रताप ओळखायला मला वेळ लागला नाही. भीत भीत मी म्हणालो, 'मी ऽ च !' तावडतोब माझ्या कानशिलावर अेक फटाका वाजला आणि दुसरा पाठीत. मी रडत रडत तेथून पळ काढला

पुढे जेव्हा आअीशी गुजगोष्टी करण्याचें रिकामपण मिळाले, तेव्हा मी हुदके देत देत म्हणालो, "बनात जळणार हे मला कसें कळावे ? मी तर भक्तीनेंच अुदबत्तीचा अेक तुकडा पेटवून तेथे ठेवला होता. पण गणपतीबाप्पा प्रसन्न झाले नाहीत !"

आअीकडून जेव्हा वडिलाना माझी बाजू समजली तेव्हा त्यानाहि वाअीट वाटले. बिचाऱ्या दत्तूला सणावाराच्या दिवशी आपण अुगीच मारले, असें ते म्हणाले. त्यांचे तें वाक्य कानी पडलें आणि माझे सगळे दु ख मी विसरलो. मला तेवढ्यानेच सन्तोष झाला

अगरबत्तीचा दुसरा तुकडा जेव्हा मी पेटवला तेव्हा मला दिसून आले की, तिच्या धूपाला कसलाच वास नव्हता. अुदबत्ती कसची ती, कोळशाचा भुकटी डिंकात घालून बाबूच्या काडीला चिकटवून दिलेली होती. मग मात्र मी त्या अुदबत्तीवर दुप्पट चिडलो. असली अुदबत्ती फटाके अुडविण्याच्याच कामाची. देवासमोर ठेवण्याची तिची योग्यताच नव्हे.

## गोकर्णाची यात्रा

१८

लंकापति रावण सारा हिंदुस्तान ओलांडून उत्तरेकडे हिमालयाच्या शिखरावर बसून तपश्चर्या करूं लागला. त्याच्या मातेनें त्याला पाठविले होतें. महान् सम्राट् शिवपूजक रावणाच्या मातेनें काय सामान्य पाषाणलिंगाची पूजा करावी? तिनें आपल्या मुलाला सांगितले, "वत्सा, कैलासाला जा आणि देवाधिदेव महादेवाकडून त्याचे आत्मलिंग मागून आण. आत्मलिंगावांचून माझी पूजाच होऊं शकणार नाहीं."

मातृभक्त रावण निघाला. हिमालयाच्या पलीकडे मानससरोवर आहे त्यांतून रोज अेक सहस्र कमळें तोडून त्यानें कैलासनाथाची पूजा आरंभिली. तपश्चर्या अेक हजार वर्षें चालली.

अेकदां काय झाले कुणास ठाऊक, हजारांत नऊ कमळे कमी पडली. पूजेंतून मध्येंच अुठतां येत नाहीं आणि कमळाच्या सहस्र संख्येंतून अेक देखील कमी पडतां कामा नये! आतां काय करावे? आशुतोष महादेव शीघ्रकोपीहि आहे; सेवेंत जरा कमतरता पडली तर सर्वनाशच करावयाचा. रावणाची बुद्धि, किंवा हिंमत कच्ची नव्हती. त्यानें

अनेक शिरकमल कलम करून महादेवाला वहायला सुरवात केली. अशा भक्तीला अप्राप्य काय असणार? नऊ शिरकमलें अर्पण होतांच भोलानाथ प्रसन्न झाले आणि म्हणाले, "वर माग, वर माग! वरं ब्रूहि! जितके मागशील तितके थोडे!" कृतार्थ झालेल्या रावणानें म्हटलें, "माझी माता पूजेला बसली आहे तिला तुझें आत्मलिंग हवें आहे." तोडातून अवढे वचन निघण्याचा अवकाश, शंभूनें स्वतःचे हृदय चिरून त्यातून आत्मलिंग काढून दिलें.

त्रिभुवनांत हाहाःकार अुडाला. देवाधिदेव महादेवानें आत्मलिंग काढून दिले! आणि तें पण कुणाला? सुरासुरांचा काळ बनलेल्या रावणाला! आतां त्रैलोक्याचे कसें होअील? ब्रह्मदेवाने विष्णूकडे धांव घेतली लक्ष्मी सरस्वतीकडे जाअून विचारूं लागली. अिन्द्र मूर्छित झाला. यमधर्म थरथर कांपूं लागला. शेवटी सर्वांनीं विघ्नविनाशक गणपतीची आराधना केली आणि त्याला गळ घालून ते त्याला म्हणाले, "बाबा, कसेहि कर, पण हें शिवलिंग लंकेला पोहोचणार नाहीं असें कर!"

महादेवानें रावणाला सागून ठेविले होतें, "हे लिंग घेअून जा. पण लक्ष्यात ठेव की जिथे जमिनीवर ठेवशील तिथेंच तें स्थिर होअील." महादेवाचे लिंग तें! पाऱ्याहूनहि जड. रावण लिंग हाती घेअून पश्चिम समुद्राच्या किनाऱ्याकिनाऱ्याने लगबगीनें लंकेकडे जात होता. संध्याकाळ होण्याची तयारी होती. अितक्यांत रावणाला लघुशंका लागली. शिवलिंग हातांत धरून लघुशंका कशी करावी? आणि जमिनीवर तर तें ठेवता येत नाहीं. अशा पेंचांत रावण पडला असतां देवांच्या संकेताप्रमाणें गणपति अेका गुराख्याचें रूप धारण करून गाअी चारीत आहे असा प्रगट झाला. रावणानें त्याला हांक मारून म्हटले, "अरे पोरा, हें लिंग जरा हातांत धरून ठेव. जमिनीवर ठेवूं नको हो!" गणपति म्हणाला, "लागतें तर फार जड बुवा! पण मी प्रयत्न करीन. जर झेपलें नाही तर तुला मी तीन वेळां हाक मारीन. तेवढ्यांत जर तूं आला नाहींस तर आमच्या कानीं सात खडे!"

प्रश्न फक्त लघुशंकेचाच होता. ती आटपायला लागून लागून किती वेळ लागणार? असा विचार करून रावण बसला. पण काय झाले कुणास ठाऊक, आज त्याच्या पोटात सात समुद्रच भरले असले पाहिजेत. गणपतीनें अेक हांक मारली पण बोलायचे कसे? जानवे कानावर आहे तोपर्यंत बोलण्याची सोय नाहीं. गणपतीनें दुसरी हाक मारली तरीहि रावणाची लघुशंका संपेना तो अगदी कावराबावरा झाला. कराराप्रमाणे सिद्धिविनायकाने तिसरी हांक मारली आणि ताबडतोब 'अरेरेरे' म्हणत त्यानें शिवलिंग जमिनीवर ठेवून दिले शिवलिंगच तें! जमिनीवर ठेवले मात्र, हा हा म्हणता अगदी पाताळापर्यंत जाऊन पोहोचले देखील. रावण रागाने आधळा झाला. त्यानें गणपतीच्या कपाळावर जोराने बुक्का मारला गणपतीचे कपाळ रक्तबंबाळ झाले. अेवढा पराक्रम करून रावण लिंग अुपटून काढण्यासाठीं धांवला पण तें आता कसचे साधणार? रावण लिंग अुपटण्याचा जसजसा प्रयत्न करूं लागला, तसतशी सारी पृथ्वी हादरूं लागली पण लिंग काहीं बाहेर येईना शेवटी रावणानें तें लिंग जोराने पिळवटले त्याचे चार तुकडे रावणाच्या हाती आले. ते त्यानें चार बाजूला फेकून दिले.

रावण रागाने आणि निराशेनें लंकेला परत गेला जगात नुसत्या तपश्चर्येनें काम भागत नसतें. धूर्त लोकांचा कावा ओळखण्याचीहि बुद्धि असावी लागते.

मुरडलेल्या लिंगाचा जो मुख्य भाग राहून गेला त्यालाच गोकर्ण महाबळेश्वर म्हणतात कारण पिंडीचे वरचें टोक गाअीच्या कानासारखे निमुळतें चपटे आहे. या पृथ्वीतलावर याचेहून अधिक पवित्र असे तीर्थस्थान नाही.

गोकर्ण महाबळेश्वर हे स्थान कारवार आणि अंकोला या दोन बंदराच्या मध्ये तदडी बंदराच्या अुत्तरेला सहा अेक मैलांवर समुद्रकांठीं आहे. दक्षिणेकडे गोकर्ण महाबळेश्वराचें महत्त्व काशीविश्वेश्वराहून अधिक मानले जातें. लिंग जमिनीच्या आंतच आहे. लिंगाच्या साकुंतीत मध्येच अेक भोंक ठेवलेले आहे. त्यांत अंगठा घातला असतां आंतील लिंगाचा स्पर्श होतो. दर्शन होण्याची आशाच नको! पुजारी

म्हणतात की लिंगाची शिळा अितकी काही मअू आहे की ती भक्तांच्या स्पर्शानें झिजून जाते. म्हणून जुन्या लोकांनीं तिच्याभोवतीं वरपर्यंत जलाधारी बसवून केवळ अंगुष्ठस्पर्शाची सोय ठेवली आहे. पुष्कळ वर्षांनीं शुभशकून झाला म्हणजे वरची साळुंकी काढतात, आसपासची बांधणी अुखडून काढून मूळ लिंग हात दोन हात अुघडे राहील, अितके खुले करतात. या अघड्या लिंगाचे दर्शन करण्यासाठी यात्रा लोटते. अमुक महिने पुरे झाले म्हणजे नवर मोती वांटून तयार केलेल्या चुन्यानें आसपासची चुनेगच्ची पूर्वीप्रमाणे करून टाकतात. या सर्व प्रकाराला 'अष्टबंध' म्हणतात असे मला स्मरतें.

आम्ही कारवारला असतांना अेकदां कपिलाषष्ठीप्रमाणे दुर्लभ अशा या अष्टबंधाचा योग आला. वडील, आअी आणि मी तिघेंहि यात्रेला निघालों. गोकर्ण आगबोटीचें बंदर नाही. बोटी तदडीलाच जाअून थांबतात. तदडी बंदरावरून गोकर्णाला मला नेण्यासाठी अेक गडी करण्यात आला. मी त्याच्या काळ्याकुळकुळीत खांद्यावर बसून गोकर्णाला गेलों तेथें आम्हीं कोटितीर्थात आंघोळ केली. गोकर्ण महाबळेश्वराचें दर्शन केले स्मशानाचे रक्षण करणारा हरिश्चन्द्र पाहिला. त्याच्या खांद्यावर अेक चाबूक कोरलेला होता. जवळच अेक तीर्थ होतें त्यात म्हणे हाडे टाकली असता हळू हळू विरघळून जातात. परत येअून आम्ही अहिल्याबाअीच्या अन्नछत्रात जाअून त्या साध्वीच्या मूर्तीचे दर्शन केले. कपाळावर खोक पडलेला आणि दोनच हात असलेला गणपती पाहिला. ब्रम्हदेवाची अेक मूर्ति पाहिली आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे रावणाच्या त्या प्रख्यात लघुशंकेचे कुंड पाहिले. आज देखील तें भरलेले असतें आणि डोके भणाणून जावे अितकी त्याची दुर्गंधी आहे. अितरहि पुष्कळ पाहिले असेल पण आता तें कोठून आठवणार ?

हो, बरे आठवले ! या प्रदेशांतील अेक विशेष गोष्ट सांगण्याची राहूनच जात होती. घर गरीबाचे असो कीं श्रीमंताचे, जमीन काळी कुळकुळीत लिंपलेली असावयाची. जणूं काय काळ्या संगमरवरी दगडाचीच बनविली आहे. अितकी काहीं गुळगुळीत आणि चकचकीत की मी जमिनींत पाहूनच तोंड लावीत असे. अुन्हाळ्याच्या दिवसांत जमिनीवर कांहींहि अथरल्यावांचून सुखाने निजावें वेळोवेळी शेणांत

काजळ मिसळून ही जमीन सारविली जाते पण हें सारवणे हाताने होत नसते. सुपारीच्या झावळ्याच्या मुळाशीं पुट्ठ्याप्रमाणें अेक भाग असतो; त्याचा अेक तुकडा घेऊन त्याच्या अुभ्या कांठाने घासून घासून जमिनीला ओप काढलेली असते. कोंकणी भाषेंत त्या पुट्ठ्याला पोवली असे म्हणतात.

गोकर्णाहून परत येतांना तदडीपर्यंत पायी न जाता गोकर्णाहून अेका वाफरात बसून तदडीच्या समुद्रांत अुभी असलेली आगबोट गांठावी, असे आम्ही ठरविले होतें. वाफर किंवा वाफोर म्हणजे वाफेच्या यंत्राने चालणारी अेक मोठीशी होडी. अिंग्रजींत हिला स्टीम लाँच म्हणतात. मोसमचे तुफान सुरू होण्याचे ते दिवस होते. आगबोटी लवकरच बंद होणार होत्या. यामुळे परत जाणाऱ्या यात्रेकरूंची गर्दी बेसुमार होती. तदडी बंदरावरून बसणाऱ्या लोकाना जागा मिळेल की नाही याची शंका होती. म्हणून आम्ही गोकर्णालाच स्टीम लाँचमध्ये बसून आगबोट लवकर गांठण्याचा मनसुबा केला होता.

गोकर्णाच्या बंदराला धक्का बाधलेला नाही. काठापासून पाणी कमरेअितके येअी तोंपर्यंत चालत जावे लागे. ( लोकांच्या कमरेपर्यंत म्हणजे माझ्या छातीपर्यंत. ) तेथें अेका होडीत चढून वाफरापर्यंत जावयाचे. तरुण लोक होडीपर्यंत चालत जात आणि बायका-मुलांना गड्याच्या खांद्यावर बसवून किंवा दोन गड्याच्या हाताची पालखी करून होडीपर्यंत नेत असत

प्रारंभीच अेक अपशकून झाला. अेक गरीब म्हातारी शरीराने विशेष स्थूल होती. पण दोन गडी करण्याअितके तिचेजवळ पैसे नव्हते. तिने अेका लोभी गड्याला थोडीशी अधिक मजुरी देण्याची लालूच दाखवून आपल्याला पाठकुळीवरून घेअून जाण्यास कबूल करविले. गडी काही विशेष सशक्त नव्हता. तो समुद्रकांठी बसला, ती विधवा म्हातारी त्याच्या पाठकुळीवर बसली कुली अुठावयास गेला तोच त्याचा तोल जाअून तो पुढें कोलंडला. अर्थात् म्हातारीहि कोलांटी खाअून पडली. अितक्यांत अेका टवाळ लाटेनें धावत येअून दोघांना सचैल स्नान घातले आणि पावन केले.

आमची बोट जवळ जवळ शेवटची असल्यामुळें गोकर्णाहून बसणारे यात्रेकरू देखील पुष्कळ होते. त्या सगळ्यांना वाफरांत जागा कोठून मिळणार ? म्हणून कंपनीनें शंभर अेक माणसें बसूं शकतील अेवढा अेक मोठा पडाव वाफराच्या मागे बांधला होता. वाफर भरल्यानन्तर अुरलेले लोक या पडावांत बसले. या पडावाच्या

मागे कस्टम खात्याची अेक होडी बांधली होती तिच्यामध्यें त्या खात्यांतील अेक अमलदार आणि अितर शिपाअी नोकर बसलेले होतें. मी पाहिले की खासगी होड्या चालवायची वल्ही अेकाद्या झाऱ्यामारखी टोकाला वाटाळीं असतात आणि कस्टमच्या सरकारी होड्यांची वल्ही क्रिकेटच्या बॅटीसारखी लांबट आणि चपटीं असतात.

आमची 'वरात' वेळेवर निघाली अेक दोन मैल आम्ही कापले असतील अितक्यांत आभाळ भरून आले. वारा सोसाट्यानें वाहूं लागला आणि लाटा तर लांडग्याना मेजवानी मिळावी त्याप्रमाणें नाचूं लागल्या होड्या डोलूं लागल्या आणि वाफरावरील ताण वाढूं लागला.

अरे ! हे काय ? थेंब ! पावसाचे थेंब !! मोठे मोठे ! वाराअेवढे थेंब ! आता कसे होअील ? लाटा जोरजोराने अुसळूं लागल्या. वाफर बेकाम झालेल्या घोड्याप्रमाणे थैमान घालूं लागले ! मागच्या होडीचे दोरखंड कर्रर्रर्र कर्रर्रर्र आवाज करूं लागले. अितक्यांत वाफर आणि होडी याचेमध्यें अेक अेवढी मोठी लाट आली की आम्हाला होडी दिसेनाशी झाली.

मी वाफरामध्ये वाफेच्या चंबा ( बॉयलर ) जवळील लाकडी फळ्याच्या ओटयावर बसलो होतों. आमच्या तांडेलाला वाफर शक्य तितक्या लवकर आगबोटीपर्यंत पोहोचविण्याची घाअी होती. त्यानें आपला वाफर बेफामपणे भर वेगानें सोडला होता. मी ज्या फळीवर बसलो होतों ती तापून गरम झाली. मला चटके बसूं लागले. काय करावे हे सुचेना. सरकायला जावे तर "समुद्रस्तृप्यतु" व्हावयाचे आणि बसून राहाणे तर जवळजवळ अशक्य झाले होतें. या संकटांतून अेका भयंकर रीतीने माझी सुटका झाली. अेक प्रचंड लाट वाफरावर तुटून पडली आणि तिनें मला नख-शिखान्त स्नान घातले. आता लाकडी ओटा कसचा गरम लागतो ?

लाट पाहून वडील घाबरले. आअीला कुलदेव आठवला. 'मंगेशा, महारुद्रा, मायबापा, तूंच आतां आम्हाला तार !' पाअूस मुसळधार पडूं लागला. वाफरांत बसणारे आम्ही कांही तरी सुरक्षित होतों पण आमच्या मागील होडीत बसलेल्यांचे काय ? प्रथम प्रथम आमचेपेक्षां त्यांची स्थिति बरी होती वाफर यंत्रानें पाणी कापीत जात असल्यानें थोडे थोडे पाणी आमच्या बाजूने अुडत असे. होडीला आलेल्या लाटेवर स्वार होतां येत असे. त्यामुळें होडी कितीहि पुढे मागे डोलली तरी पाणी आंत येत नसे. पण आतां जेव्हां वारा आणि पाअूस यांच्यांत शर्यत

लागली आणि दोघांचे अट्टहास्य सुरू झाले, तेव्हां अेक लाट आली कीं जवळजवळ अर्धी होडी भरून जाअी. लाटा समोरून येत तोपर्यंत कांहींसें ठीक होतें. होडी लाटेवर चढून अलग पलीकडे जाअी. क्षणांत लाटेच्या शिखरावर, तर क्षणांत दोन लाटांमधील गर्तेत. केव्हा केव्हा होडी अेका लाटेच्या शिखरावरून पलीकडे अुतरूं लागते न लागते अितक्यात दुसऱ्या अेका नव्या लाटेनें फुगून येअून होडीला वरच्यावर अुचलून धरावे ' असें काही तरी अकल्पित झाले म्हणजे होडींत अुभे असलेले लोक धडाधड अेक दुसऱ्याच्या अंगावर पडत.

पण आतां लाटा बाजूनें आपटू लागल्या होडींत असलेल्या बायकां-मुलांना रडण्याचा अेकच अुपाय माहीत होता. जबडे म्हणून जवानमर्द होते ते सगळे डोल, घागर, डबा, जे काही हाती येअील तें घेअून होडीतील पाणी भरभरून अुपसून काढीत होते. आगीचा ( फायर ब्रिगेडचा ) पंप याहून कितीशा वेगाने काम करीत असेल ! होडी कुठे जवळ जवळ रिकामी व्हावी अितक्यांत अेकादी क्रूर लाट विकट हास्य करून धाड़दिशी होडीच्या बरगडीत आपटून होडींत शिरत असे. त्या वेळच्या आरोळ्यांनीं आणि किंकाळ्यांनी कानठळ्या बसून जात. काळीज जणू फाटून जाअी. अेकाद्या यात्रेकरूनें अवधूत दत्तात्रेयाचा धांवा करावा; अेकाद्यानें पंढरपूरच्या विठोबाला आळवावे, कुणी अंबाभवानीला नवस करावा तर कोणी विघ्नहर्त्या गणेशाची स्तुति करावी, असें अेकसारखे चालूं होतें. प्रथम प्रथम वाफराचा तांडेल ( कप्तान ) आणि त्यातील खलाशी आम्हां सर्वांना धीर देण्यासाठी म्हणत, " अहो, तुम्ही कशाला घाबरतां ? जबाबदारी आमची आहे ना ' आम्ही असली किती तरी तुफाने पाहिली आहेत ' याला कोण भीक घालतो ?" पण बघता बघता मामला अितका काही गंभीर झाला की कप्तानाचे तोंड देखील अुतरले. तो आता म्हणू लागला, " बाबांनो, रडून काय होतें ? मनुष्याला केव्हातरी मरावयाचें आहेच. मग तें मरण अंथरुणावर येवो किंवा घोड्यावर, शिकारीत येवो किंवा समुद्रात तुम्ही पहाताच आहा कीं, आमच्यानें होअील तें आम्ही करीत आहोत पण अिन्सानच्या हातांत आहे काय ? मालिक करील तें खरे." मी तर टक लावून त्याच्या चेहऱ्याकडे पाहात होतों. सफरीच्या सुरुवातीला जो मनुष्य गाजरासारखा लालबुंद होता, तो आतां अळवाच्या पानासारखा हिरवा निळा होऊन गेला होता.

त्या वेळी माझें तर पोरवय होतें; पण गंभीर प्रसंग ओढवला असतां लहान मुलांनाहि मोठ्यांसारखे समजूं लागतें. क्षणोक्षणी मीं बसल्या जागेवरून सरकून जाअी.

ओटयाची कड दोन्ही हातानी गच्च धरून मी कसेबसें आपले बस्तान सभाळीत होतों. आमचें सगळें सामान अेका बाजूला पडले होतें, पण त्याचेकडे ढुंकून सुद्धां बघतो कोण ? तरीपण पूजेचें देव आणि पूजेचा नारळ अेका चेताच्या सांबळीत ठेवले होते. ती सांबळी मात्र मी माझ्या मांडीवर घेऊन बसावयास विसरलों नाहीं.

माझ्या मनात त्या वेळी कसले कसले विचार येत होते ! तो काळ माझ्या मुग्ध भक्तीचा होता. रोज सकाळी अुठून दोन दोन तास माझें भजन चालत असे. माझी मुंजच झाली नव्हती. तेव्हा सध्यापूजा हातून कशी घडावयाची ? तरीपण वडील पूजेला बसले म्हणजे देव्हाऱ्यातून देव काढणे, अभिषेकासाठीं त्याना तास्हनात ठेवणे, अभिषेक आटोपल्यानंतर त्यांना पुसून पुन्हा वर ठेवणें, वगैरे प्रकारची तांत्रिक मदत वडिलाना करण्यात मला खूप धन्यता वाटे. आजचे तें काळमुखी तुफान पाहून मनात विचार आला कीं, आज जर पाण्यात बुडून मरणेच नशिबात असेल तर देवाची सांबळी छातीशीं घट्ट धरूनच मी जलसमाधि घेअीन. दुसऱ्याच क्षणी विचार आला की, जर आअीच्या देखत वाफरातून पाण्यात उलटून पडलो, तर आअीची काय स्थिति होअील ? हा विचारच अितका राही असह्य झाला की श्वास गुदमरून गेला. छातीत दगड बसल्याप्रमाणे दुखूं लागले. मी अीश्वराची प्रार्थना केली की, "देवा ! आम्हाला जर बुडवायचेच असेल तर आअीला आणि मला अेकमेकाना मिठी मारली आहे अशा स्थितीतच बुडव."

प्रत्येक बालकाला वाटतें की, आपले वडील म्हणजे धैर्याचे मेरू ! आकाश कोसळून पडेल पण माझ्या वडिलांची हिंमत खचणार नाही अशी प्रत्येक बालकाला खात्री असते. त्यामुळें अशा प्रसंगी, जेव्हां वडील पण घाबरून गेले आहेत, दिङ्मूढ झाले आहेत, गोंधळले आहेत, असे मुलाच्या दृष्टीस पडतें, तेव्हां त्या मुलाला कसेंसेंच होअून जातें. त्या दिवशी मला त्या तुफानाची अितकी भीति वाटली नव्हती, मुसळधार पावसालाहि मी तसा घाबरलों नव्हतो. तुला खातों, तुला खातों, म्हणून तोंड पसरून ताडवनृत्य करणाऱ्या भुतासारख्या प्रचंड लाटा पाहून देखील माझी गाळण अुडाली नव्हती. पण जेव्हां वडिलाना घाबरलेले आणि गोंधळलेले मी पाहिले आणि त्यांचा कंठ गद्गदित झालेला पाहिला, तेव्हां मात्र माझा धीर खचला.

जो तो तांडेलाला विचारी, "आपण कुठवर आलो ? अजून किती बाकी आहे ?" चारी बाजूस जेथें नजर फेंकावी तेथें फक्त पाअूस, झंझावात आणि लाटांचे तांडव. अितका पाअूस पडला तरी आकाश कांहीं केल्या अुघडेना. मी तांडेलाला विनवले,

"वाफर जरा किनाऱ्याच्या जवळून चालवा ना ! जर आपला वाफर बुडालाच तर निदान कांहीं लोक तरी पोहत पोहत कांठाला जातील." तांडेल अुत्साहशून्य आणि विषादयुक्त हास्य करून म्हणाला, "कैसा बेवकूफ लडका ! किनाऱ्याहून जितके दूर आहोत तितकेच आपण आज सुरक्षित आहोत. असल्या वादळांत काठाच्या जरा जवळ गेलो की खडकावर आपटून चक्काचूर व्हावयाचा. आज तर आम्ही मुद्दामच किनाऱ्याहून विशेष दूर राहिलो आहोंत. अेकदां आगबोट गांठली म्हणजे मिळवली. आज दुसरा अुपाय नाही"

मी कधीकाळीं मोठ्या माणसाना अेकमेकास मिठी मारून रडताना पाहिले नव्हतें. तें दृश्य आज आमच्या मागच्या मोठ्या होडीत मी पाहिले. तेथें स्त्रीपुरुष अेकमेकांना मिठ्या मारून आकांत करीत होते. दोन तीन मुलांची अेक आअी सगळ्याच मुलांना अेकदम मिठीत घेण्याचा प्रयत्न करीत होती. बस्स्; फक्त पांच पचवीस जवानमर्द तनतोड मेहनत करून समुद्राशी असमान युद्ध लढत होते. वादळ अितके कांही वाढले आणि वाफर आणि होडी अशी कांही डोलूं लागलीं की लोक गर्भगळित होअन रडण्याचेहि विसरले. अेकच कृष्णछाया सर्वत्र पसरली. भान जाग्यावर होतें फक्त त्या होडीतील बहादुराचे आणि काळे निळे विजार सदरे घातलेल्या आमच्या वाफरांतील खलाशाचे. आमचा तांडेल केव्हां केव्हा हुकूम सोडतांना गोंधळलेला दिसे पण खलाशी मात्र बरोबर अेकाग्र होअन न चुकतां, न गोंधळतां आपापले काम करीत होते. कर्मयोग याहून कांहीं निराळी चीज असेल ?

शेवटी अेकदाचे तदडी बंदर आले. आम्हाला आगबोट दिसली, त्यापूर्वीच आगबोटीची आमच्या वाफरावर नजर पडली. आगबोटीने भोगा वाजविला, "भों SSSSS !" जणूं काय सर्वांची करुण वाणी अेकून अीश्वरानेंच "मा भैः" ची आकाशवाणी केली ! आमच्या वाफराने आपल्या किनऱ्या आवाजानें भोग्याला अुत्तर दिले. सर्वांच्या हृदयांत आशेचा अंकुर अुगवला. सर्वत्र जयजयकार झाला !

अितक्यात जणूं काय शेवटचा प्रयत्न करून पहावा म्हणून आणि आम्हा सर्वांच्या भाग्यासमोर स्वतःची हार कबूल करण्यापूर्वी अेक शेवटचा हल्ला चढवून पहावा म्हणून अेका मोठ्या लाटेने आमच्या वाफरावर आक्रमण केले. माझे वडील जेथे बसले होते तेथेच अुताणे पडले. मी किंकाळी फोडली. आतां-पर्यंत मी रडलों नव्हतों, त्या सर्वांची जणूं भरपाअीच त्या हृदयविदारक किंकाळीनें

केली. वडील तावडतोब उठून बसले. त्यांनी मला छातीशीं धरून म्हटलें, "दत्त, भिऊं नकोस. मला कांहीं सुद्धां झाले नाही."

आम्ही आगबोटीच्या जवळ जाऊन पोहोंचलो; पण आगबोटीला जाऊन चिकटण्याची हिमत कशी करावयाची ? कस्टमची होडी त्या लोकांनीं केव्हांच सुटी केली होती. कारण वाफराचे आणि होडीचे हेलकावे तिला सहन होत नव्हते. आमच्या ताडयातून वेगळे पडण्यांतच तिची सलामती होती. आमच्या वाफरानें दुरून दुरून आगबोटीची अेक प्रदक्षिणा केली, पण जवळ येण्याची कांहीं सोय दिसेना. लाटांच्या जोरानें जर वाफर आगबोटीवर आपटले तर अगदी शेवटच्या घडीला सर्वांचा चेंदा मेदा व्हावयाचा शेवटी वरून सोल फेकला गेला आणि वाफराचे आगबोटीशी लग्न लागले. आमचे खलाशी वाफराच्या छतावर उभे राहून लांब लचक वळंच्या मदतीने वाफराला आगबोटीच्या भितीवर आपटण्यापासून बचावीत होते. लाटेनें वाफर उचलून आगबोटीकडे फेंकावा आणि खलाश्यांनीं आपल्या वेळूंच्या टोकाची ढाल बनवून तो सारा मारा आपल्या हातापायावर जिरवून टाकावा. तरी पण शेवटीं आगबोटीच्या शिडीशीं वाफराचें छत आपटलें आणि 'कडाइइ' असा आवाज होऊन छताची अेक भली मोठी फळी मोडून समुद्रांत पडली.

मीच अगदी जवळ असल्यामुळे स्टीममध्यें चढण्याची पहिली संधी मला मिळाली. चढण्याची कमली ? चेंडूप्रमाणे फेकलें जाण्याची नाडेल स्वतः दुसऱ्या अेका खलाश्याला घेऊन वाफराच्या कांठीं उभा होता. त्या दोघानीं मुसाफिराचा अेक अेक बावळा पकडून आगबोटीच्या शिडीच्या अगदी खालच्या पायऱ्यांवर उभे असलेल्या खलाश्यांच्या हाती त्याला फेंकून देत. यांत ते अेवढी काळजी घेत कीं जेव्हां वाफर लाटांच्या गर्तेत खालीं उतरे, तेव्हा मुसाफराना पकडून धरून ते वाट पहात. दुसऱ्या क्षणी वाफर लाटेच्या शिखरावर चढला आणि आगबोटीची शिडी जवळ आली की झट त्या मनुष्याला शिडीवर फेंकून देत आणि तिकडचे खलाशी त्याला अर्धवट झेलून घेत. जर का वाफराच्या खलाश्यानीं आणि आगबोटीच्या खलाश्यानी अेक अेक हात पकडूनच ठेवला असता तर दुसऱ्या क्षणी वाफर लाटाच्या गर्तेत उतरतांच मुसाफिराचे जरासंधाप्रमाणे दोन तुकडेच व्हावयाचे.

मी शिडीच्या दोनचार पायऱ्या चढलों आणि आई येते किंवा नाहीं तें मागे वळून पाहूं लागलो. अनोळखी मुसलमान धटिंगणांनीं माझ्या आईचे रट्टे पकडलेले पाहून

मला कसेंसेच झाले. पण तो प्राण वाचविण्याचा वेळ होता. तेथें नाजूक भावना काय कामाच्या ? थोड्याच वेळांत वडीलहि आगबोटीत येऊन पोहोंचले. देवांची सांबळी तर मी माझ्या खांद्यावर लटकावलीच होती. वर जाऊन चांगली जागा शोधून आम्हांला तेथे बसवून वडील परत सामान आणण्यासाठीं गेले. मी श्रद्धाळू मुलगा खरा, पण त्या वेळी मला वडिलांचा मनस्वी राग आला. जळो तें सगळे सामान ! जीव जोखमीत घालून परत का बरे हे जातात ? पण त्यांनी तर तीन फेऱ्या केल्या. शेवटची फेरी करून आले तेव्हा ते म्हणाले, "गोकर्ण-महाबळेश्वराच्या प्रसादाचा नारळ पाण्यात पडला !" आजी आणि मी अकदमच उद्गारलों : आजी म्हणाली, "अरेरे !" आणि मी म्हणालों, "अेवढेच ना ?"

वाफरांतील अुतारू चढल्यानंतर होडींतील अुतारूची पाळी आली. ते सर्व चढले. त्यानंतर वाफर आणि होडी निशाचर भूतासारखी किंचाळत तदडीच्या किनाऱ्याकडे गेलीं; आणि किनाऱ्यावर तपश्चर्या करीत बसलेल्या यात्रेकरूना हप्त्याहप्त्यांनी आणू लागलीं. आतां तुफान थोडेसे शांत झालें होतें. परंतु काळोखी रात्र आणि अुफाळणाऱ्या लाटा यांत सांपडलेल्या लोकांचे जे हाल झाले त्याचे वर्णन कोण करूं शकेल ?

आगबोट यात्रेकरूंनी चिकार भरून गेली. जो कोणी बोले तो आपलें सामान समुद्रात बुडून गेल्याच्याच गोष्टी करी अन्ती यात्रेकरू सर्व आले. परमेश्वराची कृपा की कोणाच्या जीवाची हानि झाली नाहीं. आगबोट निघाली; आणि लोक आपापल्या जुन्या सफरीतील असल्याच संकटाची स्मरणे अेकमेकाना सागून सांगून आजचा दुःखभार हलका करूं लागले. रात्रीं बराच वेळपर्यंत कुणाला झोंप आली नाहीं. मी केव्हां झोंपी गेलों, कारवार बंदर केव्हा आले, आणि आम्ही घरीं कधीं पोंचलो, यांतील कांहीच आज आठवत नाही. पण त्या दिवसाचा तो तुफानाचा प्रसंग मात्र जणूं काय कालच घडला असावा अितका स्मरणपटावर ताजा, स्पष्ट आहे. खरोखरच,

*दुःखं सत्यं, सुखं मिथ्या*
*दुःखं जन्तोः परं धनम् ।*

## आपण हत्ती विकत घेऊं

१९

अेकदां आम्ही सांगलीहून मिरजेला परत येत होतो. सांगलीच्या राजवाड्याच्या आसपास आम्ही कांही हत्ती बांधलेले बघितले. हत्ती कधीं शांत अुभे राहात नाहीत. देहाचा भार अुजवीकडून डावीकडे आणि डावीकडून उजवीकडे आलटून पालटून घालण्यासाठीं सारा वेळ ते डोलतच रहातात. अमे झुलत राहाणें ह्यांतच तर हत्तीची शोभा आहे. लोकांचा असा समज आहे की हत्ती जर असा झुलत राहिला नाही तर सहा महिन्यांचे आंत त्याचा धनी मरतो. न झुलणाऱ्या अशुभ हत्तीला कुणी विकत देखील घेत नाहीत. हत्तीचे लांबलांब दांत कापून विकतात व बाकीच्या भागांत सोन्याची कडी भरतात, तरी सुद्धां ते पुरेसे लांब असतातच. हत्तीची सर्वच हाडें हस्तिदंतासारखी वापरतात; पण ह्या लांब दातांचे तुकडे हेच खरे अुत्तम हस्तिदंत; आणि त्यांची किंमत सुद्धां खूब असते. हत्तीची पाठ मागच्या बाजूला अुतरती असली तर तो हत्ती अधिक देखणा गणतात. पाठ अगदी सारखी सपाट असली तर त्या हत्तीला सामान्य कोटीचा समजतात.

घोड्याप्रमाणेच हत्तीसुद्धा रात्रीं झोपत नाहीं आणि बसतहि नाही असा समज आहे. हत्ती निजला तर त्याच्या कानांत किंवा सोंडेत मुंगी शिरते आणि त्याला चावते; आणि मुंगी चावली म्हणजे हत्ती तात्काळ मृत्यु पावतो असा देखील समज

लोकांत रूढ आहे अेवढ्या मोठ्या हत्तीचा मृत्यु यःकश्चित् मुंगीच्या हातांत आहे असा बोध शिकण्यापुरता हा समज योग्य असेल; पण हत्ती बसतो आणि थोडाबहुत झोंपतोहि. याची मी खात्री करून घेतली आहे. आपल्या सोंडेत कांहीं शिरूं नये म्हणून सोड तोडांत घालूनच हत्ती झोंपतो अमे सांगतात. पण मग तो श्वास कसा घेत असेल ?

मिरजेंत प्रवेश करतांना रस्त्यावर अेक लहानसा हत्ती विक्रावयाला काढलेला आम्ही पाहिला. मी वडिलांना विचारलें, " या हत्तीची किंमत काय असेल ?" आम्हाला खूष करण्यासाठीं वडिलांनीं गाडी अुभी करविली आणि गाडीवर बसलेल्या पट्टेवाल्यास सांगितलें कीं हत्ती केवड्याला विकतात हे सहज विचारून ये. पट्टेवाल्यानें येअून सांगितलें कीं तो पांचशेंला जाअील असे दिसतें झालें; केशूनें आणि मीं हट्ट घेतला: " आपण हत्ती विकत घेअूं ! " वडील म्हणाले, " आपणाला कसचा हत्ती विकत घेतां येतो ? " मीं म्हणालो, " पांचशें रुपयांचा तर प्रश्न आहे. तुमचा दोन महिन्यांचा पगार द्या म्हणजे पुरे " वडिलांनीं विचारले, " हत्ती घेअून आपण काय करणार ? " भाअूने अुत्तर दिलें, " त्यावर बसून फिरावयाला जाअूं " वडिलांनीं गोष्ट निकालांत काढण्यासाठीं सांगितलें, " असला वेडा हट्ट करूं नये. हत्ती राजेलोकांनींच विकत घ्यावा. आपल्या सारख्यांनीं हत्ती बाळगला तर जग हसेल. " पण याने माझें किंवा केशूचे समाधान झालें नाहीं. आम्ही अेकच हट्ट बळकट धरून बसलो कीं " आपण हत्ती विकत घेअूं या." अेवढ्यांत आमची गाडी घरीं येअून पोहोचली. वडिलांनीं विचार केला असावा की मुलांना चांगला धडा शिकवावयाची ही संधी आहे. ते म्हणाले, " कांहीं हरकत नाहीं. हत्ती विकत घेण्याची माझी तयारी आहे. मात्र आपण हत्ती घेअूं त्यापूर्वी तो दररोज काय खातो, किती खातो, त्याच्या माहुताला दर महिना किती पगार द्यावा लागतो, त्याच्यासाठीं " खंबारा " बांधण्याकरितां किती खर्च लागेल, या सर्व गोष्टींचा तपास करून हिशेब करा आणि मग माझ्यापाशीं या. "

आम्ही निघालों आणि अनेक ठिकाणीं हिंडून माहिती मिळविली–आणि गारच झालों ! हत्तीला रोज गव्हाचा मलिदा द्यावा लागतो. अितक्या गाडया गवत, वडाचीं पानें, आणि अूंस मिळेल तेव्हां अितका अूंस, पखालीच्या पखाली भरून पाणी, तसेंच गूळ, तूप, अित्यादि हत्तीला द्यावें लागतें. त्याची गजशाळा अितकी अुंच असावी लागते. तिला लगतच माहुताचें राहावयाचें घर, हत्तीचा खुराक

सांठवून ठेवण्यासाठीं खोल्या, गजशाळा धुअन रोज साफ करण्यासाठीं खास नोकर, हत्तीला स्नान घालावयाचें तेव्हां माहुताच्या मदतीला अितके लोक. याप्रमाणें हत्तीचें बजेट वाढतच चाललें आणि हत्ती मदोन्मत्त होतो तेव्हां त्याचे चारी पाय मोठमोठ्या सांखळ्यांनीं बांधून ठेवावे लागतात. अेकच सांखळ वापरली तर तो ती तोडून गांवात अुत्पात करील, अित्यादि विशेष माहितीसुद्धा आम्हांला मिळाली. विचार करतां प्रकाश पडला कीं हत्तीला खावयाला घालावयाचे म्हणजे आपणाला खावयाला काहीच शिल्लक राहणार नाहीं आणि त्याच्यासाठी घर बांधावयाचे असेल तर आपले घर विकावे लागेल अितके करून हत्ती ठेवला तरी त्याचा अुपयोग काय ? अेकाद दिवस वर बसून फिरून यावयाचे अितकाच आणि फिरण्यासाठी सुद्धां हत्तीला शोभेल अशी मोठी झूल आणि अंबारी तर हवोच. आम्ही आमचा मूर्खपणा जाणला आणि आता हत्तीचें नाव वडिलांच्या समोर काढावयाचें नाहीं असा शहाणपणाचा निश्चय केला.

पण दुसऱ्या दिवशी वडिलांनीं स्वतःच गोष्ट काढली. आम्हांला आमचा सगळा हिशेब रुजू करावा लागला. आम्ही थंडावलेले पाहून त्यानीं ती गोष्ट तिथेच सोडली. नंतर माहिती म्हणून त्यांनीं आम्हांस सांगितलें, "तुम्हांला ठाऊक आहे का ? जीवंत हत्तीपेक्षा मेलेल्या हत्तीची किंमत अधिक असते जीवंत हत्ती जेवढें खातो त्या प्रमाणांत आपणास त्याचेकडून काम घेतां येत नाहीं; अर्थात् तेवढी त्याची किंमत कमी होते. जीवंत हत्तीपेक्षां मेलेल्या हत्तीच्या हाडांची किंमत जास्त येते; मात्र तो हत्ती पोक्त असावा लागतो." हें शेवटचे वाक्य कोणता अभिप्राय मनांत ठेअून त्यांनीं सांगितलें असेल कोण जाणे.

पुढें कुणी सयामच्या राजाच्या पांढऱ्या हत्तीची गोष्ट सांगितली सयामच्या राजापाशीं अेक पवित्र पांढरा हत्ती असतो. तो राजाचा आणि शिवाय पवित्र असल्यामुळें त्याजकडून सेवा तर घेतांच येत नाहीं सयामच्या राजाची आपल्या कुणा सरदारावर मनांतून गैरमर्जी झाली; तेव्हां राजानें दरबारांत त्याची खूप वाखाणणी केली आणि म्हटलें, "मी खूष होअून माझा पांढरा हत्ती तुम्हांला बक्षिस दिला आहे." राजाचा हत्ती म्हटला म्हणजे त्याला खाणेंपिणें चांगले दिले पाहिजे; त्याची अखड सेवा झाली पाहिजे. आणि हें सारे करतां करतां सरदारांचें तर दिवाळेंच निघावयाचें. आज देखील नफा निष्पन्न न होणारी खर्चाळु प्रवृत्ति जर कुणी स्वीकारली तर त्याजविषयीं लोक म्हणतात कीं यानें पांढरा हत्ती दारांत बांधला आहे. काम न करणाऱ्या पण

लढ्ढ पगार घेणाऱ्या नोकरालासुद्धां–प्रधानाला किंवा वजीराला–पांढरा हत्ती म्हणून संबोधितात. वरील गोष्टीला तीनेक वर्षें लोटल्यानंतर कारवारांत मला कळलें की तेथे कोयलु नांवाचा अेक ख्रिस्ती व्यापारी आहे; त्यानें जंगलांतून लांकडाचे मोठेमोठे ओंडे अुचलून आणण्यासाठी हत्ती ठेवले आहेत. त्यांजकडून त्यांच्या खुराकाच्या प्रमाणापेक्षा देखील तो जास्त काम चोपून घेतो व खूप नफा करतो. हे हत्ती अेक दिवस मी जेव्हां पाहिले तेव्हां मला त्यांची दया आली राजाच्या हत्तीप्रमाणे हे हत्ती पुष्ट दिसत नव्हते त्याची कानशिलें जणूं कोनाडे असावेत अशी आत बसलेली होती!

## वाचनाचा आरंभ २०

लहानपणीं आमच्या हातांत वाचण्यालायक पुस्तक पुरेशी येत नसत. शहापुरच्या 'नेटिव जनरल लायब्ररीत' जेव्हां मी पहिल्यांदा गेलों आणि पाहिले कीं महिन्याला कमीत कमी दोन आणे दिले असतां वर्तमानपत्रें तर वाचावयास मिळतातच; पण तेथील पुस्तकाच्या संग्रहांतून पुस्तकें देखील वाचावयास मिळतात, तेव्हां मला फार आश्चर्य वाटले. ह्या प्रकारची व्यवस्था ज्याला सुचली असेल त्याच्या कल्पकते-विषयीं माझ्या मनांत आदर उत्पन्न झाला. पुस्तकें विकत घ्यावयास नकोत आणि वाचावयास मात्र पुष्कळ पुस्तकें मिळतात ही काय सोय थोडी झाली? ज्याला ही युक्ति सुचली असेल तो मानवजातीचा कल्याणकर्ता आहे यांत कांही शंका नाहीं, असें त्या दिवशीं मला अस्पष्टपणे वाटले घरांत फक्त शिवाजीचें चरित्र, शिवाजीचा गुरु दादाजी कोंडदेव याचे चरित्र, रमेशचंद्राच्या जीवनप्रभातचे मराठी भाषांतर आणि हरिश्चंद्र नाटक, इतकीच पुस्तकें मी वाचलीं होतीं; त्यांतील बराचसा भाग समजलाहि नव्हता पुराण ऐकायला जात असूं तेव्हां खूप मजा वाटत असे. लायब्ररींतून अगदी प्रथम वाचलेलें पुस्तक म्हणजे मोचनगड. त्याचा उल्लेख केला आहेच. या प्रकारे वाचण्याचा नाद सुरू झाला. अितक्यात आम्ही मिरजेला गेलों. त्या वेळीं मी मराठी चौथ्या अियत्तेंत असेन. मिरजेंत वडिलांना मिरजमळा संस्थानचे

हिशेब तपासावयाचे होते. त्या संस्थानाच्या कचेरीत मराठी पुस्तकांचें अेक कपाट होतें. कां ठेविलें होतें कोण जाणे ! केशूला या पुस्तकसंग्रहाचा कुठून तरी सुगावा लागला असावा. तो तेथून वाचण्यासाठी पुस्तके घेऊन आला. मलासुद्धां पुस्तके आणण्याची अिच्छा झाली. मी वडिलांना म्हटलें कीं मला वाचण्यासाठीं पुस्तके द्यावीं. त्यांनीं तो संग्रह ज्याच्या ताब्यांत होता त्या कारकुनाला सांगितले कीं याला वाचनीय पुस्तकें द्या.

वडील आमच्या शिक्षणाकडे किंवा संस्काराकडे विशेष ध्यान देतच नसत. त्यांना स्वतःला पुस्तकें किंवा वर्तमानपत्रें वाचण्याची गोडी नव्हती. गप्पा मारण्यासाठीं विशेष मंडळीहि त्यांच्याकडे येत नसत. जर कुणी आलेच आणि गप्पा मारूं लागले तर शिष्टाचार म्हणून ते अेकण्याचे काम करीत. पण स्वतःकडून त्यात फारशी भर घालीत नसत. कचेरीचें काम अथवा घरकाम, आजाऱ्याची शुश्रूषा, देवपूजा, स्तोत्रपाठ–अशांतच त्यांचा सर्व वेळ जावयाचा. संध्याकाळीं नियमित फिरावयास जात. भाजी स्वत:च्या आवडीप्रमाणे विकत घेण्यासाठीं स्वतःच जात. रात्रीं साडे आठ वाजतां निजावयाचें आणि सकाळी भल्या पहाटे चार वाजता सुद्धन अीश्वरचिंतन करावें हा त्यांचा नेहमीचा अबाधित कार्यक्रम होता. त्यांना अितर कांहीं सुचतच नसे. आजारी पडण्याचे देखील त्यांना कधी सुचले नाही ७२ वर्षांचे झाले तरी त्यांचा अेकहि दांत पडला नव्हता. आणि जवळ जवळ शेवटपर्यंत ते बायसिकलवर बसत असत

आम्ही काय शिकतो, काय वाचतो, आमचे दोस्त कशा प्रकारचे आहेत किंवा आमच्या डोक्यांत काय चालत असावे, हे समजून घेण्याची त्यांनी कधींच अिच्छा केली नाहीं. असें जरी असलें तरी वडिलांना काय आवडतें, काय आवडत नाही, याची आम्हांला कल्पना होती. त्यांच्या साध्या, सरळ, स्वच्छ आणि अेकनिष्ठ जीवनाची आमचेवर आपोआपच छाप पडत असे. साहित्याविषयीची त्यांची बेपर्वाअी मात्र आम्हांला बरीच नडली.

कारकुनानें मला विचारलें, "तुम्हांला कसले पुस्तक हवें आहे ?" "मला काय ठाऊक ?" मी म्हणालों. "अेखादें चटकदार पुस्तक तुम्हींच पसंत करून मला द्या" त्यांनीं पांच दहा पुस्तके थोडीशीं चाळून त्यांतील अेक पसंत करून मला दिले आणि म्हटलें, "हें घेऊन जा. हें तुम्हाला आवडेल." त्यानें ही सर्व पुस्तकें वाचलीं होतीं यांत शंका नाहीं. मला दिलेल्या पुस्तकाचें नांव होतें "कामकंदला." तें

नाटक होतें का कादंबरी, तें आता आठवत नाहीं. मुग्धपणें मी तें पुस्तक वाचूं लागलों. मला त्यांत फारशी गोडी वाटली नाहीं. गोडी वाटण्याजोगें माझें वयच नव्हतें. तरी मला अंवढें समजलें की पुस्तक घाणेरडें आहे. अश्लील आहे.

त्या पुस्तकाचा माझ्या मनावर परिणाम झाला त्याहून दुसऱ्याच अेका विचाराचा माझ्या मनावर जास्ती परिणाम झाला. मी मनात म्हणालों, " तर मग केशू देखील अशलीं घाणेरडीं पुस्तकें वाचतो आणि तीं त्याला आवडतात. तो कारकून वयाने मोठा मनुष्य होता. आमच्यासारख्या लहान मुलांना अशलीं पुस्तकें वाचण्याची शिफारस काय म्हणून करीत असावा ? चोरी करावयाची असेल तेव्हां माणसाने तीं अेकट्यानेंच करावी दोघे जण जेव्हां चोरी करतात, तेव्हां आपण चोर आहोंत याची माहिती दोघांना आपापसांत होतेच अेवाद्याशी चोरींत सहकार करूं गेलें तर त्या मनुष्यासमोर तर बेशरम व्हावे लागतेंच ना ? केशू आणि तो कारकून या दोघाचा अेकमेकाविषयीं काय अभिप्राय असेल ? आणि कसलाच संकोच मनांत न बाळगता त्याने असले पुस्तक मला वाचावयास दिले, यावरून माझ्या-विषयीं त्याची कल्पना काय असावी ?

आणि केशू तर माझा वडील भाऊ 'शहाणे व्हावे' म्हणून मला रोज उपदेश करणारा ज्याचा पुढाकार स्वीकारून मी नेहमीं वागत असे, तो कशा प्रकारची पुस्तकें वाचतो याची बातमी मला लागली आहे हें केशूला समजले असलेंच पाहिजे अशा प्रकारची घाणेरडीं पुस्तकें माझ्या हाती कधीं आलीच नाहींत, हे त्या कारकुनाला ठाऊक नसावें पण केशूला तर ठाऊक होतेंच त्यानें मला हे पुस्तक घेतांना किंवा वाचतांना नको कसें म्हटले नाही ?

आम्ही कसल्या प्रकारची पुस्तकें वाचतो याची माहिती वडिलांना नसते, हे मला ठाऊक होतें आणि कुणीहि शिकवल्यावांचून मला आपोआप सुचले कीं अशल्या गोष्टी वडिलांच्यापासून गुप्तच ठेवल्या पाहिजेत

वर लिहिलेली विचारपरंपरा त्या काळीं अशा भाषेंत किंवा अितक्या स्पष्टतेंन मी मांडूंच शकलों नसतों; पण त्यांतील प्रत्येक विचार त्या वेळचाच आहे हें मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों.

" अमुक काम करणें हे वाअीट आहे हे त्या वेळी मला ठाऊकच नव्हतें " असे म्हणून जेव्हां कोणी स्वतःचा बचाव करतो, तेव्हां त्याचें तें म्हणणें मला

सहजासहजी पटत नाही. चांगले काय आणि वाओट काय याची स्थूल कल्पना कोण जाणे कशी, पण माणसाला फार लवकर होत असते.

सुदैवाची गोष्ट ही की त्या वेळेला माझ्यामध्ये असल्या प्रकारच्या साहित्याविषयी गोडीच अुत्पन्न झाली नव्हती. म्यूझियम्स् पहावेत, कविता पाठ कराव्यात, खेळ खेळावेत आणि गोट्टबरोबर गप्पा माराव्यात, हेच माझे मुख्य व्यवसाय होते आणि रिकामा असलो म्हणजे मोठेपणी मोठे मोठे वाडे, आणि अुंच अुंच देवळे आपण कशी बांधू याच्याच कल्पना मनांत घोळत असत. माजरे आणि कबूतरे ही त्या काळच्या माझ्या जीवनात महत्त्वाचे स्थान घेअून बसली होती. अेक ब्राह्मण विधवा म्हातारी आमच्या घरी प्रतिष्ठितपणे भिक्षा मागावयास येत असे. तिच्या तोंडी लोकगीताचा फार मोठा साठा होता. आअीला गाणी फार आवडत असत. अक्कानेच आअीला ही गोडी' लावली होती. अक्काजवळ कितीतरी जुनी गाणी लिहिलेली होती आणि बहुतेक तिला पाठहि होती. सीतेचा विलाप, द्रौपदीचा धांवा, दमयंतीचे संकट, रुक्मिणीचा विवाह, हनुमानाचे लंकेतील पराक्रम, श्रीकृष्णाने गोपांची केलेली विटंबना-असे त्या गाण्यांचे विषय असत. कधी कधी स्मशानवासी वैरागी महादेव आणि त्याची अनन्य भक्ति करणारी पार्वती या विषयीचे लोकगीत सुरू व्हावयाचे. माझ्या आअीला आणि वहिनींना लिहिता वाचता मुळीच येत नव्हते. यामुळे श्रौत पद्धतीनेच त्यांना गीतांचा आस्वाद घेता येत असे. आणि गुरुमुखातून अेक अेक 'अुत्तर' घेअून ती अुत्तर पाठ करीत करीत त्यांनी ती गाणी आपलीशी करावयाची. ती म्हातारी बाअी दोन प्रहरी आमच्या घरी यअी आणि सध्याकाळपर्यंत तिचे आमच्याच घरी ठाणे असे. यांत तिला प्राप्ति चांगली होत असे आणि आअीला आणि वहिनींना काव्यरस मिळे. शाळेत जाण्याची जबाबदारी स्वीकारली नसल्यामुळे आपण या रसाचे भागीदार होत असूं. आअीच्या बरोबर मीहि कितीतरी गाणी सहजासहजी शिकलों होतों. जेव्हा वय वाढले आणि माझ्या डोक्याने घेतले की बायकांची गाणी शिकणे पुरुषाना शोभत नाही, तेव्हां मी प्रयत्नपूर्वक तीं गाणीं विसरून गेलो !

त्या वेळच्या अशा शुद्ध काव्यरसामुळे कामकंदलासारख्या पुस्तकांत मला गोडी वाटली नाही, यांत आश्चर्य कोणते ? तें पुस्तक वाचून संपविण्यापूर्वीच मिरजेचा आमचा मुक्काम संपला आणि आम्ही जत येथें गेलो. मी या प्रकारचे अेवढें अेकच पुस्तक वाचलें. त्या वेळीं त्याचा मनावर कांही परिणाम झाला नाही. पण अुन्हाळ्यांत

जमिनींत पडलेले बीज जसेंच्या तसेच पडून राहातें आणि पाऊस पडतांच अंकुरतें आणि फोफावतें, त्याप्रमाणें वयांत येताच त्या पुस्तकाच्या वाचनानें आपला प्रभाव दाखविला, आणि मनांत मलिन विचार डुगडुगूं लागले. परंतु घरची राहणी, करणी आणि संस्कार शुद्ध, वडिलांची धर्मनिष्ठा मोठी, थोरल्या भावाचा नैतिक पहारा निरंतर जागरूक-यामुळेच त्या मलिन विचारांचे अंकुर जागच्या जागींच दबले गेले, आणि म्हणून कल्पनेच्या विकृतीखेरीज आणखी कांहीं वाईट परिणाम झाला नाही वातावरण शुद्ध असेल तर वाईट वाचनांतूनसुद्धां माणूस थोडा फार वांचूं शकतो वाईट वाचन अनिष्ट तर खरेच; मुलांचे त्यापासून रक्षण केलेंच पाहिजे. परंतु निर्मळ आणि प्रेमळ कौटुंबिक वातावरण हेंच सर्वांत महत्त्वाचें. शुद्ध वात्सल्याचा आस्वाद जेथे मिळतो तेथें जीवन सहजच सुरक्षित राहातें

## यल्लाम्माची जत्रा २१

यल्लाम्माची जत्रा हा कर्नाटकच्या वाजूचा मोठा उत्सव आहे. कानडी भाषेंत 'यल्लां' म्हणजे सर्व, सगळे, आणि 'अम्मा' म्हणजे आई; अर्थात यल्लाम्मा ही विश्वजननी ठरते. तिचे दुसरें नांव आहे रेणुका.

ही रेणुका यल्लाम्मा कोण असावी ? पशुपक्षी, मानव, दानव, कृमिकीट, झाडपान, सर्वांना जन्म देणारी, सर्वांचें भरणपोषण करणारी ही रेणुका कोण असावी ? वंदे मातरम् म्हणून जिचा आपण जयजयकार करतों, तीच ती धरणीमाता होय. असंख्य अणुरेणूंची बनलेली मृण्मयी कृषीमाता होय. अशा या यल्लाम्माचा उत्सव शेतकऱ्यांच्या वांट्याला सर्वांत मोठा उत्सव असलाच पाहिजे. वेदकाळापासून ऋषिमुनी सांगत आले आहेत कीं वर्षण करणारे आकाश किंवा द्यौ हा पिता होय आणि आकाशांतील पर्जन्याचें धारण करून शस्यशालिनी बनणारी पृथिवी ती माता होय

यल्लाम्माची जत्रा दरवर्षी भरते. जत्रेच्या निमित्तानें दूर दूरचे शेतकरी गोळा होतात हुन्नरी गुणी जन आपापलें कौशल्य या ठिकाणीं प्रगट करूं शकतात व्यापारी तऱ्हतऱ्हेचा माल येथें विकावयास काढतात. क्रयविक्रयरूपी महान विनिमयाचा हा दिवस असतो.

पण यल्लाम्माच्या जत्रेचें मुख्य आकर्षण म्हणजे या यात्रेसाठीं मुद्दाम आणलेल्या

बैलांचें प्रदर्शन होय. जर तुम्हांला अुत्तमांतले अुत्तम बैल पहावयाचे असतील, अेकसारख्या आकाराच्या, सारख्या रंगाच्या, सारख्या आकाराच्या शिंगाच्या आणि सारखीच शक्ती असलेल्या बैलांच्या खिल्लारी जोडद्या हव्या तेवढ्या विकत घ्यावयाच्या असतील तर तुम्हीं यल्लाम्माच्या जत्रेला आलें पाहिजे.

मोठीं मोठीं आणि अेका बाजूला झुकलेलीं वशिंडे असलेल्या बैलांना गजगतीनें चालतांना पाहून डोळे खरोखर निवतात. कित्येक बैलांच्या पांढऱ्या पाठीवर रंगांत बुडविलेल्या हातांचे छाप मारलेले असतात. त्यांच्या शिंगांना हुरमुजी तेलीया लाल रंग लावलेला असतो. शिंगाच्या टोकाला भोकें पाडून त्यांत पिवळ्या निळ्या किंवा जांभळ्या रेशमी धाग्यांचे गोंडे लटकावलेले असतात. गळ्यांत घुंगुर तर असलेच पाहिजेत. कित्येक अुंच जातींच्या बैलांच्या पुढच्या डाव्या पायांत चांदीचे मोठे तोडे चढविलेले असतात. किती मजेचे ते दिवस ! प्रत्येक बैलाच्या मालकाची छाती अभिमानानें कशी फुललेली दिसे ! त्याच्या देखत त्याच्या बैलाविषयी कांही म्हणाल तर जरा संभाळूनच बोललेलें बरे. वाटेल तसे बकाल तर तो सहन करणार नाहीं. खरा शेतकरी त्याच्या बैलापासून काम भरपूर घेतो हे खरें; पण तें त्याचें आराध्यदैवत असतें. बैल म्हणजे त्याचा जीव कीं प्राण. बैलाची सेवा तो फक्त लाभाच्या लोभानें करीत नसतो. स्वतःच्या मुलांवरील प्रेमाअितकेंच तो आपल्या बैलावर प्रेम करीत असतो.

अशा जत्रा या मुलखांत जागजागीं होतात आम्ही संस्थानी राजधानी जत येथें असतांना यल्लाम्माची जत्रा पहावयास गेलों होतों. लोकांच्या गर्दीतून वाट काढणें सोपें नव्हतें. संस्थानाकडून दोन पट्टेवाले आमच्या दिमतीला दिले होते. ते आमच्यापुढें चालून, लोकांना चमकावून, आमचेसाठीं मार्ग मोकळा करत असत. ठिकठिकाणीं गांवठी खादीचीं दुकानें लावलेलीं होतीं. आणि दुकानदार दोन हाती गज छातीवर दाबून कापड मापून देत होते. खळ घातलेला कोरा कपडा फाडतांना जो आवाज होत असे तो अितका कांहीं आवडत असे कीं तो अेकण्यासाठींच तेथें क्षणभर थबकून अुभें राहण्याचें मन होअी.

बाजार पहात पहात जात असताना अेके जागीं विशेष गर्दी होती. तेथें आम्हीं जाअून पोहोंचलों. तेथें पाळण्यांचा राहाट फिरत होता. लहानपणीं आमच्या हाती कधीं पैसे येतच नसत. त्यामुळें पाळण्यांत बसून वर खालीं गर गर फिरण्याची अिच्छा झाली तरी ती मनांतल्या मनांतच जिरवावी लागली. पाळण्यामध्यें खेडवळ मुलें आणि कित्येक हौशी म्हातारे बसलेले पाहून मनामध्यें सहज विचार आला कीं आपल्यापेक्षां

हे गरीब लोक किती सुखी आहेत ! मनांत येतांच पाळण्यांत बसूं शकतात. अितक्यांत आमच्या पट्टेवाल्यानें राहाटवाल्याला हुकुमाच्या आवाजांत म्हटलें, "अरे, अे, हीं अंमलदाराचीं मुले आहेत. बशीव यांना तुझ्या पाळण्यांत. " मीं हलक्या आवाजाने पट्टेवाल्याला सांगितले, "पण आमचेजवळ अेक देखील पैसा नाहीं." त्याने माझा हात दाबून माझ्याहून देखील अधिक हलक्या आवाजानें म्हटले, "हरकत नाहीं. तुम्ही बसा तर खरे."

विशेष विचार केल्यावांचून अुत्कंठित मन आम्हाला पाळण्याकडे घेअून गेलें. राहाटवाला राहाट फिरवतां फिरवतां गाणें म्हणत असे. अेक जण किती फेरे झाले ते मोठ्याने "अे-क S, दो-न S" असे मोजत होता. पाळण्यात बसण्याची गंमत तर पुष्कळच वाटली. आम्हीं बसलों होतों म्हणून राहटवाल्यानें पांच दहा फेरे जास्ती घातले. तो मनांत म्हणाला असेल, "बडे बापके बेटे आहेत, घाला चार फेरे अधिक. होअूं देत राजी." तुष्यतु दुर्जनः तुम्हे काय ?

आम्हीं अुतरलों आणि चालूं लागलो. माझ्या मनांत तऱ्हतऱ्हेचे विचार येअूं लागले. शरीर राहाटांतून अुतरले आणि मन चक्कर खाअूं लागलें आपण फुकटांत बसलों आणि भिकारी बनलों. हा मनांत आलेला विचार पुसून टाकण्यासाठीं गर्वे म्हणूं लागला, "भिकारी कसले ? त्यानें कांही दया म्हणून आपल्याला पाळण्यांत बसविलें नव्हतें. आपण अंमलदाराचीं मुलें आहोंत: आपल्या वडिलांनेंच त्यानें आपल्याला बसविलें. जेव्हां तो ठरलेल्या हिशोबापेक्षां जास्त फेरे आपल्यासाठीं घालत होता, तेव्हां बाकीच्या तिन्ही पाळण्यांत बसलेलीं मुलें आणि आसपासचे लोक कसे आपल्याकडेच टक लावून पाहत होते मोठेपणावांचून असे थोडेच होअूं शकलें असतें ?" या विचारानें समाधान होअो; पण पुन्हां मनांत विचार येअो की, "पाळण्यांतून अुतरल्यानंतर आपण चालूं लागलों तेव्हां मनांत लाज वाटली ती कशामुळें ? अितर लोकांनीं अेक अेक पैसा दिला. तेव्हां आपण जर खिशांतून अेक पावली काढून त्याला दिली असती, आणि मग त्याने अगदीं कमर वांकवून मुजरा केला असता तर थोरपणा शोभला असता. पण आपण बोलून चालून मुलें. आपल्याजवळ पैसे कोठून असणार ? होय, ही गोष्ट खरी आहे. पण तशा स्थितींत पाळण्यांत बसावयालाच नको होतें. पण मीं कोठें आपणहून बसावयास गेलों होतों ? सखारामानें मला बसवलें. पण म्हणून काय झालें ? मीं नाहीं म्हणावयास पाहिजे होतें." अशा प्रकारचे कितीतरी विचार मनांत आले आणि गेले. 'पाळण्याच्या राहाटांत बसून

आपली अिज्जत कांहीं वाढली नाही !' हा विचार, मनाला कितीहि समजावलें तरी, डोक्यांतून दूर होईना.

दुसरे दिवशी जत्रेंत बोकडाचा बळी द्यावयाचा होता. गौडेसाहेब (त्यांचे वय जवळ जवळ साठ्या जितकेच होतें.) हजर राहाणार होते. अेका सांगल्या माणलेल्या शोभिवंत तंबुमध्ये श्रीमंत आबासाहेब आणि त्याचे सर्व अमलदार बसले होते. आबासाहेबांनी हिरव्या रंगाचा रेशमी अेगरखा अंगांत घातला होता. डोक्यावर मराठेशाही पगडी तिरपी ठेवून दिली होती. त्यांचे कारभारी दाजीबा मुळे त्यांच्या शेजारीं बसले होते. जत्तर आबासाहेब गंभीरपणें बसले होते. अेवढा लहान मुलगा जितका गंभीर चेहरा धारण करून गप्प बसूं शकतो, हे पाहून त्याचेविषयी माझ्या मनात आदर वाटू लागला. पण तो हें देखील पाहिले कीं खेळीमेळीनें त्यांचेशीं खेळणारा त्यांचा हुजऱ्या दूर अुभा राहून अिशाऱ्यानें त्यांची काहींतरी सूक्ष्म मस्करी करीत असे; तेव्हां आबासाहेबांना स्वतःचें हसूं दाबणें फार कठिण जाअी. मग त्याचेवर चिडून त्याचेकडे पहावयाचेच नाहीं असा निश्चय करून ते दुसरीकडे तोंड फिरवीत; पण ओढाळ दृष्टि तिरप्या नजरेनें पुन्हां त्याच दिशेकडे पाही आणि पुन्हां दोघांची नजरानजर झाली म्हणजे हसूं खुद्कन् बाहेर पडण्याच्या बेतांत येअी. बरे झाले की त्या दोघांना कल्पना नव्हती की तिसरा मी त्यांच्या या गमती गुपचुप रसपूर्वक न्याहाळत होतों.

बाळभूक कडक असते. नऊ वाजायला आले तेव्हां कारभारी साहेबानीं अिशारा करून आबासाहेबांना तंबूमागील राहुटीमध्ये न्याहारी करण्यासाठी पाठविलें. आंत गेल्यानंतर आबासाहेबांना सुचलें असावें की ऑडिटरसाहेबाच्या दोघा मुलांना बोलावलें पाहिजे. आम्ही आंत गेलों. त्यांच्याबरोबर खावयाला बसलो; पण मनांत हुरहुरुख सुरू झाली, "राजा झाला म्हणून काय झाले ? शेवटीं मराठाच ना ? आणि आपण ब्राह्मण. या लोकांबरोबर कसें खावयाचें ?" मी गोंदूच्या तोंडाकडे पाहू लागलो. गोंदू माझ्याकडे पाहूं लागला. आमचेबरोबर कोणी बोलतहि नव्हतें. ही आमची दुसरी अडचण. अितक्यांत कारभारीसाहेब आंत आले. बहुतकरून वडिलांनीं त्यांना सांगितलें असावें. त्यांनीं आम्हांला सांगितले, "मनांत काहीं संकोच

वाळूं नका. हे बुंदीचे लाडू आहेत. ते खाण्यास हरकत नाहीं. तुमचेसाठीं बाहेर लोटयांत पाणी ठेवलें आहे तें प्या." आम्हीं लाडू खाल्ला खरा; पण बरे वाटलें नाहीं. आम्हांला आंत बोलावण्यामध्ये प्रेमभाव नव्हता. कोरा शिष्टाचार होता. काहींच ओळख नसतांना बोलणें तरी व्हावे कसे ? जनावराप्रमाणें मुकाटयानें खाल्ले. ब्राह्मणी पाणी पिऊन घेतले आणि कसेबसे तेथून निघून आम्ही तंबूंत येऊन बसलों.

आतां बळी चढविण्याचा वेळ झाला. अेक मोठ वाटोळें वर्तुळ करून तमासगीर लोक उभे राहिले. मागील लोकांच्या रेटण्यामुळें वर्तुळ लहान होऊं लागलें. व्यवस्था ठेवणारे पोलीस लोक छडी आणि चाबूक चालवून लोकांना मागे हटवूं लागले. अितक्यांत कारभाऱ्यानीं अुठून पोलिसांना दरडावलें, "खबरदार लोकांना मारलें तर ! लोकांना समजावून मागें हटवा." कारभाऱ्यांचा हा हुकूम मला आवडला. अंमलदारांना देखील लोकांविषयी आस्था असते, हा आश्चर्यकारक शोध मला त्या वेळीं लागला. दाजीबाविषयी मला आदर वाटूं लागला.

अितक्यांत वाद्यें वाजूं लागलीं. अेक लहानसें बकरें बळी देण्यासाठी आणले होते. त्याच्या कपाळावर कुंकूं भरलें होतें. गळ्यांत फुलांच्या माळा होत्या. अेका खोलशा खाअीमध्यें रसरशीत निखारे होते. खाअीच्या आसपास केळीची झाडे अुभीं केलीं होतीं. अेकानें खाअीच्या अेका बाजूला अुभें राहून बकऱ्याचे मागचे पाय धरले दुसऱ्यानें दुसऱ्या बाजूनें पुढचे पाय धरले. मध्ये बिचारे बकरें खाअीवर ताणलें गेलें. अितक्यांत तेथे गुरव आला. त्याच्या हातांत तलवार होती माझ्या पोटांत कसेंसेंच होअूं लागले. कंठ दाटून आला मी तावडतोब तोंड फिरवले

आसपासच्या लोकांनीं "अुदो अुदो" चा जयजयकार केला बकऱ्याचे तुकडे खाअीतच टाकले असावेत गुरव आणि त्याच्या बरोबरची मंडळी त्या जळत्या खाअीत पाय ठेवून पलीकडे गेले असतील. बघतां बघतां सर्वत्र अव्यवस्था झाली. आम्हीं सर्व मंडळी आपापल्या वाहनांत बसून गर्दीतून कसाबसा रस्ता काढीत, आपापल्या मुक्कामीं पोहोंचलों.

यल्लाम्माला असले बलिदान आवडत असेल काय ? यल्लाम्माला ठाअूक आहे कीं

चिखल खाऊन झाडे जगतात. झाडपाला आणि गवत खाऊन पशू जगतात. आणि पक्षी आणि जीव जंतु खाऊन जगतात. मनुष्य तर धान्य, भाजीपाला आणि पशुपक्षी, सर्वांनाच मारून खातात सूक्ष्म रोगजंतू मनुष्याला खातात; आणि हवा, माती आणि सूर्यप्रकाश सूक्ष्म जंतूंचा नाश करतात. अशा रीतीनें हिंसाचक्र चालूच आहे. "जीवो जीवस्य जीवनम्" पण या सर्वांची माता ती यल्लाम्मा ती अशनाशा आणि पिपासा दोन्हीचा पर आहे. म्हणूनच तर ती यल्लाम्मा आहे. तिला बलिदान कसले द्यावयाचे ? तिच्याच मतन आत्मबलिदानामुळें तर आपण सर्व जगत असतों. तिला बलिदान देण्याचे विधान असूंच शकत नाहीं. तिचे स्वत चे बलिदान पाहून, अुलट आपणच आत्मबलिदानाची दीक्षा घ्यावयाची आहे

जोंवर जनावरकडे आपण खाद्य वस्तु किंवा मालमत्ता म्हणूनच पाहात होतों, तोंवर जनावराचा बळी देणें हें क्षम्य होते पण जनावरे देवीला आपलींच मागसलेली भावंडें आहेत, यल्लाम्माचीं तीं बाळकें आहेत, हे पटल्यानंतर त्यांचा बळी देणे म्हणजे धर्माच्या नांवाने शुद्ध अधर्म करण्यासारखे आहे.

## विठोबाची मूर्ति २२

जत हें दक्षिण महाराष्ट्रांतील अेका संस्थानाची राजधानी आहे. तेथून आम्ही पंढरपूरच्या यात्रेला निघालो होतो. हिंवाळ्याचे दिवस होते. थंडीने कसा अवतार मांडला होता ! बैलगाडींत सगळा दिवस बसून रहाण्याचा आम्हांला कंटाळा येअी. तसे पाहिले तर सरकारी गाडी होती सुंदर आणि सोयीस्कर; पण आमच्यासारख्या मुलांना अेकसारखें बसून रहाणें कसे आनंदावे ? आम्हीं सकाळ संध्याकाळ गाडीबरोबर चालत असूं. यामुळें गाडीत बसणाऱ्या लोकांना थोडी अैसपैस जागाहि मिळे. हिंवाळ्यात मातींत चालल्यामुळें पाय फाटत. पायांचे तळवेच नाहीत, तर घोट्यापर्यंत सगळ्याच पायाचें कातडें फाटत असे. वरचे नळ देखील कसे पॉलिश पेपर ( काच कागद ) प्रमाणें खरखरीत होत; आणि पायांच्या भेगांमधून रक्त निघे. रात्रीचीं जेवणे अुरकली म्हणजे साबू आणि अुन पाण्यानें वडील आमचे पाय धुवून काढीत. पायाची अशी आग होअी की नको हें धुणें, असें होअून जात असे. पायाला आणि गाला-ओठाना आअी दुधावरील साय लावीत असे. त्यानें मात्र बरे वाटे. केव्हां केव्हां डोळ्यांत झोंप भरल्याचा बहाणा करून मी डोळे बारीक करून बसत असें आणि साथीचे बोट ओठांजवळ येतांच चट्कन नें तोंडांत घेअून सर्व साय चोखून घेत असे. "अरे

लबाडा ! जागाच आहेस, होय ?" असें म्हणून आजी मला रागे भरे पण अशा रीतीनें माय मटकावल्याचे आजीला वाजीटच वाटत होतें असे म्हणता येत नाहीं.

आमच्या प्रवासात अेके दिवशीं संध्याकाळीं अेका गांवीं आम्हीं मुक्काम केला गांवांत धर्मशाळा नसल्यामुळें विठोबाच्या मंदिरांतच आम्ही तळ दिला होता. पंढरपूरच्या आसपासच्या प्रत्येक गांवात विठोबाचे मंदिर हे असावयाचेंच आणि तेथें विठोबा आणि रखुमाअी यांच्या मूर्ती 'कर कटावरी ठेवूनीया' अुभ्या असावयाच्याच. आणि पाय चरोवर जोडलेले. दिवेलावणीची वेळ झाली की गांवांतील लोक - स्त्रीपुरुष –अेकामागून अेक देवदर्शनाला येत, आणि विठोबाला क्षेम देअून पायांवर डोकें ठेवून परत जात. अिकडील प्रदेशांतील हा रिवाजच आहे. आम्हांला मात्र हे सर्व पाहून मोठे आश्चर्य वाटले.

प्यायचे पाणी थोडया दूरवर असलेल्या झऱ्यातून आणावयाचे होतें. वहिनी, गोदू आणि मी असे तिघेजण पाणी आणावयास गेलों. अंधाराचा रस्ता. थंडीमुळें बत्तिशी कडकड वाजत होती. मीं हातांतील ताब्या झऱ्यांत बुडवला. अरे बापरे ! जणू काय अेखादी अिंगळी डसावी त्याप्रमाणे हाताचे झालें. पाणी अितके गार कीं, बोटें आंखडून हातांतील लोटा निसटला आणि झरांत पडला. माझी ही अशी स्थिति पाहून गोंदूने हिंमत केली आणि पाण्यांतून लोटा बाहेर काढला; अितकेच नव्हे तर आम्ही चरोवर आणलेलीं अितर भांडीहि त्याने भरून काढलीं आणि आम्ही कसेबसे मुक्कामावर परत आलो. गोदूची ही हिंमत पाहून त्याचेविषयी मला पुष्कळ आदर वाटला. त्याचे नेहमींचे सूत्र असें होतें की, आज दु.ख सहन केले तर अुद्या आपल्याला सुख मिळणार आहे. आज जर भिरच्या खाल्ल्या तरच अुद्यां आपल्याला साखर खावयास मिळेल. अशा सूत्रांचा अक्षरशः अर्थ करून तो त्याचें आग्रहाने पालन करीत असे. त्यामुळें त्याच्यामध्ये तितिक्षा चांगली वाढली होती. मी देखील तितिक्षा दाखवीन असे खरा; पण तें बहादुरीच्या कल्पनेने किंवा अिरेला पडून.

पाणी आणून आम्ही आअीला दिले. रात्र झाल्यामुळें गांवकऱ्यांचे येणें जाणेहि बंद झालें. विठोबाच्या अेका बाजूला अुंच लाकडी ठाणवीवर दिवा तेवत होता. आतां गोदूचा भक्तिभाव जागृत झाला. गांवच्या लोकांप्रमाणें आपणहि विठोबाला क्षेम द्यावें असें त्याच्या मनानें घेतले. हळूच मंदिराच्या गर्भगृहांत जाअून भक्तियुक्त अंतःकरणानें त्याने विठोबाला आलिंगन दिले. पण अरे ! हें काय झाले ? भगवंताची अतर्क्य लीला खरी. विठोबाची मूर्ति आपलें स्थान सोडून गोंदूच्या हातांतच आली ! गोदूच्या

छातीला विठोबाचा भार झेपेना. त्याने ओरडून मला हांक मारली, "दत्तू, दत्तू, अिकडे ये; हे बघ, काय झालं ?" मी धांवत गेलो. पहातों तों विठोबाच्या मूर्तीचे पाय घोटयाच्या कांहींसे वर मोडलेले आहेत. आतां काय करावें ? गहजब झाला ! विठोबाची भक्ति बरीच महाग पडली. थोडयाशा प्रयत्नाने विठोबाला गोंदूच्या मिठींतून सोडवला. मग आम्हीं दोघांनीं विठोबाला त्याच्या स्वतःच्या पायांवर अुभे करण्याचा प्रयत्न केला; पण अठ्ठावीस युगें अेकाच विटेवर अुभा राहून विठोबा अगदीं कंटाळून गेला होता. तो कांहीं केल्या अुभा होअीना ! आमचे कांही चालेना; तेव्हां गोंदू नको नको म्हणत असतांना मुद्दां मी वडिलांना हांक मारली आणि घडलेली स्थिति कळविली. त्यांनीं अगोदर मूर्ति जेमतेम अुभी केली आणि मग आम्हां दोघांची चागलीच हजेरी घेतली. माझा स्वतःचा यात कांहींच दोष नव्हता. पण मला वाटलें कीं, मीं माझा बचाव केला तर गोंदूला जास्त बोलणीं सोसावीं लागतील. त्यापेक्षा गुपचुप बोलणें सोसलें तर त्या विचाऱ्याचे दुःख तितकेच कमी होअील. याखेरीज दुसरेंच अेक कारण होतें. सुखदुःख जे काही आपल्या वांटयास येअील त्याची तिघांत सारखी वांटणी करावी असा केशूचा, गोंदूचा आणि माझा करारमदार झाला होता. ( या प्रवासांत केशू बरोबर नव्हता तो पुण्याला शिकावयाला असे. ) रागें भरून घेण्यांत माझा वांटा मी अुचलला; पण त्याबरोबर विठोबाला आलिंगन दिल्यामुळें घडणाऱ्या पुण्याचा अर्धा वांटाहि मला मिळेल कीं नाही, याचा विचार माझ्या मनाला शिवला नाही.

दुसरे दिवशी सकाळी गावांतील अेक मुलगी मंदिरांत विठोबाला क्षेम देण्यासाठी आली. अुभें राहून राहून अगदी कंटाळून गेल्याचें विठोबानें तिलाहि कळविलें. अथरुणांत पडल्या पडल्या आतां काय होतें याची मी वाट पहातच होतों. ती मुलगी मुळींच घाबरली किंवा गोंधळली नाहीं. अंथरुणातून मीं हें सर्व पहात आहें, हें लक्षांत येतांच ती म्हणाली, "या मूर्तीचे पाय पूर्वी अेकदां मोडलेच होते. गांवांतील लोकांनी कसेबसे बसविले होते. आज पुनः ढिले झालेसे दिसतात."

रॉयटरच्या वार्ताहराच्या वेगाने मी घडलेला समाचार प्रथम गोंदूला आणि नंतर वडिलांना कळविला. आम्हां तिघांना हायसें वाटले.

थंडीमुळें शरीर मात्र चांगलेंच कांपत होतें.

लोकमान्यांनी हिंदुधर्माची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे

*प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु, साधनानाम् अनेकता ।*
*अुपास्यानाम् अनियमः, अेतद् धर्मस्य लक्षणम् ॥*

या श्लोकात हिंदुधर्माची अुदारता आणि विशेषता दोन्ही व्यक्त झाल्या आहेत. अीश्वराला ओळखण्याची आणि अीश्वराची प्राप्ति करून घेण्याचीं साधनें अनेक आहेत; कारण मनुष्याचा स्वभाव विविध आहे. त्याचप्रमाणें अेकेश्वरवादी हिंदुधर्मांत अुपास्यदैवतें अनंत आहेत, कारण अीश्वराच्या विभूतीना अंत नाहीं. साधन आणि अुपास्य या बाबतींत कुलधर्मदेखील आड येत नाही. पुष्कळदां असें दिसून येतें कीं, अेखाद्याचा कुलदेव निराळा असतो आणि अुपास्यदैवत दुसरेच असतें. स्वतःचें अुपास्य स्वतःच्या अभिरुचीप्रमाणे मनुष्यानें ठरवावयाचे असतें.

माझी मुंज झाली त्यापूर्वीच म्हणजे पुष्कळच लहान असतांना मला स्वतःचें अुपास्य पसंत करण्याचें सुचलें. धर्माचे गूढ रहस्य न समजतां फक्त अैकलेल्या व वाचलेल्या पौराणिक गोष्टींवरूनच मला तें स्वयंवर करावें लागले होतें. आमची कुलदैवतें म्हणजे मंगेशमहारुद्र आणि महालक्ष्मी. महालक्ष्मी ही वैष्णवी शक्तिहि असूं शकते आणि शैवी शक्तिहि असूं शकते. मंगेश शब्दाची व्युत्पत्ति अजून

निश्चित झालेली नाही. कित्येकांचे म्हणणे आहे की आदिमाया पार्वतीनें जंगलातील अेका वाघाला भिऊन "त्राहि मां गिरीश" अशा धावा केला. भयानें वाणी अस्पष्ट झाल्यामुळें "त्राहि मां गीश" असे शब्द तोंडांतून निघाले. महादेवाला तेंच नांव आवडलें, आणि "मार्गीश" चे "मंगेश" असें पुढे झाले. सह्याद्रि खंडांतील पौराणिक गोष्टींतील ही उपपत्ति मला ग्राह्य वाटत नाही. मला वाटतें कीं, मूळ नांव मंगलेश असावे. त्यानेच रूप मंगेश झाले असेल. असेहि असो, शिव आणि शक्ति हा आमची कुलदैवतें.

पण पंढरपुरला जाऊन आल्यानंतर माझी विशेष भक्ति बसली ती विठोबावर गोंदूची श्रद्धाहि साक्षेप्रमाणेच विठोबावर बसली होती. तेव्हां आम्हीं दोघांनी वडिलांचेकडे, आम्हांला हरिविजयाची पोथी आणून द्या, अशी मागणी केली. हरिविजयात श्रीधरकवीनें भागवतातील कृष्णकथा मराठीत आणली आहे आम्ही दोघांनीं हरिविजय वाचला. त्यांतील कांही भाग समजून येअी; काही भाग समजत नसे कृष्ण-गोपींचा शृंगार त्यामध्यें पावलोपावली येत असे. पण आमच्यासारख्या लहान मुलांना त्यांतील काय समजणार ? श्रीकृष्णाच्या खोड्या आणि पराक्रम याचे वर्णन येअी तेव्हा आम्हाला गमत वाटे बाल्यकाळ केव्हांहि अद्भुतरसाचा आणि हास्यरसाचाच भुकेला असतो.

आमचे हरिविजयाचे पारायण चालले होतें, त्या दरम्यान पुण्याहून केशू आला तो तेथे बाबाबरोबर राहून शिकत असे. ( सर्वांत वडील बंधूना आम्हो बाबा म्हणत असूं. ) बाबाच्या सहवासात त्याला उच्च नीतीचा उपदेश मिळत असे. पुण्याच्या वातावरणात त्याला धर्माभिमानाची शिदोरीहि चांगली मिळाली होती. या सर्वांचे विचित्र मिश्रण घेऊन तो घरी आला होता. आम्हाला हरिविजय वाचीत असलेले पाहून त्याने आश्चर्य व्यक्त केले त्याने आम्हांला समजावले कीं, श्रीकृष्ण कांहीं चांगला देव नाही तो त्रैण देव आहे त्याने गोपीबरोबर केलेला लीला गचाळ आहे. अशा व्यभिचारी देवाची पूजा करूंच नये खरा देव काय तो अेक महादेव. आणि तोच आपला कुलदेवहि आहे. आपण हातांत तागडी घेऊन सोनें जोखणारे वैष्णव बुद्धी सराफ थोडेच आहोत की आपण विष्णूची भक्ति करावी ? *

* बेळगावकडे आणि कोंकणात आमच्या जातीपैकी काही लोक वैष्णव आहेत. ते सर्व सराफीचा धंदा करतात. ते भागवत धर्माप्रमाणें चालणारे. आमचेसारखे शैव, ते स्मार्त धर्म पाळणारे. आम्ही स्वतःला त्याचेपेक्षा उच्च मानणारे ! आम्ही होता होअील तो आमच्या मुली सराफांच्या घरी देणार नाही. त्याच्या मुली करूं खरे; पण मुलगी सासरी आल्यानंतर प्रयत्नपूर्वक तिचे वैष्णवपण काढून टाकून तिला स्मार्तसंस्कार देण्यांत येत. आता या सर्व गोष्टी जुन्या झाल्या. आतां पूर्वीसारखा हा भेद उरला नाही

गोंदूला केशूची टीका मुळींच आवडली नाहीं. हरिविजयावरील त्याची भक्ति कायम राहिली. मी केशूचा लाडका. केशूचें म्हणणें मला ताबडतोब पटत असे. मी हरिविजय फेंकून दिला, आणि रुष्णनिंदेमध्ये मला गोडी वाटूं लागली. केशूच्या अिच्छेप्रमाणें अर्धी गोष्ट साधली, पण कुलदेव महादेवाला मीं माझे अुपास्यदैवत बनवूं शकलों नाही. महादेव कुलदेव खरा, पण आपलें अुपास्यदैवत निराळेंच असलें पाहिजे, असें माझ्या मनानें घेतले होतें. मीं अेकदा वडिलांना विचारलें कीं, "देव आहेत किती ?" मला गंभीरपणें अुपास्याचें स्वयंवर करावयाचें होतें. तेव्हां देव आहेत तरी किती, तें कळलेलें बरें असे वाटून मी वडिलांना तो प्रश्न केला. वडिलांनीं सांगितलें, "देव आहे तर अेकच, आणि तो सर्वत्र आहे. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, सर्वत्र देव आहे. तुझ्यांतहि आहे आणि माझ्यांतहि आहे. पण अेकंदर देव तेहतीस कोटी आहेत असे म्हटले जातें." मी वडिलांना विचारलें, "हे तेहतीस कोटी देव तुम्हांला ठाअूक आहेत ?" माझा प्रश्न जरा अडचणीचा होता. वडील म्हणाले, "देव कितीहि असले तरी ते सर्व पांच देवाचेच अवतार. पंचायतनामध्यें झाडून सगळ्या देवांचा समावेश होतो." मी विचारलें, "पंचायतन म्हणजे काय ?" वडील म्हणाले, "शि ना ग र दे" मला कांहींच बोध होअीना. तेव्हां वडिलांनी हंसून समजावले, "पहा, शि म्हणजे शिव, ना म्हणजे नारायण, ग म्हणजे गणपति, र तो रवि आणि दे म्हणजे देवी. या पांचांची पूजा केली म्हणजे सर्व देवांची पूजा घडते. आपल्या रुचीप्रमाणे या पांचांपैकीं अेकाला मुख्य समजून मध्यें ठेवावयाचे. त्याच्या सभोवती बाकीच्या चारांना बसवावयाचें आणि सर्वांची पूजा करावयाची. याला पंचायतनपूजा म्हणतात."

मला हवें असलेलें मिळालें. या पांचांतून मला माझे अुपास्य पसंत करावयाचें आहे, अेवढें ठरले. यांपैकीं शिव तर आपला कुलदेव आहे. त्याचें नांवहि पहिलें आहे. पण तो फार क्रोधी आहे. जराशी कुठें चूक झाली, गफलत झाली, तर सत्यनाश करावयाचा. त्याच्यासमोर जीव मुठींत धरून रहावयाचे हें कांहीं आपल्याला झेपावयाचें नाहीं. यानंतर येतो नारायण म्हणजे रुष्ण. तो तर कुकर्मी. त्याची अुपासना कोण करतो ? गणपति वर्षातून अेकदां घरीं येतो आणि त्या वेळीं आपल्याला मोदक खावयास मिळतात; हें जरी खरे असलें तरी तो विद्येचा देव. त्याची शाळेंतच पूजा करावी. आणि शेवटीं तो तर महादेवाचा मुलगा. तो कांहीं फार मोठा देव नव्हे. रहातां राहिली देवी. पण ती बायकोमाणूस. पुरुषांनीं तिची कसची पूजा करावयाची ?

पांचामधून अेकहि दैवत पसंतीला अुतरलें नाहीं. पण पांचांची निंदा मनांत आणली, हेंच मनाला खवखवूं लागलें. आतां जर या पांचहि देवांचा कोप झाला तर काय काय संकटें येअून पडतील कोण जाणे. मनांतल्या मनांत मी पांचहि देवांची क्षमा मागूं लागलों. महादेवाची सर्वांत जास्त. तरीपण अुपास्याची पसंती मी केली नाहीं ती नाहींच.

याच काळांत वडिलांना पूजा करण्यांत मी मदत करीत असे. आमच्या देव्हाऱ्यांत पुष्कळ देव होते. सर्वांना काढून ताम्हणांत ठेवणें, त्यांना धुअून पुसून त्यांच्या जागीं पुनः ठेवणें, त्यांना गंध लावणे, अक्षता आणि फुले वाहणें, हें बरेंच मेहनतीचे काम होतें. मला या कामाची मोठीच गोडी होती. त्यामुळें वडिलांचें तेवढेंच काम सोपें होत असे. त्यांचा वेळहि वांचत असे. पूजेचे मंत्र मला येत नसत, पण तंत्र सर्व अंगवळणीं पडलें होतें. अेके दिवशीं देव्हाऱ्यांत मूर्ती बसवीत असतांना मनांत विचार आला कीं, या बाळकृष्णाला देवीच्या मूर्तीजवळ ठेवतां कामा नये. बाळकृष्ण दिसतो लहान; पण ज्याप्रमाणें राधेच्या घरीं तो अेकाअेकीं मोठा झाला, तसेंच जर येथें झालें तर बिचाऱ्या देवीला निष्कारण त्रास व्हावयाचा. चारित्र्यहीन देवावर विश्वास न ठेवलेलाच बरा. शेवटीं बाळकृष्णाला, देव्हाऱ्याच्या अेका बाजूला बसवूं लागलों आणि देवीला अगदीं दुसऱ्या टोंकाला. अेवढ्यानेंहि संतोष न झाल्यानें सुरक्षितता अधिक दृढ करण्यासाठीं देवीच्या शेजारीं मीं गणपतीला बसवीत असें. या जबरदस्त देवाच्या शुंडादंडापुढें बाळकृष्ण जवळ येण्याची हिंमतच करणार नाहीं असें मीं मानीत होतों.

माझे विचार अशा पद्धतीनें चालत होते आणि त्याच वेळीं माझें पौराणिक वाचन देखील जोरानें चाललें होतें. वाचतां वाचतां मला दत्तात्रेय सांपडला. माझ्याच नांवाचा तो असल्यानें त्याचेविषयीं मनांत पक्षपात वाटणें स्वाभाविक होतें. अगदीं लहानपणापासून, कोण जाणे कशामुळें, माझ्या मनांत स्त्रीद्वेष शिरला होता. माझ्या अगदीं लहानपणच्या संस्मरणांत स्त्रीजातीविषयीं अनास्था असल्याचें दिसून येतें. दत्तात्रेय या देवतेमध्यें मला अेक लाभ हा दिसला कीं, ब्रह्मा, विष्णु, महेश, या तिन्ही देवांचा त्यांत अंतर्भाव होतो. शैवांचे आणि वैष्णवांचे झगडे दत्तात्रेयापुढें शांत होतात. ब्रह्मदेवाविषयीं माझ्या मनांत फारशी अनुकूलताहि नव्हती. पण तशीच प्रतिकूलताहि नव्हती. त्याला चालवून घेतां येअील. पण हरि-हर अेकत्र करतां आले, याहून अधिक चांगली गोष्ट ती कोणती ? याखेरीज दत्तात्रेय ब्रह्मचारी होता. बस्स, आपल्याला हाच देव चांगला.

पढरपूरहून येतांना आम्ही दत्तात्रेयाची अेक मूर्ति आणली. गोंदू अेक लहानशी चिंधी घेअून दत्तात्रेयाला तिचें धोतर नेसवीत असे. मला हें मुळींच आवडत नसे. मी त्याला म्हणे कीं, " पितळेच्या मूर्तीमध्येंच काचा घातलेलें पितळेचें धोतर कोरलेलें आहे. त्यावर पुनः हें चिंधीचें धोतर घालून कसली शोभा येणार आहे ?" गोंदू म्हणे, "पण पंढरपूरला तूं नव्हतेंस पाहिले कीं विठोबाला रेशीमकांठी धोतर नेसवीत असत. त्याच्या अंगांत अंगरखा घालीत असत. डोक्याभोंवतीं फेटा गुंडाळीत आणि हिंवाळा होता म्हणून अेक रजअी देखील विठोबाला पांघरायला देत."

आमचा मतभेद कायमच राहिला. दत्तात्रेयाची जितकी म्हणून स्तोत्रें मिळाली तीं सर्व मीं श्रद्धा-भक्तीनें अैकलीं. दत्तात्रेयाला औदुंबराच्या झाडाखालीं बसणें आवडत असे, हें वाचल्यानंतर मी देखील कुठे अुंबराचें झाड दिसले म्हणजे त्याच्या छायेला जाअून बसत असें. 'घेवडया शेंगाची बहु तुज गोडी' हा चरण कानीं पडल्यानंतर मीं देखील घेवडयाच्या शेंगा आवडीनें खाअूं लागलों.

आतां मला गुरुचरित्र वाचण्याची अिच्छा झाली. महाराष्ट्रांत नृसिंहसरस्वति म्हणून अेक अवतारी पुरुष होअून गेले. त्यांना दत्तात्रेयाचा अवतार समजून त्यांच्या लीलेचें वर्णन गुरुचरित्रांत केलेलें आहे. या सर्व कथांमध्यें मुख्य वस्तु हीच होती कीं, अनेक रीतीनें दुःखी झालेल्या लोकांच्या दुःखांचें ते निवारण करीत. असा आर्तत्राण देवच सर्वांत श्रेष्ठ, असें माझ्या मनानें घेतलें. दत्तात्रेय स्वतः तपस्वी, सर्व प्रकारचे कष्ट सहन करणारा आणि शुद्ध ब्रह्मचारी. पण लोकांचें दुःख पाहिलें कीं त्याला फारच लवकर कळवळा येअी. मला वाटे कीं, हे सर्व गुण आपल्यांत येतील तर किती चांगलें होअील ! माझ्या बुद्धीप्रमाणें मी दीन दुःखी जनांचा शोध करूं लागलों आणि शक्य तेथें लोकांच्या अुपयोगी पडूं लागलों. स्वार्थाचा कसलाहि विचार न करतां निष्काम भावानें दुसऱ्याची सेवा करणें, हा त्या वेळीं माझ्या जीवनाचा आदर्श बनला.

आमच्या घरीं रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप आणि शिवलीलामृत अितक्या पोथ्या होत्याच. आमचें गुरुचरित्र मामांच्या घरीं वाचावयास नेलें होतें. मामांच्याकडून तें आणवून द्या किंवा नवें विकत घेअून द्या, अशी मागणी मीं वडिलांचेकडे मांडली. कर्म-धर्म-संयोगानें त्याच वेळीं आअी तेथें होती. आअीनें जरा गंभीर होअून माझ्या मागणीला मोडता घातला. आपल्या घरीं गुरुचरित्र लाभत नाहीं; अक्कानें

गुरुचरित्र वाचावयास सुरुवात केली आणि त्याच वर्षी ती आपल्याला सोडून गेली. आजीनें अक्षीं दुसरीं अुदाहरणेंहि सांगितलीं आणि माझी मागणी रद्द झाली. त्या वेळीं मला वाअीट वाटलें खरे; पण आअीला दुःख देण्यापेक्षां गुरुचरित्र वाचण्याचा आग्रह सोडून द्यावा, असें मीं माझ्या मनाशीं ठरविलें. आणि तो विचार कायमचा झाला. लहानपणीं अेकदां गुरुचरित्र अैकलें होतें खरे. पण अजून तें मी वाचले नाहीं. त्यानंतर अैकल्याचेहि स्मरणांत नाहीं.

मोठा झाल्यानंतर मी संस्कृत शिकलों तेव्हां दत्तात्रेयाचीं संस्कृत स्तोत्रें वाचलीं; त्यांत जारण, मारण, अुच्चाटन, आणि हुं फट् स्वाहा, असल्या विचित्र गोष्टी पाहून त्या अुपासनेवरील माझा मोह दूर झाला. पुढें मला दिसून आले कीं, दत्तात्रेयाच्या अुपासनेमध्यें आकाशातील ग्रह गुरु, विद्या शिकून नवीन जन्म देणारा गुरु आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांना अेकत्र करून बनविलेला दत्तात्रेय या सर्वांची खिचडी झाली आहे आणि त्यांतच वाममार्गी तांत्रिक प्रकार घुसल्यामुळें सर्वच घोटाळा झाला आहे. यांपैकीं गुरु-भक्ति हीच काय ती खरी आहे. गुरु-भक्तीनेंच चारित्र्य दृढ होतें. पुढे पुढे मला असें दिसून आले कीं, दत्तात्रेय हें परमात्म्याच्या त्रिगुणात्मक विभूतीचें प्रतीक आहे. त्रिगुणातीत वृत्ति ज्यानें कमावली आहे, अशा अ-त्रि ऋषींचा तो मुलगा. असूयाशून्य अनसूया वृत्तीच्या पोटी जन्मलेला, सेवेसाठीं त्यानें स्वतःला देऊन टाकले, अर्पण केलें म्हणून त्याला दत्त म्हणूं लागले.

हें सर्व समजले. पण माझी अुपासना काहीं निश्चित झाली नाहीं. कधी मी दत्त अवधूताचें नाम घेत असें, कधीं कधीं "जय हरि विठ्ठल" चा गजर चालवीत असें. कधी "निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाअी अेकनाथ नामदेव तुकाराम" यांना शरण जात असें. पण पुष्कळ वेळा "सांब सदाशिव सांब सदाशिव, शिव हर शंकर सांब सदाशिव" हीच धून चालवीत असें.

शेवटीं हें सर्व सोडून देऊन मीं प्रणवमंत्राच्या जप घेतला. आणि ॐ काराचा गंभीर ध्वनि ललकारूं लागलों.

*पंढरीचे वाटे बाभळीचे कांटे ।*
*सखा माझा भेटे पांडुरंग ॥*

पंढरपूरला जाऊन यावे आणि तेथे विठ्ठलाचें दर्शन घ्यावें असें ज्याला कधींच वाटलें नाहीं, असा अंक तरी महाराष्ट्रीय असेल का ? अगदीं बाल्यकाळापासून पुंडलीकाच्या आणि नामदेवाच्या, ज्ञानदेवाच्या आणि गोऱ्या कुंभाराच्या गोष्टी ऐकत होतों. चोखामेळा आणि जनाबाओ यांच्या अभंगांनीं पवित्र झालेले पंढपूरचें वातावरण आपणाला केव्हां पहावयाला मिळेल, असें लहानपणापासून आम्हांला वाटत असे. पण पंढरपूर म्हणतांच जे पहिलें चित्र डोळ्यांपुढे येअी, तें तुकाराम-महाराजांचें. पंढरीसंबंधाचा ओढा जर कोणी मनामध्ये दृढ केला असेल तर तो तुकारामाच्या अभंगांनी.

पुष्कळ वर्षांची ही भुत्कंठा जेव्हां तृप्त होण्याची संधी आली, तेव्हां मला तर आपण नव्याच जगांत जातो आहोंत असें वाटूं लागलें. जतहून बैलगाडींत बसून आम्हीं पंढरपूरला गेलो, हें मागे सांगितलेंच आहे. बैलगाडींत बसून किंवा पायीं प्रवास करण्यांत जो आनंद वाटतो, जो अनुभव मिळतो आणि जी स्वतंत्रता असते, तीं आगगाडींतून प्रवास करण्यांत मिळत नाहींत.

पंढरपूरच्या वाटेवर कुठल्याशा गांवीं संध्याकाळीं अेका धर्मशाळेंत आम्हीं उतरलों होतों. तेथेंच अेक वारकरी येऊन उतरला. अंधार होत आला होता. हातपाय धुऊन येऊन त्यानें धर्मशाळेंत अेका कोपऱ्यांत आपलें सामान लावलें आणि आपल्या बोचक्यातून दशम्यांचे थोडे तुकडे काढून त्यानें ते अेका वाटींत घातले. आणि त्यावर पाणी ओतून ती वाटी अेका कोपऱ्यांत ठेवून दिली. हे तुकडे पाण्यानें चांगले मऊ झाल्यानंतर मगच ते त्याला खाणें शक्य होतें. कारण तोंडांत फारच थोडे दांत उरले होते. म्हाताऱ्याचें वागणें अत्यंत प्रेमळ, निस्पृह आणि संस्कारी होतें. दशम्याचे वाळके तुकडे भिजत ठेवून देऊन त्यानें आपली पोथी उघडली आणि नित्यपाठाचे अभंग वाचण्यास सुरुवात केली. लहानपणापासून अभंग अैकण्याची मला गोडी असे. मराठीमध्यें अभंग आणि ओवी या वृत्तांत जें साहित्य आहे, तेंच धर्मपरायण महाराष्ट्राचें अमूल्य धन आहे. हीं दोन्ही वृत्तें अत्यंत सोपीं पण वक्तृत्वपूर्ण आहेत. वाटेल तो रस या वृत्तांतून आळवितां येतो.

त्या वारकऱ्यानें तुकारामचरित्राचे अभंग सुरू केले आणि सद्गदित होऊन तो ते वाचूं लागला. त्या अभंगांतील भाव, वासरानें गायीचें दूध प्यावें त्याप्रमाणें, मी ग्रहण करीत होतों. वारकऱ्याचा भक्तिभाव अगदीं बावनकशी होता. जेव्हां तुकाराम सदेह स्वर्गाला गेला हा भाग आला, तेव्हां म्हाताऱ्याच्यानें अभंग बोलवेनात. त्याचा गळा दाटून आला. डोळे आंसवांनीं डबडब भरले आणि बराच काळ तो स्तब्ध बसला. मध्येंच अेकदां हुंदका आल्याचाहि भास होअी.

अशा रीतीनें संध्याकाळचा नित्यपाठ संपल्यानंतर त्यानें शरीराला त्याचा कर दिला, आणि पंढरीला जाण्याची शक्ति आपल्या पायांत अजून आहे, याची धन्यता मानून तो झोंपीं गेला. पण त्याच संध्याकाळीं त्यानें माझें हृदय खऱ्या भक्तीला जागें केलें. ( याच प्रसंगाविषयीं यापूर्वी कोठें तरी लिहिल्याचें स्मरतें म्हणून येथें विस्तार करीत नाहीं. ) या वारकऱ्यासारख्या लोकांनींच महाराष्ट्रांतील भूमि पावन केली आहे. खुद्द पंढरपूर म्हणजे पवित्रांतील पवित्र भूमि. तेथील प्रत्येक खडा आणि धोंडा संतांच्या चरणानें पुनीत झालेला. पंढरींतील प्रत्येक वस्तु सुंदर आहे, पवित्र आहे, हितकर आहे, असें मानण्याची प्रथमपासूनची मनाची तयारी होती. मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा बसलेले आंधळे-पांगळे, कुष्टरोगी, आणि अितर दुर्दैवी लोक देखील जणुं अेका नव्याच दुनियेंतील लोक आहेत, असें त्या वेळच्या माझ्या नजरेला भासत होतें.

मुक्कामावर जाऊन सामान वगैरे ठाकठीक लावून आम्हीं चंद्रभागेवर आंघोळीला गेलों. तेथें आम्हीं प्रथम जें मंदिर पाहिलें तें पुंडलीकाचें होतें. अेक म्हातारी त्या मंदिरांत मोठ्यानें गात होतीः

*कांरे पुंडया मातलासी ।*
*अुभें केलें विठ्ठलासी ॥*

महाराष्ट्रांतील लोकांना मातापित्याची अनन्यभावें सेवा करणाऱ्या पुंडलीकाची कथा नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. मीदेखील सकाळीं अुठल्याबरोबर वडिलांच्या आणि मातोश्रींच्या पायां पडत असें. त्यांची सेवा करण्याची अेकादी संधी मिळाली म्हणजे मला आनंद वाटत असे. तेव्हां स्वाभाविकपणें पुंडलीकाविषयीं माझ्या मनांत सविशेष आदर होता

पुंडलीकाला कृतार्थ करण्यासाठीं भगवान् विष्णु त्याचेजवळ गेले आणि तेथेंच त्यानें भगवंतास अेका विटेवर अुभें रहावयास लाविलें. त्या वेळीं रखुमाअी भगवंतांच्या बरोबर आली नसेल; यामुळेंच पंढरपुरांत विठोबाच्या मंदिरांत रखुमाअीची मूर्ति नाहीं. रुक्मिणीचें मंदिर तेथें निराळेंच आहे. पंढरपुरांत राधेला 'राअी' म्हणतात. राअी-रखुमाअी वारकऱ्यांच्या माता होत. चंद्रभागेच्या वाळवंटावर जेथें पहावें तेथें भजनच चाललें होतें तेथें वर्णाश्रमाला आणि कर्मकांडाला महत्त्व नाहीं. पंढरपूर म्हणजे भक्तीचें माहेरघर, सर्व संतांचें धाम.

आम्हीं चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाच्या दर्शनाला गेलों पुरोहित-बडवे बरोबर असल्यामुळें वाटेंतील प्रत्येक स्थानाचें महात्म्य चटचट कळत असे. रस्त्यामध्यें अेक ताक-पीठ विठोबा होता, असें मला स्मरण आहे. या विठोबापुढें अेक मोठें लाकडांचें भांडें असे. लोक त्यामध्ये लाह्य-पीठ आणि ताक घालीत असत.

विठ्ठलाच्या मंदिरांत कोण मनस्वी गर्दी ! कोणी गात आहे, कोणी वाचत आहे, कोणी अेक मोठ्यानें 'विठ्ठलाऽऽ' म्हणून आरोळी ठोकीत आहे. मंदिरांतील अेकेका भक्तांना पहातांना त्यांच्या निष्ठेविषयीं आदर अुत्पन्न होअी. पण या सर्वांचा अेकत्र विचार करतां फारसें बरे वाटलें नाहीं. हे सर्व मिळून अंगांत आल्याप्रमाणें असा कांहीं कोलाहल करीत होते कीं, त्यापेक्षां भाजीबाजार कितीतरी चांगला ! मी जरी लहान होतों तरी भक्तीच्या अुमाळ्याचें प्रदर्शन करणाऱ्या लोकांचा दंभ मला समजत असे.

सरकारी अंमलदारांचा वशिला सर्वत्र असतो. येथेंहि प्रतिष्ठेच्या वशिल्यानें आम्हीं अेका खासगी दरवाजानें मंदिरांत शिरलों आणि कसलीहि चेंगराचेंगरी न होतां सुखानें दर्शन करून परत आलों. पहिलें दर्शन घाअीघाअीनेंच करावयाचें असतें. या मंदिराच्या प्रत्येक खांबाशीं अेखाद दुसरी आख्यायिका चिकटलेली आहे. हा गरुड-स्तंभ; या येथे तुकाराममहाराज अुभे रहात असत; गोरा कुंभार येथें बसत असे; या ओट्यावर नामदेव कपाळ फोडून घेणार होता; वगैरे वगैरे माहिती आम्हांला मिळाली. मंदिराचे बाहेर पितळेच्या पत्र्याची अेक पायरी आहे, तिला 'नामदेवाची पायरी' म्हणतात. 'नामदेवाची फरशी, जशी कांहीं जडावाचो आरशी' ही ओळ मी लहानपणीं अैकिली होती. नामदेव, म्हणे, या पायरीखालींच समाधिस्थ झालेले आहेत.

रुखमाअीचें दर्शन करून आम्हीं गोपाळपूरला गेलो. रस्त्यांत जेथें श्रीकृष्णांनी दही घुसळून लोणी काढलें होतें तें स्थान आलें. तेथील अेका पुजाऱ्यानें आम्हाला मोठ्याने हांक मारून म्हटलें, "लवकर या. लवकर या. थोड्याच लाह्या अुरल्या आहेत." अेका पितळी ताटांत लाह्याचे दहा पंधरा दाणे पडलेले होते. पुरोहित म्हणाला, "श्रीकृष्णाने बरोबरच्या बाळगोपाळांबरोबर येथे न्याहारी केली होती. त्या वेळच्या या लाह्या आहेत. तुम्हीं कमे अगदीं वेळेवर आलांत ! अेवढ्याच लाह्या अुरल्या आहेत." आम्ही दोन पैसे देअून लाह्याचे चार दाणे घेतले आणि पुढें चाललों. गोपाळपूरला अेक शिळा आहे. या शिळेवर गायीला अुभी करून श्रीकृष्णानें तिचे दूध काढून तें प्राशन केले होतें. श्रीकृष्णाची पावले, त्या गायीची चार पावलें आणि त्यांची वाटी, या सर्वांची चिन्हें त्या शिळेवर बरीच खोल अुमटलीं आहेत. या नदींतून कोणताहि धोंडा बाहेर काढा, त्याचेवर बाळगोपाळांची पावलें अुमटलेली दिसावयाचींच !

नदीच्या पात्रांत अगदीं मध्यावर अेक लहानसे मंदिर होतें. होडीत बसून आम्हीं दर्शनासाठी तिकडे गेलों. अर्धा प्रवाह आम्हीं ओलांडला असेल, अितक्यांत मी होडीवाल्याला म्हणालों, "येथें पाण्यात बुडी मारून तळचा अेक धोंडा काढून दाखव पाहूं." त्यानें तसे करून अेक धोंडा काढला आणि केवढें आश्चर्य ! त्याचेवर देखील लहान मुलाचे पाय अुमटल्यासारखीं चिन्हें स्पष्ट दिसन आली.

येथून आम्हीं जनाबाअीची जागा पहावयास गेलों. जनाबाअी ही नामदेवाच्या

घरची दासी. बिचारीला नात्यागोत्याचे जवळचें कोणी नव्हतें. म्हणून विठोबा स्वतः तिचेबरोबर दळावयाला बसत आठ आठ दिवसांनीं तिला न्हाऊं घालीत आणि तिची वेणीफणी करीत. अेका रात्रीं विठोबा जनाबाअीचे घरींच निजले होते. जनाबाअीचे वेळची अेक वाकळ ( गोधडी ) आज देखील तेथें पहावयास मिळते. लोकांनीं त्या वाकळीला तेलाचे हात लावून लावून चामड्यासारखी केली आहे.

परत येतांना त्या लाह्यावाल्या भटजीजवळ आम्हीं पुन्हां गेलों. या वेळीं त्याच्या ताटात चांगल्या दोन मुठी भरून लाह्या पडल्या होत्या. मी त्याला विचारलें, " आतां अितक्या लाह्या कोठून आल्या ?" पण तो कसचा अुत्तर देतो !

चंद्रभागेच्या कांठी अेक लहानसें कुंड आहे. तेथें तुकारामानें आपल्या अभंगाच्या वह्या धोंडे बांधून पाण्यांत बुडविल्या होत्या आणि देवावर संकट घालून ते तेथे अुपवासी राहिले होते. शेवटी विठोबाला आपल्या भक्ताचे समाधान करण्यासाठीं वह्या धोंड्यासहित कोऱ्याच्या कोऱ्या पाण्यावर तरत्या कराव्या लागल्या होत्या. या गोष्टीची खात्री करून घ्यावयाची असेल तर आज देखील प्रचीति घेणें शक्य आहे. दोन पैसे दिले म्हणजे अेक मनुष्य धोंड्याची बनविलेली अेक लहानशी होडी 'पुंडलीकवरदे हारि विठ्ठल' असें म्हणून कुंडाच्या पाण्यांत सोडून देतो आणि ती नौका त्या पाण्यात मोठ्या डौलानें तरूं लागते. ती होडी अशा रीतीनें तरत असलेली मी माझ्या स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिली आहे. मी त्या मनुष्याला म्हणालों, "हीच दगडाची होडी समोरच्या नदीच्या मुख्य पात्रांत सोडून दाखव. तेथें जर ती बुडाली तर आमची खात्री होअील कीं, या कुंडाच्या महात्म्यानेंच ही दगडी नौका येथे तरते." त्यानें माझें अैकिले नाही; कारण मी लहान होतों.

संध्याकाळी लवकर जेवून आम्हीं विठोबाची पूजा पहावयास गेलों. विठोबाच्या मर्तीचे रसभरित वर्णन संतवाणीत अितके काही वाचले होतें अथवा अैकिलें होतें कीं साक्षात् विठोबाची मूर्ति पाहिल्यानंतर देखील ती बेढब आहे, कुरूप आहे, असें स्वतःशीं देखील कबूल करावयास मन तयार होअीना. 'सुंदर तें ध्यान उभें विटेवरी' आणि 'पाअुले राजिरी' वर्णनाप्रमाणें नाहीत असें मानण्याची नास्तिकता मला तरी सोपी नव्हती.

हिंवाळ्याचे दिवस होते म्हणून विठोबांनीं गरम पाण्याची आंघोळ केली. घागरी भरून भरून त्यांना दुग्ध-स्नान घातलें, मग दधि-स्नान, लोण्याचा अेक मोठासा गोळा पुजाऱ्यानें मूर्तीच्या तोंडावर थापून दिला. मग अेक लोटाभर मध घेऊन मूर्तीला मधु-स्नान घातलें. मग आली पाळी घृत-स्नानाची. शेवटीं अेक पेलाभर कस्तुरीचें पाणी डोक्यावर ओतलें गेलें. कस्तुरी हा अुष्ण पदार्थ आहे. कस्तुरी-स्नान घातलें म्हणजे पंचामृताची थंडी बाधत नाहीं, पडसें, वगैरे होत नाहीं. कस्तुरीची अुष्णता बाधूं नये म्हणून, तिचा अुतार म्हणून, चंदनाच्या पाण्याचा अेक लोटा मूर्तीच्या डोक्यावर ओतण्यांत आला. शेवटीं पुन्हां अुष्णोदक आणि शुद्धोदक येअून स्नान आटपलें. सारें शरीर पुसून घेअून विठोबा रेशिमकाठी धोतरजोडा नेसावयास तयार झाले. विठोबाच्या धोतराच्या निऱ्या अगदीं व्यवस्थित असल्या पाहिजेत. विठोबाचा तो नीटनेटकेपणा पाहून आमचेसारख्या भक्ताची दृष्टि निवून जात असे. मग विठोबानें जरकसी जामा अंगांत घातला. त्याचेवर आपल्या जुन्या थाटाचा अंगरखा चढवला गेला. त्यानंतर विठोबाच्या डोक्यावर पगडी बांधण्याची क्रिया सुरू झाली. विठोबा तैयार पगडी किंवा पागोटें घालीत नसतात, पण डोक्यावरच बांधून घेतात. त्यांत तब्बल अर्धा तास गेला. आतां विठोबा चांगले रसिक दिसूं लागले. पण थंडीचे दिवसांत ओव्हरकोटावांचून कसें चालेल ? आणि ओव्हरकोट तर परदेशी प्रकार; आधुनिक तर खराच. तेव्हां आंत कापूस भरलेली अस्तरदार रेशमी गोधडी सर्वांत वर पांघरण्यास दिली गेली. यामुळें झालें असें कीं विठोबाच्या अुंचीच्या हिशेबानें पाहातां मूर्तीचा घेरावाच अधिक झाला. विठोबाच्या कपाळावर कस्तुरीचा टिळा केला होता. त्यानंतर नैवेद्य दाखविण्यांत आला त्या वेळीं दरवाजे बंद केले होते. भुकेलेल्या आशाळभूत लोकांनीं पाहिलें तर विठोबाला नजर लागावयाची आणि खाल्लेलें पचावयाचें नाहीं. बडव्यांची कृपा म्हणून विठोबाला तांबूल मात्र आमच्या देखतच देण्यांत आला.

आतां विठोबाची शयन-गृहांत जाण्याची वेळ झाली. आमच्या अुजव्या बाजूला शयन-गृह सुंदर प्रकारें सजविलें होतें. पण विठोबांनीं आपल्या स्थलावरून शयन गृहांत जावें कसें ? याचा अुपाय म्हणून विठोबाच्या पायांपासून शयन-गृहांतील पलंगापर्यंत अेक पायघडीवजा कापड ताणण्यांत आलें. त्या कपडयावर विठोबाचीं पावलें तांबडया रंगानें छापलीं होतीं.

आमचे पुरोहित म्हणाले, "आतां कळिकाळाचा महिमा वाढला, नाहींतर पूर्वी

शयन-गृहांत तयार करून ठेविलेल्या पानपट्टया सकाळपर्यंत नाहींशा होत आणि पलंगाजवळील पिकदाणीमध्यें खाल्लेला पानाचा तांबडालाल तांबूल पडलेला असे." भक्तलोक तो तांबूल घेऊन खात.

दुसऱ्या दिवशीं पहांटे चार वाजतां आम्हीं काकडआरती पहावयास गेलों. त्या वेळीं देखील लोकांची गर्दी कमी नव्हती. कार्तिक महिन्यांत आणि माघ महिन्यांत अरुणोदयापूर्वी स्नान करण्याचें पुण्य विशेष आहे आणि काकडआरतीच्या वेळेला दर्शन करणें ही तर पुण्याची पराकाष्टा झाली. या दोहोंपैकीं अेकहि लोभ आम्हीं सोडला नाहीं.

चांगली दक्षिणा देणाऱ्यांना आणि अर्थात् मोठा वशिला असलेल्यांनाहि पंचामृताचें अुत्तम तीर्थ मिळत असे. आमच्या मुक्कामावर अेक खासा लोटा भरून जें तीर्थ येअी, त्याचेबरोबर दशम्या आणि पुऱ्या खाणें हा आमचा आनंदाचा व्यवसाय असे.

पंढरपुरांत अेकच वस्तु मला फार आवडली. तेथें अुच्चनीच भाव दिसून येत नाहीं. सर्वच संत आणि सर्वच समान. ज्ञानदेव, नामदेव, जनाबाअी, गोरा कुंभार, चोखामेळा, तुकाराम, वगैरे संतांच्या अुपदेशाचें हें फळ आहे. पंढरपूरविषयीं मी जें लिहिलें आहे, तें लहानपणीं पाहिलेल्या गोष्टींचें आज जसें स्मरण आहे तसेंच लिहिलें आहे. त्याला चाळीस-पचेचाळीस वर्षें झालीं असतील. त्यानंतर पंढरपूरला जाण्याचा योगच आला नाहीं. परवां गोकर्णाला जाअून आलों, तेव्हां पाहिलें कीं, लहानपणचे संस्कार आणि आतांचे संस्कार यांत बरेच अंतर पडलेलें होतें. मात्र पाहिलेलीं स्थानें बहुतेक जशीच्या तशीच होतीं.

विठोबाच्या मूर्तीचें वर्णन वाचून कोणीहि असें समजूं नये कीं पूजेची चेष्टा करण्याचा माझा अुद्देश आहे. माझ्या मनांत त्या वेळीं अत्यंत अुत्कट भक्ति होती. घरच्या देवांची पूजा करण्यांत मीं अगदीं तल्लीन होअून जात असें. देवळांत जाअून देखील पूजा करावयास मला मिळाली तर धन्य धन्य वाटे. पण त्या वेळीं देखील पूजेचा सर्व अप्रकार मला कांहींसा चेष्टेसारखाच भासला होता. आणि आज ज्या वेळीं पाहिलेल्या गोष्टींचें चित्र डोळ्यांपुढें आणतों तेव्हां कसेंसेंच वाटतें. पूजेमध्यें खर्च आणि थाटमाट पुष्कळ असे; पण पुजाऱ्यांना सौंदर्याची कल्पना असेल, अशी शंका देखील ते येअूं देत नव्हते. खिस्ती देवळांत जो गांभीर्याचा देखावा केला जातो तोहि आपल्या देवळांत नसतो. पण येथें मला स्वतःच्या विचारांचा प्रचार करावयाचा नाहीं किंवा समाजाला अुपदेशहि द्यावयाचा नाहीं. फक्त लहानपणचीं संस्मरणेंच द्यावयाचीं आहेत.

रामदुर्गहून आम्ही परत येत होतों. तोरगलचा सात भिंती असलेला किल्ला ओलांडून आम्ही पुढे गेलों. रस्त्यांत कुठेंशी अेक नदी येत होती. कोणती नदी तें आतां मुळींच आठवत नाहीं. या नदीच्या कांठी आम्ही दुपारचा मुक्काम केला. मी चांगलेसे तीन धोंडे आणून ते धुऊन त्यांची चूल बनवली. आसपास पडलेलीं वाळलेलीं लांकडें गोळा करून ती चूल पेटवली. बाबानें नदीवर आंघोळ करून तिकडून पाणी आणले. आआीनें स्वयंपाक तयार केला. अितके सगळें व्हायला जवळ जवळ अेक वाजला. वडील फार थकले होते; पण पूजा केल्यावांचून कसें जेवायचे ? गोंदूनें कुदूनशीं दोनचार फुले आणि तुळशीच्या मंजिऱ्या आणल्या. वडिलांना पूजा करण्यांत थोडा अुशीर लागला. आम्ही लहान मुले भुकेनें व्याकुळ होऊन अेका कोपऱ्यांत बसून भूक आणि झोप यांच्यामध्यें हेलकावे खात होतो. वडिलांची पूजा कांहीं केल्या आटपत नाहीं आणि मुलांना स्वयंपाक तयार असूनहि खायला मिळत नाहीं, असें पाहून माझी आआी जरा चिडलीच होती. मुक्कामावर आल्याबरोबर सामान सोडून आम्हां मुलांना कांहीं तरी लाडू वगैरे खायला देण्याचा वडिलांचा विचार होता. पण मुलांनीं आतां खाल्लें तर मग जेवतील काय आणि सगळा दिवस पाणी पाणी करतील, असें म्हणून आआीनें आम्हांला खायला देऊं दिलें नव्हतें. तेव्हांपासूनच

कांहीं तरी बिघडलें होतें. वडिलांना चिडण्याची मुळींच संवय नव्हती. त्यामुळेंच कधीं चिडले तर बेफाम होऊन जात. पण चिडलेच तर ते आम्हां मुलांवरच. कचेरींतल्या कारकुनांवर ते कधींच चिडले नव्हते. पट्टेवाल्यांना देखील कडक किंवा अपमानकारक शब्द बोललेले आम्हीं कधी ऐकलें नव्हतें. पण, कोण जाणे, आज वडील चांगलेच रागांत होते. "तुमची पूजा आटपणार का नाहीं?" असें आईनें म्हटल्याबरोबर वडिलांनीं रागाच्या भरांत अेक कडक शब्द वापरला. आईला त्याचा अत्यंत अपमान वाटला. आणि तो देखील आम्हां सगळ्यांच्या देखत मला चागली आठवण आहे. आईचें तोंड लाल लाल तर काय अगदीं निळें होऊन गेलें. आमच्या देखत रडावें तरी कसें? तिनें पुष्कळ प्रयत्न केला. तरीहि दोन मोती गळालेच! हें काय चाललें आहे हें माझ्या ध्यानात येअीना. मी अगदीच गांगरून तेथल्या तेथें अुभा राहिलों. बाबा तेथून केव्हां निसटला तें कोणाच्या ध्यानांतहि आले नाहीं. बाबा वडिलांच्या बरोबर कधी बोलत नसे. लहानपणापासून वचक असल्यामुळें असो किंवा अंतर बाळगण्याची संवय असल्यामुळें असो, बाबा वडिलांच्या समोर अुभाहि रहात नसे. त्याला कांहीं हवें असलें तर माझ्या मार्फत तो कळवित असे मी सर्वांत धाकटा. मला कसली भीति किंवा लाज? वडिलांनी जर अेकादी गोष्ट अैकली नाहीं तर मी त्यांचेशीं चर्चा देखील करीन असें.

जेवणाची वेळ झाली. पत्रावळीवर वाढणें देखील झाले. गोंदू तर, केव्हा खावयास मिळतें म्हणून वाटच पहात होता. पण बाबा कुठे आहे? तो तर निसटला होता. मी बाबा, बाबा, म्हणून पुष्कळ हांका मारल्या, पण ओ कोण देणार? वडील म्हणाले, "जारे, आसपास कुठे तरी बसला असेल. बोलावून घेऊन ये" मी आसपास त्याला खूप धुंडाळले. शेवटीं बाबाला दूर अेका झाडाखालीं बसलेला पाहिला. बसलेला नाहीं, खालीं डोकें घालून तो येरझाऱ्या करीत होता. माझ्या ध्यानांत आलें कीं, त्याच्या मनांत राग धुमसत होता. मी म्हणलों, "चल जेवायला. सगळे वाट पहातात." तो म्हणाला, "मला यायचेंहि नाहीं व जेवायचेंहि नाहीं." मी पुनः म्हणालो, "पण पानें सर्व वाढून तयार आहेत. गोंदूनें सुरूहि केलें असेल. सर्वजण तुझीच वाट पहात आहेत." कर्कश स्वरांत बाबा गरजला, "गोदूला सांग, पोट भरून खा. तूं जा. मला यायचें नाहीं." मी परत जाअून घडलेली सर्व हकिगत अेकाद्या रिपोर्टराप्रमाणें अित्थंभूत सांगितली. वडील म्हणाले, "काय हटवादीपणा हा! त्याला सांग, मी वाट पहात आहें. चल, लवकर ये." मी पुन्हां धांवत गेलों. या वेळीं बाबा जितका शांत

दिसत होता, तितकाच तो कडकहि झाला होता. त्यानें विचारपूर्वक आपले अुत्तर मनामध्यें रचून मला म्हणाला आणि सांगतांना प्रत्येक शब्दावर तो पुरा भार देत होता, "जाअून सांग कीं, असेंच जर अैकावयाचें असेल तर मला जेवायचेहि नाही व घरीं यायचेंहि नाहीं."

घरीं केव्हांहि मतभेद अुत्पन्न झाला म्हणजे आम्ही मुलें वडिलांचीच कड घेत असूं. कारण तो समर्थपक्ष. आअीचें तर, सर्व सहन करणें, हेंच व्रत होतें. अशा स्थितींत वडिलांच्याच बाजूला असणें सोपें होतें. आणि कांहीं झाले तरी आअी रागावणार नाहीं, सर्व कांहीं विसरून जाअील ही खात्री. पण आज बाबाला अेकाअेकीं पक्षांतर करतांना पाहून मला फार आश्चर्य वाटले. आणि बाबाची छाप अशी कीं विशेष बोलण्याची सोय नाहीं. मी सरळ परत आलों आणि रिपोर्टरच्या तटस्थ वृत्तीनें बाबाचा संदेश अक्षरशः पोहोंचविला. तो अैकून वडिलांना काय वाटलें असेल, याची कल्पना आज होते. कधीं न चिडणारे ते आज चिडले. कडक शब्द तोंडांतून निघाला. आअीला अतिशय दुःख झालें. भुकेलेला मी अिकडून तिकडे – तिकडून अिकडे द्राविडी हेलपाटे घालीत आहें. गोंदू जेवणाचें सोडून वडिलांच्या तोंडाकडेच टक लावून पहात आहे आणि बाबा, जो कधीं समोर उभाहि रहावयाचा नाहीं, तो आज असा निरोप पाठवित आहे ! कांहीं वेळपर्यंत तर ते कांही बोललेच नाहींत. शेवटीं कांहींशा मुश्किलीनें ते म्हणाले, "त्याला सांग कीं आतां जेवायला येअून जा." मला काय माहीत की, या वाक्यांत सर्व कांहीं येअून जात होतें ? मी म्हणलों, "अशानें तो येणार नाहीं." लागलेच वडील माझ्यावर रागावले. पण ते कांहीं बोलणार, त्यापूर्वीच मी तेथून धूम ठोकली. मला वाटलें, आज असले निरोप आणण्या-पोहोंचविण्याचें काम किती वेळां करावें लागणार, कोण जाणे ! पण मी गेलों तर खराच आणि बाबाला नेमके शब्द कळविले आणि काय आश्चर्य ! कांहींहि कांकूं न करतां, अेवढेंच नव्हे, तर कांहींशा संतोषानें बाबा जेवायला आला.

या सर्व प्रसंगाचें रहस्य त्या वेळीं माझ्या ध्यानांत बिलकुल आलें नाहीं आणि म्हणूनच तो माझ्या ध्यानांत राहिला अणि खरोखरच त्या दिवसापासून आअीच्या अंतकाळापर्यंत वडिलांनीं आअीवर कधींहि राग केला नाहीं. बाबाचा प्रभाव अितका असेल याची मला कल्पनाच नव्हती. जसजशी त्या प्रकरणाची आठवण होते, तसतसा प्रेमाचा नियम मीं अधिकाधिक समजूं लागलों आहें. आणि मनाशीं निर्णय होत आहें कीं खरोखर प्रेमाचें सामर्थ्य अमोघ आहे. प्रेम हेंच सार्वभौम आणि सर्वशक्तिमान तत्त्व आहे.

मला वाटतें, आम्ही रामदुर्गेहून परत बेळगांवला येत होतों. बैलगाडीचा प्रवास संपवून आम्ही रात्रीं आठ वाजतां गोकाकला येऊन पोहोंचलों. येथून आगगाडीच्या रस्त्यानें आम्हांला जावयाचें होतें. रात्रीं आम्हो अेका धर्मशाळेंत अुतरलों होतों.

मध्यरात्रीनंतर तीन वाजण्याचा सुमार असेल, अितक्यांत अेक कुत्रें धर्मशाळेंत शिरलें. आमच्या सामानांत अेक पातेलें आंत कांहीं खाण्याचे पदार्थ असल्यामुळें कपड्यांत बांधून ठेविलें होतें. कुत्र्यानें तें अुचलून कोणी अुठण्यापूर्वीच पळ काढला. कुत्र्याची चाहूल अेकतांच तीन-चार जण अुठले आणि त्यांनीं कुत्र्याचा पाठलाग केला; पण पातेले गेलें तें गेलेच !

या सर्व गडबडीमुळें झोंपमोड झाली आणि त्यामुळें सकाळीं मी जरा अुशिरानें अुठलों. अुठून पाहतों तों धर्मशाळेच्या आसपास लोकांची ये-जा सुरू झाली होती. आसपास शौच-कूप वगैरे कांहींच नव्हतें. यामुळें हातांत तांब्या घेअून मी सरळ घटप्रभेच्या कांठीं गेलों. मीं विचार केला कीं, नदीच्या कांठीं कोठेंतरी शौचाला बसण्याजोगी अेकांत जागा मिळेलच. तेथें जाअून पाहातों तों कोणी कपडे धूत आहे, कोणी पाणी भरतात, तर कोणी भांडीं घासतात; आसपास दूरपर्यंत नजर फेंकून मीं पाहिलें, कोठेंहि अेकांत दिसेना. नदीच्या कांठाकांठानें वर वर दूरपर्यंत गेलों; पण तेथेंहि निर्जन स्थान मिळेना. जेथें पहावें तेथें अेकादा म्हातारा किंवा म्हातारी किंवा गुरें चारणारा गुराखी

दिसावयाचाच. नदीकांठच्या लोकांना लाज-लज्जेची फारशी अडचण नसते. ते कोठेंहि बसून जातात. असे लोकहि मीं पाहिले. 'बसत्याला लाज नसली तरी बघत्याला असली पाहिजे' या न्यायाने अशा लोकांना दुरून पाहातांच मला माझी दिशा बदलावी लागे.

नदीच्या वाळवंटांत मी असा बराच भटकलों. शेवटीं कंटाळलों. वेळेवर जर न परतलों तर आईकडून रागे भरून घ्यावे लागणार. शौचाला न बसतां तसेंच परत जावें तर तेहि शक्य नव्हतें. कारण या बाबतींत ज्याप्रमाणें मनाला लाज असते त्याप्रमाणें शरीरालाहि असते.

शेवटीं मला अेक मजेदार अुपाय सुचला. त्याला काव्यमय म्हणावे किंवा नाहीं हें ठरविणें कठीण आहे. थोडें दूर अेक झाड होतें. चढावयाला सोपें होतें. झाडाचीं पानें अितकीं घनदाट होतीं कीं वर चढल्यानंतर कोणाचीहि नजर पडण्याची भीति नव्हती. सुदैवाने झाडाच्या आसपास कोणी नव्हतें. तेव्हां अेका हातांत पाण्याचा भरलेला तांब्या घेऊन मी वृक्षारोहण केलें. तीन फांद्यांनील पकडीत तांब्या सहज बसूं शकतो हें अनुभवी लोकांना सागण्याची जरूर नाहीं. पुरेसे वर चढून फांद्यांची अनुकूलता शोधून काढली. मनाची समजूत केली कीं जन्मांत कधीं न मिळालेला असा हवाअी अेकांत मिळाला आहे. दुसऱ्या बाजूनें भीति वाटत होती कीं झाडाच्या छायेसाठीं अेकादी गाय आली तर तिच्या मागोमाग अेकादे गुराख्याचें पोर यावयाचेंच. पण अीश्वराला अधिक अत पाहावयाचा नव्हता.

स्वस्थ मनानें मी परत आलों. माझे वडील बंधु देखील याच अुद्देशानें नदीकांठीं आले होते आणि निराश होअून परत चालले होते. त्यांनीं मला विचारले, "शौचासाठीं कोठे गेला होतास?" मी म्हणालों, "नदीच्या काठींच वरच्या बाजूला." "तिथें आडोशाची जागा मिळाली?" मी म्हणालों, "होय."

आपण गेलों तसेंच निराश होअून परत आलों हें कबूल करणें बंधूंना जड वाटलें. आणि मला, आपण वानराचें अनुकरण केले, हें सांगण्याची लाज वाटत होती. तेव्हां "तेरी बी चूप और मेरी बी चूप!" या न्यायाचें अवलंबन करून आम्हीं प्रश्नोत्तरे वाढूं दिलीं नाहींत. कित्येक महिने मी माझी गोष्ट गुप्तच ठेविली होती. लज्जेचे पापुद्रे काळ-बळेंकरून झिजून गेल्यानंतरच त्या दिवसाच्या गोष्टीची वाच्यता करण्याची मला हिंमत आली.

माणसाला पुष्कळदां अंकादे महापातक किंवा गुन्हा केला असतां त्याविषयीं लज्जा वाटते, त्यापेक्षां असल्या गोष्टीविषयीं बोलण्याचा अधिक संकोच टतो. लज्जेपेक्षां व्रीडेचें कवच अधिक दुर्भेद्य असतें असेंच म्हटलें पाहिजे.

" वाटेल तें होवो, मी महाशिवरात्रीचा अुपवास करणारच ! "

माझी मुंज देखील झाली नव्हती. अितक्या लहानपणीं महाशिवरात्रीसारखा कडक अुपवास मला कोण करूं देणार ? पण मी हट्ट धरून बसलों कीं, वाटेल तें होवो, मी आज महाशिवरात्र करणारच.

आपल्या प्रान्तांत ब्राह्मणांत स्मार्त आणि भागवत असे मुख्य दोन भेद असतात. जेवढे स्मार्त तेवढे महादेवाचे अुपासक असतातच असें नाही. आणि भागवत सगळेच विष्णूचे अुपासक असतात असाहि नियम नाहीं. तरी थोडे अपवाद सोडून दिले तर वरील नियम बरोबर आहे असें म्हणतां येअील. आम्ही महादेवाचे अुपासक. मंगलेश महादेव आणि शैवी शक्ति महालक्ष्मी हीं आमचीं कुलदैवतें. आमच्या घरचे सर्व धार्मिक विधि स्मार्त संप्रदायाप्रमाणें चालावयाचे. फक्त अपवाद काय तो अेकादशीचा. दोन अेकादशा आल्या तर आम्ही दुसरी म्हणजे भागवत अेकादशी करीत असूं. गोकुळ अष्टमीला कृष्णाची पूजा होत असे हेंहि खरे, तरी आम्ही विष्णु-अुपासक नव्हतों.

आमच्या केशूच्या अुपदेशामुळें माझ्यामध्यें महादेवाविषयीं अुग्र पक्षपात अुत्पन्न झाला. महादेव हाच सर्वांत थोरला देव, त्याचे पुढें बाकी सर्व देव तुच्छ. समुद्रमंथना-

या वेळीं अितर देवांनीं लोभी आणि अधीऱ्या भिकाऱ्यांप्रमाणें अेकेक रत्न निघालें तसें बळकावले. विष्णु त्यांतल्या त्यांत जबरदस्त. त्यानें लक्ष्मी वगैरे किती तरी रत्नें उपटलीं. आमच्या महादेवानें मात्र, मंथनांतून हलाहल निघून सर्वत्र हाहाःकार झाला, या वेळीं जगाचें दुःख पिअून टाकून तो नीळकंठ बनला देव असावा तर असा, असें मनाशीं ठरून गेले होतें. आपण देखील आयुष्यात असेंच वागावे असेंहि मधून मधून वाटे कधींहि भांडण झाले तर मनसोक्त भांडण केल्यानंतर मग अुदारपणानें आपला हट्ट सोडून द्यावयाचा, अशी अेक प्रकारे संवयच लागली. या संवयीच्या मुळाशीं थोरपणाच्या अिरेला पडून गाढवावर बसण्याची कृत्रिमता नव्हती असें म्हणतां येत नाहीं. याच सुमाराला आमच्या नानानें हट्ट करून शिवलीलामृताची पोथी वडिलांचेकडून मिळवेली. मग काय विचारावें ? रोज सकाळीं अुठून आंघोळ करून अेक दोन किंवा अधिक अध्याय वाचल्यावांचून रहावयाचें नाहीं. श्रीधरकवीची भाषा ती ! वर्णनें सुरू केलीं तर प्रत्यक्ष देखावाच नजरेपुढे अुभा करून देतो. शब्दसमृद्धीला तर खळच नाहीं. मधून मधून अति अुघड शृंगार येअी हें खरें; पण आम्हांला त्याचा स्पर्श होत नसे. हा भाग अश्लील आहे अेवढें समजे, पण तो वाचून मनामध्यें विकार अुत्पन्न व्हावे अितकें वय झालेले नव्हतें.

या शिवलीलामृतामध्ये महादेवाच्या अनेक अवतारांचें आणि त्याच्या भक्तांच्या चरित्रांचें रसाळ वर्णन आहे. महादेव जितका चंड-कोपी तितकाच आशु-तोष. भोळा शंभू प्रसन्न झाला म्हणजे काय द्यावे आणि काय न द्यावें, याचा कधीं विचार करावयाचा नाहीं. अशा देवाची जो भक्ति न करील तो दुर्भागी. सकाळीं अुठून तासतासभर मी नामस्मरण करीत असें. शिवलीलामृताची तर अनेक पारायणें केलीं. दूरदूरवर जाअून सांपडतील तिकडून बिल्व-दळें आणून महादेवाची पूजा करावयाची.

अेके दिवशीं वाचलें कीं लहान मुलांच्या भक्तीनें महादेव सविशेष प्रसन्न होत असतो. तेव्हां तर मनानें घेतलें कीं, यंदा आपण शिवरात्र करायचीच. आअी म्हणाली, "तूं मोठा हो, तुला अेक मुलगा होअूं दे. मग खुशाल शिवरात्र कर. तूं शिवरात्र केल्यानें आम्हांला आनंदच आहे. पण तुझ्यासारख्या लहान मुलांसाठीं हें व्रत नाहीं." पण मी कसचा अैकतों ? गोष्ट वडिलांच्यापर्यंत पोहोंचली कीं, दत्तू जेवत तर नाहींच पण फराळाचेंहि खात नाहीं.

वडिलांनी मला परोपरीनें समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, "महाशिवरात्र हें महादेवाचें व्रत आहे. तें अेकदां घेतलें कीं तोडतां येत नाही, सोडतांहि येत नाहीं. अेकदां घेतले तें कायमचे चिकटलें. जर का तें पालन करण्यामध्यें गफलत झाली तर महादेव सत्यनाश करून टाकील. तुला फळाहारच करायचा असेल तर अेकादशी खुशाल कर. तें सोपें व्रत आहे. जितके दिवस करावें, तितकें पुण्य मिळतें. सोडून दिलें तरी कांहीं अडचण नाहीं. विष्णु कोणाचाहि संहार करीत नाहीं." मी म्हणालो, "मला महादेवाचीच भक्ति आहे. मी कांहीं फळाहाराच्या लोभानें व्रत करायला तयार झालों नाही. मला फक्त महादेव प्रसन्न करायचा आहे. मी शिवरात्र करणारच."

"पण तुझे वडील भाअू पहाना, अेक तर संध्याच करीत नाही. त्याला कांद्याच्या भज्यांवांचून चालत नाहीं. दुसऱ्यानें खिस्ती लोकांप्रमाणे डोक्यावर केस ठेवले आहेत आणि आतां तर आठ आठ दिवसानें हजामत करण्याच्या अेवजीं फक्त दाढीच करवून घेतो. घरांत सगळा भ्रष्टाचार शिरला आहे. तूं कॉलेजांत गेलास म्हणजे तूंहि तसाच व्हायचा. यांना पुण्याला पाठवून मी चूकच केली. आज व्रत घेशील आणि भुद्यां तोडून टाकशील. हें काय कामाचे ? शहाणा हो आणि जेवायला बस. आम्हांला भुगीच दुःख देअूं नको"

मी फक्त माझीच गोष्ट पकडून ठेवली. मी गयावया करून त्यांना म्हणालों, "मी यांचेसारखा होणार नाही. मी तुम्हाला खात्रीनें सांगतों कीं, शिवरात्रीचें व्रत मी कधीं तोडणार नाहीं." माझ्या निष्ठेची खात्री पटावी म्हणून मी अेक अुदाहरण देखील दिले, "परवांच अेकदां मी सोवळी लंगोटी नेसून जेवायला बसलों. अितक्यांत आण्णा हजामत करून आला आणि आंघोळ केल्यावांचून मला शिवला. मी ताबडतोब पान तसेंच टाकून अुठलों आणि त्या दिवशीं सकाळींहि नाहीं व रात्रीहि जेवलों नाहीं. मी आण्णाला साफ सांगितलें कीं मी कॉलेजांत शिकलों तरी तुझेसारखा होणार नाहीं."

मी मनांत म्हणालों कीं हा काय प्रकार ? अेका बाजूनें बाबा, आण्णा, वगैरे म्हणतात, कीं दत्तू श्रद्धाजड आहे. अगदींच सोवळा भटजी झाला आहे. दुसऱ्या बाजूनें वडील म्हणतात कीं दत्तू नास्तिक होणार आणि कारण काय तर याचे वडील बन्धू तसे झाले आहेत. आतां मी करावें काय ? शेवटीं मी चिडून बेफाम झालों. आणि नेहमींचा सौम्यपणा सोडून कडकपणें म्हणालों, "आज मी जेवणार नाहीं. मग वाटेल तें होवो."

मला परोपरीनें समजावल्यामुळेंच वडीलहि रागावले. ते म्हणजे महादेवाचाच अवतार ! कधीं वाटेला जावयाचे नाहींत; पण अेकदां चिडले म्हणजे चांगलाच प्रसाद मिळावयाचा. त्यांनीं डाव्या हातानें माझा बावळा पकडला आणि उजव्या हातानें चांगल्या चार चपाटया लगावल्या. प्रत्येक चपाटीसरसे चार चार बोटांचे काळेनिळे वळ अुठले.

अुपवासाच्या दिवशीं पोट भरून मार खाल्ला. मार खाल्ला तरीहि अुपवास मोडत नाहीं ही धर्मशास्त्राची सोय किती चांगली आहे ! मी मार चांगलाच खाल्ला. पण जेवलों नाहीं तो नाहीच. श्रद्धा होती तितकें रडलो आणि मग मट्ट होअून देवघरांत जाअून नाम-स्मरण करीत बसलो. मांडी कशी गरम झाली होती ! घरांतील कित्येक लोक वैज-नाथाच्या यात्रेला गेले होते. मला कोणी घेअून गेले नाहीं, यामुळेंहि मी चांगलाच फुंग झालों होतों. अितक्यांत चार वाजले. आता माझी दुसरी कसोटी सुरू झाली. आअीला वाटलें, अितका हट्ट च आहे तर दत्तूला अुपवास करूं द्या खुशाल. पण अुपवासाला ज्या गोष्टी चालतात त्या खाअील तर चांगले. नाहीं तर बाळवयाचें पित्त झालें तर दुसऱ्या दिवशी हा आजारी पडावयाचा. आअीने बटाटे, भुअीमूग, खजूर आणि साबू-दाण्याचे तऱ्हतऱ्हेचे पदार्थ तयार केले आणि मला खायला बोलावले. माझा विचार निर्जळी अुपवास करायचा होता. तीर्थाचे जे कांहीं पाच दहा बिंदू पोटांत जातील ते जातील. त्याखेरीज मला पाणी देखील प्यायचें नव्हतें. अुपवासच करायचा तर तो महादेव प्रसन्न होअील असाच करावा. मीं फराळ करण्याचे नाकारलें.

मी अितका हट्ट धरीन याची कोणालाच कल्पना नव्हती. पुन्हां वडिलांपर्यंत कथा गेली. ते म्हणाले, " शिवरात्रीचें व्रत करण्याची तुला मोकळीक आहे; पण आतां फराळाचे पदार्थ तरी खा. " या वेळीं विनंती करण्याची किंवा कांहींहि बोलण्याची माझी दानत नव्हती. मीं माझे तोंड शिवूनच टाकले. खायला किंवा बोलायला तें आतां कसें अुघडणार ? तोंड अुघडल्यावांचून खाण्याजोगा फराळाचा अेकच प्रकार होता. तो वडिलांच्या हातून पुनः अेकदां यथेच्छ खाल्ला. वडिलांनींहि निश्चयच केला होता कीं आज याला खाअूं घातल्यावांचून सोडावयाचें नाहीं. या वेळीं सकाळपेक्षां देखील अधिक मार मला मिळाला. अितक्यांत वडील बन्धु तेथें आले. त्यांनीं मला धरून जबरदस्तीने माझ्या तोंडांत दूध ओतले. मीं तें सर्व थुंकून टाकलें आणि पोटांत कांहीं गेलें असेल या शंकेनें गळ्यांत बोटें घालून ओकारी काढली. अितकें झाल्यानंतर महादेवाला माझी दया आली. त्याने आमच्या नारायणमामांना आमच्या घरीं

पाठविले. त्यांनी सर्व प्रकार पाहिला आणि समजून घेतला. मामांनी माझी कड घेतली. त्यांनी वडिलांच्यासमोर व्यावहारिक दृष्टि ठेवली. ते म्हणाले, "जाऊं दे त्याला. जवळ जवळ पांच वाजायला आलेच आहेत. आतां फार फार तर तीनेक तास काढावे लागतील. चांगला थकलेला आहेच. निजून जाईल." मग माझ्या आईकडे वळून म्हणाले "गोदू, याला सकाळीं पांच वाजता उठवून आंघोळीला घालून जेवायला बसव म्हणजे भागलें. अेखाद्याच्या धार्मिक संकल्पाच्या आड न आलेलेंच बरे. अितक्या श्रद्धेने अुपवास करतो आहे; तेव्हां हा आजारी पडणार नाहीं. आणि पडलाच तर सहन करील."

शेवटीं माझ्या मनासारखे झाले. वडील मला म्हणाले, "चल देवघरांत. तिथें कुलदेवासमोर अुभा राहून कबूल कर की कॉलेजांत जाअून कितीहि नास्तिक झालों तरी महाशिवरात्रीचें व्रत सोडणार नाही." मी खुशीनें कबूली दिली. आणि तेव्हांपासून आजपर्यंत महाशिवरात्रीचा अुपवास नियमित करीत आलों आहे. फक्त अेकदांच तिथि ध्यानांत न राहिल्यानें गफलत झाली होती. त्याचे प्रायश्चित म्हणून मी दुसरे दिवशीं अुपवास केला. तरीहि त्या प्रमादाविषयीचा विषाद अजून गेला नाही. मला वाटतें महादेव माझ्या त्या अपराधाची क्षमा करील. वडील वारल्यानंतरच ती गफलत झाली असल्यामुळें त्यांची माफी मागणें कसें काय जुळणार?

## रामाची चान्नी २८

रामा आमच्या मोठ्या मामाचा मोठा मुलगा. साताऱ्याहून आम्ही शहापुरला आलो म्हणजे रामाची भेट होअी. रामानें शिक्षण केव्हां सोडले, त्याची मला कल्पना नाहीं तो घरी क्वचितच रहात असे. त्याची स्वतःची अेक तालीम होती. या तालमींत फक्त ब्राह्मण मुलांना घेतलें जात असे. कसरत, कुस्ती, वगैरे हीं मुलें मोठ्या भुत्साहानें शिकत. रामाचे सगळे मित्र अखाडाबाज होते, हें निराळें सांगावयास नको. माप-लेकांचे फारसे बनत नसे; यामुळेंच रामाचा पाय घरांत टिकत नसे. सर्वांचीं जेवणे आटोपलीं म्हणजे रामा घरीं येअून अेकटाच बसून जेवायचा. आणि वडील बाहेरच्या खोलीत बसले असले तर मागील दारानें चालता व्हायचा.

याच्या मित्रमंडळीनें अेकदां संभाजी नाटक केलें होतें. यामुळें शहापुरांत तो प्रसिद्ध झाला होता. तोंडाला रंग लावून मुलगा स्टेजवर आला याचे मामांना फार वाअीट वाटले. रामा कुस्तीत जसा हुशार होता, तसाच गप्पागोष्टीत देखील मोठा चाणाक्ष होता. यामुळें, अेक स्वतःचें घर सोडून, गांवांत जेथे जाअी तेथें त्याचें स्वागतच होत असे. रामाच्या गोष्टी अैकतांना मला फार आनंद वाटे. पण तो मांडी घालून बसला म्हणजे मुडघ्यांना हलवीत राहण्याची त्याला संवय होती, ती मात्र मला आवडत नव्हती.

अेके दिवशी रामानें कोठूनसे खारीचें पिल्लूं धरून आणले. मग काय, सगळा दिवस त्या खारीचेंच ध्यान ! कुठेहि गेला तरी खारीचे पिल्लूं बरोबरच असावयाचें. अेके दिवशीं संध्याकाळीं खारीचें पिल्लूं घेअून तो आमच्या घरीं आला. सर्व त्याला विचारूं लागले, "रामा, तुझी चान्नी कुठें आहे ?" शहापुरच्या बाजूला खारीला चान्नी म्हणतात.

रामा मोठ्या गर्वानें फुलून जाअून प्रत्येकाला आपली चान्नी दाखवीत असे त्याच्या मनांत विचार आला, कीं हातून चान्नीचें हें पोर निसटलें तरीहि मी त्याला सहज पुन्हां पकडूं शकतों हें सर्वांना दाखवावे. आम्हां सर्वांना घेअून तो मागल्या अंगणाकडे गेला. आम्ही सात आठ जण असूं. गारुडी ज्याप्रमाणें आपल्या खेळाला हवी असलेली जागा तयार करण्यासाठीं तमासगिरांना मागें हटवून आपल्या आसपास मोकळें वाटोळें मैदान करून घेतो, त्याप्रमाणें रामानें आम्हां सर्वांना मागे हटवलें. आणि हळूच आपलें चान्नीचें पोर जमिनीवर ठेअून दिले पिल्लाला जमिनीवर मोकळें ठेवलें तरी बिचाऱ्याची खात्री होअीना कीं आपण खरोखरच मोकळे आहोंत. कारण दोन दिवसांच्या रामाच्या पोरखेळामुळें बिचारें पिल्लूं भांबावून गेलें होतें. बिचारें आसपास पाहूं लागलें. आम्ही देखील आमचें सर्व ध्यान डोळ्यांत अेकवटून पिल्लाकडे पाहूं लागलों की आतां तें कोणत्या दिशेनें धांवतें.

अितक्यांत रेशमाच्या नव्या कपड्याचा आवाज होतो, तसा हवेंत आवाज होअून, हें काय आहे हें आमच्या ध्यानांत येण्यापूर्वीच, अेका घारीनें सपकन् आमच्या कोंडाळ्यामधून चान्नीचें पोर उचलून नेलें.

हें सर्व अितकें कांहीं अकल्पित रीतीनें अेका क्षणांत घडलें कीं, काय झालें हें प्रथम नीट ध्यानांतहि येअीना. पोराला वांचविण्यासाठीं आम्ही झडप घालतो त्यापूर्वी घार आकाशांत अुंच अुडून गेली होती. त्या बच्च्यानें अेकच हृदयद्रावक चीत्कार केला. तो त्याचा चीत्कार अुकळणाऱ्या पाण्याप्रमाणें माझ्या कानांतून छातीपर्यंत पोहोंचला. घार अुडतां अुडतां चोंच आणि पायाचा पंजा यांच्या मदतीनें त्या पिल्लाला चांगलें मजबूत पकडण्याचा प्रयत्न करीत होती. आम्ही 'अरेरे' म्हणतों, अितक्यांत ती घार अेका दूरच्या नारळाच्या झाडावर जाअून बसली आणि तेथें तिनें आमच्या सर्वांच्या देखत त्या चान्नीच्या पोराला तोडून तोडून अुदरस्थ केलें !

रामाचें तोंड तर आश्चर्यानें आणि अुद्वेगानें निळे होअून गेलें होतें. तोंड काळवंडल्यामुळें त्याचे मोठे मोठे दांत अधिकच पांढरे दिसूं लागले. आश्चर्यचकित

झालेलं त्याचे ते डोळे आणि उघडलेल्या तोंडातील दात अजून देखील माझ्या दृष्टी-समोर त्या दिवसाअितकेच प्रत्यक्ष आहेत. आम्ही सर्व अवाक् होऊन अेकमेकांच्य तोंडाकडे पाहूं लागलों. आमच्या तोंडावरील आश्चर्याची कळा अजून अुतरली नव्हती. आपल्या हातून कांहीं अपराध घडला आहे, असें प्रत्येकाला वाटत होतें. अेकाद्यावर चिडण्याचें जर कारण मिळाले असतें, तर रामानें त्याचे दांतच पाडले असते. पण येथें तर आम्ही सर्वच असहाय होतों. हें असें झालें तरी कसें, हाच विचार प्रत्येकाच्या मनांत घोळत होता. अरे, अेका क्षणापूर्वीच तें पिल्लूं आमचे होतें. किती आनंदानें आम्ही त्याचेशी खेळत होतों ! बाजारातून त्याला एकादे केळें किंवा पेरू आणून देअीन, असा विचार मी मनात करीत होतो. अेका क्षणांत केवढा फेरफार झाला ! हें झालें कसें ? आतां याला कांहींच अिलाज नाहीं काय ? अिलाज कसला आतां ? अीश्वराच्या राज्यांत असें कां घडावे ? असें घडायला नको होतें. खरो. खर हें असह्य आहे; पण असह्य असून देखील सहन केल्यावांचून सुटका नाहीं- अरेरे ! आम्ही अितकेजण होतों, कोणच्यानेंहि कांही होअूं शकलें नाही. आणि सर्वांच्या देखत त्या गोजिरवाण्या पिल्लाला मृत्यूच्या तोंडीं पडावें लागलें. शेवटच्या क्षणाला त्या बच्चाला काय वाटलें असेल ? घारीनें जेव्हां त्याचें पोट फाडलें, तेव्हां त्याला किती वेदना झाली असेल ? मला तर जणुं माझेंच पोट कोणी फाडीत आहे असें वाटले. कुठल्या कुमुहूर्तावर त्या पिल्लाला पकडण्याची रामाला दुर्बुद्धि झाली, कोण जाणे. या घारीला खाण्यासाठींच हें खारीचें पोर आणून तिच्या तोंडीं सोपून दिले काय ? जें पिल्लूं स्वतःच्या आअीच्या पोटाच्या अुबेंत बसलें असतें, तें आज घारीच्या पोटांत जाअून बसले. गरीब प्राण्यांच्या बच्च्याना पकडणें हें खरोखर महापाप आहे. मी तरी निदान कधीहि असले घातकी क्रूर कृत्य करणार नाहीं.

प्रत्येकजण आपापल्या जागीं खाबाप्रमाणें अुभा होता. कोणीच कांही बोलेना किंवा चालेना. शेवटीं रामानेच अेक मोठा अुसासा सोडला आणि दबल्या आवाजांत तो म्हणाला, "झालें चला आतां."

ज्याचेविषयीं हृदयांत कांहीं कोमल भाव अुत्पन्न झाला असेल, अशा प्राण्याचें मरण पाहण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता. जें होतें तें अेका क्षणांत नाहींसें कसें होअून जातें, हा प्रश्न मोठ्या आघातासहित हृदयांत कोरला गेला आणि त्याचो अस्वस्थता पुष्कळ काळपर्यंत टिकली. अजूनहि जेव्हां जेव्हां तो प्रसंग आठवतो, तेव्हां तेव्हां ती स्थिति जागृत होते.

वेदान्ताच्या तटस्थ दृष्टीनें मला असाहि विचार केला पाहिजे कीं, घारीला जेव्हां तें कोवळें पोर खावयास मिळालें तेव्हां तिला किती आनंद झाला असेल ! स्वादिष्ट फळें खातांना मला नाहीं का आनंद होत ? पण रामाच्या चान्नीच्याबाबतीत झालेलें दुःख माझे प्रथम दुःख होतें. त्याची जखम अजूनहि भरून येत नाहीं आणि घारीच्या सुखाचा, क्षुधानिवारणाचा विचार यत्किंचितहि प्रत्यक्ष होत नाहीं.

## वाजंत्र्यांचा अिलाज

२९

लग्नसराअीचे दिवस होते. सकाळीं आणि संध्याकाळीं, दुपारीं आणि रात्रीं, वेळ अवेळ कांहीं न पहातां वाजंत्र्यांचा कलकलाट चालूच असे. भाअू आणि मी आमच्या घराच्या बाहेर असलेल्या खोलीत निजत असूं. वाजंत्र्यांच्या त्रासामुळें रात्रीची गोड झोप बिघडली म्हणजे आम्ही खूप चिडत असूं. " हे लोक दिवसा लग्न करून घेतील तर त्याचे काय बिघडेल ? रात्रीं लग्न करून घ्यायला, काय हे निशाचर राक्षस आहेत ? " असे म्हणून आम्ही आमची चीड व्यक्त करीत असूं.

अितक्यांत आमच्या शेजारीच अेक लग्न निघाले. रस्त्यावर मंडप बांधला गेला. वाजंत्रीवाले आणले गेले. त्यांना बसण्यासाठीं माळकाच्या घरीं जागा कोठून असणार ? यामुळें त्या चारपांच जणांनीं आमच्या ओटयावर तळ दिला. जरासें रिकामपण मिळालें कीं ते आपली कसरत चालवीत. पों–पो–पों–पी–पी–पी–तडं–तडं–तडं ! भाअूचा स्वभाव कांहींसा चिडखोर. लांडग्यासारखा अुसळून तो खोलीच्या बाहेर आला. आणि म्हणाला, " हरामखोरांनो, निघून जा येथून " वाजंत्रीवाल्यांनीं सज्जनतेचा चेहरा धारण करून म्हटलें, " अपशब्द कां बोलतां ? सावकारआप्पांची परवानगी घेअूनच आम्ही येथे बसलों आहोंत." घरच्या वडील मंडळींनींच परवानगी

दिल्यानंतर आम्हां मुलांचें काय चालणार ? भाऊ बिचारा खजील होऊन खोलींत परत आला आणि त्यानें दणकन् दरवाजा बंद केला.

अितक्यांत माझ्या सुपीक डोक्यांतून अेक अिलाज अुगवला. त्या वेळीं मी संस्कृत शिकलों नव्हतों; पण कित्येक सुभाषितें बाबाने माझेकडून पाठ करवून घेतलीं होतीं. मी म्हणालों, 'बुद्धिर्यस्य बलं तस्य.' वाजंत्रीवाल्यांवरचा राग माझ्यावर काढून भाऊनें विचारलें, "दत्त्या, काय म्हणतोस रे ?" मी म्हणालों कीं "वाजंत्री आतांच बंद करून येतों." अितकें म्हणून मी तडक घरांत गेलों

हिरव्या आंब्याचे ते दिवस होते. अेक हिरवा हिरवा, कोंवळा कचकचीत आंबा घेअून मी बाहेर आलों आणि वाजंत्रीवाले पी-पी-पो-पो ची कसरत करीत होते त्यांचे समोर अगदीं भोळी मुद्रा धारण करून बसलो. लाडुकपणानें त्यांना चार प्रश्नहि विचारले. त्यांचें ध्यान माझेकडे गेलें आहे असें दिसतांच त्यांच्या समोर मीं तो आंबा करकर खायला सुरवात केली. कोवळ्या आंब्याचा तो आवाज आणि त्यांचा आंबट वास नाका-कानांत गेल्यानंतर जीभेंद्रिय स्वस्थ कसें बसणार ? त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें आणि तें सनअीच्या जिभेंत शिरलें. ताडपत्राच्या लांब लांब चिरा अेकत्र करून त्यांची जीभ बनवून सनअींत बसवलेली असते आम्ही तिला पीपी म्हणत असूं. या पीपीमध्यें मुखरस शिरतांच सनअी कांहीं केल्या वाजेना. माझें हसणें मला दाबतां येअीना. म्हणून तिथून अुठून मी खोलींत जाअून बसलों. सनअीवाल्यांच्या सनअीला किल्ल्याच्या झुमक्याप्रमाणें दोनतीन जास्ती पिप्या (जिभा) टांगलेल्या असतात. सनअीवाल्यानें भिजलेली पीपी काढून नवी बसविली. पण स्वतःची जीभ त्याला बदलतां येत नव्हती. दुसरींत मुखरस शिरला. त्यानें ती बदलून तिसरी बसविली. अितक्यांत मी आंतून हातांत थोडे मीठ घेअून आलों आणि आंब्याची फोड मिठांत दाबून खाअूं लागलों. करकन अेक तुकडा चावायचा आणि मिटक्या मारावयाच्या. असें सुरू करतांच सनअी आणि पोगा दोन्ही बंद झाले ! आतां चिडण्याची पाळी होती वाजंत्रींवाल्यांची. पण मला काय म्हणणार ? मोठे मोठे डोळे वटारून तेथून ते निघून गेले. शेवटीं आपला विजय झाला हें पाहून भाअूला खूपच आनंद झाला.

याच सुमाराच्या माझ्या असल्याच दुसऱ्या अेका बहादुरीची येथें आठवण होते. पण त्या युक्तीचा आचार्य मी नव्हतों. आणि तिचा प्रयोगहि मीं स्वतः केला नव्हता

रस्त्यावर नंदीबैल आलेले पुष्कळांनीं पाहिले असतील. कित्येक प्रतिष्ठित भिकारी अेक स्वतःचा सुंदर पुष्ट बैल बाळगतात. त्याच्या शिंगाला लहान लहान घांटी आणि रेशमी गोंडे बांधलेले असतात. त्याच्या कपाळाला हळदकुंकूं लावतात पत्र्यावर अुठवलेली देवीची मूर्ति देखील त्याच्या कपाळावर लटकत असते. रंगी-बेरंगी कपड्याची झूल बैलाच्या पाठीवर घालतात. गळ्यांत देखील घंटांची माळ असावयाची. पायांत घुंगरू किंवा तोडे. अशा रीतीनें बैलाला शृंगारून घरासमोर अुभे करतात आणि घरवाल्यांना तन्हेतऱ्हेचे आशीर्वाद देतात. बैलाचा मालक बैलाला प्रश्न विचारतो आणि तो खूण करील त्याप्रमाणे बैल हो किंवा नाहीं याची मान हालवितो केव्हां केव्हां बैलाचा धनी जमिनीवर–रस्त्यावर आडवा निजून बैलाला आपल्या पोटावर अुभा करतो. बैलहि आपले चार पाय अगदीं जवळ जवळ आणून धन्याच्य पोटावर अुभा रहातो. पोटासाठी अितके त्रास सोसत असलेला पाहून घरवाले आणि प्रेक्षक लोक त्याला पै-पैसा, आणा, रुपया, कांहींतरी देतात. नंदीबैल आला म्हणजे लोकांचे ध्यान खेचण्यासाठी आणि तमासगीर मंडळी गोळा करण्यासाठीं नंदीवाला अेक ढोलावर अेक वेताची वाकडी केलेली छडी घासत असतो. कोऱ्या चामड्यावर वेताची छडी घासूं लागली म्हणजे त्यांतून ड्रॉंव् ड्रॉंव् ड्रॉंव् गुज् गुज् गुज् गुज् गुज् अस आवाज अेकूं येतो.

अेकदां आमच्या गल्लीत अेक नंदीबैल आला. येथे येऊं नको, जा, म्हणून सांगितलें तरी अैकेना. त्याने ढोल वाजविणें सुरू केलें. हें पाहून शेजारच्या अेक. मुलाला मीं म्हटलें, " याच्या ढोलक्याचा हा कर्कश आवाज बंद पाडणें कठिण नाही. मी त्याच्या कानांत माझा मंत्र सांगितला. कानांत मंत्र पडतांच त्याच्या आनंदानें मुलाचें डोके खुलले. तो लागलीच घरांत धांवत गेला. आतां चांगली गंमत पहावयास मिळेल, या अपेक्षेनें मी जरासा दूर जाअून गंमत पाहण्याच्या तत्परतेनें अुभा राहिलों. माझ्या दोस्तानें घरांतून अेक कापडाची चिंधी खोबऱ्याच्या तेलांत बुडवून तो बोळा मुठींत लपविला आणि नंदीवाल्याच्या समोर येअून अुभा राहिला. नेमकी संधी पाहून त्यानें तो तेलानें थबथबलेला बोळा पचकन् ढोलाच्या चामड्यावर मारला. चामडें तेलकट होतांच त्याचा आवाज बंद झाला वेताची छडी त्या बुळबुळीत चामड्यावर कांहीं केल्या वाजेना. नंदीवाला चिडला आणि तीच छडी घेअून मुलाच्या

अंगावर धांवला. मुलगा पहिल्यापासूनच सावध होता. त्यानें चट्दिशी घरांत प्रयाण केले आणि दरवाजा बंद करून खिडकी अुघडली आणि नंदीवाल्याला म्हणतो, "कशी झाली ! कशी झाली ! खोड मोडली ना आतां ?"

ही अजब युक्ति पुण्याला असतांना मीं अैकली होती. ती येथें अुपयोगी पडली.

## श्रावणी सोमवार ३०

आम्ही महादेवाचे अुपासक. घरांतल्या देव्हाऱ्यांत अनेक मूर्ती असत. याखेरीज महादेवाचे बाण, विष्णूचे शाळिग्राम, गणपतीचा लाल पाषाण, सूर्याचा सूर्यकांतमणि, आणि देवीचा सुवर्णमुखी धातूचा चकाकणारा तुकडा; अशीं सर्व अेकत्र ठेवलेलीं संपुष्टेंहि होतीं. पण देव्हाऱ्यांत मुख्य ठिकाणीं महादेवाचे प्रतीक म्हणून अेक नारळ ठेवण्यांत येत असे. या नारळाला आम्ही रोज अभिषेक करीत असूं. चंदन, अक्षता, फूल, वगैरे अर्पण करून नैवेद्य दाखवीत असूं. शेवटीं आरती करून प्रार्थना म्हणून पूजा समाप्त करीत असूं. श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी जुना नारळ बदलून त्या ठिकाणीं नवा नारळ ठेवण्यांत येत असे. सरकारी अंमलदार बदलला म्हणजे ज्याप्रमाणे जाणाऱ्या आणि येणाऱ्या दोघां अंमलदारांचा अेकत्र सत्कार होतो, त्याप्रमाणें त्या सोमवारीं दोन्ही नारळांचा अेकत्र अभिषेक होतो. त्यानंतर पूजेचा नवीन नारळ मुख्य स्थानीं विराजमान होतो; आणि जुना नारळ बाजूला खालीं राहून पूजा ग्रहण करतो. दुसऱ्या दिवशीं जुना नारळ फोडून आंतील वाळलेल्या खोबऱ्याचा थोडा थोडा प्रसाद घरच्या सर्व मंडळींना देण्यांत येअी. पुढें मी कॉलेजांत शिकावयास गेलों तेव्हा देखील टपालांतून माझा प्रसाद मला मिळत असे.

पूजेचा नारळ अेक वर्षभर ठेवावयाचा असतो यासठीं खूप काळजीनें तो पसंत

करण्यांत येअी. वर्षाच्या शेवटी आंतील खोबरे जर चांगलें निघाले तर ती कुळदेवाची कृपा; याच्या अुलट जर आंतील खोबरे खवट निघालें किंवा कुजून गेलें असले तर तें कुळदेवाच्या अवकृपेचें लक्षण मानलें जाअी.

या सर्व विधींमुळें आम्हांला आमच्या कुळधर्माप्रमाणे श्रावणी सोमवार वर्षारंभाप्रमाणें वाटत असे. त्या दिवशीं संध्याकाळपर्यंत अुपवास असावयाचा. सकाळपासून प्रदोषकाळापर्यंत रुद्राभिषेक, पूजा, वगैरे चालूच असे. वडिलांना देवपूजा, वैश्वदेव, रुद्र, सौर, गणपत्यथर्वशीर्ष, वगैरे सर्व मुखोद्गत येत असत. घरीं जर भटजी वेळेवर आले नाहींत, तर वडील स्वतः सर्व पूजा मंत्र, तंत्र, यथासांग सर्व साभाळून स्वतःच करून मोकळे होत. मग भटजींचें काम अुशीर केल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून दक्षिणा घेअून जाण्यापुरतेंच रहात असे. कुळदेवाविषयी माझ्या वडिलांची निष्ठा आणि शरणागति लहानपणी मला अगदीं स्वाभाविकशीं वाटत होतीं. आज जेव्हां विचार करतों तेव्हां ध्यानांत येतें कीं त्यांच्यासारखी जिवंत निष्ठा मी फारच थोड्या लोकांत पाहिली आहे. म्हणूनच ती असाधारण होती, असें आज म्हणावेंसें वाटतें

आमच्या घरचा दुसरा अेक रिवाज मी अितरत्र कोंठेहि पाहिला नाहीं. श्रावणी सोमवारच्या दिवशीं वडील सकाळीं अुठून स्नानादि करून संध्या आटोपून देवघरांत जाअून बसत आणि पूजेला सुरवात करण्यापूर्वी अेक सुंदर कागद घेअून त्याला चंदन, कुंकूं, वगैरे लावून त्या पत्रावर कुळदेवाला अुद्देशून अेक पत्र लिहीत. पत्राच्या मायन्याचे शब्द अितके लांबलचक असत कीं पहिलें पान अर्ध्याहून अधिक त्या मायन्यानेंच भरून जाअी. मग गतवर्षी कुटुंबाची स्थिति कशी होती तें सर्व लिहिलें जाअी. या गेल्या वर्षी आपण आम्हांवर अमुक अमुक समृद्धीची कृपा केली, घरामध्ये अमुक अमुक मुलांचा जन्म झाला, अमुक अमुक गोष्टी घडल्या, अमुक प्रकारे कुटुंबाचा अुत्कर्ष झाला, वगैरे लिहिण्यांत येअून त्यानंतर वर्षदरम्यान कोण कोण आजारी पडली, चिंताजनक काय काय गोष्टी घडल्या, वगैरे सर्व गोष्टी देअून आम्हीं तुझी अज्ञान लेंकरे आहोंत, तुझी लीला आम्हांला काय समजणार ? तूं जें कांहीं करतोस तें सर्व श्रद्धापूर्वक मान्य करणें हाच आमचा धर्म आहे, वगैरे गोष्टी येत. पुढें येत्या वर्षासाठीं जी कांहीं मनीषा असेल ती लिहिण्यांत येअी. या मनीषेमध्यें मागितलेल्या वस्तू सामान्य स्वरूपाच्याच असत. सर्वांना सुखसमाधान मिळावें हेंच मागणें मागितलेलें असे. हें सर्व लिहिल्यानंतर सामाजि सुखदुःखाचा

अुल्लेख केअी. त्यांत मुख्यत्वें दुष्काळ, महर्गता, रोगराअी, वगैरचाच अुल्लेख असे. आणि तेथेंहि सर्वांचें कल्याण होवो, वगैरे मागून घेअून शेवटीं दासानुदास सेवक म्हणून सही करण्यांत येत असे. त्या दिवसाची पूजा आटपली म्हणजे शेवटीं हें पत्र कुळस्वामींच्या चरणीं सादर करण्यांत येत असे.

अशा प्रकारचे पत्र कुळस्वामींना लिहिण्याचा रिवाज आपल्या घरीं आहे हें देखील मला, मी पूजेंत मदत करू लागलों तेव्हांच, कळून आलें. हीं पत्रें वडील गुप्त ठेवीत असे नाही. पण कुटुंबांतील सर्व मंडळींना गोळा करून त्यांना वाचूनहि दाखवीत नसत. अशा प्रकारचीं कितीतरी वार्षिक पत्रें त्यांच्या पेटींत पडलेलीं मी पाहिली होतीं. शेवटीं मी जितकी हाती आलीं तीं गोळा करून ठेवलीं होती. लेगच्या दिवसात घर सोडून जाणें, प्रवासाला जाणें, वगैरे कारणांमुळें माझ्या सामानाची अव्यवस्था होअी. पुढे जेव्हां मी अुग्र राजकारणांत पडलो तेव्हां माझ्या अेका पुतण्याने भिअून जाअून माझे बरेचसे कागदपत्र जाळून टाकले. त्यांतच हीं पत्रें गेलीं असल्यास नवल नाहीं.

ज्या वर्षी अशा पत्राची बातमी मला प्रथम लागली त्या वर्षी वडील तें पत्र लिहीत असतांना त्यांच्या जवळ मी जाअून बसलों आणि पत्र लिहून झाले म्हणजे दाखवा असें त्याना म्हटले. पुरे न झालेलें पत्रच माझ्या हातीं देअून ते म्हणाले, "यांत कांहीं आणखी घालण्याजोगे आहे असे तुला वाटले तर मला सांग." पत्र वाचून मी प्रभावित झालों होतों. यांत आणखी काय घालण्याजोगे आहे, याचा मी विचार करूं लागलों. त्या वर्षी हिंदुस्थानच्या सरहद्दीवर आफ्रिडी लोकांशीं युद्ध चालले होतें. हे आफ्रिडी लोक हिंदुस्थान आणि अफगाणिस्थान यांच्या सरहद्दीवर रहाणाऱ्या मुसलमानांची अेक जात आहे. हे लोक अिंग्रजांच्या विरुद्ध मोठ्या बहादुरीनें लढत आहेत, असें मी वर्तमानपत्रावरून अैकिले होतें. मी वडिलांना म्हणालों, "या आफ्रिडी लोकाचा विजय होवो आणि अिंग्रजांचा पराभव होवो असे मागून घ्याना." माझें म्हणणे अैकून त्यांनीं पत्रांत चार ओळी वाढविल्या आणि पत्र पुरे केलें. दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी तें पत्र घेअून मी वाचलें. त्यांत जय-पराजयाचा अुल्लेखच नव्हता. अितकेच लिहिलें होतें: "सरहद्दीवर लढाअी चालू आहे आणि मनुष्यसंहार होत आहे. तेथें दोन्ही पक्षांना बुद्धि लाभो, लढाअी शांत होवो आणि सर्व सुखी राहोत." मला हे मिळमिळीत मागणे आवडलें नाहीं. मनांत अेक विचार येअून गेला : वडील सरकारची नोकरी करतात; तेव्हां सरकार-

विषयीं थोडासा पक्षपात असणें स्वाभाविक आहे. तक्रार करण्याची मला हिंमत झाली नाहीं. "असें कां लिहिलें," असेवढेंच मी विचारलें. वडील म्हणाले, "देवाजवळ मागावयाचें तें असेंच मागावयाचे. कोणाचें वाओट होवो अशी आपण काय म्हणून अिच्छा करावी ! ज्याचें कर्म वाओट असेल तो भोगील. सर्व सुखी राहोत असेंच मागणें अिष्ट आहे. त्यांतच आपणाला बरकत लाभते."

वडिलांच्या म्हणण्याचा मी पुष्कळ विचार केला !

## बोटें मोडण्याची कला

३१

बोटे मोडून कट्कट् आवाज काढण्याचा आनंद लहानपणी कुणी मिळवला नाहीं ? मुलीना तर कानशिलावर बोटे मोडण्याची कला जणूं जन्मापासूनच अवगत असते. पण मला माझ्या लहानपणीं बोटे मोडतां येत नसत. प्रत्येक बोट धरून जोरानें खेचले तरी आवाज निघत नसे. गोंदूला या गोष्टीची बातमी लागली. मला चिडविण्याची लहर आली म्हणजे तो म्हणावयाचा, "तुला कोठे बोटें मोडतां येतात ? आमचीं बोटें पहा कशीं वाजतात तीं." शाळेंतील दोन चार संवगड्यांबरोबर मी बोलत असतांना गोंदूनें माझे असें व्यंग बाहेर काढलें म्हणजे मला अगदीं अब्रू गेल्यासारखे दुःख होई. अेका हाताच्या मुठींत धरलेले बोट जोरानें खेचून मी त्याला म्हणत असें, "हीं पहा माझीं देखील बोटे वाजतात." पण तो तर फक्त शरीराच्या कातडीच्या घर्षणाचा "सुक्" असा आवाजच असे. गोंदू हंसून म्हणे, "हा कांहीं बोट मोडण्याचा आवाज नव्हे. तो हाडांतून "कट्ट" असा निघाला पाहिजे."

वारंवार अशी फजिती झाल्यामुळें मी ठरवलें की, या कलेमध्यें पटाअीत झालेच पाहिजे.

शहापुरांत अेक न्हावी होता. तो धंदा करीत नसे; कारण त्याला वेड लागले होतें. कोणाहि मनुष्याच्या शरीराचा कोणताहि भाग चिमटींत धरून तेथून कट्ट असा

आवाज करण्याची कला त्याला साधली होती. कधीं तो रस्त्यावर दिसला म्हणजे "तुला खायला देतों, ये." म्हणून आम्हीं त्याला बोलावीत असूं आणि "आमचीं बोटें मोडून दे" असा त्याला आग्रह करीत असूं. कधीं त्यानें शेंडीच्या केसांचा अेक बट खेचावा आणि त्यांतून कट्ट असा आवाज निघावा. त्यानें कान खेचला की तेथूनहि कट्ट असा आवाज येअी. अशाच रीतीने नाक, हनुवटी, मान, कोठेहि खेचून त्याला आवाज काढतां येत असे हा खेळ संपला म्हणजे आम्ही आअीकडून कांहीं खावयाचें मागून त्याला देत असूं.

अेके दिवशी आअीनें सांगितलें, "हा हजाम पूर्वी मोठा मांत्रिक होता. यानें अेक हुलस (भूत) वश केलें होतें. त्या काळचा याचा डौल पहाण्याजोगा होता. लोक सांगतात की, याच्या घरी सोन्याची समई असे. समईत तेल न घालतां तो पाणीच ओतत असे. तरी दिवा आपला जळायचाच त्यानें साधलेला मंत्र त्याला बारा वर्षें पोहोंचला. पुढें अेकाअेकीं त्याला चेड लागले. त्याचें सर्व वैभव नष्ट झाले आणि तेव्हांपासून तो असा भीक मागत फिरत आहे. त्यानें मलिन विद्या साधली होती. बारा वर्षेपर्यंत त्याने जसें सांगावे तसे हुलस त्याचे काम करून देअी. बारा वर्षें भरतांच तेंच भूत त्याच्यावर अुलटले. आणि त्यानें याला देशोधडीस लावले. करावें तसें भरावे."

बोटे मोडण्याची कला कोठवर पोचलेली आहे याची कल्पना आल्यानंतर माझ्या मनानें घेतलें कीं, या हजामाप्रमाणें आपणालाहि बोटे मोडतां आलीं पाहिजेत. मग काय, रात्रंदिवस अेकाच गोष्टीचे ध्यान. पंधरा दिवसांच्या प्रयत्नानें माझ्या करांगळीतून कट्ट असा आवाज निघाला! त्या दिवशीं माझ्या आनंदाला सीमा नव्हती. मी दुप्पट अुत्साहानें प्रयत्न सुरू केला. हळु हळु दोन्ही हातांचीं पांचहि बोटे मोडूं लागलीं. पुढें प्रत्येक बोट तीन सांध्यांत मोडूं लागले. कांहीं दिवसांनीं मला शोध लागला कीं, अितर बोटांप्रमाणे आंगठ्यालाहि तीन सांधे असतात. तिसरा सांधा मनगटाच्या जवळ असतो. तोहि सांधा जेव्हां वाजूं लागला तेव्हां प्रत्येक हातांत आवाजाचीं पंधरा स्थानें साध्य झालीं. मग अेवढ्यानें मला संतोष होअीना. प्रत्येक बोटाचे वरचे दोन सांधे तीन तीन प्रकारे मोडून त्यांतून तिहेरी आवाज काढण्याचा मीं प्रयत्न केला. तो साध्य झाला! मग पाळी आली मनगटाची. तेंहि वश झाले. माझा विजय वाढूं लागला. दोन्ही बाहुळ्यांतून (खांद्यांतून) कट्ट असा आवाज निघूं लागला. मग पाळी आली मानेची. तिनेंहि तीन प्रकारे मोडून आवाज देण्याचे

सुरू केलें. मान मागे वळवली म्हणजे अेक आवाज होअी आणि डाव्या-अुजव्या बाजूला ताणली म्हणजे पुन्हां त्यांतून आवाज निघे. मानेचा असा त्रिविध भंग साधल्या नंतर मी कान पकडले. त्यांचीहि मुळें बोलूं लागलीं. मग कमरेचा विचार केला. यांत कांहीं नवीन नव्हतें. पुष्कळ लोक आळोखे पिळोखे देअून पाठीच्या कण्याचीं आणि कमरेचीं हाडें वाजवितात. यांतहि अुजवी आणि डावी बाजू असतेच. गुडघ्याने ताब्यांत येअीतोंपर्यंत फार त्रास दिला. तो आवाज देत असे; पण मर्जीला येअील तेव्हांच. चार स्नेह्यां-सोबत्यांमध्यें प्रदर्शन करावयाला जावें आणि आयत्या वेळीं तो रुसून बसावा, असेंहि होत असे. नंतर घोटयाची कसरत सुरू झाली. तोहि बोलका झाला. पायांचीं बोटें तर यापूर्वीच अनेक प्रकारें मोडलीं जात असत.

आतां जिंकण्याचा असा प्रदेश अुरला नाहीं. कोपर कधींच वाजले नाहीं. तेव्हां मीं त्याचें नांवच सोडलें. अेके दिवशीं निजून अुठून जांभअी दिली, अितक्यांत मला सुचलें कीं, तोंडाचा खालचा जबडा वाजलाच पाहिजे. बकऱ्याप्रमाणें तो आजूबाजूला हालूंहि शकतो. पण तोडाचे असले चाळे मला आवडले नाहींत. म्हणून अेकदोनदां करून पाहून जबडा वाजविणे मी सोडून दिले.

अशा रीतीनें मी गोंदूवर विजय मिळविला. माझी ही करामत पाहून सर्वजण चकित झाले. पण अेवढ्यानें माझे पोट भरले नव्हतें. मी पुढें पुढेंच चाललों होतों. हातांचीं बोटे शेवटीं अितकीं वश झालीं की, म्हणाल तेव्हां आणि म्हणाल तितक्यांदा तीं मोडलीं जात असत. कोणी माझा आंगठा किंवा त्याचें नख धरलें तर तेथल्या तेथें मी आंगठा मोडून दाखवीत असें.

अितका विजय मिळवून देखील अेका गोष्टीचे मला वैषम्य वाटे. अेका हाताचीं बोटे मोडावयास दुसऱ्या हाताची मदत घ्यावी लागे. असलें द्वैत काय कामाचें? अेकाच हाताच्या आंगठ्यानें त्या हाताचीं बोटे मी मोडूं लागलों. मला वाटलें, आपण या कलेचे शिखर गांठलें. पण नाहीं; आणखी अेक मजल गांठावयाची होती. पायाचा आंगठा आंत खेचल्यानें केव्हां केव्हां वाजत असे. मी विचार केला, दोन बोटांचा स्पर्श केल्यावांचून, कसल्याहि दाबावांचून, बोट आपोआप मोडले पाहिजे. आपलें शरीर काय अेक कल्पवृक्ष आहे. जी कल्पना करावी ती सफल झालीच पाहिजे. थोडयाच दिवसांत प्रत्येक आंगठा जरासा पसरून त्यांतून मला आवाज काढतां

येऊं लागला. असा स्वयभू आवाज जेव्हा मी ऐकला, तेव्हाच माझी विजिगीषा तृप्त झाली.

पण हाय ! असल्या कुचकामाच्या कलेत प्राविण्य मिळविण्यांत मला फार जबरदस्त किंमत द्यावी लागली. शरीराचे सर्व सांधे ढिले झाले ! हाताच्या पंजांत तर मुळींच जोर राहिला नाहीं. अेकादी वस्तु मी हातांत बळकट धरून ठेविली तरी कोणीहि ती हिसकावून घेऊं शकेल.

शाळेमध्ये मला वाराचेंडू ( फूट-बॉल ) खेळणें आवडत असे. माझ्या दुर्बल शरीराच्या मानानें वाराचेंडू मी चांगला खेळत अर्से असें म्हणतां येअील. खेळांतील कौशल्यापेक्षां माझ्यांत खेळाची हिरीरी अधिक होती. हात, पाय मोडेल याचा विचार न करतां विरुद्ध गडयावर मी तुटून पडे. जेथे चेंडूमाठीं चक्री किंवा गर्दी जमली असेल तेथे अस्मादिक धांवत जाऊन हजर व्हावयाचेच. माझ्या वर्गात माझी अुंची सर्वात अधिक होती. त्यामुळें आणि माझी हिरीरी पाहून पुष्कळ वेळां मला लक्ष्यपाल (गोल-कीपर) नेमीत असत. वाराचेडूच्या खेळांत लक्ष्यपाल सर्व-तंत्र-स्वतंत्र असतो. पाय, हात, डोकें, सर्व कांहीं वापरण्याची त्याला सूट ! मी लक्ष्यपाल असलों म्हणजे आमचा पक्ष निश्चित असे. पण त्यांना काय ठाऊक कीं मी बोटे मोडण्याच्या कलेत प्राविण्य मिळविण्याच्या मागे लागलो होतों ?

अेके दिवशीं खेळांत मी लक्ष्यपाल होतों. वाराचेंडू वरून आला. लक्ष्यवेध होणार अशी सर्वांना खात्री होती. अितक्यात मी जोराचें अुड्डाण करून दोन्ही हातांनीं वाराचेडू रोकला. सर्वत्र माझा जयजयकार सुरू झाला. पण माझ्या हाताला चेंडू अटकावतां आला नाहीं. वेगवान् चेंडू दिल्या झालेल्या हातांतून निसटला आणि त्यानें लक्ष्यवेध केला ! अेका क्षणांत माझा जयजयकार मावळून माझा धिःकार सुरू झाला. हें कसें होऊं शकलें याची कुणाला कल्पना येअीना. खेळतांना ध्यान देण्यांत किंवा कडवेपणांत मी कमी नसें, हे सर्वांना ठाऊक होतें. मग आज हें अर्से कसें झालें ? मित्र जवळ येऊन माझा हात पाहूं लागले. मी त्या वेळीं कांहींच बोललों नाहीं. पण मनाची खात्री झाली, कीं बोटें मोडण्याची कला फारच महाग पडली आहे !

त्याच क्षणीं मी या कलेचा त्याग करण्याचें ठरविले. पण ही कला माझा त्याग करण्यास तयार होअीना ! " बाबा कंबल छोडनेको तैयार हुवा, लेकिन् कंबल बाबाको क्यौं छोडे ? " बोटें मोडण्याची ही घातकी कला मला अजून चिकटलेली आहे. मात्र

ती हातांच्या बोटांपुरतीच उरली आहे. ही संवय मोडण्याचा प्रयत्न मी अनेक वेळां केला; पण ज्याप्रमाणें डोळ्यांच्या पापण्या नेहमीं हालत असतात आणि आपणाला तें समजतच नाही, त्याचप्रमाणें हातांचीं बोटें मोडण्याचें माझें काम चालूच असतें. मला वाटतें, माझ्या हाताला अेकादा रोग झाला असता तरी देखील माझें अितकें नुकसान झाले नसतें.

अेकाद्या गोष्टींत विजय मिळविण्याची किंवा प्रवीण होण्याची महत्त्वाकांक्षा असणें ही चांगली गोष्ट आहे. हिरीरी, कडवेपणा, किंवा टेक सांभाळण्याचा बाणा यांतच जीवनाचें तेज आहे. पण भलत्याच ठिकाणीं आंधळेपणानें त्याचा अुपयोग केल्यास जन्मभर पस्तावावें लागतें आणि पश्चात्ताप करूनहि सुधारत कांहींच नाहीं. आपण पहिले यावे, सर्वांत श्रेष्ठ व्हावें, अशा तऱ्हेची महत्त्वाकांक्षा मला फारशी कधीच शिवली नाही. पण चिडून जेव्हां मी तिच्या वाटेस गेलों आहें, तेव्हां असाच आंधळा बनलों आहे.

*

*

## कुसंस्कार ३२

शहापुराच्या अेका कोपऱ्यांत होस्सूर गांव आहे. शहापूर आणि होस्सूर यांच्यामध्यें अेका शेतार्चेहि अंतर नाहीं. दोहोंतील घरे अेकमेकांला चिकटलेलीं आहेत पण शहापूर आहे संस्थानी गांव; आणि होस्सूर आहे खालसा मुलूख. होस्सूर आहे कानडी नांव. याचा अर्थ होतो 'नवें गांव' पण तेथें शाळा आहे मराठीच.

कोणत्या अुद्देशानें कोण जाणे, अेकदां मला होस्सूरच्या शाळेंत घालण्यांत आले होतें. शहापुरांतील मराठी शाळा चांगली मोठी होती पण होस्सूरची शाळा आम्हांला जवळ पडत असे. पण मला वाटतें कीं, मला होस्सूरच्या शाळेंत घालण्याचें तें कारण नव्हतें. ब्रिटिश मुलुखांत जे लोक शेतसाऱ्याबरोबर लोकल फंड देतात त्यांना शाळेची फी अगदींच थोडी द्यावी लागते. शहापूरच्या शाळेंत भरपूर फी द्यावी लागली असती. होस्सूरच्या शाळेंत जवळ जवळ फुकट शिकतां येअील, याच विचारानें मला होस्सूरच्या शाळेंत पाठविलें असावे.

माझ्या शिक्षणाकडे घरीं कोणाचेंच ध्यान नव्हतें. माझें स्वतःचें कोठून असणार ? होस्सूरच्या शाळेंत आमचे हेडमास्तर महिनेच्या महिने रजेवर असत. हेडमास्तरांना कोणी असिस्टंट नव्हताच. रोज चपराश्यानें यावें, शाळा अुघडावी, आणि केरसुणी फिरवल्यासारखें करावें. मग मुलें आपापल्या वर्गांत बसत. कोणी नकाशे

अुघडो, तर कोणी कविता गाअी. दहा वाजले म्हणजे सुट्टीची घंटा वाजविण्यासाठीं विद्यार्थ्यामध्यें हमरातुमरी होत असे. अेक मोठा विद्यार्थी अतिशय दुष्ट असे. अेकाद्या लहान विद्यार्थ्यानें अुंच अुडी मारून घंटा वाजविली आणि घंटेतून निघणाऱ्या आवाजाचें दीर्घ अनुरणन अैकण्यासाठीं तो अुभा राहिला कीं या लंबूसनें येअून घंटेला हात लावून तिच्या नादाचा वध करावा. त्यामुळें विद्यार्थ्यानीं त्याचें नांव ठेवलें होतें 'घंटा-नाद-विडंबन'

तो मुलगा रीतीनें पण वाअीट होता. रोज कोठून तरी अेकादें घाणेरडें पुस्तक तो घेऊन येत असे. मग वरच्या वर्गातील मुलें त्याच्या आसपास गोळा होअून त्या पुस्तकाचे पारायण करीत. मला वाटतें, मी देखील त्याच वर्गात होतों. माझ्या वर्गात मीच सगळ्यांत धाकटा त्या घाणेरड्या पारायणांतील अेक शब्दहि मला समजत नसे. मला अगदींच अनभ्यस्त पाहून अितर मुले मला आपल्या टोळींत बसूं देत नसत. तसें करण्यात माझ्याविषयीं त्याना तिरस्कार वाटत असे असें नाहीं. पण मी मुग्ध बालक आहें, ही मुग्धता बिघडविण्याचें पाप आपण करूं नये अशा बुद्धीनें घंटानादविडंबन मला आपल्या टोळींत बसूं देत नसे, असें मला वाटतें. त्याच्या य अेवढ्या सद्बुद्धीबद्दल मला जरूर आभारी राहिलें पाहिजे. वर्गात चालणाऱ्या त्यांच्य गोष्टी मला समजत नसत. मला त्यांत गोडीहि वाटत नसे. तरीहि त्या लोकांचे कांहीं अुद्गार कानावर येअून आदळत.

बाल-मनाचा अेक स्वभाव आहे कीं, जी गोष्ट समजली नाहीं ती आठवणीच्या अेका कोपऱ्यात साभाळून ठेवावयाची आणि मनाला रिकामपण मिळाले कीं त्या गोष्टीचे रहस्य शोधून काढण्यासाठीं खंथ चालवावयाचा. माझेहि असेंच झालें. मनामध्यें अनेक वेडेवांकडे तर्क-वितर्क चालत आणि चिताला मलिन करीत. अशा रीतीनें होस्सूरच्या शाळेंत नसलें तरी त्या शाळेमुळें माझें पुष्कळ नुकसान झालें.

शेवटी हेडमास्तर आले. त्याच्या सुट्टीच्या दिवसांत मी आपल्याव मनानें नकाशा पहात असल्यामुळें भूगोलांत माझी प्रगति चांगली झाली होती. त्यामुळें मास्तर माझ्यावर खूष असत. गणित आणि मराठी काव्य हे त्यांचे प्रिय विषय होते ते विद्वान् होते त्याहून अधिक अहंमन्य होते. वर्ग चालू असतांनाच त्यांना भेटण्यासाठीं मधून मधून कोणीतरी येअी. मग त्यांच्या गोष्टी चालत. आम्हीं त्या अैकत असूं. आमच्या मास्तरांना स्वतःच्या मेंदूची किंमत असाधारण वाटत असे. अेका स्नेह्याला ते म्हणाले, "माझे गणिती डोके मी क्षुद्र कामांत वापरीत नसतों.

भाजीबाजारांत किंवा वाण्याचे दुकानीं जर कांहीं विकत घेतलें आणि त्यांनीं जर मला हिशोब करावयास सांगितले तर मी त्यांना साफ सांगतो, "तुझा तूं हिशोब कर. जे कांही पैसे होत असतील ते मजकडून घे आणि बाकीची चिल्लर मला परत दे. माझें गणिती डोके वाणगट हिशोबांत मी कधीं खर्च करीत नसतों."

मास्तरांचे हें वचन ऐकून मला आश्चर्य वाटलें. त्यापूर्वी माझी समजूत होती कीं, गणितांत हुशार असलेल्या मनुष्याला अवघड अुदाहरणें देखील तोंडीच करता येतात. अशा मनुष्याला हिशोब करण्याचा कंटाळा नसून अुलट त्यांत गोडीच वाटते. सामान्य हिशोबांत देखील माझें तट्ट त्रैराशिक मांडल्यावांचून चालत नसे. त्यामुळें माझ्या मनाने घेतलें होतें कीं आपले डोकें कांहीं गणिती नाहीं. पण जेव्हां आमच्या गणिती हेडमास्तरांचा अभिप्राय ऐकला तेव्हा मला नवीन गोष्ट समजली, की, स्वतःचें ज्ञान वाटेल त्या वेळीं वापरण्यासाठीं नसतें! मेंदू जर पावलोंपावली वापरला तर तो खर्चून जावयाचा. जे भिकारी किंवा कंजूष असतील त्यांनीं तुच्छ बाबतींत वाटल्यास मेंदू वापरावा. जो गर्भश्रीमंत गणिती असेल तो ऐकादा युद्धासारखा प्रसंग येअून पडेल तेव्हांच म्यानातून आपली तरवार बाहेर काढील! ऐका दुकानदारा-विषयीं अशीच ऐक गोष्ट मी ऐकली होती. भला मनुष्य आपल्या दुकानांत डोळे मिटून बसत असे. कोणी गिऱ्हाईक आलें तर तेवढ्यापुरतेच डोळे अुघडीत असे. कोणीसे त्याला असें करण्याचें कारण विचारले. जबाब मिळाला, "आंखों की नूर मुफ्त क्यों खोवें?"

या गणिती हेडमास्तरांच्या कल्पनेंतील विचारदोष ध्यानांत येण्यास मला फार वेळ लागला नाहीं. पण त्यानें पेरलेली ती वृत्ति डोक्यांतून काढून टाकतांना नाकीं नअू आले. आणि आज देखील ती वृत्ति गेली आहे, असे मला म्हणतां यावयाचें नाही

अके दिवशी गवसु म्हणून अेक मुसलमान आमच्या घरीं आला होता. त्यानें स्वतःची अेक लहानशी तुकडाजमीन गहाण ठेवून वडिलांच्याकडून शें सव्वाशें रुपये घेतले होते. व्याज वाढत चाललें होतें, तें देणे बाजूला राहिलें; पण आज तो आणखी कांहीं पैसे कर्जाऊ मागण्यासाठीं आला होता. गवसु आळशी नंबर अेकचा. कांहीं खास धंदा असा करीत नसे. अिकडे तिकडे लटपटी करून थोडें फार खिशांत टाकीत असे. अुत्पन्नापेक्षां खर्च जास्ती; यामुळें पुनः कर्ज घेण्याची जरूर पडली. या नव्या कर्जाचे तारण म्हणून तो स्वतःचे घर लिहून द्यावयास तयार झाला होता.

सामान्यपणे पैशाचा व्यवहार घरांतील कर्ते पुरुष स्वतःचे अिच्छेप्रमाणे करीत असतात. लहान मुलांना त्यांत काय विचारावयाचें असतें ? पण त्या दिवशीं वडिलांनीं, कां कुणाला ठाअूक, मला विचारलें, "दत्तू, हा गवसु पुनः शंभर रुपये मागतो आहे आणि स्वतःचें घर गहाण ठेवावयास तयार आहे. याला आपण रुपये कर्जाऊ द्यावेत काय ?" मी आश्चर्यचकित झालों. कोणाला कर्ज देणें, न देणें, यासारख्या महत्त्वाच्या बाबतींत वडील माझी सल्ला मागतील, अशी मला कल्पनाहि नव्हती. यामुळें त्यांनी प्रश्न विचारतांच मला प्रथम जें वाटले तें हें कीं, आतां मी मोठा झालों. कारण कौटुंबिक राज्यांत मत देण्याचा अधिकार आपल्याला प्राप्त झाला. हा

अधिकार मिळाल्याचा आनंद अथवा हृदयाचा हर्ष मी रोकूं शकलों नाहीं. मला वाटलें कीं हा माझ्या चेहऱ्यावर अुमटलेला हर्ष कुणालाहि सहज दिसून आला असता; पण हा विचार मनांत येताच माझ्या अुथळपणाची मला लाज वाटली. ही लाजहि चेहऱ्यावर अुमटली असेल असे वाटून मी चांगलाच गोंधळलो. शेवटीं अवसान आणण्याचें ठरविलें. मनांत विचार केला कीं ज्या अर्थी मी मोठा झालोंच आहें, त्या अर्थी आपण गंभीर बनले पाहिजे. अशा प्रकारची सल्ला देण्याचे प्रसंग आतां वारंवार यावयाचे तेव्हां या नवीन हक्काला आपण पूर्व लायक आहोत, अशा प्रकारची स्वाभाविकता चेहऱ्यावर असली पाहिजे. आणि प्रौढ वयाच्या माणसाप्रमाणें आपल्याला पोक्त विचार करता येतो, असेंहि दिसून आलें पाहिजे.

मनांतील ही सर्व भवति न भवति आटपून क्षणभर विचार करून मी म्हणालों, "पैशाच्या व्यवहारात मला काय समजतें ? तरीहि मला वाटतें की या माणसाला कर्ज देऊं नये. आपल्या सराफ गल्लींतील घराकडे जातांयेतांना वाटेत पुष्कळ वेळां मी याच्या घरावरून फेरी मारली आहे. याच्या घरीं याची म्हातारी आजी आहे, बायको आहे आणि लहान लहान मुलें आहेत. हा गवसु सगळा दिवस भटकत असतो. घरच्या बाया बिचाऱ्या सुताच्या कांड्या भरून देण्याचें काम करतात. सकाळपासून सध्याकाळपर्यंत फाळकी फिरवावी तेव्हां कसेंबसें पोट चालतें. गवसु कांहीं घेतलेले कर्ज परत फेडूं शकणार नाहीं. शेवटीं व्याज आणि मुद्दल वसूल करण्यासाठीं त्यावें घर आपल्याला जप्त करावें लागेल. मग त्याची बायकापोरें बिचारीं कुठें जातील ?"

मला वाटले, दूरवरचा विचार करून मी कशी पोक्त सल्ला दिली आहे ! वडिलांना माझें म्हणणें पटलें. तेव्हा ते त्याला म्हणाले, "गवसु, दत्तू आप्पाचें म्हणणें मला बरोबर वाटतें." गवसु दाबलेल्या रागाने मजकडे पाहूं लागला. तेव्हा तर माझी खात्री झाली कीं खरोखर मी आता मोठा झालो आहें. गवसु कांहीं माझ्या विरुद्ध बोलूं शकत नाहीं. यापुढें गवसूनें माझेकडे वळून आपल्या अडचणी मला समजावून सांगण्यास प्रारंभ केला. शेवटी थोडीशी चर्चा होऊन आम्ही ठरविलें कीं गवसूच्या घराच्या शेजारची लहानशी जमीन आहे, तीच त्याचेकडून जुन्या कर्जात विकत घ्यावी आणि त्याला पन्नास रुपये अधिक द्यावेत. आणि बाकीच्या पन्नास रुपयांत त्यानें घर गहाण लिहून द्यावें. असें केल्यानें त्याचे जुनें कर्ज फिटेल आणि त्याचेवर फक्त पन्नास रुपयांचेंच कर्ज राहून त्याला व्याजहि फारसें द्यावे लागणार नाहीं.

माझ्या या व्यवस्थेत सावकारी व्यवहार-ज्ञान भरलेले होतेंच. पण त्याची जी जमीन आम्ही घेतली ती अितकी लहान होती की बाजारात तिला पन्नास रुपयाहून अधिक किंमत आली नसती जमीन रस्त्यावर आहे, त्या जमिनीवर अेक लहानसें घर बाधून दुकान म्हणून भाडयानें दिले तर गवसूला दिलेल्या कर्जाच्या व्याजाअितकें भाडे येअील, अशा हिशोबानें मी ही व्यवस्था सुचविली होती. मी त्या कुटुंबाचें हितच केले होतें

या पन्नास रुपयावरचे व्याजहि त्याने कधी भरले नाही. माझ्या वडील बन्धूनीं त्याचेवर कोर्टात दावा मांडला. दाव्याचे समन्स गवसूच्या आअीवरहि लागू करावयाचें होतें. यामुळे बेलिफाच्या बरोबर गवसूच्या घरीं मला अेकदां जावें लागले. ज्या घरीं कुशलप्रश्न विचारण्यासाठी मी पुष्कळदा गेलों होतों, त्याच घरी बेलिफाला घेअून शत्रूप्रमाणे प्रवेश करतांना मला अत्यंत लाज वाटली. गवसूच्या आअीच्या डोळ्याला डोळाहि मी भिडवू शकलो नाहीं. पण घरच्या स्वराज्यांत मिळालेल्या अधिकाराबरोबर असले ओंगळ काम करण्याची जबाबदारीहि माझ्यावर येअून पडली होती आणि ती निष्ठापूर्वक पार पाडण्याअितका मी मोठाहि झालो होतों

कोर्टामध्ये गवसूनें आमच्याकडून कर्ज घेतल्याची आणि व्याज कधींहि न दिल्याची कबूली दिली आता फक्त त्याचें घर जप्त करून तें लिलांव करण्याचीच गोष्ट बाकी राहिली. पण ती कल्पनाच मला असह्य झाली. मी मुन्सफला म्हणालों, "या गरिबाचे घर लिलांव व्हावे अशी माझी अिच्छा नाहीं. त्याला हप्तेबंदी करून द्या." कोर्टानें निर्णय दिला कीं पन्नास रुपये आणि त्या दिवसापर्यंतचे व्याज अेवढी रक्कम चुकती होअी तोंपर्यंत गवसूने दरमहा तीन रुपयांचा हप्ता भरावा अेक देखील हप्ता जर चुकला तर त्याचे घर जप्त करण्यात यावे. मी घडलेली सगळी हकीगत वडिलांना पत्रात लिहून कळविली. त्याचे अुत्तर आले की "तूं केलेस तें ठीक झाले." माझ्या जबाबदारीवर केलेल्या कामाला वडिलांची मंजुरी मिळाली, यामुळें माझा आत्मविश्वास वाढला. गवसूनें जवळजवळ अेक वर्षभर तीन तीन रुपये दिले. पुढें अेखाद्या महिन्याला अेकच रुपाया घेअून येअी. कोण्या महिन्याला आठच आणे घेअून येअी. मला त्याचें हसूं आलें. मी कंटाळून त्याला म्हणालो, "पुरे झाली ही वसुली. आतां येअूं नको माझ्याकडे. तुझ्या मुलांबाळांना या पैशाचे दूध, तूप देत जा म्हणजे झालें." कोर्टामध्ये खटला घेअून जाण्याचा हा माझा जसा पहिला प्रसंग होता, तसाच शेवटचाहि होता. यानंतर मी कधींच कोर्टात गेलों नाही

## पंचरंगी पोपट

३४

केशूला लहानपणीं फेपरे ( अपस्मार ) येत असे. कधीं जर चुकून रागावला किंवा चिडला तरी देखील तो बेशुद्ध व्हावयाचा आणि त्याच्या तोंडून फेंस यावयाचा. यामुळें त्याची प्रकृति सांभाळणें हे जरा नाजूक काम होतें. त्याचप्रमाणें त्याचा स्वभाव सांभाळणेंहि आवश्यक असे. याचा परिणाम असा झाला कीं त्याचा स्वभाव मिजासखोर बनला. तो जें कांहीं मागेल, तें त्याला मिळालेच पाहिजे. त्याच्या विरुद्ध कोणी ब्र देखील काढतां कामा नये. त्याचे लाड नेहमींच पुरविले जात. अितकें करूनहि तो असंतुष्टच रहात असे. लाड जसजसे पुरविले गेले, तसतशी त्याची अपेक्षाहि वाढतच गेली.

गोंदू केशूपेक्षां लहान. केशूच्या आजारीपणामुळें गोंदूकडे कांहीसे दुर्लक्ष झालें होतें. आणि त्याच्या दुर्दैवानें त्याच्या मागोमाग दीड वर्षातच मी हजर झालों. स्वाभाविकपणें सर्वांचें लक्ष माझ्याकडे लागलें. केशू आजारी म्हणून आणि दत्तू धाकटा म्हणून दोघांच्याकडे लक्ष पुरविलें जाअी. आम्हां दोघामध्यें बिचाऱ्या गोंदूला फारसा अवकाशच राहिला नाहीं.

अेकदां केशूला घेअून वडील गोव्याकडे गेले होते. तेथे पोर्तुगीज लोकांचा अंमल आहे. गोव्याहून परत येतांना केशूनें अेक पंचरंगी पोपट पाहिला. त्यानें हट्ट धरला

की, मला हा पोपट पाहिजेच. अक्कानें घरांतून पोपट काढून लावल्यापासून पुन्हां घरांत पोपट आणण्याची कोणाचीच अिच्छा नव्हती. विष्णूनें जर पोपट मागितला असता तर त्याला कोणी घेऊन दिला नसता. पण केशूची गोष्ट निराळी. वडिलांनीं तो पोपट विकत घेतला. गोव्याच्या हद्दींतून पोपट जर बाहेर गेला तर त्यावर कर द्यावा लागतो. (स्वतंत्र पोपटासाठीं हा कायदा नसून बंदी होऊन जाणाऱ्या पोपटासाठींच तो होता.) पोपटाचें रेल्वे भाडे देखील जवळ जवळ मनुष्याअितकेच असतें. पोपट अशा रीतीनें वाजत गाजत घरीं आला. तेव्हांपासून केशू सगळा दिवस पोपटाशीं खेळत असे आणि त्याचे बोल अैकत असे. पोपटाच्या गळ्यावर अेक काळी रेघ होती. आम्ही त्याला पोपटाची कंठी म्हणत असूं या कंठीमुळे पोपट कसा अुमदा दिसे. केशूनें त्याला "विठू, विठू" असें बोलायला शिकविले. या पोपटाला चारा घालण्याचे आणि पाणी पाजण्याचें काम माझ्यावर सोपविले होतें. रोज बाजारांत जाअून पोपटासाठीं मी केळीं आणीत असें. मधून मधून त्याला हिरव्या मिरच्या मी खाअू घाली. ताज्या हिरव्या मिरच्या म्हणजे पोपटाची मेजवानी. हिरवीगार मिरची आपल्या लाल चोचींत पकडून पोपट जेव्हां जिभेनें त्याचा स्वाद घेत असे, तेव्हां तें दृश्य पाहून मला मोठी गंमत वाटत असे. कोरफडाचा गर देखील पोपटाला फार आवडत असे. तेव्हां कोठून तरी कोरफड आणून तिचे कांटे काढून तुकडे करून, ते पोपटाला खाअूं घालण्याचें कामहि माझेंच. दिवसांतून दोन वेळां त्याचा पिंजरा धुअून काढावयाचा. पाण्याची वाटी तर पिंजऱ्यांत नेहमीं भरलेली असावयाची. रात्रीं निजतांना मी हरभऱ्याची डाळ भिजवून ठेवीत असें. सकाळ होते न होते अितक्यांत अुठून न्याहारीसाठीं मी ती डाळ पोपटाला देत असें. पिंजऱ्यांत मी जर माझें बोट घातलें तर पोपट जवळ येअून हळूच तें आपल्या चोचींत धरीत असे. पण तो कधीं मला चावला नाहीं. गोंदूला तसें करण्याची हिंमत नसे. अेके दिवशीं पोपटाच्या शेपटीचा पिसारा पिंजऱ्याचे बाहेर आला होता. गोंदूला संधी सांपडली. त्यानें तें शेपूट धरून जोरानें खेंचले. पोपटानें ओरडून आकांत केला. काय आहे म्हणून आम्ही सर्व तिकडे धांवलों. केशूनें रागानें गोदूची शेंडी धरली आणि अशी कांहीं जोरानें खेचली कीं, गोंदूला पोपटाचेंच अनुकरण करावे लागलें.

पोपटाची सर्व सेवा मलाच करावी लागे; पण पोपट केशूचा समजला जाअी. माझ्या नांवानें घरात अेकादे मांजर नेहमीं असावयाचेंच. गोंदूच्या मनानें घेतलें कीं, आपले देखील अेकादें जनावर असलें तर चांगलें. नारायण मामाच्या घरीं अेक

कुत्री होती. तिचें नांव होतें टॉमी. टॉमी शब्द ओकारान्त; तेव्हां मामानें ठरविले होतें की तो शब्द स्त्रीलिंगीच असावा. मामांना अिंग्रजी यथातथाच येत असे. पण कुत्र्याला अिंग्रजी नांव ठेवलें तरच आपली सुशिक्षित लोकांत गणना होणार ना! गोंदू टॉमीला घरीं घेअून आला आणि आअीला म्हणाला, "माझ्या टॉमीला कांहींतरी खायला दे." आअी म्हणाली, "दगडीमध्ये ताक आहे तें पाज तुझ्या टॉमीला." गोंदूनें तें सगळेंच भांडे कुत्रीपुढे ठेवून दिले. ताकामध्ये लोण्याचा मोठा गोळा तरता ठेवला होता. टॉमीनें प्रथम तोच चट्ट केला. वहिनीनें हे सर्व पाहिले आणि घरभर सर्वांना सांगितले. लोण्यापरी लोणी गेले आणि कुत्र्यानें दगडाचें भांडें अुष्टें केलें. सर्वांनीं मिळून गोंदूची खरडपट्टी काढली. दगडी हें भांडें अेक विशिष्ट प्रकारचा धोंडा तयार करून केलेलें असतें. डाळ शिजवायला तें फार अुपयोगी. चुलीवरून दगडी अुतरून ठेविली तरी दहा पंधरा मिनिटें आंतील डाळ अुकळतच रहावयाची. भांडें जितकें जुनें तितके चांगलें असे समजलें जातें. अितके चांगलें भांडे कुत्रीने अुष्टें केलें. आतां तें फेकून देणेच प्राप्त झालें. घरचे लोक गोंदूवर रागावले, पण टॉमी त्याचेवर खूष झाली. कां होणार नाहीं? तिला तर प्रथम प्रासे नवनीत-प्राप्तिः!

रात्रीचे आठ वाजले असतील; दिवाणखान्यांत कोणीहि नव्हतें. घरांतील मोठी मंडळी फिरावयाला गेली होती. स्त्रीवर्ग स्वयंपाकांत गुंतलेला होता. वहिनी जेवण-घरांत ताटपाट, वाटी, मांडीत होत्या. श्वानधर्माला जागून टॉमी येण्या-जाण्याच्या रस्त्यावर निजली होती. वडील बंधु घरीं नाहीत याचा फायदा घेअून त्यांच्या खोलींतून 'मोचनगड' ही कादंबरी आणून मी वाचीत बसलों होतों कादंबरीतील नायक (त्याचें नांव गणपतराव असावे) अेका किल्ल्यांत बंदिवान् होअून पडला होता. निसटून जाण्याचा कांहींच मार्ग न अुरल्यामुळें वेताच्या काड्या असलेली अेक मोठी छत्री घेअून तिच्या आधारे किल्ल्याच्या भिंतीवरून खालीं अुडी ठोकण्याची त्यानें तयारी केली होती. माझें मन सहानुभूतीमुळें अेकाग्र झाले होतें. श्वासोच्छ्वासहि जवळ जवळ थांबला होता. अितक्यांत पिंजऱ्यांतील पोपटाची किंकाळी अैकूं आली. रात्र होतांच पोपट निजून जावयाचा. त्याची किंकाळी अैकून मला आश्चर्य वाटले. कादंबरींतील गोष्टीमुळें मन अुत्तेजित झालेच होतें. तेव्हां आश्चर्याने पिंजऱ्याकडे पाहिलें. तों केवढा भयंकर देखावा! दरवाजावरून खुंटीवर आणि खुंटीवरून कडीपाटाशी टांगलेल्या पिंजऱ्यावर अुडी मारून मांजरानें पोपटाला स्वाहा करण्याची तयारी केली होती. पोपटाने भयाने मान टाकली होती आणि

जराचा पंजा पिंजऱ्यांत शिरला होता ! मी वीरासारखा 'धांविन्नलों' आणि ाच्या अेकाच चापटीबरोबर मांजराला खालीं पाडलें. कोण जाणे, त्या दिवशीं ाला मुहूर्त होता, पिंजऱ्यावरून मांजर जें पडलें तें नेमकें टॉमीच्या अंगावर ! य झालें तें टॉमोच्या ध्यानांत आले नाहीं. मांजर घरचेंच आहे हे ओळखण्याअितकें न टॉमीला अुरलें नाहीं. तिने मांजराला आपल्या पंजाचा प्रसाद दिलाच. मी जर वून कुत्रीला लाथ मारली नसती तर त्या दिवशी माझी मांजरहि मेलीच असती. रण टॉमीनें तिच्या मानेला आपले दांत लावलेच होते. पोपटाला मारण्याचा प्रयत्न णाऱ्या मांजरीवरचा माझा राग अेका क्षणांत मावळला. आतां पोपटाच्या अैवजीं जरीच दयेला पात्र झाली, आणि मनीवरचा राग अुडून टॉमीच्या पाठीवर अून बसला. मी तिला दोन लाथा मारल्या. अितक्यांत गोंदू बाहेरून परत आला. ाला येथील वृत्तांताची काय खबर ? त्यानें मला टॉमीला लाथ मारतांना पाहिलें. ा काय विचारावें ? "माझ्या कुत्रीला कां मारतोस ?" असें म्हणून त्यानें माझ्या बाडींत दोन लगावल्या. मुहूर्ताचें फळ अेवढ्यावरच संपावयाचे नव्हतें म्हणूनच काय, त्याच क्षणी केशू बाजारातून परत आला. केशूचा मी लाडका. तेव्हां ानें माझी कड घेतली आणि काय चाललें आहे, याचा तपास काढण्याची प्रस्तावना णून त्यानें गोंदूच्या पाठींत धपाटा घातला. आमचा हा कोलाहल अैकून सर्व मंडळी ळा झाली. त्या क्षणींच्या परिस्थितीमध्यें अितरांच्या मानानें सर्वज्ञ असा मीच तों. त्यामुळें माझेंच डोकें ठिकाणावर होतें. खाल्लेल्या थोबाडया विसरून जाअून हंसत हंसत सर्व प्रकरण साद्योपान्त सांगितले. सर्वांना आश्चर्य वाटले. घडलेल्या ाराची चर्चा करण्यांत सर्वजण मग्न आहेत या गोष्टीचा फायदा घेअून मी हळूच ील बंधूच्या खोलींत जाअून 'मोचनगड' कादंबरी जेथल्या तेथें ठेवून पुन्हां सर्व ळींत येअून मिसळलों.

अगदीं लहानपणापासून केशूचे मनांत माझेविषयी खास पक्षपात होता. आणि त्यामुळें तो माझेवर बरीचशी वडीलकी गाजवीत असे. त्याला संतोष होअील अितकी कसरत मी केली पाहिजे. तो सांगेल तें काम करावयाचें. त्याला आवडेल तें मला आवडलें पाहिजे. त्याचें ज्याच्याशीं वाकडें असेल त्याची निंदा मी केली पाहिजे; त्याचीं गुपितें कोठूनहि शोधून काढून केशूला सांगावयाचीं. केशूनें जर मला मारले तर त्याची तक्रार करावयाची नाही. अितकेंच नव्हे तर मार खात असतांना जर कोणी दया वाटून मला सोडवायला आला, तर मी म्हणावें, 'केशू मला खुशाल मारो; तुम्हांला मध्यें पडण्याचें कारण नाहीं.' अशीं कितीतरी तेत्रें मला संभाळावीं लागत आणि हें सर्व मी अेक प्रकारच्या राजीखुशीने करीत असें. सेनापतीच्या कडक हुकुमाप्रमाणें वागतांना सैनिकाला जें कर्तव्यपालनाचें समाधान मिळतें, तसलें समाधान मी कमावलें होतें. केशूला कधीं सदाचाराची लाट आली म्हणजे मी देखील धर्मनिष्ठ बनावें; त्याला शृंगारिक पदे म्हणण्याची लहर आली म्हणजे मी देखील रसिक बनावें; आपण करतों तें वाअीट आहे असें वाटून त्याला पश्चात्ताप झाला म्हणजे त्याच क्षणीं मी देखील पश्चात्ताप धारण करावा; अशा प्रकारचा अपूर्व आदर्श आणि अनुयायीपणा मी कमाविला होता. यामध्यें जो चांगला भाग होता तो अजूनहि

यामध्यें आहे; आणि वाओट भागाचा परिणाम देखील थोडाबहुत अुरला ण्याचा संभव नाहीं असें नाहीं. अशा प्रकारच्या साधनेचा अेक परिणाम आज । स्पष्टपणें दिसून येतो कोणीहि मनुष्य ज्या वेळीं माझ्याशीं बोलतो, तेव्हां माझ्या त ताबडतोब त्याच्याविषयी सहानुभूति अुत्पन्न होते; त्याच्या मनोभूमिकेवर दिशीं आरूढ होअून मी त्याचे म्हणणे समजून घेतों; त्याची मनोवृत्ति मला समजूं ते, अेवढेच नव्हे तर अर्धीमुर्धी मी ती धारणहि करतों. यामुळें प्रत्येक पक्षाची आणि त्यांतील खुबी सामान्य लोकांपेक्षां माझ्या ध्यानांत लवकर येते आणि मुळें कोणाहि असमाविषयी माझ्या मनांत चीड अुत्पन्न होत नाहीं. प्रयत्नपूर्वक आणली तर गोष्ट निराळी. मी जसजसा केशूचा आदर्श अनुयायी बनूं लागलों तसा तो अधिक हुकूमशहा बनूं लागला. मुळातच प्रेम प्रकृत्या सुलतान असतें ण त्यांत पुन्हा " यथेच्छसि तथा कुरु " अशा वृत्तीचा माझ्यासारखा अनुयायी ाला तर मग हुकूमशहाला दुसरे कोणतें पोषण पाहिजे ? अशा प्रकारच्या भवानें मला कळून चुकलें की, जुलूमगार जुलमी बनतो, यानें कारण गुलामाची मी वृत्तीच होय. अेक जर नरम राहिला तर दुसऱ्यानें गरम कां न व्हावें ?

लहानपणच्या माझ्या या अनुभवामुळें कोणावरहि हुकूम चालविणें मला मुळींच वडत नाहीं. दुसऱ्याचा विकास व्हावा, म्हणून मी पुष्कळदां--जवळ जवळ नेहमींच तःचा संकोच करीत असतों. माझ्या या अशा स्वभावामुळें कितीतरी लोक स्वतःची ादा विसरून माझ्यावर कुरघोडी करतात. सहन होअीतोंवर मी त्यांना तसें करूंहि ों. पण पुढे जेव्हां खटका अुडण्याचा प्रसंग येतो, तेव्हां लोकांना त्याचें आश्चर्य ातें. दुनियेला दोनच वृत्ती ठाअूक आहेतः दुसऱ्यावर कुरघोडी करावी किंवा ाऱ्याची कुरघोडी मान्य करावी. अेकतर भिअून दुसऱ्याकडे वर पहावे किंवा लदार बनून तुच्छतेनें अितरांना खालीं पहावयाला लावावे. समानतेची वृत्ति ाळून, सर्वांकडे समानतेनें पहावे आणि स्वतःची मर्यादा संभाळावी ही कला र थोड्या लोकांत दिसून येते. साधेल तेथें परिस्थितीचा गैरफायदा घ्यावा आणि थें चालत नाहीं तेथें दुसऱ्याच्या ताब्यांत रहावे, हाच नियम सर्वत्र दिसून येतो ooking up and looking down, भयानें किंवा आदराने दबून जावें वा अुलटपक्षीं अधिकारमदाने किंवा अहंमन्यतेनें दुसऱ्याला दाबून आपल्या कह्यांत ावें, हे दोनच प्रकार सर्वत्र दिसतात. Looking level म्हणजे समानतेच्या ीनें केवळ सहज संबंध ठेवावा हा प्रकार बराच कमी आहे.

माझ्या सौम्यतेमुळें लोक माझ्यावर कुरघोडी करूं लागले म्हणजे वाढूं दिलेला संबंध मला हळु हळु संपुष्टांत आणावा लागतो, अथवा पार तोडून टाकावा लागतो. अशानें प्रेमाची स्थिरता बिघडते आणि मग मला त्याचें फार वाओट वाटतें. आपण होऊन कोणाशीं संबंध अुत्पन्न करूं नये; अेकवार जर संबंध आला तर तो जन्मभर टिकावा; असा आदर्श मी माझ्या पुढें ठेवला आहे याचें पालन करणें कोणी अशक्य केलें आणि खेचाताण अुत्पन्न झाली म्हणजे मला त्या दुःखाची वेदना असह्य होते. पण जगाचा स्वभाव मी कसा बदलणार ? अशी परिस्थिति अुत्पन्न होण्यांत माझा संकोचशील स्वभाव ज्या प्रमाणांत कारणीभूत असेल त्या प्रमाणांत मला स्वतःची सुधारणा केली पाहिजे मनुष्याला वाटत असतें कीं आपण पुष्कळ प्रयत्न करीत असतों; पण स्वभाव बदलणें खरोखरीच फार कठीण आहे.

अशा प्रकारे केशूची परोपरीनें गुलामगिरी केल्यानंतर मला त्याच्या विरुद्ध सविनय भंग करावा लागला. ( त्या वेळीं गांधीजीविषयीं किंवा त्यांच्या तत्त्वज्ञानाविषयीं मला माहिती कोठून असणार ? )

आअीनें लहानपणापासून शिकविलें होतें कीं, वडील मंडळीशीं आदरानें वागावें. लक्ष्मणानें जशी रामाची सेवा केली तशी मोठ्या भावाची सेवा करावी. आपल्यापेक्षां वयानें जे कोणी मोठे असतील त्या सर्वांना गुरुजन मानावें. त्यांच्या सागण्या-म्हणण्यांत असावें. त्यांचा अपमान होअील असें कांहीं करूं किंवा बोलूं नये. हा अुपदेश माझ्या मनांत चांगलाच रुजला होता. यामुळें माझ्यांत जेव्हां बंडखोर वृत्ति अुत्पन्न झाली, तेव्हां केशूचा अपमान तर होअूं नये आणि त्याचा हुकूम आपणास कबूल नाहीं हें तर त्याला स्पष्ट कळावें, हें साधावें कसें, याचा विचार मी करूं लागलों. पुढें केशूनें अेकादा हुकूम केला आणि तो मला मान्य नसला म्हणजे मी अत्यंत नम्रपणें त्याला सांगत असें," हें पहा, केशू, तूं सांगितलेलें मी नेहमीं अैकतों; पण हें कांहीं आपल्याच्यानें होणार नाहीं. " केशूला सगळ्या घरांत अवज्ञेचा अनुभव कधींच नसे. मी त्याला कितीहि समजावून सागितलें, तरीहि त्याला आपला मानभंग झाला असें वाटे. आणि मग मला त्याच्या हातून मार मिळे. केव्हां केव्हां तो गालावर असा कांहीं चिमटा घेअी कीं रक्तच निघावें. कधीं कधीं मला न जेवण्याची शिक्षा करी. धिःकार आणि तिरस्कार करणें ही तर साधी गोष्ट. हें सर्व कांहीं मी सहन करी. दुसऱ्या क्षणीं जर त्यानें कांहीं साधें काम सांगितलें, तर तें मी दुप्पट अुत्साहानें

करीत असें. केशूचें डोकें वारंवार दुखत असे. रागांत येऊन मला मारून तो अंथरुणावर जाऊन पडला म्हणजे लागलेंच जाऊन मी त्याचें डोकें चेपीत असें. केशूचा स्वभाव महादेवासारखा शीघ्रकोपी पण आशूतोष. विचार मात्र मुळींच नाहीं यामुळें दर खेपेला पहिल्याप्रमाणेंच सर्व कांही घडून यावयाचे. शेवटीं माझ्या सहनशीलतेचा विजय झाला. मला माझी स्वतंत्रता मिळाली. याला दुसरेहि अेक कारण झालें. लहानपणीं घरांत सर्वजण मला डोक्यानें मठ्ठ समजत असत. यांत माझा दोष मुळींच नव्हता. पुढे पुढें करणें माझ्यांत नव्हतें. आणि माझें कसें चाललें आहे हें ध्यानपूर्वक पहाण्याचे कोणालाहि सुचलें नव्हतें. पुढें जेव्हां अभ्यासांत माझ्या बुद्धीची चमक केशूच्या नजरेस आली तेव्हां तो बराच मऊ आला.

पुढच्या गोष्टीचा अुल्लेख येथेच करावयास हरकत नाहीं. त्यानें जेव्हां पाहिलें कीं अिंग्रजी कवितांचा अर्थ त्याच्यापेक्षां मलाच चांगला समजतो, तेव्हां तो अगदीं गार झाला. पुढें पुढें केशूला कॉलेजमध्ये असतांना अर्धांगवायु झाला. त्यामुळें तो अगदी असहाय्य मुलाप्रमाणें झाला मनांत कांहीं बरे वाअीट वाटलें तर माझ्याजवळ बोलून दाखवित असे. माझ्या बोलण्यानें त्याला सांत्वन मिळे. आजारी माणसाचा स्वभाव चिडखोर होतोच. घरांतील सर्वांवर तो चिडला असला म्हणजे त्याला शांत करण्याचे काम माझें. त्याच्या सबंध जीवनांतील गुणदोष आणि प्रमाद मला ठाअूक होते. तरीहि अथवा त्यामुळेंच, आमचा संबंध सामान्य भावांचा असतो त्यापेक्षां विशेष गाढ झाला होता. त्याच्यावर माझे मनापासून प्रेम होतें. त्याची सेवा करतांना मला आनंद वाटे. पण त्याची जीवनपद्धति मला कधींच पसंत पडली नाहीं. त्याची मतें आणि अभिप्राय, घाअीघाअींनें बनवलेली असत. लहानसहान वासनांना देखील तो सहज बळी पडत असे. लहानपणापासून त्याचे लाड होत होते, त्यामुळें त्याच्यामध्यें आत्मप्रीति वाढली होती. जो मनुष्य अहंप्रेमी असेल तो स्वतःलाच जगाचा मध्यबिंदु समजतो. पण तेवढ्यामुळें जग कांही त्याच्या भोवती फिरत नसतें. या कारणाने त्याला पदोपदीं दुःख होतें. पृथ्वीला मध्यबिंदु समजून रचलेले खगोलशास्त्र जसे खोटे असतें तसेंच स्वतःला मध्यबिंदु समजून ठरविलेली जीवनाविषयींची कल्पना आणि त्याच्या अपेक्षा चुकीच्या ठरतात. खोटा नकाशा समोर ठेवून जो प्रवास करतो त्याला पावलोपावलीं ठोकर खावी लागेलच. त्यांत आश्चर्य कोणतें ? लहानपणी केशूच्या विरुद्ध मी जीं जीं नम्र बंडें केलीं, त्याच्या आज्ञेचा सविनय भंग केला, त्यांपैकीं

कांहीं मला आजहि आठवतात. पण सर्वच प्रसंग कांहीं स्मरण-यात्रेंत नमूद करतां येत नाहींत. आणि म्हणूनच त्या सर्व प्रसंगांचें सार अतक्या विस्तारानें वर दिलें आहे. सर्व भावांमध्यें केशूवरच माझें प्रेम अधिक असे. माझ्या हिताची त्याला काळजी असे. शेवटपर्यंत त्याला प्रसन्न ठेवणें यांतच मला आनंद होता. अर्थात् येथें जें कांहीं मी लिहिलें आहे तें मानसशास्त्रांतील अेक महत्त्वाचा अनुभव म्हणूनच लिहीत आहें; त्याला कमीपणा आणण्याकरतां नव्हे. त्याचा मोकळा स्वभाव, त्याची स्वराज्य-प्रीति आणि महत्त्वाकांक्षा यांना जर अवकाश मिळाला असता तर त्यानें खचित नांव काढले असतें.

## शहाणें होण्याची ना

३६

त्या वेळीं मी मराठी शिकत असें. केशू अिंग्रजींत गेला होता. अेकदां त्याच्या मनानें घेतले की आपण दत्तूला अिंग्रजी शिकवून शहाणा, हुशार करावा. काय कारण झालें कोणास ठाअूक, त्याच वेळीं आपण सध्यां अिंग्रजी शिकूं नये असें माझ्या मनानें घेतले. मी भीत भीत म्हणालों, "अिंग्रजी शाळेंत जाअीन तेव्हां अिंग्रजी शिकतां येअील. आज कसली घाअी आली आहे?" त्यानें मला अिंग्रजीचें महत्त्व समजावून सांगण्यास सुरुवात केली. लांबलचक व्याख्यान दिलें. अिंग्रजीला जगांत मान आहे, वगैरे सर्व माझ्यापुढें मांडलें. मीं कांहींच अुत्तर दिलें नाहीं. तेव्हां केशूला वाटलें कीं, त्याची गोष्ट मला पटली आहे. त्यानें भाषांतरपाठमाला माझ्या हातीं दिली आणि कांहीं शब्द घोकून काढण्यास सांगितलें. चक्कू, ताड्या, घोड्या. यावर त्याचा मोठा विश्वास. आणि मला तर कविता सोडून बाकी कांहींच पाठ करणें आवडत नसे. शाळेंत निदान अेवढी सोय असे कीं घडा आज दिला तर तो अुद्यांपर्यंत पाठ झाला म्हणजे बस्स. केशूला घाअी होती. "सकाळीं खालें तूप आणि संध्याकाळी पाहिलें रूप" अशी त्याची वृत्ति. तो मला म्हणाला, "हे अितके शब्द आतां माझ्यासमोर बसून पाठ करून दे." मला हें कसें रुचावें? कासव ज्याप्रमाणें आपले पाय आणि डोकें आंत खेचून घेतें, त्याप्रमाणें मी माझें चित्त आंत खेचून

घेतलें. आणि मनांत म्हणालों, 'घे आतां माझ्याकडून जें कांहीं करून घ्यावयाचें तें.' इंग्रजीचीं सव्वीस अक्षरे मराठी अंकलिपीच्या शेवटीं दिलेलीं असत; तीं माझीं पूर्वीच पाठ झालेलीं होती. तेव्हां भाषांतरपाठमालेंतील पहिल्या धडयांतील पहिला शब्द मी घोकण्यास प्रारंभ केला:

एस्, आय्, टी–सिट् म्हणजे बसणें
एस्, आय्, टी–सिट् म्हणजे बसणें
एस्, आय्, टी–सिट् म्हणजे बसणें—

थोडा वेळ गेल्यानंतर केशूने मला विचारले, "सिट् म्हणजे काय?" मला उत्तर देतां येईना. केशू चिडला आणि म्हणाला, हा अेकच शब्द पंचवीस वेळां घोकून काढ." अुजव्या हातांचीं बोटे धरून मी मोजूं लागलों व घोकूं लागलों, "अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणे अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें." पंचवीस वेळा पुऱ्या झाल्या. केशूनें पुन्हां विचारलें, "सिट् म्हणजे काय?" मी पहिल्या-अितकाच निर्दोष होतों केशूनें माझ्या मांडीवर जोरानें चिमटा घेअून म्हटलें, "आतां शंभर वेळां घोकून काढ" शंभर वेळां घोकायचे म्हणजे दोन्ही हातांची बोटें वापरलीं पाहिजेत. मी मांडी घालून मूर्तीप्रमाणें दोन हात गुडघ्यावर ठेवून मोजूं लागलों:

अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें
अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें—

शंभर वेळा पुऱ्या झाल्या. केशूनें पुन्हां विचारले, "सिट् म्हणजे काय?" आतां मात्र माझा नाअिलाज झाला. ओठांना वळण पडल्यामुळें तोंडातून निघून गेलें– "बसणें." तेव्हां केशूला कांहीशी आशा अुत्पन्न झाली आणि त्यानें विचारले, "सिट्चें स्पेलिंग काय?" अस्ली अुलटी अुडी ध्यान दिल्यावांचून कशी मारतां येणार? मी शून्य नजरेनें त्याच्याकडे पहातच राहिलों. या खेपेला केशूने बराच धीर धरला. मारण्याच्या अेवजीं त्याने मला विचार करण्यास वेळ दिला आणि म्हटले, "असें पहा, सिट् असा अुच्चार कोणकोणती अक्षरे अेकत्र आणल्यानें होअूं शकेल? सिट्-मध्यें कोणकोणते अुच्चार सामावलेले आहेत?"

मला डोकें वापरावयाचें नव्हतेंच. ओंठ हालवीन, गळ्यांतून आवाज काढीन, फार तर हाताची बोटे चाळवीन, अेवढीच माझी तयारी होती. विचार करण्याचें कोठें मी करारांत सांगितलें होतें? मी अगदीं शून्य नजरेनें पाहूं लागलों. त्या दृष्टीमध्यें

नव्हती भीति, नव्हता कंटाळा, आणि नव्हती लाजलज्जा. दिलगिरीचा देखील लवलेश नव्हता. वेदान्त्याचें परब्रम्ह निराकार, निर्गुण, निश्चल आणि निर्विकारी असतें ना ? तशी होती ती माझी शून्य दृष्टि. दगडाच्या मूर्तीमध्यें असली दृष्टि सहन होऊं शकते; पण जिवंत माणसाची असली दृष्टि कशी सहन होणार ? केशू क्षणभर खजिल झाला; पण दुसऱ्याच क्षणी माझ्यावर भुसळला. त्यानें माझे डोकें धरून खालीं वांकविले आणि दुसऱ्या हातानें पाठीवर किती तरी बुक्क्या अुतरविल्या. क्रोधाची वाफ क्रियेच्या द्वारां थोडी निघाल्यानंतर मग तोंडांतून निघूं लागली, "रडया, म्हारडया, तूं कसचा शिकणार ? शुद्ध नंदीबैल आहेस !" अित्यादि कितीतरी चालले. मला त्याचा हिशोब थोडाच ठेवावयाचा होता ? शेवटी केशू म्हणाला, "आतां तीनशें वेळां घोकून काढ." माझे मशीन पुन्हां चालू झालेः

अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें
अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें—

या वेळी मी माझ्या यंत्रांत अेक सुधारणा केली. किती वेळां घोकले हें बोटावर मोजा कशाला ? केशूच्या धीरापेक्षा माझा धीर अधिक टिकण्याजोगा होता. तेव्हां तो शुद्ध विचारीतोंपर्यंत चालेना का हें यंत्र असेंच ?

अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें
अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें

आतां पुस्तकाकडे पहाण्याचीहि जरूर नव्हती. वाटेल त्या बाजूला पहावे; मनांत वाटेल ते तरंग चालवावेत; समुद्राच्या लाटा अेकूं येत असत, त्या ध्यानपूर्वक अेकाव्या; जवळून मांजर गेले तर त्याच्यावर पेन्सिल फेकावी; फक्त तोंड चाललें म्हणजे बस्स; बाकी आपण अगदीं स्वतंत्र. स्थिति मोठी सोयीची होती. डोळ्यांच्या पापण्या चालतातच, नाकांतून श्वास चालतो, शरीरामध्यें रक्त वहातें, त्याचप्रमाणें तोंड चालत राहिलें तर बिघडले कोठे ?

अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणे
अेस्, आय्, टी, सिट्, म्हणजे बसणे

अशा रीतीनें किती वेळ होऊन गेला कोण जाणे. शेवटीं केशूने विचारलें कीं, 'बोल.' मी तावडतोब बोलून दाखविले, "अेस्, आय्, टी, सिट् म्हणजे बसणें." त्यानें मला झोपेंत विचारले असतें तरी तें मी बरोबर बोलून दाखविलें असतें. अितकें तें पक्कें होऊन गेले होतें. मूठ दाबतांच ज्याप्रमाणें तळहाताळा ठराविक

घड्या पडतात, त्याचप्रमाणें ओठाला आणि जिभेला संवय पडून गेली होती. तेव्हां त्यांत कांहींच कठीण नव्हतें. पण दुर्दैव केशूचें ! त्यानें मला पुन्हां अेक अुलटा प्रश्न विचारला, "बसणें याला शब्द कोणता ?" मेंदूचे सर्व दरवाजे आणि खिडक्या बंद करून ठेविल्या होत्या; अशा वेळीं अशा आडव्यातिडव्या प्रश्नाचें अुत्तर कोठून निघणार ? केशू पार निराश झाला. मी पोटांतील पाणी हालूं न देतां त्याला विचारलें, "पुन्हां पाठ करू ?" आतां माराचा मुसळ-धार पाअूस पडणार आणि सर्व शरीराचें कातडें विपासारखे हिरवें निळें होणार अशी माझी अपेक्षा होती. डोळे बंद करून, छाती पोटामध्यें दाबून घेअून आणि डोकें दोन खांद्याच्या मध्यें आणून मीं माराच्या स्वागताची पूर्ण तयारी केली होती. होय, विलंब करण्यांत काय फायदा ? जे व्हावयाचें तें ठरलेलें आहे. तें झटपट सुरू केले तर चांगलेंच.

पण जगांत कधीं कधीं अनपेक्षित गोष्टी घडून येतात. चीड, निराशा आणि राग यांचा जोर अितका वाढला कीं केशू आंधळा बनण्याच्या अेवजीं अेकदम शांत झाला ! तो म्हणाला, (त्याच्या बोलण्यांत यत्किंचितहि आवेग किंवा जोर नव्हता.) "ठीक आहे. तूं जा." मी देखील जणूं कांहींच झालें नाहीं अशा शांत मुद्रेनें अुठलों, झपाटयासरशीं पाठ फिरविली आणि चालता झालो.

त्या दिवसापासून केशूनें माझ्यासमोर अिंग्रजीचें नांव काढलें नाहीं. पुष्कळ दिवसानंतर प्लेग झाल्यामुळें शहापूरजवळ आम्ही झोपडींत रहावयास गेलों होतो. तेथें अेकदां रात्रीं मी निजलों असतांना माझ्या टेबलावर मी लिहिलेला अेक सुंदर निबंध त्यानें पाहिला. तेव्हां त्यानें आपली प्रतिज्ञा मोडली. दुसऱ्या दिवशीं बेळगांवच्या स्टेशनवर जाअून व्हीलर कंपनीच्या दुकानांतून त्यानें स्कॉटचें मार्मिअन् विकत आणलें आणि मला बक्षिस दिलें. तें पुस्तक अजूनहि माझ्याजवळ आहे. जेव्हां जेव्हां त्या पुस्तकावर नजर जाते, तेव्हां तेव्हां मला लहानपणचे ते दिवस आठवतात. मार्मिअन्मधून कित्येक चांगल्या चांगल्या ओळी मी पाठ करून केशूला म्हणून दाखविल्या होत्या.

## देशभक्तीची गुणगुण

३७

देशभक्तीच्या आणि शिवाजीमहाराजाच्या गोष्टी मीं प्रथम ऐकल्या पुण्यामध्यें. त्या वेळीं मी मराठी दुसरींत होतों पुण्यांत आमच्या घराच्या जवळच बाबा देशपांडे म्हणून अेक पोलीस हवालदार रहात असत. ते आमच्या घरीं पुष्कळदां येत. त्यांची पत्नीहि माझ्या आअीला आणि वहिनींना भेटावयास येत असे. बाअी स्वभावानें सुशील होती. बाबा देशपांडे आमच्या घरीं आले म्हणजे केशूला, गोंदूला आणि मला जवळ बसवून ते आम्हांला अैतिहासिक गोष्टी सांगत. देशभक्ति हें प्रत्येक माणसाचे पहिले कर्तव्य आहे; देशासाठीं मरावयास तयार झालें पाहिजे; अित्यादि अित्यादि आम्हांला समजावून सांगत असत. हेच देशपांडे पुढे मुंबअी अिलाख्याच्या सी आय. डी. खात्यांत अेक प्रख्यात अंमलदार झाले. महाराष्ट्रांतील क्रान्तिकारक चळवळीचीं पाळेंमुळें शोधून काढण्यात बाबासाहेबांचा प्रयत्न लहानसहान नाहीं. देशभक्तीची वचनें अशा व्यक्तीच्या तोंडून प्रथम माझ्या कानीं पडावीं हें किती विलक्षण !

पुढें पुण्याहून आम्ही शहापूरला आलों. तेथें शिवाजीमहाराजांचा अितिहास चरित्रग्रंथांतून व कादंबऱ्यांतून विशेष वाचला. संध्याकाळीं घुमटाच्या माळावर ( शहापूरच्या बाहेर अेक टेकडी आहे. त्या टेकडीवर अेक मारुतीचें मंदिर आहे.

मंदिरावर शिखर नसून घुमट असल्यामुळें त्या जागेला घुमटाचा माळ असें म्हणतात. ) फिरावयास जात असूं तेथें आम्हीं शिवाजीची आणि अफजलखानाची लढाअी खेळत असूं. टेकडीवर धोंडयाच्या खाणी पुष्कळ होत्या, त्यांतून धोंडे घेऊन अेकमेकांवर फेकीत असूं. पुरेसे दूर अुभे रहात असल्यामुळे कोणालाच कधी धोंडा लागला नाहीं.

हे दिवस मराठी चौथीचे असावेत. अिंग्रजी पहिलींत गेलों आणि आमच्या देशभक्तीनें भाषणाचे रूप धारण केलें. घरच्या माडीवर मंडळीची ये जा नसे. अशा ठिकाणीं आम्ही तीन चार मंडळी जमत असूं आणि आळीपाळीने देशभक्तीवर बोलत असूं. भाषणामध्ये शिवाजीमहाराजांची स्तुति, अिंग्रजांना आणि आजच्या काळाला शिव्या, अेवढेंच येत असे. अिंग्रजांविरुद्ध लढलेंच पाहिजे असा आमचा निश्चय झाला होता. पण त्यासाठीं शरीर चांगलें कसलेलें असले पाहिजे. आम्हीं कसरत आणि कुस्ती सुरू केली. आमच्या मंडळांत लागू म्हणून अेक मुलगा होता. तो वयानें माझ्यापेक्षां थोडा लहान होता. पण कुस्तींत मला नेहमीं पाडावयाचा. पाडावयाचा अेवढेंच नाही तर मारावयाचा व त्रास द्यावयाचा. पडल्यानंतर केशूचा धिःकार अैकावा लागेच. यामुळें मीं कुस्ती सोडून दिली आणि तें गुप्त मंडळहि सोडून दिलें. रोज रोज तेजोवध किती सहन करावयाचा ?

## ज्युबिली-प्रसंगीं खून

३.

शहापूरच्या अिंग्रजी शाळेंत मी शिकत होतों. बहुतकरून दुसरीत असेन. माझ्‍ पायाला गळू झाले होतें. लंगडत लंगडत रोज शाळेंत जात असें. अशा रीती शाळेंत मला जातांना पाहून वाटेतील भांड्यांचा अेक दुकानदार माझ्यावर द‍ दाखवीत असे. कधीं कधीं माझ्या शाळा–निष्ठेची वाखाणणी करीत असे. ‍ कारणामुळें त्या दुकानदाराविषयीं माझ्या मनांत सद्‌भाव अुत्पन्न झाला. जर म‍ भांडीं विकत घ्यावयाचीं असतीं तर त्याच्याच दुकानांतून मीं घेतलीं असतीं.

अेके दिवशी त्याच्या दुकानाच्या खांबावर 'केसरी जादापत्रक' म्हणून कागदा‍ अेक चतकोर तुकडा चिकटविलेला मीं पाहिला. चालतां चालतां हें काय आहे अ‍ कुतूहलानें मी पहात होतों. अितक्यांत त्या दुकानदारानें मला हांक मारली आ‍ म्हणाला, "पहा. वाच. काय गहजब ! काय होणार आहे कोण जाणे !"

जादापत्रक वाचून समजलें कीं, महाराणी व्हिक्टोरियाच्या डायमंड ज्युबिलीच्‍ रात्रीं, पुण्यांत दोन साहेबांचा खून झाला आहे. आमच्या येथें देखील डायम‍ ज्युबिलीचा अुत्सव झाला होता. त्यांत आमच्या शाळेच्या वतीनें अेक दोन पदें‍ गायिलीं गेलीं होतीं. पण पुण्याचें गायन कांहीं निराळेंच झालें. पुण्यांत जेव्हां प्रथम ‍ प्लेगचा प्रादुर्भाव झाला, तेव्हां घाबरलेल्या सरकारनें लष्करी बंदोबस्त अमलां

आणला होता. लोकांना अगदीं सळो कीं पळो असें झालें. ते म्हणूं लागले, "हा प्रांथिक सन्निपात पतकरला, पण हा सरकारी बंदोबस्त नको." शेवटीं हा बंदोबस्त ठेवणाऱ्या प्लेग-अंमलदाराचा खून झाला. लोक म्हणूं लागले, "अेकाद्या देशभक्तानेंच आमचें गाऱ्हाणें मनावर घेऊन हें काम केले असावे खास." पुढें लवकरच सरकारनें नामदार टिळकांना शिक्षा केली. सरदार नातूबंधूंना राजकैदी म्हणून बेळगावला आणून ठेवले. गांवचे लोक म्हणत, "टिळक हे शिवाजीचे अवतार आहेत. शिवाजीचे चार साथीदार होते. येसाजी कंक, तानाजी मालुसरे, आणि अितर दोघे. आजचे हे नातू-बंधू हे त्यांचेच अवतार होत." आणखी दोन साथीदार कसे काय बसविले होते, तें आज लक्ष्यांत नाही. सरकारच्याप्रमाणें आमच्या बाल-मनानेंहि घेतले कीं हे खून टिळकांच्या प्रेरणेनेंच झाले असावेत. लोकांचें दुःख दूर करण्यासाठी स्वतःच्या जिवावर अुदार होण्याचें काम दुसऱ्या कोणाच्या प्रेरणेने होणार ? खुनाशी टिळकांचा संबंध जोडण्याला आम्हाला कसल्याच पुराव्याची जरूर नव्हती. कल्पना करावयाला पुरावा लागत नसतो. लोकहिताच्या प्रत्येक कामाचा संबंध टिळकांशीं असलाच पाहिजे. नसला तरी जोडलाच पाहिजे.

थोड्याच दिवसांत अण्णा पुण्याहून आला. त्यानें तर निराळ्याच गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला, "रँड साहेब हॉस्पिटलमध्यें मेला. त्यापूर्वी तो शुद्धीवर आला होता आणि त्यानें मरण्यापूर्वी कित्येक गोष्टी सांगितल्या होत्या. स्वतःचा खून करणाऱ्याला त्यानें पाहिले होतें. खुनी अिसम कोणी गोराच होता. अेका मडमेच्या बाबतीत दोघांचें भांडण झाले होतें. आणि त्यामुळेंच हा खून झाला आहे. खुनाचा तपास करणाऱ्या ब्रुअीनसाहेबाला हें ठाऊक आहे. पण त्यानें हें सर्व "हश् अप्" ( *Hush up* ) केले आहे."

पुढें रोज पुण्याहून नवीन नवीन बातम्या येत. बातम्यांचे दोन प्रवाह असत. अेक वर्तमानपत्रांतून येणारा आणि दुसरा पुण्याहून येणाऱ्या प्रवाश्यांच्या मार्फत. खाजगी बातम्यांवर लोकांचा विशेष विश्वास बसे हे अुघड आहे. त्या सर्व खाजगी बातम्या लोक हळूच अेकमेकांच्या कानांत सांगत. पण मी पाहिलें, सर्वच सर्वांचे विश्वासपात्र होते.

पुढे अशी बातमी आली कीं सरकारचे गुप्त पोलीस प्रत्येक शहरांतून फिरत आहेत. मग काय विचारावें ? प्रत्येक अनोळखी मनुष्य गुप्त पोलीस आहे कीं काय अशी शंका घेण्यास सुरुवात झाली. याच सुमारास लिंगायत लोकांचे दोन जंगम साधु

शहापुरांत आले. दोन हातांत दोन घंटा घेऊन त्या वाजवीत ते शहरांत हिंडत. गांवच्या लोकांनीं ठरविलें, हे लोक गुप्त पोलीसच असले पाहिजेत. कोणी म्हणाले, "त्यांच्या भगव्या कफनीच्या आंत पोलिसांचा बिल्ला असल्याचें कोणीसें पाहिलें आहे." शाळेंतील मुलांना या सर्व प्रकाराची बातमी लागली आणि अेके दिवशीं अेका गल्लीमध्यें त्या बिचाऱ्या सांधूंची गरम गरम पूजा झाली !

पुढें हळु हळु सर्व अफवा वितळून गेल्या आणि चाफेकर बंधूंचे नांव रँड आणि आयर्स्ट यांच्या खुनांशी जोडलें गेले.

या खुनापायीं कित्येक देशी लोक फांशी गेले; कित्येकांना अितर शिक्षा झाल्या. खुनाचा पत्ता लावून देणाऱ्या द्रविड–बंधूंचा खून झाला. त्यांचा खून करणारे पकडले गेले. त्यांनाहि शिक्षा झाल्या. या कटांतील अेकजण आपली शिक्षा पूर्ण करून पुढें पोलिस खात्यांत शिरला. असे हें प्रकरण बरेच लांबले. या काळांत सरकारनें वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी चागलीच केली होती.

मी अिंग्रजी पहिलींत शिकत असें तेव्हां विष्णु म्हणून माझा अेक मित्र होता; किंवा मीं त्याचा मित्र होतों असें म्हणतां येअील. आडमार्गाला लागलेल्या या मुलाला तसा अेकहि मित्र नव्हता. त्याचा सगळा दिवस कल्पना-तरंगांत जाअी. शेवटीं त्यानें माझ्याशीं मैत्री जोडण्याचा प्रयत्न केला. मनोराज्यांतील कल्पना तो कानूं लागला म्हणजे मी शांतपणें अैकत असें. त्यामुळें त्याला अेक मोठा आश्रय मिळाल्या-सारखें झालें. अेकदां अेका कुलकर्ण्यानें यमराजाला कसें फसविलें याची गोष्ट अैकून "क्लृप्तिविजय" नांवाचें अेक नाटक लिहून काढावयाचे असें आम्हीं ठरविले होतें. 'सत्यविजय' नांवाचें अेक नाटक त्या काळीं फार लोकप्रिय झालें होतें. विष्णु तें पाहून आला होता. छापलेल्या नाटकांतील कांहीं भाग मीं वाचला होता. आपल्या नाटकाला 'क्लृप्ति-विजय हें नांव द्यावें ही क्लृप्ति माझी होती. प्रवेश आणि पात्रें नक्की करण्यापलीकडे तें नाटक पुढें वाढलें नाहीं.

विष्णु आपल्या मामाच्या घरी रहात असे. वाण्याच्या दुकानीं जाऊन मामाच्या नांवावर लिहवून गुलकंद, बदाम, बेदाणा, वगैरे वस्तू अुधार आणून खात असे. अेके दिवशीं त्यानें मला गुलकंद दिला, तो मीं खाल्ला. पण जेव्हां मला कळलें कीं स्वारी मामांना नकळत हा सर्व व्यवहार करते, तेव्हां त्याच्याकडून आपण कांहींहि

घ्यावयाचें नाहीं असें मी ठरविलें. त्या काळीं प्रामाणिकपणाचा कांहीं विशेष आदर्श मी मनापुढे बाळगला होता असें नाहीं; पण मला त्याचें करणें घाणेरडें वाटे. घरची मंडळी विश्वास ठेवीत असतांना तेथेंच चोरी करणें यांत नव्हती अिमानदारी आणि नव्हती बहादुरी.

विष्णूविषयीं अेक दोन वाअीट गोष्टी वर्गात बोलल्या जात असत. कित्येक विद्यार्थी म्हणत, "गोष्ट खरी नसावी. अुगीच कोणीतरी अुडविलेली असावी." दुसरे कित्येक म्हणत," गडद्याचे लक्षण असें आहे कीं गोष्ट खरीहि असेल. तो काय करणार नाही ?"

अेके दिवशीं, कशामुळें कोणास ठाअूक, आमचे दोघाचे कडाक्याचें भांडण झालें. मी त्याच्याशी वैर करावयाचे असे ठरविले. राग अनावर होअून मीं मनांत ठरविलें, "या नालायकाला चांगलाच बदनाम केला पाहिजे." वर्गात शिक्षक नव्हते. प्रथम मी पहिल्या नंबरच्या पटवेकराकडे गेलों आणि त्याला सांगितले कीं, विष्णूविषयीं जी वदंता आहे ती खरी आहे. दुसऱ्या नंबरावर कोण बसला होता, तें आतां आठवत नाहीं. त्यालाहि मीं तेंच सांगितले विष्णु तर माझ्यावर रागवून लाल झाला होता. नाहीं-नाही, त्याचे तोंड अगदीं फिक्कें झाले होतें. त्याच्या पातळ कातडीवर रक्त मुळींच दिसत नव्हतें. तिसऱ्या नंबरावर मोने बसला होता, त्यालाहि मीं जाअून सांगितलें, विष्णूविषयींची गोष्ट खरी आहे.

मोने सज्जन मुलगा होता. त्याला माझे करणें आवडले नाहीं. त्यानें माझ्याकडे तिरस्काराने पाहून म्हटले, "खरी असली म्हणून काय झाले ? प्रत्येकाला सांगत सुटण्यांत तुम्हांला लाज वाटत नाहीं का ? मित्र समजूनच त्याने तुम्हांला आपली खाजगी गोष्ट सांगितली असेल ना ? आतां भांडलांत म्हणून काय झाले ? आपला कुलीनपणा सोडूं नका. जाअून बसा आपल्या जागेवर."

हें कठोर वचन थोबाडीपेक्षांहि मला अधिक झणझणलें. प्रचार सोडून देअून मी चटकन् आपल्या जागेवर जाअून बसलों. माझे कान कसे गरम गरम झाले होते. घटकेत थंडगार होत, आणि पुन्हां गरम होत. रक्ताच्या प्रवाहाबरोबर विचाराचा प्रवाहहि खूप जोरानें चालूं लागला. मोनेचा मला मुळींच राग आला नाहीं. त्यानें आयुष्यांतील अेक अुत्तम धडा मला शिकवला होता. मनुष्य रागावून किती का आंधळा झालेला असेना, आपण करीत असलेले कृत्य हीन आहे हे ध्यानांत येण्याअितका तो भानावर असतोच. विष्णु माझ्या शेजारींच बसला होता. पण वैऱ्याबरोबर

बोलावें कसें ? मीं अेका कागदाच्या चिटोऱ्यावर लिहिले, कीं माझी चूक झाली. आणि तो कागद त्याच्या मांडीवर ठेवून दिला. अेवढ्यानेंच त्याला संतोष झाला आणि आम्ही पुन्हां मित्र झालों.

त्या मुलाबरोबर माझी दोस्ती चार-अेक महिने टिकली असेल. पुढे मी वडिलांच्या बरोबर सावंतवाडीला गेलों. तो मुलगा खराब आहे, हें मला प्रथमपासून माहीत होतें. त्याला माझा आधार हवा आहे, अेवढ्यासाठींच मीं त्याला माझी दोस्ती करूं दिली होती. त्याच्या तोंडून मीं घाणेरड्यांत घाणेरड्या गोष्टी अैकिल्या होत्या. त्याला मी ओळखत असल्यामुळें मी सावध असें. त्याच्या बोलण्याचा किंवा वागण्याचा स्पर्श मला होऊं नये याविषयी मी जपत होतों. त्या वेळीं मी अलिप्त राहूं शकलों खरा; पण कालांतरानें त्यानें सांगितलेल्या गोष्टी आठवून देखील माझी कल्पनाशक्ति मलिन झाली नाहीं, असें जर मला म्हणतां येतें तर किती चांगलें झालें असतें !

मित्र होण्याच्या प्रयत्नांत त्यानें न कळत शत्रूचें काम केलें. त्यानें माझ्या कानांत जो नरक ओतला तो धुऊन काढतां काढतां मला वर्षानुवर्षें मेहनत करावी लागली. अैकिलेल्या गोष्टी अेका कानांतून शिरून दुसऱ्या कानांतून निघून जात नसतात. अखंड भुकेलेला मेंदूचा स्पंज सर्व गोष्टी चोखून घेतो. शिलालेख काळेंकरून पुसून जातील; पण स्मरणलेख पुसले जात नाहींत.

कबीरानें अेके ठिकाणीं म्हटलें आहे, " मन गया तो जाने दो, मत जाने दो शरीर. " हातांतून बाण सुटला नाहीं तोंवर तो काय नुकसान करणार आहे ? या सिद्धान्तावर विश्वास ठेवून मीं माझें पुष्कळ नुकसान करून घेतले आहे. पुष्कळांचा अनुभव असाच असेल. खरोखरच संभाळावयाचे असतें मुख्यत्वें तें मनच होय.

## अिंग्रजीचें वाचन

४०

अेके दिवशीं विचार आला, चांदण्यांत माणसाला वाचतां आलेच पाहिजे अितकें सुंदर दुधासारखे चांदणें पडलें आहे, त्यांत वाचतां कां येअूं नये ? मी अेक खुर्ची घेअून अंगणात बसलों आणि माझें लॉगमनचे दुसरे रीडर वाचूं लागलों अिंग्रजी दुसरींत गेलों त्याला फार दिवस झाले नव्हते. आमचे दोन तीनच धडे झाले होते. अितक्यांत माझ्या वडिलांच्या बरोबर सावनूरच्या प्रवासाला निघावें लागलें. आअीनें विचारलें, " दिव्याबांचून रात्रीचे काय वाचतोस ?" मी म्हणालों, 'माझें अिंग्रजी पुस्तक. "

बंगल्याच्या मुसलमान माळ्याची–नन्हूची बायको आअीजवळ कायसें मागावयाला आली होती. अेवढासा लहान मुलगा आणि अिंग्रजी वाचतो, हे पाहून तिला आश्चर्य वाटलें. तिनें धांवत जाअून आसपासच्या कित्येक लोकांना हें अद्भुत, दृश्य पहावयास बोलावून आणलें.

सावनूर हें हुबळीजवळचें अेक लहानसे संस्थान आहे. तेथील राजा मुसलमान आहे. यावलगी स्टेशनावरून सावनूरला जावे लागे. तेथील भाषा कानडी आहे. वडिलांना कानडी भाषा कामापुरती येत असे. आअीलाहि थोडें थोडें समजत असे. मला मात्र त्या वेळेला, जनावरांची भाषा आणि कानडी भाषा

यांतील फरक कळत नसे. घरीं नोकर ठेवले होते ते मुसलमान होते; त्यामुळें माझें काम अटकत नसे. मात्र घासलेलीं भांडीं आणि धुतलेले कपडे मुसलमानाच्या हातचे असल्यामुळें, आईला ते धुऊन विसळून घ्यावे लागत. या कामीं मी आईच्या खूप उपयोगी पडे. शिवाय मुसलमानी म्हणजे हिंदी, मराठी आणि कानडी शब्दांचे विकृत मिश्रण. उर्दू शब्द फारतर वीस टक्के असतील. आणि या लोकांचे उच्चार ऐकून तर दयाच वाटावयाची. शेवटी येक लिंगायत नोकर आम्हांला मिळाला. तोहि मोडके तोडकें हिंदी बोलत असे. सकाळ संध्याकाळ खेडवळ आवाजांत तो खूप गात असे. त्याच्या त्या पदापैकीं कित्येक ऐकलेल्या ओळी मला अजून स्मरतात.

दत्तूआप्पा इंग्रजी वाचतात, हें पहावयाला पुष्कळ मंडळी जमली; पण चांदण्यांत अक्षरें नीट दिसतील तर शपथ ! पहिला धडा जवळ जवळ पाठ होता. तेव्हां तो खडखडीत वाचून काढला. जमलेली मंडळी आश्चर्यानें मुग्ध झाली. दुसऱ्या धडयांत आमचे तोंड जरा सावकाश चालूं लागले. डोळ्यांना ताण पडल्यामुळें (घाबरल्यामुळें नव्हे) डोळ्यांतून पाणी येऊं लागले. आई म्हणाली, "चांदण्याच्या उजेडांत कधीं कोणीं वाचलें आहे का ? ठेव पुस्तक बाजूला आणि चल जेवायला." सभेचें विसर्जन झालें आणि मला हायसें वाटलें. सुटलों येकदांचा ! त्यानंतर सावनूरला असे तोंपर्यंत दिवसा किंवा रात्रीं मीं पुस्तक म्हणून हातीं घेतलें नाहीं.

## चिंचेवरील दीक्षा



सावनूरचीच गोष्ट आहे. आमच्या बंगल्याच्या आसपास चिंचेची झाडें होतीं. चिंचा चांगल्या पिकल्या होत्या. मला चिंचेचें सरबत फार आवडत असे. अेकदां आअी म्हणाली, " मागल्या बाजूच्या चिंचेवर चिंचा अुत्तम पिकल्या आहेत. ये तुला दाखवतें. झाडावर चढून थोडया चिंचा पाडल्यास तर अुन्हाच्या वेळीं चिंचेचें सरबत अुत्तम होअील." मी झाडावर चढलों. कांहीं चिंचा पाडल्या; पण अुत्तम अुत्तम चांगल्या परिपक्व आणि पुष्ट चिंचा फांद्यांच्या अगदीं टोकालाच असतात. मीं हात लांबवला, बरीच हिंमत केली, पण चिंचेपर्यंत हात पोहचेना. आअी माझ्यावर रागावली, " भित्रा आहे, भित्रा ! पहा, त्याचे हातपाय कसे कांपत आहेत ! हें कांहीं शेवग्याचें झाड नव्हे, मोडून पडायला. चिंचेची फांदी बारीक असली तरी मोडत नाहीं. निर्भय होअून अजूनहि पुढें जा. तसें होत नसेल तर रिकाम्या हातानें परत ये. काय म्हणावें याला ? अेवढेंहि याच्यानें होत नाहीं." माझ्या डोळ्यापुढें भोंवळ आली. भयानें नव्हे, लज्जेनें. कांहीं मुलें खोडया करतात, तेव्हां जीव संकटांत घालावयाचींच. अशा वेळीं आअीबापें, त्यांतल्या त्यांत आअी घाबरून जाअून " अरे, असे करूं नका. शरीराला जरा संभाळा. कसे बेफाम तुम्हीं ! " असें म्हणून रागे भरल्यावांचून राहाणार कशीं ? हा त्यांचा सनातन नियम आहे. तरुणांना तुफान खोडया करणें

हेंच शोभतें. याच्या अेवजीं आअीलाच माझा भित्रेपणा असह्य झाला आणि तिनें माझी निर्भर्त्सना केली ! यापेक्षां येथेच मरून गेलेलें चांगलें असें मला झाले.

त्यानंतर मी निर्भयपणानें फांदीच्या टोकापर्यंत कसा पोहोचलों आणि अगदी शेंडयावरच्या चिचा मीं कशा पाडून आणल्या हें माझ्या ध्यानांतहि राहिलें नाहीं. त्या दिवसापासून मीं असली भीति सोडूनच दिली असें म्हणतां येअील.

आज जेव्हां कधीं विद्यार्थी मला विचारतात, " अितका हा स्वार्थत्याग कसा करावा ? आमची 'करीअर' बुडेल त्याचें काय ? " तेव्हां मी त्यांना म्हणतों, "तुमच्यासारख्या तरुणांना आम्हीं लगाम घालून मागें खेचावे, सबूर म्हणावें, हें शोभून दिसतें. तुम्हांला पुढें ढकलण्यासाठीं, पिटाळण्यासाठीं आम्हीं चाबूक अुगारावा हें तुम्हाला शोभत नाहीं." जेव्हां जेव्हां हें वाक्य मी तोडांतून काढतो, तेव्हां तेव्हां सावनूरचें तें चिचेचें झाड आणि त्या झाडाखालीं अुभी असलेली माझ्या आअीची मूर्ति हीं माझ्या डोळ्यासमोर अुभीं रहातात.

## नागरवेलाची वाडी ४२

सावनूरमध्यें आम्हीं दीड अेक महिना राहिलों असूं. अेके दिवशीं सकाळीं मला लवकर अुठवून, बरोबर घेअून, वडील फिरावयास निघाले. कोठें जावयाचें आहे, ह्याची मला कल्पना नव्हती. दोनचार मंडळी बरोबर होती. आम्हीं पुष्कळ चाललों. पुढें रस्ता संपला. आम्हीं शेतांतून चालूं लागलों आणि पहातां पहातां अेका सुंदर बागेंत जाअून पोहोचलों. जेथें पहावें तेथें कागदी लिंबाचीं झाडें. झाडें म्हटलीं म्हणजे त्यांचीं पानें हिरवी असावयाचींच. पण लिंबाच्या झाडाच्या पानांची खुबी कांहीं और असते. सोन्याजवळ फक्त रंगच असतो. या चकाकणाऱ्या पानांजवळ रंगाबरोबर सुवासहि असतो. आणि येथील ते लिंबू केवढे मोठे ! लहानपणापासून मीं जे लिंबू पाहिले होते ते वाटाळे असत. येथील लिंबू महादेवाच्या बाणासारखे लांबट वाटोळे होते. मी वडिलांना म्हणालों, " तो पहा, तो लिंबू केवढा मोठा आहे ! आणि सोनेरी हिरवा ! " माझ्या तोंडून शब्द निघाले मात्र, दुसऱ्या क्षणींच तो लिंबू माझ्या हातीं येअून पडला ! तो घेअून मी डोळ्याच्या पापणीवर दाबला. पण शिष्टाचार संभाळण्यासाठीं मी माळ्याला म्हणालों, " तुम्हां लोकांच्या मेहनतीचें फळ मीं फुकट काय म्हणून घ्यावें ? " आमच्या बरोबरच्या कारकुनानें म्हटलें, " ही वाडी सरकारी आहे वाडी पहाण्यासाठीं तुम्हाला मुद्दाम आमंत्रण देअून येथें आणलें

आहे." मग काय? माझी दानत बिघडली. अेकादे चांगलें फळ दिसलें कीं, अस्मादिकांनीं तें तोडलेंच किंवा तोडावयाला लावलेंच.

जवळच अेका शेतांत दुध्या भोपळ्याचा अेक वेल होता. वेलीचा मंडप पुष्कळच उंच होता. त्या मंडपावरून तीन दुधी खालीं लटकत होत्या. अेवढीं मोठी आणि लांब फळें मीं पूर्वी कधीं पाहिलीं नव्हतीं. आणि त्यानंतरहि कधीं पाहिलीं नाहींत. मी म्हणालों, " यांतील अेक दुधी आमच्या घरीं पाठवून द्या. मला आअीला दाखवायचें आहे, येथें हे भोपळे किती लांब होतात तें." माळी होता खोडकर. तो म्हणाला, " छोटेसाहेब, आपल्या हातानेंच तोडून घ्याना." त्यानें विळा माझ्या हातीं दिला. मी त्या दुधीचाच आश्रय धरून पायाच्या बोटावर अुभा राहिलों; पण विळा देठापर्यंत पोहोचेल तर ना. सर्वजण हसूं लागले.

आम्ही थोडे पुढें गेलों. तेथें नारळाचीं झाडें होतीं. झाडावरून कांहीं दाब काढवून आम्हीं त्यांचें अमृतपाणी प्यालों आणि आंतील लोण्यासारखे कोवळें खोबरे काढून खालें. नुसतें पाणी पिअूं नये असे म्हणतात. पाण्याबरोबर थोडेतरी खोबरे खालेंच पाहिजे. खोबरें अितके कांहीं गोड होतें कीं खाण्यासाठीं नियमाचा आग्रह आवश्यक नव्हता.

अेक तास आम्हीं फिरलों असू. सर्व ठिकाणीं कसे हिरवें गार होतें. अून्ह जसजसें वाढूं लागलें तसतसा तेथील छायेचा गारवा अधिकाधिक आनंद देअूं लागला. मी आनंदानें मनसोक्त फिरूं लागलों अितक्यांत दूरवर पसरलेली ठेंगण्या मांडवासारखी अेक झोपडी मी पाहिली. मी म्हणालों, " असली विचित्र आणि ठेंगणी झोपडी कशासाठीं बांधली आहे? माणसांची गोष्ट राहो, जनावरें देखील यांत मोकळेपणानें अुभीं राहूं शकणार नाहींत." वडील म्हणाले, " वेडया, ही कांहीं झोपडी नव्हे. हिला नागरवेलीचा मंडप म्हणतात. आंत जाअून पहा, म्हणजे खायच्या पानाच्या कोवळ्या कोवळ्या वेली दिसतील. या पानांना अून मुळीच सहन होत नाहीं. अेवढ्यासाठीं असा मांडव बांधावा लागतो."

मी आंत जाअून बघण्यासाठीं अधीरा झालों. पण आंत जाण्याचा दरवाजाच कोठे दिसेना. पुष्कळ दूर गेल्यानंतर शेवटीं दरवाजा सांपडला. वांसरूं शिरावें तसा मी आंत शिरलों. ओहोहोहो! किती सुंदर देखावा हा! दूर दूरवर बारीक बारीक मानग्यांची हार ( आमच्या बाजूला बारीक भरीव बांबूला मानगा म्हणतात ). अेकाद्या मोठ्या

मदिरांत ओळीनें खांबच खांब असावेत, तशासारख्या मानग्यांच्या रांगा शेवटीं शेवटी अेकमेकीला जणुं मिळूं पहात होत्या, आणि लहान मूल वडिलांना बिलगून असावे त्या-प्रमाणें दरअेक खांबाला अेक अक नागरवेल गुंडाळलेली होती. वेलीचीं पानें फिकीं हिरवीं, कोवळीं, टवटवीत आणि अणकुचीदार होतीं. अितकें मनोहर दृश्य कधीं कल्पनेंतहि आलेलें नव्हतें. या खांबाच्या रांगांमधून मी खूप हिंडलों. मला वाटलें, परींच्या राणीचा हा महाल असावा. अेकादे पान तोडले कीं कट् असा नाजूक आवाज होअी. वडिलांनीं मला मोठ्यानें हांक मारली नसती तर आपण होअून कांहीं मी बाहेर निघालों नसतों. बरोबरीचे लोक म्हणाले, "अेवढ्यांत काय गुंग झालांत, आप्पासाहेब ! पुढें याहूनहि अधिक चांगली मजा पहावयाला मिळेल." मला वाटलें, याच्याहून सुंदर दृश्य कोणतें असणार ? मला परत बोलावण्याची यांची ही युक्ति आहे.

पण माझी ही कल्पना चुकीची ठरली. पुढें अेका बाजूला पपअीचीं झाडे होतीं आणि दुसऱ्या बाजूला पोफळीचीं ( सुपारीची ). आणि दरेक झाडाच्या आसपास अेक अेक नागरवेल लपेटलेली होती. सुपारीचीं झाडे जवळ जवळ लावलीं तरी नुकसान नसतें. झाडें जवळ जवळ असलीं आणि त्यांची भरगच्च छाया जमिनीवर पडली म्हणजे गालीच्याप्रमाणें दिसते. येथील नागरवेल मघांच्या मांडवाच्या नागरवेली-सारखी कोवळी नव्हती. येथील पानें कांहींशीं पसरट जाड असून त्यांचा हिरवा रंग काळवंडलेला असे. कोणीसे मला सांगितले, कोवळ्या पानाना अंबाड्याची पानें म्हणतात आणि या निमुळत्या पसरट काळ्या पानाना शिरसी पाने म्हणतात. हीं पानें बरींच तिखट असतात. जे लोक तंबाकू खातात ते शिरसी पानेंच पसंत करतात. या झाडांच्या मधून मी खूप धावत सुटलों असतो; पण तसे करणे शक्य नव्हतें. कारण झाडांमधून मोटेचे पाणी खेळवलेलें होतें.

मला शंका आली, अितक्या झाडांवर जेव्हां सुपारी पिकत असेल तेव्हां ती कशी काढीत असतील ? माझी म्हणाला, "आतांच तुम्हाला दाखवितों." माझे कुतूहल अेका बाजूस राहिले आणि भीति वाटली की माझी जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं अेकाद्या बिचाऱ्या नागरवेलीला चिरडून ही स्वारी झाडावर चढणार. पण तसे झाले नाहीं. बगीच्याच्या अेका बाजूला अेक विधुर झाड अुभें होतें, त्याच्यावर तो चढला. वर पोहोंचल्यानंतर तो झाड हालवूं लागला. सुपारीचीं झाडे सरळ सोट आणि बारीक असतात. त्याने थोडेंसें हालवितांच झाड झोके घेअू लागले. अेक मोठा झोका घे अून माळ्यानें शेजारचे अेक झाड पकडले. त्याला कवटाळून त्यानें पहिले झाड

पायांतून सोडून दिलें. पहिल्या झाडाला हायसें वाटून तें आपल्या जागीं परत आलें. आतां मला समजलें कीं, हा नर-वानर अेका झाडावरून दुसऱ्या झाडावर जात जात सबंध बाग पुरी करणार आहे. माळ्याने तसेंच करून अेक रांग पुरी होतांच त्या बाजूच्या नागड्या ठेवलेल्या झाडावरून तो खालीं अुतरला.

सरकारी बाग पाहून येअी तो ऊन बरेच झाले होतें. कशीवशी आंघोळ करून जेवून घेतलें. दोन प्रहरीं खूप अुकाडा होत होता म्हणून घरीं आणलेल्या शहाळ्यावर पुन्हां ताव मारला आणि सगळा दिवस नागरवेलीच्या बगीच्याच्या गोष्टी केल्या. दुसऱ्या दिवशीं मला फणफणून ताप भरला. सर्वांना काळजी वाटूं लागली. सावनूर-मध्यें कोणी हुशार डॉक्टर होता किंवा नाहीं कोण जाणे, पण संस्थानच्या कारभाऱ्यांनी माझ्यासाठीं अेक प्रख्यात हकीम पाठवून दिला. हकीमसाहेबांची मूर्ति आज देखील दृष्टीसमोर ताजी आहे. त्यांच्या धिप्पाड शरीराला त्यांचा तो लांबलचक अंगरखा आणि फरफर अुडणारी दाढी हीं फार शोभत असत. त्यांच्या चेहेऱ्यावर प्रतिष्ठित प्रसन्नता नेहमीं पसरलेली असे. हकीमसाहेब आमच्या घरीं आले ते थेट माझ्या अंथरुणावर येअून बसले. त्यांनीं नाडी तपासली, कांहीं माहिती विचारली आणि मग त्यांनीं अिकडच्या तिकडच्या गोष्टी सुरू केल्या. मियाजींची जबान अशी कांहीं मिठ्ठी होती कीं तासभर बसले होते तरी त्यांना किंवा आम्हाला वेळेची आठवणच राहिली नाहीं. पुढें त्यांनीं औषध देण्याचा विचार केला. अंगरख्याच्या लटकत्या लांब पिशवी-वजा खिशांतून त्यांनीं अेक बाटली काढली. त्या अेकाच बाटलींत तऱ्हेतऱ्हेच्या गोळ्या होत्या. बाटलींतील सर्व गोळ्या डाव्या तळहातावर ओतून अेकेक गोळी

अुजव्या हाताच्या बोटांत घेअून ते विचार करूं लागले. दोन बोटांत गोळी फिरवतां फिरवतां त्यांचा विचार चालू होता. शेवटीं निर्णय करून त्यांनीं अेक गोळी माझ्या हातीं दिली. मी ती तोंडांत टाकणार अितक्यांत त्यांनीं विचार बदलला आणि म्हणाले, " आज ही नको घ्यायला. अुद्यांपासून ही गोळी देअीन. आज दुसरी देतों." पुन्हां त्यांच्या बोटांमध्यें निरनिराळ्या गोळ्या अेकामागून अेक फिरूं लागल्या. आणि शेवटीं अेका गोळीचा निर्णय झाला आणि मीं ती खाल्ली. विलायती औषधापेक्षां आपली देशी वैद्यकी चांगली. पथ्य पाळावें लागतें खरें; पण देशी औषधे स्वादिष्ट आणि रुचकर असतात.

दुसऱ्या दिवशी त्याच वेळीं हकीमसाहेब आले. मी तर अंथरुणांत पडल्या पडल्या त्यांची वाटच पहात होतों दरवाजांतून आंत येतांनाच छोटेमहाराज म्हणून त्यांनीं माझी तब्येत विचारावी. पथ्य पाळण्यासंबंधी दोनचार गोष्टी सांगितल्या की पुन्हां त्यांच्या गोष्टी सुरू होत. माझ्या वडिलांना तोंडभर बोलण्याची संवय नसे. त्यांचा आपला श्रवणभक्तीचा मार्ग असे. हकीमसाहेबांची हिंदुस्तानी अतिशय सोपी असे. त्यांत कानडीपेक्षां मराठी शब्दच अधिक असावयाचे. त्यामुळें त्यांच्या गोष्टी अैकण्यांत मला फार आनंद होत असे. कधीं अेकाद्या प्रहरात दरवडेखोराची गोष्ट त्यांनीं सांगावी तर कधी देशदेशांतरी स्वत:ला आलेल्या अनुभवांचें वर्णन करावें.

अेके दिवशी मीं त्यांना तेथल्या वाडींत पाहिलेल्या अजगरासारख्या लांबलचक दुधी भोपळ्याची गोष्ट सांगितली. हकीमसाहेब ताबडतोब म्हणाले, "यांत तुम्हीं मोठेंसे काय पाहिलेत ? आम्ही होतों तेथें अेका माळ्यानें दुधीचा वेल मांडवावरून लटकत न सोडतां जमिनीवरच पसरला होता. त्यांतील अेक दुध्या भोपळा जसा वाढूं लागला, तशी माळ्यानें त्याच्या समोर जमिनींत अेक खुंटी ठोकली. दुधीनें थोडें वळण घेऊन वाढावयास सुरुवात केली. थोडे वाढूं देअून त्यानें पुन्हां अेक तेथें दुसरी खुंटी मारली. तेव्हां पुन्हां दुसऱ्या (उजव्या) बाजूला वळून तिनें वाढावयास सुरुवात केली. अशा रीतीनें माळ्यानें मोठ्या युक्तीने खुट्या मारून दुधीला नागरमोडीचा आकार दिला चांगला दहा हात लांब दुध्या पाहून आम्हाला मोठें आश्चर्य वाटलें !"

बिरबल-बादशहाच्या गोष्टींचा तर हकीमसाहेबांच्या जवळ मोठाच खजिना होता. अेका वेलीला लटकणाऱ्या लहानशा भोपळ्याखालीं मोठे थोरलें मातीचे मडकें बिरबलानें लटकावून दिलें. भोपळा मडक्यांत वाढूं लागला. मडकें चांगलें भरलें तेव्हां त्यानें देठ कापून बादशहाला भेट म्हणून पाठवून दिले. आणि निरोप

पाठविला कीं, हा भोपळा या मडक्यात कसा घातला हें तुमच्या दरबारांतील शहाण्या लोकांना विचारा आणि मडकें न फोडतां आंतील भोपळा जशाचा तसा काढून त्या शहाण्यांनीं बादशहाच्या हातीं द्यावा, अशी सूचना केली. अशा तऱ्हेच्या किती तरी गोष्टी हकीमसाहेबाच्याकडून ऐकावयास मिळत.

मी बरा झालो तो हकीमसाहेबांच्या औषधानें का त्याच्या गोष्टीनें हें सांगणें कठीण आहे. एवढें खरे कीं त्यांच्या गोष्टी ऐकावयास मिळत असल्यामुळें लौकर बरें होण्याची मला पर्वा अुरली नाहीं. अुलट भीति वाटे कीं, जर लौकर बरा झालों, तर हकीमसाहेबांचे येणे बंद होअील आणि मग या मनोरंजक गोष्टींचा दुष्काळ सुरू होअील.

हकीमसाहेब आपल्या धंद्यामध्ये बरेच हुशार होते. आअीनें अेकदां आमच्या नातेवाअिकांपैकीं कित्येकांच्या रोगाचे वर्णन करून अशा रोगावर काय औषध करावें हे विचारले. गैरहजर असलेल्या रोग्यांचे सामान्य वर्णन अैकून ते बराच बारीक अंदाज करीत असत. अेकदा त्यानीं विचारले "ते गृहस्थ ठेगू आणि फोपसे आहेत काय?" आअी म्हणाली, "होय." हकीमसाहेबांनीं पुन्हा विचारले, "त्यांना पूर्वी कधी अमुक अमुक रोग झाला होता काय?" आअी म्हणाली, "तेंहि खरे." त्यांची ही शक्ति पाहून मनाला अचंबा वाटत असे. हकीमसाहेब नाडी-परीक्षेंतच प्रवीण नव्हते; मनुष्य-स्वभावाची देखील त्यांना चांगली पारख होती. मी अेकटा असलों म्हणजे अेक प्रकारच्या गोष्टी सांगत. वडील जर जवळ असले तर दुसऱ्याच अेकाद्या रंगाची जमावट करीत. रिकामपणीं आअी अैकावयास येअून बसली म्हणजे अितर गोष्टी सोडून माझ्या लहानपणच्या गोष्टीच आअीला विचारीत. असले जीवन-स्पर्शी आपले वैद्य आणि हकीम कोठे आणि आजचे धंदेवाअीक डॉक्टर कोठें? हे डॉक्टर व्हिजिटिंग फी घेतल्याशिवाय यावयाचे नाहींत आणि आपल्या धंद्याच्या बाहेर ब्र काढतील तर शपथ! पण डॉक्टरांचा तरी काय दोष? अेकेका डॉक्टराच्या मागे रोज जर शंभर शंभर आजाऱ्यांची फौज लागली तर बिचाऱ्यांनीं काय करावे? जुन्या काळीं लोकाना वारंवार आजारी पडण्याची हौस नव्हती आणि आजारी पडल्यानंतर लौकर बरे होण्याची घाअीहि नव्हती

शेवटीं मी बरा झालों माझा ताप गेला. पुढें हकीमसाहेब रोज अेक प्रकारचा मुरब्बा केळीच्या पानांत बांधून माझ्यासाठीं घेअून येत. त्या त्या दिवशीं खाण्यापुरताच मुरब्बा रोज आणीत आणि समोर बसून प्रेमानें खावयास लावीत. पहिल्या दिवशीं

मला शंका आली कीं मुसलमानाच्या हातचा मुरब्बा खावा का ? मीं हळूच आओला विचारलें. ती म्हणाली, " औषधाची चिकित्सा कधींहि करूं नये " वडिलांनीं देखील सांगितलेः

" औषधं जान्हवी तोयं
वैद्यो नारायणो हरिः "

औषध गंगाजलाप्रमाणे पवित्र आहे असे मानावें आणि वैद्याचें सांगणे तर साक्षात् नारायणाचे वचन. पुढें कित्येक लोकांकडून या ओळीचा मीं अुलटाच अर्थ अैकला. जर आपण आजारी पडलों असलों तर औषध घेण्याच्या भानगडींत पडूं नये. गंगाजल हेंच आपलें औषध आणि सर्वांना बरे करणारा सर्वांचा वैद्य नारायण हरी आहेच.

हकीमसाहेब म्हणाले, "ओहो ! छोटेमहाराज, धर्माची गोष्ट आड आली होय ? या मुरब्ब्यामध्ये तसलें कांहीं नाहीं हं ! कितीतरी हिंदु कुटुंबांमध्यें माझें येणें जाणें आहे. तुमचे रीतरिवाज मला ठाअूक आहेत. आमच्या युनानी वैद्यकामध्यें हरेक प्रकारचीं औषधें असतात. पण तसें म्हटले तर तुमच्या हिंदु वैद्यकांत मांसाचा अुपयोग कोठें करीत नाहीत ? "

बस्स. अेवढयावरून अेकामागून अेक कितीतरी गोष्टी निघाल्या. ते म्हणाले, " अेकदा मी प्रवासाला निघालों होतों. रस्त्यांत अेक खेडेगांव लागलें. तिकडे दिसून आलें कीं, अेका जागीं लोकांचा घोळका जमला आहे आणि आवाज होत आहे. जवळ जाअून पहातों तर कित्येक लोक अेका माणसाला झोडपीत अहेत. " अरे, याला कां मारतां ? " असें विचारतां अुत्तर मिळालें, " या अिसमाला भूत लागलें आहे. तें भूत काढण्याचें काम चालू आहे. " त्या मनुष्याला न्याहाळून पहातांच माझ्या ध्यानांत आलें कीं भूतबीत कांहीं नाहीं. याला अेक विशिष्ट प्रकारचा रोग झाला आहे. तमासगीर लोकांना बाजूला करून मी आंत शिरलों आणि म्हणालों, " अरे वेड्यांनो, तुम्हीं भूत काढणार नसून या गरीबाचा जीव घेणार आहांत. लक्षणांवरून दिसतें कीं याला अेक जबरदस्त रोग झाला आहे. या क्षणींच जर सशाचे रक्त मिळालें तरच हा मनुष्य बरा होअील; नाहींतर संध्याकाळपर्यंत हा मरून जाणार. तुम्हीं त्याला मारून मारून अर्धमेला केला आहेच. " लोक म्हणाले, " सशाचें रक्त येथें कोठून मिळणार ? " मी म्हणालों, " तर मग हा माणूस जगण्याची आशा नाही. " मी तेथून चालता झालों. पण देवाला त्या माणसाला वांचवावयाचें होतें. अीश्वराची

करणी कशी असते, ती पहा. समोरून अेक पारधी आला. त्याच्या हातांत ताजाच मारलेला अेक ससा दिसला. मी आनंदानें म्हणालों, " मेहेर खुदाकी ! तुमचा मनुष्य वांचला, असें समजा." मीं माझ्या पेटींतून दवा काढली आणि सशाच्या रक्तांत तयार करून त्या माणसाला पाजली. रोगी बरा झाला."

सशाच्या रक्ताची गोष्ट अैकून मला आश्चर्य वाटलें. पण आअी म्हणाली, " यांत आश्चर्य करण्याजोगें कांहीं नाहीं. आपल्या गांवीं देखील अेकाच्या जवळ सशाच्या आणि कबुतराच्या रक्तांत भिजवून वाळवून ठेवलेले हातरुमाल आहेत."

वैद्यकामध्यें कोणती वस्तु कामाला येते आणि कोणती येत नाहीं, हें सांगणे कठीण आहे. कित्येक रोगांत दुधांत ढेंकूण कोळून प्यायला देतात. अेका रोगावर मांजराची विष्ठा देखील देतात. म्हणूनच आपल्या लोकांनीं म्हणून ठेवलें आहेः

अमन्त्रम् अक्षरम् नास्ति
नास्ति मूलम् अनौषधम्

पुढें निरनिराळ्या वनस्पतीच्या गुणधर्माच्या गोष्टी चालल्या. वनस्पतीची चर्चा चालली आहे आणि कडू लिंबाचे नांव आले नाहीं असे कधीं झालें आहे काय ? आअी म्हणाली, " कडू लिंबाचीं पानें वांटून त्यात पाण्याचा अेक थेबहि न टाकतां जर त्याचा आपरस काढला आणि असा अेक तोळाभर रस दिला असतां मेलेला मनुष्याहि जिवंत होतो." यावर वडील हसून म्हणाले, " कडू लिंबाच्या पानांतून पाणी घातल्यावांचून अेक थेबहि रस निघूं शकत नाहीं. म्हणूनच कोणी तरी हें महात्म्य ठोकून दिलेले दिसतें." हकीमसाहेब म्हणाले, " तें कसेंहि असो. जर कडू लिबाचें अेकादे जुनें म्हातारें झाड तुमच्या पहाण्यांत आले तर त्याच्या आसपास फिरून तपासून पहा. केव्हां केव्हा त्याचा बुधा आपोआप फाटून त्यांतून डिंकासारखा रस निघतो. असा रस जर हातीं लागला तर तो ताबडतोब खाअून टाकावा. त्या ताज्या डिकामध्यें अद्भुत शक्ति असते. त्याच्या योगानें अनेक रोग बरे होतात. कित्येक लोकांचे पाय नेहमीं फाटतात. त्यांनीं जर हा रस चाटला तर त्यांचे पाय फाटावयाचे नाहींत. कडू लिबाच्या झाडावर मधमाश्यांनीं घर केले, तर त्या पोळ्यांतील मध विशेष गुणकारी असतो."

थोडयाच दिवसांनंतर आमच्या बंगल्यासमोरील कडू लिबाच्या झाडावर मला अेक पोळें दिसलें. जवळच्या विहिरीवर कैदी लोक येअून मोट चालवीत असत.

त्यांना सांगून मीं तें पोळें काढवलें. आणि त्यांतील मध अेका सुंदर, पातळ बाटलींत भरून ठेवला. थोडयाच दिवसांत त्या मधांत बारीक दाण्याची साखर खालीं बसलेली दिसली. त्या साखरेचा रंग पिवळसर पांढरा होता. अितक्या सुंदर मधाची असली साखर अेकदम खाअून जाण्याचें माझे मन होअीना. मी अेकदोनदांच थोडी थोडी चाखली असेल; अितक्यांत माझ्या हातून ती बाटली फुटून गेली. बाटलींत अुरलेल्या मधांत काचेचे बारीक तुकडे असतील या भयाने आअीनें तो मध फेकून द्यावयास लावला.

शेवटीं सावनूर येथील वडिलाचें काम संपलें. सावनूर सोडण्याचे दिवस आले. वडिलांनीं कारकुनाच्या मार्फत हकीमसाहेबांना त्यांच्या फीविषयीं विचारले. वडिलांचा विचार त्यांच्या नेहमीच्या फीपेक्षां थोडें जास्ती देअून हकीमसाहेबांना राजी करण्याचा होता. हकीमसाहेब म्हणाले, "मला तुमचेकडून पैसे घ्यावयाचे नाहींत; पण तुमचें तें घडयाळ तुमची आठवण म्हणून मला द्या." घडयाळाची किंमत फारशी नव्हती. तीस पस्तीस रुपयांचें वेस्ट अेड वॉच होतें. पण वडील म्हणाले, "दुसरे हवें तें मागा. हें घडयाळ मला देतां येत नाही." वडिलांनीं दुसरे घडयाळ मागवून देण्याचें कबूल केलें, पण हकीमसाहेब कबूल होअीनात. ते म्हणाले, "मला पैशाची गरज नाहीं. तुम्ही वापरीत असलेलेंच घडयाळ मला हवें आहे." वडिलांनीं आपलें घडयाळ देण्याचें कां नाकारले, हें मला कांहीं समजले नाहीं. त्यांना विचारण्याचेंहि मला सुचले नाहीं. शेवटीं वडिलांनीं आपलाच हट्ट कायम राखला. आणि कारभाऱ्यांच्या मार्फत हकीमसाहेबांना कांहीं रक्कम घ्यावी लागली. त्या घडयाळाशीं कांहीं विशेष संबंध अथवा भावना असावी अशी मीं कल्पना केली. तें घडयाळ वडिलांचे नंतर माझ्या ताब्यांत आलें. हिमालयाच्या सर्व प्रवासांत तें माझ्या संगतीला असे. काश्मीरांत श्रीनगरला असतां तिकडील अेका साधूनें तें माझेकडे मागितलें. मीं देखील जिद्द करून तें देण्याचें नाकारलें. आश्रमांत रहाण्यास साबरमतीला आलों तोंवर तें घडयाळ माझेजवळ होतें. तें कधींहि आजारी पडलें नाहीं, व कधीं त्यानें वेळ चुकीचा दाखविला नाहीं. पुढें मद्रासकडील अेका स्नेह्यांनीं तें थोडया दिवसांसाठीं माझेकडून मागून घेतलें आणि हरवून टाकलें. तें घडयाळ मजजवळ होतें तोंपर्यंत हकीमसाहेबांचें स्मरण वारंवार होअी. आजदेखील अेवढें दुःख तर आहेच कीं, तें हकीमसाहेबाना दिलें गेलें नाहीं. अशा दिलदार मनुष्याला आपण नाराज केलें, हें कांहीं चांगलें झालें नाहीं.

## व्रतनिष्ठ कुत्री ४४

न्हन्नू माळ्याची अेक काळी कुत्री होती. शिकार करण्यांत पटाअीत. बकरीं, मेंढरें पाहिलीं कीं त्यांच्या मागें ती धांवायचीच कधीं कधीं बकरीचें पिलूं किंवा अेकादा ससा मारून ती आणीत असे. न्हन्नूची त्या दिवशीं दिवाळी व्हावयाची. मीं मागें सांगितलेंच आहे, कीं सावनूरला असतांना आम्ही शहराबाहेर गेस्ट हाअूसमध्यें रहात होतों. तेथें मला अेकहि मांजर मिळालें नाहीं. तेव्हां काळीलाच मीं आपलीशी केली. रोज तिला पोटभर अन्न खाअूं घालावें आणि तिचेशीं खेळावें. काळी धर्मानें मुसलमान असली पाहिजे. गुरुवारच्या दिवशीं बिलकुल खात नसे. पहिल्या दिवशीं मला वाटलें, काळी कुत्री आजारी पडली आहे म्हणून खात नाहीं. पण आसपासच्या लोकांनीं सांगितलें, "तिला कांहींहि झालेलें नाहीं. पण ती गुरुवारचा रोजा पाळते." लहानपणीं आपलें मन फारसें चिकित्सक नसतें. कोणतीहि गोष्ट अैकली कीं आपण तिचा श्रद्धेनें स्वीकार करतों. अेवढेच नव्हे तर आपण अद्‌भुत रसाचे असे कांहीं भोक्ते असतों कीं अेकादी अशी कांहीं विचित्र गोष्ट अैकली कीं ती खरीच आहे असें मानण्याकडे आपल्या मनाचा कल असतो. तरीहि काळीची ही गोष्ट मला अशक्यच वाटली. त्या जनावराला गुरुवार नेमका कसा कळावा ? मीं तिचेवर खास लक्ष्य ठेवलें.

दुसऱ्या गुरुवारीं निऱ्या दुधांत पीठ मिसळून मी अेक खमंग भाकरी तयार केली आणि वर तूप लावलें. ( मी तर काळीला तळलेली पुरीच खाअूं घालणार होतों; पण आअी म्हणाली, "कुत्र्यांना तळलेलें देत नसतात. तळलेलें खाल्लें म्हणजे कुत्रीं पिसाळतात किंवा आजारी पडतात. ) गुरुवारीं असली भाकर मीं काळीला घातली. भाकर खमंग भाजलेली होती. काळीच्या तोंडाला पाणी सुटले. अेकादा तुकडा तोंडांत घेअी, पण पुन्हां सोडून देअी. तिनें असें पुष्कळदां केलें; पण अुपवास मोडला नाहीं. संध्याकाळीं चार वाजतां तिला खूप भूक लागली असें पाहून मीं पुन्हां तोच प्रयोग केला. अेक सबंध भाकरीच तिचेपुढे टाकली. काळीला या वेळीं नवीन विचार सुचला. तिनें भाकरी तोंडांत धरून ती दूर नेली आणि तेथें पुढल्या पायांनीं माती अुकरून त्यांत ती पुरून टाकली. आणि तिचेवर आपले आसन 'जमवले'. दुसरे दिवशीं सकाळीं अुठून काळीला पहावयास गेलों. तीहि त्याच वेळीं अुठली. आणि तिनें भाकरी अुकरून काढून पाहातां पाहातां भाकरीचें पारणें केलें.

पुढल्या दोन गुरुवारीं देखील मला तसाच अनुभव आला

त्यानंतर कांहीं वर्षांनीं माझ्या वडिलांना दुसऱ्यादां सावनूरला जावें लागले. या वेळीं मी गेलों नव्हतों. तेथून लिहिलेल्या पहिल्याच पत्रांत वडिलांनीं लिहिलें होतें कीं काळीचा धंदा पूर्ववत् चालूच आहे. पुढें पत्र आलें कीं काळी शिकार करावयास गेली असतां अपघातानें मेली. काळीला गुरुवारची दीक्षा कोणी दिली होती? पूर्वजन्मींचा कांहीं संस्कार असेल कीं काय, वगैरे कल्पनांच्या भराऱ्या मारण्याचें काम माझें नव्हे.

या खेपेला आम्ही सावंतवाडीत गवंडळकरांच्या घरीं भाड्यानें राहिलों होतों. तेथें खग्रास सूर्यग्रहण पहावयास मिळालें. दहा अकराचा सुमार असेल, जिकडे तिकडे अगदीं अंधार पडला. आकाशांत अेकदोन ग्रह देखील दिसूं लागले. कावळे वगैरे पक्षी घाबरून जाऊन कोलाहल करूं लागले. कांचेच्या तुकडयाला धूर लावून त्यांतून सूर्याचें तांबूस बिंब आम्ही पाहूं लागलों. या ग्रहणाच्या वेळीं अेका विचित्र गोष्टीकडे माझें लक्ष्य वेधलें. ग्रहण जसजसें पाहूं लागलों, तसतसें मृगजळाच्या पातळ लहरी झुळझुळत्या पाण्याप्रमाणें आकाशांत दिसूं लागल्या. माझ्या डोळ्याची भ्रांति असेल, अशा शंकेनें अितर लोकांनाहि मीं तें दाखविलें. पुढें जमिनीकडे पाहिलें तों धुराची छाया जमिनीवरून धांवावी, त्याप्रमाणें छायेच्या बारीक बारीक लाटा जमिनीवरून धांवतांना दिसूं लागल्या. याचें कारण काय असावें तें माझ्या ध्यानांत त्यानंतर आलें नाहीं. आजवर तसले खग्रास ग्रहण पाहावयास मिळालें नाहीं. तो अनुभव पुन्हां तपासण्याची संधी मिळूं शकली नाहीं. त्या वेळच्या अनुभवाची छाप मात्र मनावर स्पष्ट आहे.

तें सूर्यग्रहण अेका दिवसाचे होतें. अेक दिवस कसचा, अर्ध्या तासाचेंहि नसेल. पण दुसरें अेक ग्रहण मला कित्येक महिने बाधलें. द्वारकानाथ राघोबा तर्खडकराची ती

भाषांतरपाठमाला अेके वेळीं भाऊशीं सत्याग्रह करून मीं दूर सारली. पण ती कांहीं मला सोडणारी नव्हती. या खेपेला आण्णाच्या मनानें घेतलें कीं, दत्तू आणि गोदू सगळा दिवस फुकट घालवितात; त्यांना काहीं तरी शिकविलें पाहिजे. मग काय? रोज शब्द घोकणें आमच्या नशिबीं आलें. त्याखेरीज नियम ध्यानात ठेवायचे आणि वाक्ये करावयाची. कोण पीडा! ए, ॲन्, आणि दी जिकडे तिकडे नडत. त्यांना सरळ करण्याअेवजीं आम्हालाच सर्वजण छळीत, यांचें मोठे वैषम्य वाटे. पब्लिकचें स्पेलिंग मीं नेमके *Publike* असें करावयाचें. आण्णा म्हणे, त्याचा अुच्चार पब्लाअीक असा होअील. लगेच सुधारून मी करीत असें *Publick*. तोंडांतून सी, के निघाल्याबरोबर वेताची छडी माझ्या दंडावर किंवा मांडीवर बसावयाची. पण 'सी'ला कसलीहि मदत न देतां अेकटी सोडून देण्याचें मला सुचत नसे. सकाळचा वेळ आंघोळ, संध्या, जेवणखाण यांत जाअी. दोन प्रकरीं आण्णा लायब्ररीत तरी जावयाचा किंवा रघुनाथ बापू रांगणेकर यांचेकडे राजयोगाचें ज्ञान घेण्यास जाअी. हा सर्व वेळ आम्ही खेळून काढीत असूं. संध्याकाळीं जेवणें आटपल्यावर आण्णा आमचें लेखन घेत असे.

अेके दिवशीं आण्णा अचानक दुपारीच घरीं आला. अुन्हामुळें त्यानें छत्री अुघडली होती. त्यामुळें आण्णा जवळ येअी तोंपर्यंत आम्ही त्याला पाहूं शकलों नाहीं. आम्हांला खेळतांना पाहून त्यानें विचारलें, "आजचे शब्द करून मगच खेळत आहां ना?" मीं ताबडतोब उत्तर दिलें, "अर्थात्". रागा भरून घेऊं नये म्हणून खोटें तर बोललों; पण मनांत भीति अुत्पन्न झाली. आण्णा राजयोग शिकायला जात असतो. योगशक्तीच्या बळावर त्याला दुसऱ्याच्या मनांतील गोष्ट समजत असली तर? तसें झालें तर नेमके पकडलें जाअून दुप्पट मार मिळावयाचा.

आण्णाची संवय होती कीं आमच्या दोघांपैकीं ज्याचें जेवण लवकर आटोपेल त्याचे लेसन प्रथम घ्यावयाचे. नंतर दुसऱ्याचे. आण्णा जेअून अुठण्यापूर्वीच घाअीनें कसेंबसें खाअून आम्ही अुठत असूं. आणि जीं कांहीं ५-१० मिनिटें मिळतील तेवढ्यांत त्या दिवसाचे शब्द पाहून घेत असूं. सगळा दिवस अभ्यास करावयाचा नाहीं आणि आयत्या वेळीं घाअीघाअीनें शब्दांवरून दृष्टि फिरवावयाची यामुळें डोक्यांत घोटाळा होत असे. अितक्यांत मला अेक नवीन युक्ति सुचली. अेके दिवशीं मीं अगदीं सावकाश शास्त्रोक्त चावून चावून प्रत्येक घास खाल्ला. गोंदू नेहमीं प्रमाणें घप घप जेवून अुठला आणि तोफेच्या तोंडीं पोहोंचला. त्याचा धडा

संपेतोंपर्यंत मीं माझे शब्द पाठ करून घेतले. आणि आण्णाच्या परीक्षेसाठीं तयार झालों. चार अेक दिवसांत गोंदूला माझी युक्ति समजली. आणि तोही सावकाश सावकाश रवंथ करूं लागला. आतां कठिण प्रसंग आला. आम्हां दोघांना जेवायला अुशीर लागतो असें पाहून आण्णाहि सावकाश जेवूं लागला. हें माझ्या नजरेस येतांच मीं माझी रणनीति बदलली. अेकीकडे गोंदूचें चर्वण चालत असे तोंवर दुसरीकडे मी कुत्र्यासारखें बकबक खाअून मोकळा होत असें; आणि माझे शब्द मन लावून पाहून जात असें. शब्द पाठ करून पक्के करण्याचा प्रश्नच नव्हता. दोन तीन वेळां शब्द पाहून होतात अितक्यांत आण्णा यावयाचा. ताजेच केलेले शब्द ओकून टाकायला फारशी अडचण पडत नसे. मी अुठल्यानंतर गोंदूला जेवायला जितका अुशीर लागे तितकें त्याचें नुकसान होअी. माझा धडा लवकर आटोपला म्हणजे आण्णानें त्याला हांक मारावयाची आणि मग त्याला घाअीघाअीनें आटपून हजर व्हावें लागावयाचें. यामुळें गोंदूचें जेवण द्रुतविलम्बित गतीनें चालत असे. आण्णा जेवत असला म्हणजे त्याची गति विलम्बित असावयाची. आणि आण्णा अुठला कीं द्रुत. असें केल्यानें त्याचें वेळाचें बजेट सांभाळलें जाअी. पण त्यामुळें तो पकडला गेला. सर्वांच्या ध्यानांत आलें कीं हे दोघे सगळा दिवस खेळतात आणि अैन वेळीं जेवणांतील वेळ चोरून शब्द कसेबसे तयार करतात. आण्णानें याचेवर अेक अिलाज शोधून काढला. त्यानें त्या दिवशीं जुने शब्द विचारावयास सुरुवात केली. त्यामुळें माझें बिंग बाहेर पडलें. रोजचे शब्द मला बरोबर येत होते. पण आज त्यांतील अेकहि शब्द मला येअीना.

दुसऱ्या दिवशीं मीं निश्चय केला कीं आतां युक्ति करून भागावयाचें नाहीं. प्रामाणिकपणा हीच सर्वोत्तम धूर्तता आहे. त्या दिवशीं आण्णाबरोबरच मी जेवून अुठलों. दिवाणखान्यांत पोहोचतांच मीं त्याला सांगितलें, "आज माझे शब्द पक्के झाले नाहींत; कच्चेच आहेत. मला थोडा वेळ देशील तर मी ते चांगले पक्के करीन. तोंवर तूं नानाचा धडा चालीव." मी पुस्तक घेअून बसलों. आमच्या या संभाषणाचा गोंदूला वास कोठून लागणार? मी चांगला सांपडला गेलों आहें असें समजून गोंदू निर्भयपणें खालून माडीवर दिवाणखान्यांत आला. पण जेव्हां आण्णानें त्यालाच अभ्यासाला बोलाविलें तेव्हां तो आश्चर्यचकित झाला. हें झालें कसें? काय युक्ति करून मी निसटलों? हें कांहीं केल्या त्याच्या ध्यानांत येअीना. तो घटकेंत आण्णाकडे पाही, घटकेंत माझ्याकडे. मी मान खालीं घालून हंसत हंसत माझे शब्द घोकूं लागलों.

यापुढें आण्णानें आम्हां दोघांना अेकत्र बसवून रोज पहिल्यापासून त्या दिवसा-

पर्यंतचे सगळे शब्द विचारण्यास सुरुवात केली. अशा या दैनिक परीक्षेपुढें कसलीच मेहनत केल्यावांचून सगळे शब्द मला पाठ होऊन गेले. चार पांच दुष्ट शब्द मात्र हटवादीपणा करीत. पण तेवढ्यासाठीं आण्णा मला मारीत नसे. पुढें पुढें नेमके तेच शब्द विचारण्याची आण्णानें सुरुवात केली. त्यामुळें शेवटीं त्याहि शब्दांनीं आत्महत्या केली आणि माझा अभ्यास निष्कंटक झाला.

या सर्व प्रकरणांत आश्चर्य हें कीं मला अितक्या युक्त्या सुचल्या; पण दुपारीं तासभर बसून पद्धतशीरपणें अभ्यास करण्याचा मार्ग मला सुचलाहि नाहीं आणि रुचलाहि नाहीं.

"अितक्या भिकाऱ्यांची ही टोळधाड कोठून लोटली आहे कुणास ठाअूक ! आम्हाला अितकीं वर्षें झालीं पण अितकी अुपासमार आम्हीं कधीं पाहिली नव्हती."

घरची म्हातारी मोलकरीण शेवंती रोज हेच अुद्गार काढीत असे आणि खरोखर तऱ्हतऱ्हेचे भिकारी रोज सकाळीं ७ वाजल्यापासून १२ वाजेतोंपर्यंत लोटत असत. तऱ्हतऱ्हेचे हेल काढून किंवा गाणीं म्हणून भिक्षा मागत असत. कित्येकांच्या हातांत लोकर कातणारा तकवा खेळत असे. कित्येक भिकारणी शिंदीच्या पानाच्या चटअीच्या पट्टया हातानें विणीत जात आणि भिक्षा मागत. कित्येकाच्या डोक्यावरील टोपलींत सुअी, दोरा, पोताच्या पिरड्का ( मणी ), वगैरे वस्तू विकण्यासाठीं असत. यांची विक्रीहि चाले आणि भीकहि चाले. हवा असलेला माल विकत घ्या आणि भिक्षाहि घाला अशी यांची मागणी असे. कित्येकांच्या तोंडीं खुशामतीचीं गाणीं असतः

*ताईबाईचे डोळे*

*लोण्याचे गोळे इ०*

कित्येक भिकारणी राधाबाअी, रुखमाबाअी, गोपकाबाअी, अि० अितकीं म्हणून बायकांचीं नावें असूं शकतात तीं सर्व संबोधनाच्या दीर्घ रूपांत बोलून मग

गाणी म्हणत. कित्येक पुरुषांच्या गळ्यांत अेक लोखंडी सांखळी आणि लाकडाचा अेक वीत लांब लहानसा नांगर असे. ते म्हणत,' "दुष्काळांत धान्याचा खंड भरूं शकलों नाहीं म्हणून आतां भिक्षा मागून भरपाअी करीत आहोंत. आजवर अडीच हजार पुरे केलेत. आतां फक्त आठश्याची बाकी अुरली आहे. दरेक घरानें थोडे थोडे दिले तर आमची सुटका लौकर होअील."

प्रथम प्रथम मला या लोकांची फार दया वाटे. मीं त्या सर्वांना मूठमूठ तांदूळ घालीत असें. कित्येकांना भात, आमटी, वगैरे द्रोणांत किंवा पत्रावळीवर घालून देत असें. या लोकांचें अनुकरण करू जातां कित्येक ओळी तोंडीं बसून गेल्या. त्यांपैकीं कांहीं ओळी आजहि मला येतात. लोकगीताच्या दृष्टीनें आज मी त्यांच्याकडे पाहूं शकतोः

*सोनार बापूजी बापूजी*
*नथ कां घडवली घडवली.*
*पायां पडवली पडवली*
*पायाचा जोड जोड*
*पायाला आला फोड फोड,*

दुसरें गाणें कोंकणी आहेः

*आल्यान् माल्यान्, माल्यान् मोगरो*
*फुलेलो मोगरो, माल्यान् गो*
*जावअि बोले, लाडके सुने*
*दादान् मोगरो, माल्यान् गो.*

पुढे पहातों तों रोज रोज ते न् तेच लोक पुन्हां पुन्हां येअूं लागले. मी कंटाळलों. माझी सहानुभूति आटून गेली. माझी खात्री झाली कीं हे लोक अुपासमारीमुळें भीक मागत नसून भीक मागणें हा त्यांनी धंदाच केला आहे. कित्येकांची मीं अुलटतपासणी सुरू केली. ते लोक नेहमीं खोटें बोलत रोज कांहीं तरी नवीनच कथा सांगत. कित्येकांना मी म्हणालों, "पण परवां तुम्हीं कांहीं निराळीच कथा सांगितली होती." अगदीं निलाजरेपणानें त्यांनी म्हणावें, "छे हो. तुम्हांला भुरळ पडली आहे. आम्ही आजच प्रथम या गांवीं आलों आहोंत."

यापुढें माझा धीर निघेना. मी त्या लोकांना हांकून लावूं लागलों. त्यांना आंगणांत पायच ठेवूं देअूं नये असें मीं ठरविलें. ते लोक पहिल्यानें माझी फार स्तुति करीत. मला सांबाचा अवतार म्हणत. आतां ते प्रथम गयावया करूं लागले. पुढें त्यांनीं बडबडणें सुरू केलें. मीहि चवताळलों आणि पिसाळलों. मीं हातांत अेक वेताची छडी घेतली. जे कोणी आंगणांत येतील त्याचेवर मी धांवूं लागलों. शेजारीपाजारी हसूं लागले.

कधीं कधीं अुरलेला भात या भिकाऱ्यांना देण्यासाठीं रमावहिनी बाहेर येअी. त्यांना पाहून भिकारी धांवून येत. तें पाहून मी त्यांचेवर धांवून जाअी. वहिनीला म्हणे, " आणा तो भात अिकडे. मी तो कुत्र्यांना देअून टाकतों. या अैदी लोकांना कांहीं घालतां कामा नये. धडधडीत खोटें बोलतात ! "

गोंदू म्हणाला, " कोणी कुणाला दान देत असले तर आपण आड येऊं नये. पाप लागतें. "

" लागूं द्या आम्हाला पाप ! पाहतों मी या भिकाऱ्यांना तुम्हीं कसे खाअूं घालतां तें ! "

सर्व मला समजावण्याचा प्रयत्न करूं लागले. शेवटीं आमचा घरवाला म्हणाला, " तुमच्या दारी आलेल्या लोकांना तुम्ही आडवा वाटल्यास. पण आमच्या दारीं कोणी येअून मागितलें तर त्यालाहि तुम्ही आडकाठी करणार काय ? " चिडेनें आणि लज्जेनें मी निळापिवळा झालों. हातांतील कांठी फेकून दिली आणि मुकाटयानें आपल्या खोलींत जाअून बसलों. तेव्हांपासून तेथें असेनोंपर्यंत कधीहि १२ वाजण्याच्यापूर्वी मी घराच्या बाहेर पडत नसें.

पंधरा दिवसांत भिकाऱ्यांची ही भरती कांहींशी ओसरली. अितक्यांत कुठूनसे मोठे मोठे पिवळट तांबडे टोळ आले. अितके टोळ, अितके टोळ, कीं आकाश अगदीं भरून जाअी आणि विजेचा डायनामो चालावा त्याप्रमाणें आकाशांतून आवाज अैकूं येअी. या टोळांनीं भाजीपाला खाअून टाकला, झाडांचीं पानें खलास केलीं. हे खरोखर टोळ जंतु आहेत कीं आग ! अेकीकडे खात आणि लेंड्या टाकीत जात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत खाल्लें तरी त्यांचें पोट म्हणून भरत नसे ! लोक बिचारे काय करणार ? लांब लांब बांबू घेअून झाडांवरून टोळ अुडविण्याचा प्रयत्न केला;

टीनचे डबे वाजवून त्यांना पिटाळण्याचा प्रयत्न केला; पण टोळ कांहीं कमी होईनात. रस्त्यावरून जाण्याचीहि सोय नव्हती. भरूर करून येत आणि हाताच्या अस्तनींत शिरत. मान खालीं घालून जरा पहावें, अितक्यांत कोटाच्या आणि सदऱ्याच्या गळपट्टीच्या आंत शिरून पाठीपर्यंत पोहोंचत. रस्त्यावर अुभ्या अुभ्या अंगांतील कोट काढून पायाच्या गुडघ्यांत धरून सदऱ्यांत घुसलेला टोळ काढावा लागे. अितक्यांत दुसरा न शिरला म्हणजे मिळवली ! रात्र पडल्यानंतर त्यांचीं पंखे जड होत. मग ते कोठें तरी जाअून बसत.

आतां लोकांनीं अेक रस्ता शोधून काढला शेताच्या किंवा वाडीच्या बाजूला अेक लांब चर खोदून रात्रीं त्यांत गवत पेटवून देत. ज्वाळा पाहून हे टोळ धांवून त्यांवर झडप घालीत आणि मरून जात. लहान मुलांनीं याच्याहि पुढें पाअूल टाकलें. त्यांनीं अेकादा टोळ पकडावा, त्याचे पाय तोडून त्याला विस्तवावर शेकावा आणि मटकावावा ! हें पाहून आम्हांला अशी कांहीं शिसारी येत असे ! गरीब लोकांनीं आपल्या घरांत टोळांचीं पोतीं भरून ठेविलीं.

टोळांचा हल्ला आतां नारळांच्या झाडांवर सुरू झाला. नारळाचे लांब बादशाही झांप अेका दिवसांत साफ होअूं लागले. आठदहा दिवसांत नारळाचीं झाडें तारखात्याच्या खांबासारखीं दिसूं लागलीं. तो देखावा पाहून रडावेंसें वाटे. शेतकरी आणि माळी लोक भयंकर चिंतेत पडले. "अेकाद्या वर्षी पाअूस न पडला तर अेका वर्षाचा दुष्काळ सहन करावा लागतो. आमच्या नारळी गेल्या. आतां दहा वर्षें अुत्पन्नाच्या नांवानें पूज्य." रस्त्यावर पहा कीं अंगणांत, शेतांत पहा कीं बगीच्यांत, जिकडे तिकडे टोळांच्या लेंड्या पसरलेल्या दिसावयाच्या. अेक जण म्हणाला, "लेंड्यांचें खत मोठें किंमती असतें." अेका म्हातारीनें अैकून रागानें म्हटलें, "जळो तुझें तोंड ! सोन्यासारखीं झाडें गेलीं आणि म्हणे, खत किंमती असतें ! वापरून पहा हें खत तुमच्या शेतांत. पेरलेल्या धान्याची राख होअून जाअील. हें काय खत आहे ? आग आहे आग !!"

अजूनहि टोळांच्या पलटणी येतच होत्या. मैलचे मैल या टोळांचे ढग पसरलेले असत. आणि हे सर्व अेकाच दिशेनें अुडत असत-जणू कुणाचा तरी हुकूमच घेअून आलेले आहेत.

प्रत्येक वस्तूला कधीं तरी शेवट असतोच. त्याप्रमाणें या टोळाच्या धाडीचाहि शेवटीं आपोआप अंत झाला. ते टोळ आले तसे गेले.

*अतिवृष्टिरनावृष्टिः शलभाः मूशकाः शुकाः*
*प्रत्यासन्नाश्च राजानः षडेता ईतयः स्मृताः*
*( स्वचक्रं परचक्रं च सप्तैता ईतयः स्मृताः )*

अतर मुलांपेक्षां मला पशुपक्ष्यांचें आकर्षण विशेष असे. कुत्रीं, मांजरे, चिमण्या, कावळे, वासरे, ससे, खारी, पोपट, अित्यादि कितीतरी प्राणी माझा वेळ घेत असत. घरच्या म्हशीची सेवा माझ्याच वांटयाला येअी. बैलाचे गळे खाजवणें, आणि त्यांच्या शिंगांच्या मधली जागा साफ करणें, हेंहि काम माझेंच. फुलबागामध्यें मी जात असें, तें फुलें आणण्यासाठीं का फुलपांखरें पहाण्यासाठीं, हें सांगणें कठीण आहे. पण माझें आवडतें जनावर तें मांजर.

मांजरें धन्याची खुशामत करतात. पण कधींहि स्वाभिमान घालवून बसत नाहींत. कुत्रीं अनार्य झालेलीं तुम्हांला दिसतील; पण मांजरे नेहमीं आपली संस्कृति आणि आपली प्रतिष्ठा संभाळून असावयाचीं. अेकादे दिवशीं प्यावयाचें दूध कमी असलें तरी त्यांतून माझ्या मांजराला थोडें दिल्यावांचून दूध पिणें मला रुचत नसे. लहानपणीं मीं प्रवास पुष्कळ केला. कोठल्याहि गांवीं जाअून पोहोंचलों कीं आठदहा दिवसाचे आंत आसपास मांजरे किती आहेत, कुणाचीं आहेत, याची बातमी अस्मादिकांना लागावयाची. मांजरांविषयींचा माझा पक्षपात अेकांतिक नव्हता. मी जेथें जाअून राही तेथील मांजरांना माझ्या राग-द्वेषाचा – दोहोंचा प्रसाद चाखावा लागे. मांजराला वेढा कसा घालावा, त्याला चोप कसा द्यावा, अेकाद्या खळग्यांत कांटे पस-

रून वर कागद किंवा पातळ काप्ड पसरून मांजराला खड्ड्यांत कसें पाडावें, इत्यादि सर्व कलांमध्यें मी पारंगत होतों.

मांजराला ठार केल्यास बारा ब्राह्मण मारल्याचे पाप लागतें, ही गोष्ट जर मला ठाऊक नसती तर माझ्या हातून मांजराची हत्याहि झाली असती. मांजराचे शेपटीवर पापाचे बारा काळे पट्टे असल्याचें पाहिल्यामुळें धर्मशास्त्र खोटें आहे असें मानण्याची सोय नव्हती.

कारवारला असतांना मीं अेक लहानसा बोका पाळला होता. मोठा गोजिरवाणा होता. त्या बाजूचेंच त्याला नाव असावें, म्हणून मी त्याला व्यंकटेश म्हणत असें. कर्नाटकाकडे मुली नकोशा झाल्या म्हणजे मुलीचें नांव सावित्री ठेवतात व मुलगे हवे असले म्हणजे त्याचें नांव व्यंकटेश ठेवतात. ( 'साकु सावित्री बेकु व्यंकय्या.' ) आमचा व्यंकटेश अेकादे वर्ष आमच्याजवळ राहिला असेल; शेवटीं त्याला अेका घुशीनें मारून टाकला ! मला तर माजरावांचून चैन पडेना. तेव्हां सगळें कारवार धुंडाळलें. अेकादे सुंदर मांजर दिसलें कीं तें ज्या घरांत शिरेल तेथील त्याचे मालकाजवळ त्याची मागणी करावयाची. पण अशा रीतीनें मांजर मिळतें थोडेंच ? "कित्येक लोक, माजर आमच्या संवयीची आहे, तुमचेकडे रहाणार नाहीं" असें गोडपणें सांगत आणि कित्येक अपमान करून काढून लावीत. शेवटी केशू, गोदू आणि मी अेका घराच्या आसपास पाळत ठेवून आम्ही अेका मांजराचें राक्षस पद्धतीनें हरण केलें.

माजर पकडावयाची म्हणजे कांहीं अशी तशी गोष्ट नव्हे. मांजराच्या नखांना आणि दातांना हत्यारबंदीचा कायदा अजून लागू झाला नाहीं. प्रथम अेक तर मांजर हातांत येणेंच मुष्किल. अितकेंहि करून तें पकडलेच तर गुर्र म्यांऊ करून तुम्हांला तें चावावयाचें किंवा तीक्ष्ण नखांनीं ओरबडा घ्यावयाचें. आम्हीं जवळ अेक पोतें बाळगीत असूं. तिघांनीं तीन बाजूला अुभें रहावयाचें. मांजर आटोक्यांत आलें कीं त्याच्यावर झडप घालावयाची आणि चटकन् त्याची मान पकडून त्याला वर अुचलावयाचें. मांजराच्या मानेची चामडी पकडून त्याला अुचललें तर त्याला त्रास होत नाहीं आणि तें पूर्णपणें कबजांत येतें. मानेच्या चामडीनें अुचललें कीं आपण सुरक्षित. तेथें त्याचे दांतहि पोहोंचत नाहींत आणि पायांचीं नखेहि पोहोंचत नाहींत. मागील पाय वर करून ओरबडा घेण्याचा तें प्रयत्न जरूर करतें. शरीराला आळोखे पिळोखे

चेवून सुटण्याचा प्रयत्नहि करतें. अननुभवी मनुष्य असला म्हणजे नखें लागण्याच्या भीतीनें तो मांजराला सोडून देतो. आणि अेकदां हातून सुटली कीं मनीबाअी पुन्हां हातांत यावयाची नाही.

आम्हीं मांजर पकडलें की अेका हातानें त्याची मान आणि दुसऱ्या हातानें त्याचे मागचे पाय बरोबर पकडून ठेवीत असूं. मग त्याला झटकन् पोत्यांत घालून पोत्याचें तोंड बंद करून देत असूं. मांजर असें कोंडलें गेलें म्हणजे तें बंगाली पद्धतीनें चळवळ करावयाचें. खूब आरडाओरडा करील, पोतें फाडून टाकण्याचा आव आणील. मांजराला पकडतांना कितीतरी वेळां माझे हातपाय रक्तबंबाळ झाले आहेत. पण अमुक मांजर पकडावयाचें ठरविल्यानंतर त्याला कधीं निसटूं दिलें नाहीं.

मांजर घरीं आणल्यानंतर आमचें पहिलें काम त्याला पोटभर खाअूं घालून घरच्या चुलीवर त्याचें नाक आणि कान घासण्याचें. समजूत अशी कीं, असें केल्यानें मांजर त्या चुलीला सोडून जात नाहीं. चुलीच्या आसपास राहातें आणि रात्रीं चुलींतील आग शांत झाल्यानंतर चुलींतच निजतें. कारण काहींहि असो, आमचीं मांजरे आमच्या चुलींतच निजत.

अेके दिवशीं अेक पांढरी शुभ्र मांजर मीं पाहिली. तिच्या शेंपटीवर काळे पट्टे नव्हते. असलें निष्पाप मांजर आपले घरीं असलेंच पाहिजे. ज्या बाअीचें तें मांजर होतें, तिचेजवळ मागावयाला जावयाची सोय नव्हती. तेव्हां तीन चार दिवसांची तपश्चर्या करून आम्हीं त्या मांजराचा कबजा मिळविला. घरीं आणल्यानंतर त्याला रहाण्यासाठी लाकडाच्या मोठ्या पेटीचे घर केलें. त्याला निजण्यासाठीं गादी तयार केली. फरनॅन्डिस् मुताराजवळ जाअून त्या पेटीला लहान लहान खिडक्या करून घेतल्या. मांजराच्या घराच्या खिडक्यांना आणि दरवाजांना लाल, पिवळ्या, हिरव्या काचांचीं तावदानें बसविलीं. निरनिराळ्या खिडकींतून मांजर निरनिराळ्या रंगाचें दिसे. मांजरालाहि आपले घर फार आवडले. पण दिवसें दिवस मांजर सुकूं लागलें. आणलें तेव्हां कसें गुबदुल होतें. आतां त्याचीं हाडें दिसूं लागलीं. हें सर्व पाहून आअीनें म्हटलें, "वेड्यांनों, हें मांजर जेथून आणलें तेथें परत सोडून द्या. नाहीं तर फुकट त्याची हत्या घ्याल. या मांजराला मासळी खाण्याची संवय आहे. आपला दूधभात त्याच्या काय कामाचा ?"

अितकें सुंदर मांजर ! अितक्या पुरुषार्थानें आणलेलें. त्याला सोडून देणें आमच्या

जिवावर आलें. आमच्या घरीं भांडीं घासणारी अेक बाअी होती. तिला आम्हीं सांगितलें, "रोज आम्हीं तुला अेक पैसा देत जाअूं. तुझ्या घरून आणून या मांजराला मासळी खावयाला घालीत जा." बस्स्. मासळीचा आहार मिळाला आणि मांजर पहिल्यासारखें हृष्ट पुष्ट झालें. आम्ही पण खूष झालों. पण थोड्याच दिवसांत हें सगळें प्रकरण वडिलांच्या कानीं पडलें. ते रागावले. "या मुलांना काय म्हणावें ? मांजराच्या नादीं लागून वेडे झाले आहेत. आणि ब्राह्मणाच्या घरांत मांजराला मासळी आणून घालीत आहेत." वडिलांच्या पुढें आमचें कांहीं चालण्याजोगें नव्हतें. तेव्हां मुकाट्यानें तें मांजर आम्ही मूळच्या ठिकाणीं सोडून आलों. घरीं त्या मांजराचें रिकामें झालेलें लाकडी घर पाहून आमचें मन कसें अुदास होअी.

तें मांजर गेले तेव्हां आम्हीं दुसरें आणले. जेवतांना शेवग्याच्या शेंगा चावून त्यांचा चोथा ताटाच्या बाहेर बाजूला ठेवला कीं हें मांजर तो चोथा चघळीत असे. आअी म्हणाली, "हेंदेखील मांसाहाराचें लक्षण आहे." पण आअीला आम्हीं साफ सांगितलें, "कांहीं झाले तरी हे मांजर आतां घरांत ठेवणारच. पहाना किती गोजिरवाणे आहे तें !" आअीनें परवानगी दिली. पण त्या मांजराचा ऋणानुबंध आमच्या घरीं नव्हता. अेकदां तें आजारी पडलें आणि मरून गेलें. त्याच्या अंतकाळच्या वेदना पाहून माझ्या पोटांत कसेंसेंच झालें. यापूर्वी मी मनुष्यांचीं आणि पशूंचीं शवें पाहिलीं होतीं. पण कोणत्याहि प्राण्याच्या अंतकाळच्या वेदना पहाण्यास हजर नव्हतो.

कारवारहून आम्ही थोड्या दिवसांसाठीं पुन्हां अेकदां सावंतवाडीला गेलों होतों. तेथें अेक मांजर रोज आमच्या घरीं येअी. आमचें जेवण लवकर होवो किंवा अुशीरा होवो, मांजरी आपली वेळेवर हजर. मी तिला पोटभर दूधभात घालीत असे. घरच्या लोकांना वाटलें, "दत्तूला मांजराचा नाद फार लागला आहे. यावर कांहीं अिलाज केला पाहिजे." शेवटीं विष्णूनें किंवा आण्णानें मांजरीचें नांव ठेवलें दत्तूची बायको. मांजरी घरांत आली म्हणजे सर्वांनीं म्हणावे "पहा, पहा, दत्तूची बायको आली." मी तिला खाअूं घालूं लागलों म्हणजे कोणी तरी म्हणावयाचे "पहा बायकोला कसा मायेनें खाअूं घालीत आहे !" मी लाजूं लागलों. मांजरीकडे सरळ दृष्टीनें पहाण्याचें मीं सोडले. पाहिलेच तर तिरप्या नजरेने चोरून पहावयाचें. बिचाऱ्या मांजरीला हें सर्व कसें कळावें ? आम्ही जेवायला बसलों कीं ती येअून माझ्या पाटाच्या शेजारीं बसे. ताटासमोरहि नव्हे. जर मीं वेळेवर तिला भात घातला नाहीं तर माझ्या

तोंडाकडे पाहून मान हालवून हालवून म्यांऊ म्यांऊ करावयाची. मंडळी याचीहि चेष्टा करूं लागली. शेवटीं मी मांजरीकडे न पहातां अेक मोठासा घांस तिच्यापुढे ठेवून देत असें. सर्वजण याचीहि चेष्टा करूं लागले. मांजरीला कांहीं न द्यावें तर ती भंडावून सोडी. त्याचीहि चेष्टा होअी. मांजरीला हांकून लावण्याचा प्रयत्न केला. पण त्यांतहि कांहीं यश आलें नाहीं. खरे म्हणावयाचें म्हणजे त्या मांजरीला हाकून लावणें माझ्या जिवावर येअी.

पुष्कळ दिवस अशा प्रकारचा त्रास सोसला. शेवटीं अेक दिवस ठरविलें कीं, "लोक हवें तें म्हणोत, शरण आलेल्याला मरण देअूं नये मांजरीनें काय गुन्हा केला आहे?" असा विचार करून मी सगळी लाजलज्जा बाजूला केली. अेके दिवशीं सगळ्यांसमोर जोरानें म्हटलें, "होय, होय. मांजरी आमची बायको आहे. आम्ही तिला खाअूं घालणार. रोज खाअूं घालणार. मायेनें आणि प्रेमानें खाअूं घालणार. आतां कांहीं बाकी राहिलें आहे? आणखी कोणाला कांहीं म्हणावयाचें आहे? ये, मांजरी ये, बस माझ्या शेजारीं." असें म्हणून मी तिच्या पाठीवरून हात फिरवूं लागलों.

मनुष्य चिडला आणि बिथरला म्हणजे सर्वच त्याला भिअूं लागतात. त्या दिवसापासून कोणीहि माझें किंवा मांजरीचें नांव काढलें नाहीं.

## सुरू पार्क

४८

मोठेपणीं हिमालयाची यात्रा करतांना धरासूच्या पुढें जन्नोत्री रस्त्यावर अेके दिवशीं दुपारीं अेका अशा कांहीं विचित्र जंगलामध्यें मी पोहोंचलों होतों कीं, आसपास दूरपर्यंत कोठेंहि मनुष्यवस्ती नसतांना देखील मला वाटूं लागलें कीं, येथेंच माझें घर आहे. या जन्मीं किंवा पूर्वजन्मीं येथें मी पुष्कळ राहिलों आहें. या अद्भुत अनुभवाचे किंवा भावनेचें कारण शोधून काढण्याचा मीं पुष्कळ प्रयत्न केला. पण अजूनहि कांहीं कारण किंवा संबंध हातीं लागला नाहीं. मनांत अेक शंका येते, कीं, लहानपणीं कारवारजवळ सुरूच्या झाडांचें अुपवन मीं पाहिलें होतें, त्याची तुलना येथें सुप्त मनांत अुत्पन्न झाली असेल. निश्चितपणें कांहींच सांगतां येत नाहीं. कारवारच्या त्या सुरू पार्कचा माझा प्रथम परिचय असा आहे.

अेके दिवशीं भाअू (केशू) आणि मी असे दोघेजण समुद्राच्या वेळेवर (किनाऱ्यावर) फिरावयास निघालों. दिवस रविवारचा होता. आणि आम्ही दोघेहि तरंगी गडी ! निघालों साडेतीन वाजतांच समुद्राच्या बाजूला. डाव्या बाजूला फार दूर जाणें शक्य नव्हतें. फार फार म्हणजे पोस्ट ऑफीसपर्यंत जातां येअी. आणि आम्हांला तर खूप रखडावयाचें होतें. म्हणून आम्हीं अुजव्या बाजूचा किनारा पकडला. वाटेंत रेती दबली जाअून साफ झालेल्या जमिनीवर हातांतील

काठीनें मीं कितीतरी वचनें लिहून काढली; पण थोडासा वारा येतांच लिहिलेलें सर्व सुटून जाअी. कोऱ्या रेतीमध्यें चालतांना देवील थकल्यासारखें होअी. यामुळें पाय आपोआप ओल्या रेतीकडे चालले. ओल्या रेतीवर लिहिण्याचा आनंद कांहीं औरच होता. आम्ही काय लिहीत असूं ? 'महाराजाधिराज गो-ब्राह्मण-प्रतिपालक छत्रपति श्रीशिवाजीमहाराजकी जय !' लांब लचक ओळ लिहितांना आणि मग ती वाचताना केवढा अभिमान वाटे ! थोडें पुढें जाऊन आम्हीं लिहिले, 'अिंग्रज लोक आपले शत्रू आहेत; त्याना मारलेंच पाहिजे.' मोरोपंताची अेक आर्या मीं अशीच वाळूंत लिहून काढली होती. ती आज देखील स्पष्ट आठवते. कारण ती लिहिण्यात बराच वेळ गेला होता. ती आर्या अशी—

*गरुड जसा गगनातुनि वेगें अुतरोनि पन्नगा झडपी ।*
*तैसा भीम बळानें दुःशासनकंठ अंघ्रिनें दडपी ॥*

माझी आर्या वाचून भाअूनें ताबडतोब तिच्या खाली दुसऱ्या ओळीच्या अैवजी खालीलप्रमाणें ओळ लिहिली—

*तैसा भट्ट बळानें अुन्ह अुन्ह पोळ्या तुपामधें दडपी !*

भट्ट महाशयांना अुन्ह अुन्ह पोळ्या तुपाबरोबर खावयास तेथेंच बसवून आम्ही पुढें चाललों. शिंपा गोळा कराव्यात, चांगल्या कोणत्या, वाईट कोणत्या, याची चर्चा करावी. जास्ती चांगल्या मिळाल्या म्हणजे जुन्या फेकून द्याव्यात आणि मन भडकेल त्याप्रमाणें वाटेल त्या गोष्टी कराव्यात. असें करीत आम्ही खूप दूर गेलों. तेथें पूर्वी कधींहि न पाहिलेलें असें अेक नितान्त रमणीय दृश्य आम्हीं पाहिले. अेक प्रसन्न गंभीर नदी समुद्राला येअून मिळत होती सागर-सरिता-संगम म्हणजे मूर्तिमंत काव्य. असा संगम जेव्हां आपण प्रथमच पहातों तेव्हां त्या काव्याचा जणूं कैफ चढतो. संगमाची शोभा पहातां पहातां सूर्यास्त होण्याची वेळ झाली. मग काय विचारतां ! सोनेरी रंग सर्वत्र पसरला. झाडावर देखील हिरव्या सोनेरी रंगाची कान्ति पसरली. समुद्र तर जणु सोन्याच्या रसाचे सरोवर भरून अुतूं जात असावें तसा शोभूं लागला. या अुपमा आज सुचतात. त्या वेळचें मुग्ध हृदय अशा अुपमांच्या द्वारें अन्तरींच्या भावाला पाट फोडून भार हलका करूं शकत नव्हतें दुःखाचा वेग हलके करणें जितकें आवश्यक असतें, तितकीच आवश्यकता आनंदाची अूर्मि शमविण्याचीहि असते. अन्यथा आनंदाचा कैफ अनिवार होअून गुदमरल्या-सारखें होतें.

वेळ किती होअन गेला याचें भान, न राहिलें केशूला, न राहिलें मला. जेथें आम्ही उभे होतों तेथें अेका बाजूला होता समुद्र आणि दुसऱ्या बाजूला होतें सुरूचें गाढ जंगल. भरती वाढली आणि समुद्राच्या लाटा सुरूच्या झाडांचें पादप्रक्षालन करूं लागल्या. आतां परत कसें जावयाचें ! हिंमत बाळगून कांठाकांठानें थोडें परत चालून पाहिलें; पण लाटा अुल्हासांत होत्या. पाणी वाढूं लागलें. दाट झाडीमधून रस्ता निघेल अशी आशाच नव्हती. पाण्यांतून जावें तर तें वाढत होतें. पुढें किती वाढेल याची कल्पना नव्हती. आम्ही गोंधळलों. भाअू मजकडे पाहूं लागला आणि मी त्याचेकडे. अस्ताला जाणाऱ्या सूर्याचा चेहरा पाहण्याचा आनंद कुठें आणि आतां गोंधळलेल्या आमच्या दोघांच्या मुखदर्शनाची विचित्रता कुठें ! बरीच भवति न भवति केल्यानंतर आम्हीं ठरवले कीं आलेल्या रस्त्याने परत जातां यावयाचें नाहीं; तेव्हां नदीच्या कांठाकांठानें आंत शिरावें. पुढें जें व्हावयाचें असेल तें होवो. नदीचें पाणी देखील भरतीमुळें वाढत होतें; कारण ती खाडी होती. समुद्रकिनाऱ्या-वरील पाणी सरळ अंगावर अुडत होतें. त्यापेक्षां हे कांहीं बरें होतें. दगडापेक्षां वीट मअू या न्यायानें आम्हीं हाच रस्ता पसंत केला. आणि नदीच्या कांठाकांठानें बरेच चाललो जसजसे आम्ही आंत गेलों, तसतसें आतां अुजव्या बाजूस असलेलें सुरूचें जंगल घनदाट होअूं लागलें. प्रकाश वाढणें शक्यच नव्हतें.

संध्याकाळचा ओझरता प्रकाश गमगीन आणि गंभीर असतो. अशा वेळीं सर्व गूढभाव जागृत होतात. म्हणूनच प्राचीन ऋषीनीं संध्याकाळीं व्यवहारांतून मुक्त होअून ध्यान चिंतनामध्यें मग्न होण्याचें विधान केले असावें. संध्यासमयीची गंभीरता, मध्यरात्रीच्या गंभीरतेपेक्षांहि अधिक खोल असते. कारण संध्याकाळचा काळोख वर्धमान असतो. मध्यरात्रीं तो स्थिरावलेला असतो.

पुढें गेल्यानंतर अुजव्या बाजूला अेक पायवाट दिसली. या वाटेनें गेल्यास शेवटीं कारवार आलें पाहिजे याविषयी शंका नव्हती. पण ही वाट जगलांतून आरपार पोहोंचेलच याची खात्री कुणी द्यावी ? आणि या सुरूच्या जंगलातून, अंधारांतून रस्ता कापावा कसा ? या रस्त्यानें जाणें शहाणपणाचे नाही असें मीं ठरविलें. मीं भाअूला निक्षून सांगितलें कीं, "या रस्त्यानें मला यावयाचें नाही. आपण असेच किनाऱ्या किनाऱ्यानें वर जाअूं. कोठें तरी अेखादी झोंपडी किंवा घर मिळेलच. रात्र तेथेंच काढूं. सकाळचा प्रश्न सकाळीं." भाअू म्हणाला, "तुला कल्पना नाहीं दत्त, आपण जर घरी गेलों नाहीं तर घरीं सर्वजण किती काळजी करतील याचा विचार

कर. सगळेच आपला शोध करीत सबंध रात्र रखडतील. आपण समुद्रांत बुडालों अशीहि कल्पना करतील. कसेंहि करून परत हें गेलेंच पाहिजे." भाऊची गोष्ट खरी होती. शेवटी आम्हीं हिंमत केली आणि त्या गहन कान्तारांत प्रवेश केला.

सुरूखेरीज दुसरें झाड औषधाला मिळेल तर शपथ. सुओसारख्या त्यांच्या बारीक लांब पानांमधून स्स्स्सो असा लांब आवाज ही झाडें दिवस रात्र काढीत असतात. आम्ही अनवाणी चालत होतों. धांवत होतों म्हटलें तरी चालेल. वाटेवर सुरूचीं कांटेरी फळें जिकडे तिकडे पसरलीं होतीं. वाढता अंधार, वाऱ्याचा भीषण आवाज, कांटेरी फळें असलेला रस्ता आणि घरीं काय चाललें असेल याची चिंता, अशा सरंजामानिशीं आम्ही चाललों. अर्धा रस्ता संपवला असेल, इतक्यांत सर्वत्र अंधारच अंधार झाला. आम्ही गोंधळलों होतों; पण दोघांतून अेकहि घाबरला नव्हता. अशा प्रसंगामध्यें साहसाचें जें अद्‌भुत काव्य असतें त्याचा आस्वाद न घेण्याअितके आम्ही अरसिक नव्हतों. पायांना दुप्पट वेग दिला आणि शेवटीं आम्ही सहीसलामत म्युनिसिपालिटीच्या हद्दींत जाऊन पोहोंचलों.

पुढें कसलीच अडचण उरली नाहीं पण रस्त्यावरील म्युनिसिपालिटीचे दिवे डोळ्याला खुपूं लागले. हे नसते तर बरे असेंच वाटत होतें. घरीं पोहोंचलों, तिथें सर्व आमची वाट पहात होते. स्वयपाक थंड झाला होता. आम्हाला शोधायला अजून कोणी बाहेर गेलें नव्हतें. चोरासारखे घरांत जाऊन, हातपाय धुवून आम्ही पाटावर जाऊन बसलों.

त्या रात्री जंगलाचीं स्वप्नें पडलीं किंवा नाहीं याची आतां आठवण नाहीं.

शिक्षणाच्या नेहमींच्या सर्व विषयांत गणित हें कांहींसें निराळें पडतें. हायस्कूल–कॉलेजमध्ये माझे गणित पहिल्या पंक्तीचें असे. या विषयाचा प्रथम मला कसा परिचय झाला यांचें स्मरण आजहि ताजें आणि स्पष्ट आहे.

साताऱ्यांत जेव्हां प्रथम शाळेला जाऊं लागलों, तेव्हां शंभरपर्यंत अंक लिहायला शिकण्याचेंच काम होतें. पाढे मी केव्हां शिकलों यांचें मला नीटसें स्मरण नाहीं. पण अेवढें आठवतें कीं संध्याकाळीं शाळा संपत आली म्हणजे आम्ही सर्व मुलें हेल काढून पर्वचा म्हणत असूं. जेव्हां शाळा नसे तेव्हां संध्याकाळीं किंवा निजण्यापूर्वी वडिलांचे समोर बसून मला पर्वचा म्हणावा लागे. पुष्कळदां पर्वचा बोलतां बोलतांच झोप येअी आणि तोंडांतले शब्द तोंडांतच राहून जात. परंतु आंकडे आणि पाढे म्हणजे कांहीं गणित नव्हे. गणिताला खरी सुरुवात कारवारच्या मराठी शाळेंत झाली. सखाराम मास्तर म्हणून अेक असंस्कारी, अहंमन्य आणि आळशु वाणी आम्हांला शिकवीत असे. स्वतः कधीं शिकवावयाचा नाहीं. तिम्माप्पा म्हणून अेक हुशार विद्यार्थी आमच्या वर्गांत होता तोच आम्हांला बेरीज शिकवीत असे. त्या काळीं गणिताची बुद्धि माझ्यांत अुगवलीच नव्हती. त्यामुळें मला वर्गांतील कांहींच समजत नसे. आम्ही सर्व मुलें ओळीनें अुभीं रहात असूं. शिक्षक किंवा तिम्माप्पा दोन तीन

किंवा चार संख्या आम्हांला सांगत तेव्हां त्या आम्ही पाटीवर लिहून घेत असूं. "आतां या संख्यांची बेरीज करा" असा हुकूम सुटला म्हणजे सर्व संख्यांच्या खालीं आडवी अेक रेघ ओढून त्याच्याखाली मनांत येतील तसे आंकडे मी लिहून काढी. आंकडे मोजण्याची पंचाअीत मजजवळ नव्हतीच. त्यामुळें चुकून देखील बेरीज बरोबर येण्याची भीति नव्हती. बिचारा तिम्माप्पा माझी चूक कोठें आहे ती शोधून काढून मला समजावण्यासाठीं येत असे. पण जिथें हिशेबच करण्याचा प्रश्न नव्हता तिथें चूक तरी कशी सांपडावी ?

तिम्माप्पा स्वतःच्या शक्तीप्रमाणें अुदाहरण मला समजावण्याचा प्रयत्न करी. परंतु माझ्या डोक्यांत गणिताची खिडकीच नव्हती कीं ती अुघडेल ! तेव्हां तो तरी काय करणार आणि मी तरी काय करणार ?

तरीहि त्याचा धीर खचला नाहीं. मी अुदाहरण करूं (?) लागलों म्हणजे तिम्माप्पा माझे मागें येअून अुभा राही. त्याला पहिली बातमी ही लागली कीं अुजवीकडून डावीकडे बेरीज करीत जाण्याच्या अैवजीं मीं सरळ डाव्या बाजूकडून अुजवीकडे आंकडे मांडीत जात असें. तो म्हणाला, "असें करावयाचें नसतें. बेरीज अेकंपासून करावयाची असते. अुजवीकडून डावीकडे गेलें पाहिजे." माझी याला कोठें हरकत होती ? दुसऱ्याच अुदाहरणांत त्याप्रमाणें मीं सुधारणा केली. आपलें काय जातें ? आंकडे अुजव्या बाजूनें सुरू करून डाव्या बाजूकडे लिहूं लागलों. कांहीं तरी आंकडे मांडावयाचे त्यांत अडचण कोणती ? मी सहजासहजीं सव्यसाची झालों. पण यामुळें माझी अुपाधि अुलट वाढली. मीं अेकादा आंकडा लिहिला म्हणजे तिम्माप्पानें विचारावें, "अरे, हा आंकडा कसा आला ? मला बेरीज करून दाखीव." कठिण प्रसंग आला म्हणजे मनुष्याला कांहींतरी युक्ति सुचतेच. मी तिम्माप्पाला म्हणालों, "तूं माझ्यामागें अुभा राहून माझ्या अुदाहरणावर नजर ठेवतोस म्हणून मी गोंधळून जातों. मग मला कांहींच आठवत नाहींसें होतें." अिलाज रामबाण झाला. त्यानें माझें नांव घेणें सोडून दिलें.

वजाबाकी, गुणाकार, भागाकार मी पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत शिकलों. येथें माझीं अर्धी अुदाहरणें बरोबर येत. गणिताच्या चारहि विधींची रीत मी शिकलों. पण माझ्यांत अजूनहि गणित असें अुगवलें नव्हतें. पुढें आली अुतरती आणि चढती भांजणी. पुन्हां कारवारला गेलों असतां घनश्याम मास्तरांच्या हाताखालीं मला ती शिकावी लागली. घनश्याम मास्तर आणि सखाराम मास्तर अेकाच माळेचे मणी.

घनश्याम मास्तर देखील असंस्कारीच होता. पण आळस करण्याच्या कामांत कांहींसा कच्चा. त्यामुळें वर्गांत बरींचशीं अुदाहरणें होअूं शकत. व्यवहारी अपूर्णांक आणि त्रैराशिक शिकतांना मी शहापूरच्या मराठी शाळेत होतों. तिकडील माधवराव मास्तर तिनअीकर गणितामध्ये अतिशय हुशार. त्यांनीं मला फार त्रास दिला. त्यांचें गणित अुत्तम होतें. पण विद्यार्थी-मानस म्हणून कांहीं पदार्थ असतो हें त्यांच्या स्वप्नींहि कधीं आलें नसेल. त्याचें विद्यार्थ्यांवर पुष्कळ प्रेम असे. विद्यार्थ्यांनीं पुष्कळ शिकावें अशी त्यांना हौस असे. त्यांची ती हौसच मला नडली. मास्तर जर बेदरकार असते तर मी सुखी झालों असतों. पण माधवराव अेकाहि मुलाला सोडीत नसत. कधीं कधीं सुट्टीच्या दिवशीं मुलांना घरीहि बोलावीत. त्याचें घर आमच्याच गल्लींत ( आळींत ) होतें. तेव्हा गेल्याबाचून गत्यंतर नसे.

थोडेंसें विषयांतर करून याच काळचा माझा अेक अनुभव येथें नमूद केला पाहिजे. माधवराव मास्तर त्यांच्या सनातन शिक्षण-पद्धतीला अनुसरून वर्गांत निरनिराळे प्रश्न विचारीत. अेका मुलाला अुत्तर आठवलें नाहीं म्हणजे त्याच्या खालच्या मुलाला विचारावयाचें. त्याला न आलें तर त्याच्या खालच्या. असें करतां करतां ज्याचें अुत्तर खरें असेल तो त्या सर्वांच्या वर जाअून बसे. ही वर चढविण्याची पद्धत चांगली असो किंवा वाअीट, आमच्या अंगवळणी पडली होती. पण तिनअीकर मास्तरांचा रिवाज याच्याहि पुढें जाअी. अुत्तर बरोबर असलेला विद्यार्थी जितक्या मुलांवर विजय मिळवून वर जाअी, त्या प्रत्येकाचें नाक डाव्या हातानें धरून अुजव्या हातानें अेक अेक थोबाडींत मारण्याचा त्याला हुकूम होअी. हा जंगली प्रकार आमच्या मास्तराअितकेच जंगली असलेले कांहीं विद्यार्थी फार पसंत करीत. पण बाकीच्या सगळ्यांना त्याचा त्रास वाटे. विजयी मुलानें हरलेल्या मुलाला न मारलें तर रोमन लोकांनीं कुस्ती खेळणाऱ्या ग्लॅडीअेटर लोकांना शिक्षा करावी त्याप्रमाणें आमचे हेडमास्तर ( माधवराव मास्तर शाळेचे हेडमास्तर होते. ) चिडून जात आणि विजयी मुलालाच चोप देत. अेकदां गोंदू आणि मी अेकाच वर्गांत मराठी चौथींत अेकत्र आलों. गोंदू वर बसला होता, मी खालीं बसलों होतों. माधवराव मास्तरांनीं गोंदूला कायसा प्रश्न विचारला. त्याला तो येअीना. मीं ताबडतोब अुत्तर दिलें आणि आनंदानें गोंदूच्या वर जाअून बसलों. अितक्यांत माधवराव मास्तर म्हणाले, "असें जाअून बसतां कामा नये. मोठा भाअू असला म्हणून काय झालें ? त्याचें नाक धरून त्याच्या थोबाडींत मार आणि मग वर जा." मी म्हणालों, "माझ्यानें तें होणार

नाहीं " मास्तर रागावले. म्हणाले, " मोठा आला आहे रामाचा भाऊ लक्ष्मण ! " मी तसाच उभा राहिलों. माधवरावांना आतां धर्मचर्चा सुचली. ते म्हणाले, " वडील भावाचा अपमान करण्यांत अधर्म होतो; आणि गुरूची आज्ञा मोडतांना अधर्म होत नाहीं काय ? " आतां काय करावे ? मनांत विचार आला, " घरीं गोंदूशीं कितीदां तरी भांडतों आणि मारामारी करतो. अिथे त्याच्या थोबाडींत मारण्यास हरकत काय ? गुरु वडिलासमान. त्यांची आज्ञा मोडतां कामा नये " मीं गोदूचें नाक पकडले पण अुजवा हात चालेचना. गोंदूची मुखमुद्रा पाहूनच मी कावराबावरा झालो. मी गोदूचें नाक सोडून दिलें आणि मास्तरांना म्हणालों, " मला वरचा नंबरच नको. मी खाली बसावयास तयार आहें. " माझी अडचण, मनांत चाललेला गोधळ, किंवा माझी भावना समजण्याअितकी शक्ति माधवरावांमध्ये नव्हती, यांत त्या बिचाऱ्यांचा काय दोष ? त्यांनीं मला जवळ बोलावून गरम गरम छडी चमकावली. छडी खाअून रडत रडत मी आपल्या जागीं जाअून बसलों. या वेळीं गोंदूला काय वाटत असेल याची कल्पना मला होती. यामुळें मी त्याचेकडे पाहिलेंच नाहीं आणि मनांत नक्की केले, की यापुढें आतां रोज शाळेला अुशीरानें जाअीन. तसें करणें मला मुळीच कठिण नव्हतें. अेकादा तास वर्गात अुभें रहावें ल'गलें तरी तें पत्करले पण शेवटचा नंबर खात्रीने मिळेल. आणि अेकाहि प्रश्नाचें अुत्तर मी देणार नाहीं. असे केलें म्हणजे कोणाच्या थोबाडीत मारावयाला नको. आणि कोणाच्याहि-कडून थोबाडीत खायला नको. या निश्चयाप्रमाणें मी शेवटपर्यंत वागलों असल्याचें माझ्या आठवणीप्रमाणें सांगतां येत नाही. पण गोदूचा अपमान करण्याचा प्रसंग पुन्हां कधीहि माझ्यावर आला नाहीं हें निश्चित !

माझ्यामध्यें गणितबुद्धि जागृत झाली ती अिंग्रजी पहिल्या अियत्तेत. जोशी म्हणून आमचे अेक मास्तर होते. आम्ही त्यांना वाकसकर किंवा अशाच कांहीशा नांवानें ओळखत असूं ते सही मात्र जोशी म्हणूनच करीत. त्यांनीं आम्हांला त्रैराशिकाचें रहस्य अुत्तम समजावून दिलें. त्यांनो समजावले कीं गणित म्हणजे जगांतील रोजचा साधा व्यवहार आहे. हा व्यवहार बरोबर समजला म्हणजे बाकी सर्व त्रैराशिकच आहे. याच वर्गात माझा गणिताचा पाया मजबूत झाला. मला गणिताचें स्वरूप समजलें. आणि तेव्हांपासून अुदाहरणें सोडविण्यामध्यें असलेल्या गणितानंदाचा आस्वाद मी चाखूं लागलों. माझीं सगळीं अुदाहरणें बरोबर येत. माझ्यामध्यें आत्मविश्वास अुत्पन्न झाला. आणि तेव्हांपासून वर्गातील कच्च्या मुलांना

गणित समजावण्यांत आणि उदाहरणें सोडविण्यांत मी मदत करूं लागलों. खाजगी वेळांत वर्गांतील मुलांना केवळ हौसेनें गणित शिकविण्याचें काम कॉलेजच्या इंटर परीक्षेपर्यंत अव्याहत केलें. पुढें मात्र गणिताचा माझा संबंध तुटला.

## माझ्या अुपदेश

५०

अिंग्रजी दुसऱ्या अियर्तेत असतांना मी कारवारच्या हिंदु स्कूलमध्यें गेलों. तेथील अुत्साही मास्तर आमचें गणित दुसरींतच अिंग्रजी भाषेंतून चालवीत असत. मला त्यांतील कांहींच समजेना; कारण हा प्रकार मला अगदींच नवा होता. वर्गांतील जुन्या झालेल्या विद्यार्थ्यांनीं भाषा नीट न समजतांच अुदाहरणांचा अर्थ अनुमानानें बसविण्याची कला प्राप्त करून घेतली होती. माझें गणित ठीक होतें; पण भाषा समजत नसल्यामुळें मी पंगु झालों होतों आम्ही मुलें खासगी अभ्यासाला बसलों म्हणजे अुदाहरणांचा अर्थ मुलें मला समजावून देत आणि मग तें अुदाहरण कसें सोडवावें हें त्यांना मीच शिकवीत असें.

शाळेंत दाखल होअून थोडेच दिवस झाले असतील; अितक्यांत आमची सत्रान्त परीक्षा आली. मला आशा होती कीं गणितांत मी पहिला येअीन; पण झाले अगदींच अुलट ! गणितांत मला सात किंवा दहाच गुण मिळाले. अितर मुलांचे पेपर मीं पाहिले. कित्येक मुलांचीं अुत्तरें चुकीचीं होतीं; पण अुदाहरण सोडविण्याची रीत बरोबर असल्यामुळें त्यांचें अुदाहरण अर्धें बरोबर ठरून शिक्षकांनीं त्यांना कांहीं गुण दिले होते. हें पाहून मला आशा सुटली कीं, मलाहि असे मार्क मिळतील. नापास झाल्याचा आघात तर होताच; पण निराशेंत देखील आशा मनुष्याला शेवटपर्यंत

असते. मी शिक्षकांजवळ गेलों. रडकुंडीस तर आलों होतोंच. मी त्यांना म्हणालों, " तुम्हीं कितीतरी मुलांना उदाहरणें अधीं बरोबर दिलीं आहेत. मला देखील त्याचप्रमाणें कांहीं मार्क मिळण्याजोगे आहेत. " माझे म्हणणें शिक्षकांना बरोबर समजलें नाहीं. ते चिडून म्हणाले, " माझ्या निर्णयाविरुद्ध तक्रार करतोस, होय ? आणि माझेवर पक्षपाताचा आळ घेतोस ? मी तुझा पेपर नाहीं पहात, जा. " मी दीन होऊन पुन्हां अेकदां म्हणालों, " असें नव्हे; पण माझे हें उदाहरण पुन्हां अेकदां पहाल तर बरें. " त्यांनीं माझेकडून माझा पेपर घेतला आणि रागानें दूर फेकून दिला. माझ्या डोळ्यांतून पावसाळा सुरू झाला.

सकाळचा अकराचा सुमार असेल, वाहत्या गंगा-यमुना घेऊनच मी घरीं पोहोंचलों. आंघोळ, जेवण कोठून सुचणार ? अेका कोपऱ्यांत बसून मी स्फुंदन रडूं लागलों. तेथें भाऊ आला. (केशूला आतां आम्ही भाऊ म्हणूं लागलों होतों.) त्यानें काय आहे म्हणून विचारलें. बोलण्याचा जों जों प्रयत्न करावा तों तों रडण्याचा हुंदका अनावर होअी. खालचा ओठ अगदीं खालीं वांकून गेला होता. भाऊनें मला शांत करून पुन्हां विचारलें कीं काय झालें ? मीं त्याला सगळें सांगितलें त्यानें अतिशय प्रेमानें माझा पेपर तपासून पाहिला. मग तो म्हणाला, " तुझ्या मास्तरानें पक्षपात केला किंवा नाहीं या गोष्टीचा मी विचार करीत नाहीं पण उदाहरणें अधीं खरीं समजण्याची पद्धतीच चुकीची आहे. या चुकीच्या रिवाजामुळें अितर मुलांना जास्त मार्क मिळाले म्हणून काय झालें ? तुझ्यासारख्याला असल्या भिक्षेच्या मार्काची आशा बाळगतांना लाज वाटली पाहिजे. आणि समज, अेक दोन उदाहरणें अधीं खरीं धरून तुला त्यांनीं मार्क दिले असते तरी त्यांची बेरीज कितीशी झाली असती ? मला नाहीं वाटत पंधरासतराहून अधिक मार्क तुला मिळाले असते. मग दहा मार्कानीं नापास झालास काय आणि सतरा मार्कानीं नापास झालास काय, नापास झाल्याची फजिती सारखीच. तूं नापास झाल्याबद्दल मला कांहींच वाटत नाहीं; पण दयेच्या मार्काची तूं आशा केलीस याची मात्र लाज वाटते. "

हें अैकून मी असा कांहीं खजिल झालों कीं, रडण्याचेंहि विसरलों. जेवण आटोपल्यानंतर भाऊनें मला पुन्हां बोलावलें आणि म्हटलें, " तुझें गणित तर चांगलें होतें. मग आतांच असें कसें झालें ? " पुन्हा गंगा यमुनेला पूर आला. तें पाहून भाऊनें मला जवळ बसवून घेतलें. माझ्या हुशारीची थोडीशी स्तुति केली आणि आंजारून गोंजारून पुन्हां त्यानें तोच प्रश्न विचारला. मी रडत रडत म्हणालों, " येथें सगळें

अिंग्रजीतच चालतें. मला तें समजत नाहीं. गणिताचा अर्थ अुलटा केल्यानंतर गाडें चालावें कसें ?" भाअू म्हणाला, "हात्त्याच्या ! अेवढेंच ना ? चल; तुला अुद्यांपासून मी अुदाहरणांचा अर्थ सांगत जाअीन. मग कांहीं हरकत आहे ?" भाअूनें माझेवर चांगली मेहनत घेतली. मला मदत हवी होती ती अर्थापुरतीच. आणि हिंदु स्कूलच्या प्रतापानें माझें अिंग्रजीचे ज्ञानहि थोडया दिवसांत चांगले वाढलें. मग काय ? मी गणितांत पहिला येअूं लागलो. हरिमास्तरना आश्चर्य वाटलें कीं, हा मुलगा गणितांत पाहतां पाहतां कसा सांवरला ? त्यांना काय कल्पना कीं गणितांत मी कच्चा नव्हतोंच. अुलट गणित माझा खास विषय होता. मला नडत होतें तें अिंग्रजीच. गणितांत माझी प्रगति पाहून ते खूष झाले आणि माझें हक्काचें स्थान मिळवून मी खूष झालों.

भाअूची मदत मला फारच अुपयोगी पडली. पण दयेचा लोभ न बाळगण्याचा त्याचा अुपदेश त्याहून अधिक महत्त्वाचा होता. हें त्या वेळीं देखील माझ्या ध्यानांत येअून चुकलें होतें.

## जगन्नाथ बुआ



जगन्नाथ बुआ हे जुन्या काळच्या संस्कारी हरिदासवर्गाचे अेक प्रतिनिधि होते. हरिदासांचा वर्ग म्हणजे जुन्या संस्कृतीचा प्रचारक सेवकवर्ग. धर्मप्रवचन, कथा-प्रसंग, संगीत आणि मनोरंजन या सर्व तत्त्वांचें लोकभोग्य संमिश्रण करणारा हा हरिदासांचा वर्ग महाराष्ट्रांतच विशेषतः दिसून येतो. यांच्या कीर्तनाला लोकांची नेहमींच गर्दी असते. रात्री लवकर जेऊन खाऊन लोक कीर्तनासाठीं मंदिरांत जातात. हरिदास बुआंच्या कीर्तनांत प्रथम पूर्वरंग असतो. यामध्यें अेकादे धार्मिक वचन घेऊन त्याचें सोपपत्तिक पण चटकदार असें विवरण चालतें. अुत्तररंगामध्यें त्याच सिद्धान्तांचें किंवा ब्रह्म-निरूपणाचें स्पष्टीकरण करणारे अेकादे पौराणिक आख्यान रसाळ वाणीनें आणि काव्यमय पद्यांच्या गायनाबरोबर चालविण्यात येतें. घटकेंत वार्ताकथनाची वर्णनात्मक शैली प्रगट होते. दुसऱ्याच घटकेला संभाषणाचा अभिनय खुलूं लागतो. त्यांतूनच चतुर वार्तालाप आणि कोटीवर कोटया चालून चातुर्य आणि विनोद यांची झड लागून जाते. थोडया वेळानें कारुण्याच्या अनिरुद्ध प्रवाहांत सर्व श्रोतृवृंद ओल्या डोळ्यांनीं वाहूं लागतो. कीर्तनाची ही संस्था लोकशिक्षणाचें काम फारच अुत्तम रीतीनें करीत असे. कांहीं हरिदासांनीं ऐतिहासिक आख्यानें घेऊन राजकीय, सामाजिक चर्चा देखील या कीर्तनांतून आणण्याचा प्रयत्न केला आहे. तरीहि ही संस्था आतां मोडकळीस येअूं लागली आहे असेंच म्हटलें पाहिजे. अेका

बाजूनें लोकांना व्याख्यानाची गोडी लागली; दुसऱ्या बाजूनें नाटकें, सिनेमा आणि ग्रामफोन बोकाळलीं. पण सामान्य जनतेसाठीं सर्वांगीण शिक्षण मिळवून देण्याचें काम या संस्थेनें अजूनहि करण्याजोगे आहे. सत्पुरुष धर्माला जबाबदार राहून पूर्वीची परंपरा न तोडतां आणि सामाजिक दोषांवर निर्भयपणें कोरडे ओढून ही संस्था जर भविष्यकाळची मानसिक तयारी करण्याचें काम खेडोंखेडीं पसरील तर अझूनहि या संस्थेचें भविष्य उज्ज्वल आहे असें म्हणतां येईल. भाट, चारण आणि गोंधळी यांच्या संस्थेमध्यें जोम असे. शौर्यवीर्याला खुराक मिळत असे. पण अितर संस्कारितेला तेथें वाव बेताचाच. पुराणिकांच्या कथा-पुराणांपेक्षां हरिदासांचें कीर्तन अधिक लोकप्रिय असे. घरांत कोंडून राहिलेल्या निरक्षर स्त्रियांना तर कीर्तन म्हणजे मोठीच मेजवानी. भावनाप्रधान पण क्षीणबुद्धि अशा कित्येक बाया धर्मवेडामुळें अशा हरिदासांच्या मागें वेडाअून गेल्याचींहि अुदाहरणें आहेत.

कारवारला जगन्नाथ बुआ आमच्या शेजारी येअून राहिले. तब्बल अेक महिना राहिले असतील. त्यांची राहणीकरणी शुचिर्भूत आणि व्यवस्थित. आणि वर्तन निर्मळ, निष्पाप, अशी त्यांची माझ्यावर छाप आहे. आमच्या घरीं येअून ते तासचे तास बसत. व्युत्पत्तीमध्ये चांगलेच प्रवीण होते. त्या वेळीं मी अिंग्रजी दुसरींत होतों. आमचें गणित चालत असे. जगन्नाथ बुआंना गणिताची गोडी विशेष होती. अेके दिवशीं माझें अेक उदाहरण अडलेले पाहून त्यांना अवसान आलें आणि ते माझ्या मागे लागले. सकाळीं, दुपारीं, संध्याकाळी केव्हांहि मी रिकामा राहिलों म्हणजे मला धरून बसवीत आणि तऱ्हतऱ्हेचीं अुदाहरणें मला समजावीत. नवीन नवीन रीती दाखवीत. माझें गणित बरेच चांगलें असे. यामुळेंच जगन्नाथ बुआंनीं मला हाताशी धरलें असेल. घड्याळाचे कांटे समोरासमोर किती वेळानें केव्हां येतात, समोरासमोर धांवत येणाऱ्या आगगाड्यांची अुदाहरणें कशी सोडवायचीं, वाढत्या कुरणांतील गवत एका बाजूला वाढत जातें आणि दुसऱ्या बाजूला जनावरें चरत जातात, अशा वेळीं त्या कुरणाचा हिशेब कसा करावा, विसराळू मुलाच्या स्मृतीसारख्या फुटक्या हौदांतील पाणी किती वेळांत रिकामें होअून जाअील किंवा भरले जाअील हें कसें शोधून काढावें, अि. सगळे प्रकार त्यांनीं मला शिकविले. स्थूल मानानें म्हणतां येअील कीं अेक वर्षाचें गणित त्यांनीं अेका महिन्यांत संपवून टाकलें. मला देखील त्यांच्या पद्धतीची अशी गोडी लागली कीं त्यांच्या हातून निसटण्याचा प्रयत्न मीं दुसऱ्या दिवसापासूनच सोडून दिला. गणिती विचार कसा चालवावा याची किल्ली त्यांचेकडून मला मिळाली.

अुदाहरणार्थ कोणकोणत्या गोष्टी दिल्या आहेत आणि कोणती गोष्ट शोधून काढावयाची आहे, यांचें पृथक्करण करावयाला त्यांनीं मला शिकविलें. आणि ज्ञात वस्तूपासून प्रारंभ करून अज्ञाताचा मार्ग कसा काढावा याची कला त्यांनीं दाखवून दिली. प्रत्येक अुदाहरण म्हणजे आपलीच शिडी आपण तयार करीत जाअून आपणच तयार केलेल्या पायऱ्यावरून चढत चढत वर पोहोंचण्याचा प्रयत्न करणें होय, हें मला चांगलें समजले.

रात्रीं जेवण आटोपलें म्हणजे पोटावर हात फिरवीत 'होटया' म्हणून मोठा ढेकर देत ते आमच्या घरीं आपलें आसन मांडीत. आणि मग मोरोपंती आर्यांची सरबत्ती सुरू होत असे. केव्हां केव्हां मोरोपती आर्या म्हणजे मराठी प्रत्यय असलेलें संस्कृत काव्यच असावयाचें. या आर्यामध्यें ज्यानें चांगले अवगाहन केलें असेल त्याला संस्कृतचें ज्ञान सहजासहजींच होअून जातें. महाराष्ट्रांत आजवर संस्कृतचें अध्ययन जें विशेष आहे त्याचें कारण आजवर जुन्या कवींचें अध्ययन मोठया गोडीनें आणि व्युत्पत्तिसहित होत आले आहे, हेच होय.

जगन्नाथ बुआना अितिहास भूगोलाचें ज्ञानहि चांगलें होतें. संक्रांतीच्या वेळीं पातळ कागदाचे पतंग कसे तयार करावे, दिवाळीच्या वेळीं आकाशदिवे कसे तयार करावेत, अि. सर्व गोष्टी ते मोठया खुबीने दाखवीत. यामुळे त्यांच्या आसपास विद्यार्थ्यांची टोळी जमलेली असावयाची. पण हल्ली कित्येक शिक्षक ज्याप्रमाणें विद्यार्थी-वेडे असतात आणि नाजूकपणा वाढवितात तसे ते नव्हते. कोणी मुलगा फार लाडांत येअून बोलूं लागला तर तें त्यांना सहन होत नसे अेकादा नाजूक मुलगा फार जवळ बसला किंवा गळ्यांत येअून पडला तर त्याला श्रीमुखांतच मिळावयाची. जर कोणी मुलानें सुदर दिसण्याचा प्रयत्न केला तर दहा विद्यार्थ्यांत त्याची फजिती व्हावयाचीच. अेक मुलगा फारच नाजूकपणा करून दाखवीत असे. सामान्य टीकेनें तो वठणीवर येअीना. तेव्हां चिडून जाअून अेकदां बुआ म्हणाले, "अरे, बाजारांत जाअून दोन आण्याच्या बागडया घेअून या. या पोरीच्या हातांत भरल्या पाहिजेत. परकर तर याची बहीण फुकट देअील."

असले कडक शिक्षक आजकाल पहावयास मिळत नाहींत. ते म्हणत, "शिक्षकाचा मर्दानी स्वभाव हाच विद्यार्थ्यांच्या चारित्र्याचा विमा आहे."

अेके दिवशीं शाळेंत आमच्या हरिमास्तरना जगन्नाथ बुआविषयीं मीं सांगितले. मला वाटलें, हरिमास्तरना त्यांत कांहीं विशेष वाटलें नसावें. पण जेव्हां थोडयाच

दिवसांत आमच्या शाळेंत रविवारीं संध्याकाळीं जगन्नाथ बुआंचें कीर्तन होणार असल्याचें जाहीर झालें, तेव्हां मला फारच आनंद झाला. त्या दिवशीं जगन्नाथ बुआ साधें शुभ्रकांठी धोतर नेसून आणि सदऱ्यावर रामदासी सांप्रदायाची भगवी कफनी घालून आणि डोक्यावर भगव्या रंगाचा लहानसा फेटा बांधून हजर झाले होते. कितीतरी तास त्यांचें कीर्तन अस्खलित वाणीनें चाललें होतें. पूर्वरंगांतील त्यांची अेकच गोष्ट आज आठवते. षड्रिपूंचें आकर्षण किती घातक असतें आणि त्यांतून खरोखर सुख तर मिळतच नाहीं, याचें विवेचन चालत असतां जेव्हां कामविकाराची पाळी आली तेव्हां ते म्हणाले, "अगदीं सुकून गेलेलें निर्मांस हाडुक चावत असतांना स्वतःच्या दातांतून निघत असलेलें रक्त चाटून त्याचा आनंद मानणारें कुत्रें आणि कामी मनुष्य या दोहोंमध्यें मुळींच अंतर नाहीं."

जगन्नाथ बुआ कोठून आले होते आणि पुढें कोठें गेले, त्यांचें वास्तव्य कोठलें, हें मला कांहींच ठाअूक नाहीं. त्यांनीं शिकविलेलीं अुदाहरणें आतां सगळीं विसरून गेलों; पण गणिताची गोडी लावणाऱ्या चार व्यक्तींमध्ये मात्र त्यांचें स्थान कायमचें आहे. त्यांनीं माझेकडून पाठ करून घेतलेल्या आर्या देखील मी विसरून गेलों; पण त्या कुत्र्याचा दृष्टान्त मात्र अजूनहि ध्यानांत आहे, आणि तो अुपयोगीहि आहे.

## कपाल-युद्ध

५२

शरीरानें मी लहानपणापासून अशक्त. घरांतील व्यवहारांत मी सविनय आज्ञाभंग करून माझें व्यक्तित्व संभाळीत असें. पण शाळेंत हे चालावें कसें ? बरोबरीच्या विद्यार्थ्यांशीं वागतांना तो रस्ता कांहींच उपयोगाचा नव्हता. त्यामुळें सामान्यपणें खेळ, कसरत, कवायत, उत्सव, आणि भटकावयास जाणें, वगैरे सामुदायिक प्रवृत्तींतून निसटून जाण्याचें किंवा गैरहजर रहाण्याचें मी पसंत करीत असें. अशा रीतीनें जीवन संकुचित करूनच मी माझें शालेय जीवन सुखावह करूं शकलों होतों. पण कधीं कधीं आणीबाणीचा प्रसंग येऊन ठेपे. अशाच अेका प्रसंगांत सांपडल्यावेळीं मीं यावर अेक शस्त्र शोधून काढलें. हें शस्त्र चार पांच निरनिराळ्या प्रसंगीं माझ्या बाबतींत संकटनिवारक ठरलें.

देवीदास पै माझा दिलोजान दोस्त. आम्ही दोघेहि सरकारी अंमलदाराचे मुलगे. अणि दोघेहि सारखेच बडबडे ! यामुळेंच बहुधा आमची दोस्ती जमली असावी. पावसाळ्यांत अेके दिवशीं समुद्रांत तुफान झालें होतें. समुद्राच्या मोठमोठ्या लाटा रस्त्याच्या बांधावर येऊन आपटत आणि आदळल्यानंतर अुलटया वाहूं लागत. या अुलटया जाणाऱ्या लाटा आणि समुद्रांतून येणाऱ्या लाटा यांची टक्कर होत असे. परंतु या लाटा अगदीं समांतर नसल्यामुळें त्यांच्या टकरेची क्रान्ती होअी. समोरासमोरून येणाऱ्या

लाटांची जेथें टक्कर होअी, तेथें पाणी कारंज्याप्रमाणें आकाशांत वर अुडे. आणखी टक्कर अेका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत चालली म्हणजे पाण्याचें हें कारंजे अेका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत अुडत जात असे. ही शोभा ज्यानें न्याहाळून पाहिली असेल, त्यालाच याचा आनंद समजेल.

सोसाटयाचा वारा वहात होता. पावसानें सरीवर सरी झोडण्याची परंपरा चालविली होती. आणि आम्ही दोघेजण कपडे भिजून चिंब झाले तरी ती शोभा पहात अुभे होतों. किती वेळ होअून गेला कोण जाणे. पण शेवटीं घरी रागें भरतील या भीतीनें आम्ही भानावर आलो. आणि आम्ही परत घरीं जाण्याचें ठरविले. अितक्यांत कशावरूनशी आमची बोलाचाली सुरू झाली आणि भांडण जुंपले. भांडतां भांडतां आम्ही दोघेहि ( अितका पाअूस असूनहि ) गरम झालो ! देवीदासला माझे वर्म नेमकें ठाअूक होतें. माझेकडून अेक दोन बुक्क्या खातांच त्याने माझीं दोन्हीं मनगटें जोरानें पकडून धरलीं. माझी सगळी कमजोरी माझ्या मनगटांतच. मीं कितीहि धडपड केली तरी माझे हात कांहीं सुटेनात. आणि त्याला मारण्याची संधी मला मिळेना. आम्हां दोघांचें वय सारखें होतें; पण तो ( देवीदास ) दुहेरी हाडाचा आणि मजबूत होता. त्याच्यापुढें माझे कांहींच चालेना. लज्जेनें माझा राग धुमसून भडकला.

त्या रागांतच मला अेक विचार सुचला. सुचल्याबरोबर तो अंमलांतहि आणला. धाड्कन् मीं माझें कपाळ त्याच्या कानशिलावर अेकाद्या हातोड्याप्रमाणे ठोकलें. त्याचा चेहरा लालबुंद झाला. हाताची पकड केव्हां सुटली हें त्याच्या ध्यानींहि आलें नाहीं. तो मट्कन् खालीं बसला.

आमच्या भांडणांत अर्थ कांहींच नव्हता. रागहि क्षणिक होता. त्याला खालीं पटलेला पाहून मला फार वाअीट वाटले. त्याच्या कपड्याला कोठे कोठे लागलेला चिखल मीं झाडून काढला आणि पहिल्यासारखेच मित्र होअून आम्ही घरीं परतलों. वाटेंत देवीदास म्हणाला, " तूं असला मारेकरी असशील याची मला कल्पना नव्हती. " मी म्हणालों, " देवीदास, विसरून जा हें सगळें. मला कुठें कल्पना होती कीं, कानशिलावर अितकें लागतें ? "

या शस्त्राचा अुपयोग पुढें दोनदां शहापुरांत केला होता. अेकदां अेका मायाळू मित्राच्या आग्रहांतून मुद्दून जाण्यासाठीं आणि दुसऱ्यांदां शहापुरच्या शाळेच्या

आखाड्यांतील अेका तालिमबाज विद्यार्थ्यानें माझ्याशीं बोलतांना कांही अश्लील शब्द काढले होते म्हणून त्याला शिक्षा करण्यासाठीं. या दुसऱ्या वेळीं तो मुलगा चांगलाच मजबूत होता. त्याला मार बसला त्यापेक्षां मलाच अधिक लागलें असलें पाहिजे; पण मी तें कांहीं दिसूं दिलें नाहीं. मला अशक्त समजणाऱ्या त्या तालिमबाजाला मात्र चांगलाच धडा मिळाला. शेवटच्या वेळीं या शस्त्राचा अुपयोग मीं केला होता, तो फर्ग्युसन कॉलेजमध्यें असतांना जीवतराम कृपलानीशीं. पण त्या प्रसंगाचें वर्णन पुढें केव्हां तरी.

वडिलांची बदली झाल्यामुळें आम्ही कारवार कायमचें सोडून धारवाडला गेलों. मला हिंदु स्कूल सोडून जाणें जिवावर आलें होतें. पण प्रवास घडेल या आनंदाचें आकर्षण त्याहून विशेष होतें. शाळेंतील सर्व मित्रांना मी जाहीर केलें कीं आम्ही आतां कायमचे जाणार आहोंत. तेव्हांपासून सगळेजण माझेपाशीं विशेष प्रेमानें गोष्टी करूं लागले.

देवीदास पै तर माझा जीवश्च कंठश्च मित्र. त्याला बरोबर घेऊन लागोपाठ तीन चार दिवस मी समुद्रकिनाऱ्यावर फिरावयास गेलों. रामचन्द्र अंगडी हा माझेपेक्षां वयानें थोडा मोठा होता. पण त्याचेशीं देखील माझी दोस्ती पुष्कळ. शहराच्या दुसऱ्या भागाला तो दूर रहात असल्यानें त्याला शाळेंतच भेटून घेणें शक्य होतें. सुब्बराव दिवेकर म्हणून अेक कारकुनाचा मुलगा होता, त्याचेशीं देखील माझी पुष्कळ मैत्री होती. शरीरानें तोहि माझेसारखा अशक्त. पण मी त्याचेअिनका नाजुक नव्हतों. ज्यांचेशीं माझा वर्गांत नेहमीं विचारविनिमय होअी, असे हे दोघेच जण होते.

यांखेरीज बाळिगा म्हणून तिसरा अेक मुलगा होता. त्याची आणि माझी बौद्धिक भूमिका अेक प्रकारची नव्हती. त्याला वर्गांतील पुस्तकांच्या बाहेरील फालतू

ार्चेची गोडी नव्हती. पण आमचें अेकमेकांवर पुष्कळ प्रेम होतें. खरें म्हणावयाचें हणजे त्याचेंच माझेवर विशेष प्रेम होतें. त्याला जेव्हां समजलें कीं मी कारवार ायमचें सोडून जाणार, तेव्हां त्याचे डोळे ओले झाले.

बाळिगा घरचा मोठा श्रीमन्त नव्हता. त्याचें अेक चहाचें हॉटेल होतें व अेक ाणावळ होती. हिन्दु स्कूलच्या पवित्र वातावरणांत आम्ही सामाजिक प्रतिष्ठा, ातीचा अभिमान, बुद्धिमत्तेची अैट, धर्मभेदाची संकुचितता, हें सर्व विसरून चारित्र्य ' भावनेकडेच पाहावयास शिकलों होतों. आजदेखील माझ्या दृष्टीला सगळेच लोक ारखे दिसतात. पैशानें, विद्वत्तेनें, फार काय नीतीनेंहि कमी प्रतीच्या गणल्या ाणाऱ्या लोकांकडे मी अुतरत्या नजरेनें पाहूं शकत नाहीं. माणसाची पारख याच्या हृदयावरून करावी, त्याच्या स्वतःच्या सदाचारावरून व संस्कारितेवरून रावी, यांतच खरी खानदानी आहे. असें शिक्षण मिळाल्यामुळें भिन्न दृष्टीनें ाहातांच येत नाहीं. लोकव्यवहार सांभाळण्यासाठीं मी भेद करीत नाहीं, असें ाहीं; पण ते नीटसें जुळत नाहीं. सगळ्यांशीं सारखे वागण्याचा स्वभाव गांतील व्यवहारांत बाधक ठरतो, हें मला ठाअूक आहे. पण मला त्याचें फारसें ाअीट वाटत नाहीं.

जगाच्या व्यवहारांत प्रतिष्ठित होण्याचा, स्वतःचा दर्जा वाढविण्याचा धोपट मार्ग ा आहे कीं, आपल्या बरोबरीच्या अथवा आपल्याहून खालच्या दर्जाच्या ोकांविषयीं तुच्छता किंवा बेपर्वाअी दाखवावी आणि स्वतःहून श्रेष्ठ गणल्या गेलेल्या ोकांची सफाअीदारपणानें खुशामत करीत राहून त्यांचेशी आपली बरोबरी आहे असें दाखवावें. सभेंत अर्धांच तास का बसावयाचें असेना, तरी तेवढ्यांत आपल्याहून श्रेष्ठ लोकांच्या जवळ जाअून बसण्याचा प्रयत्न कितीतरी लोक करतात. पण आपल्याहून खालचा मनुष्य जर आपले शेजारीं येअून बसला, तर मात्र त्यांना रुचत ाहीं. प्रतिष्ठेचे असले हे भिकारी लोक प्रतिष्ठेचा प्रतिग्रह शोधीत असतात. पण प्रतिष्ठेचें दान करण्याची दानत मात्र त्यांच्या अंगांत नसते.

हिंदु स्कूलच्या शिक्षणामुळें आम्ही सर्व विद्यार्थी अेकमेकाला भावनेच्या मापानेंच मापत असूं. सुब्बराव दिवेकरचे वडील माझ्या वडिलांच्या हाताखालील अेक कारकून होते. प्रारंभीं प्रारंभीं सुब्बराव मला कांहीं विशेष मान देत असे; पण जेव्हां आमचा परिचय वाढला, तेव्हां मला दिसून आलें कीं अभ्यासाची नियमितता, वर्गांत वेळेवर येण्याचा आग्रह, सर्वांशीं मिळाअपणानें वागण्याची हातोटी आणि सर्वसामान्य

सहानुभूति, या सर्व गोष्टीत तो माझेपेक्षां श्रेष्ठ होता. यामुळें पुढें पुढें मीच त्याला अधिक आदर दाखवूं लागलों.

बाळिगाहि या सर्व दृष्टींनीं चांगल्या मुलांपैकीं होता. प्रवासाला जायच्या आदल्या दिवशीं बाळिगानें विचारलें, "आज संध्याकाळीं 'माझे' बरोबर फिरावयास येशील ?" कदाचित् मी नाहीं म्हणेन या शंकेनें त्यानें आपला प्रश्न अगदीं कोमल स्वरांत उच्चारला होता. देवीदासशीं मला पुष्कळ गोष्टी बोलावयाच्या होत्या. त्यामुळें बाळिगाला मी नाहींच म्हटलें असतें. पण त्याच्या आवाजांत असा कांहीं मायाळूपणा होता कीं त्याला नाहीं म्हणावयाची माझी हिंमतच झाली नाहीं.

कबूल केल्याप्रमाणें त्याचेबरोबर समुद्रकिनारीं दूरवर फिरावयास गेलों. तेथें बसून आम्ही अिकडच्या तिकडच्या बऱ्याच गोष्टी केल्या. मग बाळिगानें खिशांतून अेक भला मोठा द्रोण काढला. त्यांत गरमगरम जिलब्या होत्या. जिलब्यांवर अेक दुसरा द्रोण अुलटा झांकून त्याचेवर अेक स्वच्छ हातरुमाल बांधून त्यानें जिलब्या गरम ठेवल्या होत्या. मी कांहीं बोलणार; अितक्यांत बाळिगा मला म्हणाला, "चुप्! चुप्! कांहीं बोलूं नकोस. नाहीं म्हणून चालावयाचें नाहीं. हें सगळें तुला खाल्लेंच पाहिजे. तूं नाहीं म्हटलेंस तरी मी तें अैकणार नाहीं. तुला माझ्या गळ्याची शपथ आहे." समुद्रावर आंघोळ करतांना अेकावर अेक लाटा आल्यानें आपण ज्याप्रमाणें गुदमरून जातों त्याप्रमाणें मला झालें. मी अेक जिलबी हातांत घेतली आणि म्हणालो, "बरे तर मग! तूहि खा आणि मीहि खातों." पण तो कसचा अैकतो ? तो म्हणे, "हें सगळें तुलाच खाल्लें पाहिजे." मी हट्ट धरला कीं तूं खाणार नाहींस तर मीहि खाणार नाहीं. आम्ही दोघेहि हेकेखोर. पण शेवटीं मी हरलों. बाळिगानें अेका जिलबीचे दोनएक तुकडे तोंडांत टाकले आणि बाकी सगळ्या जिलब्यांचा भार माझ्या माथीं किंवा गळ्यांत येअून पडला.

खातां खातां मी त्याला विचारलें, "तुला अितक्या जिलब्या कशा आणूं दिल्या ? सांगूनच आणल्या आहेस ना ?" अेरवींचा प्रसंग असता, तर या प्रश्नाचा अपमान मानून माझेवर तो रागावला असता; पण आज त्याला तसें कांहीं सुचण्यासारखें नव्हतें. तो अितकेंच म्हणाला, "अरे, असें काय विचारतोस ? दुकानांत जाअून माझ्या हातानें ताज्या करून घेअून आलों आहें." जितका वेळ मी खात होतों तितका वेळ बाळिगा मला न्याहाळून पहात होता. जणूं काय मीच त्याची डोळ्यांनीं खाण्याची जिलबी होतों.

घरीं येऊन मी आओला सांगितलें कीं माझ्या मित्रानें अशा अशा रीतीनें मला जिलबी खाऊं घातली. आओ म्हणाली, "होय, असेंच असतें. कृष्ण आणि सुदामा यांचेमध्यें देखील असेंच प्रेम होतें. मोठे झाल्यावर ओश्वराच्या कृपेनें थोरपणा आला, तरी लहानपणच्या बाळगोपाळांना विसरूं नये. समजलास काय ?"

रात्रीं बाळिगा मला पुन्हां भेटावयास आला. मी त्याला दिवाळीसाठीं बनविलेला माझा रंगीत कागदाचा आकाशदिवा भेट म्हणून दिला. आम्ही कारवार कायमचें सोडणार होतों. चारपांच वर्षें कारवारला राहिल्यामुळें घरीं सामानाचा ढीग होणें साहजिकच होतें. कित्येक सामान आम्हीं विकून टाकलें. कित्येक स्नेह्याच्या घरीं पाठवून दिलें. बाळिगाचें माझ्यावर असलेलें प्रेम ऐकून आओच्या मनांत त्याचे-विषयीं वात्सल्य अुत्पन्न झालें होतें. त्यामुळें अेखादी वस्तु त्याचे अुपयोगाची आहे असें वाटतांच आओ ती त्याला देऊन टाकी. बाळिगाची खाणावळ आमच्या घरापासून फारशी दूर नव्हती. दिलेली वस्तु घांवत जाऊन घरीं ठेऊन येऊन तो पुन्हां माझेशीं बोलावयास बसे. असें अेक दोनदां झालें, तेव्हां घरच्या लोकांना वाटलें कीं हा मुलगा न सांगता अुचलून तर आणत नाहींना ? त्याचे घरचा अेक मनुष्य आमचे येथें तपास करावयास आला. बिचाऱ्या बाळिगावर अेकाच दिवशीं अशा रीतीनें दोनदां नाहक आळ आला. भोळ्या प्रेमाची अशी कदर व्हावी काय ! त्या प्रसंगाला ४०।४५ वर्षें अुलटून गेलीं असतील; पण बाळिगाचे भोळें प्रेम माझ्या मनांत आजहि ताजें आहे.

सकाळच्या गुलाबी झोंपेचे घोट पीत पीत मी अंथरुणावर पडून होतों. घरांतील अितर मण्डळी केव्हांच अुठून प्रातर्विधि आटोपून मोकळी झाली होती. आअी व माझे वडील बन्धु बाबा माझ्या अंथरुणावर येअून केव्हां बसले, कुणास ठाअूक. अर्धवट झोंपेमध्यें मी कुठें निजलों आहें, माझें डोकें किंवा पाय कोणत्या दिशेला आहेत, बाहेर प्रकाश आहे कीं अंधार आहे, याची मला कसलीच जाणीव नव्हती. फक्त साखरझोंपेचा आनंद व पांघरलेल्या रजअीची अूब अेवढेंच माझ्या आसपास होतें. अितक्यांत आअीचें व बाबाचें संभाषण माझ्या कानीं पडलें.

"कायरे, बाबा ? तुला काय वाटतें हा दत्तू शिकतो आहे का कांहीं ?"

हा प्रश्न अैकतांच माझे कान जागृत झाले. स्वतःविषयीं गोष्टी चालल्या असल्या म्हणजे तिकडे ध्यान जावयाचेंच. त्या क्षणींच मी विचार केला कीं जर कांहीं हालचाल केली तर संभाषणाची तार तुटेल. मी निजलों आहें असें समजूनच या गोष्टी चालल्या होत्या. मी अगदीं निश्चेष्ट पडून होतों. अेवढेंच नव्हे तर प्रयत्नपूर्वक श्वासोच्छ्वासांत कांहींहि फरक पडूं नये याचीहि काळजी मी घेतली.

बाबा म्हणाला, "होय. त्याच्या शक्तीप्रमाणें तो शिकतो खरा."

आअीला अेवढ्यानें संतोष झाला नाहीं. ती म्हणाली, "त्याच्या हातांत पुस्तक

तर कधींच दिसत नाहीं. सगळा दिवस रिकामटेकडया गोष्टींतच असतो. अेक दिवस देखील वेळेवर शाळेंत गेल्याचें आठवत नाहीं. हा शाळेंत जाऊन पोहोंचतो तोंवर आठ वाजून गेलेले असतातच. आणि रात्रीं परवचा म्हणतां म्हणतांच निजून जातो. याचें काय होणार आहे ? याच्या जिभेला विद्या येअील असें तुला वाटतें काय !"

माझ्या अभ्यासाचें हें असलें वर्णन मी नेहमींच अैकत असें. कोणीहि केव्हांहि माझ्यावर रागावलें म्हणजे अितक्या दोषांचा नामोच्चार व्हावयाचाच. अभ्यासाच्या बाबतींत मला रागें भरत नव्हता फक्त गोंदू. कारण या बाबतींत तो माझ्याहून सवाअी होता. आअीच्या वरील प्रश्नाचें मला नावीन्यहि कांहीं वाटलें नाहीं आणि वाअीटहि वाटलें नाहीं. आपण आहोंतच असे काळ्याला कोणी काळा म्हटलें तर त्यानें काय म्हणून रागवावें ? मला यत्किंचितहि वाअीट वाटलें नाहीं. माझें सर्व ध्यान, यावर बाबा काय म्हणतो, तिकडेच होतें.

बाबा म्हणाला, " आअी, तूं व्यर्थ याची काळजी करतेस ! दत्तूची बुद्धि चांगली आहे, तो कांहीं मट्ट नाहीं. जेव्हा अभ्यास करतो, तेव्हां ध्यान ( मन ) लावून शिकतो. शरीरानें किरकोळ आहे तेव्हां दुसऱ्या मुलांप्रमाणें तासचे तास अभ्यास करू शकत नाहीं. पण त्याचें कांहीं नाहीं. जेव्हां कधीं मी त्याला कांहीं समजावतों तेव्हां तें त्याच्या ध्यानांत चटकन् भरतें. तूं त्याची कसलीच काळजी करूं नको. "

आअी म्हणाली, "तूं अितकी खात्री दिल्यानंतर मला कसची चिन्ता ? शिकण्याच्या बाबतींत मला काय समजणार ? तो धट्ट राहूं नये अेवढीच माझी अिच्छा आम्ही नसूं तेंव्हां तुम्ही सगळे मोठे झालेले असाल. माझा दत्तू सगळ्यांत लहान. शिकलेला नसेल तर त्याला वणवण फिरावें लागेल. तो मोठा होअून मिळवता होअेपर्यंत मी जगावें असें मला वाटतें. दत्तचा संसार नीट थाटला म्हणजे मग मी आनंदानें डोळे झांकीन.

हा संवाद चालत असतां माझ्या बाळ हृदयांत काय चालले होतें, याची कल्पना नव्हती माझ्या आअीला आणि नव्हती मोठ्या बन्धूंना. माझेविषयीं श्रद्धा व आस्था बाळगून मला अनुलक्षून झालेले हें पहिलेंच संभाषण मी अेकलें होतें. बुडत्या मनुष्याला कोणी वांचवून घेतलें आणि जीवदान दिले म्हणजे त्याला जसा हर्ष व्हावा, तसा बाबाचे शब्द अैकून मला झाला. माझ्या अुनाडपणामुळें आअीला किती चिन्ता

वाटते, याचीहि मला याच वेळीं कल्पना आली. पण त्या चिन्तेचा माझेवर त्या वेळीं फारसा परिणाम झाला नाहीं. आणि जो झाला तो फार वेळ टिकलाहि नाहीं. पण बाबाचे शब्दाचा परिणाम मात्र स्थाअी झाला.

बाबाच्या शिक्षणाचा आदर्श मोठा कडक होता. "बाबाचा" म्हणण्यापेक्षां त्या काळचा म्हटलें तरी चालेल. आमच्या देखत आमची स्तुति करणें म्हणजे महापाप. जेवढे म्हणून वडील असतील त्या सर्वांनीं आमच्या दोषांकडे आमचें ध्यान खेचले पाहिजे. त्यांतल्या त्यांत बाबा म्हणजे आमची बहिश्चर कर्तव्यबुद्धि. पावलोंपावलीं त्यानें आम्हांला ठोकावे. पावलोंपावलीं रागें भरावें आणि रागें भरावयाचें तें जिभेपेक्षां छडीनेंच अधिक. मार मिळेल या भयानें मी पुढे धांवत आहें आणि बाबा हातांत छडी घेअून माझा पाठलाग करीत आहे–अशा शर्यतीची तीनचार दृश्यें अजूनहि माझ्या डोळ्यांसमोर ताजीं आहेत. धांवत असतांना आमच्यामधील अन्तर वाढतें कीं कमी होतें, हें पाहण्यासाठीं मधून मधून मी मागे पहात असें. त्या वेळीं जर अेकादा काव्यज्ञ रसिक हजर असता तर त्याला कालिदासाचा "ग्रीवाभङ्गाभिरामम्" हा श्लोक ध्यानांत आल्यावांचून राहिला नसता.

अशा प्रकारच्या शर्यतीमध्यें आम्हां दोघांमधील अंतर कधीं कमी होत असे, तर कधीं मी निसटूनहि जात असें. कधी अडखळून पडलों म्हणजे बाबाच्या हातीं सांपडत असें. आणि मग तासचे तास त्याच्या खोलीचा कैदी होअून रहात असें. पण जीवनांतील शर्यतींत मात्र आम्हांमधील अंतरांचे प्रमाण दिवसेंदिवस कमीच होत चाललें. शेवटीं केव्हां केव्हां मीच बाबाचा सलाहकार बनत असें. आमच्यांमधील वयाचें अन्तर पाहून अनोळखी लोक आम्हांला पितापुत्र समजत असत. आणि खरोखर बाबाचें प्रेम पित्यासारखें होतें. पुढें जेव्हां माझ्यांत विचारांची व वयाची वाढ होऊं लागली, तसतसें बाबाच्या कोमल हृदयांतील भावना व्यक्त करण्याचे, स्वतःच्या आशानिराशा, चिन्ता व महत्त्वाकांक्षा व्यक्त करण्याचें मी अेकमात्र स्थान झालों होतों. पुढें पुढें तर आमच्या संबंधाची गोडी जशी भावाभावाची होती, तशी मैत्रीचीहि होती. त्या सर्व गोडीचें मूळ त्या दिवशीं साखरझोपेंत अैकलेलीं बाबाचीं वचनें, हेंच होतें असें मला आतां वाटतें; कारण त्या दिवशीं खरोखरच मला "श्रुतं श्रोतव्यं" असें झालें होतें.

नुकतेंच अेका स्नेह्याच्या तोंडून अैकलें कीं लोक दोष दाखविण्यांत आणि ठपका देण्यांत अितके अुदार असतात आणि योग्य प्रसंगीं अेकाद्याची स्तुति

करण्यांत अितके कंजूष ( चिक्कू ) कां व्हावे ? अेका पाश्चात्त्य लेखकानें म्हटलें आहे कीं, स्तुति केल्यानें अैकणारे लोक बिघडतात, म्हणून कोणाची स्तुति करूं नये असें ठरविणें म्हणजे अेकाद्याचें देणें परत दिलें असतां तो त्या पैशाचा दुरुपयोग करील या भयानें देणें न देण्यासारखेंच आहे.

या प्रश्नाचा निकाल कोण करील ?

वर्गात प्रश्न विचारण्याच्या अेका पद्धतीची शाळेत जाणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना चांगली माहिती असते. प्रथम सगळ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या क्रमाप्रमाणें बसावयाला सांगतात. मग शिक्षक पहिल्या नंबरापासून सुरू करून प्रश्न विचारूं लागतात. पहिल्याला उत्तर न आलें तर तोच प्रश्न दुसऱ्याला विचारतात. त्याला न आला तर तिसऱ्याला. शिक्षक घाअीघाअीनें अेकामागून अेका विद्यार्थ्याला तोच प्रश्न विचारतात. ज्यांचें अुत्तर बरोबर येअील तो हरलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या वर जाअून बसतो. नंतर त्याच्या खालच्या विद्यार्थ्याला प्रश्न विचारण्यांत येतो. विजयी विद्यार्थ्यांनीं हरलेल्या विद्यार्थ्यांच्या वर जाअून बसावें हा सार्वत्रिक नियम असतो. या रीतीनें सगळे विद्यार्थी जागृत राहतात हें खरें; पण विद्यार्थ्यांची खरोखर परीक्षा होते असें म्हणतां यावयाचें नाहीं. अेक तासभर असे प्रश्न विचारल्यानंतर विद्यार्थी ज्या क्रमानें बसतात तो क्रम विद्यार्थ्यांची हुशारी किंवा त्यांचा अभ्यास यांचा द्योतक नसतो. ही अेक प्रकारची सोडतच ( लॉटरी ) असते. शिक्षक जर पक्षपाती असला आणि विद्यार्थ्यांना जर नीट ओळखत असला, तर वाटेल त्या विद्यार्थ्याला हव्या त्या स्थानीं बसवूं शकतो.

प्रश्नांची ही लॉटरी मानवी समाजाच्या विशाल जीवनाचें प्रतिबिंबच असतें.

विद्यार्थ्यांना जागृत रहावें लागल्यामुळें ते शीघ्रगति बनतात. आणि शिक्षकाचा पुष्कळसा वेळ वांचतो. शिक्षकांना किंवा विद्यार्थ्यांना आळशी बनविण्याची सोयच अर्थे नसते. आज जरी ही पद्धति मला सदोष वाटते आणि म्हणून मान्य नाहीं, तरीहि लहानपणीं आम्हांला ही पद्धति फार आवडत असे. पहातां पहातां अेकादा विद्यार्थी रंकाचा राजा होतो आणि राजालादेखील रंक बनण्याची तयारी ठेवावी लागते, ही तर गम्मत आहेच; पण पहिल्या नंबरच्या विद्यार्थ्याला स्वर्गाधिपति अिंद्राप्रमाणें उग्र तपश्चर्या करणाऱ्या प्रत्येकाची भीति बाळगावी लागते. स्वतः पहिल्या नंबरावर ( प्रथम स्थानीं ) असल्यामुळें वर चढण्याचा आनंद त्याला कोठून मिळणार ? त्याला नेहमीं भीति पडण्याची ! आपलें स्थान कसें टिकेल या काळजींत असलेला त्याला पाहून इतरांना गम्मत वाटते खरी !

कोणाचीहि फजिती झालेली पाहण्यांतच आनंद मानून घेण्याची रजोगुणी वृत्ति ज्यांच्यांत असेल त्यांना आनंद वाटो; पण यांत नीतिशिक्षणाचा नाश आहे ही गोष्ट त्या वेळीं शिक्षणशास्त्रयांच्या ध्यानांत आली नसावी.

अेके दिवशीं आमच्या वर्गांत अशीच प्रश्नोत्तरे चाललीं होतीं. माझ्या नेहमींच्या नियमाप्रमाणें शाळेला अुशीरा गेलों असल्यामुळें मी सर्वांत शेवटच्या स्थानीं हक्कानें बसलों होतों. तेथून पहातां पहातां अध्यर्धावर जाअून बसलों. अितक्यांत वामन मास्तरनीं पहिल्या विद्यार्थ्याला अेक कठिण प्रश्न विचारला. त्यांनीं प्रथमच मानलें होतें कीं याचे उत्तर कोणाला येणार नाहीं. त्यामुळें ते भराभर एकामागून एका विद्यार्थ्याला विचारीत पुढेच चालले. मीं अुत्तर दिले; पण मास्तरांचें तिकडे ध्यानच गेलें नाहीं. माझी खात्री होती कीं माझें उत्तर बरोबर आहे; पण मास्तरांचें बोट सपाट्यानें शेवटपर्यंत पोहोंचलें. कोणालाच अुत्तर आलें नाहीं म्हणजे शिक्षकांनी स्वतः अुत्तर द्यावयाचें आणि जरूर पडल्यास तेवढा विषय सविस्तर समजावून सांगावयाचा; या रिवाजाप्रमाणें मास्तरनीं प्रश्नाचें अुत्तर वर्गाला सांगितलें. ते अैकल्यानंतर माझ्यानें गप्प कसें बसवेल ? मी अुभा राहून म्हणालों–सर, हें अुत्तर तर मीं दिलें होतें ! मास्तरना तें खरे वाटेना आणि त्यांनीं स्वतःचा अविश्वास आपल्या डोळ्यावाटें व्यक्त केलाहि ! मी पुनः ठांसून सांगितलें–मी खरोखर सांगतो सर, मीं हेंच अुत्तर दिलें होतें. आतां वामन मास्तरांच्या पुढें धर्मसंकट अुत्पन्न झालें. स्वतःचे कान खरे मानावेत कीं समोर अुभा असलेल्या या मुलाचें खरें मानावें ? त्यांची ही अडचण मलाहि दिसत होती; पण मी निष्कारण हार काय

म्हणून कबूल करावी ? मी आपल्या जागीं अुभाच राहिलों. मास्तर थोडेसे चिडले. मग आपल्या खुर्चीवरून अुठून माझेकडे आले. आणि आपल्या दोन्ही हातांनीं माझे खांदे पकडून मला पहिल्या नंबराकडे घेअून जाअून कर्कश आवाजानें म्हणाले–घे, बस अिथे. मी बसलो तर खरा; पण त्यांचे हे वर्तन पाहून मी अगदी अस्वस्थ झालो. सर्व विद्यार्थी राहून राहून मास्तरकडे आणि माझ्याकडे टक लावून पहात होते. तेंहि अेक पाहण्यासारखें दृश्य झाले. मीं अितका कांहीं गोंधळून गेलों कीं काय करावें हें मला कांहीं सुचेना. असें होअील याची मला प्रथमच कल्पना आली असती, तर मी या भानगडींत पडलोच नसतों. पहिला नंबर घेण्याचा मोह असा मला कधींच नव्हता. माझा हा असा झालेला गोंधळ पाहून मास्तरना काय वाटलें कोण जाणे ! त्यांनीं मला विचारले, "*Do you think you deserve the first place ?*" ( तुला वाटतें का की पहिल्या नंबराला तूं योग्य आहेस ? )

अेक तर शिक्षकांची चीड आणि त्यांचा अविश्वास यांमुळें मी अस्वस्थ झालोंच होतों. मनांत वाटत होतें, अितकी सगळी शोभा होण्यापेक्षां पहिला नंबर चुलीत गेलेला बरा ! त्यावर मास्तरांच्या या प्रश्नाचा घाव बसला. माझी अमुक योग्यता आहे असें आपण होअून आपल्या तोंडानें म्हणणें, हें आपल्या हिंदु सदाचाराच्या विरुद्ध आहे. मी शहाणा आहें, मी लायक आहें, असे जो म्हणतो तो कुलीन नव्हे, अेवढें शील लहानपणापासून मी शिकलों होतों. यामुळें मास्तरांच्या प्रश्नाच्या अुत्तरादाखल माझ्या तोंडातून होय असें चटकन कसें निघावे ? लाजेनें माझें तोड लाल झालें. माझे कानदेखील गरम झाल्याचा मला अनुभव आला. मी काय अुत्तर देतों अिकडे वर्गातील विद्यार्थी देखील पहात होते. माझ्या डोळ्यांपुढें काळोखी आली. होय म्हणावें तर विनय सोडल्यासारखे होतें आणि अेवढे नाटक झाल्यानंतर नाहीं तरी कसें म्हणावें ? अुलट दुसऱ्या बाजूने अुत्तर देण्यांत जितका अुशीर होत होता, तितका माझेविषयीचा अविश्वास वाढत होता, हेंहि मला दिसत होतें. शेवटीं मी जिवाचा धडा केला आणि आणि आवश्यकतेपेक्षां अधिक जोरानें म्हणालों, "*Yes, I do.*" ( होय, मी योग्य आहेंच. )

मास्तर अेकदम चुप झाले आणि जणुं का कांहीं घडलेंच नाहीं अशा रीतीनें त्यांनीं वर्ग पुढें चालविला; पण जें वातावरण अितका वेळ गढूळ झाले होतें तें अशा रीतीनें ताबडतोब थोडेंच निवळणार ? तो सगळा दिवस मला कसेंसें वाटत होतें. त्यानंतर मास्तरनीं किंवा अितर कोणीहि त्या प्रश्नाचा यत्किंचितहि अुल्लेख केला नाहीं.

सर्वांना वाटलें असेल कीं हा नाजूक प्रश्न न छेडलेलाच बरा ! किंवा ते तो प्रसंगच विसरून गेले असतील. पण मी कसा विसरणार ?

लहानपणीं आणि मोठेपणीं देखील असे किती तरी प्रसंग येतात. लहानपणची मुख्य अडचण ही असते कीं त्या वयांत भावना अत्यत कोमल आणि उमद्या असतात. पण त्यांच्या प्रमाणानें परिस्थितीचें पृथक्करण करण्याची शक्ति किंवा भाषा माणसाजवळ नसते. मोठी मंडळी स्वतःचें लहानपण विसरलेलीं असतात. आणि लहान मुलांविषयीं असें धरूनच चालतात की मुले ती मुलें. त्यांच्या जीवनाला विशेष महत्त्व देण्याची जरूर काय ? ही सर्व परिस्थिति अनिवार्य असेल; पण त्या योगानें बालजीवन सरळ मात्र होत नाहीं

लहानपणी मुलांना जो बरावाओट, गोडकडू अनुभव येतो, त्यामुळेंच त्यांच्या स्वभावाला विशिष्ट वळण लागतें आणि त्यांतूनच चारित्र्य सिद्ध होत असतें. मुलांचा स्वभाव बनवण्याला पुष्कळ अंशीं आपणच जबाबदार आहोंत, हें वडील मंडळीच्या क्वचितच ध्यानांत येतें. वर वर्णिलेल्या प्रसंगीं माझे शिक्षक संस्कारी होते, धीर धरणारे होते, शंकेचा फायदा आरोपीला देण्याऱ्या वृत्तीची उदारता त्यांच्यांत होती. त्यांच्या जागीं जर कोणी दुसरा सामान्य शिक्षक असता, तर त्यानें मला लबाड आणि बेरड ठरविलें असतें. खोटें बोलतो म्हणून शिक्षाहि केली असती. निदान माझा धिक्कार केला असता. आणि त्याची माझ्यावर कशी काय छाप पडली असती हें काय सांगावे ? मनुष्यस्वभावाविषयीं थोडी तरी नास्तिकता माझ्यांत जरूर आली असती. वामन मास्तर माझ्याशीं किंबहुना सर्वच विद्यार्थ्यांशीं अतिशय चांगल्या रीतीनें वागत. यामुळेंच त्यांचेविषयीं माझे मनांत नेहमीं पूज्यभाव असे. पण आजच्या प्रसंगीं त्यांच्या वागण्याचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला. त्यांचें मन अतिशय संशयग्रस्त असून देखील त्यांनी माझेविषयीं उदारता दाखविली आणि माझ्या बाळ आत्म्याच्या अब्रूची किंमत राखली. यामुळें मी त्यांचा भक्त झालों. त्यांनीं आम्हांला नीति-शिक्षणाचे किती तरी धडे शिकविले असतील; पण हा धडा निराळा होता. अशा धड्यांचाच चारित्र्य-संगटनावर खोल आणि स्थाअी परिणाम होत असतो.

## शनिवारची तोफ



कारवारचें बंदर दोन्ही बाजूला पसरलेल्या पहाडाच्या वेंगेमध्यें वसलेलें आहे. त्यामुळें बाहेरून येणाऱ्या आगबोटी किनाऱ्यावरून बरोबर दिसत नाहींत, ही अडचण टाळण्यासाठीं बंदराच्या तोंडाजवळ कित्येक मैल दूर असलेल्या देवगडच्या डोंगरावर जो दीपस्तंभ आहे त्याच्यावर दुरून बोट दिसतांच अेक बावटा चढवतात. किनाऱ्यावर हा बावटा सहज दिसत नाहीं; म्हणून पोस्ट ऑफिसाजवळील एका खडकावर बावटयाचा खांब अुभा केला आहे. देवगडच्या दिवादांडीमधील बावटा दुर्बिणींतून दिसला कीं लगेच या खडकावर बावटा चढविण्यांत येअी. हा बावटा दिसल्यानंतर मगच लोक घरून बन्दरावर जाण्यासाठीं निघत असत. कधीं कधीं आम्ही बावटा दिसल्यानन्तर जेवायला बसून जेवण आटपून बन्दरावर गेलों आहोंत. आगबोट धक्क्यापासून दूर अुभी रहावयाची. होडींत बसून लोक आगबोट गांठावयाचे.—समुद्रांत कांहीं मोठें वादळ व्हावयाचें असलें म्हणजे दोन्ही दिवादांडीवर विशिष्ट प्रकारचे काळे बावटे चढविण्यांत येत. आगबोट यावयाची असली म्हणजे तांबड्या कपडयाची ध्वजा वर चढे. तुफानसूचक बावटे वाटोळ्या त्रिकोणी किंवा चौकोनी पेटाऱ्यासारखे असत. मला वाटतें, लांकडाच्या निरनिराळ्या आकाराच्या चौकटीवर बांबूचे तट्टे ठोकून त्याला

ढांबर फासून हे पेटारे तयार करीत असत. त्रिकोणी, चौकोनी हंड्यासारखे वाटोळ असे त्याचे आकार असत. प्रत्येक आकार तुफानाच्या स्वरूपाचा द्योतक असावा. हे पोकळ पेटारे आकाशांत लटकूं लागले म्हणजे कोठूनही सारखेच दिसतात. मचव्यांना आणि आगबोटींना याचेमुळें वेळींच अिशारे मिळत असतात.

शहराजवळील बावटेवाल्याजवळ अेक चांगलीशी दुर्बीण असे. कारण त्याला नेहमीं देवगडच्या दिवादांडीवर लक्ष ठेवावें लागे. याच अिसमाला दर शनिवारीं दोन प्रहरीं स्थानिक बारा वाजल्याबरोबर अेक तोफ अुडविण्याचें काम सोंपविण्यात आलें होतें. कारवारमध्यें या सर्व जागेलाच बावटा असें म्हणत असत.

अेका शनिवारी आम्हीं हें स्थान पहावयास निवालों. बावट्याची कचेरी ज्या खडकावर बांधली आहे, तो खडक समुद्रांच्या आत घुसलेला आहे. त्यामुळें त्याचे आसपास वालूचा किनारा नव्हता. समुद्राच्या लाटा येअून त्या खडकावर आपटत असल्यामुळें, पाण्याचा फेस आणि तुषार खूप वरपर्यंत उडत असत. बावटावाला एक वृद्ध मुसलमान होता. मुसलमान व्यक्तीला स्वतःच्या प्रतिष्ठेची जाणीव पुष्कळच असते. आमच्यासारखीं मुले तिकडे गेलीं म्हणजे बन्दर-घुरकी दाखविल्याशिवाय तो रहावयाचा नाही. अशा प्रकारच्या सलामीची आमची तयारीच होती. तुसडेपणाच्या प्रश्नोत्तराचा परिवयविधि आटोपल्यानंतर आम्ही त्याला म्हणालों, "देवगडवरील दिवादांडी आम्हांस दुर्बिणींतून पहावयाची आहे. जरा दाखवा ना मियां." त्यानें बंगल्यांतील कपाटांतून दुर्बीण काढली आणि म्हटलें, "खालीं या. मी तुम्हांला दाखवितों."—बंगल्याच्या खालच्या बाजूला तोफेच्या शेजारींच आमच्या छातीअितका अुंच अेक विटांचा खांब होता. त्याचेवर अेका सपाट आणि गुळगुळीत धोंडयाची लादी बसविली होती. या लादीच्या मध्यभागीं दक्षिणोत्तर अेक रेघ कोरलेली होती. लादीच्या चारी बाजूला टीचभर अुंचीचे चार खांब होते आणि ह्या खांबांवर छप्पराप्रमाणें ढाळ असलेला एक पत्रा ठोकलेला होता. लादीमध्यें मात्र तिळमात्र ढाळ नव्हता. पाण्याच्या पातळींत बसवल्याप्रमाणें सर्व बाजूंनीं ती समतोल होती. त्या लादीवर दुर्बीण आडवी ठेवून आम्हांला पहावयास त्यानें सांगितलें. दूरच्या देवगडावर बावटा चढला असतांना साध्या डोळ्यांनीं पुष्कळांना तो क्वचितच दिसे. माझी काकदृष्टि तो पाहूं शकत असे. याचा मला कितीतरी अभिमान वाटे. आज या दुर्बिणींतून पहातांच सगळा देवगड, त्याचेवरील दिवादांडी आणि बावटा सर्व कांहीं

जवळ येऊन स्पष्ट दिसूं लागलें. समुद्राच्या लाटा अुन्हांत कशा चकाकत होत्या. दिवादांडीचा आकार प्रथम कोणी ठरवला असेल ? बुद्धिबळांतल्या प्याद्याप्रमाणें तो किती आकर्षक दिसतो ! खालच्या बाजूला रुन्द आणि वर निमुळता झालेला आणि तोही कसा कमानदार !

दुर्बीण अिकडेतिकडे फिरवून मच्छिंद्रगड वगैरे अितर डोंगर देखील मी पाहून घेतले. दूर क्षितिजावरून पसार होणाऱ्या कित्येक फत्तेमाऱ्या पाहिल्या. त्यांच्या शिडांचीं सफेद पालें पाहून पाणकोंबडयांचें स्मरण झालें. समुद्र शांत असतांना देखील लाटांचा तालबद्ध खेळ चालावयाचाच. पांचसहा मैलांचा समुद्राचा विस्तार नजरेसमोर पसरलेला असला म्हणजे जवळच्या लाटा बऱ्याच मोठ्या दिसतात. तेथून दृष्टि जसजशी दूर पोहोंचवावी तसतशा त्या लहान होत जातात. असलें हें दृश्य कोणाला मोहित करणार नाहीं ? दुर्बिणींतून हेंच दृश्य अगदीं रेखीव कोरीव दिसतें आणि म्हणून मनावर त्याचा ठसा चांगला अुमटतो —हे सर्व पाहिल्यावर माझें लक्ष त्या लादीवर अुभें केलेल्या छोटेखानी टिनाच्या छपरावर गेलें. मी बावटावाल्याला विचारलें, "लादी अुन्हानें तापूं नये म्हणून हा पत्रा बसविला आहे काय का दुर्बिणीवर अून पडूं नये म्हणून ही छाया केलेली आहे ?" "तें आताच सांगत बसत नाहीं. दुर्बिणींतून तुम्हांला जें कांही पहावयाचे असेल तें अेकदां पुरेसें पाहून घ्या. मग दुसऱ्या गोष्टी. दुर्बीण अेकदां आंत ठेवली कीं पुन्हां तुम्हीं म्हटले तरी मी काढणार नाहीं." त्याच्या या सूचनेचा मान राखण्यासाठीं मी पुन्हां अेकदां दुर्बिणींतून पाहून घेतलें. प्रथम देवगड पाहिला. तेथून मच्छिन्द्रगड. पुढें दिशा फिरवून काळी नदीच्या मुखाजवळील सुरूंचें अुपवन, सर्व कांहीं डोळेभरून पाहिले. बावटावाल्यानें दुर्बीण आंत नेऊन ठेवली आणि म्हणाला, "थोडयाच वेळांत १२ वाजण्याची वेळ होअील. मला तोफ अुडवण्याची तयारी करावयाची आहे"--अेवढा हा वेळ खडक-लाटांचा सनातन झगडा पहाण्यांत खर्च करावयाचें आम्हीं ठरविलें. अून म्हणजे मी म्हणत होतें. पण या खडकांना त्याची काय पर्वा ? लाट येऊन खडकांवर आपटली म्हणजे पाण्याच्या चिन्धडया होऊन तें सगळें पाणी खडकांच्या डोक्यावर चढे आणि तेथून खडकांच्या फटींत आणि भगदाडांत शिरे. हे खडक देखील लाटांच्या थपडा खाऊन खाऊन अितके कोडगे झाले होते कीं त्यांना कोठेंही अणकुचीदार टोंक अुरलें नव्हतें. ते सगळ्या बाजूंनीं गुळगुळीत वाटोळे आणि बुळबुळीत झाले होते. मोठ्या मोठ्या खडकांच्या फटींमधून स्वच्छन्दानें विहार करणारे

खेकडे दिसत होते. अितके मोठे आणि अुग्र कीं भीतीच वाटावी. जलचर प्राणी आपल्या शरीरांतून अेक प्रकारचा चिकट डिंक किंवा चीक काढून त्याच्या मदतीनें आपल्या शिंपा खडकाला चिकटवून टाकत. लाटांच्या योगानें खडक झिजून गेला तर जाअील; पण शिंपा अेकदां चिकटल्या त्या चिकटल्याच. या लाटांना दिवसरात्र, अुन्हाळा, पावसाळा, बारा महिने आणि अनन्त वर्षे या खडकांवर टकरा देअून काय मिळत असेल ? येतात आणि जातात, येतात आणि जातात. लाटा पाण्याच्याच असल्यामुळें कितीही वेळां आपटल्या आणि त्यांच्या कशाही चिन्धड्या अुडाल्या तरी त्याचें कांहीं जात नाही. पण या लाटा खडकांसारख्याच निलाजऱ्या आणि कोडग्या ! खडकांशीं भांडण्यांत स्वतःचा विजय होतो कीं पराजय होतो, याचा विचारही त्यांच्या डोक्यांत येत नाहीं. निष्काम कर्मच जेथें करावयाचें तेथें विचार कसला ! अविचल पाषाण आणि चंचल पाणी यांचा हा संयोग विचार करण्याची संवय नसलेल्या माणसाच्या मनांत देखील तऱ्हतऱ्हेचे भाव अुत्पन्न करतो. जवळच अेक खारवा मासे पकडण्याचा अेक मोठा चाबूक हातांत धरून निश्चेष्ट बसला होता. जणुं काय मोठी तपश्चर्याच करीत आहे. वरून आकाशांतून पडणाऱ्या कडक अुन्हापेक्षां पोटाच्या आंतील भुकेची आग अधिक तीव्र असेल; म्हणूनच या वेळीं असे पञ्चाग्निसाधन तो करीत होता. अेकाअेकीं चाबकाची दोरी आंत खेचली गेली. तो ताडकन अुठला. चाबकाची दोरी कांहीं लहानसहान नव्हती. करंगळीअेवढ्या जाड काढणीची ती दोरी होती. त्यानें जोरानें खेंचण्यास सुरुवात केली. पाण्यांतील माशांचा जोरही कांहीं कमी नव्हता. जेव्हां खेंचून खेंचून तो कांहींसा थकला, तेव्हां मदतीची याचना करण्याच्या दृष्टीनें त्यानें आमच्याकडे पाहिलें. "जरा मदत करा" असें म्हणण्याची त्याची छाती नव्हती आणि त्याला मदत करण्याची आमची अिच्छा नव्हती. थोडया वेळानें त्यानें चटकन दोरी कांहींशी ढिली सोडली आणि मग जोरानें पुन्हां खेचली. या युक्तीमुळें त्याचा बराचसा कार्यभाग झाला. त्यानें दोरी हातांतून निसटूं नये म्हणून मनगटाला दोरीचे दोनतीन वेढे दिले आणि तो पुन्हां खेंचूं लागला. माशापुढें जीवनमरणाचा प्रश्न होता. तो सहजासहजीं कसा हरणार ? आम्हांला वाटलें कीं दोरी आतां तुटणार. कारण माशानें खडकाचे फटीमध्यें चांगला आसरा मिळविला होता. माझ्या जोडीदाराच्यानें आतां राहवेना. त्यानें धांवत जाअून दोरी खेंचायला मदत केली. अेकाच्या ठिकाणीं दोघे झाले तेव्हां घाबाळ झालेला मासा पाण्याच्या बाहेर जाअून पडला. माझ्या तोंडून अुद्गार निघालाः

"तव अशरीरिणी वदली अुत्तर, धर्मयुद्ध नव्हे हें"...

मासा ताडाच्या पंख्यासारखा वाटोळा आणि बराच जाड होता. त्याच्या पाठीवर करवतीसारखे दांते दांते होते. केवढे मोठे आणि अणकुचीदार ! करवतीचे दांते तीक्ष्ण असले तरी स्थिर असतात. या माशाच्या पाठीवरचे दांते त्याला जोरानें चालवतां किंवा मारतां येतात. मला वाटलें कीं याच्या पाठीजवळ लाकडाची फळी धरली तर रागाच्या सपाटयांत तो तिला करवतून टाकील.

शत्रूच्या दरबारांत ज्याप्रमाणें बृहस्पतीची अक्कल देखील कामीं येत नाहीं त्याप्रमाणें पाण्याच्या बाहेर माशाचा जोर अुपयोगी पडत नाहीं. तो मासा तडफडला. पाण्याकडे जाण्याचा त्यानें शेवटचा प्रयत्न करून पाहिला. दोन चार अुचक्या खाल्ल्या आणि सचेतन रूप सोडून देअून मनुष्याच्या आहारांचें रूप त्यानें धारण केलें. चिन्तामग्न असा मी त्याच्याकडे पहातच राहिलों. अितक्यांत माझा सोबती म्हणाला, "चल, चल. तोफ अुडण्याची वेळ झाली असेल. आम्ही धांवत धांवत वरच्या बाजूला गेलों. तेथें तोफ अुडविण्याची तयारी चालली होती. अेका लांब बांबूला पुष्कळसें तुटकें सूत बांधलेलें होतें. हा कुंचा ( ब्रश ) कांहींसा ओलसर करून तोफेच्या तोंडीं घालून बावटावाल्यानें तोफेला दांतवण करवलें. नन्तर अेका दोन शेरी पिशवींत बन्दुकीची दारू भरली होती. ती पिशवीची पिशवीच त्यानें तोफेच्या तोंडांत कोबली. त्यावर कागदाच्या लहान मोठ्या तुकडयांचा अेक मोठासा गोळा त्या दारूवर कोंबण्यांत आला. आणि लांब बांबूच्या मदतीनें ठोकून ठोकून मजबूत बसविण्यांत आला. हें काम बरेच मेहनतीचें होतें. अितकें झाल्यानंतर त्यानें अेक हात लांबीचें अेक मोठें दाभण घेअून तोफेच्या काण्यांत घालून आंतल्या पिशवीला त्यानें भोंक पाडलें. यानंतर अुजव्या हाताच्या ओंजळींत बंदुकीची बारीक दारू घेअून त्यानें ती हळूहळू काण्यामध्यें ओतली. ही दारू आंतल्या पिशवीच्या दारूला मिळाली आणि काण्याचें तोंड भरून गेलें. तेव्हां हातांत अेक कांकडा घेअून तो तयार झाला आणि मला म्हणाला, "अिकडे ये असा. तूं विचारीत होतास ना या लादीच्या शिळेवर हें पत्र्याचें छोटेखानी छप्पर कशासाठीं आहे म्हणून ? या छपराच्या पत्र्याच्या अगदीं मध्यावर हे बारीक छिद्र आहे पहा. यांतून सूर्याचा अेक किरण खालच्या शिळेवर पडतो. या शिळेवर अेक रेघ अुत्तरदक्षिण कोरलेली आहे. सूर्याचा किरण ज्या क्षणीं या रेघेवरून जातो तेव्हां कारवारचे बारा वाजतात आणि हेंच जाहीर करण्यासाठीं मी ही तोफ अुडवतों." हें सर्व पाहून मला गंमत वाटली. मनांत विचार आला कीं ही लादी समतल बसविली आहे हें बरोबर आहे; पण वरचा छिद्र असलेला पत्रा छपराप्रमाणें ढळता बसवला आहे. त्यामुळें बाराचा वेळ नक्की करण्यांत

कांहीं चूक तर होत नसेल ? वर पाणी राहून पत्रा गंजून जाऊं नये हाच अुद्देश असावा. मी असा विचार करीत होतों अितक्यांत बावटेवाल्यानें म्हटलें, " हं. पहा आतां हा किरण रेघेजवळ आला. आतां १२ वाजतात. " मी म्हणालों, " बरोबर. मुमुहूर्त सावधान ! " बावटावाल्यानें अेका काठीच्या टोकाला कांकडा बांधला होता. काठी हातांत धरून तो लादीवर सूर्यकिरणांकडे टक लावून पहात होता. आतां काय होअील, कसा आवाज होअील, याचा विचार करीत मीही अुभा होतों. अितक्यांत तोफेच्या शेजारी पिरामिडप्रमाणें रचलेल्या तोफेच्या गोळ्यांच्या ढिगाकडे माझी नजर गेली. शत्रूचें जहाज आलें म्हणजे तोफेमध्यें हे गोळे भरून तोफ अुडवीत असतील. गोळा जहाजाच्या बरगडीला लागून फुटत असेल. मग आंत पाणी भरून तें समुद्राच्या तळाला जात असेल, अशा कल्पना माझ्या डोक्यांत आल्या. लिहावयाला वेळ लागतो तितका कल्पनेला लागत नाही. बुडणाऱ्या जहाजाचे चित्र मी मनापुढें आणीत होतों, अितक्यांत बावटेवाल्याचा कांकडा तोफेच्या काण्यावरील लहानशा पाळीला जाअून लागला. तेथील दारू भक् करीत आहे, अितक्यांत तोफेच्या तोंडातून अेकदम फाड्-ड् असा मोठा धडाका झाला. माझ्या कानठाळ्या बसल्या. छाती धडधड होअूं लागली. मी कुठें आहें याची जाणीवही त्या क्षणापुरती बधिर झाली. डोळ्यांपुढें धुराचे लोळच्या लोळ पसरले. तोफेच्या तोंडांत कोंबलेल्या कागदाच्या चिन्धडया कशा व कोठें अुडून गेल्या याची बातमीही लागली नाहीं. मात्र दारू जळल्याची घाण नाकांत शिरली. तोफेचा आवाज अितक्या जवळून कधींच अैकला नव्हता आणि आतां याचा जो अनुभव आला तो अितका अचानक आणि क्षणिक होता कीं तो अनुभव नीट ध्यानांत येण्यासाठीं मागाहून त्याचें विचारपूर्वक पृथक्करण करण्याची अिच्छा झाली. पण त्याच क्षणीं म्हणजे तोफेची गर्जना झाल्यानंतरच्या दुसऱ्या क्षणीं अेकदम मागल्या बाजूच्या डोंगरावरून आणि टेकडयांवरून मेघगर्जनेसारखा कडड् कडड् गडड् असे प्रतिध्वनी अैकूं येअूं लागले. जणुं कांहीं हा काय अुत्पात झाला हें पाहाण्यासाठीं सर्व टेकडया धांवून येत आहेत. आवाज अेवढा मोठा झाला कीं आजूबाजूचीं नारळीचीं झाडेंदेखील कांपूं लागलीं. तोफेच्या आवाजापेक्षां पहाडाचे हे पडसादच मला अधिक अद्भुत आणि आकर्षक वाटले. माझा श्वासोच्छ्वास क्षणभर थांबला. कांहीं कारण नसतांना गोंधळल्यासारखें होअून मी चारी बाजूला पाहूं लागलों. प्रतिध्वनि समुद्रावरील विस्तीर्ण आकाशांत लीन होअून गेला. तरीही माझ्या कानांत तो प्रतिध्वनि चालूच होता. आजदेखील त्याचें स्मरण होतांच तो प्रतिध्वनि पूर्वीसारखाच पण अुत्तरोत्तर मन्द आवाजानें अैकूं येतो.

मी खालीं समुद्राकडे वळून पाहिलें. मला पाहून हसऱ्या लाटा म्हणतात, "अरे, असें काय पाहतोस ? कोठें आहे तो तोफेचा आवाज ? संपलें. झालें तें होऊन गेलें. खरें म्हणावयाचें म्हणजे कांहीं झालेच नाहीं. जें जसें आहे तसेंच आहे आणि तसेंच रहाणार."

पण लाटांचें सत्य तें माझें सत्य नव्हतें.

आतां भाडें जास्ती मिळूं लागल्यामुळें घरवाल्या रामजीशेटनीं आपल्या वखारीचे चार भाग केले होते. अेका भागांत कोप्पीकर मामलतदार रहात असत. शेजारच्या भागांत आम्ही रहात होतों. आमच्या या भागांत आमच्या पूर्वी साठे म्हणून अेक ओव्हरसियर रहात असत. त्यांनीं बाहेरच्या ओट्यावर बाम्बूचे तट्टे ठोकून अेक नीटनेटकी खोली बनविली होती. अेन्जीनिअरच्या देखरेखीखालीं बनलेली ! अर्थात् ती नीटनेटकी असणारच. आम्ही या खोलींत अभ्यासाला बसत असूं. बाबाला कोणी भेटावयास आले तरी ती मंडळी देखील आमच्या खोलींतच बसण्याचें पसंत करीत. मला स्वतःला ती खोली अितकी आवडली होती कीं रात्रीं निजण्याचें देखील मी या बाहेरच्या खोलींतच ठेवलें होतें. घराच्या बाहेर असें निजल्यानें सकाळीं साडे-चार वाजतां मला अुठतां येत असे, हाही अेक मोठा फायदाच होता.

आमच्या शेजारचीं मुलें बाहेरच्या ओट्यावर खेळत असत आणि आरडा ओरडा करीत. आम्हांला हें आवडत नसे; पण असा आवाज सहन करणें आम्हांला कठीण जात नसे. कारण आम्ही देखील जेव्हा चर्चेला पेटत असूं तेव्हां सारी वखार दणदणून जात असे. शांतीचा आधुनिक आग्रह आम्ही त्या वेळीं कमावला नव्हता.

पण जेव्हां शेजारचीं मुलें स्वतःच्या ओट्यावर धांवत धांवत येअून आमच्या

तट्ट्यावर जोरानें हात आपटत तेव्हां मला धीर रहात नसे. त्या कारट्यांना मी अनेकदां सांगून पाहिलें, रागे भरून पाहिलें; पण त्याचा कांहीं अुपयोग झाला नाहीं. मुलांच्या दंगामस्तीमुळें आमच्या भिंतीचा तट्टया दबला तो अेकाद्या चौकोनी तव्यासारखा झाला. भिंतीची शोभा तर गेलीच; पण तट्टया आंत वांकल्यामुळें खोलीतील जागाही कमी झाली. मी तट्ट्या आतून दाबून तो बाहेरच्या बाजूनें फुगवला. आपली जागा निष्कारण काय म्हणून कमी होअूं द्यावी ? पण याचा परिणाम अुलटाच झाला. भिंतीचा भाग फुगलेला पाहून मुलांना त्याचेवर हात आपटण्याची मौज वाटूं लागली. मुलांनी जोरांनीं हात मारले म्हणजे तट्टया आंतून फुगीर होअी.

आता काय करावें ? मी जाअून मुलांच्या आअीकडे तक्रार केली. त्या लोकांची भाषा कोंकणी. मी सांगे मराठीतून. त्यामुळें समजण्यास थोडी अडचण अुत्पन्न होत असे खरी; पण मुख्य गोष्ट म्हणजे ते लोक बेदरकार. माझें म्हणणें ते मनावर घेअीनात. "असेल, असेल; पाहूं." असें म्हणून त्यांनीं मला अुडवून दिलें. मी मनापासून रागावलों. मुलांची दंगामस्ती कमी होअीना. शेवटी त्रासून मी अेक आसुरी अुपाय योजण्याचें ठरविलें. याच सुमारास गोंदूला त्रिफळीच्या झाडाचे मोठेमोठे कांटे आणून त्यांचा पृष्ठभाग सपाट करून त्यावर स्टॅम्प ( छाप ) कोरण्याचा नाद लागला होता. कोरण्यासाठीं त्यानें सुजनासारखें अेक अवजार कोटूनसें आणलें होतें. पोलादाची त्रिकोनी किंवा चौकोनी सळअी तिरपी घांसून त्याचा पाना तीक्ष्ण करण्यांत आला होता. हें अवजार हातांत घेअून, त्याचें टोंक तट्टयांत शिरकावून मी मागल्या बाजूनें तयार राहिलों. नेहमीप्रमाणें शेजारचा खोडकर मुलगा धांवत धांवत आला आणि त्यानें आपले दोन्ही तळहात त्या फुगवटयावर मारले. त्यानें जितका जोर केला तितक्याच जोरानें माझ्या त्या अवजाराचें टोंक त्याच्या तळहातांत घुसलें. मुलानें अेकदम किंकाळी फोडली. त्याच्या हातांतून रक्त वाहूं लागलें. मुलाला जरा लागेल, तो ओरडेल, अेवढीच माझी अपेक्षा होती. आणि त्या प्रसंगाची मी आनंदानें वाट पहात होतों. पण मी अटकळ केली होती त्यापेक्षां त्याला थोडे जास्ती लागलें. त्यामुळें त्यानें फोडलेल्या किंकाळीनें माझ्या त्रिडलेल्या हृदयाला संतोष देण्याअेवजीं त्याची ती किंकाळी माझ्या त्या अवजाराप्रमाणेंच माझ्या हृदयाला लागली. छातीच्या मध्यभागीं अेकादा धोंडा लागावा त्याप्रमाणें मला झालें. मी तें हातांतील सुजन टेबलाखालीं ठेवून दिलें आणि आतां पुढें काय होणार याची वाट पाहूं लागलों. मुलाची किंकाळी अैकून त्याची आअी धांवत आली. त्यांचा सैंपाकीही धांवत

आला. आतां हे लोक माझेशीं भांडायला येतील याची मला खात्री होती. पण मुलाच्या हाताला झालेल्या जखमेवर अिलाज करण्याचे धांदलींत माझेशीं भांडायचें कुणाला सुचणार ? त्यांचे अुद्‌गार मला अैकूं येत होते. त्यांत क्रोध किंवा चीड नसून फक्त दुःखच होतें. माझ्या अपेक्षेच्या हें सर्व अुलटेंच झालें. त्यामुळें मला कसेंसेंच वाटूं लागलें. मी खजील झालों. ते लोक जर माझेशीं भांडावयाला आले असते तर न्यायाचा पक्ष माझाच आहे असें म्हणून मलाही भांडावयाला जोर आला असता. त्यांनीं माझें नांवही घेतले नाहीं. तेव्हां आपण कोणती वृत्ति धारण करावी हेंच मला कळेना. अिन्साफ स्वतःच्या हातीं घेअून मी सूड अुगवायला गेलों. पण रागानें आंधळा झालेला मनुष्य न्याय मिळविण्याच्या अेवजीं अत्याचार करून मोकळा होतो. माझ्या कृत्याचा विचार करतां माझ्या स्वतःच्या दृष्टीला देखील त्या मुलाची आगळीक क्षुल्लक वाटूं लागली. मी स्वतःचे दृष्टीनें देखील गुन्हेगार ठरलों.

मुलगा तर रडतच होता. स्वैपाकी त्याच्या हातावर पाणी ओतीत होता. मुलाला किती लागले आहे हें पहाण्याची माझी अिच्छा अनावर झाली. त्यांच्या ओट्यावर सरळ जाण्याची माझी हिम्मत नव्हती. तेव्हां माझ्या टेबलावर अुभें राहून तट्ट्याच्या भिंतीवरून चोराप्रमाणें मी पाहूं लागलों. असें करण्याची खरोखर कांहीं जरूर नव्हती. पण माझ्याच्यानें राहवेना. मी वर चढून पाहतों अितक्यांत माझ्या दुर्दैवानें आअीची दृष्टि माझेवर पडली. त्या वेळीं आअीनें रागानें मला चार शिव्या दिल्या असत्या किंवा अेकादा शाप दिला असता तरी मी तें सहन केलें असतें. पण आअीच्या डोळ्यांत फक्त अुद्विग्नताच होती. ती अेवढेंच म्हणाली, "पहा, हें तूं काय केलें आहेस तें !" आअीचा अुद्‌गार देखील माझ्या हृदयाला तीक्ष्ण शस्त्रासारखा बोंचला. माझें तोंड अुतरून गेलें. मीं म्हणालों खरा "मी नाहीं कांहीं केलें"; पण माझा आवाजच सांगत होता कीं माझ्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

बिचाऱ्या आअीला अितकें कांहीं वाअीट वाटले कीं तिनें कोणाही जवळ झालेल्या गोष्टीविषयी ब्रदेखील काढला नाहीं. अति दुःख आणि अति उद्‌वेग यांमुळें ती अगदीं शान्त राहिली. पण तसें करून तिनें माझ्या शान्तीचा मात्र पूर्ण नाश केला. कित्येक दिवसपर्यंत मी शेजारच्या लोकांना तोंड दाखविलें नाहीं. जेव्हां जेव्हां मुलाची आअी समोरून जातांना दिसे, तेव्हां तेव्हां मी तेथून मान खालीं घालून निसटून जात असें. मुलांची दंगामस्ती बंद झाली खरी; पण हा विजय मला फारच

महाग पडला. पुष्कळ दिवस निघून गेले. त्या लोकांची भाषा मला अधिक समजूं लागली. परिचय वाढून मी त्या लोकांत मिसळून गेलों. फार काय-त्या मुलाला माझा लळा लागावा अितका मी त्याला खेळवूं लागलों. पण त्यानन्तर त्याच्या आअीनें त्या प्रसंगाची गोष्ट मजजवळ कधीही काढली नाहीं आणि मीही कधीं त्याचा अुल्लेख केला नाहीं. तो मुलगा स्वतःचें दुःख विसरला असेल; पण त्या दिवशींच्या माझ्या दुष्टतेचा विषाद मात्र मी अजून विसरूं शकलों नाहीं.

## हिन्दु स्कूल



नीति किंवा सदाचाराविषयी माझा प्रत्यक्ष परिचय करून देण्याचे काम माझ्या घडील बंन्धूनी केलें होतें. धर्मनिष्ठेची कल्पना वडिलांच्या आणि मातुश्रींच्या आचरणामुळें मनावर चांगली ठसली; पण योग्य काळीं नीतीचें आणि धर्माचें तात्त्विक स्वरूप आणि गाम्भीर्य हृदयावर ठसविणारें होतें: माझे पूज्य शिक्षक वामनराव दुभाषी. कारवारांत त्यांनीं "हिन्दु स्कूल" म्हणून अेक खाजगी संस्था काढली होती. आमच्या वेळीं या संस्थेंत अिंग्रजीच्या फक्त तीनच अियत्ता होत्या. या शाळेंत तीन शिक्षक काम करीत असत. महाराष्ट्रांत विद्यार्थ्यांना शिक्षकांचा परिचय त्यांच्या आडनांवावरूनच असतो. आश्रमासारखी संस्था असली किंवा विद्यार्थ्यांचे शिक्षकांशीं घरोब्याचे संबंध असले तर अध्यापकांना अण्णा, तात्या, नाना, काका, वगैरे कौटुंबिक नातें दाखविणारीं नांवें ठेवलेलीं असावयाचीं. प्रोफेसर विजापूरकरांना अण्णा म्हणत असत. प्रोफेसर ओकांना नाना, नारायणशास्त्री मराठयांना मामा म्हणत असत; पण कारवारमध्यें पहावें तों विद्यार्थी शिक्षकांविषयीं त्यांच्या नांवानेंच बोलत. हिन्दु स्कूलचे तीन शिक्षक होते. वामनमास्तर, हरिमास्तर आणि विठ्ठलमास्तर. यांपैकीं विठ्ठलमास्तर प्रभावशाली नव्हते. पण खेळांत आमच्याशीं मिसळत असल्यानें ते बरेच विद्यार्थीप्रिय होते.

माझा प्रथम परिचय झाला तो हरिमास्तरांशीं. कारण ते अिंग्रजी दुसरी शिकवत. मराठी चौथी आणि अिंग्रजी पहिली या दोन वर्षांत मी माझे गणित बरेच चांगले केलें होतें. पण येथें गणित अिंग्रजीतून करावे लागे. दुसऱ्या यत्तेंतील मुलांना गणित अिंग्रजींतून करावे लागणें हा अत्याचार आहे असे त्या वेळीं मानले जात नसे. प्रथम प्रथम गणिताचा तास आला म्हणजे मला नकोसे होअी. हरिमास्तर स्वभावानें रजोगुणी. थोडक्या गोष्टीनें चिडून जात आणि जरा कांही झालें म्हणजे संशय घेत. पण त्यांना विद्यार्थ्यांची काळजी पुष्कळच. व्याख्यान देण्याची हौसही त्यांना पुष्कळ. अेकाददुसरी प्रवृत्ति हाती घेतल्याशिवाय त्यांना शान्ति वाटावयाची नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सतत चळवळीचे समाधान त्याना प्रिय होतें.

मुलांचे अिंग्रजी अुत्तम करून देणें ही त्या काळीं शिक्षणाची अुत्तम कसोटी मानली जात होती आणि नीतीचें शिक्षण देणे यांत शिक्षकाचा आत्मसंतोष असे मला आठवतें कीं हरिमास्तरांच्या वर्गात आम्ही सोप्यासोप्या अिंग्रजी कविता बऱ्याच शिकलों होतो, आणि तिसरींत गेलों तेव्हां खाजगी वर्ग घेअून आमच्या मास्तरांनीं "*Lady of the Lake*" या काव्याच्या जवळ जवळ दोनशें ओळी आमचेकडून करून घेतल्या होत्या. हिन्दु स्कूलमध्ये दीडेक वर्ष राहिल्याने माझा अिंग्रजीचा पाया असा कांही मजबूत झाला होता की मॅट्रिकपर्यंत मी अिंग्रजींत नेहमीं वर यावयाचा. पुढें अिंग्रजी पांचवींत मी अिंग्रजी व्याकरण आणि वाक्यपृथक्करण वगैरे भाग केले. अेवढीच माझी तयारी. कॉलेजमध्ये देखील मला अिंग्रजींत चांगले मार्क मिळत असत. पण सुदैवानें मला भाषेपेक्षां ज्ञानाची गोडी अधिक लागली. त्यामुळें अेकाही भाषेंत प्रावीण्य मिळविण्याचा प्रयत्न असा मी केला नाहीं. त्या त्या भाषेंतील कठिणांतील कठीण ग्रन्थ आपल्याला अचूक समजावे, भाषेच्या आणि अर्थाच्या खुब्या चटकन ध्यानांत याव्या आणि स्वतःचे विचार सोप्या भाषेंत मांडतां यावे याहून अधिक महत्त्वाकांक्षा मला कधींच शिवली नाहीं.

हरिमास्तरांना तपकिरीची संवय होती. त्यांना त्याचे वाअीटही वाटे. वर्गांत ते बोलूनही दाखवीत, "हें अेक वाअीट व्यसन आहे. मी किती जरी प्रयत्न केला तरी सुटत नाहीं." माझ्या सरळ स्वभावाप्रमाणें मी ताबडतोब स्वीकारलें कीं हे म्हणतात तसेंच असलें पाहिजे. तरीसुद्धां त्या वेळीं मला मनांतून असेंही वाटे की तपकिरीच्या व्यसनाविषयीं त्यांना मनापासून तिरस्कार नाहीं. तपकीर ओढणें हें वाअीट आहे, तें व्यसन आहे, अेवढें तत्त्वतः कबूल केलें आणि स्वतःच्या अशक्तीचा प्राञ्जलपणें

स्वीकार केला म्हणजे पुष्कळच झालें, असें त्यांना आंतून वाटत असावें–अशा प्रकारची अस्पष्ट छाप माझ्या बालमनावर देखील पडल्यावांचून राहिली नाहीं.

कोंकणांतील त्या काळच्या फॅशनप्रमाणें हरिमास्तरांच्या शेंडीचा घेर बराच मोठा होता त्यांचे केसही कांहीं कमी लांब नव्हते. शिकवण्याच्या रंगांत आले कीं त्यांचा हात नकळत शेंडीकडे जाअी. आणि तेथून ते अेकादा केस पकडून जिभेकडे आणीत. आणि मग त्या केसाच्या मदतीनें जीभ आणि बोटें यांच्यामध्यें गजग्राह चालावयाचा. केंस तोंडांत घालणें अस्वच्छ असें घरीं लहानपणापासून समजत आल्यामुळें हरिमास्तरांची ही संवय मला कशीशीच वाटे. त्यामुळें वर्गात माझ्या अेकाग्रतेंत पुष्कळदां बाध येअी. सहा अेक महिने मी त्यांच्या वर्गात होतों. पण रोजरोज पाहून देखील त्याचें तें तसें करणें माझ्या आंगवळणीं पडलें नाहीं. किंवा 'डोळवळणीं' म्हटलें पाहिजे.

हरिमास्तर शिकविण्यांत फार हुशार होते. अिंग्रजीच्या शुद्ध अुच्चाराविषयीं त्यांचा विशेष आग्रह असे. त्यांना स्वःला जरी संस्कृत येत नव्हतें तरी त्यांनीं आमच्याकडून कित्येक संस्कृत सुभाषितें पाठ करवून घेतलीं होतीं. भाषांतरावर देखील त्यांचें चांगलें लक्ष असे. त्यांची जन्मभाषा कोंकणी: त्यामुळें त्यांना मराठी सफाअीदार येत नसे. आमच्या वर्गात शुद्ध मराठी येणारा मी अेकटाच. बाकी सर्व विद्यार्थी घरीं, दारीं, व्यवहारांत कोंकणी बोलत आणि शाळेंत मात्र कानडीतून किंवा मराठीतून शिकत. अशी स्थिति होती. आमच्या वर्गात अिंग्रजीचें भाषान्तर दोन्ही भाषांतून चाले. अशा प्रकारे कानडी भाषा प्रथम माझ्या कानी पडली. त्या वेळींच विशेष लक्ष दिलें असतें तर अेक द्राविडी भाषा सहजच पदरांत पडली असती. स्वतःला मराठी बेताचीच येते ही गोष्ट लपविण्याचा प्रयत्न हरिमास्तरांनीं कधींही केला नाहीं. अेक दोन वेळां जाहीर भाषणांत स्वतःला नेमका शब्द न आठवला असतांना, मला जवळ बोलावून माझेपासून तो शब्द त्यांनीं विचारून घेतल्याचें मला आठवतें.

हरिमास्तरांच्या वर्गात असतांना मला त्यांची भीति वाटत असे. पण कोणत्याही प्रसंगीं खरेच बोलावें या गोष्टीचे महत्त्व मी त्याचेकडून चांगलें शिकलो. हिन्दु स्कूल-मध्यें असतांना कधीं खोटें बोलल्याचा अेकही प्रसंग मला आठवत नाहीं. प्रथम प्रथम खोटें बोलण्याचा मोह आवरून आम्ही खरेच बोललों हें पाहून ते क्षमा करीत; पण पुढें

पुढें खरे बोलण्यासाठीं अशा प्रकारे लांच देणें त्यांना अयोग्य वाटले. त्यामुळे पुष्कळ वेळीं खरेपणानें अपराध कबूल करून देखील आम्हांला यथास्थित चोप बसे. पण खोटे बोलून मार चुकवणें सहज शक्य असतांना देखील खोटें बोलणें हीनपणाचें आहे येवढ्याचसाठीं खरें सांगण्याची हिम्मत आमच्यांत आली होती. आम्ही मन लावून अुत्साहानें शिकावें म्हणून हरिमास्तरांनीं अेक सुन्दर युक्ति शोधून काढली. शिक्षणशास्त्राच्या दृष्टीनें तिचे महत्त्व विशेष आहे. लहानपणापासून आम्हांला मार्क ( गुण ), १ला नंबर, चढाओढ आणि ब्लॅकबेन्च ( ज्यांनीं अभ्यास केला नसेल त्याला वर्गातून काढून न लावतां अेका बाजूला निराळ्या बांकावर बसवून वाळीत टाकण्याच्या प्रकाराला ब्लॅकबेन्च म्हणत ) याचा अनुभव होता. चढाओढ चालू असली म्हणजे सौम्य स्वरूपांत का होअीना प्रत्येक विद्यार्थ्याला वाटतें कीं, अितर विद्यार्थी आपले प्रतिस्पर्धी म्हणजे शत्रू आहेत; त्यांचेशीं लढून, त्यांचा पराजय करून, पहिले आले पाहिजे. नंबराविषयीं अुदासीन असलेला माझ्यासारखा विद्यार्थी चुरशीच्या विषापासून वांचला जाअी. पण पहिल्या नंबराचा लोभ असलेल्या विद्यार्थ्यामध्यें पुष्कळ वेळां मत्सर, अीर्षा, असूया आणि स्वार्थ हे दोष दिसावयाचे. हे विद्यार्थी ज्ञानचोर तर असावयाचेच ( ज्ञानचोरीसाठीं आपलें जुनें नांव चित्तशाठ्य. कोणी काही माहिती विचारली किंवा अभ्यासांत मदत मागितली तर सरळपणें न शिकवतां अथवा सरळपणें नाहीं न म्हणतां वरवर शिकवल्यासारखें करावें, मह्खीच्या गोष्टी लपवाव्या आणि टाळाटाळी करावी. याला चित्तशाठ्य म्हणतात. ) आणि जर शिक्षक असंस्कारी अथवा हलक्या कानाचा असला तर चुरशीला बळी पडलेले विद्यार्थी चहाडखोरही बनतात. अशा विद्यार्थ्यांना तीन प्रकारचीं व्यवधानें सांभाळावीं लागतात. आपला विषय अुत्तम शिकणें, आपल्या प्रतिस्पर्ध्याची तयारी कितपत आहे, कोणत्या बाबतींत तो गाफील आहे, हें शोधून काढण्यासाठीं त्याचेवर पाळत ठेवणें आणि काय केलें असतां शिक्षक खूष आणि प्रसन्न होतील अिकडे लक्ष ठेअून शिक्षकाला पचेल त्याप्रमाणें त्यांची स्थूल किंवा सूक्ष्म खुशामत करणें. प्राचीन काळापासून मनुष्यसमाजांत वाग्युद्धाचा प्रचार झाला असल्यामुळें पंडित लोकांमध्यें, गवयी, चित्रकार, वगैरे गुणीजनांमध्ये हे सर्व दुर्गुण कमीअधिक प्रमाणांत दिसून येतात. समाजांत गुलामी वृत्ति वाढण्याच्या अनेक कारणांमध्यें हीन प्रकारची ही चुरस अेक महत्त्वाचें कारण आहे.

हरिमास्तरांनीं अेक नवा प्रकार म्हणून जी युक्ति अमलांत आणली होती तिच्यामध्यें चुरशीचें हें तत्त्व थोडें व्यापक होअून तिच्याच पोटांत परस्पर-सहकाराचें

तत्त्व दाखल झालें होतें. त्यांनीं आमच्या वर्गाच्या दोन तुकड्या पाडल्या किंवा खरे म्हणावयाचें म्हणजे आमच्या वर्गाच्या दोन तुकड्या पाडण्याचें त्यांनीं आम्हांला स्वराज्य दिले. आम्ही आमचे दोन पुढारी पसंत केले. मग खेळांत होतें त्याप्रमाणें प्रत्येकानें आपापले गडी पसंत करून वर्गाच्या दोन तुकड्या पाडल्या. आठवड्याचे शेवटी प्रत्येक तुकडींतील मुलांच्या मार्कांची बेरीज करून ज्या तुकडीचे गुण अधिक भरतील त्या तुकडीला पहिली तुकडी म्हणण्यांत येअी आणि तिला पुढला सर्व आठवडा शिक्षकाच्या अुजव्या बाजूच्या बांकांवर बसण्याचा अधिकार मिळे. ही योजना अमलांत येण्यापूर्वी पहिल्या नंबराची भूक असलेल्या चारपांच विद्यार्थ्यांत चढाओढ असल्यानें तेच कायते अभ्यासांत विशेष लक्ष देत. यांखेरीज अभ्यासाच्या विषयाचीच गोडी असलेला माझ्यासारखा अेकादा विद्यार्थी वर्गातील विषयाकडे कमीअधिक ध्यान देअी. बाकीचे खालचे सर्व विद्यार्थी महिष-वृत्ति धारण करून बसून असत. 'आपल्याला कुठें पहिला नंबर मिळवावयाचा आहे' अशा प्रकारचें सनातनी समाधान बाळगण्यांतच मोठेपणा आहे असें ते समजत.

ही नवीन व्यवस्था सुरू झाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्याला असें वाटूं लागलें कीं, आपण आपल्या हातून होअील तेवढें अुत्साहपूर्वक शिकलें पाहिजे. स्वतःला पहिला नंबर मिळवावयाचा नसला तरी आपल्या तुकडीला पहिला नंबर मिळवून देण्याची मेहनत आपल्या हातून सहज होण्यासारखी आहे आणि त्याप्रमाणें करणें आपला धर्म आहे. यांतच संघनिष्ठा आहे. याप्रमाणें या नव्या विचारानें सर्व विद्यार्थी कसून अभ्यास करूं लागले. पुढें पुढें आम्ही आपापल्या तुकडींतील कच्च्या किंवा मंद विद्यार्थ्यांना घरीं बोलावून शिकवूं लागलों. अेकमेकांना आपलीं पुस्तके द्यावीं, ज्याला जें न समजेल त्याला तें दुसऱ्यानें समजवावें. खास ध्यानांत धरावयाच्या गोष्टींची यादी करावी आणि विशेष महत्त्वाचें म्हणजे आपल्या तुकडींतील सर्वांना सहानुभूतीचा खुराक देत रहावें. अेका महिन्याच्या आंत या पद्धतीचा फायदा आम्हांला प्रत्यक्ष दिसूं लागला. आमच्यांत भातृभाव वाढला. संघवृत्ति अुत्पन्न होअून दृढ झाली. आम्ही अेकमेकांच्या घरीं जाअूं लागलों. आणि अभ्यासाखेरीज अितर गोष्टींत देखील अेकमेकांच्या अुपयोगी पडूं लागलों.

हा झाला अंतस्थ लाभ. पण दोन तुकड्यांमधील चुरशीचें प्रमाण हळूहळू अधिक तीव्र होअूं लागलें. विरुद्ध तुकडीच्या विद्यार्थ्यांना मदत करावयाची नाहीं असें आम्हांला वाटूं लागलें. त्यांच्यांतील अुणीवा पाहून आम्हांला आनंद होअी.

हिन्दु स्कूलमध्यें मिळत असलेल्या नैतिक शिक्षणामुळें हा दोष माझ्या ध्यानीं आला. मी माझ्या स्वभावाप्रमाणें माझ्या तुकडीच्या विद्यार्थ्यांना अपील केलें औदारतेचें किंवा सद्भावाचें तें अपील नसून मोठेपणाचें होतें. प्रतिपक्षापैकी अेकाद्यानें जर आपली मदत मागितली तर आपल्या पक्षाच्या विद्यार्थ्यांपेक्षां देखील आपण त्याला अधिक मदत केली पाहिजे–यांतच आपला थोरपणा आहे–असें छाती फुगवून मी माझ्या तुकडीच्या विद्यार्थ्यांना समजावले. याचा परिणाम शुभ झाला हें सांगणें नलगे.

कांहीं दिवसांनीं विद्यार्थी दोन तुकडयांना दोन राज्यें समजूं लागले. तुकडीचा नायक तो राजा, नंतर प्रधान, सेनापती, वगैरे सर्व अधिकारी नेमण्यांत आले. या राज्यव्यवस्थेमध्यें मला दोन राज्यातील तंट्यांतील निर्णय करणारा न्यायाधीश म्हणून नेमण्यांत आले. वर्ग चालू असतां मीं एका तुकडीचा प्रजाजन म्हणून गणला जात असे. पण वर्गाच्या बाहेर दोन तुकडयांचा न्यायाधीश म्हणून. ( विचार करतां मला आतां वाटतें कीं माझ्या लेखनांत, भाषणांत किंवा चर्चेंत मूळ नैतिक मुद्यांचें जें विवेचन वारंवार येतें त्याचें कारण हिन्दु स्कूलमधील माझें हें विशिष्ट जीवनच असावें. जीवनराम कृपलानी मला वारंवार म्हणे कीं, वेळीं अवेळीं नैतिक चर्चा करण्याची तुला संवय आहे. त्यामुळें लोक तुझेपासून दूर होतात. मला वाटतें कीं जर ही गोष्ट खरी असेल तर त्याचें मूळही वर सांगितलेल्या परिस्थितींतच शोधलें पाहिजे. ) न्यायाधीश बनल्यानंतर चोवीस तास मी नीतीचा आणि न्यायाचाच विचार करूं लागलों. माझीं बालोचित स्वाभाविकता नष्ट झाली. आपण न्यायाधीश आहोंत या कल्पनेनें विद्यार्थ्यांना मी हुकूम करूं लागलों. अेकाद्या बंडखोर मुलानें माझा हुकूम अैकला नाहीं तर मला त्याचा फार राग येअी. पण तो राग तेवढयापुरताच. मनांत त्याचा कधीं आकस रहात नसे. अेवढेंच नव्हे तर असा विद्यार्थी जर कधीं गुन्हेगार म्हणून माझ्यापुढें–न्यायालयापुढें–आला तर माझी न्यायपरायणता सिद्ध करण्यासाठीं जाणून बुजून त्याच्याच बाजूला मी झुकूं लागलों. यामुळें माझी प्रतिष्ठा वाढली खरी; पण स्वाभाविकता मात्र गेली हें नुकसान कांहीं थोडेथोडकें नव्हतें.

## वामनमास्तर



हिंदु स्कूलमध्यें दुसऱ्या ओयसेंतून मी तिसऱ्या ओयसेंत गेलों तेव्हां मला वामनमास्तरांचा अधिक परिचय झाला. त्यांची छाप यापूर्वीच माझेवर पडूं लागली होती. दर रविवारीं वामनमास्तर आणि हरिमास्तर मिळून धार्मिक शिक्षणाचा अेक वर्ग चालवीत. सरकारी हायस्कूलांतील विद्यार्थी देखील त्यांत येत. अेकाद्या नैतिक, धार्मिक विषयावर प्रवचन होअी. पुढें पुढें त्यांनीं हरिश्चंद्राख्यान सुरू केलें. ओव्या वाचून त्यांचें विवरण करण्यांत येअी. हरिमास्तरांची बोलण्याची आणि विवरण करण्याची छटा सुंदर असे. पण वामनमास्तरांमध्यें कळकळ आणि गंभीरता अधिक असत. जीवनासारख्या पवित्र विषयांविषयीं आपण बोलत आहोंत याची जाणीव त्यांचेमध्यें स्पष्ट दिसून येअी. पण त्यांच्यांत कृत्रिमतेचा लवलेश नव्हता. मी जसजशी त्यांचीं प्रवचनें अैकूं लागलों तसतशी मला खात्री वाटूं लागली कीं, हे कोणी सामान्य मास्तर नसून चारित्र्यशील भव्य पुरुष आहेत. नकळत मी त्यांचा भक्त बनूं लागलों. त्यांना स्वतःची वासरी लिहिण्याची संवय होती. पुस्तकासारखी अेक जाड वही बांधून त्यांत ते रोज पुष्कळ लिहीत. पण तें सगळें अींग्रजींत. रोज वर्गांत येतांना ते आपली ती वासरिका बरोबर घेअून येत. आणि आम्ही अुदाहरणें करूं लागलों म्हणजे त्यांत कांहीं न् कांहीं लिहीत असत. बालोचित जिज्ञासेमुळें आम्ही ती वही

हातीं घेऊन त्यांत डोकावून पहात असूं. त्यांनीं कधी आम्हांला मना केले नाहीं. रागें भरण्याची गोष्ट तर दूरच. मी स्वतः त्यांची ती रोजनिशी अनेकदांच हातीं घेतल्याचे स्मरण आहे. मी जें पान उघडलें त्यांत ग्रहणाचें चित्र होतें आणि ग्रहणाविषयीच कांहीं लिहिलेलें होतें.

वामनमास्तर इंग्रजी फारच सुरेख शिकवीत. मराठी कविता देखील त्यांचेबरोबर वाचतांना आम्हांला आनंद वाटे. आम्हांला इंग्रजी " न्यू रॉयल रीडर " पुस्तक तिसरें चालत असे. त्यांतील दुसराच धडा मातेचें प्रेम यावरील कवितेचा होता. तिसरींत देखील ते आमचेकडून कविता करवून घेत असत. अशे दिवशीं वामनमास्तर वर्गात आले त्यांच्या हातांत पुस्तक नव्हतें. आल्याबरोबर नेहमींप्रमाणें खुर्चीवर न बसतां त्यांनीं वर्गात येरझारा घालण्यास सुरुवात केली. आणि अेकाअेकीं सुंदर वर्णन सुरू केलें. अेक मोठें जंगल आहे, पाअूस सारखा पडत आहे, पावसाबरोबर हिम ( *Snow* ) हि पडत आहे. अशा वेळीं अेक बाअी आपल्या लहानशा अर्भकाला छातीजवळ दाबून धरून तें जंगल पार करीत आहे. हळूहळू अंधार पडला आहे आणि तो वाढूं लागला आहे. बर्फाची वृष्टीदेखील वाढूं लागली आहे. पायाखाली बर्फाचा खच झाल्यामुळें चालणें मुष्कील झालें आहे. आतां कसे करावे? रात्र निघेल असें वाटेना. थंडी तर मी म्हणत होती. अितक्यांत आअीला अेकाअेकी अेक विचार सुचला. ही झोंबणारी थंडी माझ्या तान्ह्याला कशी झेपणार? तिनें मनाचा निश्चय केला. अंगांतील मोठा डगला काढला, आणि त्या अुबदार डगल्यांत आपल्या त्या जिवंत रत्नाला गुंडाळलें आणि जमिनीवर बसून मुलाला मांडीवर घेअून बालकावर बर्फ पडूं नये म्हणून तिनें आपल्या पाठीची कमान केली. झालें! व्हायचें तें होअून गेलें. पहाटे अेक वाटसरू त्या मार्गानें जात होता. बर्फात अेकादा कपडा दबला आ; असें पाहून त्यानें थोडेसें खोदून पाहिले. मातेचे शव थोडेसे बाजूला करतांच अुबदार डगल्यांत गुंडाळलेल्या मुलानें प्रकाश पाहिला आणि तें हंसलें. वामनमास्तरानीं अशा प्रकारचें कारुण्यमय आणि हृदय विरघळून टाकणारें वर्णन आमच्यापुढें वाढले. आमच्यापैकीं प्रत्येकाचें हृदय द्रवून प्रथम कासावीस झालें. पुढें आमचा श्वासोच्छ्वास देखील जणूं थांबला. अितकें झाल्यानंतर त्यांनीं तीच गोष्ट आम्ही समजूं शकूं अशा अत्यंत सोप्या अिंग्रजींत सांगितली. त्यांत जे दोनचार नवे शब्द आले त्यांचा अर्थ त्यांनी त्याच वेळीं आम्हांला सांगितला. हें सर्व आटोपून ते खुर्चीत जाअून बसले आणि म्हणाले, " चला आतां आपण आपला धडा सुरू करूं " नवीन धड्यांत

काय आहे हें पाहण्याची तसदी आम्ही घेतलीच नव्हती. कवितेचा धडा टाळावयाचा अशीच सर्वत्र प्रथा असे. पण वामनमास्तरांनीं "*A Mother's Love*" हाच धडा सुरू केला. ते कविता वाचूं लागले आणि ती आम्हांला आपोआप समजूं लागली. पाहतां पाहतां आम्ही त्या कवितेच्या प्रवाहावर पोहूं लागलों आणि त्याचेबरोबर वाहूंही लागलों. आणि जेव्हा मध्येंच—

*"Oh God !" she cried in accents wild,*
*"If I must perish, save my child."*

या ओळी आल्या तेव्हां तर सारा वर्ग शोकरसांत बुडून गेला. आमचा इंग्रजीचा वर्ग चालू आहे आणि आम्ही धडा शिकत आहोंत यांचें भानच कोणाला राहिले नाहीं. याचप्रमाणे "*The Blind Boy*" ही कविता देखील त्यांनीं आम्हांला अनुरूप पद्धतीनें शिकवली. इंग्रजी वाचण्याची त्यांची तऱ्हा अशी काहीं स्पष्ट, रेखीव, उठावदार आणि भाव-वाही असे की मधले कांहीं शब्द ठाऊक नसले तरी अर्थ नेमका मनांत बिंबत असे. पण या सर्वांत नाटकी हावभाव मुळींच नसत.

कविता किंवा अितर पाठ शिकवितांना ते त्यांतील नीतिबोधही आम्हास समजावून सांगत. आजकालच्या शिक्षकांत आणि साहित्यसेवकांत नीतिबोधाची फोड करून सांगण्याचें बाबतीत अरुचि दिसून येत आहे. प्रत्यक्ष बोध केव्हांही नीरस आणि निष्परिणामी असतो. असा आजच्या युगाचा अभिप्राय आहे. अेका परदेशी साहित्यकारानें म्हटले आहे कीं, लिखाण बोधगर्भ असल्यास हरकत नाहीं पण लेखकानें सुशीणपणा करण्याच्या भानगडीत पडूं नये. साहित्याच्या दृष्टीनें हा कलाबोध यथायोग्य आहे. पण साहित्याचे प्राथमिक पाठ शिकविणाऱ्या शिक्षकानें जर हें काम केले नाहीं तर साहित्य आणि नीति दोघांचाही कोंडमारा व्हावयाचा. आजकालचे शिक्षक नीतीच्या चर्चेला बिचकतात. यांचें कारण त्यांच्या मधील भावनांचे अुथळपण हेंच आहे, असा माझा अभिप्राय आहे. वामनमास्तरांच्या नैतिक अुत्साहाचा आणि कळकळीचा आमचेवर असा कांहीं प्रभाव पडला कीं सत्ययुगांतील क्षात्र धुरंधरासारखा (*Knights* सारखा) अुत्साह आणि पुरुषार्थ आमच्यामध्ये स्फुरूं लागला

अेके दिवशीं खालच्या वर्गातील अेक मुलगा कांहींसा निरोप घेऊन आमच्या वर्गांत येऊन अुभा राहिला. मुलगा अगदीच खेडवळ होता. कपडे अव्यवस्थित. अंगांत सदरा न घालतांच त्यानें कोट घातला होता आणि कोटांत त्याची छाती मावत नसल्याने त्याचें बटनही खुले होतें. असें हें ध्यान पाहून आम्हांला गंमत

वाटली. पण मुलाला त्याचें कांहीच वाटत नव्हतें. तो प्रसन्नपणें हंसत हंसतच आमच्या वर्गांत आला. वामनमास्तरांनीं त्याला कोटाचें बटन लावण्यास सांगितलें. मास्तरांचा शब्द राखण्यासाठीं त्यानें तसें करण्याचा प्रयत्न केल्यासारखे केलें. कारण त्याला ठाऊक होतें कीं बटन कांहीं काजापर्यंत पोहोचावयाचें नाहींत. मग तो कितीका प्रयत्न करीना. आम्ही सर्व हसूं लागलो.

काम आटपून मुलगा परत गेल्यानंतर वामनमास्तरांनीं आम्हांला ठपका दिला आणि म्हटलें, " त्या मुलाच्या शरीराची सुदृढता कशी होती तें तुम्ही पाहिलेत ना ? धट्टाकट्टा मुलगा आहे. त्याचे सारखा निर्दोष आरोग्यवान आणि अंगांत रक्त मुसमुसत असलेला मुलगा तुमच्यांत कोणी आहे का ? त्याच्या त्या अुघड्या छातीचा हेवाच वाटावा. घरीं तो अंगभर मेहनत करीत असेल ! गरिबीनें आणि साधेपणानें रहात असेल. तरीही किती मोकळेपणानें हंसत होता. त्याच्या वांट्याला आजही सत्ययुगच आहे. आरोग्य आणि सामर्थ्य दुधा-तुपांत किंवा बदाम-पिस्त्यांत नसून अशा शुद्ध, स्वतंत्र, मेहनती आणि मोकळ्या जीवनांतच आहे. " आम्हांला वस्तूंचें खरें महत्त्व मापण्याची नवीन दृष्टीच मिळाली.

आमच्या वर्गात आम्ही तिघेचौघे सरकारी अम्मलदारांचे मुलगे होतो. शिकण्यांत देखील आम्ही तिघे विशेष होतों. अशा रीतीनें शिकण्यांतील हुशारी आणि सामाजिक प्रतिष्ठा या दोन्ही बाजूंनीं श्रेष्ठ असल्यानें आमच्यामध्ये नकळत आणि कांहींसा अस्पष्ट असा अेक भाव अुत्पन्न झाला होता कीं आम्हींच सर्वांत चांगले आहोंत. मनांत अहंकारानें घर करण्याअितकी ती जाणीव स्पष्ट नव्हती. कारण कांहीं झालें तरी आम्ही मुग्धच होतों. आणि सर्वांशीं बरोबरीच्या नात्यानें वागत होतों. पण आज जेव्हां अेक शिष्टाचार-शून्य खेडवळ मुलगा आमचेहून श्रेष्ठ ठरला तेव्हां चांगल्यावाओटपणाची अेक नवीन कसोटी आमच्या हातीं आली. आम्ही डेमॉक्रॉसी ( *Democracy* ) शिकलों.

" कितीतरी वर्षें झालीं आपण कुळदेवाच्या दर्शनाला गेलो नाही; कितीतरी नवस फेडावयाचे राहून गेले आहेत. आपण असेच राहिलों तर कुळस्वामींचा कोप नाहीं का होणार ? " असें आईला वडिलांचेजवळ म्हणतांना मी कितीदां तरी ऐकलें होतें. आणि दर वेळेला वडिलांनीं म्हणावें कीं " काय करावें, रजा मिळाली पाहिजे. रजा मिळतांच आपण घाटाखालीं जाऊं. " घाटाखालीं म्हणजे कोंकणांत. तेथें गोमंतकांत आमच्या कुळदेवाचे—मंगेशाचें—स्थान आहे. मला वाटतें मंगलेश वरून ' मंगेश ' हें नांव पडलें असावें. कदाचित् महान् गिरीशचे मंगेश झाले असावे.

गोव्यामध्यें पोर्चुगीज लोकांचे राज्य सुरू झालें तेव्हां धर्माच्या नांवानें पारावार जुलूम होत असे. त्या धर्मांध ख्रिस्ती लोकांनीं असंख्य ब्राह्मणांना आणि अितर हिंदू लोकांना जबरदस्तीनें बाटवलें. मंदिरे भ्रष्ट करून किंवा तोडून त्यांच्या अिगरजी बनविल्या ( अिगरजी म्हणजे ख्रिस्ती लोकांचें देअूळ. यावरूनच हिंदुस्तानीमध्यें चर्चसाठीं गिरीजाघर हा शब्द आला आहे. ) गोव्याच्या जुन्या वस्तींत अिगरजीशिवाय अितर कोणतेंही मंदिर असताच कामां नये. कुणी बांधलें तर तो गुन्हा गणला जाअील, धार्मिक किंवा कसल्याच मिरवणुकी काढतां कामा

नयेत—अित्यादि कायदे केले होते. यापैकीं बरेच कायदे अगदीं परवां-परवां-पर्यंत अमलांत होते. पुढें जेव्हां पोर्चुगालमध्यें राज्यक्रान्ति झाली आणि प्रजासत्ताक राज्य स्थापले गेलें तेव्हां हा धार्मिक जुलूम आणि ही कुचंबणा बंद झाली. सध्यांचें सरकार धर्मशून्य बुद्धिवादी आहे. त्याच्या मतें सगळेच धर्म लोक-भ्रमाचीं स्वरूपें आहेत. आजच्या तेथील सरकारानें सगळ्याच धर्माविषयीं पक्षपातरहित अुपेक्षेची नीति धारण केली आहे. *

धार्मिक जुलमाच्या त्या काळीं गोव्यांतील आमच्या जातीच्या कित्येक पुढा-च्यांनीं विचार केला कीं, आपल्याला तर हे लोक बाटवणारच; पण कुळदेवाची मूर्ति भ्रष्ट होअूं देतां कामा नये. रातोरात त्यांनीं मंदिरांतील महादेवाची शिळा तेथून हलवून जुन्या वस्तीच्या बाहेर तिची स्थापना केली. हें नवे स्थान मंगेशी या नांवानें प्रख्यात आहे. महादेवाला दूर नेअून सुरक्षित करतां आलें; पण देवाला वांचवणारे ते लोक जमीनजुमला आणि अिष्टमित्र सर्व कांहीं सोडून कोठे जाअून राहणार ? त्यांनीं लाचारीने आणि जळत्या हृदयानें ख्रिस्ती धर्मांत प्रवेश केला. ते दर रविवारीं नियमितपणें चर्चला जात पण घरीं सोमवार, अेकादशी, शिवरात्र, वगैरे सर्व कांहीं यथासांग करीत. ख्रिस्ती पाद्र्यांना याचा मागमूस लागूं नये अेवढी काळजी ते घेत. मुलींचीं लग्नें करतानां स्वतःच्या जातींतीलच ख्रिस्ती झालेल्या कुटुंबांत, गोत्रप्रवराचीं बंधनें सांभाळून त्यांना देत असत.

शेवटीं १८९९ सालीं आम्हीं मंगेशीला गेलों. कोंकणांतील कित्येक मंदिरें विशिष्ट जातीचीं किंवा विशिष्ट कुटुंबाचींच असतात. त्या कुटुंबांतील लोकच तेथें पूजेला आणि सेवेला यावयाचे. अशा मंदिरांचे अुत्पन्न चांगलें असतें. त्या अुत्पन्नाची व्यवस्था त्या त्या जातीच्या पंचाच्या हातांत असते. गोव्यांत आमच्या जातीचीं अशा प्रकारचीं पांचसात मंदिरें निरनिराळ्या ठिकाणीं आहेत. आम्हीं मंगेशीला जाअून महिना सवा महिना राहिलों असू. हें स्थान रमणीय आहे. चारी बाजूनें अूंच टेकड्या, ठिकठिकाणीं नारळाची, सुपारीचीं आणि काजूचीं झाडें. शेती बहुतकरून भाताचीच. प्रत्येक घराच्या अंगणांत केळीचीं झाडें

* स्मरण-यात्रा मुळांत लिहिली त्या वेळची ही स्थिति होती. आतां तीही बदलून अडमुठी साम्राज्यशाही राज्य करीत आहे.

आणि अळू असावयाचेच. आणि जंगलांत जेथें पहावें तेथें पिटकुळीची लाल, सुंदर पण गरीब फुलें. आम्हीं गेलों म्हणजे आमच्या पुरोहितांच्या मोठ्या प्रशस्त घरांतच राहतों. मंगेशीला आम्हांला लघुरुद्र, महारुद्र, वगैरे कितीतरी अभिषेक करावयाचे होते.

मंगेशीचे मंदिर पाहण्याजोगे आहे. मंदिर, मस्जिद आणि चर्च तिहींची शोभा येथें अेकवटली आहे आणि मंदिराचें वैभव तर अेखाद्या लहानशा देशी संस्थानिकासारखे. मंदिरासमोर मिनाऱ्यासारखी अुंच दीपमाळा. आंतून वर जाण्यासाठीं पायऱ्या. रोज रात्री दीपमाळेच्या शिखरावर अेक दिवा जळत असल्यामुळें दिवादांडीप्रमाणें लोकाना त्याचा दूरवर अुपयोग होतो. अंधेऱ्या रात्रीं हा दिवा पाहून वाटसरू ओळखूं शकतात कीं तेथें मंगेशीचे मंदिर आहे. मंदिराच्या समोर चारी बाजूनें घाट बांधलेली अेक तळी आहे. तळी कसची आसपासच्या नारळाच्या झाडांना आपले तोंड पाहतां यावें म्हणून खोल चौकटींत बसविलेला तो आरसाच आहे, असें म्हटलें पाहिजे. मंदिराच्या महाद्वारावर अष्टौप्रहर चौघडा आणि शरणाअी वाजत असतात आणि पूजेच्या वेळी मंदिरांत देखील नगारे वाजतात. महादेवाच्या दोन्ही बाजूला कितीतरी नंदादीपाच्या सांखळ्या अखंड तेवत असतात. आणि राहून राहून पुरोहितांच्या आणि भक्तांच्या तोंडून शंभू महादेवाचा जयजयकार अैकूं येत असतो.

माझें वय लहान. त्यामुळें मला कुणी अभिषेकांत आति पूजेंत बसावयाला कसें देणार ? मीं संकल्प केला कीं मंगेशींत आहें तोंवर महादेवाला अभिषेकासाठीं रोज शंभर घडे पाणी घालावयाचें. विहिरींतून शंभर घडे पाणी खेचून काढणें हें माझ्या त्या वयांत सोपें काम नव्हतें. पण संकल्प केला तो केला. थोड्या दिवसांत माझी कमर दुखूं लागली. बसतांना किंवा अुठतांना चांगलीच कळ येत असे. मीं अेक युक्ति शोधून काढली. भिंतींतील खुंटीला अेक दोरी बांधून ती दोरी धरून मी अुठे आणि बसे. तरीहि पाणी ओढण्याचें काम चालूच होतें. तो काळ माझ्या कर्मकांडी मुग्ध भक्तीचा होता. सगळा दिवस आणि रात्रीचाहि कांहीं काळ मीं मंदिरांतच असावयाचा.

अेके दिवशी आमचे पुरोहित भिक्कम भटजी मला म्हणाले, "अभिषेक चालू असतांना जर सेवेनें महादेव प्रसन्न झाले तर महादेवाच्या लिंगांतून सिंहनाद अैकूं येतो." कुतूहलानें मीं विचारलें, "सिंहनाद म्हणजे काय ?" भटजी म्हणाले, "भुंगा बोलावा किंवा जंगी भोंवरा वाजावा त्याप्रमाणें घु ड ड ड ड ड असा गंभीर आवाज

महादेवाच्या पिंडींतून निघतो." प्रथम तर या गोष्टीवर माझा विश्वासच बसेना. अशी दैवी गोष्ट कलियुगांत व्हावीच कशी ? पण भटजींनीं अनेक अुदाहरणें देअून माझी खात्री केली.

त्या रात्रीं मला झोंप कशी यावी ? शभर घागरींच्या संकल्पाने महादेव माझेवर प्रसन्न नाहीं का होणार ? मी करून करून अशीं कितीशीं पापें केलीं असतील कीं माझी सेवा अगदींच फुकट जावी ? मीं अमुक वेळीं खोटें बोललों, घरीं आअीला न सांगतां चोरून खाल्लें, गुराढोरांना, पशुपक्ष्यानां किंवा किड्यामुंगींना त्रास दिला असेल तें आठवून आठवून मीं मंगेश महारुद्राची क्षमा मागूं लागलों. " अेकदांच कां होअीना जर सिंहनाद अैकावयास मिळाला तर आमरण तुझा भक्त होअून राहीन, तुला न आवडणारें अेकहि कर्म करणार नाहीं." असें महादेवाला वचन देअूं लागलों. तरीहि आपल्या नशीबांत सिंहनाद अैकावयाचें असेल अशी कांहीं मनाला खात्री होअीना. आपली श्रद्धाच कच्ची, आपल्या भक्तींत राम नाहीं, ध्रुवासारखा, प्रल्हादासारखा किंवा चिलया बाळासारखा कोणी भाग्यवान् भक्त असेल त्याच्याच कपाळीं सिंहनाद अैकण्याचे लिहिलेलें असावयाचें, असा विचार करून मीं स्वतःला निराशेचे सांत्वन देत होतों. असें कितीतरी दिवस गेले.

अेके दिवशीं माझा शंभरावा घडा जळाधारीमध्ये ओतून मी बाहेर येत होतों अितक्यांत घूं ड ड ड असा आवाज अैकूं आला. प्रथम माझा माझ्या कानावर विश्वासच बसेना. 'मनीं वसे तें स्वप्नी दिसे' असेंच मीं ठरवले. पण भ्रम असला तर तो किती वेळ टिकणार ? सिंहनाद वाढला आणि स्पष्ट अैकूं येअूं लागला. मीं गोंदूला हांक मारून म्हटलें, "नाना, अैक, तुला सिंहनाद अैकूं येतो का ?" विस्मयानें डोळे विस्फारून, अुघडया तोडानें तो अैकतच राहिला. शेवटीं सद्गदित होअून म्हणाला, " दत्तू, खरोखरच देव तुझेवर प्रसन्न झाला आहे."

मी धन्य धन्य झालों. लहानपणापासून जी कांहीं भक्ति केली, पूजाअर्चा केली आणि नामस्मरण चालवले त्याचे आज फळ मिळाले. आतां आपण सगळें आयुष्य अीश्वराची सेवा करण्यांतच घालवणार. जळो सगळा प्रपंच आणि लोकव्यवहार. महादेव प्रसन्न झाला. त्याची खूण म्हणजे सिंहनाद अैकावयास मिळाला. याहून अधिक आपणाला काय हवें आहे ? अीश्वराचा वरदहस्त आपल्या डोक्यावर आहे !

जेवायला बसलों असतानां गोंदनें सर्वांना सिंहनादाची गोष्ट सांगितली. आआीला खूपच आनंद झाला. वडील कांही बोलले नाहींत; पण त्यांचा आनंद त्यांच्या चेहेऱ्यावर स्पष्ट अुमटला होता. त्यानीं वात्सल्ययुक्त नजरेनें मजकडे पाहिलें. मी विजयी मुद्रेनें प्रत्येकाच्या चेहेऱ्याकडे पाहिले आणि प्रत्येकाकडून मूक अभिनंदनाचा कर वसूल करूं लागलों. त्या रात्रीं आणि दुसरे दिवशीं सकाळीं मी माझ्या नामस्मरणाचा वेळ दुप्पट केला. आसपास निजलेल्यांची झोंपमोड होअील याचा यत्किंचित् विचार केल्याबांचून मीं माझा आवाजही वाढवला:

सांब सदाशिव, सांब सदाशिव, जयहर शंकर, जयहर शंकर ॥

अशा रीतीनें कितीतरी दिवस गेले. तेवढ्यांत सिंहनाद पुन्हां दोनदा अैकूं आला. माझी हीच स्थिति कायम राहिली असती तर किती चागले झाले असतें !

आमच्या गोंदूमध्यें लहानपणापासून प्रयोग करण्याची वैज्ञानिक दृष्टि विशेष होती. अनेक वस्तु घेअून त्यांची मोड-तोड-जोड करून त्याचे कांहींतरी नेहमीं चालत असावयानें. कुणाशींहि बोलल्या-चाललयाबांचून या सिंहनादाचें मूळ तो शोधूं लागला. त्याच्या मनानें घेतले कीं या सिंहनादांत कांहींतरी 'भेद' आहे. तो रोज गरभागारांत जाअून अभिषेक पूजा चालत असे ती पहावयास तासाचे तास बसे. अेके दिवशीं माझेजवळ येअून तो मला म्हणाला, "दत्तू, चल तुला अेक गंमत दाखवतों." मी त्याचेबरोबर मंदिरात गेलों. मंगेशीचा महादेव नेहमीसारखे लिंग नसून अेक पुराणप्रसिद्ध ओबडधोबड शिला आहे. प्राचीन काळीं अेक गाय येअून या शिलेवर स्वतःच्या दुधाची धार सोडून तिला पयस्नान करवीत असे. तेव्हांपासून या शिलेचे महात्म्य प्रगट झाले. या शिलेवर जळाधारींतून पाणी पडूं लागलें म्हणजे शिलेवरील पूजेचीं फुलें आसपास विखुरली जातात. शिला ओबडधोबड असल्यानें मध्यें मध्यें अेखादे अंगुळीअितके खोल खड्डेहि आहेत. गोदूनें शिलेच्या साळुंकींतून पाणी जेथून बाहेर जात होतें तेथें स्वतःचा हात धरून पाणी रोकले आणि दुसऱ्या हातानें जळाधारी जरासी खेचून धरली. पाण्याची धार बरोबर अमुक ठिकाणीं पडूं लागली आणि अेकदम सिंहनाद सुरू झाला !

मला ज्ञानानंद होण्याच्या अैवजीं अत्यंत दुःख झालें. माझी अेक सबंध सृष्टि भंग पावली. गोंदू म्हणाला, "आज सकाळीं बरींचशी फुलें शीलेच्या या बाजूला गोळा होअून त्यांनीं पाण्याचा प्रवाह रोकला होता आणि जळाधारी झोके खात

होती, अशा वेळीं मी सिंहनाद ऐकला. बरोबर याच ठिकाणीं पाण्याची धार पडूं लागली म्हणजे आवाज ऐकूं येई; धार बाजूला सरकली कीं आवाज बंद होई; अेवढी गोष्ट ध्यानीं येतांच मी माझे प्रयोग सुरू केले आणि अेक तासाच्या आंत सिंहनाद कावूंत आला. आतां तूं सांगशील तेव्हां आणि म्हणशील तितका वेळ तुला सिंहनाद ऐकवूं शकेन."

गोंदूच्या हातून मी जळाधारी घेतली. आणि मीहि त्यानें सांगितल्याप्रमाणें अनेक वेळां प्रयोग केला. आणि प्रत्येक वेळीं मला सिंहनाद बरोबर अैकूं आला. मनाची खात्री झाली कीं यांत दैवी चमत्कार नसून सृष्टीच्या भौतिक नियमाचा खेळ आहे.

या गोष्टीचा माझ्या जीवनावर काय परिणाम झाला तें येथे मी न लिहिणेंच चांगलें. कांही वर्षांपूर्वी वडील मंडळीपैकीं अेका व्यक्तीला जेव्हां मी सिंहनादाची गोष्ट सांगितली तेव्हां ते म्हणाले कीं, "हा अनुभव दयानन्द सरस्वतींच्या अनुभवासारखाच आहे." त्यांचे तोंडून दयानंद सरस्वतींचा असा अुल्लेख अैकल्यानंतरच मीं त्या सुधारक संन्याशाचें जीवनचरित्र वाचलें. त्यांचेविषयीं मला सहानुभूति आणि आदर वाटल्यास नवल तें कोणचें ?

लहानपणापासून " कॉपी " करण्याविषयीं मला तिरस्कार असे. शेजारच्या मुलाच्या पाटीकडे किंवा पुस्तकांत चोरून पाहून अुत्तर लिहिल्याचें अेकही अुदाहरण माझ्या जीवनांत नाहीं. परीक्षेच्या वेळीं शेजारीं बसलेल्या मुलाला विचारावें किंवा चोरून पुस्तक जवळ बाळगून लपतछपत त्यांत पाहून अुत्तरें लिहावींत, पैरणीच्या अस्तनीवर पेन्सिलीनें अुपयोगीं माहिती लिहून परीक्षेच्या वेळीं तिचा अुपयोग करावा, टीपकागदाच्या घडीच्या आंतल्या बाजूला अितिहासाचे सन लिहून काढावे, शेजारीं बसलेल्या मित्राशीं कागदाची अदलाबदल करावी, वगैरे चौर्यशास्त्रांतील अनेकानेक युक्त्या आणि प्रयोग मी जाणत नव्हतों असें नाहीं. तरीही अेकही दिवस मी त्याचा अुपयोग केला नाहीं. ज्या ज्या शाळेंत गेलों ( आणि मी कांही थोड्या थोडक्या शाळा पाहिल्या नाहींत. कोणत्याही शाळेंत अखंड अेक वर्ष पुरें करण्याचें माझ्या नशिबीं लिहिलेलें नव्हतें. ) त्या त्या शाळांमध्यें विद्यार्थ्यांत आणि शिक्षकांत माझी प्रामाणिकता संशयातीत असे. शिक्षकांच्या गैरहजेरींत वर्गांत जर कांहीं घडलें असलें आणि शिक्षकापर्यंत त्याची तक्रार गेली तर दोन्ही बाजूचे विद्यार्थी माझी साक्ष घ्या असें शिक्षकांना सांगत. पुष्कळदां मी साक्ष देण्याचेंच नाकारीत असें. पण जें सांगावयाचें तें खरेंखुरेंच असावयाचें.

अेकदां कारवारला असतांना माझ्या अेका दिलोजान दोस्ताविषयीं-बाळिगा-विषयीं-कायसें सांगण्याचा प्रसंग आला. हरिमास्तरांनीं मला अेक नेमका मुद्याचा प्रश्न विचारला. माझी असलेली पत वापरून खोटे बोलण्याचा आणि मित्राला बचावून घेण्याचा लोभ मला झाला. भुत्तराचे वाक्यही मनांत रचलें गेलें. हिंमत करून बोलावयास गेलो; पण आयत्या वेळी हिंमतीनें दगा दिला. अर्धा अेक क्षण मनाशीं झगडा करून जें खरे होतें तेंच सांगून टाकले. भल्यामास्तरांच्या मिस्किल डोळ्यांनीं माझे मनोमंथन बरोबर पाहून घेतलें. ते हंसले. माझा मानसिक गुन्हा अुघड झाला. मी खजील झालों. शेवटीं माझ्या भावनेची कदर करून शिक्षकांनी माझ्या मित्राला अगदींच सौम्य, नांवाचीच शिक्षा केली. त्या दिवसापासून हरि-मास्तरांचेजवळ माझी पत कमी होण्याचे अैवजीं अुलट वाढली हे पुढें माझ्या ध्यानांत आलें.

कॉपी करण्यात पामरता आहे, हलकेपणा आहे, हा विचार माझे अंगांत रगोरग भिनलेला होता. पण कॉपी देण्यामध्यें कांहींशी बहाहुरी आहे, दानशूरता आहे, असें त्या वेळीं वाटे. आणि याहूनही विशेष म्हणजे पहारेवाल्याच्या काकदृष्टीनें पहात सर्वत्र फिरणाऱ्या शिक्षकांचा सूड अुगविण्याची ती अेक अुत्तम संधी आहे असेंही मला वाटे. पण ती अगदीं लहानपणची गोष्ट. मोठा झाल्यानंतर मी तेंही सोडून दिलें. अेकाद्या विद्यार्थ्यानें कॉपी मागितली तर मी अगदीं गोडपणानें त्याला नाही म्हणून सांगत असें. पयावया करून कोणी पुन्हां पुन्हां कॉपी मागूं लागला तर शिक्षकांना सांगून देतों, अशी मी भीतीही दाखवीत असें. पण कधी कुणाला अशा रीतीनें पकडून मात्र दिला नाहीं. विद्यार्थी-वर्गाचा द्रोह करून शिक्षक-वर्गास मदत करणे आपल्याला कसें शोभेल, हाच अेक विचार मनांत येत असे.

मात्र अेके दिवशी अगदी बेमालूम कॉपी दिल्याचा प्रसंग मला बरोबर आठवतो. शहापूरच्या शाळेंत मी अिंग्रजी दुसरींत होतों. तेथें गोखले म्हणून अेक मास्तर नवी-नच बी. अे. पास होअून आमच्या शाळेंत आले होते. त्यांचें फुटबॉलसारखे वाटोळें डोकें, लिंबासारखी कान्ति, ठेंगणें शरीर, आणि धूर्त डोळे, सर्व कांहीं आकर्षक असे. त्यांचे अिंग्रजीचे नखरेबाज अुच्चार आणि सर्व विद्यार्थ्यांना अहोजाहो म्हणून संबोध-ण्याची त्यांची पद्धत या गोष्टी विशेष होत्या. " अिन्डिया " म्हणण्याअैवजीं तें " अिन्डिय " म्हणत. " आयडिया " न म्हणतां ते आयडिड म्हणत. ते वारंवार

हंसत हंसत मुलांना म्हणत, " तुमच्या सर्व युक्त्या मला समजतात. मला तुम्ही फसवूं शकणार नाहीं. या बाबतींत मी तुमच्यांतलाच अेक आहे असें समजा." गोखले-मास्तराविषयीं आम्हां सर्वांमध्यें सद्भाव असे. गोड स्वभावाचा मास्तर केव्हांही विद्यार्थीवर्गाला प्रिय असावयाचा ! पण आमचे हातून ते फसले न जावेत याचा अर्थ काय ? विद्यार्थ्यांचा हा केवढा मोठा अपमान ! काय आमची पिढी अितकी निर्माल्य झाली आहे ? शिक्षकांमध्यें जर अशा प्रकारचा आत्मविश्वास वाढूं दिला तर पाहतां पाहतां ते विद्यार्थ्यांची नाडी पारखून घेतील. आणि मग त्यांचें राज्य बिनधोक चालूं लागेल ! तें कांहीं नाहीं या मास्तरांना पुरून अुरलेंच पाहिजे.

आमची सत्रांत किंवा वार्षिक परीक्षा असावी. गोखले भूगोलाची परीक्षा घेणार होते. या विषयांत मला नेहमींप्रमाणे पन्नासांतील पन्नास मार्कस् मिळणार याची मला खात्री होती. पण कसेही करून आज गोखलेमास्तरांना बनवलेंच पाहिजे असा मी संकल्प केला. शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना लेखी परीक्षाचा सारखाच कंटाळा असतो. पण तोंडी परीक्षेमध्यें पुरेसे प्रश्न काढणें सोपें नसतें. आणि प्रत्येक विद्यार्थ्याला अकच प्रकारचे कठिण प्रश्न विचारणेंही शक्य नसतें. या अडचणींतून गोखलेमास्तरांनीं अेक वाट काढली. सर्व परीक्ष्य विद्यार्थ्यांना दुरच्या अेका खोलीत बसविलें. आणि परीक्षेच्या खोलीमध्ये अेकेक विद्यार्थ्याला बोलावून आणून त्याला ठराविक प्रश्न विचारण्याची व्यवस्था केली. परीक्षेच्या खोलीशेजारीं अेक लहानशीच खोली होती. ती रिकामीच ठेवली होती. अेका मुलाची परीक्षा सुरू झाली म्हणजे त्याच्या खालच्या नंबराचा मुलगा या मधल्या लहान खोलींत वाट पहात बसावयाचा. पहिल्याची परीक्षा संपली म्हणजे त्यानें परीक्षेच्या खोलींतून बाहेर न जातां दरवाजा अुघडून दुसऱ्या नंबराला आंत बोलवावयाचें. त्यानें आंत येण्यापूर्वी तिसऱ्या नंबरला मोठ्यानें हाकारून मधल्या खोलीत आपल्या जागीं येअून बसावयास सांगावयाचें आणि मग स्वतः कत्तलखान्यांत प्रवेश करावयाचा ! ज्यांची ज्यांची परीक्षा संपली त्यांनीं परीक्षा संपेपर्यंत परीक्षेच्या खोलींतच कोंडून रहावयाचें. गोखलेमास्तरांच्या हातीं पंचवीस प्रश्नांची यादी होती. जो विद्यार्थी येअील त्याला तेच तेच प्रश्न विचारून त्याच्या नांवापुढें ते मार्कस् मांडीत असत.

अशा कडेकोट बंदोबस्तांच्या किल्ल्यांतून परीक्षेचे प्रश्न चोरून बाहेर पाठवणें शक्य कोटींतील गोष्ट नव्हती. वर्गांतील विद्यार्थी म्हणूं लागले, "आज आपली हार झाली खरी." मी म्हणालों, "अशी कांहीं अबू घालून बसतां येअील ? मी आंत जातांच

सगळे प्रश्न लिहून तुमचेकडे पाठवून देतों की नाही पहा." परीक्षेची खोली बरच्या मजल्यावर होती. मी अेका विद्यार्थ्याला म्हटलें कीं तूं खिडकीच्या खालीं टपून बस. मी वरून प्रश्नाचा कागद टाकतांच तो झट्कन् अुचलून तेथून पोबारा कर. थोडासा जरी थांबलास तर आपण दोघेही मारले गेलों असें समज.

माझा नंबर आला. मी आंत जाअून सर्व प्रश्नांचीं अुत्तरे चटपट दिलीं. आणि पन्नासांपैकीं अठ्ठेचाळीस मार्के मिळाल्याच्या समाधानासहित अेका कोपऱ्यांतील डेस्काच्या शेजारीं जाअून बसलों. पुढें खिशांतून तीन कागद काढले. अेका कागदावर कित्येक कविता लिहिल्या. दुसऱ्यावर भूगोलाचे प्रश्न आणि तिसऱ्यावर कित्येक विनोदी चुटके. कवितेचा कागद डेस्कावरच राहूं दिला भूगोलाच्या प्रश्नांच्या कागदाची घडी करून त्यांत अेक खडा घालून तयार ठेवला. मग तिसऱ्या कागदाचे फाडून लहानलहान तुकडे केले. अितकें झाल्यानंतर हातात अ सलेला तो कागद आणि तिसऱ्या कागदाचे तुकडे हातांत घेअून सरळ अुठून खिडकीकडे गेलों आणि खिडकींतून ते बाहेर फेकून दिले. शिक्षकाचे माझेकडे ध्यान न जाणें शक्यच नव्हतें. तशी अपेक्षाही नव्हती. मी साळसूदपणें सरळ चालत खिडकीपर्यंत जाअून ते फेकून दिले होते. धोंडा असलेला कागद चटकन खालीं पडला. पडला कसचा ? माझ्या मित्रानें तो हातांत झेलूनच घेतला आणि तेथून त्यानें पलायन केले. माझी हिंमत पाहूनच शिक्षकांना माझेवर शंका घेण्याचें सुचलें नसेल. अेकच क्षण अनिश्चितपणें घालवून ते अुठले आणि धांवत खिडकीकडे जाअून बाहेर पाहूं लागले पाहतात तर कागदाचे तुकडे अुडत अुडत खालीं पडत आहेत. त्यांनीं मला विचारलें, "खिडकींतून काय फेकले हो ?" मी म्हणालों, "कुचकामाच्या कागदाचे तुकडे" खिडकींतून बाहेर पहातच त्यांनीं डेस्कवर असलेला माझा कागद मागवून पाहिला. त्याचेवर काय असणार ? मराठी कवितेच्या थोडया ओळी होत्या. त्या पाहून मास्तरांची शंका दूर झाली. पण औरंगजेब कधी विश्वासानें चालला आहे ? मास्तरांनीं स्वतः खिडकींतून पडणाऱ्या कागदावर नजर ठेवली आणि पहिल्या वर्गाच्या मॉनिटर मुलाला खालीं पडलेले सगळे तुकडे गोळा करून आणण्यास सांगितले. मॉनिटरला धांवत जाअून पळन परत येण्याचे सांगावयाला ते विसरले नव्हते.

मॉनिटर गेला. बहुतेक सर्व तुकडे वेचून घेअून आला. शिक्षकांनीं प्रयत्नपूर्वक ते सर्व तुकडे त्यांचा आकार पाहून पाहून जुळवले. वाचून पाहतात तर त्यांचेवर

विनोदी चुटक्यांवाचून कांहींच नव्हतें. त्यांनीं मला म्हटलें, " पुन्हां असे कागद फेकूं नकोस. पहा किती वेळ रिकामा गेला तो !" मीही शहाणा होअून म्हटलें " होय मास्तर. "

यानंतर जसजसे विद्यार्थी येअूं लागले तसतशी त्यांची प्रश्नांचीं अुत्तरे बरोबरच येअूं लागलीं. मास्तराना शंका आली. आंत येणाऱ्या प्रत्येक नव्या विद्यार्थ्याला ते विचारूं लागले, " कायहो, प्रश्न बाहेर फुटले आहेत काय ?" पण कबूल कोण करणार ? शेवटी अेक मुलगा आला. आमच्या वर्गातील तो ढ विद्यार्थी होता. अेकाही विषयांत तो पास होण्याची आशा नव्हती. यामुळें त्याला कोणी प्रश्न सांगितले नव्हते. स्वतःचा असा बहिष्कार झालेला पाहून तो मनांत चिडलेला होता. त्याला जेव्हां शिक्षकांनीं विचारलें, "कायरे नारायण ! प्रश्न फुटलेले दिसतात." तो म्हणाला " होय मास्तर." त्याचे हे अुत्तर अैकतांच माझें बसल्या ठिकाणींच पाणी पाणी झालें. पायांत असलेले बूट देखील जड वाटूं लागले. छातींत धडधड होअूं लागलें. आतापर्यंत मिळवलेली पत धुळीला मिळणार गोखलेमास्तर पुष्कळदां माझ्या वडील बंधूना भेटतात. तेव्हा शाळेंतच नव्हे तर घरीदेखील अबूचें दिवाळें वाजणार ! मला कोठून ही कुबुद्धि सुचली ? गेले, सर्व गेलें ! आतां कितीही खरेपणानें वागलो तरी हा डाग कायमचा रहाणार ! कोठे मी या शिक्षकांची अीर्षा करावयास गेलों !

अीश्वराच्या घरचा कायदा काय आहे समजत नाही. कधी कधीं अनेक अपराध केले तरी मनुष्याला अद्दल घडत नाही. त्याचे अपराध वाढूं लागतात. आणि मग अगदीं शेवटी पापाचा घडा फुटून सगळ्या अपराधाची शिक्षा अेकदमच भोगावी लागते. कधी कधीं पहिल्याच प्रसंगीं अशी काहीं जबरदस्त शिक्षा होते की मनुष्य पुन्हां अपराध करण्याचें विसरून जातो. याला मी अीश्वराची कठोर कृपा म्हणतो. कधीं कधीं मनुष्याला झालेला पश्चात्ताप हीच पुरेशी शिक्षा आहे असे समजून अीश्वर त्याला वांचवीत असावा. हा शेवटचा प्रसंग खरोखरच कठिण असतो. आपण वांचलों यांत अीश्वराची दया आहे असें तो ओळखूं शकला तर तो पुन्हां गुन्हा करावयाच नाहीं. पण जर आपण वांचलों यांत, आपल्या भाग्याचीच थोरवी आहे असें जर तो समजला अथवा कर्मफळाचा नियम धर्मकार म्हणतात तितका अटळ नाहीं अमें जर त्यानें अनुमान काढलें तर तो अधिकाधिक खड्ड्यांत पडावयाचा आणि अंधारांत बुडून जावयाचा. अीश्वरानें कसेंही वागण्याचे ठरविलें तरीं शेवटीं अीश्वर

न्यायी आहे आणि म्हणूनच तो दयाळू आहे, त्याला सदाचार प्रिय आहे अेवढे ध्यानांत राखून, त्या विचाराला जर चिकटून राहिलों तरच आपला अुद्धार आहे.

शिक्षकांनी विचारलें, "नारायण, प्रश्न कोठून बाहेर फुटले?" तो म्हणाला, "मॉनिटर पटवेकरनें अमुकाला सांगितले, त्यानें अमुकाला कळविले. अशा रीतीनें सगळे प्रश्न बाहेर पसरले आहेत. मला मात्र कोणी सांगितले नाहीत. सर्वांनीं माझा बहिष्कार केला आहे."

गोष्ट अशी झाली होती कीं दरेक मुलाला आत घेण्यासाठीं दरवाजा अुघडतांना मॉनिटरनें बाहेरच्या विद्यार्थ्याला हळूच अेकदोन प्रश्न सांगितले होते. माझे कागदाचे तुकडे आणण्यासाठीं मॉनिटर खालीं गेला होता तेव्हांसुद्धां त्यानें धांवतां धांवतां अेकदोन प्रश्न सांगितले होते. त्याच्या या दुर्बुद्धीच्या ढालीच्यामागे माझे रक्षण झाले होतें. याचा अर्थ अेवढाच की शिक्षकांना माझ्या शिताफीची बातमी लागली नाहीं.

असल्या कामांत निर्ढावलेल्ले विद्यार्थी तो प्रसंग विसरूनही गेले असतील; पण या शेवटच्या चारपांच क्षणात मला जी मानसिक वेदना अनुभवावी लागली आणि तीमुळें मी स्वतःला जो अुपदेश केला तें सर्व, माझ्या जोवनांतील अेक मूल्यवान् प्रसंग म्हणून नेहमीं माझ्या स्मरणांत राहील. तो मी कधीं विसरणार नाहीं.

ज्या विद्यार्थ्याला मी प्रश्नाचा कागद शिताफीनें पोंचविला होता तो अेक सुताच्या व्यापाऱ्याचा मुलगा होता. त्यानें सुताच्या पुडयाच्या दोन्ही बाजूला जे पुठ्ठे घातलेले असतात त्यांतील अेक सुदंरसा पुठ्ठा भेट म्हणून मला दिला. तो तुकडा पुढें किती तरी दिवस मजजवळ होता. जेव्हां जेव्हां त्याचेकडे नजर जाअी तेव्हां तेव्हां वरील सर्व प्रसंगाचे मला स्मरण होअी.

'अरेबियन नाअिटस्' अथवा 'अरबी भाषेंतील सुरस कथा' जगाच्या साहित्यक्षेत्रांत अेक नामांकित चीज आहे. अेक हजार आणि अेक रात्रींच्या त्या गोष्टी ज्यानें वाचल्या नाहींत असा सुशिक्षित क्वचितच सांपडावयाचा. प्रत्येकाच्या जीवनांत असा अेक काळ येतो की जेव्हां असल्या काल्पनिक आणि अद्भुत गोष्टी वाचण्याची आणि त्यांचे चिंतन करण्याची हौस मनुष्यांत अधिकाधिक असते. या ग्रंथांशीं माझा परिचय कसा झाला तें आठवतें तसें लिहिण्याजोगे आहे

माझे मोठे बंधु शिकण्यासाठी पुण्यास गेले त्याच सुमाराला प्रह्यात विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे वडील कृष्णशास्त्री यानीं अरेबियन नाअिटस्चे मराठी भाषांतर केले असावे. ( किंवा पुण्यालाच प्रथम तें पुस्तक वडील बंधूच्या नजरेस पडलें असावे. ) हे भाषांतर, भाषांतरकलेचा अप्रतिम नमुना म्हणून मानलें जातें. पुस्तक भाषांतरित आहे असें मुळींच वाटत नाहीं. भाषा अशी कांहीं सुंदर वापरली आहे कीं हा ग्रंथ मराठी भाषेचा अेक अलङ्कार मानला जातो.

हें पुस्तक आपलेजवळ असावे अशी अभिलाषा बाबाचे मनांत अुत्पन्न झाली. पण अेवढे मोठें पुस्तक विकत घ्यावयास पैसे कोठून आणावयाचे ? दर महिन्याला

वडील पैसे पाठवीत खरे; पण त्यांना पैन् पैचा हिशेब पाठवून द्यावा लागे. [ ही देखील अेक आश्चर्याचीच गोष्ट आहे. कारण पुढे जेव्हां शिकण्यासाठी मी कॉलेज-मध्ये गेलों तेव्हां वडिलांनी माझेकडून कधींही हिशोब मागितला नाहीं. मी आपणहून पाठवला तर ते तो पहातही नसत. वडील बंधूचा विद्यार्थीकाळ आणि माझा विद्यार्थीकाळ यामध्यें अेका पिढीचे अंतर लोटले होतें त्याचा हा परिणाम असावा. किंवा लहानपणापासून वडिलांचेबरोबर राहून त्यांच्या देखरेखीखाली घरची थोडीबहुत व्यवस्था मी पहात असें. त्यामुळें कोठे खर्च करावा व कोठे करूं नये याविषयींच्या माझ्या तारतम्य बुद्धीवर त्यांचा विश्वास बसला असेल. माझी अभिरुची तर त्यांना पूर्णपणें ठाऊकच होती. त्यामुळें हिशोबाविषयीं ते बेफिकीर असत. माझेकडून जर त्यांनीं महिन्याचे महिन्याला हिशोब घेतला असता तर हिशोब लिहून ठेवण्याची मला संवय लागली असती. अशी संवय नसल्याने मी माझ्या आयुष्यांतील आर्थिक व्यवहार अगदींच संकुचित करून टाकला. वाटेल तें होवो, अडचण सहन करावी; पण कधी कोणाकडून अुसने पैसे घेअूं नयेत. कर्जाचे तर नांवच नको. कधीं कोणाला पैसे अुसनवार देअूं नयेत. आणि दिले तर गेलेच असें समजूनच द्यावे, असे धोरण मी स्वतःसाठीं ठरविलें. यामुळें मला नेहमीं संतोषच लाभला आहे. सार्वजनिक कामांत पडल्यानंतर देखील मी कधींही पैशांची जबाबदारी माझे डोक्यावर घेतली नाही. अशा रीतीनें समाधान तर टिकलें; पण जीवनांतील अेका महत्त्वाच्या अंगाचा विकास व्हावयाचा राहून गेला. ] कशा रीतीनें कोणास ठाअूक पण बाबानें कसें तरी करून, जेवणाच्या आणि पाठ्यपुस्तकांच्या खर्चांत काट-छाट करून असेल कदाचित् त्यानें अरेबियन नाअिटस् विकत घेतले. जी वस्तु असाधारण प्रयत्नाने मिळते तिचे महत्त्व व तिची गोडीही असाधारण असते. आमच्या घरीं आणि बाबाचे मित्रमंडळींत या अरेबियन नाअिट्सचा अुल्लेख वारंवार होत असे. त्या वेळीं मी अगदीच लहान. समुद्रमंथन करून देवांनीं अमृत मिळवले त्याचप्रमाणें कांहीं असाधारण पराक्रम करून बाबानें हें पुस्तक मिळवलें आहे, असे त्या वेळीं मला वाटे.

पुढें मी मोठा झालों. बाबाची गणना पोक्त लोकांत होअूं लागली. त्याला आतां समजूं लागले कीं अरेबियन नाअिटस् हें अमृत नसून मदिरा आहे. त्यामुळें त्यानें तें पुस्तक आपल्या कपाटांत ठेवून दिलें. आमच्या हाती तें पुस्तक येअूं नये याची त्याला विशेष काळजी असे.

पण गोंदूनें अेके दिवशीं लाग साधून तें पुस्तक मिळविलें. आणि त्यांतून अेक-दोन गोष्टी वाचून स्वतःच्या पराक्रमाचा प्रसाद म्हणून त्याच रात्री त्या गोष्टी त्यानें मला सांगितल्या. पुढें माझेंही कुतूहल जागृत झालें. मी बाबाचा सगळ्या दिवसाचा कार्यक्रम तपासून पाहिला. कोणचे तास सुरक्षित आहेत तें नक्की केलें. आणि मग अगदीं ठरल्या वेळीं त्याच्या खोलींत जाअून तें पुस्तक वाचूं लागलों. जनक राजाच्या दरबारांत ज्याप्रमाणे शुकमुनि दुधानें परिपूर्ण भरलेला प्याला घेअून योगयुक्ताप्रमाणें सर्वत्र फिरले, त्याप्रमाणे मला हें पुस्तक वाचावे लागलें गोष्टींचा रग असा कांहीं जमावयाचा कीं जणुं का आपण जादूच्या दुनियेतच विहार करीत आहोंत ! घटकेंत चीन देशांत तर घटकेत खलीफ हारून अल्रशीदच्या दरबारात ! घटकेन सिंदबादबरोबर तर घटकेत अल्लीबाबा आणि चाळीस चोरांची खोड मोडणाऱ्या मार्ग्यानाच्या सहवासांत. राक्षस, पऱ्या आणि जादूचे कंदील, आणि मंतरलेले घोडे याच्या दुनियेंत माझे कल्पनेचे घोडे धांवत असत. तरीही बाबाचा परत येण्याचा वेळ सांभाळावा लागे. त्यांत गफलत झाली तर पकडले जाण्याची भीति. बरेच दिवस असें हें वाचन चालले. पण शेवटीं अेक दिवस मी पकडला गेलों. बाबा आतां चांगलाच चिडणार, त्यानें मारलें नाहीं तरी खरडपट्टी काढणार अशी अपेक्षा होती. माझा चेहरा पार भुतरून गेला, पण बाचा रागावला नाही. अद्भुत गोष्टीतील राजपुत्राच्या अैवजी वाचन-चोर बनून बाबासमोर मी अुभा होतों बाबा रागवला नाहीं त्याला कदाचित् स्वतःचे लहानपण आठवले असेल. दुःखित हृदयानें आणि गंभीर आवाजानें त्यानें अितकेच म्हटलें–"दत्तू, तूं स्वतःचे नुकसान करून घेत आहेस. हे वाचन म्हणजे विष आहे. विषाहूनही वाअीट अशी ही शुद्ध दारू आहे. हिला शिवूंही नकोस." बाबाच्या या कळवळ्याच्या अुपदेशाचा माझेवर परिणाम व्हावयास पाहिजे होता. पण मी गोष्टीच्या नशेंत होतों. मी अेवढेंच पाहूं शकलो कीं बाचा चिडला नाहीं तेव्हां रागे भरणार नाही. कामी मनुष्य जसा निर्लज्ज होतो तसा गोष्टीची चटक लागल्याने मी निर्लज्ज बनलों. आतां मी कांहीं कुकुबाळ नाहीं अशा आवाजांत बाबाला मी म्हणालों, "बाबा, तूं म्हणतोस ती गोष्ट खरी आहे. पण मी हें पुस्तक जवळजवळ पाअूण भाग वाचून काढलें आहे. आतां बाकीचा पाअूण भाग पुरा करू दिलास तर विशेष कितीसें नुकसान होणार आहे ?" बाबा विरघळला किंवा निराश झाला कोणास ठाअूक ! पण तो म्हणाला, "तर मग ने तें पुस्तक आणि कर पुरें" त्या प्रसंगीं बाबानें काय करणें योग्य होतें याच्या निर्णय आजही मला करतां येत नाहीं. पण हे लिहित असताना

अेवढें वाटतें खरे कीं त्या पुस्तकासंबंधाने त्याचा जर अितका कडक अभिप्राय होता तर त्यानें त्याचा नाशच करावयाचा होता. मी तें पुस्तक घेअून पुरें केलें. त्या गोष्टींची छाप माझ्या मनावर दीर्घकालपर्यंत राहिली.

पण फारच लहान आणि निर्दोष वयांत मी तें पुस्तक वाचले. यामुळें असो किंवा जणूं काय अेकाच बैठकींत सगळें पुस्तक पुरे करावें अशा वेगानें तें वाचल्यामुळें असो; पण मनुष्याला घेरी यावी आणि काय झालें याचे भान अुरूं नये त्याप्रमाणें तें सगळें पुस्तक मी जवळ जवळ विसरून गेलों. विजेच्या वेगानें प्रवास करावा आणि रोज दोनदोन तीनतीन शहरांत चारचार सहासहा तास व्याख्यानें देत हिंडावें आणि मग कुठे काय पाहिले, कुठे कोण भेटले, आपण काय काय सांगितलें हें सर्व आपण विसरून जातों. तसेच कांहीसें झाले असावे. पुढें पुष्कळ वर्षांनीं अल्लीबाबाची गोष्ट आणि सिंदबादच्या सफरी यांची विद्यार्थ्यांच्या अुपयोगी संक्षिप्त आवृत्ति अिंग्रजीतून वाचण्याचा प्रसंग आला. त्यामुळें त्या गोष्टी बऱ्याचशा डोक्यांत राहिल्या आहेत. बाकीचें सर्व शून्यवत् झालें आहे.

अरेबियन नाअिटस्‌च्या गोष्टी मी विसरलो खरा; पण त्याच्या वाचनानें कल्पने-मध्यें विहार आणि विलास करण्याची मलीन सवय पुष्कळ वर्षेपर्यंत टिकली. कल्पनेला अितके जबरदस्त विकृत शिक्षण मिळालें कीं त्याची छाप समग्र जीवनावर पडली. आणि ती पुष्कळच वाअीट होती. अरेबियन नाअिट्‌सूसारखीं जर पुस्तकें वाचण्यांत आलींच नसतीं तर मला वाटतें कल्पनेच्या किनीतरी अशुद्धीपासून मी वांचलों असतों. सुखांत दुःख अेवढेच होतें कीं तें पुस्तक मी लहानपणीं वाचल्यानें त्यांतील बराचसा शृंगार डोक्यांत घुसण्याच्या अैवजीं डोक्यावरून निघून गेला.

पुष्कळ शिक्षकांना आणि आअीबापांना वाटतें कीं अरेबियन नाअिटस्‌मधील शृंगार हेच त्यांतील सर्वांत मोठें विष आहे. माझे मत असें आहे कीं, तसला शृंगार तर जीवनाला चिघडवतोच; पण त्याहूनही अधिक भयानक गोष्ट ही आहे कीं असल्या अद्‌भुत गोष्टी वाचल्यानें सद्‌गुणावरील व स्वतःच्या पुरुषार्थावरील श्रद्धा ढिली होते आणि दैव, अपघात, अद्‌भुत घटना, अि. गोष्टींवर विश्वास राहून अकर्मण्य बनण्याची संवय लागते. आणि मनुष्याची अभिरुचीही विकृत होते. या दोन्ही कारणांमुळें मनुष्य निर्वीर्य दैववादी बनतो. योग्यतेवांचून, परिश्रमावांचून, जगांतील सर्व अुपभोग स्वतःला मिळावेत अशी अिच्छा करूं लागतो. कित्येक तर तशा प्रकारच्या

आशेवर अवलंबूनही रहातात असें मी पाहिलें आहे मेंदूची कमजोरी, आणि थोडासा प्रयत्न करतांच थकवा येणे हा त्याचा पहिला परिणाम होय.

अरेबियन नाअिटस्‌चें पुस्तक त्यानंतर मी पुन्हां कधी वाचले नाहीं. यामुळें त्याचेविषयीं आज मला काय वाटतें हे सांगणे कठीण आहे. पण त्या वेळच्या वाचनाचा मनावर जो परिणाम झाला तो असाच कीं असलीं पुस्तके म्हणजे मनुष्यजातीवर हल्ला करणारी प्लेग किंवा अिन्फ्ल्युअेंझा सारखी अेक साथ आहे. आज जर घरचें तें पुस्तक माझ्या हातीं लागले आणि मला आज वाटतें तसेच तें असले तर त्याला मी जाळूनच टाकीन. पण आज तें कोणाच्या हाती असेल कोण जाणे ! शेतातील गवताची जीवनशक्ति जशी जबरदस्त असते, प्रतिकूल परिस्थितींतही तें जसे जीव धरून वसतें त्याचप्रमाणे आपल्या साहित्याची गत आहे. चांगलीं पुस्तके कपाटात आणि पुस्तकालयात धूळ खात पडलेलीं असतात; आणि अशा पुस्तकाना अेका दिवसाची सुटी किंवा रिकामपण मिळत नसेल. रोगाचे जंतु ज्याप्रमाणें सर्वत्र पसरतात त्याचप्रमाणें असलें साहित्य समाजांत सहज पसरतें. रसास्वादाला चटावलेले लोक त्याचा प्रचार करतात. आणि जबाबदार अुन्मत्त साहित्यिक अशा पुस्तकांचा बचावही करतात. खरोखरच—

" पीत्वा मोहमयीं प्रमादमदिराम् अुन्मत्तभूतम् जगत् । "

## धारवाडचा भाजीबाजार



कारवारला राहिल्यानें शाळेंत कानडी भाषेचे कांहीं शब्द नेहमीं कानीं पडत. पण ते पुस्तकी भाषेचे. वर्गांत अिंग्रजीचे भाषान्तर मराठीतहि होत असे आणि कानडींतहि. आणि पाठ्य पुस्तक समजावतांना विद्यार्थ्यांना मराठींतून, अिंग्रजींतून किंवा कानडींतून अेखादा शब्द जर बरोबर न समजला तर शिक्षक कोंकणी शब्द सांगून काम भागवीत. अशा रीतीनें तीन्ही चारी भाषांचे शब्द कानीं पडूं लागले. अिंग्रजी-खेरीज अन्य भाषांकडे लक्ष द्यावें असें कधीं वाटलेंच नाहीं. त्यामुळें अुत्तम संधि मिळूनहि मीं जवळ जवळ कोरा राहिलों. अितक्यांत वडिलांची धारवाडला बदली झाली. तिथें रोज भाअूला आणि मला बाजारांत जावे लागे. गांवांत प्लेग सुरू झाला म्हणून गांवाबाहेर दूर झोंपडी बांधून राहण्याचे ठरविले त्या कामीं मदत करण्यास म्हणून बेळगांवहून विष्णू आला. पण त्यालाच प्लेग होअून तो वारला. पुढें कशीबशी झोंपडी तयार करून आम्ही तेथें जाअून राहिलों. आतां बाजार करावयाचा म्हणजे दुपारीं जेअून लगेच जावयाचें तें रात्रीं परत यावयाचें. आम्हांला हव्या असलेल्या वस्तूंचें कानडी नांव आमचेजवळ कोठून असणार ? अुभ्या बाजारांत अेकच असा दुकानदार होता जो आमच्याशीं मराठी बोलूं शकत असे. आम्ही प्रथम त्याचेकडे जाअून त्याला विचारावयाचे कीं चण्याच्या डाळीला

काय म्हणतात ? त्यानें सांगावे, "कडली ब्याळी" बस. आम्हीं कडली ब्याळी कडली ब्याळी घोकत घोकत सबंध बाजार हिंडून चागला माल पसंत करून विकत घेत असूं. सर्वत्र हिंडल्यानें आणि कडली ब्याळीचें नांव घोकत गेल्यानें न खातांच तिनें आमचें तोंड भरून जात असे.

नंतर पुन्हां पहिल्या दुकानांत जाऊन आम्हीं विचारावें कीं भिऱ्यांना काय म्हणतात ? त्यानें म्हणावें, "मेनशिनकाआी" हा शब्द घेऊन आम्हीं मेनशिनकाआीच्या शोधार्थ निघत असूं. मेनशिनकाआी विकत घेण्यापूर्वीच आम्हांला यथेच्छ शिक्षा येत कर्नाटकचे लोक मिर्ची खाण्यांत बहादूर. फार काय सांगावे कित्येकांचे आडनांवच मेनशिनकाअी असतें. नंतर पाळी यावयाची नारळाची. कानडींत त्याला 'तेंगिनकाआी' म्हणतात. तेंगिनकाआीच्या भाराबरोबर तो शब्दहि अुचलून आम्हीं पुढें जात असूं.

गवय्यानें गातांना कितीहि ताना मारल्या आणि आलाप घेतले तरी ज्याप्रमाणे तो वेळेवर सम साधतो, त्याप्रमाणे आम्हांला पुन्हां पुन्हां त्या दुभाषी दुकानदाराकडे जावे लागे. अेखाद्या कागदाच्या चिटोऱ्यावर सगळीं नांवे लिहून तेवढा कामचलाअू कोश घोकून काढण्याचा सोपा रस्ता कसा काय कुणाला ठाअूक, आम्हांला सुचलाच नाहीं. आम्ही अेखाद्या निरक्षराप्रमाणें प्रत्येक वेळीं आमच्या त्या जिवंत कोशाकडे जात असूं. आणि तो भला गृहस्थ देखील थोडेसे हंसून आम्हीं विचारलेल्या प्रश्नाचे अुत्तर सावकाश स्पष्ट आवाजानें बोलून दाखवीत असे. केव्हां केव्हां तो पुस्ती जोडीत असे कीं 'काआी' म्हणाल तर कच्चें फळ मिळेल आणि 'हण्णू' म्हणाल तर पिकलेलें फळ मिळेल

भाजीबाजार या दुकानाहून बराच दूर असे. तिथे आम्हांला स्वतःचीच अक्कल चालवावी लागे. भाजी विकणाऱ्या बहुतकरून बायाच असावयाच्या. त्यांचे अुच्चार अगदींच खेडवळ. अनेकवार अैकूनहि शब्द तोंडीं बसत नसत. पुन्हां विचारावे तर सगळ्या बाया मिळून आम्हाला हंसत. त्या हसूं लागल्या म्हणजे कलंगडाच्या बियासारखे त्यांचे काळे कुळकुळीत दांत पाहून मला हंसू येत असे. या प्रदेशांत अेक प्रकारचे दंतमंजन वापरण्याचा रिवाज आहे. रमणी पांढऱ्या दातांनीं कशी शोभेल ? हाडासारखे पांढरे दांत स्त्रियांनीं तोंडांत कसे धारण करावे ? नखाला मेंदी आणि दातांना दंतमंजन आणि गालाला हळद.

कर्नाटकी रमणीची ही विशेष शोभा. अेखादी स्त्री कुणाच्या घरीं बसायला गेली की हळदीची पिठी तिच्यापुढें केली जावयाचीच. मधल्या दोन बोटांनीं त्यांतील थोडी पिठी घेऊन डाव्या तळहाताला लावावयाची आणि मग दोन्ही तळहात अेकमेकांवर चोळून त्या पिवळ्या हातानीं दोन्ही गाल पिवळे करावयाचे. अशा रीतीने होणाऱ्या सुवर्णकान्तीची तिकडे बरीच चाह आहे.

भाजी विकणाऱ्या बायांशीं भाजीचा दर नक्की करणें सगळ्यांत कठिण काम असे. अेकदां वांगी विकत घेतांना भाऊ बदनी काअी म्हणण्याच्या अेवजीं बदनी हण्णू असें म्हणाला. सगळा बाजार हसूं लागला. भाऊ लाजून गोंधळून गेला त्यामुळें बाअीला बदनी काअीचे पैसे देणे राहून गेले. आम्ही विसरलो ते विसरलों. पण ती बाअीदेखील हास्यरसाच्या प्रवाहांत पैसे घ्यायला विसरली.

आम्हीं तिकडून शेजारच्या बाजारात गेलों. तेथे आम्हीं बेल्ला ( गूळ ) विकत घेत होतों. अितक्यांत अेकाअेकी ती बाअी धांवत आली आणि तिनें भाऊच्या धोतराचा सोगाच धरला आणि कानडीमध्यें शिव्या देऊं लागली. भाऊचा स्वभाव तापट खरा; पण अिथें तो काय करणार ? आणि त्या शिव्यांचा आम्हांला अर्थहि समजत नव्हता ती बाअी मिनिटाला दीडशें शब्दांच्या वेगाने शिव्या देत होती आणि भाऊ मराठींत विचारत होता. "अरे पण झाले काय ?" आपण हिचे पैसे दिले नाहींत हें त्याच्या डोक्यांतहि नव्हतें. भाऊपेक्षां माझे कानडीचे ज्ञान अधिक. कारण कारवारला मीं अधिक राहिलों होतों. मीं त्याला म्हणालों, "ती वांग्याचे पैसे मागत आहे. देऊन टाक तिला." आपण पैसे दिले कीं नाहीं याची भाऊ आठवण करूं लागला. मला त्याचा फार राग आला. भर बाजारांत आपली अशी फजिती होत आहे, लोक टकटक पहात आहेत, हें दृश्य अेक क्षणभर देखील कसें सहन करावें ? मीं भाऊला म्हणालों, "तिला अगोदर पैसे देऊन टाक. पूर्वी दिले असले तरी हरकत नाही." या बाबतीत भाऊच्या भावना बोथट होत्या किंवा न्यायबुद्धि अधिक तीव्र. तो माझें म्हणणे कसचें अैकतो ? तो आपला आठवून-आठवून हिशोबच करूं लागला. शेवटीं मीं त्याच्या खिशांत हात घालून दहा पैसे काढून त्या बाअीच्या पुढें फेकून दिले. आम्हां दोघांची पुटका झाली. परत येतांना अशा प्रसंगीं काय करणें योग्य असतें याविषयीं आमची चर्चा चालली. भाऊ म्हणाला, "हा दहा पैशांचा प्रश्न नाहीं, सिद्धान्ताचा प्रश्न आहे. समज कीं दहा पैशांच्या अेवजीं शंभर रुपयांचा प्रश्न असता तर ? घाबरून जाऊन तूं ते दिले असतेस का ?" मीं म्हणालों, "जशी परिस्थिति

असेल तसा सिद्धान्त ठरवावा लागतो." भाऊ म्हणाला, "सिद्धान्त म्हणजे सिद्धान्त." तेथें रकमेच्या लहानमोठेपणाचा प्रश्नच बुरत नाहीं" आणि माझी बाजू अशी होती की परिस्थितीहून अलिप्त, परिस्थितिनिरपेक्ष असा नागडा सिद्धान्त असूंच शकत नाहीं. शभर रुपयांचा प्रश्न असतो तेव्हां आपण सहजासहजीं विसरत नाहीं. व्यवहाराचा कांहींतरी पुरावाहि असतो. आणि त्या प्रसंगीं भर बाजारात भांडायला अुठणाऱ्या भाजीविक्त्या बाअीशी प्रसंगहि नसतो. या आमच्या मतभेदावर चर्चा चालली ती वहात वहात दहा दिवस चालली. आज ज्याप्रमाणें थोडक्यात आणि स्पष्ट शब्दांत हे दोन पक्ष मीं मांडले आहेत त्याप्रमाणे करण्याची शक्ति त्या वेळीं कुठून असणार ? आमच्या सिद्धांतातहि दृढता नव्हती आणि भाषेंतहि स्पष्टता नव्हती. आपण परस्परविरोधी विचार मांडत आहोंत याचीहि जाणीव त्या वेळी नव्हती. सगळाच घोटाळा होता. आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठीं अेखादें अुदाहरण द्यावें किंवा अुपमा मांडावी तर तीच अेक विवादाचा विषय होअून जाअी. त्याचे खंडन-मंडन करूं जातां त्यांतूनच अेक नवीन भाडण अुपस्थित होअी. पुढे पुढें तर प्रथम कोणी काय म्हटले होतें हेहि आम्ही विसरून गेलो असूं. मी भाऊला म्हणावे, "तूं असें म्हटले होतेंस." त्यानें म्हणावे "बिलकुल नाही. मी असे कधींच म्हटले नव्हतें." त्यावर मी म्हणावे "होतें;" त्याने म्हणावे "नव्हतें."

असे आमचे हें वाग्युद्ध किती तरी दिवस चालले होतें. वडील जेअून कचेरीला गेले म्हणजे आमचे या युद्धाचे नगारे वाजत. संध्याकाळपर्यंत तें चाले. गोंदू आमच्या चर्चेमध्ये मधून मधून भाग घेत असे, पण त्यामुळें अेकाहि पक्षाचे समर्थन होत नसे अुलट आम्हा दोघांना मिळून प्रश्न काय आहे हे त्याला मुळापासून समजवावें लागे. माझी खात्री आहे कीं आमचें हे युद्ध शास्त्रोक्त अठरा दिवस चालले असतें. पण आम्हाला असे भांडताना पाहून आअीला फार वाअीट वाटे. आम्ही कशासाठीं भांडतों याची आम्हांलाच कल्पना नव्हती. मग आअीला ती कोठून यावी ? रोज अुठून मोठ्यामोठ्यानें आम्हाला असे वाद करताना पाहून आअीला चिंता वाटूं लागली. शेवटीं जेव्हां तिच्यानें राहवेना तेव्हां आमचेकडे येअून तिनें गहिंवरून म्हटले 'अरे, दत्तू, केशू, तुम्हांला आज ही काय दुर्बुद्धि सुचली आहे ? जन्मांत कधीं तुम्हीं भांडला नाहींत. काही गोड खावयास मिळाले तर तोंडांतला घांस काढून तुम्हीं वांटून घेत होतां. तुम्हींच जर असे भांडूं लागलां तर मी आंत काय करावें ? कुठें जावें ? आज संध्याकाळीं ते आले म्हणजे त्यांना सगळें सांगून

टाकणार.'' भाऊ मोठ्यानें हांसला. ''आम्हीं भांडत नाहीं आऊ. आमची तात्त्विक चर्चा चालू आहे. आम्ही द्वेषानें बोलत नाहीं; पण आम्हांला तत्त्वांचा निर्णय करायचा आहे.''

या खुलाशाने आऊचें समाधान झाले नाहीं. आईचा तो गहिंवरलेला आवाज माझ्या हृदयाला वेधून आरपार गेला. मीं भाऊला म्हणालो—''जा, तुझेंच म्हणणें सगळें खरे मला नाहीं चर्चा करायची.'' भाऊ मनांत समजला. इतक्यांत गोंदू अेकदम ओरडला, ''कमा हरला ! कमा हरला ! मीं नव्हतों म्हणत ?''

दीड वर्षानें बाळ गंगाधर टिळक तुरुंगांतून सुटून आले. तुरुंगांत जाण्यापूर्वीचें त्यांचे पुष्ट शरीर आणि तुरुंगांतून जाऊन आल्यानंतरचे त्यांचें कृश शरीर यांची तुलना सहज होण्यासारखे त्यांचे दोन फोटो शेजारीं शेजारीं छापून काढले होते. हीं चित्रें घरोघर भिंतीवर चिकटविलीं गेलीं. सर्वत्र आनंदीआनंद झाला. त्या दिवसांत आमच्यासाठीं मराठी मासिक 'बालबोध' घरीं घेत असत. त्यांत टिळकांच्या स्वागताविषयी जो लेख आला होता, त्यांत प्रथमच मोरोपंताची ओळ दिली होती:

*तेव्हां गंधर्व-मुखी जिकडे तिकडेहि तनन न तननम्।*

खरोखर महाराष्ट्रभर मोठा उत्सव झाला. आजकाल शहरांतील वाढत्या लोकसंख्येसाठीं शहराबाहेर जशीं अेक्स्टेन्शन्स म्हणून अुपनगरे जिकडे तिकडे स्थापलीं जात आहेत, त्याचप्रमाणें बेळगांवच्या कांहीं लोकांनीं रेल्वेच्या सडकेच्या शेजारीं नव्या अिमारती बांधल्या होत्या. या नव्या वस्तीचा प्रवेशसमारंभ टिळक सुटले त्याच वेळीं झाला. म्हणून लोकांनीं या नव्या वस्तीचे नांव 'टिळकवाडी' असें ठेविलें. पण नव्या वस्तींत बरेच सरकारी नोकर रहाणार होते. त्यांना असें राजद्रोही राष्ट्रपुरुषाचें नांव धरवेना आणि सोडवेना ! त्यांनीं या वस्तीचे नांव शेवटीं

ठेवले 'ठळकवाडी;' मनामध्ये समजावयाचे टिळकवाडी; बाहेर बोलावयाचें ठळकवाडी. कोणी विचारले तर सांगावयाचे की गांवांतील ठळक ठळक लोक येथे रहातात म्हणून हे नांव ठेवले आहे. हृदयांत देशभक्ति असावी आणि बाहेरून राजनिष्ठा दाखवावी, यासाठीं त्या काळचे हे चतुर लोक अगांत स्वदेशी गिरणीच्या कापडाचा सदरा घालीत आणि वर परदेशी सर्जचा कोट चढवीत. आसपास कोणी चहाडखोर नाहीं अशी खात्री करून घेऊन कोटाच्या खालीं असलेला देशी सदरा दाखवून आपणहि देशभक्त आहोंत, याचा पुरावा ते देत. आपल्या धर्मात नाहीं का सांगितलें कीं, मुक्त पुरुषानें 'अन्तर्बोधो बहिर्जडः' असे वागावे ! शेवटी बेळगांवच्या या नव्या वस्तीला 'ठळकवाडी' हेंच नांव चिकटले. देवाला अुघड व्यवहार तेवढाच मंजूर असावा असे दिसतें.

टिळक सुटल्याचा अुत्सव संपल्यानंतर आम्ही तिघे धाकटे भाअू देशाचा विचार करूं लागलों. टिळकासारख्या देशभक्तांना सरकार तुरुंगात घालतें याचे कारण ते सार्वजनिक भाषणे करितात आणि वर्तमानपत्रांत लिहितात हेच होय. सर्व काम जर गुप्तपणानें करण्यात येअील, तर सरकारला त्याची बातमी कोठून लागणार ? शिवाजी महाराज का कोठें भाषणे करावयाला गेले होते ? आम्ही तिघांनी गुप्तमंडळ काढण्याचें ठरविले.

याच सुमाराला आमचें घर मागल्या बाजूनें वाढविण्यात आले. त्यासाठीं पाया खोदीत असतांना म्यानासकट अेक तरवार सांपडली. म्यान कुजले होतें. तरवारीला थोडासा गंज चढला होता. विष्णूनें गवंडी मजुरांना तरवार सांपडल्याची गोष्ट गुप्त ठेवण्यास सांगितले आणि ती तरवार घराच्या छपरांत लपवून ठेवली. आमचें तिघांचें गुप्तमंडळ स्थापन झाल्यानंतर आम्ही ती तरवार काढून तिची पूजा करीत असूं. आणि मग ती हातांत घेअून आडवी तिडवी फिरवीत असूं. तरवार काहीं विशेष जड नव्हती आणि मीहि काहीं फारसा मोठा नव्हतों. अेकदा आवेशांत येअून मी त्या तरवारीचे दोनतीन घाव आढ्याखालच्या खांबावर केले होते खांब जर कापला जाता तर सारे छप्पर माझ्या डोक्यावर कोसळले असतें. पण खांब कांही कच्च्या केळीचा नव्हता आणि माझ्या मनगटांतहि तानाजी मालुसऱ्याची शक्ति नव्हती. त्यामुळें माझे हे तरवारीचे प्रयोग सुरक्षित होते. खांबाचे रूप थोडेसें बिघडलें म्हणून काय झाले ? माझ्या देशभक्तीच्या विकासापुढें खांबाच्या रूपाची काय किंमत ?

पुष्कळ वर्षेपर्यंत ती तरवार आमच्या घरीं होती. पुढें राजकीय चळवळीत मी विशेष भाग घेतों यामुळें पोलिस लोक आमच्या घराची झडती घेणार, असें कळल्यावरून वडिलांवर कांहीं संकट येऊं नये म्हणून त्या तरवारीचे मी तुकडे केले. लोहाराकरवीं त्या तुकडयाच्या सुऱ्या करविल्या आणि तलवारीची मूठ शहराबाहेर अेका लहानशा पुलाखाली मी टाकून दिली. त्या दिवशीं मला जेवण रुचले नाहीं. रात्रीं झोंपहि आली नाही. अगोदरच देश निःशस्त्र झालेला; दैववशात् हातीं आलेले शस्त्र आपल्याच हाताने मोडावें लागले. दरवर्षी दसऱ्यापूर्वी खंडे-पूजा करण्यासाठीं जें शस्त्र वापरावयाचे त्याचाच आपण नाश करतांना आपण कांहीं तरी अधर्म करीत आहोंत, असें त्या वेळीं मला वाटलें पण दुसरा अिलाज नव्हता. त्या काळचें राजकीय वातावरण अगदीच गढूळ होतें

मनुष्यानें मनुष्याचा वध करण्यासाठीं तयार केलेल्या शस्त्राला पवित्र मानावयाला आज माझे मन तयार नाही. पण आजदेखील त्या वेळीं ती तरवार मोडून टाकली याबद्दल बरे वाटत नाहीं आमच्या त्या वेळच्या या गुप्तमंडळात कोणा चौथ्याला आम्हीं खेचू शकलों नाहीं. अरण्यात जाऊन तयारी करावी, किल्ले जिंकावेत, तेथें फौज ठेवावी, वगैरे आमचीं मनोराज्ये चालत आणि हें सर्व कसे साधनां येअील याचे विवेचनच आम्हीं करीत असूं.

हिन्दु स्कूलचें पवित्र वातावरण घेऊन मी धारवाडला गेलों. तेथून आम्ही बेळगांवजवळील शहापूरला आलों. वर्गांतील विद्यार्थ्यांहून मी निराळा होतों. मला याचे भान होतें आणि अभिमानहि होता. वर्गांत खासगी वेळीं नीतिमय जीवनाविषयीं मीं कितीतरी बोलत असें. वर्गांतील अेकाद्या विद्यार्थ्यांत असत्य, अश्लील भाषण किंवा अन्याय यांचा प्रकार नजरेस आला तर मी कठोर भाषेंत त्याच्या तोंडावर त्याचा धिक्कार करी अेकदां वर्गांतील अेका विद्यार्थ्याच्या देखत त्याचेविषयीं चिडून मीं म्हणालों, " हा मुलगा हलकट आहे. " सर्व विद्यार्थी चकित झाले. तो मुलगा सपाटून चिडला; पण काय अुत्तर द्यावे तें त्याला सुचले नाहीं. क्षणभर थांबून तो म्हणाला, " काय मीं तुमच्या बापाचे खाल्लें आहे कीं माझेविषयी तुम्हीं आपला हा असा अभिप्राय जाहीर करावा ? तुमचा जर मी मित्र असतों तर तुमची निंदा मीं सहन केली असती. पण सुखासुखीं असली अुत्तरे कोण सहन करील ? " मला वाटलें होतें कीं स्वारी मारण्यासाठीं माझेवर धांवून येअील. त्याच्या अुत्तरानें मी भानावर आलों. मीं त्याची माफी मागितली आणि तें प्रकरण तेवढ्यावरच आटोपलें.

वर्गांतील मुलें कांहींशा आदरानें पण मुख्यत्वें टवाळी करण्याच्या अुद्देशाने

मला सन्त कालेलकर म्हणून म्हणूं लागलीं. पण यामुळें मी फुलून गेलों आणि सर्व शाळेचा नीतिरक्षक काजी बनलों. माझ्यादेखत मोकळेपणानें अचकट विचकट बोलण्याची कोणाची हिम्मत नव्हती. चारजण जमून कांही अशाच गोष्टीत बोलत असले आणि मी जर तेथे जाऊन पोहोंचलों तर ते अेकदम विषय बदलून टाकीत. मला हे सर्व यथायोग्य आहे असे वाटे. अितका आपला अधिकार आहे याविषयीं मला शंका नव्हती.

पण असला सासुरवास लोक किती दिवस चालवून घेणार ? आमच्या वर्गात अेक मोठ्या वयाचा मुलगा होता. गावांतील अेका प्रतिष्ठित परंतु असंस्कारी घरातील तो अेकुलता अेक मुलगा. शिक्षण्याची त्याला कसलीच पर्वा नसे. घरच्या लोकांचा देखील त्यानें शिकावे असा आग्रह नव्हता. काहीच काम नाही म्हणून स्वारी शाळेला येअी. वय झालेले आणि शरीरानें धिप्पाड; यामुळें शाळेंतील मास्तर त्याचे नांवच घेत नसत. तो नियमितपणें फी देअी यामुळें मनांत येअील तेव्हां वर्गात येअून बसण्याचा त्याचा हक्क अुघड होता. गंमत वाटली तर वर्गातील विषयांकडे थोडें ध्यान द्यावे, नाहीतर हव्या तसल्या गोष्टी करीत रहाव्या, हा त्याचा रिवाज होता.

शाळेंनील लहान मुले त्याला नेहमीं भिअून असत आणि तोहि मुलांना धमकावण्यांत कमी करीत नसे. अशा परिस्थितीत लहान मुलाच्याजवळ आत्मरक्षणाचा अेकच अुपाय असतो. शिक्षकांचेजवळ जाण्यात अर्थ नसावयाचा. तेथें कसलीच सहानुभूति मिळण्याची आशा नको. अुलट खोटी तक्रार करतो म्हणून शिक्षाच व्हावयाची. आणि मग त्या पोळाकडून त्रास अधिक व्हावयाचा हे निराळें यामुळें लहान मुलें त्याची नेहमी खुशामत करीत. त्यानें माझी खोड मोडण्याचे मनावर घेतले. मला मारण्याची किंवा अितर रीतीनें त्रास देण्याची त्याला हिंमत नव्हती. हुशार आणि सज्जन विद्यार्थी म्हणून शिक्षकांजवळ माझी प्रतिष्ठा बरीच होती. अभ्यासात मागासलेल्या विद्यार्थ्यांना विषय समजून देण्यांत मीं बरीच मदत करीत असें. यामुळें वर्गात देखील माझेविषयीं सर्वसामान्य आदरच असे. यामुळें त्यानें नवाच रस्ता शोधून काढला. तो बसल्या ठिकाणीं जर मीं चुकून गेलों तर मुद्दाम कांहींतरी अश्लील गोष्टी सुरू कराव्यात. मी जर धिःक्कार केला तर बेशरमपणानें जरासे हंसून आणखी घाणेरड्या गोष्टी त्यानें चालवाव्यात. शेवटीं कंटाळून मी तेथून अुठून जात असे.

यामुळें स्वारीची हिम्मत वाढली. मी जेथे बसलों असेन तेथें येअून शेजारच्या विद्यार्थ्यांच्याबरोबर कांहीतरी अश्लील गोष्टी त्यानें बोलावयास सुरुवात केली.

वर्गातील विद्यार्थ्यांविरुद्ध शिक्षकांकडे तक्रार नेणें हें माझ्या नीतिविषयक कल्पनांप्रमाणे हीन कर्म होतें त्याला माझा हा स्वभाव ठाऊक होता. आणि म्हणून त्याचे सर्व प्रकार व्यवस्थितपणे चालत. मी अगदीं त्रासून गेलों. अुपाय सांपडेना. मला अुद्देशून जर तो बोलला असता तर माझे मित्रमंडळ अेकत्रित करून त्याचेशी मी भांडण केले असतें. पण तो होता धूर्त. जणूं काय अश्लील शब्दांचा शब्दकोश पाठ करीत असावा, त्याचप्रमाणें त्याची वाग्धारा चालू असे. शेवटी त्याच्या बाबतीत मी पूर्ण तटस्थता धारण केली. तरीहि त्याने पिच्छा सोडला नाहीं. शिक्षक वर्गातून बाहेर गेले म्हणजे अश्लील गोष्टी विस्तारपूर्वक विद्यार्थ्यांना अेकविण्याचें काम तो करीत असे. पुढे त्यानें वर्णनाबरोबर अभिनयही सुरू केला. प्रथम प्रथम मला हें सर्व असह्य होअी. पण पुढे पुढे कानाना संवय झाली. हा म्हणतो तें सर्व आहे तरी काय हें समजून घेण्याची जिज्ञासा वृत्ति जागृत झाली. अेका अज्ञात क्षेत्रांतील माहिती या दृष्टीनें सर्व समजून घेण्याचे कुतूहल जागृत झाले. हळू हळू मन विकारी होअूं लागलें. चेहऱ्यावर मी तिरस्काराची छटा दाखवीत असें आणि आंतून नव्या तहानेनें श्रवणाच्या ओंजळींतून रसपान करीत असे. अेका बाजूनें प्रतिष्ठाहि सुरक्षित आणि दुसऱ्या बाजूनें विकृत मनाला हवा असलेला खुराकहि तयार. ही परिस्थिति मला बरीच सोअीची वाटली.

अगदीं लहानपणीं निरनिराळ्या वेळी ज्या कांहीं गलिच्छ गोष्टी वाचल्या किंवा अेकल्या होत्या त्या स्मरणांत पडून राहिलेल्या होत्या. त्या वेळी मनावर त्यांचा कांहीं परिणाम झाला नव्हता. कारण त्या वेळीं माझे वयच अगदीं कोंवळें होतें. गोव्याकडे गेलों असतांना शिवराम नांवाचा अेक तरुण आमच्या शेजारीं रहात होता. त्याची ओळख फार तर पंधराच दिवसाची असेल; पण तेवढ्यांतच त्याने समाजांतील वस्तुस्थितीचें चित्र म्हणून कांहीं घाणेरड्या गोष्टी सविस्तर वर्णन करून सांगितल्या होत्या. पुढें धारवाडला अेका कानडी विद्यार्थ्याने त्याच्या मोडक्यातोडक्या अिंग्रजी-मध्ये अशाच कित्येक गोष्टी शास्त्रीय माहिती म्हणून सांगितल्या होत्या. त्याच्या त्या शास्त्रीय माहितींत कल्पनेची विकृतिच भरलेली होती. पण माझ्या डोक्यांत काहूर माजवावयाला ती माहिती पुरेशी होती. नेहमीं नीतीमत्तेचा आव आणणाऱ्या माझेसारख्या विद्यार्थ्याला कोणाशीं अशा बाबतींत चर्चा करण्याची सोयच नव्हती. खरें खोटें काय आहे याचा निर्णय करण्यासाठीं वडील मंडळींशीं गोष्ट तरी कशी काढणार ? तेव्हां मनांतले मनांत अनेक प्रकारच्या कल्पना कराव्या आणि रहस्य

समजून घेण्याचा प्रयत्न करावयाचा. जिथें प्रत्यक्ष माहिती किंवा अनुभव नसतो तिथें मन चित्रविचित्र कल्पना लढवितें. मग त्या गोष्टी अिहलोकाविषयीं असोत किंवा परलोकाविषयीं असोत. वर्गांत चालणाऱ्या गोष्टींनीं माझे कान आणि माझें मन तुडुंब भरून गेलें, अेकांतांत याच वस्तूवर मीं विचार करूं लागलों. आणि पुढें पुढें मनोराज्यें रचूं लागलों. वरून अत्यंत नीतिनिष्ठ आणि पवित्र समजला जाणारा मी मनांत आणि मनोराज्यांत विलासाचा नरक अुत्पन्न करूं लागलों.

मनांतील ही मलिनता जसजशी वाढूं लागली तसतशी बाह्य आचरणांतील शिष्टाचार आणि नीटनेटकेपणा बराच वाढला. माझ्यामध्यें दंभ नव्हता, पण मिथ्याचार होता. मनोराज्य मुख्यत्वें कुतुहलाचे होतें. अेका बाजूनें सर्व रहस्य आपल्याला समजावें अशी अुत्कंठा आणि दुसऱ्या बाजूनें आपण खरोखर सदाचारी व्हावे असा आन्तरिक आग्रह. या दोहोंमधले तें द्वंद्व होतें.

वर्गातील परिस्थिति सुधरण्यासाठीं *The Good Compay* म्हणून अेक लहानसें मंडळ मीं स्थापिलें. या मंडळांत आम्हीं अनेक विषयांची चर्चा करीत असूं. परोपकाराच्या योजना आंखाव्या. आत्मोन्नतीचे वातावरण तयार करावें असा प्रयत्न चालू असे. कधीं कधी आम्हीं शिक्षकांनाहि बोलावीत असूं. अिंग्रजी तिसऱ्या रीडर-मध्यें कांही नीतिवाक्ये मी वाचलीं होतीं. *Better be alone than in bad company* हे वाक्य मला विशेष आवडलें त्याचा मीं जीवनमंत्र म्हणून स्वीकार केला. यांतूनच वरील मंडळाचे नांव अुत्पन्न झाले होतें. या मंडळाचे वातावरणाचा मला फारच फायदा झाला. पण *Alone* म्हणजे अेकाकी असल्यावेळीं माझे मलिन मनोराज्य चालू असे. हे कसें शक्य आहे हा मानसशास्त्राचा प्रश्न आहे. पण तें शक्य असतें याला माझा अनुभवच साक्ष आहे.

तो प्रौढ विद्यार्थी कांहीं दिवसांनीं शाळा सोडून गेला. त्याला कुठे शिकायचें होतें ? अेकादे वर्ष शाळेंत अधिक रहावें अेवढ्याच कल्पनेनें तो शाळेंत आला होता. अेकादे वर्ष लौकरच शाळा सोडण्याचे त्याला सुचतें तर चांगलें झालें असतें. जणुं काय माझ्या दुर्भाग्यानेंच त्याला शाळेंत अेक वर्ष अधिक ठेवलें होतें.

मलिन विचार कानांमध्यें ओतणें आणि मनामध्यें भरून ठेवणें सोपें आहे. पण ते तेथून काढून मन धुअून साफ करणें सोपें नाहीं. पुढें असाधारण परिस्थितीचा लाभ मला मिळाला नसता —वारंवार प्रयास करून निरनिराळे अनुभव घेणें, देशभक्तीची

दीक्षा, कॅालेजमध्यें प्रवेश आणि पुढें शिक्षक म्हणून येणारी जबाबदारी या गोष्टींची मला मदत मिळाली नसती, तर मला नाहीं वाटत कीं कुविचारांच्या परिपोषांतून मी वांचूं शकलों असतों.

ज्याला शिकावयाचे नाहीं, शुभ संस्काराची ज्याला कदर नाहीं, पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें दुर्गुणांचा प्रसार करण्याची ज्याला लाज वाटत नाहीं, अशा लोकांना शाळेंत न जाण्याची बुद्धीच ओश्वर देअील तर किती चांगले. अशा प्रकारच्या बिघडलेल्या, निर्ढावलेल्या, रखडू विद्यार्थ्यांना शाळेंत न ठेवण्याची जबाबदारी शाळांवर नाहीं काय ? दुर्गुणी मुलांना सुधारणें हें शाळेचे अेक कर्तव्य आहे खरे; पण तसें करण्यास शिक्षकांनीं असे विद्यार्थी शोधून काढले पाहिजेत. त्यांच्या हृदयांत प्रवेश केला पाहिजे. आरोग्य-भवनांत रोग्यांना ठेवतात तसें त्यांना ठेवले पाहिजे. मुग्ध विद्यार्थ्यांना त्यांचा संसर्ग लागूं नये. याचा अुपाय जरी सांपडला नसला तरी तशा प्रकारची काळजी आणि कळकळ तरी निदान शिक्षकांमध्यें असली पाहिजे.

आणि आरोग्य-भवनांत तर अशाच लोकांना ठेवतात कीं ज्यांना बरें व्हावयाचें आहे. ज्यांना सुधरावयाचेच नाहीं अशांना कोणतीहि शाळा कशी काय सुधारणार ?

## फोटोची चोरी



लहानपणीं छापखान्यांतील दोन टाअिपांची चोरी केल्यानंतर मी मनाशीं खूण-गांठ बांधली होती कीं, पुन्हां असें होतां कामा नये. तरीहि चोरीची खास अिच्छा बाळगल्यावांचून माझ्या हातून अेक चोरी झाली.

मुधोळांत आम्हीं संस्थानचे पाहुणे म्हणून होतों. तेथील सरकारी मंदिरांत आमची राहाण्याची सोय केली होती. रोज संध्याकाळीं आम्हीं निरनिराळ्या ठिकाणीं फिरावयास जात असूं. अेक दिवस आम्ही युरोपिअन पाहुण्यांसाठीं खास तयार केलेले गेस्ट हाअूस पहावयास गेलों. त्यांत पहाण्यासारखें काय असणार ? बंगल्यासारखा बंगला. खुर्च्या, टेबले, वगैरे अुपकरणांची तेथें रेलचेल असावयाची. भिंतींवर लहानमोठीं चित्रें टांगलेलीं असावयाचीं. जेवण्याचें मोठें टेबल, मोठमोठे पंखे, असेंच सर्व असावयाचें. सौंदर्याच्या किंवा कलेच्या दृष्टीनें पहाण्याजोगें तेथें कांहींच सांपडावयाचे नाहीं. बंगल्याच्या खानसाम्याने युरोपियन लोक कशा रीतीनें रहातात, काटया-चमच्यानें कसे खातात, आंधोळ कशी करतात, हें सर्व सांगितलें. मला त्या सगळया बंगल्यांत तीन जणांनीं तीन बाजूंनीं तोंडें करून बोलत बसण्याजोगी अेक मोठी खुर्ची मात्र आकर्षक वाटली. अिंग्रजी S अक्षराला अेक फांटा फोडून अेक त्रिकोणी स्वस्तिक केलें होतें असेंच समजाना.

खरोखर आम्हीं त्या बंगल्याकडे फिरावयास जात असूं ते बंगल्याच्या आसपास असलेला बगीचा पहाण्यासाठीं. तेथे जुअीचीं अितकीं कांहीं झाडें होतीं कीं, आअीनें तेथून रोज जुअीचीं फुले मागवून घरच्या महादेवाला अेक लाख फुलें वाहिलीं. रोज घरीं फुलें आली म्हणजे मी, माझ्या दोन भावजयी आणि माझी पत्नी—आम्हीं सर्वजण फुले मोजण्यांत सकाळ खर्च करीत असूं.

त्याच बंगल्यांत अेका लहानशा खोलीच्या कोपऱ्यांत वीतभर लांबीचे लहानसे सुंदर शेल्फ होतें. त्याचेवर अेका गोऱ्या बाअीचा लहानसा फोटो ठेविला होता. या बंगल्यांत राहून गेलेल्या अेकाद्या बाअीचा असेल कदाचित्. फोटोवरून पहातां बाअी शरीरानें चांगली स्थूल असली पाहिजे. डोक्यावरचे केस अशा कांहीं रीतीनें तिनें विंचरले होते कीं, तें पाहून विरस होअी. पण फोटो काढण्याच्या कलेच्या दृष्टीनें तो फोटो नमुनेदार होता आणि मला तर त्या कलेतील खुब्या पहाण्याची हौस विशेष. पहिल्या दिवशीं घाअींत असल्यामुळें तो फोटो ध्यानपूर्वक मीं पाहूं शकलों नाहीं. पण तो डोळ्यांत मात्र भरला खरा.

दुसऱ्यादां जेव्हां त्याच बंगल्याकडे वडिलांच्या बरोबर फिरावयाला गेलों तेव्हां तो फोटो पहावयाचा आहे अेवढें डोक्यात राहून गेलें होतें. फोटोसमोर अुभा राहून टक लावून पाहूं लागलों तर वडिलांचें लक्ष माझेकडे जावयाचें. त्यांना वाटावयाचें की, स्त्रियांचे सौंदर्य पहात अुभें रहाण्याअितका दत्तू अशिष्ट झाला आहे. मला पहावयाचें होतें त्या फोटोचें रीटचिंग. छातीचा वरील भाग कायम ठेवून खालचा भाग ढगाप्रमाणें व्हायनेट करून टाकला होता, तेंहि मला पहावयाचें होतें. हें सर्व पहाण्याचा लोभ सुटेना आणि वडिलांच्या देखत पहाण्याची हिंमत होअीना. मीं तो फोटो काढून हातांत घेतला. आशा ही कीं, बंगल्यांत अिकडे तिकडे फिरतां फिरतां फोटो पाहून घ्यावा आणि बाहेर जातांना वडिलांचा डोळा चुकवून खानसाम्याच्या हातीं देअून टाकावा. आमच्या बरोबरचा कारकून, तो खानसामा, आणि अितर पट्टेवाले या सर्वांचें लक्ष वडिलांना खूष करण्याकडे होतें. पण वडिलांना मी मागें न रहावें याची काळजी होती. त्यामुळें फोटोग्राफरची कला पोटभर पाहून घेण्याची संधीच मला मिळाली नाहीं, अेवढेंच नव्हे तर फोटो परत देण्याचीहि संधि मिळेना. तो नालायक खानसामा जर क्षणभर मागें रहाता तर त्याचे हातीं फोटो देअून मोकळा झालों असतों. पण तो कसचा मागें रहातो ?

आतां काय करावें ? जर वडिलांनीं माझे हातांत फोटो पाहिला तर सर्वच आटो-

पलें ! त्यांना खात्रीनें वाटावयाचें की गोऱ्या मडमेचा फोटो आहे म्हणून यानें हातांत घेतला आहे आणि बरोबर हिंडवीत आहे. काय करावें याचा विचार करण्या-इतकाहि वेळ राहिला नाहीं. गोंधळलेल्या मनुष्याला जेव्हां शेवटच्या घटकेला कांहीं ठरवावेंच लागतें, तेव्हां तो नेमकें न करण्याचेंच करून बसतो. मी तो फोटो कोटाच्या वरच्या खिशांत ठेवून दिला आणि आलेला प्रसंग टाळला. रस्त्यामध्यें छातीवर अेक मणाचे ओझें असल्याप्रमाणें मला वाटूं लागले.

घरीं आलों तों मनांत दुसरी चिंता वाटूं लागली. जर तो खानसामा वडिलांच्या-कडे आला आणि फोटो नाहींसा झाल्याची गोष्ट त्यानें केली तर ? असल्य लहानशा वस्तूसाठीं वडिलांपर्यंत येण्याची खानसाम्याची हिंमत होणार नाहीं, हा विचार देखील मनांत आला नाहीं. चोर नेहमींच भ्याड असतो. पुष्कळ विचार करून मी मनाशीं ठरविलें कीं, आपण अितक्या कांहीं चिखलांत रुतलों आहोंत की, येथून परत जाण्यांत अर्थ नाहीं. आतां बाकीचा चिखल तुडवीत पैलतीराला पोंचल्यावांचून सुटका नाहीं. मुद्देमालाचा नाश करून टाकला म्हणजे चिंता टळली. फोटो फाडून टाकला आणि त्याचा अेकादा तुकडा कोठे सांपडला तर ? चुलींत टाकण्यासाठीं तुकडे घेऊन गेलों, आणि आअीनें तें पाहून "काय आहे ?" म्हणून विचारलें तर ? फोटोचे तुकडे शौचकूपांत टाकून दिले आणि सकाळीं भंग्याचे तिकडे लक्ष गेलें तर ? दूर कोठे तरी फिरावयास जाअून शेतांत ते तुकडे पुरून टाकले तर मात्र तें जुळण्याजोगे होतें. पण फिरावयास निघालों, फार काय कुठेंहि जरासें दूर जावयाचे असलें तरी अेकादा पट्टेवाला बरोबर असावयाचाच. बाहेर जावयाचें असलें म्हणजे पट्टेवाला बरोबर असलाच पाहिजे असा आग्रह धरणारा मी आज त्याला नको म्हणून अेकटाच गेलों तर शंका आल्यावांचून रहाणार नाहीं.

तर मग आतां या फोटोचें काय करावें ? शेक्सपीअरच्या लेडी मॅकबेथच्या हाताला ज्याप्रमाणे रक्ताचे डाग चिकटले होते आणि कांहीं केल्या ते धुअून जाअीनात, त्याप्रमाणें माझी स्थिति झाली. हा फोटो अमर आहे किंवा मरून पुन्हां जिवंत होणाऱ्या रक्तबीज राक्षसासारखा आहे असें मला वाटूं लागलें. शेवटीं अेक रामबाण अिलाज सुचला. फोटो घेअून मी शौचाला गेलों. तेथें त्याला पाण्यांत भिजवून मग त्याचे लहान लहान तुकडे केले. मग ते तुकडे हाताच्या

बोटांनीं चोळून चोळून त्यांचें मी मेण करून टाकलें आणि कांहींसे वाळल्यानंतर मातींत मिसळून फेंकून दिले

दोन रात्रीं मला झोंप आली नाहीं. आपण करावयास गेलों काय आणि झालें काय ! हेंच अेकसारखे मनांत येअूं लागले. फोटोचा नाश झाला तेव्हां मला वाटलें कीं, आतां आपल्या चिंतेचा शेवट झाला. पण अेवढयानेंच भागावयाचे नव्हतें. पुन्हां जेव्हां त्या गेस्ट हाऊसकडे फिरावयास गेलों, तेव्हां तो खानसामा माझ्या बरोबर बरोबर फिरूं लागला. माझा पिच्छा मुळीच सोडीना. माझे गुन्हेगार मन नेमके पाहूं शकलें कीं खानसाम्याच्या डोळ्यांत आदर किंवा खुशामत नसून केवळ वहीमच भरला आहे. मला वाटलें कीं, हातून अेक चोरी घडल्यानें मी अितका दीन झालो आहे कीं, हा खानसामा देखील माझ्यापेक्षां मोठा होअूं पहात आहे. माझेवर तो पाळत ठेवीत आहे. मी घाअीनें घाअीनें बगीचांत हिंडलों आणि परत जावयास निघालों अितक्यांत खानसामा म्हणालाच, " साहेब, आमचा अेक फोटो सांडला आहे. " माझ्यापुढें अंधेरी आली. काय जबाब द्यावा हें सुचेना. प्रतिष्ठेची ढाल पुढें करणेंच शक्य होतें. मी चिडून अितकेंच म्हणूं शकलों "थांब. वडिलांना सांगतों. " मी अेवढें वाक्य बोललो खरा पण माझा आवाज भरीव नव्हता.

परत घरीं येताना यांतन अेक नवीन संकट अुद्भवतांना मला दिसले चरोबरच्या कारकुनाच्या आणि पट्टेवाल्याच्या देखत मी बोलून चुकलों होतों कीं वडिलांना सांगतों. आतां जर न सांगावे तर कांहींतरी पाणी मुरत आहे असें अनुमान निघावयाचें. तेव्हां हिंमत करून मी वडिलांना सांगितलेच कीं खानसामा असें असें म्हणाला. वडिलांच्या स्वप्नांत देखील ही गोष्ट येणें शक्य नव्हतें कीं, दत्तू फोटोची चोरी करील. घरीं वडिलांचे स्वतःचे दोन कॅमेरे होते. याखेरीज नानाचे तीन होते ते निराळेच. घरांत फोटोंचा ढीग पडलेला. स्वाभाविकपणें वडिलांनीं माझी बाजू घेअून खानसाम्याला बोलावून आणलें त्याची चांगली खरडपट्टी काढून शेवटीं म्हणाले, "आत्तांच्या आतां कारभाऱ्यांना चिट्ठी लिहून तुला बडतर्फ करवितों." खानसामा घाबरला. समर्थापुढें गरिबाचें काय चालणार ? त्यानें माझी माफी मागितली. माझा चेहरा फिक्का पडला होता. आपला चेहरा फिक्का पडला आहे याचें मला भान झालें होतें. वडिलांना माझा अुतरलेला चेहरा दिसला; पण त्यांना वाटलें असावें कीं, हकनाहक अेका तुच्छ माणसाच्या हातून अपमान झाल्यामुळें माझा चेहरा अुतरला असावा.

मी सरकारी अंमलदाराचा मुलगा असलों आणि तो खानसामा अेक गेस्ट हाऊसचा मामुली नोकर असला तरी हृदयाच्या माणुसकीच्या तराजूमध्यें आम्हीं दोघेहि सारखींच माणसें होतों. माझी माफी मागतांना देखील त्याची खात्री होती कीं, गुन्हेगार मीच आहें. आणि मलाहि आंतून वाटत होतें कीं, खरोखर मीच याची माफी मागितली पाहिजे. वडिलांनीं जर खरोखरच कारभाऱ्याला चिठ्ठी लिहिली, तर माझ्या अपराधामुळें त्या बिचाऱ्याची रोजीच जावयाची आणि त्याचों मुलेंबाळें अुघड्यावर पडावयाचीं. आम्हां दोघांची दृष्टि जेव्हां मिळाली तेव्हां माझी काय स्थिति झाली असेल याची कल्पना निर्दोष हृदयांना यावयाची नाहीं. मी घाओ करून तें प्रकरण तेवढ्यावरच मिटविलें. मात्र पुन्हां कधीं गेस्ट हाअूसच्या बाजूला फिरावयास गेलों नाहीं.

या सर्व प्रकरणांत कोणत्याहि पायरीला खरे सांगून टाकण्याची हिंमत जर मी करू शकलों असतों तर किती चांगलें झालें असतें ! पण तसें झालें नाहीं खरें. आतां आज अितक्या अुशीरां हें प्रकरण लिहून जे कांहीं समाधान मिळेल तेवढें खरें.

आण्णू म्हणून अेक शिपाअी आमच्या दिमतीस दिलेला होता. देशी संस्थानांत ब्रिटिश सरकारकडून गेलेल्या अंमलदाराचा दमामा किती असतो, त्याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. माझ्या वडिलांचा स्वभाव अगदीच साधा. स्वतःचा धाक किंवा दरारा बसविणे त्यांना आवडत नव्हतें आणि साधतहि नव्हतें. पण स्थान-माहात्म्य थोडेंच कमी होतें? आण्णू होता संस्थानी पोलीस; पण आज त्याला ब्रिटिश प्याद्याची प्रतिष्ठा मिळाली होती. वाटेल तेथें जाअी आणि वाटेल त्याला धमकावी. आम्हांला त्याची बातमीहि नसावयाची. अेकदां घरीं बारा ब्राह्मणांची समाराधना घालावयाची होती. आण्णूला बरेचसे पैसे देऊन भाजी आणण्यास पाठविलें. त्यानें जवळ जवळ गाडीभर भाजी घरीं आणून ओतली आणि मला म्हणाला, " येथें खेडेगांवांत भाजी फार स्वस्त मिळते. " मला त्याचे म्हणणें खरे वाटले. पुढे जेव्हां आमचा मुक्काम हालला त्या दिवशीं कोणीसे मला सांगितले कीं ,आसपासच्या खेडे-गांवांत जाऊन जबरदस्तीनें सगळी भाजी फुकटांत आणली होती. अगदीं अुशीरां हें सर्व कळल्यामुळें यावर कांहींच करणें शक्य नव्हतें. बारा ब्राह्मणांना पक्वान्नांचें आकंठ जेवण देऊन आणि मनसोक्त दक्षिणा देऊन जर कांहीं पुण्य आम्हांला मिळालें असेल तर तें या जुलमानें संपून गेलें असलेच पाहिजे. ( प्राचीन काळीं म्हणे राजे

लोक ब्राह्मणांकरवीं मोठमोठे यज्ञ करीत, तेव्हां देखील अशाच जुलमानें यज्ञाची आणि समाराधनेची सामुग्री अेकत्रित होत असे. अेका ब्राह्मणाशीं चर्चा करीत असतांना त्यानें मनुस्मृतींतला श्लोक सांगितला कीं, ब्राह्मण जे कांहीं खातो तें सर्व स्वतःचेच खातो. सर्व कांहीं ब्राह्मणाचेच आहे. ब्राह्मण कठोर होत नाहीं म्हणूनच अितर प्रजेला खावयास मिळतें. मी त्याचेपुढें हात जोडून गप्प बसलों.) अेके दिवशीं आण्णू माझे जवळ येअून म्हणाला, " आप्पासाहेब, ( लहानपणीं मला आप्पासाहेब म्हणत ) येथील पोस्टमास्तर फार मिजाजी आहे. मी टपालाला जातों तेव्हां टपाल ताबडतोब देत नाहीं. ही गोष्ट जाअूं द्या; पण त्याची रहाणी-करणी फार वाअीट आहे. जातीनें कोमटी असावा. असा घाणेरडा आहे कीं, शेजारीं अुभें रहाण्याची अिच्छा होत नाहीं. रहातो अेका मंदिरांत आणि तेथें कोंबडी मारून खातो ! आणि अंड्याच्या कवच्या अिकडे तिकडे फेंकून देतो. त्याला वठणीवर आणला पाहिजे. तुम्हीं मनावर घेतलें तर त्याला सहज ठीक करतां अेअील. " आण्णू हुशार आहे हे पाहून मी त्याच्यावर खूष होतो. तो जुलूमगार आहे हें मला शेवटीं शेवटीं कळले. मी त्याला म्हणालों, " ठीक आहे. " मनाची खात्री करून घेण्यासाठीं अेकदोन कारकुनांना आण्णूच्या नकळत पोस्टमास्तराविषयीं विचारले. ते म्हणाले, " गोष्ट खरी आहे. " यानंतर कधीं मी आणि कधीं आण्णू वडिलाच्याजवळ पोस्टमास्तरांविषअीं तक्रारी सुरू केल्या.

अेके दिवशी कर्मधर्मसंयोगानें आमच्या टपालाच्या बाबतीत तो चांगलाच गफलतींत सांपडला. मी ताबडतोब वडिलांना सागून पोस्टमास्तरना चिठ्ठी लिहविली. पोस्टमास्तर घाबरला. पोस्टमननें तर येअून माझ्यासमोर साष्टांग दंडवत घातले. सहा फूट दोन अिंच अुंचीचा धिप्पाड वृद्ध पोस्टमन विंध्याद्रीप्रमाणे माझ्या समोर आडवा पडलेला पाहून मला फार वाअीट वाटले. आणि मला कोठे त्याच्यावर शरसंधान करावयाचें होतें ? मला तर पोस्टमास्तर हवा होता. त्या म्हाताऱ्याला साफ सांगितलें कीं, " दोष पोस्टमास्तराचा आहे. तो जर येथें आला तर त्यांत कांहींतरी अर्थ आहे. "

बिचारा पोस्टमास्तर आला. मी सहज बोलतां बोलतां त्याला सांगून दिले की, पोस्टल सुपरिन्टेण्डंट नाडकर्णीची आणि माझी चांगलीच ओळख आहे. मग तर बिचाऱ्याची त्रेधाच अुडाली. त्याचे बरोबर अेक कारकून आला होता. त्याने माझी

खुशामत करण्यासाठीं म्हटलें, "साहेब कितीहि गरम झाले असले तरी त्यांना प्रसन्न करण्याचें काम मुलाला साधतें. तुम्ही वडिलांना दोन शब्द सांगितले तर लगेच त्यांचा राग अुतरून जाअील." मी यावर ताडकन् म्हणालों, "मला काय गरज आहे यांच्याबद्दल रदबदली करण्याची? मंदिरांत राहतात आणि कोंबडी मारून खातात." कारकून म्हणाला, "पण मी सांगतों ना तुम्हांला आतां कीं पुन्हां असे कधीं होणार नाहीं." मला अेवढेंच हवें होतें.

मी चटकन् आंत वडिलांच्या खोलींत जाअून सांगितले. "पोस्टमास्तर बाहेर आला आहे. मनुष्य गरीब दिसतो. त्याची चूक त्यानें कबूल केली आहे." कोंबड्याची गोष्ट वडिलांना ठाअूक नव्हती. तें आमचें गुप्त कारस्थान होतें. पोस्टमास्तर म्हणाला, "साहेब, आम्हीं आपले नोकर आहोंत आपण जो हुकूम कराल तो खरा." वडिलांनीं साधेपणानें म्हटले, "तुमचे खातें निराळें, आमचें रेव्हेन्यू खातें निराळें. आम्हीं कांहीं तुमचे वरिष्ठ अमलदार नाहीं आहोंत. टपालाच्या बाबतींत पुन्हां गफलत झाली नाही म्हणजे बस." पोस्टमास्तर बिचारा खूष होअून घरीं गेला.

माझ्याबद्दल त्याचें मत काय झाले असेल कोण जाणे. किंवा माझा त्यानें विशेष विचारहि केला नसेल. त्याला वाटले असेल, कीं दुनिया तर अशीच चालावयाची. नीति, अनीति, कायदा, गुन्हा ही सर्व वरपांगी दाखविण्याची भाषा आहे. जबरदस्तापुढें नमावें आणि दुर्बल मअू लोकांना पिळून काढावे, हेंच जीवनाचें खरें शास्त्र आहे माझेविषअीं त्यांचें मत कसेंहि झाले असलें तरी मला त्याची पर्वा नाहीं. कारण अितक्या वर्षांत त्याचा माझा पुन्हां कधीं कांहीं संबंध आला नाही, व यापुढें येअील असेंहि वाटत नाहीं. पण जीवन म्हणजे असेंच असावयाचे असा त्याचा ग्रह होण्यास ज्या मानानें मी कारणीभूत झालों, त्या मानानें त्याला नास्तिक बनविण्याचें पाप मी केलें. प्रतिष्ठा, अंमल, आणि वशिला यांची भीति घालावयाची हें काम काय अंडीं आणि कोंबडी खाण्यापेक्षां कमी हीन आहे?

मुधोळामध्ये असतांना आम्हीं घोडदौडी ( रेस कोर्स ) कडे कधीं कधीं फिरावयास जात असूं. अेके दिवशी दरबारकडून आम्हांला फिरावयास नेण्यासाठीं खेचराचा तांगा आला. खेचर म्हणजे अर्धे गाढव. खेचराच्या तांग्यांत कसें बसावें ? मी चिडून म्हटलें, " आम्हांला नाहीं असल्या तांग्यांत बसावयाचे. घेऊन जा त्याला परत. " बापूराव खाडिलकरांनीं मला समजावलें, " येथें तांग्यांना खेचर जुंपण्याचा रिवाज आहे. तुम्हीं पहाल कीं, अिकडील खेचरांची जात चांगली अुमदी आहे. फार काय, प्रत्यक्ष आमचे राजेसाहेब देखील कधीं कधीं खेचराच्या गाडींतून फिरावयास जातात. " अेवढें महात्म्य अैकल्यानंतर माझे मन अनुकूल झालें. मी मनांत म्हटलें, आपल्या बेळगांवकडे लष्करांत तोफा खेंचण्यासाठीं खेचरेच जुंपतात; तेव्हां खेचर कांहीं अगदींच अस्पृश्य नव्हे.

आम्हीं तांग्यांत बसलों आणि घोडदौडीकडे निघालों. पण खेचरे कांहीं केल्या चालेनात. तांगेवाल्याच्या आणि पट्टेवाल्याच्या सतत प्रयत्नानंतर अेक तासानें कसे बसे आम्हीं घोडदौडीवर पोहोंचलों. मी अगदीं कंटाळून गेलों होतों. घोडदौडीच्या आसपास शेराच्या झाडांचें अुंच कुंपण होतें. आंत जाण्यासाठीं अेका बाजूला अेक गाडी कशीबशी जाअील अेवढेंच अेक खिंडार होतें. तेवढ्या भागांत झाडें जरी नव्हतीं

तरी कुंपणाखालचा अुंचवटा होताच. या ढिगावरून गाडी चढवून आंत अुतरावी लागे. हा सर्व प्रकार पाहून मला झाले कीं आपण कोठे यायचे कबूल केलें. बापूरावांना मी म्हणालों, " आज मुहूर्त चांगला लागला नाही. तांग्याला रोजचेच घोडे कां जुंपले नाहीत ? " तांगेवाला म्हणाला, " घोडे सरकारी कामासाठीं दुसरीकडे गेले आहेत. तेव्हां खासगी कारभारी म्हणाले कीं, हीं खेचरेंच घेअून जा. "

आंत गेल्यानंतर आम्ही अेक वावरभर गेलों असूं. अितक्यांत खेचरांनी निश्चय केला कीं आतां कितीहि मार खाल्ला तरी अेक पाअूलदेखील पुढे टाकायचें नाहीं. खेचरे कांहीं अहिंसा-वादी थोडींच होतीं ? तांगेवाल्याने चाबूक मारला कीं लगेच मागच्या पायांच्या दुगाण्या झाडून तांग्याच्या पुढच्या फळीला लाथांचा प्रसाद द्यावयाचा. फळी थोडीशी मोडलीहि. त्रासून मी म्हणालो, " परत फिरा तर मग आतां. " तांगा फिरविला गेला. खेचरांना वाटले कीं, आतां घरीं जावयाचे. त्या अुत्साहासरशी त्यांनीं अशी कांहीं आंधळी धूम ठोकली कीं, कुंपणाचे बाहेर जाण्याचें तें खिंडार त्यांच्या नजरेसहि पडलें नाहीं. घोडदौडीची भली मोटी वाटोळी सडक ती ! खेचरे धांवतच सुटलीं. दहा मिनिटे झाली, वीस मिनिटे झालीं, खेचरे आपलीं धांवतातच तुफानी समुद्रांतील लाटांवर जहाज डोलावें त्याप्रमाणें तांगा वर खालीं होअूं लागला. मला अशी कांहीं मौज वाटली कीं हंसतां हंसतां बरगड्या दुखूं लागल्या.

बराच वेळ असा गेला. आणि त्या मट्ट प्राण्यांना शंका वाटली कीं, कांहीं तरी बिघडले आहे दोन्ही खेचरे अेकदम थांबलीं आणि त्यांनीं मागच्या पायाच्या लाथा तडातड मारावयास सुरुवात केली. अर्धी मोडलेली फळी त्यांनीं सगळी तोडून टाकली. आणि अेकाअेकीं विचार करून परत फिरण्याचे ठरविलें. आपण होअून त्यांनीं तांगा फिरविला. त्यांना वाटलें की, आतां मात्र आपण खात्रीनें घरीं पोहोंचणार. बस्स्. पुन्हां त्यांनीं दौड सुरू केली. ही अुलटी परिक्रमा देखील चांगली वीस अेक मिनिटें चालली. यानंतर खेचरांनीं नियमच केलाः धांवावें, थांबावें, लाथा माराव्या, परत फिरावें आणि पुन्हां धूम ठोकावी. अंधार पडावयाची वेळ आली. खेचरें थकून घामाघूम झाली. आणि आम्ही देखील हंसून हंसून अर्धमेले झालों.

शेवटीं तांगेवाल्यानें तें खिंडार जवळ येतांच खेचरांचा वेग आवरला आणि हळूच त्यांना खिंडाराच्या बाहेर काढलें. मग काय विचारावें ! खेचरे अशी अुडालीं

कीं सात मिनिटांतच त्यांनी आम्हांला घरीं आणून पोहोंचविलें. रस्त्यांत कांहीं अपघात होऊं नये म्हणून ओरडतां ओरडतां तांगेवाल्याला पुरेवाट झाली.

मी तांगेवाल्याला म्हणालों, "अुद्यां हींच खेचरे घेअून ये. घोड्यांची आतां जरूर नाहीं. तांगा सरकारी कारखान्यांत दुरुस्त होअीलच." बापूरावानीं पुस्ती जोडली, "अुद्यां येतांना बरोबर चामड्याच्या थोड्या वाद्याहि घेअून ये. खेचरांनीं लगाम तोडला किंवा पोल मोडला तर वाद्या आयत्या बेळी अुपयोगी पडतील." या पुस्तीमध्यें मला सूचना होती हें माझ्या ध्यानांत आलें. म्हणून मी कांहींसें मोठ्यानें म्हणालों, "हो, हो, होय. तें सर्व घेअुन ये. यापुढें रोजरोज घोडदौडीकडेच जावयाचे! आणि खेचरेहि हींच!"

आमच्या लहानपणी बायसिकली नव्हत्या. प्रथम आली ती ट्रायसिकल होती. भरीव रबराच्या धांवा, म्हशीच्या शिंगासारखा हॅन्डल बार, आणि टीचभर रुंदीचे खोगीर. असले तें ध्यान पाहून आम्हांला गंमत वाटे. कोणी म्हणे अेका चाकाखाली जर धोंडा आला तर ही तिचाकी अेकदम अुलटून पडते. खड खड आवाज करीत ही रत्यावरून चालली म्हणजे लोक पहावयास धांवत. पुढें आली सायकल. अुभ्या बेळगांव शहरांत ही अेकच बायसिकल होती. कोठेहि जा, लोक या सायकलीच्याच गोष्टी करीत. अेकजण म्हणाला ही पायगाडी ( त्या वेळीं बायसिकल शब्द देखील प्रचलित झाला नव्हता; सर्वजण पायगाडीच म्हणत. हा शब्द कां मागें पडला कळत नाहीं. ) आपण पानाचा अेक विडा खाअून संपवतों अितक्यांत शहापुराहून बेळगांवला जाअून पोहोंचते. दुसऱ्या अेकानें शंका अुठवली, अेकापुढें अेक चाक असू-नहि पडत कां नाहीं ? कोणीसें म्हणाले, " हीं चाकें अगदीं समोरासमोर नसतात. त्यांत थोडेंसें अन्तर असतें." स्वतःला बुद्धिमान समजणारा अेक तिसरा गृहस्थ म्हणाला, " दोरीवरून चालणारा नट आपण पडूं नये म्हणून ज्याप्रमाणें हातांत अेक आडवा बांबू धरतो त्याप्रमाणें पायगाडीवाला दोन हातांमध्यें तो चकाकणारा वांकडा दांडा धरतो. म्हणून तो पडत नाहीं." अेका म्हाताऱ्यानें सायकलवर बसणाऱ्या डॉक्टरनाच विचारलें, " तुम्हीं पडत कसे नाहीं ?" डॉक्टरनें अुलट प्रश्न विचारला

"साडेतीन हात अुंचीचा तुमचा देह घेअून तुम्हीं वीतभर पावलावर अुभे रहातां आणि चालतां, ते तुम्हीं कसे पडत नाहीं ?" सर्वत्र हंशा पिकला आणि म्हातारा खट्टू झाला.

त्या वेळीं मी अगदीच लहान होतों. पण तेव्हांपासून आपल्याजवळ असली अेक पायगाडी असली तर किती गंमत होअील, अशा प्रकारची वासना माझ्या मनांत घर करून बसली. पण सायकलसारखी तीनशें, चारशें रुपयांची मूल्यवान् वस्तु आपल्या घरांत कोण आणणार असा विचार येअून सायकलचा मनोरथ मनांतले मनांत विलीन होअून जाअी. पुढें हळू हळू सायकली वाढल्या, पायगाडी शब्द अगदींच मागे पडला. त्याच्याअेवजीं बायसिकल शब्द शिष्ट मानला जाअूं लागला. थोडया दिवसांनीं हाहि शब्द शिळा झाला आणि अेज्युकेटेड लोक बाअिक् शब्द वापरूं लागले. पुढें जेव्हां द्विचक्रीनें आमच्या घरांत प्रवेश केला त्या काळीं सायकल शब्दानें बाअिक् शब्दाशीं स्पर्धा चालविली होती.

ही बाअिक् घरांत आली नव्हती त्या वेळीं तिचे ध्यान अधिक होत असे. आपण लहान, तीनशें चारशें रुपये खर्चून आपल्याला सायकल कोण घेअून देणार ? हिंमत करून मागितलीच तर विचारावयाचे, "तुला सायकल घेअून काय करावयाचे ?' तेव्हां वारंवार मनात येअी, "सायकल मिळविण्याचा अेकच अुपाय आहे. लग्नाच्या वेळीं आपण रुसून बसूं आणि सासऱ्याला कळवूं कीं, 'मला सोन्याची कंठी नको किंवा मनगटांत पोचीहि नको. बस् ! आपल्याला अेक सुंदर सायकल पाहिजे.' माझ्या सर्व वडील बंधूंची लग्नें त्यांच्या बाळपणींच झाली होती . लग्नाच्या वेळीं ते कसे रुसून बसतात हें मी पाहिले होतें. त्यामुळेंच हा विचार डोक्यांत आला.

आतां लहानपणींच रामदासस्वामींच्या गोष्टी अैकल्यापासून मनांत ठसलें होतें कीं, लग्न करणें हें वाअीट आहे. लग्न करतात या भयानें गोंदूनें आणि मीं लहानपणीं घरांतून पळून जाण्याचा प्रयत्नहि केला होता. परंतु सायकलनें माझी बुद्धि भ्रष्ट केली. लवकरांत लवकर सायकल मिळविण्याचा हा अेकच अुपाय असल्यानें सायकलच्या लोभामुळें मी लग्न करून घ्यावयाला देखील तयार झालों ! अेकदां मनांत संकल्प अुठला; मग काय ? कल्पनेचे घोडे-चुकलों ! कल्पनेच्या सायकली धांवूं लागल्या.

अेके दिवशीं लग्नसोहळयाचा विचार अणि सायकलचा विचार यांचा डोक्यांत काला झाला आणि त्यांतून कल्पना सुचली कीं, लग्नाची सगळी वरातच सायकलवर निघाली

तर किती गंमत होअील ! नवरानवरी तर सायकलीवर असावयाचींच. पण दोन्ही-कडची सगळी व्याही मंडळी, फार काय, पुरोहित, भटभिक्षुक, वाजंत्रीवाले, आपट-बार वाजविणारे, मशाली धरणारे, चंद्रज्योति पेटविणारे, सगळे जर सायकलवर बसून शहरांतून फिरले तर कसा अद्‌भुत देखावा लोकांना दिसेल ! सायकलला बसविलेल्या बेल्स ( घंटा ) किंवा रबरी, हवेने वाजणारे कर्णे ( पोंगे ) यांची देखील अशी कांहीं व्यवस्था करावयाची कीं त्यांतून सारीगमपधनिचे निरनिराळे सूर निघावेत. अशा प्रकारची वरात भरधांवच जावयाची. लोकांना डोळाभर पाहावयास मिळावयाचें नाहीं; यासाठीं वरातीनें शहरांतून निदान दहा तरी फेऱ्या कराव्यात. अेवढ्यानें ज्यांचा संतोष होणार नाही त्या तमासगिरांनी भाडयाच्या सायकली घेअून वरातींत सामील व्हावें, अि० अि०, तऱ्हेतऱ्हेच्या कल्पना मनांत वाहूं लागल्या.

अेवढी सुंदर आणि अपूर्व कल्पना आपलपोटेपणानें मनांत कशी ठेवावी ? मीं ती गोंदूला सहज म्हणून सांगितली. त्याच्या पोटांत थोडीच ती रहाते ? त्यानें त्यान दिवशीं घरच्या सर्व मंडळीना हंसत हंसत ती सांगितली. थोडयाच दिवसांत ही घरां-तली गोष्ट बाहेर फुटली. प्रत्येकजण मला सायकलींच्या वरातीविषयीं खोदखोदून विचारून चिडवूं लागला आणि हैराण करूं लागला.

बरे झालें, त्यावर्षी माझें लग्न झालें नाहीं. नाहीं तर कोणीहि मला सुखासमाधानानें लग्न करूं दिलें नसतें. जेव्हां माझें लग्न झालें तेव्हां सर्वजण ती गोष्ट विसरले होते. विसरलों नव्हतों काय तो मीं. मनांतून रोज अीश्वराची प्रार्थना करीत होतों की, सर्व कार्य आटोपेपर्यन्त सायकलच्या वरातीचें कोणाला स्मरण न होवो. लग्नाच्या सोहळ्यांत जेव्हां बसून बसण्याचा विधि आला तेव्हां मनांत तीव्र अिच्छा असूनहि मी सायकलीचे नांव घेतलें नाहीं. कारण तेवढ्यानेंच सायकलच्या वरातीचें बंधूंना स्मरण झालें तर ?

पुढें जेव्हां खरोखरच आमच्या घरीं सायकल आली आणि मीं सायकलवर बसूं लागलों तेव्हां मी नानाला म्हणालों ( आतां मी गोंदूला नाना म्हणूं लागलों होतों ) मी सायकल घेअून अुभा आहें असा अेक माझा फोटो काढून दे ना ! तो म्हणाला, " त्यांत काय मोठेंसें आहे ? आजच काढूं. पण त्यांत अेक अट आहे;-फोटोच्या खालीं मीं लिहिणार, " सायकलवरची वरात. " ती अेक अट काढून टाकण्यासाठीं मला नानाची कितीतरी खुशामत करावी लागली.

## चोरांचा पाठलाग ७०

प्लेगचे दिवस आले म्हणजे शहापूरच्या बाहेर झोपड्यामध्ये रहावयास जाण्याचें असे कांहीं नियमित होऊन गेले होतें की लोकांनी झोंपड्या बांधण्यापेक्षां कच्चीं घरे बांधणेच सोयीस्कर आहे असे ठरविले होतें. तरीहि या घरांना झोंपड्याच म्हणत असत. आमच्या झोंपडीच्या भिंती बांबूच्या होत्या. बांबूला आंतून बाहेरून मातीचा गिलावा केला होता. छपरावर कौले घातली होतीं. ( बेळगांव-शहापूरकडचीं कौले पुणें-साताऱ्याप्रमाणे चपटीं नसून चांगलीं अर्ध गोलाकार असतात. कुंभार वाटोळ्या नळ्या बनवून भाजण्यापूर्वी त्यांचे अुभे दोन तुकडे करून ती कौलें बनवीत असतो.) आमची ही झोंपडी तयार झाल्यानंतर गांवांत प्लेग असो वा नसो, मी झोंपडींतच रहाण्याचे पसंत करीत असे. त्या वेळीं मी अिंग्रजी पांचवींत असेन. आसपास दूरदूर आठदहा झोंपड्या होत्या. त्या आमच्याच जातीच्या लोकांच्या होत्या. आमच्या मागील बाजूला अेक लिंगायत कुटुंब रहात असे. त्याच्या पलीकडे अेका शेतकऱ्याची खरीखुरी गवती झोंपडी होती. या बाजूला रात्रीं मधून मधून चोर यावयाचे.

अेकदां चोरांनीं येऊन बिचाऱ्या शेतकऱ्याच्या झोंपडींत शिरून त्याचें चाळीस अेक रुपयांचें गांठोडें लांबविलें. शेतकरी जागा होऊन चोरांच्या मागें धांवला तेव्हां चोरांनीं त्याच्या डोक्यावर कुऱ्हाडीचा वार केला. घाव भुंवयीवर बसला. जरा

जास्ती लागले असतें तर डोळाच फुटावयाचा. त्याच्या घरीं जेव्हां धांवा धांवा म्हणून आरडाओरडा झाला तेव्हां आमच्या घरांतून त्याला धीर देण्यासाठीं आईनें ओरडून उत्तर दिलें, "अरे, घाबरूं नका आमच्या येथे पाहुणे मंडळी आली आहेत. आम्ही आलोंच मदतीला." खरी गोष्ट अशी होती कीं, आमच्या घरी पुरुष असा मी अेकटाच होतों. मी माझी बंदुक भरून ठेवीत असे. बंदुक घेऊन मी बाहेर पडलों. पण चोरांना माझी वाट पहाण्याअितकें रिकामपण नव्हतें. शेतकऱ्याच्या झोंपडीकडे जाऊन, काय झाले तें सर्व विचारून मी परत आलो. अंधारात हवेंत अेक बार करून पुन्हां बंदुक भरून मी झोपीं गेलों.

दुसऱ्या अेका वेळीं आमच्या झोंपडीसमोरील गोठ्यांत साखळी तुटल्याचा आवाज झाला. आमच्या म्हशीला आणि गाडीच्या बैलांना आम्ही लोखंडी साखळीनें खांबाशीं बांधून ठेवीत असू. ताबडतोब बंदुक घेऊन मी निघालों. मध्यरात्रीचा वेळ होता. मीं दरवाजा अुघडला आणि आअी जागी झाली. ती मला बाहेर जाअूं देअीना. मी म्हणालों, "गोठ्यांत चोर शिरले आहेत. घरची जनावरे काय जाअूं द्यावयाची ?"

मी निघालोंच. आअी म्हणाली, " जनावरे गेलीं तर जाअूं देत. पण तुझा जीव तूं संकटांत घालूं नकोस. " " आअी, लहानपणीं कांही तूं मला अशा प्रकारचें शिकविलें नव्हतेंस. " असें म्हणून मी धांवलोंच. गोठ्यांत जाऊन पहातों तों म्हैस नाहीं. दोन्ही बैल चमकून कान टवकारून अुभे होते. म्हैस नाही असें पहातांच माझ्या पोटांत काय झालें असेल त्याची कल्पना ज्यांनीं गुरेढोरे पाळलीं असतील त्यांनाच होअूं शकेल. म्हशीला रोज चोळून न्हाअूं घालावयाचे मीं धार काढावयाचे काम माझेच. नोकर विसरले तर मी स्वतः अुठून विहिरींतून पाणी काढून तिला पाजीत असें. माझ्या सायकलची घंटा वाजली कीं ताबडतोब दुरूनच ओळखून, हंबरून ती माझे स्वागत करी. आतां ती माझी म्हैस मला पुन्हां दिसावयाची नाही. ती गेली ती गेलीच. आणि चोर जर महार असले तर ते तिला मारून खाअून मोकळे व्हावयाचे ! आतां काय करावें ?

मीं अंदाज केला कीं, चोर रस्त्याच्या बाजूनें मुळीच जावयाचे नाहीत. अुत्तरेच्या लहानशा शेतापलीकडे आणि पश्चिमेकडे झोंपड्या होत्या. अर्थात् त्या बाजूनें देखील चोर गेले असल्याचा संभव कमी. अेवढें ठरवून मी पूर्वेकडील शेतांत घुसलों. बराच दूर धांवत गेल्यावर म्हैस जवळपास असेल तर तिला आश्वासन

देण्यासाठीं मीं तिचेप्रमाणें हंबरून पाहिलें. दोन शेतें ओलांडलीं. तिसरे शेत कांहींसें सखल होतें. जवळच अेक दगडानें बांधलेली विहीर होती. आणि बाजूला पिंपळाचें झाड होतें. जुन्या काळीं अेका सत्पुरुषाची तेथें दहनक्रिया केली असल्यामुळें लोक त्याला सोन्याचा पिंपळ म्हणत असत. त्या शेतांत गवत खूप अुंच अुगवलेले होतें. अनवाणी अंधारांत जाण्याची हिंमत होअीना. मी पुन्हां अेकदां हंबरून पाहिले. लागलेच म्हशीचें अुत्तर मिळालें. अेका क्षणांत माझी चिंता दूर झाली आणि मला हिंमत आली. मी त्या शेतांत अुडी ठोकली. माझ्या हातात बंदुक पाहून म्हैस कांहीशी चमकली आणि दूर झाली. मी तिला जरा चुचकारून तिच्या जवळ गेलो आणि तिचा कान धरून तिला गोठ्याकडे घेअून आलों.

दुसरे दिवशीं आअीनें जोंधळे शिजवून म्हशीला खाअूं घातले आणि मला चांगला गरमा-गरम सांजा मिळाला.

आमच्या झोंपडीच्या बाजूला अेक लिंगायत गृहस्थ रहात होते. अेके दिवशीं त्यांच्या घरीं त्यांचे जामात आले. मी त्यांना पहावयाला गेलो. अगदींच मुलासारखा दिसत होता. सासऱ्यासमोर बसून स्वारी पान खात होती. सासरा मला म्हणाला, " माझ्या मुलीला मुलगा झाला आहे म्हणून पुत्रमुखदर्शनासाठीं जांवईबुवांना आज बोलाविले आहे. "

माझ्यासमोर बसलेल्या त्या मुलाची, अेका अर्भकाचा बाप म्हणून ओळख करून दिलेली अैकून मला तर लाजच वाटली. पण ते " पिताश्री " प्रतिष्ठेचा रुबाब बाळगून विडयाचा रवंथ करीत होते. पुत्रोत्सवाची खडीसाखर खाऊन मी परत आलो. थोडयाच दिवसांत तें अर्भक त्याना सोडून गेल्याचा दुखवटा व्यक्त करण्यासाठीं मला जावें लागले असल्याचें अस्पष्ट स्मरण आहे.

पण त्या लिंगाइत कुटुंबाचे स्मरण दुसऱ्याच कारणामुळें मनाला चिकटून राहिले आहे. थोडयाच महिन्यांत आमचे ते शेजारी गृहस्थ–त्या 'पिताश्री'चे सासरे वारले. गृहस्थ चांगला सधन असल्यामुळें स्मशानयात्रेला पुष्कळ लोक जमले होते. लिंगायत लोकांच्या चालीप्रमाणें प्रेताला बाहेरच्या ओटयावर मांडी घालून भिंतीला टेकून बसतें केलें होतें. प्रेतापुढें दहींभात कालवून ठेविला होता.

नात्या-गोत्याच्या लोकांपैकीं अेकेक जण येऊन दहींभाताचा अेक घांस प्रेताच्या तोंडाजवळ घेऊन जाअी. आणि तो घांस खालीं ठेऊन विलाप करी : 'अुंडिल्ला' ( जेवले नाहींत ).

दुसरा रिवाज याहून अधिक चित्तवेधक होता. प्रेताजवळ अेक नवीन साडी ठेविलेली होती. लिंगाईत लोकांत पुनर्विवाहाचा निषेध नाहीं. पण प्रेत अुचलण्याचे वेळीं जर पत्नी ती साडी घेऊन नेसली तर त्याचा अर्थ असा कीं तिने आजन्म वैधव्यांत रहाण्याचें पसंत केलें आहे. असा निश्चय नसला तर पत्नी त्या साडीला हात लावीत नाहीं. मृत गृहस्थाची पत्नी चांगली तरणीताठी होती. सर्वांची अपेक्षा होती कीं, ती पुनर्विवाह करील. ती बाअी काय करते हें पहाण्यासाठीं मी तेथें गेलो. घरांतील सर्व मंडळी खूप आक्रांत करीत होती. फक्त ती बाअी रडत नव्हती. तिचे डोळे ओले देखील झाले नव्हते. पुष्कळांना त्याचें आश्चर्य वाटलें. मीहि आश्चर्यचकित झालों. पण तिच्या शून्यमनस्क डोळ्यांतील चमक पाहून मला वाटूं लागलें कीं, बाअीनें या दुनियेमधला आपला जीवनरस खेचून घेतला आहे. अश्रूंवाटे तिला स्वतःचें दुःख हलकें करावयाचे नव्हतें. प्रेताजवळ वैधव्याची साडी ठेविली गेली मात्र, तिनें ती लागलीच अुचलून घेतली आणि ती नेसून आपला निर्णय तिनें व्यक्त केला.

आलेले सर्व लोक दुःखाबरोबर आश्चर्यांत मग्न झाले. मूठमातीचा विधि अुरकून सर्व मंडळी शहरांत रहावयास गेली. दुसऱ्या दिवशीं समजलें कीं, त्या विधवेने अन्नत्याग केला आहे. मला आठवतें कीं, आठदहा दिवसांच्या आंतच त्या विधवेनें देह सोडला. कांहीं रोग नाहीं कीं अपघात नाहीं. केवळ दुःखाच्या आवेगानें त्या सतीला शरीरांतून आपले प्राण अलग करतां आले. आज देखील प्रेताशेजारील साडी अुचलतांना झालेला तिचा तो चेहरा आणि तिची ती निर्धाराची दृष्टि माझ्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष दिसत आहे.

## भातकुली

७२

आमच्या झोंपडीच्या शेजारीं आमच्या जातीच्या कांहीं लोकांच्या झोंपड्या होत्या. मी त्यांच्यांत मुळींच मिसळत नसें. पण तिकडील अेक वृद्ध बाअी आमच्या आतेला भेटावयास येत असे. ती माझी आत्या नसून माझ्या आअीची आत्या होती. तरीहि आम्हीं सर्व तिला आत्याच म्हणत असूं. आत्यांची अितकी वृद्धावस्था झाली होती कीं, त्या अगदींच ठेंगू झाल्या होत्या. त्यांना सरळ ताठ चालतांहि येत नसे. स्वयंपाक करून मला जेवूं घालीत. आणि मग सगळा दिवस कापूस आणि अेक लहानशी धनुकली घेअून कापूस पिंजून आरतीसाठीं फुलवाती त्या तयार करीत असत. मी पोटभर खात नाहीं अशी तिची तक्रार नेहमींची असे. " तुझ्यासाठीं स्वयंपाक करावयाला भांडीं तरी कशाला पाहिजेत ? दौतींत रांधावें आणि पणतींत फोडणी द्यावी " असें तिनें म्हटले कीं मला मोठी गंमत वाटे आकाश ढगांनीं घेरलें म्हणजे तिचे गुडघे दुखत. तेव्हां म्हणावयाचा " आकाशांत मोड आले, म्हणजे अंगहि मोडूं लागतें." (कानडी भाषेंत ढगांना 'मोड' म्हणतात.) शेजारच्या कुंपणांतून मी तिला शेराच्या फांद्या आणून देत असें त्याचें दूध (चीक) काढून ती गुडघ्याला लावी. शेजारची ती वृद्ध बाअी अेक दिवशीं मला विचारूं लागली, " आमची मनू तुमच्या घरीं आपल्या मैत्रिणींना घेअून भातुकलीचा

खेळ खेळावा म्हणते. तुमची परवानगी आहे ना ?" मुलींनीं पुढें पुढें केलेलें मला मुळींच आवडत नसे. पण वाओट दिसेल म्हणून मी नकार दिला नाहीं. मी अेवढेंच म्हटलें, "यांत मला काय विचारावयाचें आहे ? आत्याला विचारा. त्या म्हणतील तें खरे."

दुपारीं मुली आल्या. सगळी दुपार त्यांचा खेळ चालू होता. त्यांचा खेळ पहाण्यांत मलाहि गंमत वाटली. मनू शांत, कष्टाळू आणि दक्ष मुलगी होती. मैत्रिणींना प्रसन्न ठेवून त्यांना आपल्या कांबूंत ठेवणें, कामें वाटून देऊन त्यांचेकडून ती करवून घेणें, आणि प्रत्येकीला खेळांत कांहींना कांहीं गोडी वाटेल असें करणें हें सर्व तिला साधलें होतें. तऱ्हत-हेचे खेळ खेळल्यानंतर मुलींनीं स्वयंपाक केला. अेक ताट वाढून माझेपुढेंहि ठेवण्यांत आले. दोनप्रहरीं भलत्या वेळीं जेवणांत गोडी ती काय वाटणार ? तरीहि थोडेसें मी खालेंच. संध्याकाळ झालो आणि मुली घरोघर गेल्या.

दुसरे दिवशीं मनूची ती वृद्ध आजी माझेकडे येअून म्हणते, "आमची मनू अगदीं लहान होती तेव्हां अेका शेजारीण बाअीनें तिला आपल्या हातून पाडली त्यामुळें तिचे मनगट मोडले आहे. पण तुम्हीं पाहिलेच, कीं स्वयंपाक वगैरे सर्व तिला करतां येतो. मनूला करून घ्यावयाला तुम्हीं तयार आहांत काय ? मी जर तुमच्या आअीला विचारलें तर त्या नाहींच म्हणतात. आजकालचीं तुम्हीं मुले स्वतःच बायको पसंत करीत असतां म्हणून तुम्हांला विचारतें. तुम्ही जर रुकार दिला तर मग तुमच्या आअींनाच समजावयाचें बाकी राहिलें."

कालचा कट कशासाठीं होता हें आतां माझ्या ध्यानीं आले. बाअीची धिटाअी पाहून मी चकित झालों. मी म्हणालों, "तुम्हीं म्हणतां तें सर्व खरे आहे. पण मला लग्नच करून घ्यावयाचें नाहीं. तेव्हां पसंती नापसंतीचा प्रश्नच अुरत नाहीं." म्हातारीनें अेक प्रश्न विचारला, "पण मुलगी तुम्हांला पसंत आहे ना ?" मनूची आजी म्हणजे अगदीं भोळें माणूस. तिला छक्के पंजे माहीत नव्हते. तिच्या आंधळ्या प्रेमानें तिचेकडून हे सर्व करून घेतलें होतें. मला त्यांचा स्वभाव ठाअूक असल्यामुळें मला त्यांची दया आली. त्यांना वाअीट वाटूं नये असें अुत्तर मीं मनांत पुष्कळ शोधले पण तें कसचे सांपडतें ? स्त्रीदाक्षिण्याची भाषाहि मी शिकलों नव्हतों. मी अितकेंच म्हणालों, "मला लग्नच करावयाचें नसल्यानें माझ्या डोक्यांत

विशेष विचारच येत नाहींत." "झालें तर मग. अेवढीच अेक आशा बाळगली होती." असें म्हणून ती वृद्धा निघून गेली.

त्या रात्रीं कितीतरी विचार माझ्या डोक्यांत आले. लग्न करून घेण्याची अुत्सकता मनांत बिलकुल नव्हती. पण त्या बाअीच्या शेवटच्या शब्दांनीं मला अस्वस्थ केलें. बिचाऱ्या मुलीचा हात मोडला यांत तिचा काय दोष? अेकादी अव्यंग, आणि नाका डोळ्यानें देखणी अशी मुलगी असली तरी हजार दीड हजार रुपयांच्या हुंड्याखेरीज तिचें लग्न होअूं शकत नाहीं. अशा स्थितींत या बिचारीला कोण करून घेणार? संस्कारी तरुणांचें हें कर्तव्य नव्हे काय कीं त्यांनीं बहादुरी दाखवून अशा मुलींचा अुध्दार करावा? नुसत्या रूपावर लोक कां अितके मोहित होतात? पत्नीला थोडेंच कोठें नाचावयाला घेअून जावयाचें असतें? घरसंसार चांगल्या रीतीनें चालवितां आला, तर मनुष्याला त्याहून अधिक काय हवे आहे? अित्यादि अित्यादि कितीतरी विचार माझ्या मनापुढे आले. पण मला तर लग्नच करून घ्यावयाचे नव्हतें. दुसरी गोष्ट म्हणजे आमच्या समाजांत सरळ जाअून नवऱ्यामुलाकडे गोष्ट काढावयाचा रिवाज नव्हता यामुळें तें प्रकरण तितक्यावरच आटपलें.

नव्या युगाच्या भावना आणि आकांक्षा समजण्याअितके ज्यांना शिक्षण मिळाले नाहीं, असे लोक देखील अडचणीत सांपडले म्हणजे गरजवंत बनून नव्या युगाचे नवे रंग समजूं लागतात. आणि जुनी मर्यादा सोडून नव्या प्रकाराना शरण जातात. ही स्थिति मात्र मला दयाजनक वाटली या वस्तुस्थितीमध्यें देखील समजण्याजोगीं आणि पसंत करण्याजोगी तत्त्वे आहेत. पण त्याची जाणीव किंवा कदर त्या वेळीं मला नव्हती.

## गेस्ट हाऊसमधील अनुभव ७३

आम्ही तिसऱ्या किंवा चौथ्या खेपेला सावंतवाडीला गेलो असूं. या वेळेला आमच्या रहाण्याची सोय मोतीतलावाच्या बाजूला गेस्ट हाऊसमध्यें केली होती. अर्धा बंगला आमच्या ताब्यात होता. या बंगल्यात आम्हीं तिघे बंधू खूप खेळत असूं आणि गंमत करीत असूं

सावंतवाडीमध्यें आमच्या ओळखीची अक्का म्हणून अेक मुलगी होती. लाडांत वाढलेली मुलगी. घरचे लोक अकल्या ! म्हणून हाक मारीत असत. ही मुलगी अेकदां आमचे येथे रहावयास आली घरीं कोण येतें आणि कोण जातें याची आम्हांला काय पर्वा ? पण दुपारीं आम्हीं बुद्धिबळाच्या पटावर वाघ-शेळ्याचा खेळ खेळत असलों किंवा कांहीं वाचीत असलों म्हणजे आमच्यामध्यें येऊन बसावयाची या मुलीला संवय होती. पुरुषांपेक्षां स्त्री म्हणजे कांही कमी प्रतीचा प्राणी असें लहानपणापासून आमच्या मनाने घेतलें होतें. मुलगी असून आमच्या बरोबरीनें खुर्चीवर येऊन बसते याचा आम्हांला अपमान वाटे. पण अेक लाडकी मुलगी आमच्या घरीं पाहुणी म्हणून आलेली. आमच्यांत येऊन बसूं नकोस असें म्हणावे तरी कसें ? मनांत मीं किती वेळां तरी म्हणालों असेन, ' पुरुषांत बायको लांबोडी, भाजून खाते कोंबोडी ' तरीहि तिचें आमच्यांत येऊन

बसणें आम्हींमु काटयानें सहन करीत असूं. अेक दिवसाच्या परिचयानंतर ती आमच्या संभाषणांतहि मिसळूं लागली. आणि आम्हांला प्रश्न विचारूं लागली. आम्ही जर तुसडा जबाब दिला तर म्हणावयाची, "असें हो काय अुत्तर देतां ?" आणि पुन्हां जणुं कांहीं झालेंच नाहीं अशा रीतीनें पुन्हां आमच्या गप्पागोष्टींत भाग घेत असे.

तीन चार दिवस हें सर्व कांहीं आम्हीं सहन केले. पुढें भाअूने अेक युक्ति केली. तिला अैकूं जाअील अशा रीतीनें तो आअीला म्हणाला, "आअी, आज अक्का आपल्या घरीं परत जाणार आहे. तिला तशीच कशी पाठवावयाची ? बाजारांतून अेकादा चांगलासा अुची खग आणून देअून तिला पाठव. म्हणशील तर मीच बाजारांतून मागवून देतों." आणि आअीचा जबाब अैकण्यापूर्वीच भाअू पट्टेवाल्याला म्हणाला, "अरे धोंडी, आज अक्का आपल्या घरीं जाणार आहे. तिला पोहोंचवायला तीन अेक वाजतां ये आणि आतां बाजारांत जाअून आअी सांगेल तसा अेक खग घेअून ये." ही युक्ति रामबाण ठरली आणि केशूला हायसें वाटले.

पण बकरी जातां अुंट घरांत घुसल्यासारखे झाले. त्याच दिवशीं कोणी युगे पिअन पाहुणे या बंगल्यांत रहावयास आले. सरकारी पाहुणे आणि सरकारी बंगला. होय नाहीं म्हणण्याची सोय नव्हती. अर्धा बंगला रिकामा होता. त्यांत हे लोक येअून राहिले. साहेब आणि त्यांची मडम दोघेंच होतीं. बरोबर त्यांचे दोन घोडेहि होते. नवरा-बायको दोघेंही घोड्यावर बसण्यांत पटाअीत. साहेबच स्वभावानें कांहींसा शांत होता. पण मडम तर नुसती वाघीण ! सगळा दिवस नोकरांवर डुरकावयाची. घोडयासाठीं चंदी तयार करावयाची ती आपल्या हातानेंच. मग दोन हातांत त्या दोन बादल्या स्वतः अुचलून घोडयापुढें नेअून ठेवावयाची आणि दोघेहि घोडे पोटभर खाअीपर्यंत स्वतः अुभी रहावयाचो.

अेके दिवशीं बाअी थकून निजली असेल. शेजारच्या आमच्या खोलींत टेबलावर आम्ही वाघ-शेळ्या खेळत होतों. खेळतां खेळतां आमचा विवाद सुरू झाला. आमचा आवाज बराच वाढला. बाअीची झोपमोड झाली. नागिणीसारखा फूत्कार करीत ती अुठली आणि आमच्या आणि त्यांच्या खोलीच्या मधल्या बंद दरवाजावर बुक्का मारून अिंग्रेजींत गरजली, "अरे मुलांनों, काय अुच्छाद मांडला आहे तुम्हीं ? जरा निजूं

द्याल कीं नाहीं ?" आम्हीं अुंदरासारखे चुप्प झालों. फक्त भाअू म्हणाला, "थँक यू." आम्हीं ती खोली मोडून दिली. ही पीडा केव्हां जाते असें आम्हांला झालें.

आम्हीं या चिंतेंत होतों. तिकडे वडिलांना दुसऱ्याच प्रकारची चिंता लागली होती. जेवण्याचे वेळीं वडील आअीला म्हणाले, "हे गोरे लोक याच घरांत येअून राहिले आहेत. मांसमच्छर सर्व कांहीं खातील. ज्या घरांत परधर्मी रहातात आणि मांसाहार चालतो तेथें पाणी प्यालों तरी विटाळ होतो."

आअीनें शास्त्रार्थ काढला—"आपण कोठें अेकाच घरांत रहात आहोंत ? त्यांचा भाग निराळा आणि आमचा निराळा."

वडील म्हणाले, "अशी समजूत करून घेण्यांत कांही अर्थ नाहीं. सगळ्या चंगल्याचे आढें तर अेकच आहे ना ? सगळें घर अेकच समजलें पाहिजे. अितकी वर्षें नोकरी केली पण असा कधीं प्रसंग आला नव्हता. अुपाय कांहीं दिसत नाही. आलेलें संकट सहन केल्यावांचून सुटका नाहीं. देव तर जाणतोच आहे कीं, आपल्या हातीं कांहींच अुपाय नाहीं."

दोन रात्रीं राहून ते दोघेहि घोडेस्वार निघून गेले आणि पुन्हां आम्हांला वाटलें, "अेकदांची पीडा गेली !"

## विठू आणि भानू



विठू हा आमच्या खेडेगांवांतील घरचा नोकर. बेळगुंदींत आमचे घर बांधण्याचें काम चालू होतें तेव्हां प्रथम मजूर म्हणून कामावर येत असे. त्या वेळीं त्याचे वय अजमासें बारातेरा वर्षांचे असेल. अेका दिवशीं मजूर विहिरीतील गाळ काढीत होते. विठू विहिरीत अुतरून काम करीत होता. अितर मजूर आंतील गाळ घमेल्याच्या शिंक्यांनीं खेचत होते. कोणाच्या तरी हातून गफलत झाली. शिंक्यांतून घमेले निसटून विठूच्या डोक्यावर पडले. विठू अेकदम बेशुद्ध झाला हें सांगण्याची गरज नाहीं. मोठ्या मुष्किलीनें आम्हीं त्याला बाहेर काढू शकलों. औषधपाणी करून बरा करीतोंपर्यंत त्याला आमच्याच घरीं ठेवला होता.

तरुणांचें मन भावना प्रधान असतें. तीन महिन्यांच्या या सहवासामुळें विठू आमच्या घरचाच झाला. ठरविल्याप्रमाणें त्याला जरी आम्हीं पगार देत असूं तरी कोणीहि त्याला नोकर समजत नसे. सकाळ-संध्याकाळीं दशमी खाण्याची वेळ झाली, म्हणजे आअी आम्हां सर्वांना बोलावून कांही तरी खाअू द्यावयाची. आअीनें सर्वांच्यासाठीं ओळीनें बश्या ठेवलेल्या असावयाच्या. खेडेगांवांतील रिवाजाप्रमाणें नोकरांना दोनदांच जेअूं घालतात. सकाळसंध्याकाळ त्यांना कांहीं द्यावयाचें नसतें. कधीं कधीं कांहीं दिलेंच तर नांवाला थोडेंसें देतात. विठूचें तसें नव्हतें. खावयाची

वेळ झाली, म्हणजे हवी तीं बशी भुचलून तो खात असे. लौकर आला तर आमच्या अगोदरहि खाऊन मोकळा होओ. ब्राम्हणाच्या घरांत कुळवाडयाला असलेली अेवढी मोकळीक पाहून लोकांना आश्चर्य वाटे.

विठू मोठा झाला आणि त्यानें आमच्या शेतीचे सर्व कामकाज संभाळलें. जीं शेतें पूर्वी आम्हीं खंडानें देत असूं, तींच आतां घरीं करूं लागलों. शेती वाढली त्या मानानें बैल, गाअी, म्हशी, ठेवाव्या लागल्या. त्यांचेसाठीं मोठा गोठा बांधला. गवतासाठीं डोंगरांत अेक कुरण घेतले. जंगलांतून गवत, लांकडें आणि शेतांतून धान्य वगैरे आणण्यासाठीं मोठे गाडे तयार करावे लागले. 'कारखाना' वाढला. वडील बंधु-बाबाच्या देखरेखीखालीं विठू कारखान्याचें सर्व काम पहात असे. लहानपणापासून विठूची सत्यप्रियता आणि न्यायनिष्ठा जबरदस्त.

सामान्यपणें आपल्या खेडेगांवांतून अितकी गरिबी असते कीं, बिचाऱ्या शेतकऱ्यांना न्यायनिष्ठ होऊन चालत नाहीं बारा महिने चोवीस तास जीवन-कलहासाठीं स्वार्थाकडेच त्याना पहावे लागतें. खेडेगावांतील दुकानदार वाणी, व्याजबट्टा करणारा सावकार, मुहूर्त आणि शकुन सांगणारा, आणि लग्ने लावणारा पुरोहित जोशी, सगळेच स्वार्थी असतात. सगळेच स्वार्थानें आंधळे झालेले असतात. हे लोक सगळ्या गावाला नागव्या स्वार्थाचे धडे देत असतात. आणि पाटील कुलकर्णी म्हणजे सत्तेचे प्रतिनिधी. त्यांना तर भिअूनच वागले पाहिजे आणि त्यानां अपेक्षांहि जास्त नैवेद्य दिला पाहिजे.

घरचा कारखाना मोठा. त्यामुळें रोज कोणाना कोणाशीं तरी घासाघाशी व्हावयाचीच. अितर नोकर आमच्या नोकरींत आहेत अेवढ्यासाठीं आमचा स्वार्थ ज्या बाजूनें असेल त्या बाजूने भांडत. पण विठूला आमच्या स्वार्थापेक्षां आमची पत, प्रतिष्ठा व अब्रू यांचीच काळजी विशेष होती. आणि तसें म्हटलें तर आमच्या प्रतिष्ठेपेक्षां देखील न्यायाची चाड त्याला अधिक असे. अन्यायाची चीड आणि न्यायाचा पक्षपात तो शिकला असेल तर तो आमच्या बाबाकडूनच. पण जर बाबानेंच सांगितलेलें अेकादें काम विठूला गैर वाटलें, तर रागारागानें बाबालाच म्हणावयाचा, "होय गा बाबा, माज (मला) खोटं काम करूस सांगत्यास व्हय ?" विठूला सांगितलेलें काम अगदीं स्वच्छ आहे अशी त्याची खात्री करून दिल्यावांचून चालत नसे. वडील जेव्हा रजा घेऊन बेळगुंदीला जात, तेव्हां प्रथम विठूलाच बोलावून त्याचेकडून सर्व गोष्टी

समजून घेत. विठू देखील सर्व हकीगत जशी असेल तशी सांगून पुढें कोणत्या गोष्टी कशा झाल्या पाहिजेत याची सूचनाहि देत असे. त्याच्या जवळ गुप्त असें कांहींच नसे. पण जर त्याला आम्ही अेकादी गोष्ट गुप्त ठेवावयाची आहे असें सांगितले, तर मध्यकालीन निष्ठेनें तो ती गुप्त ठेवी. आमच्या घरीं राहूं लागल्यापासून विठू क्वचित्च आपल्या घरीं जाअी. वर्षाचे चार कुडव धान्य आणि वीस रुपये घरीं देअून आला म्हणजे मोकळा. ( बेळगांवच्या बाजूला चोवीस पायल्यांचा कुडव असतो ) अितकें अन्न अेकाद्या सामान्य कुटुंबाला वर्षभर पुरेसें होत असे. कपडे, कांबळें आणि वहाणा या तर फक्त नोकरापुरत्याच असत.

संतू म्हणून विठूचा अेक भाअू होता. त्याला देखील आमच्या घरीं नेहमीं मजुरी मिळे. संतू सर्व बाजूंनीं डिला मनुष्य. संतूची हीन वृत्ति पाहून विठूला मेल्यासारखे होअी. स्वत:मुळें संतूला आमच्या घरीं आश्रय मिळतो आणि त्याचा तो फायदा घेतो याचें विठूला वैषम्य वाटे. आणि आपल्या हातून संतूच्या बाजूनें काही पक्षपात होअूं नये याची तो विशेष काळजी घेत असे.

पहातां पहातां विठूनें शेतकी कारखान्याचा कारभार संभाळला. विठूची पत गांवात सगळ्यांना पटली. त्याची न्यायनिष्ठा आणि आमची प्रतिष्ठा या दोहींच्या संयोगामुळें खेडयांतील कितीतरी लोक आपण वांचविलेले पैसे ठेव म्हणून आमचे घरीं ठेवण्यास येत. सगळ्या गांवांत आमच्या बाबाची धर्मावतार म्हणून ख्याति होती. विठू आणि बाबा जेथे असतील तेथें केवढीहि मोठी रक्कम असली, तरी सुरक्षित आहे असा लोकांचा विश्वास बसला होता. आमच्या अिकडील सावकार लोक गरीब शेतकऱ्यांना कसे त्रास देतात आणि फसवितात, याची कल्पना ज्यांना असेल, त्यांनाच या विश्वासाचें महत्त्व समजावयाचें. ठेवीच्या रकमा जसजशा वाढूं लागल्या, तसतसें त्यांतूनच लहान लहान रकमा अुसन्या देण्याचा रिवाज बाबानें सुरू केला. ठेवीसाठीं व्याज देण्या-घेण्याचा प्रकार नव्हता. आणि म्हणून अर्थात्च पैसे अुसने देतांना व्याजाचा प्रश्नच नसे. विठूचा ज्या माणसावर विश्वास असेल, त्यालाच पैसे अुसनवार मिळावयाचे. कित्येक शेतकरी घरचे चांदीचे दागिने देखील सुरक्षित म्हणून आमच्या घरीं ठेवीत असत. अेकाद्याचा लग्न-समारंभ असला तर मूळ मालकाची परवानगी घेअून विठू कांहीं दागिने लग्नांत वापरावयास देत असे. व्यवहार स्वच्छ ठेवून विठूवर चांगली छाप पाडण्याचा कितीतरी शेतकरी प्रयत्न करीत असत.

विठू आमच्या घरीं रहात असे. पण त्यानें कधीहि स्वतःच्या घरची भर करण्याचा प्रयत्न केला नाहीं. महादेव ज्याप्रमाणें मागेल त्याला हवा तो वर देत असतो पण स्वतः मात्र नंदी आणि गजचर्म याखेरीज कसलाच परिग्रह न बाळगतां राख लावून बसतो, त्याप्रमाणेंच विठूचीहि वृत्ति होती. पुढे पुढें स्थिति अशी झाली कीं बाबाची आज्ञा बाजूला ठेवून देखील विठू आपल्या मनाप्रमाणे सर्व कांहीं करीत असे. आम्हांला बेळगुंदीहून बेळगांवला जावयाचे असलें, तर विठूनें दिली तर गाडी आम्हांस मिळावयाची. विठू जर म्हणाला की, आज शेतीचें काम आहे किंवा बैल थकले आहेत, तर गाडी मिळण्याची आशा नको. आईला देखील जरूरीचें काम असलें तर विठूला आत बोलावून कामाचें अगत्य समजावून सांगावे लागे. कधीं कधीं आईनें त्याला चार शिव्याहि द्याव्या. पण विठूची खात्री झाल्यावांचून कांहीं विठू हो म्हणावयाचा नाहीं.

पैसे, दागिने, वगैरे घरात असेच ठेवणें सुरक्षित नाही असा विचार करून बाबानें अेक तिजोरी घेण्याचें ठरविलें. पण अमक्या घरीं अेक तिजोरी आली, अशी बातमी पसरतांच त्या घरावर धाड यावयाची ( त्या काळीं आमच्या प्रदेशात दरोडयांचा धुमाकूळ बराच होता ) तेव्हां विठूनें बाबाला म्हटले, " तुम्ही कोणाला कळूं न देतां पुण्याहून तिजोरी मागवा. मी बेळगांवच्या स्टेशनावरून माझ्या विश्वासू दोस्ताकरवीं तिजोरी गाडीत घालून रातोरात घेऊन येअीन. आणि कोणालाहि चाहूल लागण्याच्या पूर्वी माजघराकडील खोलींत पुरून टाकीन. फक्त तिजोरीचे तोंड वर अुघडें राहील वर मोठा पाट ठेवून त्यावर तुम्ही आपले अंथरुण करा. विठूने पोस्टांत असली व्यवस्था पाहिली होती.

विठूचे दोस्त म्हणजे विश्वासाच्या मूर्ती. परशा, गिड्डया, घुमब्या, आणि सुब्या. जणुं शिवाजीचेच मावळे. जसे हुशार तसेच निष्ठावान्. वडील बंधूंनीं परशाला घराच्या मागील अंगणाला बांबूचे कुंपण करावयास सांगितले दोन दिवसांत काम सहज पुरे झाले असतें. परशाने कामाची चालढकल केली. म्हणून बाबाने विठूच्या देखत परशाला ठपका दिला. रात्री आठाचा सुमार असेल तो. दुसरे दिवशीं सकाळीं अुठून मागील दारीं जाअून पहातो तों कुंपण तयार ! परशाने रातोरात बागेंत जाअून बांबू तोडून आणून जमिनींत खड्डे खोदून सकाळ होण्याच्या अगोदर कुंपण तयार केले होतें ! आणि ते कुणालाहि मदतीला न बोलवतां अेकट्यानेंच.

बेळगुंदीस जेव्हां प्लेग सुरू झाला, तेव्हां गांवाबाहेर मैदानाचा अुतार पाहून तेथे

आम्ही झोंपड्या बांधल्या आणि राहूं लागलों. जनावरे बांधण्यासाठीं अेक निराळी झोंपडी बांधली. विठूला सगळ्यांच्या रक्षणाची चिंता. तेव्हां रात्रीं आमच्या झोंपडीच्या आसपास निजण्यासाठीं पांच पंचवीस तरुणांना तो गोळा करीत असे. फक्त चिलीम आणि चुटा चालू रहावे, म्हणून चारपांच शेर तंबाकू आम्हांला ठेवावी लागे आणि सबंध रात्र धुनी पेटत असावी म्हणून गोवऱ्यांचीहि मुबलक व्यवस्था करावी लागे. विठूला स्वतः गातां येत नव्हतें. पण गाणाऱ्या लोकांना तो गोळा करीत असे. अशा रीतीनें आमच्या झोपडीच्या आसपास सबंध रात्र चौकीपहारा असावयाचा.

पुढें विठूनें विचार केला कीं, परक्या लोकांचे दागदागिने आपण गांवांतल्या घरांत ठेवतों आणि घराला कुलूप असतें. त्यापेक्षां गुपचूप जर तो सर्व माल या झोंपडीतच आणून ठेवला तर काय वाअीट ? भुवडग्या माळावर अशी जोखीम ठेवणें आअीला सुरक्षित वाटले नाहीं. आअी म्हणाला, " मालापरी माल जाअील आणि त्याबरोबर तुमच्यापैकीं कुणाचा तरी जीवहि जाअील." विठू म्हणाला, "तुम्हांला यांतलें कांहींहि समजावयाचे नाहीं." त्यानें लहानशा अेका पोत्यात ते सगळे दागिने घातले आणि तें पोतें गोठ्यामध्ये गुराना गवत घालण्याचे गव्हाण होतें तेथे दाबून दिले. वर भरपूर गवत आणि दोन्ही बाजूला मस्त जनावरांच्या दोन रागा आणि गुरांची सगळी व्यवस्था विठूच्या हातीं. विठूला जनावरे म्हणजे जीव कीं प्राण. त्यामुळें विठू सगळ्यांना सोडून गोठ्यांत का निजतो असा कोणाला विचारहि यावयाचा नाहीं.

आमच्या झोंपडीची सुरक्षितता पाहून आमच्या नात्या-गोत्यांच्या लोकांनीं आपल्या झोंपड्या आसपास बांधल्या. विठूला हें कांही आवडले नाहीं तो अेवढें म्हणे, " हे लोक बरे नव्हेत." पण बिचाऱ्यांचें काय चालणार ? हा सगळा शेजार सहन केल्याबाचून त्याला सुटका नव्हती. नात्याचे लोक बाबाजवळ किंवा आअीजवळ वस्तु किंवा सोय मागावयाला आले, तर विठूला त्याचेविषयी तिरस्कार व्यक्त न करणें फार जड जाअी. अेकदां मी विचारलें कीं " तुझा या लोकांवर राग कां ?" तो म्हणे, 'दत्तूआप्पा, तुमच्या नातेबाअिकाचे दोष तुम्हांला कसे दिसावेत ? या लोकांचे पोटांत गरिबाविषयी दया नाही. कोणावरहि अुपकार केले तर दहा वेळां वर काढतील, तोंडावर बोलून दाखवतील. आणि त्याचा फायदा घेतल्याबांचून रहावयाचे नाहीत. यांनींच गांव बिघडवून टाकला आहे."

आमचा बाबा बेळगुंदींत शेतीवर देखरेख करीत असे. अणि वडील कलेक्टरच्या

कचेरीत हेड अकाउंटंट होते. बेळगांव-शहापूरकडे वारंवार ट्रेंग येत असल्यामुळें शहापूरच्या बाहेर बेळगांवहून तीनचार मैलांवर आम्हांला अेक कौलारू झोंपडी बांधून रहावें लागत होतें, हें मागें आलेलेंच आहे. झोंपडींतून कचेरीला जाण्यासाठीं दोन बैलांची अेक घमणी ठेविली होती. बेळगांवाकडे अशा गाडीला सारवट असेंहि म्हणतात. कितीहि जोराचा पाअूस पडत असला तरी आंतील मंडळी सुरक्षित अशी या सारवटीची रचना असते.

गाडी हांकण्यासाठीं आणि घरांतले कामकाज करण्यासाठीं आम्हीं अेक नोकर ठेविला होता. त्याचें नांव भानू. भानूचें वय तीसपसतीस वर्षांचें असेल. शरीरानें धिप्पाड आणि धडवाकट. मूळचा कोंकणचा रहिवासी. पगार भरपूर मिळाला म्हणजे या लोकांची दुसरी कसलीच कुरकुर नसते. सकाळीं सहा वाजल्यापासून रात्रीचे आठ-दहा वाजेपर्यंत काम करावयाचा. आम्हीं त्याला अेक लहानशी झोंपडी बांधून दिली होती. तेथें तो हाताने स्वयंपाक करून जेवी आणि रात्रीचा निजे. भानूनें भांडी घांसावीं, पुरुषांचे कपडे धुवावेत, गाडी हांकावी, गाडी धुवावी, बैलांना चोळावें, झाडलोट करावी, अंथरुणें घालावींत, दिवे साफ करून त्यात तेल घालावें आणि कोठें कांहीं विशेष निरोप पाठवावयाचा असला, चिठ्ठी द्यावयाची असली, तर तेंहि काम करावयाचें. त्याच्या गांवीं त्याची स्वतःची थोडी शेती होती आणि डोक्यावर कर्ज होतें. तेव्हां आमच्या घरीं नोकरी करून, फक्त पोटापुरते पैसे खर्च करून, बाकीचे मनीऑर्डरीनें घरीं पाठवीत असे. त्याचा स्वतःचा खर्च तीन साडेतीन रुपयांहून जास्त होत नसे.

अेके दिवशीं मी भानूची झोंपडी पहावयाला गेलों. त्याचे वैभव म्हणजे चार गाडगीं आणि अेक खापर ! स्वयंपाकाची पळी म्हणजे नारळाच्या करवंटींत बांबूची मूठ बसविलेली. माझेकडून त्याचे घरची हकीगत अैकून वहिनींचें अंतःकरण द्रवले. तेव्हांपासून घरांत स्वयंपाकांत कांहींना कांहीं अुरावयाचेंच आणि भानूला दशमी, भाकरी, भाजी, लोणचें, कांहींतरी मिळावयाचेंच.

भानू म्हणजे मूर्तिमंत पक्षपात. घरच्या अितर लोकांचे कपडे तो कसेबसें धूत असे. पण वडिलांच्या कपड्यांवर किती मेहेनत घ्यावी, याची कांहीं मर्यादाच नसे. वडिलांच्या कपड्यांच्या खालोखाल माझ्या कपड्यावर त्याची मेहेरनजर असे. मी त्याचेशीं विशेष चांगला वागत होतों किंवा मी त्याला विशेष आवडत होतों, अशांतला भाग नव्हता. माझ्यापेक्षां माझ्या कपड्याचीच काळजी त्याला अधिक.

याचें प्रथम मला आश्चर्य वाटे. अेके दिवशीं याचे कारण अचानक माझ्या ध्यानांत आलें.

हाय स्कूलला जाण्यासाठीं कधीं कधीं मी वडिलांच्या बरोबर गाडींतून जात असें. सुट्टीचे वेळी त्यांच्या कचेरींतहि जाऊन बसत असे. आमचें सरदार्स हायस्कूल आणि कलेक्टरची कचेरी अेकमेकांपासून फार दूर नव्हत्या. भानूनें विचार केला कीं, कलेक्टरच्या कचेरींत आणि हाय स्कुलांत त्याच्या जातीचे जे थोर लोक चपराशी किंवा पट्टेवाला म्हणून काम करीत, त्यांनीं जर माझे कपडे मळके पाहिले तर त्याची किंमत खाडकन् कमी व्हावयाची. अंमलदाराच्या घरींच काम करण्यासाठीं भानूचा जन्म होता. पट्टेवाल्यांच्या शिफारसीनेंच त्याला असली नोकरी मिळावयाची. आमच्या घरीं लागला होता तो देखील दशरथ पट्टेवाल्याच्या शिफारसीनेंच. माझे कपडे पाहून जर त्याला त्याचेकडून ठपका मिळाला, तर त्याला तोड दाखवावयाला जागा रहावयाची नाहीं. अेवढ्याच साठीं तो काळजी घेत असे.

भानूच्या जगांत माझे वडील हे मध्यवर्ती सूर्य. अितर सर्वांनीं ग्रह-अुपग्रहाप्रमाणें त्यांच्या भोंवतीं फिरलें पाहिजे, अशी त्याची अपेक्षा. कारण त्याच्या कल्पनेप्रमाणें बाकी सर्व वडिलांचे आश्रित. वडिलांचे काम करीत असला तर दुसऱ्या कोणाकडे लक्ष्य द्यावयाचा नाहीं. मी जर आंघोळीला गेलों असलों आणि त्याच वेळीं वडील जर भानूला म्हणाले, "कीं आंघोळीची तयारी कर" तर कधीं तो वडिलाना सांगावयाचा नाही, "की दतूअप्पा आंघोळीला अुतरले आहेत." तो सरळ येअून मलाच सांगावयाचा, "साहेब आंघोळीला येत आहेत, तुम्ही व्हा बाजूला."

भानू आमच्या घरीं आल्यापासून आम्ही देखील वडिलांना साहेब म्हणूं लागलों. अगदीं लहानपणीं आम्ही वडिलांना दादा म्हणत असूं. अिंग्रजी शिकूं लागल्यानंतर पत्रांत त्यांना *My Dear Papa* असेंहि लिहीत असूं. तेव्हां भानूनें आमच्या तोडीं साहेब शब्द दृढ केल्यास आश्चर्य कोणतें? भानूमुळें घरचे आम्ही सर्व वडिलांशीं जास्त अदब ठेवावयास शिकलों. त्यापूर्वी स्वाभाविक प्रेम आणि आदर हीं होतींच; पण अदबीच्या नियमांचा विस्तार आमचे जवळ नव्हता. वडिलांचें ताट आणि त्यांचा तांब्या घासण्याची माती देखील तो निराळी ठेवीत असे. जी जीं भांडीं वडील वापरीत असत, तीं तीं अगोदर धुअून, पुसून निराळीं ठेवून देत असे. मग बाकीच्या भांडयांना तो हात लावी. वडिलांच्या सर्व सोयी संभाळून मग जें कांहीं अितर काम होअूं शकेल तेवढेंच करण्याचें स्वतःचें कर्तव्य

आहे, अशी त्याची कल्पना होती. आम्हां सर्वांमध्यें वडिलांचेविषयीं स्वाभाविक अुत्कट प्रेमादर असल्यामुळें भानूच्या या वृत्तीचें आम्ही कौतुकच करीत असूं. त्याला आळस असा ठाअूक नव्हता. मेहनत करण्यांत त्याला खूप आनंद वाटतो असेंच दिसून येअी. त्याच्या बोलण्या-चालण्यांत अेकच विषय, घरची व्यवस्था आणि वडिलांची सोय. त्याच्या बोलण्या-चालण्यावरून कोणालाहि असेंच वाटावे की, या अुभ्या जगांत त्यांचें दुसरे कोणी नाहीं.

पण त्याचे दोस्त नव्हते असें नाहीं. निरनिराळ्या ठिकाणीं काम करणारे त्याच्या जातीचे अनेक दोस्त होते. महिन्यांतून अेक दिवस तो सर्वांना भेटावयास जाअी. पण आमच्या घरीं त्याच्या दोस्तांविषयीं त्याच्या तोंडून कधीं अेक शब्दहि निघाला नाही. जणूं काय कट करणाऱ्या अेकाद्या गुप्त संस्थेचा सभासदच ! मित्रांना भेटण्याचे त्यांचें नियमितपणें चाललेले पाहून मीं अनुमान केले, कीं या लोकांचा भेटण्याचा अेकादा दिवस मुकर झालेला असावा. याला जेव्हा मी अनेक प्रश्न करून माहिती काढली, तेव्हा समजले की, खरोखरच महिन्याच्या अेका ठराविक तारखेला ते अेकत्र जमत सहभोजन करीत. अेकमेकांच्या सुखदुःखांची वास्तपुस्त करीत. अेकाद्याला काम नसलें, तर कोठे कोठे नोकरी मिळण्याचा संभव आहे, याची त्याला बातमी देत. अेकाद्याचा साहेब त्याच्यावर नाराज झाला असला तर त्याचा दोस्त आपल्या साहेबाच्या मार्फत त्याच्या साहेबाला समजावून सागण्याचें काम आपल्या शिरावर घेअी. थोडक्यांत सागावयाचें म्हणजे " फ्री मॅसन " प्रमाणें या नोकरांची नाव नसलेली ती अेक सस्थाच होती. अेका सणाच्या दिवशी–कोणता तें मी विसरलों–ते सगळे मिळून दारू पीत. सामान्यपणें या लोकांना दारूचें व्यसन नसतें. पण वर्षातून अेकदां त्या ठरलेल्या दिवशी जातीसाठीं म्हणून दारू प्यावीच लागते. आणि पितात तेव्हां अितकी कांहीं पितात की बेहोष होअून जातात. दुसरे दिवशी कामावर हजर झाले म्हणजे अगदीं मार खाल्लेल्या चोरासारखे दिसतात.

हे नोकर जितके दिवस ज्याच्या घरी रहातील तितके दिवस त्या मालकाशी अगदी निष्ठेनें रहातात. घरची कोणतीहि गोष्ट त्यांचे तोंडून बाहेर फुटणार नाही. धन्याविषयीं बोलतील तें केव्हांहि बरेच बोलतील. अेकाची नोकरी सोडून दुसऱ्याचे घरीं राहिले तर तेथें देखील पहिल्या मालकाच्या घरच्या गोष्टी बोलावयाचे नाहीत. त्यांच्या तत्त्वाप्रमाणें रहस्य म्हणजे रहस्य. मात्र त्यांच्या त्या मासिक सभेमध्यें

सगळे नोकर गोळा झाले कीं तेथें मात्र कोणतीहि गोष्ट खासगी नसते. शहरांतील मोठ्या लोकांच्या सर्व लहान गोष्टींची तेथें चर्चा व्हावयाची. आज विचार करतांना वाटतें कीं, या लोकांचा विश्वास मिळवून सभेचा सभासद होतां आलें तर समाजशास्त्राचें अध्ययन करण्यासाठीं तेथें किती तरी असाधारण महत्त्वाचा मासला मिळावयाचा.

भानू अभिमानदार होता. आपण अभिमानदार आहोंत याचा त्याला अभिमानहि होता. शिष्टाचार, अदब, वगैरे त्याला अुत्तम ठाअूक. त्यांचें पालनहि तो बिनचूक करी. पण शहरी नोकरांची ही अदब म्हणजे वरून धारण केलेला भलेपणा असतो. हा भलेपणा आंत मुरलेला नसतो. शहरी शिष्टाचार कधीं कधीं आंगील हलकेपणा झांकण्यासाठीं धारण केलेले अेक प्रकारचें कवच असतो.

अेके दिवशीं साबूचा अेक मोठा तुकडा अेकाच दिवसांत संपून गेलेला पाहून मीं भानूला विचारलें, "अेवढा साबू अेका दिवसांत कसा संपून गेला?" (नोकरांना निष्कारण साबू जोरजोरानें घासून जरूरीपेक्षां अधिक खर्च करण्याची संवय असते. ती सुधारावी म्हणून त्याला मीं प्रश्न विचारला.) भानूला माझा प्रश्न सहन झाला नाहीं. शिष्टाचाराची वरची खाली पडून गेली आणि तो म्हणाला, "मीं तुमचा साबू खाअून टाकला कीं काय?" अितक्यांत वडील तेथें आले. त्यांनीं भानूचें अुत्तर अैकलें. त्यांनीं विचारलें, "भानू, काय गोष्ट आहे?" भानूचा घुस्सा अुतरला नव्हताच. त्यानें पुन्हां म्हटलें, "मीं यांचा साबू खाल्ला नाहीं; साहेबांच्या आणि यांच्या कपड्यांनाच वापरून टाकला." वडील म्हणाले, "अुद्धटपणानें जबाब देणारा नोकर कसा चालेल?" त्याला घरांतून काढून लावण्याचा कोणाचाहि विचार नव्हता. पण त्याला वाटलें कीं आपणाला फुरसत मिळाली आहे. कपडे चढवून तो चालता झाला.

घरीं गेला आणि त्याला पश्चात्ताप झाला. दुसरे दिवशीं दशरथ येअून विचारूं लागला, "साहेब, भानूची काय कसूर झाली होती? त्याला बडतर्फ कां केला?" वडील म्हणाले, "आम्हीं कांहीं त्याला कामावरून काढले नाहीं. त्याला जर कामावर यावयाचें असेल तर खुशाला येअूं दे." दुसरे दिवशीं भानू परत आला आणि पहिल्यासारखें काम करूं लागला. भानूनें निष्कारण साबू जास्त वापरला किंवा त्या दिवशीं जास्त कपडे धुवायला पडले होते हें समजून घेण्यासाठींच त्याला मीं प्रश्न विचारला होता. भानूला

आम्हीं ज्या तऱ्हेनें घरीं ठेवला होता, त्यावरूनच त्याला समजावयाला हवे होतें की त्याचेवर संशय घेण्याचा प्रश्नच नव्हता. त्या दिवसापासून भानूनें कधींहि साबूसंबंधानें गोष्ट काढली नाहीं. जणुं कांहींच झालें नाहीं अशा रीतीनें तो वागूं लागला.

आपले नोकर अशा रीतीनेंच क्षमा मागत असत. प्रत्यक्ष शब्दांनीं त्यानें क्षमा मागितली नव्हती. वचनापेक्षां वृत्ति आणि कृति या अधिक अर्थपूर्ण असतात.

भानूदेखील घरच्या व्यवस्थेत कधीं फेरफार सुचवीत असे. अमुक केलें तर अितके पैसे वांचतील वगैरे योजना तो आमच्यापुढें माडावयाचा. पण त्या सर्वांच्या मुळाशीं वडिलांची सोय आणि आराम हा अेकच विचार असावयाचा. अितर कोणाला अडचण सोसावी लागली तर त्याची त्याला पर्वा नव्हती. त्याला वाटे, अितका खर्च वांचतो तर लोकांनीं अडचण सोसलीच पाहिजे. त्याच्या अर्थशास्त्रामध्यें अपवाद काय तो वडिलांचा; आणि कांहीं अंशी आअीचा. त्याचेसाठीं सगळें आहे. बाकी सगळे त्याच्या दृष्टीनें आश्रित. हळू हळू घरीं भानूची प्रतिष्ठा वाढली. बाजारांतून वस्तू आणावयाच्या, किरकोळ खर्च करावयाचा, धोब्याला रागे भरावयाचें, हजामाला वेळेवर बोलावून आणावयाचे. भानूनें सांगितलें म्हणजे कपडे बदललेच पाहिजेत. भानू म्हणेल तेव्हां हजामतीला बसलें पाहिजे. भानू आणील ती भाजी खाल्ली पाहिजे. जी भाजी चांगली म्हणेल, ती आम्हांला आवडलीच पाहिजे. आम्हीं सांगितलें असो वा नसो, अमुक फळें घरांत यावयाचींच. भानूच्या व्यवस्थेनें आम्ही सर्व संतुष्ट होतों.

सरकारी नोकरीमुळें वडिलांना सावंतवाडीला जावे लागे. त्या संस्थानची व्यवस्था त्या वेळीं अिंग्रज सरकारच्या हातीं असल्यामुळें तिकडील हिशेबाची देखरेख करण्यासाठीं दरवर्षी अेक ब्रिटिश अंमलदार जात असे. अेके वर्षी वडिलांना अन्वेषक म्हणून सावंतवाडीला जाअून रहावे लागले. भानूला वडिलांचे बरोबर जावें असे वाटणे स्वाभाविक होतें. पण देशी संस्थानामध्ये ब्रिटिश अंमलदार गेले म्हणजे त्यांच्या सेवेत अितके कांहीं नोकर ठेवण्यांत येतात की, भानूची तेथें कांहीच जरूरी नव्हती. तेव्हां बाबा म्हणाला, "भानूला बेळगुंदीस पाठवून द्या. तो हुशार आहे, मेहनती आहे आणि विश्वासपात्र आहे. मला त्याचा पुष्कळ अुपयोग होअील." विठूचें मतहि तसेंच होतें. खेडेगांवांत रहावयास मिळालें तर

भानूला नकोसें होतें असें नाहीं. तेव्हां कोणतीहि अडचण अुपस्थित न होतां बाबाचा प्रस्ताव सर्वानुमतें पास झाला.

मी वडिलांचे बरोबर सावंतवाडीला गेलों होतों. तेथून अेक महिन्यानें परत बेळगुंदीला येअून पहातों तर विठूचें आणि भानूचें आपआपसांत बनत नाहीं. दोघेहि मनानें चांगले. दोघेहि निष्ठावान्; पण दोघांचे आदर्श निराळे.

वडिलांना सावंतवाडीहून परत येण्यासाठीं गाडी हवी होती. सावंतवाडीहून बेळगांव म्हणजे बासष्ट मैलांचा प्रवास. रस्त्यांत आंबोली घाट लागतो. रस्ता फारच सुंदर आहे. विठोबानें बाबाला म्हटलें, "शेताचें काम फार जरूरीचें आहे. मी कांही माझे बैल देणार नाहीं. साहेबांना लिहा कीं, तिकडून भाडयाची गाडी करून या. भाडें थोडें जास्त पडेल; पण माझ्या कामाची खोटी करून चालावयाची नाही."

भानूनें चिडून म्हटलें, "मोठा आला आहे कारभारी! मालकाची अडचण जास्ती की शेतीची? मालकासाठीं शेती कीं शेतीसाठीं मालक? मी बैल आणि गाडी घेअन जाणारच. साहेबांचें पत्र आलें आहे, दिसत नाहीं का?"

दोघेहि जण बाबाच्या तोंडाकडे पाहूं लागले. बाबासमोर तिसराच प्रश्न होता; निष्कारण पडणारे भाडे वांचवावे किंवा शेतीची अडचण पहावी या प्रश्नापेक्षां दोन निष्ठावान् सेवकांची मर्जी कशी सभाळावी, हाच त्याचेपुढें मोठा प्रश्न होता. शेवटीं काय केले पाहिजे हें ठरविण्याचे अेवजीं त्यानें दोघांचें म्हणणें सविस्तर अैकण्याचे ठरविलें. हट्टाला पेटलेले दोघेहि आपापली दृष्टि समजावूं लागले. बाबा म्हणजे तत्त्वज्ञानी. धर्म, समाजशास्त्र, नीतिशास्त्र आणि अर्थशास्त्र यांच्याच जगांत तो वावरत असे.

त्यांची ही चर्चा चालली होती अितक्यांत मी बाहेर गेलों आणि बेळगुंदींतूनच आठ दिवसांसाठीं दोन बैल भाडयाने घेअून आलो आणि म्हणालों, "भानू, हे घे दोन बैल विठूचे बैल तुला मिळणार नाहींत. घरची धमणी आहे ती तूं घेअून जा. तुझेबरोबर विठूचा भाअू देखील येअील." झालें. तसेंच ठरले. कारण घरीं जरी मी सगळ्यांत धाकटा होतों, तरी वाटेल ती सत्ता हातीं घेण्याची मला संवय होती. मीं हुकूम केला कीं, तो शेवटचा. लहानपणीं घरीं मला सगळेजण व्यवहार-चतुर समजत. कॉलेजमध्यें गेल्यानंतर मात्र माझें सगळें चातुर्य वितळलें.

दोघांमधील तकार टळली. पण जी तेढ पडली ती मात्र सरळ झाली नाहीं ती

नाहींच. विठू कुटुंबाचा विचार करी आणि भानू फक्त धन्याचा. आणि मौज ही कीं खुद्द आमच्या घरांत कुटुंब आणि धनी अशाप्रकारचें द्वैत नव्हतेंच.

आसपासच्या खेडेगांवांतून व्याजीं दिलेल्या पैशांची किंवा व्याजाची वसुली करण्यासाठीं जेव्हां भानू जाअी तेव्हां तो रयत लोकांवर बरीच सक्ती करीत असे. आणि रकमेबरोबर अेक दोन भोपळे, अेकादा कोहळा, किंवा पांचदहा शेर वांगीं आणल्यावांचून रहात नसे. विठोबाला याची मोठी चीड असे. भानू म्हणावयाचा, "सगळेच सावकार असे घेतात. आपला तो दस्तुर आहे. दस्तुर कसा सोडावयाचा ?" यावर विठोबा म्हणे, "मोठा आला आहे पाटील मला शिकवायला ! मी कांहीं तुझेसारखा कोंकणांतून आलों नाहीं. याच गांवांत माझा जन्म झाला आहे आणि याच सीमेंत माझीं हाडे पुरलीं जाणार आहेत. सगळेच सावकार दस्तुर घेतात तें मला ठाअूक नाहीं कीं होय ? पण बाबानें आमच्या येथें तो रिवाज बंद केला आहे. लोक अुगीच नाहीं त्याला धर्मावतार म्हणत. पांच शेर वांग्यांत चार दिवसांची भाजी तरी होअील का ? अुगाच कां आपल्या सावकाराला बदनाम करतोस ? मग भानू माझ्याकडे येअून म्हणे, "पाहिले, दत्तूआप्पा, या विठोबाला धन्याच्या फायद्यातोट्याची कांहीं फिकीर आहे का ? हे शेतकरी म्हणजे याच्याच जातीचे लोक !"

अेके दिवशीं शेतामध्ये कापणी चालली होती. भात कापून पेंढ्या बांधल्यानंतर जमिनींत जे खुंट रहात त्याचेवर जर पाय पडला तर पायांतून रक्तच निघावयाचें. यामुळें मजुरांना संभाळून दोन रांगांच्या मध्यें पाय ठेवून चालावें लागे. भानूला वाटले, "असे संभाळून चालण्यानें वेळ फुकट जातो आणि काम कमी होतें. यापेक्षां वहाणा घालून काम केले तर झपाट्यानें काम होअील." भानूनें तसें केलें. विठूनें तें पाहिले आणि त्याची आग भडकली ! खेडेगावामध्यें कापणीच्या वेळीं शेतांत वहाणा घालून चालणें अशुभ मानतात. धरतीमातेचा अनादर होतो, शेतांत गोळा केलेल्या लक्ष्मीचा अनादर होतो आणि शेताच्या मालकाचें अशुभ होतें. बेसावधपणे विठूच्या तोंडून शिवी निघाली. भानू त्याला मारावयास धांवला. दोघांची चांगलीच जुंपली असती. पण मी मध्ये पडलों. मीं विठूला चांगलाच ठपका दिला. आणि भानूला म्हटले, "हातांतलें स, काम सोड आणि घरीं जाअन माझें खावयाचें घेअून ये."

संध्याकाळीं धुमीजवळ बसून बाबा दोघांना समजावूं लागला. "समाजव्यवस्थेचे आणि लोकरूढीचे कानूप्रमाणें शिष्टाचार संभाळण्यास तुम्हीं शिकलें पाहिजे."

मूलभूत सिद्धांत तो त्यांना समजावीत होता आणि सेवाधर्माची मीमांसा करीत होता. अस्वलाप्रमाणें गुरगुरत असलेले भानू आणि विठू धर्मावताराचे प्रवचन श्रद्धापूर्वक ऐकत होते. पण हें सगळें पालथ्या घड्यावर पाणी ! दोघेहि जेथे होते तेथेंच. बाबाच्या प्रवचनांतून जी जीं वाक्ये स्वतःला अनुकूल असतील तीं तीं मात्र त्यांनीं आपलींशीं केलीं होती.

नेहमीं दिवसांतून चारचार वेळ भांडणें होत. प्रत्येक वेळेला युक्तिप्रयुक्तीनें आलेला प्रसंग टाळण्यासाठीं मी, किंवा धर्म-चर्चा करून दोघांची समजूत घालण्यासाठीं बाबा नेहमीं हजर कोठून असणार ? यामुळें दोघांच्यामध्ये बरेंच बिनसले. सर्वच त्रासले. दोघांनाहि वाटूं लागलें की, आपली प्रतिष्ठा आतां अुरली नाही. पण घर सोडून जाण्याची कल्पना दोघांपैकीं अेकालाहि होण्याजोगी नव्हती आणि आम्हीहि त्यांना सोडावयास तयार नव्हतों. दोघेहि आपापलें काम बरोबर करीत; पण दोघेहि नेहमी मनांतून दुःखी असत.

सावंतवाडीहून परत आल्यानंतर वडिलांनी तीन महिन्यांची हक्काची रजा घेतली. त्यामुळें आम्ही सर्व बेळगुंदीलाच राहूं लागलों. आतां भानूला आणि विठूला वेगवेगळे ठेवण्याची माझी युक्ति चालण्याजोगी नव्हती. अितक्यांत भानूची आअी वारल्याचे पत्र कोंकणांतून आलें. आतां घरची शेती संभाळणारे त्याच्या घरीं कोणी न अुरल्यामुळें त्याला आमची नोकरी सोडावी लागली. जातांना तो ढळढळां रडला. भानू जात आहे याचें विठोबाला वाअीट वाटलें. विठोबानें त्याला झाल्या गोष्टी विसरून जाण्यास विनविले. तीन दिवस आपल्या घरीं पाहुणा म्हणून ठेवून घेतले आणि शेवटीं गद्गद् कंठानें त्यांनीं अेकमेकांचा निरोप घेतला.

भानू गेल्यानंतर विठोबा कितीतरी वेळां भानूचे गुण वर्णन करीत असे. भानूजवळ मी अमुक शिकलों, तमुक शिकलों हें कबूल करी. स्वतःच्या केव्हां केव्ह साथीदारांना म्हणे,

" भानूबरोबर आपण निष्कारण भांडलों. आतां त्याचें वाअीट वाटतें " पण कधीं कधी असेंहि म्हणावयाचा, " कांहीं झालें तरी भानू शहरांत, शहरांतलीं कामे करून वाढलेला. तो कितीहि हुशार झाला म्हणून काय झालें ? तो आमचेसारखा नव्हेच. शेवटीं पहा सोडून गेलाच ना ? आम्हीच काय ती घरची खरीं माणसें. "

त्यानंतर थोड्याच महिन्यांनी विठू ज्वरानें मरण पावला. त्याची बायको पाट

लावून दुसऱ्या गांवी गेली. विठूला मूलबाळ कांहींच नव्हतें. त्याचा भाऊ, भावाची बायको, वगैरे पुष्कळ वर्षे आमच्या येथे मजुरीला येत परशा आणि सुब्ऱ्या हे लवकरच वारले. गिड्या आणि घुमड्या यांनी मात्र आमच्या घरी पुष्कळ वर्षे काम केलें पण विठूची सर त्यांना नव्हती.

अेकदां सावंतवाडीमध्ये अेका घराला आग लागली. चारी बाजूला आरडाओरडा पसरला. गोष्ट कानीं येतांच काय प्रकार आहे, तें पहाण्यासाठीं आम्ही धांवलों. विठू पट्टेवाला बरोबर होता. दोनचार आळ्या ओलांडून आम्ही आग लागलेल्या जागीं पोहोचलों. घर तर कोलमडून बसूनच गेलें होतें. फक्त भिंतीच शुभ्रा होत्या. अशा घरांत बघण्याजोगे काय असणार ? छपराचीं मोठमोठीं लांकडें भगभग जळत होती. घरांतील सामानसुमान रस्त्यावर अस्ताव्यस्त पडलें होतें. अेक म्हातारी रस्त्यावर बसून कपाळ आपटून घेत होती. कित्येक लोक घराच्या ढिगाऱ्यांतून अजूनहि वांचविण्याजोग्या वस्तू बाहेर खेचून काढीत होते. अितर कित्येक दैववादी लोक कांहीहि न करितां हात जोडून फक्त तोंडानें हळहळत होते. आम्हांला तेथें फार वेळ अुभें रहाणें बरें वाटेना.

आम्ही परत जावयास निघालों अितक्यांत कोणसें म्हणालें "मदतीला धांवून आलेल्या लोकांपैकीं अेक सज्जन जळत्या घरावर चढला होता. पण पाय घसरून आंत पडला. चांगलाच भाजून निघाला. लोकांनीं मोठ्या मुष्किलीनें त्याला बाहेर काढला आणि अिस्पितळांत नेअून टाकला. त्याचें नांव अैकतांच विठू म्हणाला, "अरे, तो तर आपला भगत ! किती चांगला माणूस आहे तो !"

आम्हांला त्या भक्ताला पहाण्याची अिच्छा झाली. मी विठूला म्हणालों, "कोठें आहे तें अिस्पितळ ? आम्हांला घेऊन चल तेथें."

"जेवल्यानंतर दुपारीं गेलों तर ?"

"नाहीं नाहीं. आत्तांच चल. बिचाऱ्याला पाहूं दे तरी."

"पण साहेब रागे भरतील. घरीं जायला अुशीर होअील."

"नाहीं, साहेब नाही रागें भरणार. मी तुला खात्रीनें सांगतों."

आम्ही अिस्पितळांत पोहोंचलो. तेथें अनेक आजाऱ्यांच्यामध्ये भक्ताचें खाटलें (कॉट) होतें. बिचाऱ्याला किती तरी ठिकाणीं पट्टया बांधल्या होत्या. विठूची व त्याची ओळख होती. त्यानें भगताला सांगितलें, "आमच्या साहेबांचे चिरंजीव तुम्हांला पहावयास आले आहेत." भगत बसण्याचा प्रयत्न करूं लागला. आम्हीं त्याला अुठूं दिलें नाहीं. माझ्या मनांत विचार आला, कीं या मनुष्यानें अितकी बहादुरी दाखवली आहे, त्याची आपण कांहीं तरी कदर केली पाहिजे. त्याला वाटलें पाहिजे कीं, या जगांत आपल्या सारख्यांची कदर करणारे लोक आहेत. त्याला बरे वाटेल अशीं वेचक वाक्ये मी मनांत रचूं लागलों. पण काय बोलावें हें सुचेना. कृत्रिम शिष्टाचार मला म्हणाला, "बोल ना कांहीं तरी गोडसे." पण अेकादे वाक्य रचावे अितक्यांत हृदय म्हणे, "हें सगळें पोकळ पोकळ वाटतें." या सर्व मनोमंथनांत मी कांहीं तरी बोललो तर खरेंच; पण असें कांहीं चमत्कारिक वाटले कीं, कोणालाच पुढें काय बोलावें तें सुचेना. भगत कांहींसा गडबडलेला दिसला. आपण आतां कांहीं जगत नाहीं असे त्याला वाटलें होतें. तो म्हणाला, "देवानें माझें नेहमींच बरे केलें. आता जर तो आपल्या घरीं बोलवून नेअील तर तेंहि चांगलेंच होअील."

मी म्हणालों, "भगत घाबरूं नका. पांडुरंग तुम्हांला यांतून बरे करील. तुमची मेहनत फुकट जाणार नाहीं."

भगतला खुशामत करावीशी वाटली किंवा शिष्टाचार आठवला. तो म्हणाला, "तुमचे सारखे मोठे लोक मला पहावयास आले, यांतच सर्व कांहीं मिळून चुकलें."

आतां तेथें अधिक वेळ अुभें रहाण्याजोगे नव्हतेंच. घरीं येअून वडिलांना मीं सर्व प्रकार निवेदन केला. अुशीर बराच झाला. तरी वडील विठूला कांहीं बोलले नाहींत. अेक महिन्यानें भगत बरा झाला आणि अीश्वराच्या नाहीं पण स्वतःच्या घरीं परत गेला. हें विठूकडून मला समजलें.

त्या दिवशी घर आणि घरांतले सामान वांचविण्यासाठी भगतानें किती अविश्रांत श्रम केले होते आणि निधडचा छातीनें जळत्या घरांत तो कसा घुसत होता याचीं वर्णनें अनेक लोकांच्या तोंडून मीं पुडे ऐकली.

माझें लग्न होऊन थोडेच दिवस झाले असतील, आम्ही जमखिंडीला गेलों. वडील आमच्या पूर्वीच तेथें पोहोंचले होते. आमच्याबरोबर सामान पुष्कळच होतें, त्यामुळें कुडची स्टेशनवर मला लगेजचे दुप्पट पैसे भरावे लागले हें अजूनहि स्मरणांत आहे. रात्रींच आम्ही बैलगाडींत बसून निघालों. दोन्ही बैल पांढरेशुभ्र आणि धिप्पाड होते. रंगानें, शिंगांच्या आकारानें, मुखमुद्रेंत, चालण्याच्या ढबीत, सर्व प्रकारे दोन्ही बैल अगदीं सारखे होते. अशा जोडीला 'खिल्लारी जोडी' म्हणतात. या बैलांनीं आम्हांला अेका दिवसाच्या आंत पस्तीस मैल पोंचवून दिलें. आम्हांला वाटेंत जेवण्याखाण्यांत जो वेळ लागला असेल तो खरा. जमखिंडीला जातांना वाटेंत तेरदाळ म्हणून सांगली संस्थानचें अेक गांव लागतें. तेरदाळजवळ आम्ही पोहोंचलों, तेव्हां मध्यान्हाचा समय होऊन चुकला होता; अुजव्या बाजूला शेतें दूरवर पसरलीं होतीं. बऱ्याच दूर जवळ जवळ क्षितिजाजवळ अेक मोठी नदी वहात होती. पाण्यावर दुपारच्या अुन्हाचा मारा होत असल्यामुळें तें चमकत होतें आणि किती जोरानें वहातें याचीहि कल्पना होत होती. अेवढया मोठया सुंदर नदीच्या कांठीं झाडें तुरळक कां, यार्चे मला कोडेंच पडलें. मीं गाडीवाल्याला विचारलें, "या नदीचें नांव काय ? केवढी मोठी नदी आहे ही ! कृष्णा नदी तर नव्हे ?" गाडीवान हंसला.

" इथें नदी कोठची, साहेब ? हें मृगजळ आहे, पाण्याचा हा देखावा पाहून बिचारीं हरणें फसतात आणि तहान असह्य झाल्यामुळें अुन्हांत धांवत जाअून तडफडून मरतात. म्हणूनच याला मृगजळ म्हणतात. "

मृगजळाविषयी मी वाचले होतें. पाण्याप्रमाणें मृगजळांत देखील झाडाचे अुलटे प्रतिबिंब पडतें. रणांतून जाणाऱ्या अुंटाच्या पडछाया देखील मृगजळांत अुमटतात, वगैरे माहिती मी वाचली होती. चित्रेंहि पाहिलीं होतीं. पण माझी समजूत होती कीं, मृगजळ मध्य आफ्रिकेंतच दिसतें. सहाराच्या वाळवंटांतील अेकवीस दिवसांच्या मुसाफरीतच असलें अद्भुत दृश्य पहावयास मिळणार. हिंदुस्थानांत देखील मृगजळ दिसतें याची मला कल्पना असती तर मी अितक्या सहज आणि अितका बेमालुम फसलो नसतो. आतां माझ्या ध्यानांत आलें कीं, जसजसे आम्ही गाडींतून पुढें जात होतों, तसतसें हें अुन्हाचें पाणी देखील पुढें पुढें सरकत होतें. माझ्या हेहि नजरेस आले की, पाण्याच्या आसपास हिरवळ मुळीच नाहीं आणि पाण्याचा प्रवाह आसपासच्या जमिनीच्या मानाने खोलांत नसून सपाट जमिनीवरूनच पाणी वहात आहे. पुढें पुढें तर वरील हवेंत देखील अुन्हाच्या तापामुळें अेक प्रकारच्या लहरी अुत्पन्न झालेल्या दिसूं लागल्या. आतां मृगजळ ध्यानपूर्वक पहाण्याचा आणि त्याचें स्वरूप समजून घेण्याचा विशेष आनद वाटूं लागला. बिचारे बैल डोळे अर्धे मिटून स्वतःच्या गतीच्या तालाच्या तंद्रींत अेकसारखे चालले होते. अेकादा बैल चालतां चालतां मुतूं लागला की त्याच्या डोलण्याचा आलेख जमिनीवर पडत असे. पण थोडयाच वेळांत वाळून जात असे. या आलेखाची कल्पना करण्यांत कांहीं वेळ गेला. पण पुन्हां पुन्हां हरिणांच्या पाठी भाजणाऱ्या त्या अुन्हाकडेच लक्ष्य जाअी. अध्यां अध्यां तासानें खुजांतून पाणी घेअून प्यालों तरी तहान भागत नसे.

असें करतां करतां शेवटी तेरदाळ आलें. धर्मशाळा धोंडयांनीं बांधलेली होती. संस्थानी धर्मशाळेच्या अिमारती चांगल्याच असतात; पण अुन्हामुळें ही धर्मशाळा अगदीं भकास दिसत होती. गाडीतून सामान काढल्यानंतर मी तळ्यांत जाअून आंघोळ करून आलों. बरोबर पूजेचे देव होते. त्यांना वेताच्या सांबळींतून बाहेर काढून पाटावर ठेवलें आणि त्यांची पूजा केली. देवामध्यें अेक शाळिग्राम होता. तुळशीच्या पानावांचून तो कसा जेवणार ? ओल्या धोतरानिशीं आणि अुघडया पायानें मी तुळशीपत्राच्या शोधार्थ निघालों. सुदैवानें अेका घराच्या अंगणांत पांढऱ्या कण्हेरीचीं

फुले आणि तुळशीच्या मंजिऱ्या मिळाल्या. दोन प्रहरची वेळ. पोटांत भुकेची आग. पाय भाजत होते आणि डोळे तापून गेले होते. अशा त्रिविध तापांत मी पूजा करावयास बसलों. आणि देवहि कांहीं थोडेथोडके नव्हते. अीश्वर अेक खरा म्हणून कांहीं सगळ्यांच्याच वतीने अेकाच मूर्तीची पूजा करून भागण्याजोगें नव्हतें. सगळे देव ताम्हणांत काढून त्यानां अभिषेक केला आणि त्यांना पुसून जागच्या जागीं बसवलें. स्वतः अुगाळलेले चंदन त्यांना लावलें. धूप, दीप, नैवेद्य, मध्यें पानीयं, सर्व कांहीं यथासांग समंत्रक केले. पूजा करतां करतां डोळ्यापुढें अंधेरी आली. कशी बशी पूजा आटोपली. आणि जेवून मी झोंपी गेलों.

स्वप्नामध्यें हरिणांची टोळी चेडूप्रमाणे अुडत अुडत मृगजळाचे पाणी पिण्यासाठीं धांवत होती. मी त्या हरिणांना कसे रोकणार किंवा कसें समजावणार ?

असेंच अेक मृगजळ दांडीकुचच्या वेळी नवसारीहून दांडीच्या समुद्रकिनाऱ्याला जातांना वाटेत पहावयास मिळाले होतें. हें मृगजळ आहे अशी खात्री असली तरी तेवढया ज्ञानामुळें डोळ्याचा भ्रम यत्किंचितहि कमी होत नाही. वेदान्ती ज्ञान डोळ्यांना कसें पटावे ?

आजकाल कलकत्त्याला देखील डांबरी रस्त्यावर दोनप्रहरच्या वेळीं मृगजळ असे कांहीं चमकूं लागतें की रस्त्यावर पाअूस पडून नुकताच सडा झाला असावा असें वाटूं लागतें. आणि धांवणाऱ्या मोटारीचें प्रतिबिंबहि त्यांत पहावयास मिळतें.

ज्ञान होअूनहि मनुष्य मोहवश कसा राहूं शकतो या प्रश्नाचे अुत्तर देण्यासाठीच अीश्वरानें ही मृगजळाची व्यवस्था केली आहे.

माझ्या पांच वडील बंधूंपैकीं अेकटा आण्णाच बी. अे. पर्यंत पोचूं शकला. बाकीचे सगळे मध्येंच कोठे ना कोठे गळाठले. अिंग्रजी शिक्षणापायीं यथेच्छ खर्च करून देखील त्याचें कोणी चीज केलें नाही, असें पाहून वडील बरेच निराश झाले होते. माझ्या बाबतींत त्यांनीं प्रथमच नक्की करून ठेवले होतें की, दत्तूला कॉलेजांत पाठवावयाचा नाही. मी मनांत चिडत असें. दोष दुसऱ्यांचा आणि शिक्षा मला होते. पण मी कांहींच बोललों नाहीं. जेव्हां मी पहिल्याच वर्षी मॅट्रिक पास झालों, तेव्हां कुठें माझी पत जमली. त्याच वर्षी शाळेची अब्रू संभाळण्यासाठीं आम्ही मॅट्रिकचे तीन विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या स्कूल फायनलच्या परीक्षेला देखील बसलों. या परीक्षेचेंहि तें शेवटचें वर्ष होतें. ( युनिव्हर्सिटीने ती परीक्षा पुढें काढून टाकली, आणि शिक्षणखात्याकडे दिली. ) त्याहि परीक्षेंत मी पास झालों. अेवढेंच नव्हे तर माझा नंबर ठीक वर आला होता. घरी कोणी पहिल्या वर्षी मॅट्रिक झाला नव्हता. आणि मीं पहिल्याच वर्षी दोन परीक्षा पास झालों या आधारावर कॉलेजमध्यें जाण्याची मी मागणी केली. पण वडील कांही केल्या अैकेनात. शेवटीं मी त्यांना म्हणालों, " तुम्हांला ठाऊक आहे की माझें गणित व अिंग्रजी हे दोन्ही विषय चांगले आहेत. मला अिंजीनिअरी लाअीनकडे जाऊं द्या. प्रीव्हिअस परीक्षा ( हल्लींची फर्स्ट अीअर आर्ट )

पास झाल्यावांचून अिंजीनिअरिंग कॉलेजांत घेत नाहीत. अेवढ्याचसाठीं मी अेक वर्ष आर्ट्स् कॉलेजमध्यें जाणार. " माझी ही सूचना अैकून वडिलांना थोडा पाझर फुटला, आणि त्यांनीं मला कॉलेजमध्यें जाण्याची परवानगी दिली.

बी. अे., अेल्अेल्. बी. चा मार्ग सोडून अेल्. सी. अी. चा कोर्स पसंत करण्याच्या मुळाशीं माझी जी विचारशृंखला होती तिची आठवण करतांना देखील लाज वाटते. प्रथम माझा विचार विलायतेला जाऊन बॅरिस्टर व्हावें असा होता. पण वडील बंधूंनीं वडिलांना निराश केलेलें आणि विलायतेचा खर्च वडिलांना झेंपण्यासारखा नव्हताच. मीं मनांत विचार केला, आपणाजवळ भांडवल कोठें आहे कीं आपण व्यापार करूं शकूं ? आणि व्यापारांत प्रतिष्ठा कोठें आहे ? नोकरी करावयाची म्हटली तर पगार मिळून मिळून किती मिळणार ? सरकारी नोकर गबर होतात ते लांच खाऊनच. वकील होऊन लोकांची भांडणे परदेशी कोर्टांत भांडणें आपल्याला रुचत नाहीं. बी. अे., अेल्अेल् बी. होऊन नोकरी धरली तर फार फार तर मामलतदार किंवा मुनसफ होऊं. या लाअीनमध्यें लांच पुष्कळ मिळते खरी; पण तसें करतांना लोकांना छळावें लागतें आणि पदोपदी अन्याय करावा लागतो. आपणाला तें कांहीं पटत नाहीं. याच्यापेक्षां आपण अेल्. सी. अी. व्हावें, हें बरें. पहिल्या तीन नंबरांत जर आपण आलों तर हां हां म्हणतां अिंजीनिअर होऊन जाऊं. मोठमोठे बंगले बांधावे, जंगलांतून रस्ते तयार करावेत, नद्यांवर पूल अुभे करावेत, हा आनन्द तर जन्मभर मिळेल. आणि घोड्यावर बसून सकाळपासून-संध्याकाळपर्यंत फेरफटका करण्याचें सुख मिळेल तें निराळेंच. आणि कौंट्रक्टर लोकांकडून लांच घेतली तर सरकारला फसवल्यासारखें होअील. यांत प्रजेची छळणूक कांहींच नाहीं. अधर्म वृत्तींत देखील मी धर्म-बुद्धीला अवकाश देत आहें याचा अभिमानहि मनांत कमी नव्हता. अशा तऱ्हेचे विचार जरी मनांत घोळत असले, तरी ते कोणाजवळ बोलून दाखविण्याचा हिय्या किंवा वाचाळटपणा माझ्यांत नव्हता.

ज्या दिवशी मी कॉलेजांत जाण्यासाठीं बेळगांवाहून निघालों, त्याच दिवशीं वडिलांना सांगलीहून ट्रेझरी ऑफिसर या नात्यानें तीन लाख रुपये पोलिस पाहऱ्यांत पुण्याला न्यावयाचे होते. पुण्याहून संस्थानासाठीं प्रॉमिसरी नोटा विकत घ्यावयाच्या होत्या. सांगली स्टेशनवर आम्ही भेटलों तेव्हा वडील पुण्याला कां जात आहेत तें मला समजलें. मी वडिलांना म्हणालों, " नोटांचा भाव रोज बदलतो. आपण जर थोडीशी मेहनत केली तर जाहीर झालेल्या भावापेक्षां सस्त्या भावानें आपणाला नोटा विकत

घेतां येतील. सांगली सरकारला जो जाहीर भाव आहे तोच दाखवावा. मध्यें जो नफा राहील तो आपल्याला घेतां येअील. कोणलाहि कांहीं कळणार नाही आणि आपणाला सहज पुष्कळ फायदा पदरांत पाडून घेतां येअील."

वडिलांनीं माझें म्हणणें शांतपणें अैकून घेतलें. निदान त्या वेळीं मला तसें वाटलें. माझ्या बोलण्यानें त्यांच्या मनावर कांहीं आघात होअील अशी मला मुळींच कल्पना नव्हती. मला वाटले, वडील माझ्या सूचनेच्या शक्याशक्यतेचा विचार करीत आहेत

थोड्या वेळानें वडील सद्गदित होअून म्हणाले, "दत्तू, मला वाटलें नव्हतें कीं तुझ्यांत असली हीनता असेल. तुझ्या म्हणण्याचा अर्थ हाच ना कीं माझ्या अन्नदात्याला मीं फसवावे ? धूळ पडो तुझ्या शिक्षणावर. आपल्या कुलदेवानें आपल्याला जी भाकरी दिली आहे तेवढ्यांतच संतोष मानावा. लक्ष्मी आज आहे आणि अुद्यां नाहीं. अब्रूनें राहिलों अखेरपर्यंत म्हणजे सर्व कांहीं मिळवलें. मेल्यानंतर देवासमोर अुभा राहीन त्या वेळीं तेथें मीं काय जबाब द्यावा ? तूं कॉलेजांत चालला आहेस. तेथून शिकूनसवरून शेवटी असेंच करणार ना ? त्यापेक्षां येथूनच परत घरीं गेलास तर काय वाअीट ?"

मी अगदीं गार झालों. आगगाडींत सबंध रात्र मला झोंप आली नाहीं. पहांटे पुण्याला पोहोंचलों, त्या पूर्वीच मी मनाशीं खूणगांठ बांधली कीं हरामाच्या पैशाचा कधीहि लोभ करावयाचा नाही. वडिलांच्या नांवाला बट्टा लावावयाचा नाहीं.

वडिलांना शहरांत सोडून वरील निश्चय बरोबर घेअून मीं फर्ग्युसन कॉलेजांत प्रवेश केला. कॉलेजचें खरे शिक्षण मला सांगली आणि पुणें यांच्या मध्यें ट्रेनमध्येंच मिळालें !

